क्षेमेन्द्रप्रणीत

औचित्य-सिद्धान्त

आणि

औचित्यविचारचर्चा

समीक्षक व संपादक

प्रा. वा. के. लेले, एम्. ए.

वाराणसी.



महाराष्ट्र शासनाने 'मराठी भाषेतील उत्कृष्ट पुस्तकांना पारितोषिके देण्याची योजना १९६७-६८' या योजनेखाली आयोजित केलेल्या स्पर्धांमध्ये प्रौढ वाङ्मय-विभागातील 'समीक्षा आणि सौन्दर्यशास्त्र' या लेखनप्रकारांत रु. १५००/– चा प्रथम पुरस्कार देऊन गौरविलेला ग्रंथ.

क्षेमेन्द्रप्रणीत

औचित्य-सिद्धान्त

आणि

औचित्यविचारचर्चा

समीक्षक व संपादक

प्रा. वा. के. लेले, एम्. ए.,

भारतीय-भाषा-विभाग, काशी हिन्दू विश्वविद्यालय,

वाराणसी.

प्रथमावृत्ती १९६६]

[मूल्य सात रुपये पन्नास पैसे.

प्रकाशक :—

सौ. मालती वामन लेले

अभिजात-ग्रन्थावली-प्रकाशन,

घर नं. बी २७/६५ सी,

दुर्गाकुण्ड, वाराणसी–५ (उ. प्र.)

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :—

बाळकृष्ण शास्त्री

ज्योतिष प्रकाश प्रेस,

काळभैरव मार्ग, वाराणसी–१

अनुक्रमणिका

क्षेमेन्द्रप्रणीत औचित्य-सिद्धान्त

विषय	पृ०
१. संस्कृत साहित्यशास्त्राच्या वैभवाचा काळ	१
२. काश्मीरी 'नजराणा'	३
३. 'यस्मिन्द्वयं श्रीश्च सरस्वती च' (क्षेमेन्द्र-चरित्र)	३
४. 'नीतानि काव्यकुसुमान्यसितानि तानि' (क्षेमेन्द्र-ग्रन्थावली-परिचय)	७
५. 'औचित्यरुचिरा वाणी विधत्ते शतशाखताम्' (क्षेमेन्द्र-ग्रन्थावलीचे वर्गीकरण)	११
६. क्षेमेन्द्राचे 'साहित्यशास्त्र'	२१
७. औचित्यविचारचर्चा—बहिरंग-परीक्षण	३०
८. औचित्यविचारचर्चा—अंतरंग-परीक्षण	७१
९. औचित्यसिद्धान्ताचा महिमा	८०
१०. औचित्यसिद्धान्ताची पुनर्व्यवस्था	८५

क्षेमेन्द्रकृता औचित्यविचारचर्चा

कारिका १—मंगलाचरण	१
कारिका २-३—औचित्य काव्यजीवित	३
कारिका ४—औचित्यावाचून अलंकार-गुण व्यर्थ	५
कारिका ५—औचित्य रससिद्ध काव्याचे जीवित	७
कारिका ६—गुणालंकारही औचित्याधीन	९
कारिका ७—औचित्याचे लक्षण	१०
कारिका ८ ते १०—औचित्याची मर्मस्थाने	११
कारिका ११—पदौचित्य	१३
कारिका १२—वाक्यौचित्य	१७
कारिका १३—प्रबन्धार्थौचित्य	२१
कारिका १४—गुणौचित्य	२७
कारिका १५—अलङ्कारौचित्य	३१
कारिका १६—रसौचित्य	३७

कारिका १७-१८—रससंकरौचित्य ६२
कारिका १९—क्रियापदौचित्य ७३
कारिका २०—कारकौचित्य ७६
कारिका २१—लिंगौचित्य ९०
कारिका २२—वचनौचित्य ९२
कारिका २३—विशेषणौचित्य ९५
कारिका २४—उपसर्गौचित्य १००
कारिका २५—निपातौचित्य १०४
कारिका २६—कालौचित्य १०७
कारिका २७—देशौचित्य ११३
कारिका २८—कुलौचित्य ११५
कारिका २९—व्रतौचित्य ११८
कारिका ३०—तत्त्वौचित्य १२१
कारिका ३१—सत्त्वौचित्य १२३
कारिका ३२—अभिप्रायौचित्य १२७
कारिका ३३—स्वभावौचित्य १३०
कारिका ३४—सारसंग्रहौचित्य १३३
कारिका ३५—प्रतिभौचित्य १३६
कारिका ३६—अवस्थौचित्य १४०
कारिका ३७—विचारौचित्य १४३
कारिका ३८—नामौचित्य १४६
कारिका ३९—आशीर्वचनौचित्य १५२
उपसंहार १५७

परिशिष्ट अ—ग्रन्थस्थ कारिकांची अकारानुक्रमणिका ... १६०

क्षेमेन्द्रप्रणीत

औचित्य-सिद्धान्त

१. संस्कृत साहित्यशास्त्राच्या वैभवाचा काळ—

संस्कृत साहित्यशास्त्रावरील जे ग्रंथ आजमितीस उपलब्ध आहेत त्यांमधील सर्वांत प्राचीन ग्रंथ भरतमुनीचे नाट्यशास्त्र हा होय. ह्या ग्रंथात पाच हजारांहून अधिक कारिका असून त्यांमध्ये नाटकाच्या सर्व अंगोपांगांची सविस्तर, सूक्ष्म व प्रौढ चर्चा करण्यात आली आहे. असा प्रगल्भ शास्त्रीय ग्रंथ एखाद्या धूमकेतूप्रमाणे एकाएकी प्रकट झालेला असणे संभवत नाही. या ग्रंथामागे दीर्घकालीन, सुदृढ व समर्थ परंपरा निश्चितच उभी असली पाहिजे. आणि तशी ती अवश्य होती असे डॉ. काणे[1] व श्री. सूर्यनारायण[2] ह्या दोघा विद्वानांनी दाखवून दिले आहे. त्यांच्या मती वेदोपनिषत्कालीन वाङ्मयात उपमा, अतिशयोक्ती, व्यतिरेक, श्लेष इत्यादी अलंकार आढळून येतात. मंत्रद्रष्ट्या ऋषींना नित्याची व्यवहारातील भाषा व काव्याची भाषा या दोहोंतील फरक जाणवलेला होता. कवीला काव्य रचिताना शब्दांची मार्मिकपणे निवड करावी लागते व काव्य रसिकाला परमोच्च आनंद (निर्वृति) प्राप्त करून देते, हेही वेदकालीन विचारवंतांना प्रतीत झालेले होते. त्यांनी काव्य ह्या शब्दाचा स्पष्टपणे उपयोग केलेला आहे. उपनिषदांमध्येही अनेक काव्यमय व चमकदार कल्पना आढळून येतात. एवंच, वेदोपनिषत्कालीच काव्यविद्येविषयीचा विचार सूक्ष्म प्रमाणात होऊ लागला होता. वेदोत्तरकालीन महाभारत, रामायण इत्यादी आर्ष काव्ये व पाणिनी, वररुची, अश्वघोष इत्यादींच्या रचना ह्या सर्वांवरून इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापूर्वीच काव्यशास्त्रीय विचाराने बराच पल्ला गाठला असल्याचे स्पष्ट होते. आणि असे घडून येणे अगदी स्वभाविकच होते. कारण वेदोत्तरकालीन वाङ्मय वैदिक वाङ्मयाहून प्रेरणा, प्रयोजन व पद्धती ह्या तिन्ही दृष्टींनी भिन्न असल्यामुळे त्याची वेदवाङ्मयाशी तुलना करण्याची इच्छा विचारवंतांच्या मनात निश्चितपणे अंकुरित झाली असली पाहिजे. त्या इच्छेमधूनच

---

१. History of Sanskrit Poetics, 1961, Part II, pp. 326-341.

२. Indian Poetics (Notes mimeographed and preserved in the Banaras Hindu University Library.)—pp. 2-3

साहित्यसौंदर्याच्या समीक्षेचे सिद्धान्त हळूहळू निर्माण होऊ लागले. म्हणूनच खिस्तपूर्व पाचव्या शतकात होऊन गेलेल्या यास्काच्या निरुक्तात उपमेची एक शास्त्रीय व्याख्या उद्धृत केलेली आढळते, खिस्तपूर्व चवथ्या शतकात होऊन गेलेल्या वररुचीच्या वार्तिकात आख्यायिका ह्या वाङ्मयप्रकाराचा निर्देश आढळतो आणि पतंजलीने तर ह्या वार्तिकावर भाष्य करताना तीन आख्यायिका-ग्रंथांचा नामनिर्देश स्पष्टपणे केलेला आढळतो.* एकंदरीने संस्कृत साहित्यशास्त्राची मुळे फार दूरस्थ काळापर्यंत पोचलेली आहेत. तथापी, तत्कालीन कोणताही ग्रंथ आज उपलब्ध होत नसल्यामुळे भरताने नाट्यशास्त्र लिहून संस्कृत साहित्य-शास्त्राचा हरिःॐ केला असे म्हणण्याचा रिवाज पडून गेला आहे. भरतोत्तर काळात संस्कृत साहित्यशास्त्ररूपी प्रवाहाला इतर अनेक प्रवाह येऊन मिळाले व त्यामुळे तो थोडक्याच अवधीत लोकवंद्य † झाला. भरतानंतरच्या काळात काव्याचा तात्त्विक व व्यावहारिक अशा उभयविध दृष्टिकोणांमधून नियमितपणे विपुल व सकस विचार होऊ लागला. ह्याच काळात काव्याचे लक्षण, प्रयोजन, कारण, कविप्रतिभेचे स्वरूप, कवींचे प्रकार, काव्यांचे भाषानिष्ठ इत्यादी प्रभेद, काव्याचे गुण, दोष, अलंकार इत्यादी अनेक घटकोपघटकांची चर्चा होऊ लागली. ह्याच काळात काव्यालंकार, काव्यादर्श, काव्यालंकारसारसंग्रह, काव्या-लंकारसूत्रे, ध्वन्यालोक, काव्यमीमांसा, काव्यकौतुक, वक्रोक्तिजीवित, ध्वन्यालोक-लोचन, दशरूपक, व्यक्तिविवेक, सरस्वतीकंठाभरण, औचित्यविचारचर्चा प्रभृती मौलिक आकरग्रंथांचे प्रणयन झाले. ह्याच काळात काव्यात अलंकार हे सर्वाधिक महत्त्वाचे होत, काव्याचा आत्मा रीती होय, ध्वनी हाचि काव्याचा आत्मा होय, वक्रोक्ती हेच काव्याचे जीवित होय, औचित्य हेच काव्याचे जीवितसर्वस्व होय, ह्या प्रमुख विचारसरणी आविर्भूत झाल्या. एवंच, इ.स. ७०० पासून ते इ.स. ११०० पर्यंत संस्कृत साहित्यशास्त्राचे वैभव चंद्रकलेप्रमाणे उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेले. ह्या चारशे वर्षांच्या काळात अनेक सद्ग्रंथरत्ने निपजल्यामुळे संस्कृत साहित्यशास्त्राला अक्षरशः रत्नाकरत्व[१] लाभले. परंतु, लवकरच ह्या रत्नाकराचे वैभव निस्तेज होण्यास प्रारंभ झाला आणि इसवी सनाच्या सतराव्या शतकाच्या तृतीय पादात लिहिल्या गेलेल्या रसगंगाधर ह्या ग्रंथाबरोबरच ह्या शास्त्राची

* Dr. P. V. Kane-History of Sanskrit Poetics, 1961, Part II. P. 333.

† 'सरितामिव प्रवाहास्तुच्छाः प्रथमं यथोत्तरं विपुलाः । ये शास्त्रसमारंभा भवन्ति लोकस्य ते वन्द्याः ॥ राजशेखर, काव्यमीमांसा, द्वितीय अध्याय.

१. 'सागरः सूक्तिरत्नानां......' । काव्यादर्श १।३४

इतिश्री झाली. मात्र वर दर्शविलेल्या ऐन वैभवाच्या काळात जे महत्त्वाचे साहित्य-शास्त्रज्ञ होऊन गेले त्यांमधील शेवटचा क्षेमेन्द्र होय.

२. काश्मीरी 'नजराणा'

क्षेमेन्द्र हा एक असाधारण ग्रंथकार अकराव्या शतकात होऊन गेला. त्याने आपल्या ग्रंथकर्तृत्वाने संस्कृत साहित्यावर कायमचा ठसा उमटविला. त्याची साहित्यविषयक कामगिरी जितकी विविध व विपुल तितकीच महत्त्वपूर्ण आहे. त्याचा ग्रंथरचनेचा उत्साह उदंड होता आणि परिश्रमांविषयीची निष्ठा अदम्य होती. म्हणूनच नैसर्गिक उज्ज्वल प्रतिभेची देणगी लाभलेली नसतानाही त्याने श्रीसरस्वतीची दिव्य तसेच मानवी प्रयत्नानी उपासना[1] करून चिरंतन कीर्ती मिळविली. त्याने छंदःशास्त्र, काव्यशास्त्र, रसपूर्ण लघुकाव्ये, नीत्युपदेशात्मक काव्ये, उपहासपर काव्ये, सारांशकाव्ये, राजांची पद्यात्मक चरित्रे, कोश इत्यादी विविध विषयांवर आपली कमावलेली लेखणी लीलया चालविली आणि लहानमोठे मिळून सुमारे चाळीस ग्रंथ लिहिले. क्षेमेन्द्राची ही ग्रंथसंपदा केवळ संख्याबहुल नाही तर ती गुणबहुलही आहे आणि म्हणूनच क्षेमेन्द्र हा उल्लेखनीय व वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथकार ठरतो. भामह, उद्भट, अभिनवगुप्त, महिमभट्ट, मम्मट, कल्हण इत्यादींप्रमाणेच क्षेमेन्द्रही काश्मीरी असल्यामुळे डॉ. दे यांचा शब्द वापरून असे म्हणावेसे वाटते की, संस्कृत साहित्यशास्त्राचे माहेरघर (home-land) असलेल्या काश्मीरने क्षेमेन्द्ररूपी बहुमोल नजराणाच सरस्वतीला अर्पण केला !

३. 'यस्मिन्द्वयं श्रीश्च सरस्वती च'

बहुतेक संस्कृत ग्रंथकार स्वतःविषयी जास्त लिहीत नाहीत. क्षेमेन्द्राने मात्र इतके मौन पाळलेले नाही. त्याने आपल्या काही[2] ग्रंथांच्या उपसंहारपर श्लोकांमधून आत्मवृत्तपर माहिती दिली आहे. तसेच क्षेमेन्द्रपुत्र सोमेन्द्र ह्याने क्षेमेन्द्ररचित बोधिसत्त्वावदानकल्पलता ह्या ग्रंथाला एकशे आठावा पल्लव जोडून ग्रंथपूर्ती केली असून सुरुवातीस स्ववंशविषयक काही माहिती दिली आहे[3].

---

१. 'कृत्वा निश्चलदैवपौरुषमयोपायं प्रसूत्यै गिरां
क्षेमेन्द्रेण यदर्जितं शुभफलं तेनास्तु काव्यार्थिनाम् । -कविकंठाभरण ५।३

२. दशावतारचरितोपसंहारश्लोक १-५, बृहत्कथामंजरी-उपसंहारश्लोक ३१-४१; भारतमंजरी-उपसंहारश्लोक १-५, रामायणमंजरी-उपसंहारश्लोक १-७, औचित्यविचारचर्चा-उपसंहारश्लोक १-२.

३. क्षेमेन्द्रकृत 'अवदानकल्पलता'-सं० शरच्चन्द्र दास, १८८८, सोमेन्द्रकृत प्रस्तावना-श्लोक १-५.

ती सर्व विचारात घेऊन असे म्हणता येते की, काश्मीरच्या जयापीड राजाचा (इ. स. ७७९-८१३) नरेन्द्र नामक मंत्री होता. त्याच्या वंशात भोगीन्द्र नावाचा पुरुष जन्माला आला. 'सत्त्वनिधी' भोगीन्द्राला सिंधूसारखा गुणरत्नगणाश्रय असा सिंधु नामक पुत्र झाला. त्याच्या मुलाचे नाव प्रकाशेन्द्र. तो पृथ्वीवरील प्रकाशेन्द्रासारखा असून स्वर्गातील इंद्रासारखा वैभवशाली होता. त्या भद्रमूर्ती महापुरुषाचा हात दानासाठी नेहमीच पुढे केलेला असे. विद्वानांची योग्य संभावना करणे आणि स्वबांधवांना संतोष देणे हे जणू त्याचे व्रतच होते. तो ब्राह्मणांना अन्न, धन, जमीन, गाईंचे कळप, कृष्णाजिने इत्यादी वस्तूंचे वरचेवर दान करीत असे. त्यामुळे सन्तुष्ट झालेले ब्राह्मण त्याची 'तू इंद्रासारखाच आहेस, फरक इतकाच की इंद्र प्रकाशहीन आहे तर तुझ्या ठायी प्रकाश हा अधिकचा गुण आहे,' अशा शब्दांनी स्तुती करीत असत. त्याच्या घरात पवित्र सत्र अखंडपणे चालू असे आणि ब्राह्मणभोजनात किती ब्राह्मण जेवून जात त्याची गणती नसे ! तो निरनिराळ्या याचकांच्या विविध अभ्यर्थना पूर्ण करीत असल्यामुळे त्यांना तो कल्पवृक्षासारखा वाटे. आणि इतका दानधर्म करूनही 'आपण फारच थोडे देतो' असेच त्याला नेहमी वाटत असे. त्याने स्वतःच्या घरात एक ब्रह्मदेव-मंदिर स्थापन केले होते व त्यात देवतांची प्रतिष्ठापना केली होती. तो शिवभक्त असून शेवटी शिवचरणीच विलीन झाला. अशा सधन, धर्मशील, दानशूर, सुसंस्कृत, सुजन व कीर्तिशाली प्रकाशेन्द्राचा मुलगा क्षेमेन्द्र. ह्याने आपल्या कवित्वाच्या योगे विद्वानांचाही परितोष साधला व कवीन्द्र ही प्रतिष्ठा मिळविली. त्याचे काव्य इतके विबुधप्रिय झाले की, त्याचे नाव कविसंमेलनात आदराने उच्चारले जाऊ लागले. त्याने सरस, सामोद काव्यकुसुमे निर्मून* अक्षय कीर्ती संपादन केली. अशा ह्या क्षेमेन्द्राचा जन्म कधी झाला त्याविषयी निश्चित माहिती मिळत नाही. तथापी, क्षेमेन्द्राचे गुरू, आश्रयदाते राजे व ग्रंथांतीचे रचनासमयपर उल्लेख इत्यादी प्रमाणांच्या आधारे क्षेमेन्द्राचा जन्म इ. स. ९९० च्या सुमारास झाला असावा असे त्याच्या ग्रंथांचे सर्वच अभ्यासक[1] मानतात. क्षेमेन्द्राचा मृत्युसनही निश्चित स्वरूपात कोठेही उल्ले

* रामायणमंजरी–उपसंहारश्लोक ७-८.

१. (अ) डॉ० सूर्यकान्त—Ksemendra Studies, 1954, Chap. I, p. 7. (आ) डॉ० पां० वा० काणे—History of Sanskrit Poetics, 1961, Part I, p. 266; (इ) पंडित मधुसूदन कौल—Introduction to the edition of देशोपदेश & नर्ममाला, 1923, p. 20.

खिलेला मिळत नाही. त्यामुळे तोही अनुमानाचाच विषय होऊन बसला आहे. क्षेमेन्द्राचे निधन इ. स. १०६५ नंतर झाले असावे असे पं० मधुसूदन कौल[१] म्हणतात. परंतु त्यांचे हे म्हणणे अमळ शिथिल वाटते कारण क्षेमेन्द्राने स्वतःच आपण दशावतारचरित[२] १०६६ साली लिहिल्याविषयीचा उल्लेख केला आहे. त्यामुळे क्षेमेन्द्राचे निधन १०६६ नंतर झाले असावे असे म्हणणेच जास्त योग्य आहे व डॉ. काणे[३] आणि डॉ. सूर्यकान्त[४] असेच मत देतात. क्षेमेन्द्राने आपल्या बृहत्कथामंजरी, भारतमंजरी इत्यादी ग्रंथांच्या अखेरीस रामयशस्, देवधर, वीर्यभद्र, नक्क, सज्जनानंद, रत्नसिंह इत्यादी मित्रांची व हितचिंतकांची नावे दिली आहेत, त्यावरून त्याचा मित्रपरिवार बराच मोठा असावा असे वाटते. त्याच्या मित्रगणात राजपुत्रांचीही गणना होत असे. रत्नसिंह राजाचा पुत्र उदयसिंह हा क्षेमेन्द्राचा शिष्य असल्याचा उल्लेख औचित्यविचारचर्चेच्या उपसंहार-श्लोकांक दोनमध्ये मिळतो. तसेच लक्ष्मणादित्य नावाचा आणखी एक राजपुत्र क्षेमेन्द्राचा शिष्य असल्याचे कविकंठाभरणाच्या पंचम संधीवरून कळते. क्षेमेन्द्राचे आपल्या ह्या राजपुत्र-शिष्यांशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध असावेत असे वाटते कारण तो त्यांची पद्ये आपल्या ग्रंथांमधून (कविकंठाभरण, पंचम संधी) निःसंकोचपणे उद्धृत करतो. डॉ. सूर्यकान्त[५] चक्रपाल हा क्षेमेन्द्राचा भाऊ होता असे म्हणतात, पण ते चुकीचे आहे. एकतर क्षेमेन्द्राने आपल्या भावाच्या नावाचा कोठेही उल्लेख केलेला आढळत नाही. ज्याने आपल्या मित्रांचाही निर्देश केला आहे त्याने भावाच्या नावाचा निर्देश करण्यास टाळण्याचे काहीच कारण नव्हते. दुसरी गोष्ट अशी की, क्षेमेन्द्राच्या वंशातील 'सिंधु' हे त्याच्या आजोबाचे नाव वगळता बाकीची सर्व नावे 'इन्द्रान्त' असल्याचे आढळते–उदा० नरेन्द्र, भोगीन्द्र, प्रकाशेन्द्र, क्षेमेन्द्र, सोमेन्द्र. चक्रपाल हे नाव असे 'इन्द्रान्त' नाही. तिसरी गोष्ट अशी की, डॉ. सूर्यकान्त कविकंठाभरणातील ज्या वाक्याचा हवाला देऊन चक्रपाल हा क्षेमेन्द्राचा भाऊ होय असे म्हणतात ते वाक्य असे आहे–'यथा चैतद्भ्रातुश्चक्रपालस्य[६]' हे वाक्य पद्कोपजीवी मुक्ताकणाचा 'यथा रन्ध्रं…' इत्यादी श्लोक उद्धृत केला गेल्यावर आलेले आहे. अर्थात्, ह्यातील एतद् शब्द मुक्ताकणाशी अन्वित करावयाचा आहे

१. उपर्युल्लिखित १ इ. २. दशावतारचरित–उपसंहारश्लोक क्रमांक ५.
३. उपर्युल्लिखित १ आ. ४. उपर्युल्लिखित १ अ—p. 8.
५. Kṣemendra Studies, 1954, pp. 8, 10 & 13.
६. कविकण्ठाभरण, द्वितीय संधी.

हे उघड आहे. यावरून चक्रपाल हा मुक्ताकणाचा भाऊ होय असे ठरते. तो क्षेमेन्द्राचा भाऊ नव्हे. (क्षेमेन्द्राने आपल्या भावाचा उल्लेख अस्मद्भ्रातुः असा केला असता.) क्षेमेन्द्र स्वतःला 'सर्वमनीषिशिष्य'[१], असे म्हणवतो ह्यावरून त्याचे शिक्षण अनेक गुरूंच्या हाताखाली झाले असावे असे वाटते. त्याने आपल्या गंगक[२], अभिनवगुप्त[३] व सोमपाद[४] ह्या तीन गुरूंच्या नावांचा उल्लेख स्पष्टपणे केलेला आढळतो. पैकी गंगकाच्या हाताखाली क्षेमेन्द्राने कोणत्या विषयाचे अध्ययन केले ते कळावयास साधन नाही. परंतु, अभिनवगुप्ताच्या हाताखाली त्याने साहित्यशास्त्राचे अध्ययन केल्याचे तो स्वतःच म्हणतो[५]. सोमपाद हा क्षेमेन्द्राचा आध्यात्मिक गुरु असावा. क्षेमेन्द्राचे वडील प्रकाशेन्द्र हे कट्टर शैव असल्याचा उल्लेख वर आलाच आहे. क्षेमेन्द्राचा एक गुरू अभिनवगुप्त हा काश्मीरी शैवदर्शनाचा एक मोठा आचार्य होता. अशा प्रकारे शैव पित्याच्या पोटी जन्मून व शैव गुरूच्या हाताखाली शिकूनही क्षेमेन्द्र अनेक ग्रंथात विष्णूचीच स्तुती[६] करताना आढळतो. ह्यावरून भागवताचार्य सोमपादाच्या शिकवणुकीचा क्षेमेन्द्रावर चांगलाच प्रभाव पडल्याचे दिसून येते. क्षेमेन्द्राने बृहत्कथामंजरी लिहून ग्रंथलेखनाचा श्रीगणेशा गिरविला (इ. स. १०३७). त्या बृहत्कथामंजरीत तो स्वतःला नारायणपरायण[७] म्हणवून घेतो. त्याच्या मनांतील ही नारायणभक्ती उत्तरोत्तर बळावतच गेलेली दिसते. कारण जे दशावतारचरित लिहून क्षेमेन्द्राने आपली लेखणी खाली ठेवली त्या दशावतारचरिताच्या सुरुवाती-सुरुवातीलाच तो एखाद्या जातिवंत वैष्णवाला साजेसे पुढील उत्कट, भक्तिपूर्ण उद्‍गार काढतो—

> 'संतोषो यदि किं धनैः सुखशतैः किं यत्नायत्तता ।
> वैराग्यं यदि किं व्रतैः किमखिलैस्त्यागैर्विवेको यदि ॥
> सत्संगो यदि किं दिगन्तगमनप्रस्थानतीर्थश्रमैः ।
> श्रीकान्ते यदि भक्तिरप्रतिहता तत्किं समाधिक्रमैः ॥'[८]

---

१. औचित्यविचारचर्चा, उपसंहारश्लोक २. २. औचित्यविचारचर्चा, कारिका ३९ खालील उदाहरणश्लोकारंभ. ३. (अ) बृहत्कथामंजरी उपसंहारश्लोक ३७. (आ) भारतमंजरी-हरिवंशोपसंहारश्लोकांक ८. ४. बृहत्कथामंजरीउपसंहारश्लोक ८.

५. 'श्रुत्वाभिनवगुप्ताख्यात् साहित्यं बोधवारिधेः । आचार्यशेखरमणेर्विद्याविवृतिकारिणः ॥'—उपर्युल्लिखित ३ अ. ६. औचित्यविचारचर्चा, दशावतारचरित, रामायणमंजरी इत्यादी ग्रंथांची मंगलाचरणे. ७. उपसंहारश्लोकांक ८.

८. दशावतारचरित, मत्स्यावतार, श्लोकांक १५.

आणि म्हणूनच क्षेमेन्द्र आमरण वैष्णव राहिला हे डॉ० सूर्यकान्तांचे[१] म्हणणे पटते. क्षेमेन्द्र स्वतःला व्यासदास म्हणवून घेतो. त्याच्या मनात व्यासांबद्दल नितान्त आदरभावना आहे; तो त्यांचा उल्लेख नेहमी 'भगवान् व्यास' ह्या शब्दांनी करतो. त्याने त्यांच्या स्तुतिपर एक व्यासाष्टकस्तोत्रही रचिले आहे. क्षेमेन्द्राचे कुलशील, त्याची गुरुपरंपरा, त्याची विष्णुभक्ती, त्याला व्यास-वाल्मीकींबद्दल वाटणारा आदर, त्याचे शिक्षण, त्याची नीत्युपदेशात्मक व धार्मिक ग्रंथरचना, तीत अभिव्यक्त झालेली त्याची अभिरुची, त्याने अनेक[२] ग्रंथांच्या अखेरीस काढलेले, 'माझे पुण्य वाचकांना मिळो' ह्या आशयाचे उद्‌गार इत्यादी सर्व गोष्टी लक्षात घेतल्या की, क्षेमेन्द्राचे वर्तन आदरणीय नव्हते असा जो ठपका डॉ० सूर्यकान्त[3] त्याला देतात, तो अन्यायकारक वाटतो.

४. 'नीतानि काव्यकुसुमान्यसितानि तानि ।' *

वर म्हटलेच आहे की, क्षेमेन्द्राने विविध विषयांवर विपुल लेखन केले आहे. त्याच्या वाणीची झेप जबरदस्त होती आणि तिला चौफेर व सूक्ष्म निरीक्षणाची जोड लाभली होती. त्यामुळे क्षेमेन्द्राने संस्कृत वाङ्मयाचे एकही दालन अलंकृत करावयाचे बाकी ठेवले नाही. क्षेमेन्द्र व्यास व वाल्मीकी यांच्याप्रमाणे स्फूर्तिदाता होता[४] हे डॉ० सूर्यकांतांचे म्हणणे अतिशयोक्तीचे म्हणून उपेक्षिले तरी संस्कृत साहित्यविश्वात क्षेमेन्द्राचे स्थान असाधारण आहे[५] हे त्यांचे म्हणणे पटण्यासारखेच आहे. कारण क्षेमेन्द्राच्या वाणीने सारस्वताच्या अनेक दालनांमधून अक्षरशः अनन्यपरतंत्रपणे विहार केला आहे. ती कधी कवीच्या तर कधी नाटककाराच्या, कधी तत्त्वज्ञाच्या, तर कधी विलासी पुरुषाच्या, कधी कोशकाराच्या तर कधी इतिहासपंडिताच्या, कधी भक्ताच्या तर कधी साहित्यशास्त्रज्ञाच्या परिवेषात तत्कालीन रसिकांसमोर वावरली. ती सर्वतोगामी व सर्वरस होती. तिची अनेक दालनांत उमटलेली 'पाऊलचिन्हे' अद्यापी पाहावयास मिळतात ! मात्र क्षेमेन्द्राच्या लेखणीने नेमके किती ग्रंथ प्रसविले ते आजमितीसही सांगणे कठीण आहे. आजपावेतो त्याचे अनेक ग्रंथ प्रकाशित झाले असले तरी अद्यापी बरेच ग्रंथ हस्तलिखित स्वरूपात पडून आहेत.

१. Kṣemendra Studies, 1954, p. 15

२ (अ) कविकण्ठाभरण ५।३, (आ) चतुर्वर्गसंग्रह ४।२९, (इ) दशावतारचरित-उपसंहारश्लोक ४. ३. Kṣemendra Studies, 1954, p. 12, ४. तत्रैव-p.5.

* रामायणमंजरी-उपसंहारश्लोक ८.

५. Kṣemendra Studies, 1954, p 33

त्यामुळे क्षेमेन्द्र-साहित्याच्या अभ्यासकांची एतद्विषयक भिन्न-भिन्न मते दिसून येतात. उदाहरणार्थ, डॉ० सूर्यकान्त क्षेमेन्द्राचे ग्रंथ बत्तीस असे एकदा[१] म्हणतात व आजमितीस चौतीस ग्रन्थ क्षेमेन्द्राच्या नावावर दाखल केले गेले आहेत असे अन्यत्र[२] म्हणतात ! चौतीस ह्या संख्येस 'सुभाषितरत्नभांडागारम्' चे संपादक नारायण राम आचार्य[३] दुजोरा देतात. डॉ० दे क्षेमेन्द्राच्या[४] सदतीस ग्रन्थांची यादी पुरवितात. तर डॉ. काणे[५] क्षेमेन्द्राने भारतमंजरी व बृहत्कथामंजरी ह्यांखेरीज सुमारे चाळीस ग्रन्थ लिहिले असे म्हणतात. श्री. ई. व्ही. व्ही. राघवाचार्य व डी. जी. पाध्ये हे क्षेमेन्द्रलघुकाव्य-संग्रहाचे संपादक[६] क्षेमेन्द्राने जवळजवळ चाळीस ग्रन्थ लिहिले असेच म्हणतात. एवंच, क्षेमेन्द्राच्या ग्रन्थकृतींची संख्या बत्तीस ते चाळीसच्या दरम्यान आहे, एवढेच निश्चयाने म्हणता येते ! संख्यानिश्चिती करणे दुष्कर असल्यामुळे व ते प्रस्तुत लेखनाचे प्रयोजनही नसल्यामुळे क्षेमेन्द्राच्या ग्रंथांची जी यादी डॉ० दे यांनी दिली आहे ती ग्राह्य मानून चालवयास हरकत नाही. त्या यादीस अनुसरून आता क्षेमेन्द्राच्या ग्रन्थांचा परिचय करून घेऊ—

१. **अमृततरंग**—देव व पूर्वदेव ह्यांनी क्षीरसागराच्या केलेल्या मंथनाच्या घटनेवर आधारित लघुकाव्य, अशी ह्याची माहिती क्षेमेन्द्रलघुकाव्यसंग्रहाचे संपादक[७] पुरवितात. ह्यातील एक पद्य ('आवर्तशोभी पृथुसत्त्वराशिः···' इ.) कविकंठाभरणाच्या पंचम संधीत तुरगलक्षणपरिचयाचे उदाहरण म्हणून दिलेले आढळते. २. **औचित्यविचारचर्चा**—क्षेमेन्द्राने औचित्य हे काव्याचे जीवित होय हा आपला महासिद्धान्त मांडण्यासाठी काश्मीरच्या अनंतराजाच्या कार-कीर्दीत[८] (इ. स. १०२८–१०६३) लिहिलेला स्वतंत्र[९] व मौलिक ग्रन्थ. ग्रन्थात मंगलाचरणासह एकूण ३९ कारिका असून कारिका क्रमांक ५, ७ व ८ ते १० ह्यांमध्ये अनुक्रमे औचित्य हे रससिद्ध काव्याचे स्थिर व अविनश्वर जीवित आहे, औचित्य म्हणजे उचिताचा भाव आणि औचित्याची काव्यगत

१. Kṣemendra Studies, 1954, p. 1. २. तत्रैव p. 28.

३. सुभाषितरत्नभांडागारम् (१९५२), Abbreviations & Sources, पृ० २.

४. History of Sanskrit Poetics, 1960, Vol. I, p. 132-133.

५. History of Sanskrit Poetics, 1961, Part I, p. 264.

६. Minor Works of Kṣemendra, 1961, Introduction, p. 8.

७. Introduction, p-10. ८. औचित्यविचारचर्चोपसंहारश्लोक क्र० १. ९. तत्रैव श्लोक क्र० २.

मर्मस्थाने सत्तावीस असून इतरही काव्यांगात औचित्य असते हे प्रमुख विचार मांडलेले आहेत. क्षेमेन्द्राने कारिकागत विचारांच्या स्पष्टीकरणासाठी एकूण एकशे सहा उदाहरणे दिली असून ग्रन्थरचना अन्वयव्यतिरेक-पद्धतीने केली आहे. ३. **अवसरसार**—ह्या ग्रन्थाचे नांव अवतारसार[१] असे क्षेमेन्द्रलघुकाव्यसंग्रहाचे संपादक देतात ते चुकीचे वाटते. कारण ह्या ग्रन्थातील एक पद्य क्षेमेन्द्राने औचित्यविचारचर्चेत (उदाहरणश्लोकांक ५६) कर्मपदौचित्यप्रकरणी 'न तु यथा ममैवावसरसारे' असा प्रस्ताव करून दिले आहे. हे प्रायः एक लघुकाव्य असून त्यात कदाचित् अनंतराजाचीच स्तुती असावी असे लघुकाव्यसंग्रहाचे संपादक[२] म्हणतात. ४. **कनकजानकी**—प्रायः हे रामाच्या वनवासोत्तर चरित्रावर आधारलेले नाटक असावे[३]. ह्यातील एकूण पाच पद्ये क्षेमेन्द्राने कविकंठाभरणात[४] रसगत चमत्कार, धनुर्वेदपरिचय, गजलक्षणपरिचय, वृक्ष-परिचय व वनेचरपरिचय ह्या मुद्यांच्या स्पष्टीकरणासाठी दिली आहेत. ५. **कलाविलास**—क्षेमेन्द्राच्या उपहास-उपरोधपर काव्यांतील उत्कृष्ट काव्य. दंभाख्यान, लोभवर्णन, कामवर्णन, वेश्यावृत्त, कायस्थचरित, मदवर्णन, गायन-वर्णन, सुवर्णकारोत्पत्ति, नानाधूर्तवर्णन व सकलकलानिरूपण ह्या नावांच्या दहा सर्गांमध्ये व ५५१ श्लोकांमध्ये विभागलेले काव्य. मूलदेव हा ह्या काव्याचा नायक असून कमालीचा कारस्थानपटू आहे. तो चंद्रगुप्ताचा शिक्षक असतो. त्याचेकडून आपणास असे कळते की, ठकबाजीची विद्या भूतलावर अवतीर्ण झाली असून ती संन्यासी, वैद्य, गवई, सोनार, व्यापारी, नट इत्यादी सगळ्यांमध्ये प्रविष्ट झाली आहे. इतकेच नव्हे तर ती पशुपक्ष्यांमध्ये व वनस्पतींमध्येही शिरली आहे. क्षेमेन्द्राच्या उपहास-उपरोधाचे काही नमुने बघण्यासारखे आहेत. उदा० झाडे संन्याशांप्रमाणे भूर्जपत्रे पांघरून उभी आहेत. सोनार गिऱ्हाईकाच्या डोळ्यात पाहातापाहाता धूळ फेकू शकतो. वैद्य जितक्या माणसांना त्यांच्या मृत पूर्वजांकडे धाडतो तितक्या प्रमाणात त्याचा लौकिक वाढतो ! औषध-विक्रेत्याच्या स्वतःच्या डोक्यावर टक्कल असले तरी तो टकलावरील औषधे विकतो. भटके गवई सकाळी कमावलेले दुपारी गमावून मोकळे होतात ! ६. **कविकंठाभरण**—क्षेमेन्द्राचा एक अल्पविस्तृत पण अनल्पगुणी ग्रंथ. क्षेमेन्द्राने शिष्यांना उपदेश देण्यासाठी व विद्वानांच्या ज्ञानात भर घालण्यासाठी अनंतराजाच्या कारकीर्दीत (इ० स० १०२८–१०६३) लिहिलेला व ५५ कारिकांमध्ये निबद्ध असलेला

१. Introduction, p. 11. २. तत्रैव. ३. तत्रैव. ४. क्षेमेन्द्रकृत कविकण्ठाभरण-संपादक वा. के. लेले, वाराणसी, १९६६, पृ० ५१, ६९, ६९, ७२ व ७३.

शास्त्रीय ग्रंथ. ग्रंथाचे एकूण पाच संधी असून पहिल्या संधीत अल्पप्रयत्न-साध्य, कृच्छ्रप्रयत्नसाध्य व असाध्य अशा तिन्ही प्रकारच्या कविशिष्यांनी कोणत्या दिव्य व पौरुष उपायांनी कवित्वशक्ती संपादावी त्याचे विवेचन आले आहे. दुसऱ्या संधीच्या पूर्वार्धात छायोपजीवी, पदकोपजीवी, पादोपजीवी, सकलोपजीवी व भुवनोपजीव्य ह्या पाच प्रकारच्या कवींचे वर्णन असून उत्तरार्धात भाषाप्रभू कवीला 'शतोपदेश' करण्यात आला आहे. तिसऱ्या संधीत ज्यात चमत्कार नाही ते काव्य नाही असा सिद्धान्त प्रारंभी मांडून तत्पश्चात् चमत्काराच्या अविचारितरमणीय, विचार्यमाणरमणीय इत्यादी दहा प्रकारांचे सोदाहरण विवरण केले आहे. चवथ्या संधीत शब्दनिर्दोषता, अर्थनिर्दोषता व रसनिर्दोषता हे तीन काव्यगुण; शब्दसदोषतादी तीन काव्यदोष आणि सगुण-निर्गुण–सदोष-निर्दोष–सगुणदोष हे काव्याचे पाच प्रकार यांचे सोदाहरण विवेचन करण्यात आले आहे. शेवटच्या संधीत होतकरूने तर्क—व्याकरण—नाट्यशास्त्रप्रभृती अनेक शास्त्रांचे परिश्रमपूर्वक अध्ययन करावे असे सांगितले आहे. ७. **कविकर्णिका**—क्षेमेन्द्राने[१] औचित्यविचारचर्चेच्या द्वितीय कारिकेत 'कविकर्णिका' चा निर्देश केला आहे. त्यावरून क्षेमेन्द्राने ह्या ग्रंथात काव्याचे दोष व काव्याचे गुण यांचे वर्णन केले असावे असे वाटते. तथापी ती कारिका अमळ विचारपूर्वक वाचली की, असेही वाटू लागते की कविकर्णिका हा कविकंठाभरणाहून वेगळा ग्रंथ नसावा. कारण क्षेमेन्द्राने काव्यगुण व काव्यदोष यांचे वर्णन कविकंठाभरणात केलेले असल्याचे, वर त्या ग्रंथाचा जो सारांश दिला आहे, त्यावरून स्पष्ट होतेच. विवेक शब्दाचा स्पष्ट प्रयोग कविकंठाभरणात[२] आढळतोच. क्षेमेन्द्र चमत्कार-औचित्यसंप्रदायी असल्यामुळे त्याने काव्यगत अलंकारांचे विस्तृत वर्णन केले असावे असे वाटत नाही. औचित्यविचारचर्चेतील अलंकारौचित्याच्या[३] विवेचनप्रसंगीही क्षेमेन्द्राने उपमा, उत्प्रेक्षा, रूपक अशा तीन-चार ठळक अलंकारांचाच निर्देश केला आहे. ह्या सर्व गोष्टींमुळे कविकर्णिका स्वतंत्र ग्रंथ की कविकंठाभरण व कविकर्णिका हे दोन्ही ग्रंथ एकच त्याचा निर्णय होत नाही. ८. **क्षेमेन्द्रप्रकाश**—ह्या ग्रंथाबद्दल काहीच माहिती मिळत नाही. ९. **चतुर्वर्गसंग्रह**—क्षेमेन्द्राने शिष्यांना उपदेश देण्यासाठी आणि सुसंस्कृत बुद्धीच्या पुरुषांना संतुष्ट करण्यासाठी[४] धर्मप्रशंसा, अर्थप्रशंसा, कामप्रशंसा, आणि मोक्षप्रशंसा नामक

---

१. 'कृत्वापि काव्यालङ्कारां क्षेमेन्द्रः कविकर्णिकाम्। तत्कलङ्कं विवेकं च विधाय विबुधप्रियम् ॥' औ० वि० च. २, २. कविकंठाभरण ४।२., ३. कारिका १५.

४. चतुर्वर्गसंग्रह—धर्मप्रशंसा १।२.

चार परिच्छेदात व १०६ स्वरचित श्लोकांमध्ये केलेला वर्गसंग्रह. धर्मादी चार पुरुषार्थांपैकी काम-पुरुषार्थाचे वर्णन विशेषतया सरस असल्याचे डॉ. सूर्यकान्त[1] म्हणतात तर ते अळेबळे साधलेले आहे असे डॉ. कीथ्[2] म्हणतात. समग्र ग्रंथ वाचला की, डॉ. कीथ् यांचेच म्हणणे अधिक युक्तिसंगत आहे असे वाटते. क्षेमेन्द्रकृत कामप्रशंसेपेक्षा तत्कृत मोक्षप्रशंसाच अधिक सुगम व सरस वाटते. १०. **चारुचर्या**—सदाचाराची शिकवण देणारे सुबोध व सुंदर शंभर श्लोक. प्रत्येक श्लोकाच्या पहिल्या ओळीत आचारतत्त्व प्रतिपादिलेले असून दुसऱ्या ओळीत समुचित असा ऐतिहासिक वा पौराणिक दाखला दिलेला आढळतो. उदा० 'औचित्यप्रच्युताचारो युक्त्या स्वार्थं न साधयेत् । व्याजवालिवधेनेव रामकीर्तिः कलङ्किता ॥[3] ' ह्या ग्रंथाच्या आद्यन्ती विष्णुस्तवन आहे. ह्या ग्रंथाच्या आधाराने द्याद्विवेदाने (इ० स० १४९४) आपली नीतिमंजरी रचिली. जल्हणाला आपला मुग्धोपदेश लिहिण्याची प्रेरणाही प्रायः ह्याच ग्रंथापासून मिळाली असावी असे डॉ. कीथ्[4] म्हणतात. ११. **चित्रभारत नाटक**—हे महाभारतावर आधारित नाटक असावे.[5] ह्यातील दोन श्लोक कविकंठाभरणात व एक श्लोक औचित्यविचारचर्चेत उदाहरणादाखल दिलेले आढळतात. १२. **दर्पदलन**—कुलविचार, धनविचार, विद्याविचार, रूपविचार, शौर्यविचार, दानविचार व तपोविचार अशा सात अध्यायांमध्ये व ५९६ श्लोकांमध्ये गुंफिलेले उपदेशपर काव्य. क्षेमेन्द्राने मंगलाचरणात[6] दर्परूपी सर्प दूर सारून निःशेष विघ्ने प्रशान्त करणाऱ्या, सत्यरूपी अमृताचे निधान असलेल्या, स्वप्रकाश विकसित करणाऱ्या, संसारनाशक, प्रशान्तीरूप व अमृताचे सिंचन करणाऱ्या विवेकास नमस्कार असो असे म्हटले असून मित्रांना स्वास्थ्य लाभावे यासाठी आपण ह्या मधुरवचनरूपी औषधांनी प्रयत्न करीत आहोत[7] असे म्हटले आहे. त्याने कुल, वित्त, श्रुत, रूप, शौर्य, दान व तप ह्या मदहेतूंपैकी[8] प्रत्येकाची निदर्शक अशी एकेक कल्पित गोष्ट दिली आहे. क्षेमेन्द्राचा उद्देश जरी नीत्युपदेशाचा असला तरी दृष्टिकोण औपरोधिकच

---

१. Ksemendra Studies, 1954, p. 4 २. A History of Sanskrit Literature, 1953, P.238.

३. चारुचर्या ५१. ४ A History of Sanskrit Literature, 1953, p. 239. ५. क्षेमेन्द्रलघुकाव्यसंग्रहः, १९६१, Introduction, p. 11., ६. दर्पदलनम्, प्रथमः कुलविचारः, श्लोक १-२, ७. तत्रैव, श्लोक ३.

८. दर्पदलनम्—प्रथमः कुलविचारः, श्लोक ४.

आहेसे वाटते. संन्यस्तवृत्तीही दर्पास कारणीभूत होते ह्याची दखल क्षेमेन्द्राने घेतली आहे हे विशेष होय. क्षेमेन्द्राच्या मती संन्याशांनी फक्त डोक्यावरील केसांचा तेवढाच 'संन्यास' केलेला असतो ! क्षेमेन्द्राला संन्याशांच्या अंगावरची पिवडीने माखलेली वस्त्रे मानसिक किल्मिषाची प्रतीके वाटतात. एकूण हे काव्य क्षेमेन्द्राची सूक्ष्म व चौरस निरीक्षणशक्ती उत्तम प्रकारे प्रकट करते. १३. **दशावतारचरितकाव्य**—क्षेमेन्द्राने ह्या काव्यात मत्स्य, कूर्म, वराह, नृहरि (नृसिंह) त्रिविक्रम (वामन), जामदग्न्य (परशुराम), राम, शौरी (श्रीकृष्ण), सुगत (बुद्ध) व कर्की (कलंकी) ह्या विष्णूच्या दहा अवतारांची एकूण १७५१ श्लोकात (ग्रंथोपसंहाराचे पाच श्लोक वेगळे) सरस स्तुती केली आहे. ह्या काव्यावरून त्याची उत्कट विष्णुभक्ती दिसून येते. शिवाय, बुद्धाला विष्णूचा अवतार म्हणून मान्यता देऊन त्याचे चरित्र लेखनांकित करणारे हे पहिलेच काव्य. रचना इ. स. १०६६. १४. **देशोपदेश**—दुर्जनवर्णन, कदर्यवर्णन, वेश्यावर्णन, कुट्टनीवर्णन, विटवर्णन, छात्रवर्णन, वृद्धभार्यावर्णन व प्रकीर्ण ह्या नावांच्या आठ उपदेशांमध्ये व २९८ श्लोकांमध्ये (उपसंहारपर श्लोकद्वय वेगळे) गुंफिलेले सामाजिक टीकात्मक काव्य. क्षेमेन्द्राने हे काव्य लोकसुधारणेसाठी[१] रचिले आहे. हे काव्य समोर असले तरी ह्याचे श्री. कृष्णचैतन्य ह्यांनी इतके बहारदार वर्णन केले आहे की, तेच येथे सारांशरूपाने उतरून घेणे इष्ट वाटते. श्री. कृष्णचैतन्य[२] म्हणतात की, देशोपदेश व नर्ममाला हे ग्रंथ आवळ्याभोपळ्यांप्रमाणे वाटतात. कारण काश्मीरातील भ्रष्ट राज्यशासन हेच दोहोंचे लक्ष्य आहे. मात्र हल्ल्याचे तंत्र भिन्न आहे. देशोपदेशात ironical homage आहे तर नर्ममालेत forthright ridicule आहे. सरकारी कारभारात खालपासून वरपर्यंत सर्वत्र कायस्थ कारकून व अधिकारी बोकाळले होते. ते लोकांना छळून पैसा कमावीत. डॉक्टर, ज्योतिषी, भिक्षुक ही बांडगुळे कायस्थरूपी वृक्षांवर पोसली जात. क्षेमेन्द्राने अनेक व्यक्तींवर टीकेची धार धरिली आहे. कंजूष माणूस पाहुण्याला उपाशीपोटी परत पाठवतो. श्रीमंत म्हातारा तरुण पत्नी मिळविण्यात यशस्वी होतो. त्याला मूल होते, त्याचे त्याला आश्चर्य वाटते, इतरांना वाटत नाही ! काश्मीरात अध्ययनार्थ आलेले गौडीय विद्यार्थी स्वतःला 'मीमांसा'-प्रवीण समजतात. ते काश्मीरात शिकण्यात हुशार होत नाहीत, खाण्यात वरीक होतात ! दुकानदार-

---

१. 'हासेन लज्जितोऽत्यन्तं न दोषेषु प्रवर्तते । जनस्तदुपकाराय ममायं स्वयमुद्यमः ॥' दुर्जनवर्णनम् १.४. / २. A New History of Sanskrit Literature, 1962, p. 435-436.

व्यापारी त्यांचेकडून उगराणी वसूल करू लागला की, ते त्याचेवर सुरी उपसतात! या ग्रंथात नखरेल कलासक्ताचेही चित्रण केलेले आढळते. १५ दानपारिजात—ह्या ग्रंथाबद्दल काहीच माहिती मिळत नाही. १६. नर्ममाला—देशोपदेशासारखेच उपरोधगर्भ टीकात्मक काव्य. ह्याचे तीन परिहास असून एकूण श्लोकसंख्या ४०७ आहे. क्षेमेन्द्राने कायस्थांखेरीज श्रमणिका, मठदैशिक, सभर्तृका, वैद्य, गणक, गुरु, चक्षुर्वैद्य, वृद्धवणिक् इत्यादी समाजातील भिन्नभिन्न थरातील व्यक्तींवर कोरडे ओढले आहेत. काव्य करुणान्त आहे. १७. नीतिकल्पतरु—व्यासरचित राजनीतीवरील ग्रंथावरची ही टीका होय असे डॉ. सूर्यकान्त म्हणतात.[1] औचित्यविचारचर्चेत ज्या नीतिलतेतील चार पद्ये (क्रमांक, ३२,५१,६६,६७) उद्धृत केलेली आढळतात ती नीतिलता व हा नीतिकल्पतरु एकच की भिन्न ते सांगणे कठीण आहे. १८. पद्यकादम्बरी—बाणाच्या कादंबरीचे पद्यात्मक सार. ह्यातील आठ पद्ये कविकंठाभरणात उदाहृत केलेली आढळतात. १९. पवनपंचाशिका—पन्नास श्लोकांचे वायुवर्णनपर लघुकाव्य.[2] ह्यातील पद्य सुवृत्ततिलकात आढळते. २०. बृहत्कथामंजरी—पाचव्या शतकातील गुणाढ्याने पैशाची ह्या प्राकृत भाषेत सात लाख पद्यात लिहिलेल्या 'बृहत्कथा' ह्या काव्याचा क्षेमेन्द्राने साडेसात हजार श्लोकात काढलेला सारांश. रचना इ. स. १०३७. लेखनाचा सराव व्हावा ह्यासाठी केलेला उद्योग. काव्य १९ लंबकात विभागलेले असून सारांश एकंदरीने शुष्क व नीरस आहे. बराच भाग मुळाला सोडून असून अतिसंक्षिप्तपणामुळे काही ठिकाणी दुर्बोधता आली आहे. एकंदरीने काव्य अनाकर्षक व निर्जीव असल्याचे मत डॉ. कीथ[3] व डॉ. सूर्यकान्त[4] देतात. क्षेमेन्द्राने प्रस्तुत काव्याच्या रचनेत पंचतंत्र व तंत्राख्यायिका यांचाही उपयोग करून घेतला आहे. २१. बौद्धावदानकल्पलता—काव्यदृष्ट्या व धर्मदृष्ट्या बौद्धांना उत्कृष्ट वाटणारे बुद्धचरित्रपर काव्य. रचना १०७ पल्लवात विभक्त. रचनाकाल—इ. स. १०५२. क्षेमेन्द्रपुत्र सोमेन्द्र याने १०८ वा पल्लव जोडला. क्षेमेन्द्राचा बौद्ध धर्माचा सखोल अभ्यास व त्याची सहिष्णू वृत्ती यांचे दर्शन ह्या ग्रंथावरून घडते. क्षेमेन्द्राने ह्या ग्रंथात सर्व प्रसिद्ध जातककथांचा संग्रह केला आहे. क्षेमेन्द्राला वीर्यभद्र

---

१. Kṣemendra Studies, 1954, p.24

२. क्षेमेन्द्रलघुकाव्यसंग्रहः, १९६१, Introduction, p. 12. ३. A History of Sanskrit Literature, 1953, p. 276. ४. Kṣemendra Studies, 1954, pp. 17-19.

नामक बौद्ध आचार्याने ह्या कार्यात मदत केली व सूर्यश्रीने क्षेमेन्द्राचा लेखक (scribe) म्हणून काम केले. ह्या ग्रंथाचे इ. स. १२७२ साली तिबेटी भाषेत शब्दशः भाषांतर झाले होते. त्या भाषेत हा संपूर्ण ग्रंथ उपलब्ध आहे.[1] डॉ. कीथ्च्या[2] मते हा ग्रंथ विषयदृष्ट्या महत्त्वाचा आहे, रचनादृष्ट्या फारसा महत्त्वाचा नाही. **२२ भारतमंजरी**[3] —व्यासकृत महाभारताचा १०६६५ श्लोकात सांगितलेला सारांश. ह्यात मूळ महाभारत व हरिवंश ह्या दोहोंचा समावेश असून विषयवार छोट्याछोट्या प्रसंगांचे वर्णन करण्यात आले आहे. अनुष्टुप् वृत्ताचाच प्राधान्याने उपयोग करण्यात आला असला तरी वसंततिलका, मालिनी, शार्दूलविक्रीडित, पृथ्वी इत्यादी वृत्तातही रचना करण्यात आली आहे. भारतांतर्गत वनपर्वाचे आरण्यपर्व असे नामकरण करण्यात आले असून शांतिपर्वातील विष्णुसहस्रनामे गद्यातच देण्यात आली आहेत. क्षेमेन्द्राने प्रत्येक पर्वाच्या उपसंहारात स्वतःला 'श्रीव्यासरूप' महाकवी असे संबोधिले आहे. संक्षेपाने भारतीय कथा सांगणे हेच धोरण आहे. उदाहरणार्थ, मूळच्या गीतेतील सोळाव्या अध्यायाचा (२४ श्लोकांचा) सारांश पुढील चार श्लोकात सांगितला आहे—'अभीः सत्त्वं शुचिर्ज्ञानं दमो दानं तपः क्रतुः। अहिंसायाः गुणाश्चान्ये जायन्ते दिव्यसंपदाम् ॥ दंभमानमदक्रोधपारुष्याज्ञानचापलैः। आसुरी सूच्यते संपन्मोहशोकविवर्धिनी ॥ युक्तोऽपि सततं दिव्यसंपदा मा शुचः सखे। आसुरं भावमापन्ना भजन्ते योनिमासुरीम् ॥ सत्त्वादिभिर्गुणैर्बद्धो ज्ञायते चेष्टितैर्जनः। मनोभोजनमाचारो गुणतुल्यो हि देहिनाम् ॥' भीष्मपर्व[4] १६७–१७०. रामयशस् नावाच्या मित्राच्या प्रार्थनेवरून[5] क्षेमेन्द्राने हा ग्रंथ लिहिला. ह्या ग्रंथात साहित्यसौंदर्य फार थोडे असून ग्रंथ रूक्ष व निर्जीव आहे; तसेच संक्षेपाधिक्यामुळे अनेक ठिकाणी दुर्बोधता उतरली आहे; हा ग्रंथ क्षेमेन्द्रकाली महाभारताची संहिता कोणत्या अवस्थेत होती ते जाणून घेण्यास उपयोगी आहे, अशी टीका डॉ. सूर्यकान्त[6] यांनी केली आहे. ती तितकीशी पटत नाही. ग्रंथाचा रचनाकाल इ. स. १०३७. ह्या ग्रंथामुळे क्षेमेन्द्राला 'कवीन्द्रता' लाभली. **२३. मुक्तावलीकाव्य—**

---

१. Sūryakānta—Kṣemendra Studies, 1954, p. 19-20. २. A History of Sanskrit Literature, 1953, p. 493. ३. क्षेमेन्द्रकृत भारतमंजरी, काव्यमाला नं० ६४, निर्णयसागर, १८९८.

४. भारतमंजरी, काव्यमाला नं. ६४, १८९८. ५ तत्रैव, उपसंहारश्लोकांक १०.

६. Kṣemendra Studies, 1954, P. 17

तापसाचे वर्णन करणारे काव्य[1]. यातील एक पद्य (श्लोक क्रमांक ८३) औचित्यविचारचर्चेत व्रतौचित्याचे उदाहरण म्हणून उद्धृत केला गेला असून आणखी एक श्लोक मोक्षोपायपरिचयाचे उदाहरण म्हणून कविकंठाभरणात[2] उद्धृत करण्यात आला आहे. २४. **मुनिमतमीमांसा**—व्यासोपदेशाचे तात्पर्य वर्णन करणारे काव्य[3]. ह्या काव्यातील पंधरा पद्ये औचित्यविचारचर्चेत (श्लोकांक २८,३८,४१,४३,४७,४८,६९,७१,७३,७५,९१,९२,९३,९९,१००) उद्धृत करण्यात आली आहेत. २५. **राजावली ऊर्फ नृपावली**—काश्मीरी राजांची वंशावळ. पद्यबद्ध ग्रंथ. ह्या ग्रंथातील माहिती निष्काळजीपणाने दिली गेलेली आहे असा दोष राजतरंगिणीकार कल्हण देतो. परन्तु, क्षेमेन्द्राने ग्रंथ काळजीपूर्वक लिहिलेला असावा व त्यामुळे त्याची अनुपलब्धी ही खरोखरीच मोठी हानी होय, असे डॉ० कीथ्[4] यांना वाटते. २६. **रामायणमंजरी**—वाल्मीकीच्या कथेचे सार. काव्य १९८ प्रसंगांत विभागलेले असून श्लोकसंख्या ६३९१ आहे. भाषा अतिशय ओघवती व सुगम असून रामायणीय कथेतील घटनाप्रसंगांची हानी न होऊ देता त्यांचे सार व्यवस्थितपणे सांगितले आहे. प्रायः रचना अनुष्टुप् वृत्तात असून काही पद्ये वसंततिलका, मालिनी इत्यादी इतर वृत्तातही आहेत. क्षेमेन्द्राने मंगलाचरणात विष्णूचे स्तवन केले असून त्यानंतरच्या तीन श्लोकात वाल्मीकी व त्यांचे रामायण यांची स्तुती केलेली आहे. तीत सरस्वती वाल्मीकीपासून उत्पन्न झाली व वाल्मीकी सर्वोपजीव्य व चक्रवर्तीकवी होते असे म्हटले आहे. उत्तरकांडाचा अखेरचा श्लोक असा आहे—'इति दुरितविरामः कीर्तिकान्ताभिरामः। सुजनहृदयरामः कोऽप्यभूद्यः स रामः ॥ प्रकृतमनुसरामः पापपाशं तरामः । सुकृतभुवि चरामस्तस्य नाम स्मरामः ॥[5]. ह्यानंतरचे ग्रन्थसमाप्तिपर नऊ श्लोक आत्मवृत्तपर आहेत. प्रस्तुत काव्य केवळ ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे, परंतु काव्यदृष्ट्या worthless (शून्य किंमतीचे) आहे असे जे डॉ. कीथ्[6] म्हणतात ते पटत नाही. यात थोडी अस्सल काव्यरचना आढळते असा सावध अभिप्राय डॉ. सूर्यकान्त[7] देतात. २७. **ललितरत्नमाला**—वत्सराज व रत्ना-

१. क्षेमेन्द्रलघुकाव्यसंग्रहः—१९६१, Introduction, p. 11.

२. संपादक—वा. के. लेले, १९६६, पृ ६६. ३. उपर्युल्लिखित टीप क्रमांक १.

४. A History of Sanskrit Literature, 1953, p. 161.

५. क्षेमेन्द्रकृत रामायणमंजरी, काव्यमाला नं० ८३, निर्णयसागर, १९०३.

६. A History of Sanskrit Literature, 1953, p. 133.

७. Kṣemendra Studies, 1954., p. 16-17.

वली यांच्या प्रेमकथेवर आधारित नाटक.[१] यातील एक श्लोक (क्रमांक ६५) औचित्यविचारचर्चेत उद्धृत केलेला आढळतो. २८. **लोकप्रकाश**–क्षेमेन्द्रकालीन हिंदूंची दिनचर्या, काश्मीरचे परगणे, हुंड्या, व्यापाऱ्यांचे देवाण-घेवाणीचे करारनामे, इत्यादी विविध विषयांची माहिती देणारा कोश. ही रचना व्यासदास क्षेमेन्द्राचीच असे बुल्हरचे मत आहे तर वेबरला हे मत मान्य नाही.[२] श्री. कौल[३] यांचे मतही वेबरप्रमाणेच आहे. त्यांना ही कृती तिसऱ्या दर्जाच्या मोगलकालीन लेखकाची वाटते. ह्या ग्रन्थात फारशी शब्दांचा भरणा असून अनेक मुसलमानी नावेही आहेत. ह्यावरून तो ग्रन्थ क्षेमेन्द्राचा नसावा, असे कौल यांना वाटते. २९. **लावण्यवती**—ह्या ग्रन्थातील सहा श्लोक औचित्यविचारचर्चेत उदाहृत करण्यात आले आहेत—(क्रमांक २५, २६, ५५, ९५, ९६, ९७) वासन्तिका नामक वेश्या अत्रिवसु नामक श्रोत्रियाला स्ववश करीत असल्याचे ह्यात वर्णिले आहे. ३०. **वात्स्यायनसूत्रसार**–हा वात्स्यायनाच्या कामसूत्राचा संक्षेप होय. यामधील एक श्लोक औचित्यविचारचर्चेत (उदाहरणश्लोकांक १०५) उदाहृत केलेला आढळतो. क्षेमेन्द्राने स्वतंत्रपणे ग्रन्थरचना करावयास लागण्यापूर्वी तर्कशास्त्र, व्याकरण, नाट्यशास्त्र, राजनीती, कामशास्त्र, अध्यात्मशास्त्र, धातुशास्त्र, ज्योतिःशास्त्र इत्यादी अनेक शास्त्रांचे अध्ययन केले असावे असे वाटते आणि अधीत विषयाच्या ज्ञानाला पक्कपणा यावा ह्यासाठी त्याने सारग्रन्थांची रचनाही केली असावी. वात्स्यायनसूत्रसार हा अशांपैकीच एक ग्रन्थ दिसतो. ३१. **विनयवल्ली**—ह्या ग्रन्थाचे नाव विनयवती[४] असे क्षेमेन्द्रलघुकाव्यसंग्रहाचे संपादक देतात परंतु ते बरोबर नाही. कारण क्षेमेन्द्राने औचित्यविचारचर्चेत ह्यातील एक श्लोक (उदाहरणपद्यांक ५) 'यथा मम विनयवल्ल्याम्' असा प्रस्ताव करून दिला आहे. ३२. **वेतालपंचविंशति**—ह्याचेविषयी काहीच माहिती उपलब्ध होत नाही. ३३. **व्यासाष्टक**—'भुवनोपजीव्य' व्यास ऋषींच्या स्तुतिपर आठ श्लोक. ते येथे उद्धृत केल्यास क्षेमेन्द्राची व्यासांबद्दलची आदरभावना किती उत्कट होती ते आपोआप कळून येईल. श्लोक असे—'नमो ज्ञानानलशिखापुञ्जपिञ्जजटाभृते । कृष्णायाकृष्णमहसे कृष्णद्वैपायनाय ते ॥ नमस्तेजोमयश्मश्रुप्रभा-

१. क्षेमेन्द्रलघुकाव्यसंग्रहः, १९६१, Introduction, p. 11.

२. Dr. Suryakānta—Kṣemendra Studies, 1954, p.25

३. देशोपदेश & नर्ममाला, 1923, Introduction, p. 25.

४. Introduction p, 12.

स्खलितत्विषे । वक्त्रवागीश्वरीपद्मरजसेवोदितश्रिये ॥ नमः सन्ध्यासमाधान-निष्पीतरवितेजसे । त्रैलोक्यतिमिरोच्छेददीपप्रतिमचक्षुषे ॥ नमः सहस्रशाखाय धर्मोपवनशाखिने । सत्त्वप्रतिष्ठापुष्पाय निर्वाणफलशालिने ॥ नमः कृष्णाजिनजुषे बोधनन्दनवासिने । व्याप्तायेवालिजालेन पुण्यसौरभलिप्सया ॥ नमः शशिकला-काग्रब्रह्मसूत्रांशुशोभिने । श्रिताय हंसकान्त्येव संपर्कार्कमलौकसः ॥ नमो विद्या-नदीपूर्णशास्त्राब्धिसकलेन्दवे । पीयूषरससाराय कविव्यापारवेधसे ॥ नमः सत्य-निवासाय स्वविकाशविलासिने । व्यासाय धाम्ने तपसां संसारायासहारिणे ॥—व्यासाष्टकस्तोत्रम् १–८. **३४. शशिवंश महाकाव्य**—शशिवंशातील राजांच्या कथा वर्णिणारे महाकाव्य असावे. क्षेमेन्द्राने ह्यातील पाच श्लोक कविकंठाभर-णात[१] उद्धृत केले आहेत. **३५. समयमातृका**—रचना इ. स. १०५०[२]. दामोदरगुप्ताच्या कुट्टनीमताच्या धर्तीवर लिहिलेले आणि वेश्याजीवन व वेश्या-व्यवसाय हा विषय असलेले उपदेशपर काव्य. श्लोकसंख्या ६३५ (उपसंहाराचे चार श्लोक वेगळे). क्षेमेन्द्राने ह्या ग्रंथाच्या मंगलाचरणात कामदेवाला[३] नमन केले आहे आणि वारयोषितांची रहस्यार्थमंत्रतंत्रोपयोगी अशी ही समयमातृका आपण रचीत असल्याचे सांगितले[४] आहे. ह्या काव्याचे चिन्तापरिप्रश्न, चरितोपन्यास, प्रदोषवेश्यालापवर्णन, पूजाधरोपन्यास, रागविभागोपन्यास, ह्या नावांचे पहिले पाच समय असून त्यापुढील सहाव्या समयाला नाव नाही. सातव्या व आठव्या समयांची नावे अनुक्रमे कामुकसमागम व कामुकप्राप्ती अशी आहेत. ह्या काव्याचा विषय थोडक्यात असा आहे—एक नापित कलावती नावाच्या एका भावी वेश्येचा परिचय कंकाली नावाच्या एका कुंटि-णीशी करून देतो. तो न्हावी कलावतीस कंकालीच्या काश्मीरातील काम-विक्रमाच्या विविध व मनोरंजक कथा ऐकवितो. कंकाली एकामागोमाग एक अशा अनेक पुरुषांशी विवाहबद्ध होते पण विधवा बनते. त्यानंतर ती माळीण, दुकानावरची विक्रेती, दारूच्या गुत्त्यावरील दासी, जादुगारीण अशी अनेक वेषांतरे करून अनेक 'धंदे' करते. अखेरीस ती कुंटीण बनते. त्यानंतर कलाव-तीची तिच्याशी गाठ पडते तेव्हा ती कलावतीला वेश्याव्यवसायाची संथा देते. त्या शिक्षणाच्या बळावर कलावती एका वणिक्पुत्राला ठकविते आणि

१. संपादक वा० के० लेले, १९६६, पृ० ४७, ४८, ५२, ५४ व ७२.

२. समयमातृका—उपसंहारश्लोकांक २.

३. 'अनंगवातलास्त्रेण जिता येन जगत्त्रयी । विचित्रशक्तये तस्मै नमः कुसुमधन्वने ॥' समयमातृका १।१. ४. तत्रैव १।३.

आपल्या जाळ्यात पकडते. मात्र हा ग्रंथ आपण सत्पक्षाचे रक्षण[१] करण्यासाठी लिहिला आहे असे क्षेमेन्द्र ग्रंथांती म्हणतो. क्षेमेन्द्राने उपसंहारात वेश्येची सत्कविभारतीशी[२] तुलना करून मोठेच अनौचित्य प्रकट केले आहे.

३६. **सुवृत्ततिलक**—क्षेमेन्द्राच्या तीन शास्त्रीय ग्रंथांपैकी एक. क्षेमेन्द्राने सच्छिष्यांच्या वाणीचे वर्णसुंदर प्रसाधन म्हणजे सुवृत्ततिलक असे ह्या ग्रंथारंभी म्हणून छंदाचे सौंदर्य विचारात घेऊन आपण हा प्रसिद्ध वृत्तांचा संग्रह केला असल्याचे निवेदिले आहे[३]. ग्रंथाचे वृत्तावचय, गुणदोषदर्शन व वृत्तविनियोग असे तीन विन्यास असून कारिकांची संख्या १२४ आहे. क्षेमेन्द्राने कारिकागत विषय समजावून सांगण्यासाठी ९१ उदाहरणश्लोक दिले आहेत. क्षेमेन्द्राने सुरुवातीस गुरू, लघू, त्रिलघू, त्रिगुरू इत्यादी छंदःशास्त्रीय पारिभाषिक शब्दांचे स्पष्टीकरण करून त्यानंतर तनुमध्या, विद्युन्माला, प्रमाणी, अनुष्टुप्, इन्द्रवज्रा इत्यादी सत्तावीस[४] वृत्तांची लक्षणे दिली आहेत. त्यांच्या स्पष्टीकरणासाठी त्याने एका उदाहरणाचा अपवाद वगळून बाकीची सर्व स्वरचित उदाहरणे दिली आहेत, हे वैशिष्ट्य आहे. क्षेमेन्द्राने द्वितीय विन्यासात उपर्युक्त वृत्तांचे गुणदोषप्रदर्शन केले आहे. ते करताना कालिदास, उत्पलराज, भट्टबाण, हर्ष, रत्नाकर, परिमल इत्यादि अनेक प्रसिद्धाप्रसिद्ध कवींचे श्लोक उद्धृत केले आहेत. इतकेच नव्हे तर स्वतःचेही काही श्लोक उद्धृत करून त्यातील दोष प्रांजलपणे दाखवून दिले आहेत. तिसऱ्या विन्यासाच्या सुरुवातीस[५] वाग्विस्तार हा शास्त्र, काव्य, शास्त्रकाव्य व काव्यशास्त्र असा चतुर्विध असतो असे सांगून त्याचे स्वरूप समजावून दिले आहे. त्यानंतर निरनिराळ्या प्रकारच्या रचनांसाठी कोणती वृत्ते वापरावीत ते सांगून प्राचीन प्रसिद्ध कवींपैकी कोणत्या कवीची कोणत्या वृत्तावर विशेष प्रभुता व भक्ती होती तेही विशद केले आहे. क्षेमेन्द्राच्या मती अभिनन्द अनुष्टुप् वृत्तात, पाणिनी उपजातीत, रत्नाकर वसंततिलकात, भवभूती शिखरिणीत, कालिदास मन्द्राक्रान्तात व राजशेखर शार्दूलविक्रीडितात विशेष प्रवीण होते.[६] डॉ. कीथ्, डॉ. सूर्यकान्त, डॉ. काणे, डॉ. दे, राघवाचार्य-पाध्ये इत्यादी सर्वच विद्वान

---

१. 'क्षेमेन्द्रेण सुभाषितं कृतमिदं सत्पक्षरक्षाक्षमम् ।'—समयमातृकोपसंहारश्लोकांक ४.

२. तत्रैव, श्लोकांक १. ३. सुवृत्ततिलक १–४ व ५.

४. क्षेमेन्द्राच्या ग्रंथांत सत्तावीस ह्या अंकाला कांही विशेष महत्त्व दिसते-कारण त्याने येथे २७ वृत्तांचे निरूपण केले आहे व औचित्यविचारचर्चेत २७ मर्मस्थाने विवेचिली आहेत. ५. सुवृत्ततिलक ३-२ ते ५.

६ सुवृत्ततिलक ३-२९ ते ३५.

क्षेमेन्द्राचा हा ग्रंथ वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे म्हणतात. ह्या विद्वानांपैकी एकाचेच उद्‌गार येथे उतरून घेऊ, त्यावरून ह्या ग्रंथाची पृथगात्मता लक्षात येईलः— "सुवृत्ततिलक occupies an unique place among works on metres. In this work he has discussed for the first time the merits, flaws and proper usages of several metres. This difficult task has been very well accomplished by him. He was a pioneer in this type of work without any followers till to-day."[१] ह्या ग्रंथाची रचना अनंतराजाच्या कारकीर्दीत (इ. स. १०२८-१०६३) झाली.

३७. **सेव्यसेवकोपदेश**—क्षेमेन्द्राचे एक वैशिष्ट्यपूर्ण लघुकाव्य. श्लोकसंख्या फक्त ६१. धनी व नोकर यांची कर्तव्ये व यांच्या जबाबदाऱ्या यांचे वर्णन करणारे व सेव्यसेवकांमधील संबंध सुधारावेत ह्या सद्धेतूने लिहिलेले काव्य. क्षेमेन्द्राने स्वकालीन सेव्यसेवकसंबंधांवर प्रकाश टाकता-टाकता सेव्य दर्पामुळे व सेवक लोभामुळे अंध[२] झालेले असतात व त्यामुळेच दोहोंच्या संबंधांमध्ये अंतराय निर्माण होतो ही मानसशास्त्रीय व व्यवहारात पदोपदी प्रतीत होणारी तत्त्वे सांगितली आहेत. सेव्य व सेवक ह्या दोन्ही पक्षांनी संतोषवृत्ती बाळगल्यास परस्परसंबंधांतील विषाचा नाश होईल अशी क्षेमेन्द्राची धारणा असल्यामुळे त्याने मंगलाचरणात[३] संतोषरूपी रत्नास नमस्कार केला आहे.

५. 'औचित्यरुचिरा वाणी विधत्ते शतशाखताम् ।'

क्षेमेन्द्राच्या ग्रंथसंपदेचा जो परिचय वर करून देण्यात आला आहे त्यावरून ग्रंथकार या नात्याने क्षेमेन्द्राचा दर्जा किती उच्च होता ते सहज लक्षात येईल. क्षेमेन्द्राची अमृततरंग, अवसरसार, कनकजानकी, कविकर्णिका, क्षेमेन्द्रप्रकाश, चित्रभारत नाटक, दानपारिजात, नीतिकल्पतरू, पद्मकादंबरी, पवनपंचाशिका, मुक्तावली, मुनिमतमीमांसा, राजावली, ललितरत्नमाला, लावण्यवती, वात्स्यायनसूत्रसार, विनयवल्ली, वेतालपंचविंशति व शशिवंश ही ग्रंथरत्ने अनुपलब्ध अथवा अप्रकाशित असल्यामुळे त्यांचा विचार करता येत नाही. लोकप्रकाश काव्याच्या कर्तृत्वासंबंधी दुमत असल्यामुळे तेही विचारात न

१. क्षेमेन्द्रलघुकाव्यसंग्रहः-Introduction p. 14. वरील अवतरणातील an unique हा इंग्रजी प्रयोग 'दुष्ट' आहे !

२. सेव्यसेवकोपदेश, श्लोक ३. ३. 'विभूषणाय महते तृष्णातिमिरहारिणे । नमः सन्तोषरत्नाय सेवाविषविनाशिने ॥'-तत्रैव, श्लोक १.

घेणेच बरे. उरलेल्या सतरा ग्रंथांकडे दृष्टिक्षेप टाकल्यास असे जाणवते की ते आशय व अभिव्यक्ती ह्या दोन्ही दृष्टींनी वैविध्यपूर्ण आहेत. क्षेमेन्द्राच्या ग्रंथांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल—१. **अवतारचरित्रपर काव्ये**—दशावतारचरित व बौद्धावदानकल्पलता. २. **आचारोपदेशपर काव्य**—चारुचर्या ३. **आर्थिक संबंध व प्रश्न यांवरील काव्य**—सेव्यसेवकोपदेश. ४. **उपहास-उपरोधपर काव्ये**—कलाविलास, दर्पदलन, देशोपदेश व नर्ममाला. ५. **सामाजिक विषयपर काव्य** (वेश्याजीवन व वेश्याव्यवसाय) समयमातृका. ६. **शास्त्रीय ग्रंथ**—औचित्यविचारचर्चा, कविकंठाभरण व सुवृत्ततिलक. ७. **सारांशकाव्ये**—बृहत्कथामंजरी, भारतमंजरी व रामायणमंजरी. ८. **स्तोत्र-काव्य**—व्यासाष्टक. ह्यावरून क्षेमेन्द्राची बुद्धी किती व्यापक होती, त्याचे स्वकालीन समाजाचे निरीक्षण कसे चौफेर होते आणि त्याची वाणी कशी सर्वविषयसमावेशक व महत्त्वाकांक्षी होती ते स्पष्टपणे दिसून येते. त्याच्या ग्रहणशक्तीला* कोणत्याही विषयाचे वावडे नव्हते. ती सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, शास्त्रीय असे सर्व विषय लीलया आत्मसात् करू शकत असे. त्याची लेखणीही शृंगार, वीर, करुण, अद्भुत, भयानक, हास्य, रौद्र, बीभत्स व शांत ह्या नऊही रसांचा उल्लास साधण्यात सारखीच तरबेज व तत्पर होती. क्षेमेन्द्राच्या शास्त्रीयेतर ग्रंथांच्याही काही मर्यादा अवश्य आहेत, परंतु तरीदेखील त्याच्या लेखणीला कोणताही विषय वर्ज्य नव्हता, हे मान्य करावेच लागेल. आणि म्हणूनच डॉ० सूर्यकान्तांनी क्षेमेन्द्राला आदरांजली वाहताना काढलेल्या पुढील उद्‌गारातील भावनेशी कोणीही रसिक सहमतच होईल. "Kṣemendra holds a unique position in the history of Sanskrit Literature. He appears as poet, dramatist, rhetorician, lexicographer and historian. He has written numerous works which form important landmarks in several fields of Sanskrit Literature·· Almost every important branch of Sanskrit Literature has been enriched by the facile pen of this versatile genius. Indeed, in the whole range of Sanskrit Literature, only Bhoja and Hemacandra have tried their hand on such a variety of subject, but Kṣemendra displays a depth and originality peculiarly his

* 'न खलु धीमतां कश्चिद् अविषयो नाम ।'

own."[1] "क्षेमेन्द्राच्या वेगवेगळ्या ग्रंथांच्या रचनाकालाविषयीचे जे उल्लेख मिळतात त्यांवरून असे दिसून येते की, त्याचा हा ग्रंथरचनेचा उद्योग तीस वर्षेपर्यंत अव्याहतपणे चालू होता. क्षेमेन्द्राच्या वाग्वल्लीच्या बृहत्कथामंजरी व भारतमंजरी ह्या दोन मंजिऱ्या इ. स. १०३७ साली प्रकट झाल्या आणि त्यानंतर तिला अक्षरशः बहर आला. इ. स. १०५० मध्ये 'समयमातृका' अवतरल्या. १०५२ साली बौद्धावदानकल्पलता फुलली, त्यानंतरच्या काळात सुवृत्ततिलक, कविकंठाभरण व औचित्यविचारचर्चा हे शास्त्रीय ग्रंथत्रय आविर्भूत झाले. आणि क्षेमेन्द्राने इ. स. १०६६ साली दशावतारचरित लिहून लेखणीस कायमची विश्रांती दिली. क्षेमेन्द्राचा हा त्रिदशकात्मक अमन्द अभियोग जाणवताच रसिक अभ्यासकाचे मस्तक नम्रतेने लवते.

६. क्षेमेन्द्राचे 'साहित्यशास्त्र'—

क्षेमेन्द्राच्या समस्त ग्रंथरचनेची तोंड-ओळख वर करून दिलीच आहे. त्याच्या उपहास-उपरोधपर, चरित्रवर्णनपर, सामाजिक तसेच सारांशात्मक काव्यांतील विषय, त्यांची मांडणी इत्यादी बाबींविषयीही संक्षेपाने माहिती दिली आहे. तथापी, प्रस्तुत प्रबंधात क्षेमेन्द्राच्या औचित्यसिद्धान्ताचा परामर्श घ्यावयाचा असल्यामुळे त्याच्या तीन शास्त्रीय ग्रंथांवर अधिक लक्ष खिळविणे आवश्यक आहे. क्षेमेन्द्र हा स्वभावतः विचारशील पुरुष असल्यामुळे त्याने कविकण्ठाभरण, सुवृत्ततिलक व औचित्यविचारचर्चा ह्या ग्रंथत्रयीत काव्य व काव्यशास्त्र ह्यांविषयीचे आपले बरेच विचार प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे मांडले आहेत. त्याने स्वपूर्वकालीन भामह-वामनादी ग्रंथकारांप्रमाणे काव्याचे लक्षण, प्रयोजन, कारण, काव्यालंकार, गुण, दोष, इत्यादी काव्य-घटकांची सविस्तर चर्चा करणारे स्वतंत्र ग्रंथ लिहिलेले आढळत नाहीत. त्याच्या कविकर्णिका ग्रंथाचे नेमके स्वरूप काय होते, ते सांगता येत नाही. अशा परिस्थितीत क्षेमेन्द्राच्या उपर्युक्त तीन ग्रंथांचे परिशीलन करून त्याची साहित्यशास्त्रीय भूमिका समजावून घेणे हे अभ्यासकाचे दायित्व ठरते. ह्या अभ्यासाच्या योगे क्षेमेन्द्राच्या औचित्यसिद्धान्ताची सम्यक्तया परीक्षा करणे सुकर व सुलभ होईल. हा अभ्यास करीत असताना क्षेमेन्द्राच्या विचारसरणीचे भामह-वामनादी पूर्वसूरींच्या विचारसरणीशी कोठेकोठे जुळते ते पाहणेदेखील आवश्यक आहे. कारण तसे केल्याशिवाय क्षेमेन्द्राच्या विचारांचे 'अभिनवत्व' सुस्पष्ट होणार नाही. म्हणून आता क्षेमेन्द्राची 'साहित्य' दृष्टीच प्रथमतः

१. Kṣemendra Studies, 1954, p. 33.

समजून घेऊ. ह्यापुढील विवेचनात त्याच्या उपर्युक्त तीन ग्रंथांचा अनुक्रमे क०, सु० व औ० ह्या संक्षेपांनी निर्देश केला आहे.

(क) काव्यलक्षण—सरस्वतीच्या विस्ताराच्या चार प्रकारांपैकी एक प्रकार म्हणजे काव्य. काव्य म्हणजे विशिष्ट शब्द व अर्थ यांच्या साहित्याचे[1] (सहभावाचे) सुंदर अलंकरण (सु० ३।३) (ख) आदर्श काव्य—प्रसाद-पूर्ण शब्दांनी युक्त, संदर्भाशी सुसंवादी, अर्थपूर्ण, वर्ण्यविषयास अनुरूप अशा रसाच्या अभिव्यक्तीने ओतप्रोत व विषयानुसार संक्षेपविस्तारयुक्त ते आदर्श-काव्य (क. २।२१). अशा काव्यातील विषय, शब्द व अर्थ ही तिन्ही मनोरम[2] असल्यामुळे असे काव्य चमत्कृती उत्पन्न करते (तत्रैव ३।१). चमत्कार-हीन काव्य ललनांच्या लावण्यहीन यौवनाप्रमाणे होय. (तत्रैव ३।२). शब्द-वैमल्य, अर्थवैमल्य व रसवैमल्य या त्रिगुणांनी युक्त, शब्दकालुष्यादी त्रिदोषांनी रहित आणि शब्दव्यापाराच्या संकरापासून अलिप्त असलेले काव्य कवीला 'कविचक्रवर्ती' ही प्रतिष्ठा मिळवून देते. (तत्रैव ४।२) (ग) काव्यार्थ—काव्यगत अर्थ हृदयसंवादी व अनौचित्यरहित असला पाहिजे. (औ. श्लोक २० वरील गद्यवृत्ती) काव्यार्थ लोकविश्रुत असेल तर त्याचे विशेषणरहित वर्णन दोषास्पद ठरत नाही, परंतु अप्रसिद्ध काव्यार्थाचे निर्विशेषण वर्णन निरर्थकच होय (औ० श्लोक ८२ वरील वृत्ती). काव्यार्थ विनासायास प्रकट झाला पाहिजे (तत्रैव, कारिका ३२). काव्याचा अर्थ नीतिदृष्ट्या सुसंवादीच असला पाहिजे (तत्रैव, श्लोक ९० वरील वृत्ती[3]) (घ) काव्यप्रयोजन—बहुविध शिक्षण

---

१. तुळा—'शब्दार्थौ सहितौ काव्यं—' भामह, काव्यालंकार १।१६; 'शरीरं तावदि-ष्टार्थव्यवच्छिन्ना पदावली ।'—दण्डी काव्यादर्श १।१०; 'शब्दार्थौ सहितौ वक्रकविव्यापार-शालिनि । बन्धे व्यवस्थितौ काव्यं तद्विदाल्हादकारिणी ॥'—कुन्तक—वक्रोक्तिजीवित १।८; रुद्रट काव्यालंकार २।१

२. तुळा—'अलंकारवदग्राम्यमर्थ्यं न्याय्यमनाकुलम् । गौडीयमपि साधीयो वैदर्भमिति नान्यथा ॥'—भामह, काव्यालंकार १।३४; 'मालाकारो रचयति यथा साधु विज्ञाय मालां। योज्यं काव्येष्ववहितधिया तद्वदेवाभिधानम् ॥' तत्रैव १।५९; 'सर्वथा पदमप्येकं न निगाद्यम-वद्यवत् ।'—तत्रैव १।११; 'तदल्पमपि नोपेक्ष्यं काव्ये दुष्टं कथंचन ।'—दण्डी, काव्यादर्श १।७; 'व्यंग्योऽर्थो ललनालावण्यप्रख्यो यः प्रतिपादितः, तस्य प्राधान्ये ध्वनिरित्युक्तम्'-ध्वन्यालोक, हरिदास संस्कृत ग्रंथमाला, ६६, १९५३ पृ. ४९३; रुद्रट;—काव्यालंकार १-२२.

३. तुळा-भामह, काव्यालंकार १।३४; 'न हि प्रतीतिः सुभगाः शब्दन्यायविलंघिनी ।' -दण्डी, काव्यादर्श १।७५; 'अयमेव हि महाकवेर्मुख्यो व्यापारो यद् रसादीन् एव मुख्यतया काव्यार्थीकृत्य तद्व्यक्त्यनुगुणत्वेन शब्दानां अर्थानां च उपनिबन्धनम् ।-'ध्वन्यालोक,

संपादिलेल्या कवीने चराचर सृष्टीतील पदार्थांच्या भावांची स्वाभाविक स्थिती वर्णन करण्याचे ध्येय बाळगावे. (क. २।२३).[१] (ङ) कवित्वशक्ती—मंत्रशक्तीने कवित्वशक्ती प्राप्त होते असे क्षेमेन्द्राला वाटते (क. १।१) त्यामुळे त्याने होतकरूंना दिव्य व मानवी असे दुहेरी प्रयत्न करण्याचा आदेश दिला आहे (१।६). सरस्वतीच्या क्रियामातृकेच्या जप हा कवित्वप्राप्तीचा दिव्य उपाय होय (क. १।१०). सरस्वतीच्या कृपाप्रसादासाठी व्रत पाळणे, यज्ञ करणे, गणेशाचे पूजन करणे, काव्यलेखनाची सवय करणे, अर्थानुसंधान करणे, वृत्तपूर्तीचा उद्योग करणे, श्रेष्ठ कवींच्या सान्निध्यात राहणे, महाकाव्ये पुन्हापुन्हा वाचणे, नाटके पाहणे, निरनिराळ्या भाषा अभ्यासणे इत्यादि सर्व कवित्वप्राप्तीचा मानवी उपाय होय. (क० २–२ ते २२). कवीची वाणी अनन्यपरतंत्र असली पाहिजे, कवीच्या वैयक्तिक वासनांचा क्षय झालेला असला पाहिजे. त्याचे मन आल्हादैकमय असले पाहिजे (क० १।१४). ज्याप्रमाणे पक्व झालेला अंकुर भूमी फोडून वर येतो त्याप्रमाणे उत्तम प्रतिभावंताचे काव्य विवेकाचे खतपाणी मिळाल्यावर कवीची मनोभूमी भेदून उचंबळून वर येते[२] (क० १।१८). (च) प्रतिभा—क्षेमेन्द्राला भट्टतौतांची 'प्रज्ञा नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा मता ।' ही प्रतिभेची व्याख्या मान्य आहे. (औ० श्लोक ९५ वरील वृत्ती). प्रतिभेमुळे नवीन व सुन्दर काव्यार्थ उत्पन्न होतो (तत्रैव). प्रतिभा म्हणजे जणू काव्याचे ऐश्वर्य होय. (औ. कारिका ३५) (छ) आदर्श[३] कवी—विवेकी, अभ्यासू

उपर्युल्लिखित आवृत्ती, पृ. ४१४; 'आविद्वदङ्गनाबालप्रतीतार्थं प्रसादवत् ।'-भामह, काव्यालंकार २।३.

१. 'तत्रापि विनीतानां अविनीतानां च चेतनानाम् । अचेतनानां च भावानां आरंभाद्यवस्थाभेदभिन्नानां एकैकशः स्वरूपं उपनिबध्यमानं आनन्त्यं एव उपयाति ।' ध्वन्यालोक उपर्युक्त आवृत्ती पृ. ६३७.

२. तुळा—कवेरुपकुर्वाणा कारयित्री । साऽपि त्रिविधा सहजाऽहार्यौपदेशिकी च ।... मंत्रतंत्राद्युपदेशप्रभवा औपदेशिकी ।'...'बुद्धिमान् शुश्रूषते शृणोति गृण्हीते धारयति विजानाति ऊहते अपोहति तत्त्वं चाभिनिविशते ।...अहरहः सुगुरूपासना तयोः प्रकृष्टो गुणः ।'-राजशेखर, काव्यमीमांसा, चतुर्थोऽध्यायः ।; 'शब्दश्छन्दोभिधानार्था इतिहासाश्रयाः कथाः । लोको युक्तिः कलाश्चेति मन्तव्या काव्यगैर्ह्यमी ॥ शब्दाभिधेये विज्ञाय कृत्वा तद्विदुपासनम् । विलोक्यान्यनिबन्धांश्च कार्यः काव्यक्रियादरः ॥' भामह, काव्यालंकार १–९–१०; ["Poetry is a spontaneous overflow of powerful feelings taking its origin from emotion recollected in tranquillity—" वर्ड्स्वर्थ.]; रुद्रट-काव्यालंकार १–१६ ते २०.

३. तुळा—राजशेखर काव्यमीमांसा, अध्याय ४ व १२; भामह, काव्यालंकार १।८–१०; दण्डी काव्यादर्श १।१०४–१०५; वामन काव्यालंकारसूत्रवृत्ती १–३–१ ते २०;

(क. २।२), सज्जनांशी मैत्री करणारा, सरळ अंतःकरणाचा (तत्रैव २।४), नेहमी प्रसन्न राहून चित्तवृत्तींचा समतोल राखणारा (तत्रैव २।८), चिकित्सक बुद्धीचा, स्वतंत्र वृत्तीचा (तत्रैव २।१२), अभ्युदयनिरपेक्ष, परोत्कर्षसहिष्णू, आत्मश्लाघापराङ्मुख व परस्तुतितत्पर (तत्रैव २।१३), नम्र, वैरमत्सरवर्जित (तत्रैव २।१४), श्रोत्यांच्या मनाचा कानोसा घेऊन वागणारा (तत्रैव २।१५), विवेचन-कुशल (तत्रैव २।१६), विदग्ध, वाक्पटू, समाधानी वृत्तीचा (तत्रैव २।१७), टीका-सहिष्णू (तत्रैव २।१९) असा कवी आदर्श कवी होय. कोणत्याही कवित्वशक्तिसंपन्न कवीला तर्कादी शास्त्रांच्या अध्ययनाने 'कविसम्राट्' बनता येते (तत्रैव ५।१ वरील वृत्ती). (ज) **कवींचे प्रकार**—दुसऱ्या कवीच्या छायेवर जगणारा (छायोपजीवी), दुसऱ्या कवीच्या पदावर जगणारा (पदकोपजीवी), दुसऱ्या कवीच्या पादावर जगणारा (पादोपजीवी), सर्वस्वी दुसऱ्याच्या काव्यावर जगणारा (सकलोपजीवी) व स्वतःच्या प्रतिभासामर्थ्याने सर्व जग जिंकणारा (भुवनोपजीव्य) असे कवींचे पाच प्रकार आहेत[1] (क. २।१) (झ) **असामान्य कवी**—श्रेष्ठ कवी काव्यातील गुण व दोष पारखण्यात प्रवीण असतात. ते सत्काव्यापासून असत्काव्य वेगळे काढू शकतात (क. ४।१) त्यांनी वापरलेली वृत्ते प्रसंग-पात्र-रस-प्रभृतींना अनुसरून नसली तरीही ती योग्य बनतात (सु० ३।१०). अशा सत्कवींची वाणी सालंकृत, सुन्दरपणे विभक्त, वैशिष्ट्यपूर्ण, वक्र, चर्वणार्हतेमुळे आदरणीय, रसवती, मुग्धार्थसंपन्न आणि आश्चर्योत्पादक, विविध व अभिनव वर्णनांच्या आस्वादाचा आनंद देणारी अशी असते (समयमातृकोपसंहारश्लोक १)[2] (ञ) **कुकवी**—शास्त्रीय ज्ञान नसलेला, केवळ पद्यरचनेची हमाली करणारा, अभिनिवेशी व उत्तान शब्दांनी काव्यरचना करणारा तो कुकवी होय (क. ५।१)[3] (ट) **सरस्वती**—

'अधिगतसकलज्ञेयः सुकवेः सुजनस्य संनिधौ नियतम् । नक्तंदिनमभ्यसेदभियुक्तः शक्तिमान्काव्यम् ॥' रुद्रट-काव्यालंकार १।२०.

१. तुळा--राजशेखर काव्यमीमांसा अध्याय चौदावा 'शब्दार्थहरणोपायाः' तसेच अध्याय पाचवा-कवींचे शास्त्रकवी, काव्यकवी व उभयकवी हे प्रमुख भेद व त्यांचे उपभेद.

२. 'काव्यं तु जायते जातु कस्यचित्प्रतिभावतः ।'--भामह, काव्यालंकार १।५; तत्रैव १।४; 'सुकविभिरभियुक्तैः सम्यगालोच्य तत्त्वं त्रिजगति जनताया यत्स्वरूपं निबद्धम् । तदिदमिति समस्तं वीक्ष्य काव्येषु कुर्यात्कविरविरलकीर्तिप्राप्तये तद्वदेव ॥' रुद्रट-काव्यालंकार १३-१७.

३. 'अधनस्येव दातृत्वं क्लीबस्येवास्त्रकौशलम् । अज्ञस्येव प्रगल्भत्वमकवेः शास्त्रवेदनम् ॥ भामह, काव्यालंकार १।३; 'नाकवित्वमधर्माय व्याधये दण्डनाय वा । कुकवित्वं पुनः साक्षान्मृतिमाहुर्मनीषिणः ।'--तत्रैव १।१२.

शुभ्र[१], चंद्रमंडलामध्ये असणारी, सुन्दर अक्षरांनी अलंकृत, वाङ्मयामृताचा वर्षाव करणारी, आनंद देणारी, विद्युल्लतेसारखी तेजस्वी आणि अमृताची नदी असलेली सरस्वती सर्वच कवींना पूजार्ह वाटते. (क. १–११–१२) शास्त्र, काव्य, शास्त्रकाव्य व काव्यशास्त्र हा सरस्वतीचाच चतुर्विध विस्तार होय (सु० ३.२). (ठ) **शब्द**—काव्यातील शब्द रुचिर असून ते रुचिर अर्थाला उपकारक असतात (औ. का. ५–वृत्ती)[२]. शब्द केवळ अनुप्रासाच्या हव्यासाखातर वापरले गेल्यास सौंदर्य उत्पन्न करीत नाहीत (तत्रैव, उदाहरणश्लोक ३). (ड) **काव्यगुण**—शब्दवैमल्य, अर्थवैमल्य व रसवैमल्य हे तीन काव्यगुण होत (क. ४–१ वरील वृत्ती). ओजादी काव्यगुण मनुष्याच्या ज्ञानचारित्र्यादी गुणांप्रमाणे आहार्यच असतात. त्यांना जेव्हा औचित्याचे अधिष्ठान लाभते तेव्हा ते सजीव होतात (औ० कारिका ५–६). प्रसादादी अर्थानुरूप गुणांना काव्यात शोभा व भव्यता प्राप्त होते (औ० का० १४).[३] पात्राच्या स्वभावाला अनुरूप अशा गुणांच्या अभावी उचितार्थयुक्त काव्यही मन्दतेज होऊन जाते (औ० उदाहरणश्लोक १५ वरील वृत्ती (ढ) **काव्यदोष**–शब्दकालुष्य, अर्थकालुष्य व रसकालुष्य हे काव्यदोष होत (क. ४।१ वरील वृत्ती) (ण) **काव्यालंकार**–काव्यगत उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, अनुप्रास इत्यादी शब्दार्थालंकार मानवी शरीरावरील दागिन्यांप्रमाणे केवळ बाह्य होत. ते काव्याच्या शरीराची म्हणजे बाह्यांगाची तेवढी शोभा साधतात. त्यांचा काव्याच्या अंतरंगाशी संबंध नसतो. काव्यात केवळ अलंकार असूनही काव्यसौंदर्य उत्पन्न होत नाही (औ० का० ५). अलंकार योग्य जागी घातला तरच शोभून दिसतो, नहून त्याच्या द्वारे काव्याची शोभा मात्र होते ! अशा अलंकाराला अलंकार हे अभिधानच प्राप्त होत नाही.[४]

---

१. 'चतुर्मुखमुखांभोजवनहंसवधूर्मम । मानसे रमतां दीर्घं सर्वशुभ्रा सरस्वती ॥' दण्डी, काव्यादर्श १।१; ध्वन्यालोक ४।१२१. २. तुळा--भामह १।५९,६।२३ आणि 'क्रमागतं श्रुतिसुखं शब्दमर्थ्यमुदीरयेत् ।' ६।२८; 'शरीरं तावदिष्टार्थव्यवच्छिन्ना पदावली ।' दण्डी-काव्यादर्श १।१०; 'यत्र हि व्यंग्यावभासिनः पदस्यैकस्यैव तावदाविर्भावः तत्रापि काव्ये कार्ऽपि बन्धच्छाया, किमुत यत्र तेषां बहूनां समवायः ।' ध्वन्यालोक, पृ० ३२८. 'रचयेत्तमेव शब्दं रचनायाः यः करोति चारुत्वम् ।'—रुद्रट, काव्यालंकार २।९

३. 'ओजः प्रसाद···कान्तयो बन्धगुणाः ।' वामन, काव्यालंकारसूत्रवृत्ती ३–१–४; 'त एवार्थगुणाः ।' तत्रैव ३–२–१; भामह, काव्यालंकार २–१ ते ३; 'दोषा विपत्तये तत्र गुणाः संपत्तये यथा ।' दण्डी-काव्यादर्श ३–१२४; 'ते गुणाः शौर्यादिवत्'—ध्वन्यालोक, २।२९ वरील वृत्ती; पदपदार्थ-वाक्य-वाक्यार्थदोषांचे निरूपण वामनाच्या काव्यालंकारसूत्राच्या द्वितीयाधिकरणात आढळते.

४ 'न यमकोपमादयः । कैवल्येन तेषामकाव्यशोभाकरत्वात् ।' वामन, काव्यालंकार-

(औ. का. ६) (त) **चमत्कार**—ज्या काव्यात चमत्कार (लावण्य, सौंदर्य वा हृद्यता) नाही ते काव्य नाही व ज्या कवीला चमत्कार निर्मिता येत नाही तो कवी नाही. चमत्कारशून्य काव्य म्हणजे ललनांचे लावण्यहीन यौवन. चमत्काराचे अविचारितरमणीय, विचार्यमाणरमणीय, समस्तसूक्तव्यापी, सूक्तैकदेशदृश्य, शब्दगत, अर्थगत, शब्दार्थगत, अलंकारगत, रसगत व प्रख्यातवृत्तिगत असे एकूण दहा प्रकार असतात. (क. तृतीय संधी)[1] (थ) **काव्याचे कथानक**–मूळ ऐतिहासिक कथेत नसलेला एखादा प्रसंग कवीने स्वप्रतिभेने कल्पावयास हरकत नाही. परंतु, तसा कल्पित प्रसंग प्रबंधगत रससौंदर्याचा परिपोष करणारा असला पाहिजे (औ० उदाहरणश्लोक १०)[2]. (द) **रस**—काव्यगत रसाला अनुरूप व उद्दीपक पदांनी रस उद्भावित होतो व त्यायोगे वाक्यार्थ सजीवसा भासू लागतो (औ० उदाहरणश्लोक ५ व ६ वरील वृत्ती). रस केवळ शाब्दिक (वक्त्रगत).असता कामा नये. विभावानुभावसंचारीभावांच्या संयोगाने परिपुष्ट होणाऱ्या स्थायीभावाचे उचित रसीकरण झाले पाहिजे (तत्रैव, उदाहरणश्लोक २९). रसाची निष्पत्ती साधताना कवीने पात्रापात्रविवेक अवश्य केला पाहिजे. अप्रधान पात्राच्या उत्कर्षपर वर्णनाने रसविघात होतो (तत्रैव). केवळ स्थायीभावाचे नाव उच्चारल्याने रसनिष्पत्ती होत नाही. (तत्रैव उदाहरणश्लोक ३७). एखाद्या प्रदीर्घ महाकाव्यात एखादा विशिष्ट रस प्रधान असला तरी त्याच्या घटकीभूत श्लोकात दुसरा एखादा रस असू शकतो (तत्रैव उदाहरणश्लोक ४६), परस्पर-अविरुद्ध रसांचेच मिश्रण साधले पाहिजे, परंतु, तसे करताना त्यांचा प्रधानाप्रधान भाव ध्यानी घ्यावा (तत्रैव, का. १७-१८). विरोधी वा अविरोधी रस दुसऱ्या एखाद्या रसाचा अंगभूत असल्यास त्याची पुष्टी करता कामा नये. तशी ती केल्यास सहृदयांचा विरस होतो. परंतु, तशी ती न केल्यास स्वभावतः प्रधानप्रतिकूल असलेला

सूत्रवृती ३. १. १; 'तदतिशयहेतवस्त्वलंकाराः ॥' तत्रैव ३. १. २.

१. रुद्रटाने चमत्काराचा पर्यायी वैचित्र्य शब्द वापरलेला आढळतो, (काव्यालंकार ४. ३१); तुळा—'यदपि तदपि रम्यं काव्यशरीरं यल्लोकस्य किंचित् स्फुरितमिदमितीयं बुद्धिरभ्युज्जिहीते, स्फुरणेयं काचिदिति सहृदयानां चमत्कृतिरुत्पद्यते ।'—ध्वन्यालोक ४।१२० वरील वृत्ती, पृ० ६५७.

२. 'इतिहासकथोद्भूतं इतरद्वा सदाश्रयम् ।'—दण्डी, काव्यादर्श १।१५; 'सन्ति द्विधा प्रबन्धाः···उत्पाद्यानुत्पाद्या···॥ तत्रोत्पाद्या येषां शरीरमुत्पादयेत्कविः सकलम् । कल्पितयुक्तोत्पत्तिं नायकमपि कुत्रचित्कुर्यात् ॥'—रुद्रट, काव्यालंकार १६-२-३; 'कथाशरीरमुत्पाद्यवस्तु कार्यं तथा/तथा । यथा रसमयं सर्वमेवैतत् प्रतिभासते ॥'—ध्वन्यालोक, परिकरश्लोक, पृ० ३०९.

रसही प्रधानानुकूलच होतो (तत्रैव, उदाहरणश्लोक ४९),[१] (ध) नायक-विचार—कवीने प्रधान नायकाचा उत्कर्ष वर्णावयास हवा. (औ० उदाहरण-श्लोक ३२), कारण तो समस्त प्रबंधाचे जणू जीवितसर्वस्व असतो. काव्यगत रसविलास त्याचेवरच अवलंबून असतो (तत्रैव उदाहरणश्लोक ३४). काव्यगत पात्राच्या प्रधानाप्रधानत्वाविषयीचे तारतम्य कवीने अवश्य पाळावयास हवे (तत्रैव). वीर पुरुषाची स्वाभाविक वृत्ती प्रसन्नमधुरधीर असते. त्याच्या क्रोधात विकृती संभवत नाही[२] (तत्रैव उदाहरणश्लोक ३२). (न) काव्य आणि विचार—ज्याप्रमाणे विद्वानाची विद्या सम्यग्ज्ञानाने शोभून दिसते त्याप्रमाणे काव्यही समुचित विचारांनी शोभून दिसते (तत्रैव, कारिका ३७) (प) काव्य व पद्य—केवळ पद्यनिर्मिती म्हणजे काव्य नव्हे. ज्यात उचित गुणांचा सन्निवेश आहे ते खरे काव्य (तत्रैव, उदाहरणश्लोक ५१-५२). (फ) काव्यात वापरलेली वृत्ते निर्दोष व सगुण असली पाहिजेत (सु० ३।?). काव्यातील वृत्ते रसानुसारी असावीत, उदाहरणार्थ सुकुमार रसाचे वर्णन करण्यासाठी योजलेले वृत्तही सुकुमारच असावे (तत्रैव २-४०). काव्यात वापरलेली वृत्ते शास्त्रशुद्ध व आनंददायी असावीत (तत्रैव १-३८). काव्यगत वृत्त छंदःशास्त्र-अनभिज्ञालाही श्रवणकटू वाटणार नाही इतके श्रवणीय असले पाहिजे. ज्याप्रमाणे तरुणी तरुणाला पसंत करते त्याप्रमाणे वृत्तरत्नावलीदेखील रस-पात्र-प्रसंगोचित काव्यालाच माळ घालते. (तत्रैव ३।१४). शास्त्रीय व उपदेशपर ग्रंथांत अनुष्टुप् वृत्त वापरावे (तत्रैव ३-५, १६). शृंगाररसाचा आलंबनविभाव असलेल्या नायिकेच्या रूपवर्णनात व वसंतऋतू इत्यादी उद्दीपन-भावांच्या वर्णनात उपजाती वृत शोभून दिसते (तत्रैव ३-१७). वीर व रौद्र या रसांच्या संकराच्या वर्णनासाठी वसंततिलका वृत्त वापरावे (तत्रैव ३-१९),

---

१. तुला—'तस्मात्तत्कर्तव्यं यत्नेन महीयसा रसैर्युक्तम् । उद्वेजनमेतेषां शास्त्रवदेवान्यथा हि स्यात् ॥' रुद्रट, काव्यालंकार १२-२; क्षेमेन्द्राचे येथील विवेचनावर ध्वन्यालोकाच्या तृतीय व चतुर्थ उद्योतांची दाट छाया आहे, इतकी की कितीही समांतर विचारपर श्लोक उद्धृत केले तरी ते अपुरेच ठरतील. त्यामुळे जिज्ञासूंनी स्वतःच ही तुलना करून पहावी.

२. 'तज्जयान्नायकोत्कर्षवर्णनं च धिनोति नः ॥' दंडी, काव्यादर्श १।२२; 'न तस्यैव वधं ब्रूयादन्योत्कर्षाभिधित्सया ।'—भामह, काव्यालंकार १।२२; 'उत्साहात्मा वीरः स त्रेधा युद्धधर्मदानेषु । विषयेषु भवति तस्मिन्नक्षोभो नायकः ख्यातः ॥'—रुद्रट-काव्यालंकार १५. १.

राजांच्या पराक्रमाचे वर्णन शार्दूलविक्रीडितात उठून दिसते (तत्रैव ३-२२).[1] (ब) **काव्याचे प्रकार**—सगुण, निर्गुण, सदोष, निर्दोष व सगुणदोष[2] असे काव्याचे पाच प्रकार होतात (क. ४।१ वरील वृत्ती). (भ) **काव्याचे शत्रू**–शुष्क तार्किक व केवळ शब्दज्ञानी (व्याकरणपंडित) हे काव्याचे शत्रू होत (क. १।१५) (म) **काव्यशास्त्र**—भट्टी व भौमक यांच्या ग्रंथांना काव्यशास्त्र म्हणतात. (सु०३।४). (य) **शास्त्र**—सर्व काव्यांगांनी लक्षित ते शास्त्र होय. (तत्रैव ३।३). शास्त्रे प्रसन्नार्थक असल्यास सर्वोपकारक[3] ठरतात (तत्रैव ३।६). शास्त्रीय ग्रंथातही मधूनमधून काव्य योजावे, तसे केल्याने ग्रंथ सरस व वाचनीय बनतो. (तत्रैव ३।५). (र) **शास्त्रज्ञ**—योग्यांसारखी सूक्ष्म व अंतर्भेदी दृष्टी असलेल्यांना शास्त्रे कळतात. वाणीच्या नाना स्वरूपांचे गुण व विविध दोष त्यांच्या त्यांच्या सूक्ष्म फरकांसह जाणणारे ते विचारवंत शास्त्रज्ञ[4] होत (सु० २।४६). (ल) **शास्त्रकाव्य**—चार पुरुषार्थांच्या वर्णनाने प्रायशः युक्त असलेले व सर्वोपदेशक ते शास्त्रकाव्य (तत्रैव ३।४). उदाहरणार्थ, क्षेमेन्द्राचे चतुर्वर्गसंग्रह हे काव्य.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होईल की, क्षेमेन्द्राच्या विचारांमध्ये भामहापासून आनंदवर्धनापर्यंतच्या शास्त्रज्ञांच्या विचारांचे अनेक पडसाद ऐकू येतात. आणि असे होणे अगदी स्वाभाविकच आहे. क्षेमेन्द्र, वर प्रथम कलमाच्या शेवटी म्हटल्याप्रमाणे, संस्कृत साहित्यशास्त्राच्या विभवकालातील अखेरचा ग्रंथकार होता. त्यामुळेच त्याने आपले तीन शास्त्रीय ग्रंथ रचिताना पूर्वीलांच्या विचारांचा सारांश काढला, प्राचीन व समकालीन प्रयोग न्याहाळले[5] व ह्या सर्व गोष्टींचा सम्यक् विचार करून आपली मते बनविली. ह्याच संस्कार[6]-

१. हा सर्वच विचार 'अभिनव' आहे; भामहादींनी हा विचार केलेला आढळत नाही. दंडीने महाकाव्याच्या संदर्भात (काव्यादर्श १-१८) 'श्रव्यवृत्तैः' शब्द वापरलेला आढळतो.

२ येथे बीजगणितातील Permutations and Combinations या प्रकरणाचीच आठवण होते !

३. तुळा—'हितशासकम् शास्त्रम् ।' सर्वतंत्रसिद्धान्तपदार्थलक्षणसंग्रहः, संवत् २००६, पृ २०३.

४. 'सादृश्य—'गुणदोषानशास्त्रज्ञः कथं विभजते नरः । किमन्धस्याधिकारोऽस्ति रूपभेदोपलब्धिषु ॥'—दण्डी, काव्यादर्श १।८.

५. 'पूर्वशास्त्राणि संहृत्य प्रयोगानुपलक्ष्य च । यथासामर्थ्यमस्माभिः क्रियते काव्यलक्षणम् ॥' दण्डी-काव्यादर्श १।२.

६. 'किन्तु बीजं विकल्पानां पूर्वाचार्यैः प्रदर्शितम् । तदेव प्रतिसंस्कर्तुमयमस्मत्परिश्रमः ॥' तत्रैव २।२.

क्रियेमुळे क्षेमेन्द्राच्या विचारांमध्ये प्राचीनांच्या विचारांचे प्रतिध्वनी जसे ऐकू येतात तसेच काही निर्भेळ नवे विचारही ऐकावयास मिळतात. वरील यादीतील (त) व (फ) हे विचार ह्याच कोटीत पडणारे आहेत. पैकी 'फ' हा विचार छंदोविषयक असल्यामुळे औचित्यसिद्धान्ताच्या परीक्षणात त्याचा परामर्श घेण्याचे कारण नाही (अर्थात् काव्यात वापरलेली वृत्ते रस-पात्र-प्रसंग यांना अनुरूप हवीत ही क्षेमेन्द्राची भूमिका अमान्य नाही. तथापी, एकूणच वृत्तविचार काव्यशास्त्राच्या व्यापकतेच्या तुलनेने महत्त्वाचा नसल्यामुळे व क्षेमेन्द्रानेही औचित्यसिद्धान्त मांडताना 'छंदौचित्य' विचारात घेतलेले नसल्यामुळे. त्याचे परीक्षण येथे टाळले आहे). मात्र क्षेमेन्द्राने केलेली 'चमत्कारचर्चा' महत्त्वाची आहे. एक तर त्याने प्रत्येक काव्यात चमत्कार म्हणजे लावण्य, सौंदर्य अथवा हृद्यता असणे आवश्यक आहे असा सिद्धान्तच मांडला आहे व तो कोणाही कवीला व काव्यशास्त्रज्ञाला मान्य होण्यासारखाच आहे. वामन[1] तर स्पष्टपणे म्हणतोच की, 'काव्यं ग्राह्यमलंकारात् ।। सौन्दर्यमलंकारः ।।' अर्थात्, काव्य म्हणजे शब्दार्थ अलंकारामुळे ग्राह्य म्हणजे उपादेय (आस्वाद्य) होतात आणि अलंकार म्हणजेच सौंदर्य. एवंच, काव्य सौंदर्यामुळे आस्वाद्य बनते असा अर्थ निष्पन्न होतो. पुनः, क्षेमेन्द्राने चमत्काराचे दहा प्रकार सांगितले असून त्यात काव्याच्या शब्द, अर्थ, रस, अलंकार व विषय ह्या काव्यघटकांबरोबरच चमत्काराच्या प्रतीतिपद्धतीचा व व्याप्तिक्षेत्राचाही विचार केला आहे. त्यामुळे काव्यगत चमत्काराच्या सर्व संभाव्य विलासस्थानांचा विचार झाला असून चमत्कारतत्त्वाला प्रतिष्ठा लाभली आहे. शिवाय, क्षेमेन्द्राने चमत्कारतत्त्वाची औचित्यसिद्धान्ताशी सांगड घातली आहे. त्याने औचित्यविचारचर्चेच्या तिसऱ्याच कारिकेत औचित्य हे काव्याच्या रसपूर्ण आस्वादात चमत्कार उत्पन्न करते असे म्हटले आहे. इतकेच नव्हे तर त्याने एकतिसाव्या कारिकेत तसेच तीवरील वृत्तीत, तेराव्या कारिकेवरील वृत्तीत आणि उदाहरण–श्लोकांक २, ३, १७, २२, २५, २६, २७, ५४, ५९ व ९५ ह्यांवरील वृत्तींतही चमत्कार शब्दाचा उपयोग केलेला आहे. क्षेमेन्द्राला वक्र, वैचित्र्य इत्यादी शब्द माहीत नव्हते असे नाही. नव्हे, त्याचा त्याने प्रयोगही[2] केलेला आढळतो. आणि तरीही

---

१. काव्यालंकारसूत्रवृत्ती–१. १. १–२

२. उदा० 'वक्र' शब्दाचा समयमातृकेतील उपसंहारश्लोकांक १ मध्ये व वैचित्र्य शब्दाचा औ० मधील ५५ व्या उदाहरणश्लोकावरील वृत्तीमध्ये प्रयोग.

त्याने वक्रोक्तिजीवितकाराप्रमाणे वक्रतेचे वा वैचित्र्याचे सविस्तर निरूपण न करता चमत्काराचेच सोदाहरण विवेचन केलेले आढळते. यावरून त्याला चमत्काराचा अभिनव विचार प्रतिपादावयाचा होता हे स्पष्ट होते. एवंच, क्षेमेन्द्राची 'वृत्तचर्चा' व त्याचे 'चमत्कार-निरूपण' ह्या संस्कृत साहित्यशास्त्राला लाभलेल्या दोन मुख्य देणग्या होत. त्याने संस्कृत साहित्यविद्यावधूला[1] अर्पिलेला तिसरा मोलाचा अलंकार म्हणजे औचित्यविचार हा होय व आता त्याचीच जडणघडण कशी झाली आहे ते पाहावयाचे आहे.

७. औचित्यविचारचर्चा—बहिरंग-परीक्षण

कोणत्याही "ग्रंथाचें परीक्षण दोन प्रकारचें असतें; एक अंतरंगपरीक्षण व दुसरें बहिरंगपरीक्षण. समग्र ग्रंथ अवलोकन करून त्यांतील मर्म, रहस्य, मथितार्थ किंवा प्रमेय काढणें यास 'अंतरंगपरीक्षण' हें नांव असून, ग्रंथ कोठें व कोणीं केला, त्याची भाषा कशी आहे, काव्यदृष्ट्या त्यांत माधुर्य किंवा प्रसाद गुण कितपत वठला आहे, ग्रंथांतील शब्दरचना व्याकरणशुद्ध आहे किंवा त्यांत कांहीं जुने आर्ष प्रयोग आहेत, अगर कोणकोणत्या मतांचा, स्थलांचा किंवा व्यक्तींचा त्यांत उल्लेख केलेला आहे, व त्यावरून ग्रंथाचा कालनिर्णय करण्यास अथवा तत्कालीन समाजस्थिति समजण्यास कांहीं साधन मिळतें कीं नाहीं, -ग्रंथांतील विचार स्वतंत्र आहेत कीं दुसऱ्यापासून घेतलेले आहेत, व दुसऱ्यापासून घेतलेले असल्यास कोठून व कोणते, इत्यादि केवळ बाह्यांगांचें विवेचन करणें यास 'बहिरंगपरीक्षण' असें म्हणतात"[2]. भगवद्गीतेसारख्या दार्शनिक ग्रंथरत्नाची परीक्षा करताना लोकमान्य टिळकांनी स्वीकारलेली ही अंतरंगबहिरंग-परीक्षणाची द्विकोटिक परीक्षा-पद्धती प्रस्तुत स्थळीही स्वीकारण्यास मुळीच हरकत नाही.

(१) **रचनाकाळ**—क्षेमेन्द्राने हा ग्रंथ अनन्तराज ह्या काश्मीरच्या राजाच्या कारकीर्दीत लिहिला.[3] अनंतराजाने १०२८ पासून १०६३ पर्यंत राज्य केले व इ. स. १०६३ साली 'कलश' नावाच्या आपल्या पुत्रावर राज्याभिषेक केला, असे डॉ. काणे[4] म्हणतात. कलश राजाने अनन्त राजाविरुद्ध बंड पुकारले त्यामुळे अनंतराजाला आत्महत्या करावी लागली, असे श्री० कृष्णचैतन्य

१. 'तदेतस्य वशीकरणं काममपि स्त्रियं सृजामीति विचिन्तयन्ती (उमा) साहित्यविद्यावधूं उदपादयत्—' राजशेखर, काव्यमीमांसा, तृतीयोऽध्यायः.

२. लो० बा० गं० टिळक-गीतारहस्य अथवा कर्मयोग १९१५; विषयप्रवेश पृ. ६-७.

३. औचित्यविचारचर्चा, उपसंहारश्लोक ३.

४. History of Sanskrit Poetics, 1961, p. 265.

म्हणतात.[१] अनन्तराजा इ. स. १०८१ साली वयाच्या ६१ व्या वर्षी मरण पावला असे डॉ. काणे[२] म्हणतात (अनन्तराजाचे मृत्युसमयी वय ६१ वर्षांचे होते की ८१ वर्षांचे होते ? त्याने १०२८ साली राज्यकारभारास सुरुवात केली हे लक्षात घेता मृत्युसमयी त्याचे वय ८१ वर्षांचे असणेच अधिक संभवते). क्षेमेन्द्राने आपण औचित्यविचारचर्चा हा ग्रंथ अनन्तराजाच्या काळात रचिला असे म्हटले आहे (श्रीमदनन्तराजनृपतेः काले किलायं कृतः ।'–औ. उपसंहारश्लोक ३). त्याने सुवृत्ततिलक व कविकण्ठाभरण ह्या दोन ग्रंथांच्या अंती अनुक्रमे 'अनन्तराजस्य राज्ये' (सु. ३. ४०) व 'राज्ये श्रीमदनन्तराजनृपतेः काव्योदयोऽयं कृतः ॥' (क० उपसंहारश्लोक) असे निर्देश केले आहेत. त्यावरून जरी काही निश्चित अनुमान काढता येत नसले तरी कदाचित् औचित्यविचारचर्चेची रचना अनंतराजाचा काळ होण्यापूर्वी म्हणजेच त्याच्या हयातीत केव्हातरी झालेली असावी, असे म्हणावेसे वाटते. (अनंतराजा राज्यनिवृत्तीनंतरही हयात असल्याचे वर दाखविलेच आहे.) डॉ. ग. त्र्यं. देशपांडे[3] ह्या ग्रंथाच्या रचनेचा काळ इ. स. १०५० असा देतात, परंतु त्यास प्रमाण काय ते समजत नाही.

(२) कोणासाठी लिहिला ? क्षेमेन्द्राने हा ग्रंथ उदयसिंह नामक मित्रपुत्राच्या शिक्षणासाठी लिहिला (औ० उपसंहारश्लोकांक ४). येथेच एका महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करणे आवश्यक आहे. तो प्रश्न म्हणजे प्रस्तुतचा ग्रंथ साहित्यशास्त्रपर की कविशिक्षापर, हा होय. क्षेमेन्द्राने केवळ हाच ग्रंथ नव्हे तर कविकंठाभरण व सुवृत्ततिलक हे दुसरे दोन शास्त्रीय ग्रंथही शिष्यांच्या उपदेशासाठी लिहिले असल्याचे स्वतःच म्हटले आहे (पाहा—'शिष्याणां उपदेशाय विशेषाय विपश्चिताम् । अयं सरस्वतीसारः क्षेमेन्द्रेण प्रदर्श्यते ॥' क. १।२; 'क्षेमेन्द्रेण सुशिष्याणां सरस्वत्याः प्रसाधनम् । सुवृत्ततिलकं वर्णरुचिरं क्रियते मुखे ॥' सु० १।४). त्यामुळे साहजिकपणेच असा ग्रह होतो की, त्याचे हे सर्वच ग्रंथ कविशिक्षापर आहेत. पैकी, सुवृत्ततिलकाचा अन्तर्भाव छंदःशास्त्रीय ग्रंथांत होत असल्यामुळे त्याचा विचार साहित्यशास्त्राचा परामर्श घेणाऱ्या समालोचकांनी केलेला नाही व त्यांचे तसे करणे युक्तच आहे. उरलेले दोन ग्रंथ संस्कृत साहित्यशास्त्राचे विवेचन करणाऱ्या आधुनिक विमर्शकांनी कविशिक्षापर ग्रंथांत ढकलले आहेत. उदा० डॉ० दे म्हण-

१. A New History of Sanskrit Literature, 1962, p. 368.
२. History of Sanskrit Poetics, 1961, p. 266.
३. भारतीय साहित्यशास्त्र, १९५८, पृ. १०१.

तात—"Kṣemendra's two works, Aucitya-vicārcarcā and Kavikaṇṭhābharaṇa, which may be conveniently grouped here, are curious and valuable in many respects.[1] श्री एडविन् गेरो म्हणतात—"His two works on poetics are the Aucityavicārcarcā and the Kavikaṇṭhābharaṇa, which fall into the category of kavisikṣā, or the education of the pcet."[2] प्रो. भूषण यांचेही मत असेच आहे. ते म्हणतात—"Several works in the subject deal with grammar, rhetoric, figures of speech and kavisikshana (education, equipment and discipline of the poet). Panini's Vyākarana, Ruyyaka's Alaṁkāra-manjari, Bhoja's Saraswati-Kanthābharana, Ksemendra's Auchitya-Vikāra, Deveswara's Kavikalpalata—are examples of works of this kind."[3] ह्या सर्वच ग्रंथकारांची काहीतरी चूक होत आहे असे वाटते. क्षेमेन्द्राने स्पष्टपणे 'शिष्याणां उपदेशाय' हे किंवा ह्याच आशयाचे शब्द वापरलेले असल्यामुळे उपर्युक्त समालोचकांची अशी समजूत झालेली दिसते. परंतु, फक्त क्षेमेन्द्रच असा शब्दप्रयोग करतो अशातला भाग नाही. संस्कृत साहित्यशास्त्रावर लिहिणाऱ्या सर्वच ग्रंथकारांनी असेच उद्गार आपापल्या ग्रंथांमधून काढलेले आढळतात. उदा० भामह म्हणतो—'तस्य चाधिगमे यत्नः कार्यः काव्यं विधित्सता ॥—' काव्यालंकार १।४ तसेच 'अवलोक्य मतानि सत्कवीनामवगम्य स्वधिया च काव्यलक्ष्म । सुजनावगमाय भामहेन ग्रथितं रक्रिलगोमिसूनुनेदम् ॥' तत्रैव ६।६४. अर्थात् भामहानेही आपला काव्यालंकार सज्जनांच्या बोधासाठी लिहिला आहे. पण तरी आपण त्या ग्रंथाचा समावेश कविशिक्षापर ग्रंथांत करीत नाही. उलट भामह हा आद्य काव्यशास्त्रज्ञ होय असे आपण मानतो. दण्डीच्या काव्यादर्शातील ['तेषामसंनिधानेऽपि न स्वयं पश्य नश्यति ।' (काव्यादर्श १।५)] 'पश्य नश्यति' हे उद्गार काव्यादर्शाचे प्रणयन एखाद्या राजपुत्राच्या वा सुयोग्य शिष्याच्या शिक्षणार्थच झाल्याचे सूचित करतात. पण

1. History of Sanskrit Poetics, 1960, Vol. II, p, 284.

2. S. K. De—Sanskrit Poetics as a Study of Aesthetic, 1963, p. 100, Note No. 40 : 13. 3. The Moving Finger, 1945, (The Light from Heaven) p. xxii-xxiii.

तरीही आपण दंडीला गुण-रीती-संप्रदायांचा अनुयायी ग्रंथकार मानतो, कविशिक्षापर ग्रंथकार मानीत नाही. वामनाने आपल्या काव्यालंकारसूत्रांवर स्वतःच वृत्ती लिहिली आहे. वामनाची सूत्रे व वृत्ती ह्यांमध्ये 'न प्रयोज्यं, न प्रयोक्तव्यं, न विधेयम्, प्रयोज्या, अन्वेष्यः, प्रयोगाश्चिन्त्याः,' असे कितीतरी विध्यर्थी प्रयोग आढळून येतात. पण आपण वामनाच्या ग्रंथाचा कविशिक्षापर-ग्रंथांत अन्तर्भाव करीत नाही. उलट आपण वामनाला रीती-संप्रदायाचा संस्थापक मानतो. रुद्रटाचा काव्यालंकार हाही साहित्यशास्त्रावरील एक प्रसिद्ध ग्रंथ आहे. त्यामध्ये विदध्यात्, रचयेत्, कुर्वीत, कुर्यात्, रचनीया अशी रूपे शेकडो वेळा आलेली आहेत. इतकेच नव्हे तर यत्नशील पुरुषाने अवधानपूर्वक निर्दोष काव्य रचावे (काव्यालंकार १।२२), पात्रगत तसेच अभिधेय(अर्थ)गत औचित्याचा विमर्श करून मिश्र वृत्तींची योजना करावी (तत्रैव २।३२), औचित्य जाणणाऱ्या सुकवींनी सर्गबद्ध महाकाव्यात सौष्ठवपूर्ण यमके रचावीत (तत्रैव ३।५९) असे स्पष्ट आदेश दिलेले आढळून येतात. आणि तरीही रुद्रटाचा काव्यालंकार हा एक कविशिक्षापर ग्रंथ होय असे कोणीही म्हणत नाही. उलट त्याला अलंकारसंप्रदायाचा श्रेष्ठ प्रतिनिधी मानले जाते. ध्वन्यालोक हा आकरग्रंथ प्रसिद्ध व गौरवास पात्र झालेला आहे, याबद्दल दुमत नाही. त्या ग्रंथात 'ध्वनी हा काव्याचा आत्मा होय' हा क्रांतिकारक अथवा युगप्रवर्तक महासिद्धान्त प्रगल्भविवेचनपूर्वक मांडला आहे. तथापी, त्या ग्रंथातही 'एवं अन्येऽपि अलंकारा यथायोगं योजनीयाः' (ध्वन्यालोक, हरिदास संस्कृत ग्रंथमाला ६६, १९५३, पृ० २१३), 'वृत्तादपि कथाशरीरादुत्प्रेक्षिते विशेषः प्रयत्नवता भवितव्यम् ।' (तत्रैव पृ० ३०९), 'तेषु कथाश्रयेषु तावत् स्वेच्छैव न योज्या ।' (तत्रैव पृ० ३१०), 'अलंकृतीनां शक्तावप्यानुरूप्येण योजनम् ।' (तत्रैव पृ० ३१८) 'यत्नः कार्यः सुमतिना परिहारे विरोधिनाम् ।' (तत्रैव, ३।७३), 'विधातव्या सहृदयैर्न तत्र ध्वनियोजना ॥' (तत्रैव ३।९६), 'तदेवं इदानीन्तनकविकाव्यनयोपदेशे क्रियमाणे, प्राथमिकानां अभ्यासार्थिनां यदि परं चित्रेण व्यवहारः, प्राप्तपरिणतीनां तु ध्वनिरेव प्राधान्येन काव्यं इति स्थितं एतत् ।' (तत्रैव, पृ० ५५४), 'अनन्ता हि ध्वनेः प्रकाराः सहृदयानां व्युत्पत्तये तेषां दिङ्मात्रं कथितम् ।' (तत्रैव पृ. ५७६) असे कितीतरी उद्गार आढळून येतात. वरील अखेरच्या दोन अवतरणांतील काव्यनयोपदेशे व व्युत्पत्तये हे शब्द तर कमालीचे बोलके आहेत. संस्कृत साहित्यशास्त्राच्या क्षेत्रातील अष्टाध्यायी[१] किंवा वेदान्तसूत्रे असलेल्या युगप्रवर्तक

१. "It occupies the same position in the Alankārśāstra as

ध्वन्यालोकाचे लेखनही सहृदयांच्या व्युत्पत्तीसाठी झालेले दिसते. पण तरीही कोणी ह्या ग्रंथाला कविशिक्षापर ग्रंथ म्हणत नाही. खरा प्रकार एकंदरीने असा आहे की, प्राचीन काळचे ग्रंथकार आपापले विचार स्वतःच्या विद्यार्थ्यांना विषय निरूपिता-निरूपिताच समजावून सांगत आणि विषयाचे चिंतन-मनन पूर्ण झाले व त्याची सर्व अंगोपांगे मनात (बुद्धीत) सुव्यवस्थितपणे स्थिरावली की, मग ग्रंथ लिहून टाकीत असत. त्या त्या ग्रंथकारांची मूळची भूमिका अध्यापकाची असल्यामुळे ग्रंथलेखनातही 'शिष्याणां उपदेशाय' हे व एतत्सदृश शब्दप्रयोग अपरिहार्यपणे येत असत. एवंच, क्षेमेन्द्राच्या औचित्यविचारचर्चा ह्या ग्रंथाला कविशिक्षापर ग्रंथाच्या कोटीत ढकलणे योग्य व न्याय्य नाही. काव्यालंकार, काव्यादर्श, ध्वन्यालोक इत्यादी ग्रंथांचा जो दर्जा तोच औचित्यविचारचर्चेचा. औचित्यविचारचर्चा हा ध्वन्यालोकाप्रमाणे एका स्वतंत्र सिद्धान्ताचे प्रतिपादन करणारा साहित्यशास्त्रीय ग्रंथ आहे, हे मान्य व्हावयास हरकत असू नये.

(३) **रचना**—प्रस्तुत ग्रंथात मंगलाचरणासकट एकूण ३९ कारिका आहेत. सर्व कारिका श्लोकवृत्तात रचिलेल्या आहेत. मंगलाचरणाच्या कारिकेत क्षेमेन्द्राने विष्णू ह्या आपल्या आराध्य देवतेची स्तुती केली आहे. त्यानंतरच्या म्हणजे दुसऱ्या कारिकेपासून दहाव्या कारिकेपर्यंत ग्रंथाचा एक भाग पडतो. दुसऱ्या कारिकेत कविकर्णिका नामक ग्रंथाचा निर्देश आहे. तो ग्रंथ लिहूनही आपले समाधान झाले नाही व म्हणून आता आपण रसजीवितभूत औचित्याचा विचार करणार आहोत, असे क्षेमेन्द्र तिसऱ्या कारिकेत म्हणतो. क्षेमेन्द्राने त्यापुढील दोन कारिकांमध्ये औचित्य हे रससिद्ध काव्याचे स्थिर जीवित असून काव्यगत अलंकार व गुण यांची गणना करणे व्यर्थ आहे असे प्रतिपादिले असून ग्रंथारंभीच आपल्या भूमिकेचे स्पष्टीकरण केले आहे. कारिका पाचवर विस्तृत वृत्ती लिहून त्यानंतरच्या म्हणजे सहाव्या कारिकेत त्याने गुणालंकारही औचित्याधीन कसे असतात ते सोदाहरण दाखवून दिले आहे. अशा प्रकारे स्वपूर्वकालीन गुण, रीती, अलंकार इत्यादी सर्व मतांहून आपले मत भिन्न असल्याचे स्पष्टपणे प्रतिपादून क्षेमेन्द्राने सातव्या कारिकेत 'ज्याला जे साजेसे असते त्यास आचार्य उचित म्हणतात व उचिताचा जो भाव ते औचित्य होय', असे औचित्याचे सामान्य-लक्षण केले आहे. त्यावर लगेच एका वाक्याची

Pāṇini's Sutras in grammar and the VedāntaSutras in Vedānta".—Dr. P. V. Kane, History of Sanskrit Poetics, 1961, p. 161.

गद्यवृत्ती देऊन मुद्याचे विशदीकरण केले आहे. त्यानंतरच्या म्हणजे क्रमांक ८, ९ व १० ह्या कारिकांमध्ये सकलकाव्य-शरीरामध्ये चैतन्यरूपाने वावरणाऱ्या औचित्याच्या मर्मस्थानांचा पुढीलप्रमाणे नामनिर्देश केला आहे—१. पद, २. वाक्य, ३. प्रबन्धार्थ, ४. गुण, ५. अलंकरण, ६. रस, ७. क्रिया (पद), ८. कारक, ९. लिंग, १०. वचन, ११. विशेषण, १२. उपसर्ग, १३. निपात, १४. काल, १५. देश, १६. कुल, १७. व्रत, १८. तत्त्व, १९. सत्त्व, २०. अभिप्राय, २१. स्वभाव, २२. सारसंग्रह, २३. प्रतिभा, २४. अवस्था, २५. विचार, २६. नाम, २७. आशीर्वचन व २८. काव्यांगे. ह्या तीन कारिकांवर ह्रस्व गद्यवृत्ती आहेच. अशा प्रकारे ग्रंथगत महासिद्धान्ताचा पृथक्पणा, त्याचे स्वरूप व त्याची व्याप्ती एवढ्या महत्त्वाच्या मुद्यांचा पहिल्या दहा कारिकांत परामर्श घेऊन क्षेमेन्द्र अकराव्या कारिकेत विषयाच्या विभागवार विवेचनाकडे वळला आहे. अकराव्या कारिकेपासून एकुणचाळीसाव्या कारिकेपर्यंत पुढीलप्रमाणे विषयनिरूपण झाले आहे.

कारिका	विषय	कारिका	विषय
११	पद	२५	निपात
१२	वाक्य	२६	काल
१३	प्रबन्धार्थ	२७	देश
१४	गुण	२८	कुल
१५	अलंकार	२९	व्रत
१६	रस	३०	तत्त्व
१७, १८	रससंकर	३१	सत्त्व
		३२	अभिप्राय
१९	क्रियापद	३३	स्वभाव
२०	कारक	३४	सारसंग्रह
२१	लिंग	३५	प्रतिभा
		३६	अवस्था
२२	वचन	३७	विचार
२३	विशेषण	३८	नाम
२४	उपसर्ग	३९	आशीर्वचन

एकुणचाळीसाव्या कारिकेच्या विवरणानंतर 'अन्येषु काव्यांगेषु अनयैव दिशा स्वयमौचित्यमुत्प्रेक्षणीयम्। तदुदाहरणानि आनन्त्यान् न प्रदर्शितानि इति अलं

अतिप्रसंगेन ॥' असे उद्‌गार काढून ग्रंथस्थ विषयाचे विवेचन संपवले आहे. ह्या आढाव्यावरून व वरील कोष्टकावरून दोन गोष्टी स्पष्ट होतील व त्या ह्या की, कारिका दहामध्ये ज्या 'काव्यांग' औचित्यस्थानाचा क्षेमेन्द्राने उद्देश केला आहे, त्याचे उदाहरणपूर्वक विवेचन केलेले नाही. काव्यांगांची कल्पना सहृदय वाचकांनीच करावी असे समारोपादाखल म्हणून त्याने ग्रंथविस्तार टाळला आहे. दुसरी गोष्ट अशी की, कारिका आठ ते दहामध्ये त्याने 'रससंकर' ह्या औचित्यस्थानाचा नामनिर्देश केलेला नाही. परंतु, प्रत्यक्ष ग्रंथात मात्र त्याचा त्याने उदाहरणपूर्वक विचार केलेला आहे. रससंकर ह्या मर्मस्थानाचा त्याने रस ह्या मर्मस्थानाच्या अन्तर्गत एक उपविभाग म्हणून परामर्श घेतलेला आहे. क्षेमेन्द्राने सहाव्या कारिकेच्या स्पष्टीकरणासाठी एक उदाहरण दिले आहे. त्यानंतर अकराव्या कारिकेपासून एकूणचाळीसाव्या कारिकेपर्यंत चर्चिलेल्या विविध विषयांच्या विशदीकरणासाठी त्याने स्वतःची व इतर कवींची मिळून एकशे-पाच पद्ये उद्‌धृत केली आहेत. त्याशिवाय त्याने आपल्या भूमिकेच्या समर्थनासाठी आनंदवर्धनाची एक व भट्टतौतांची अर्धी मिळून एकूण दीड कारिकाही उद्‌धृत केली आहे. विषयाचे प्रतिपादन संपल्यावर ग्रंथाच्या अखेरच्या पहिल्या श्लोकात त्याने आपल्या पित्याविषयी माहिती दिली आहे, दुसऱ्या श्लोकात 'नवौचित्यविचारचर्चा' आपण कोणासाठी केली आहे ते सांगितले आहे आणि तिसऱ्या श्लोकात कोणत्या राजाच्या काळात हा ग्रंथ रचिला ते निवेदिले आहे. शेवटी 'इति श्रीप्रकाशेन्द्रात्मजव्यासदासापराख्यश्रीक्षेमेन्द्रकृता औचित्यविचारचर्चा समाप्ता ॥' असे म्हणून ग्रंथ संपविला आहे.

(४) **सिद्धान्त-प्रतिष्ठापना**—वर प्रस्तुत ग्रंथाचा जो आराखडा दिला आहे त्यावरून ग्रंथगत विषयाचे व त्याच्या अंगोपांगांचे विवेचन कसे करण्यात आले आहे, त्याची कल्पना येईलच. आता, क्षेमेन्द्राने आपल्या नवसिद्धान्ताची प्रतिष्ठापना किती काळजीपूर्वक पण आत्मविश्वासाने केली आहे ते पाहावयाचे आहे. क्षेमेन्द्राने मंगलाचरणातही औचित्य शब्दाचा प्रयोग करून आपल्या औचित्यसिद्धान्ताची जणू नांदी गायिली आहे. त्यानंतरच्या कारिकेत त्याने आपण काव्याचे गुण, दोष, अलंकार इत्यादींचे विवेचन 'कविकर्णिका' नामक ग्रंथात केलेले असले तरीही जणू आपले समाधान झालेले नसल्यामुळेच आपण रसजीवितभूत औचित्यतत्त्वाचा येथे विचार करीत आहोत असा खुलासा केला आहे. ह्या खुलाशावरून क्षेमेन्द्राला काव्याच्या जीविततत्त्वाला भिडावयाचे आहे व त्यासाठीच त्याने प्रस्तुत ग्रंथाचे प्रणयन केले आहे, अशी वाचकाची खात्री पटते. ह्याबाबतीत क्षेमेन्द्राची वामन व ध्वन्यालोककार

ह्या दोन ग्रंथकारांशी तुलना करणे उद्बोधक ठरेल. वामन हा रीति-संप्रदायाचा प्रस्थापक म्हणून प्रख्यात आहे. परंतु, त्याच्या 'रीतिरात्मा काव्यस्य।' (काव्यालंकारसूत्रे १.२.६) ह्या स्वसिद्धान्तपर सूत्राचे दर्शन वाचकाला प्रथमाधिकरणाच्या प्रथम व द्वितीय अध्यायाची प्रत्येकी पाच सूत्रे पालथी घातल्याशिवाय होत नाही. ध्वन्यालोककारांनी मंगलाचरण संपविल्यावर लगेच पहिल्याच श्लोकाच्या आरंभी 'काव्यस्यात्मा ध्वनिरिति बुधैर्यः समाम्नातपूर्वः' (ध्वन्यालोक १।१) अशी घोषणा केली असून 'ध्वनी हा काव्यात्मा होय' ह्या भूमिकेवरील इतरांच्या आक्षेपांचा निर्देश करून त्यांचाच आम्ही आता परामर्श घेणार आहोत असे आत्मविश्वासाने सांगितले आहे. त्यांची ही पद्धती क्षेमेन्द्रावरही ताण करणारी आहे. कारण क्षेमेन्द्राने जरी, वर म्हटल्याप्रमाणे, मंगलाचरणातच औचित्यसिद्धान्ताचा उल्लेख केला असला तरी 'औचित्य हे काव्याचे जीवित होय' ह्या त्याच्या प्रिय सिद्धान्ताप्रत येण्यापूर्वी दरम्यान आणखी तीन कारिका ओलांडाव्या लागतात. क्षेमेन्द्राने तिसऱ्याच कारिकेत चमत्कारतत्त्वाची औचित्यसिद्धान्ताशी सांगड घातली असून आपल्या दृष्टिकोणाचे संसूचन केले आहे. त्याने औचित्य हे तत्त्व काव्याच्या आनंददायी आस्वादात चमत्कार उत्पन्न करते असे म्हटले आहे व म्हणूनच ते तत्त्व विचारणीय व प्रतिपादनीय आहे असे जणू सुचविले आहे. आपला पंथ पूर्वसूरींच्या पंथाहून वेगळा व स्वतंत्र आहे हे विशद करण्यासाठीच त्याने क्रमांक चार व पाच ह्या कारिकांची रचना केली आहे. क्षेमेन्द्राला स्वपूर्वकालीन भामह-वामन-रुद्रट-आनंदवर्धनप्रभृतींच्या विचारसरणी पूर्णपणे परिचित होत्या. भामहाने जरी तीनच गुणांचा निर्देश केला असला (पाहा-काव्यालंकार २-१ ते ३) तरी गुणांची ही संख्या उत्तरोत्तर वाढत जाऊन तिने भोजाच्या सरस्वतीकण्ठाभरणात (प्रथम-परिच्छेद) अठ्ठेचाळीसची कमाल-मर्यादा गाठली. अलंकारांचाही तोच प्रकार. भामहाच्या काळात चाळीसच्या आसपास रेंगाळणाऱ्या अलंकारसंख्येस उत्तरकाळात एकाएकी फुगवटा आला व तिने भोजाच्या सरस्वतीकंठाभरणात ७२ पर्यंत मजल गाठली. गुणालंकार-परिगणनेचा हा सर्वच उद्योग क्षेमेन्द्राला प्रयोजनशून्य अतएव त्याज्य वाटतो आणि म्हणूनच तो ज्या काव्यात औचित्यरूपी जीविताचा आढळ होत नाही त्या काव्याच्या गुणालंकारांचे गणित निरर्थकपणे काय करीत बसावयाचे, असे चवथ्या कारिकेत विचारून आपला एतद्विषयक दृष्टिकोण ध्वनित करतो. क्षेमेन्द्राने ह्या दृष्टिकोणाचे अधिक स्पष्टीकरण पाचव्या कारिकेत व तीवरील वृत्तीत केले आहे. अशा प्रकारे गुण व अलंकार

हे दोन्ही घटक बाह्य म्हणजे अ-स्वाभाविक अथवा आगन्तुक असल्यामुळे त्यांच्या-वाचून काव्याचे अडून राहणार नाही, पण औचित्य नसेल तर मात्र काव्याला काव्य म्हणता येणार नाही, असे सुचवून आपल्या सिद्धान्ताची मूर्ती रसिकांच्या अंतःकरणरूपी गाभाऱ्यात स्थिर केली आहे. उपर्युल्लिखित गद्यवृत्तीत अलंकार व गुण हे केवळ अलंकार व गुणच असतात असे सांगितले गेले, परंतु त्यांचा व औचित्य ह्या नवतत्त्वाचा संबंध काय ते स्पष्ट झाले नाही. तेच कार्य क्षेमेन्द्राने सहाव्या कारिकेत साधले आहे. गुणालंकारही औचित्यायत्त असतात असे त्या कारिकेत व तीवरील वृत्तीत प्रतिपादून त्याने एक समर्पक श्लोकही स्वमतपुष्ट्यर्थ उद्‌धृत केला आहे. अशा प्रकारे क्षेमेन्द्राने स्वसिद्धान्ताचे स्थिरी-करण केले आहे. परंतु, आपला सिद्धान्त सर्वस्वी नवीन आहे, तो प्रचलित सिद्धान्तांहून भिन्न आहे असे कोणीही कितीही कंठरवाने सांगितले तरी विद्वान् त्याकडे फारसे लक्ष देत नाहीत; त्या सिद्धान्ताची तत्प्रणेत्याने व्याख्या करावी, त्याचे स्वरूप स्पष्ट करून सांगावे अशी विद्वानांची अपेक्षा असते. ती ध्यानात घेऊनच क्षेमेन्द्राने सातव्या कारिकेत व तीवरील वृत्तीत उचित व औचित्य ह्या दोन्ही शब्दांचे निर्वचन केले आहे. त्याच्या मती जे ज्याला अनुरूप असते त्यास उचित म्हणतात व त्या उचिताचा जो धर्म (भाव) त्याला औचित्य म्हणतात. हे औचित्याचे सामान्यलक्षण करताना त्याने 'प्राहुराचार्याः' असे साभिप्राय म्हटले आहे. आपल्या औचित्य-निर्वचनाला प्राचीन विद्वानांचा पाठिंबा आहे असे सुचविणे हाच तो अभिप्राय होय. ह्याबाबतीत त्याने ध्वन्यालोककारांच्या पावलावर पाऊल ठेवले आहे, असे प्रतीत होते. ध्वन्या-लोककारांनी 'यत्रार्थः शब्दो वा तमर्थमुपसर्जनीकृतस्वार्थौ। व्यङ्क्तः काव्य-विशेषः स ध्वनिरिति सूरिभिः कथितः ॥' (१।१३) या कारिकेत ध्वनि-काव्याचे अर्थात् उत्तमकाव्याचे लक्षण सांगितले आहे. त्यातील 'सूरिभिः कथितः' या पदद्वयाचे प्रयोजन स्पष्ट करताना वृत्तिकार म्हणतात, "सूरिभिः कथितः इति विद्वदुपज्ञेयमुक्तिः, न तु यथाकथञ्चित्प्रवृत्तेति प्रतिपाद्यते ।"[1] क्षेमेन्द्राने अशा प्रकारे औचित्यसिद्धान्ताचे नीटसपणे दृढीकरण केले आहे. तथापि, ह्या जीवितभूत औचित्याची काव्यात प्रतीती कोठेकोठे होते, त्याचा विहार समग्र काव्यात असतो की त्याच्या काही घटकात तेवढा असतो असे प्रश्न शिल्लक राहतातच. त्यांच्या उत्तरार्थ क्षेमेन्द्राने आठ ते दहा ह्या कारिका रचून औचित्याची काव्यगत विलासस्थाने कोणती ते स्पष्ट करून सांगितले

---

१. 'ध्वन्यालोक':—हरिदास-संस्कृत-ग्रन्थमाला ६६, १९५३, पृ० ६५.

आहे. काव्यातील पदादी अठ्ठावीस स्थानांमध्ये औचित्याची प्रतीती येते, त्यामुळे ही स्थाने जणू शरीरातील मर्मस्थानांप्रमाणे होत अशी भूमिका क्षेमेन्द्राने घेतली आहे. ह्या मर्मस्थानांमध्ये औचित्य नुसतेच जाणवते असे नाही तर ते स्पष्टपणे सळसळताना भासमान होते, असे क्षेमेन्द्राने म्हटले आहे. 'सकलशरीरव्यापि जीवितमौचित्यं स्फुटत्वेन स्फुरदवभासते।' (कारिका ५ वरील वृत्ती) ह्या शब्दांच्या प्रयोगाने क्षेमेन्द्राने एकीकडे औचित्य हा काव्यात्मा होय हे घोषित केले आहे व दुसरीकडे विद्वानांनी ह्याबाबतीत निःशंक असावे असे जणू आवाहन त्यांना केले आहे. क्षेमेन्द्राने अशा प्रकारे आपल्या नवसिद्धान्ताचा परंपरागत सिद्धान्तांहून असलेला वेगळेपणा दर्शवून, नवसिद्धान्ताची व्याख्या करून व त्या सिद्धान्ताच्या अंगोपांगांची परिगणना करून त्यास बळकटपणे उभे केले आहे. आणि ह्यानंतरच्या ग्रंथात क्षेमेन्द्राने पदादी उद्दिष्ट मर्मस्थानांचे क्रमशः, सोदाहरण व सांगोपांग विवेचन करण्यास प्रारंभ केला आहे. त्याच्या ह्या विवेचन-पद्धतीची वैशिष्ट्येच आता अभ्यासावयाची आहेत.

(५) विवेचनपद्धतीची वैशिष्ट्ये— (अ) क्षेमेन्द्राने औचित्याचे सामान्य-लक्षण जरी सातव्या कारिकेत केलेले असले तरी त्याने प्रत्येक मर्मस्थानाचेही स्वतंत्रपणे लक्षण केलेले आढळते. उदा० पदौचित्याच्या निरूपणास प्रारंभच मुळी 'तिलकं बिभ्रती सूक्तिर्भात्येकं उचितं पदम्। चन्द्राननेव कस्तूरीकृतं श्यामेव चान्दनम्॥' (कारिका ११) ह्या कारिकावतरणाने झाला आहे. वस्तुतः, एकदा औचित्याचे सामान्यलक्षण केल्यावर प्रत्येक औचित्यस्थानाचे पृथक् लक्षण करण्याचे प्रयोजन काय, अशी शंका साहजिकपणेच निर्माण होते. तिचे समाधान ध्वन्यालोककारांच्या अर्थपूर्ण शब्दात करणेच औचित्यपूर्ण आहे. ते म्हणतात, 'न हि सामान्यमात्रलक्षणेन उपयोगिविशेषलक्षणानां प्रतिक्षेपः शक्यः कर्तुम्। एवं हि सति सत्तामात्रलक्षणे कृते सकलसद्वस्तुलक्षणानां पौनरुक्त्यप्रसंगः।'[१] ह्याचे स्पष्टीकरण वैशेषिकसूत्रांचा दाखला देऊन करता येईल. वैशेषिकसूत्रकार कणाद महर्षींनी 'क्रियागुणवत् समवायिकारणं इति द्रव्यलक्षणम्।' (वै. सू. १. १. १५) असे द्रव्य ह्या पदार्थाचे सामान्यलक्षण केले. ते द्रव्यात अन्तर्भूत होणाऱ्या पृथिव्यादी नऊ वस्तूंना लागू होते हे खरे. तथापी, पृथिवी व जल ही दोन्ही द्रव्येच असली (म्ह० अविशेष असली) तरी पृथिवी म्हणजे जल नव्हे (म्ह० ती दोन्ही विशेषही आहेत). म्हणूनच त्यांची विशेष-लक्षणे करणे प्राप्त ठरते आणि तशी ती केलेलीही आढळतात. उदा०

१. 'ध्वन्यालोकः', हरिदास—संस्कृत ग्रंथमाला ६६, १९५३ पृ. ४९१.

'रूपरसगन्धस्पर्शवती पृथिवी ।' (वै. सू. २-१-१) हे पृथ्वीचे लक्षण किंवा 'रूपरसस्पर्शवत्यः आपो द्रवाः स्निग्धाः ।' (वै. सू. २. १. २) हे जलाचे लक्षण, किंवा 'तेजो रूपस्पर्शवत् ।' (वै. सू. २. १. ३) हे अग्नीचे लक्षण इत्यादी. हे सर्व विचार मनात वागवूनच क्षेमेन्द्राने प्रत्येक औचित्यस्थानाचे लक्षण केले आहे. त्यानंतर त्या लक्षणपर कारिकेवर गद्य वृत्ती देऊन लक्षणाचे स्पष्टीकरण केले आहे. तत्पश्चात् त्या त्या प्रकारच्या औचित्याच्या परिपोषाची व भंगाची उदाहरण-पद्ये सादर करून प्रत्येक पद्यात औचित्याचा परिपोष किंवा भंग कसा झाला आहे, त्याचे विवेचन केले आहे. ह्याच साचेबंद पद्धतीने क्षेमेन्द्राने पदापासून आशीर्वचनापर्यंतच्या सत्तावीस औचित्य-स्थानांचे विवरण केले आहे. ते विचारात घेता क्षेमेन्द्राच्या बौद्धिक शिस्तीची चांगलीच कल्पना येते. एवंच, शिस्तबद्धपणा, टापटीप, रेखीवपणा हे क्षेमेन्द्राच्या विवेचनसरणीचे आद्य वैशिष्ट्य होय, असे म्हणता येते.

(आ) क्षेमेन्द्राच्या ह्या टापटिपीला त्याची स्वाभाविक साक्षेपी वृत्ती कारणीभूत आहे. त्यामुळेच त्याच्या ग्रंथाची गुणवत्ता वृद्धिंगत झाली आहे, ह्यात शंका नाही. कोणताही विचार वा विचारांश संदिग्ध ठेवणे क्षेमेन्द्राला रुचत नाही. आपले प्रत्येक विधान सुस्पष्टतर व निःसंदिग्ध करण्याची तो खबरदारी घेतो. इतकी की, एखाद्या कारिकेत 'सताम्' शब्द वापरला (उदा० कारिका १२) तर तीवरील वृत्तीत तो तत्परतेने त्या शब्दाचे 'काव्यविवेकविचक्षणानां' असे विशदीकरण करण्यास विसरत नाही. त्याच्या ह्या साक्षेपी वृत्तीची कितीतरी उदाहरणे दाखवून देता येतील. राजशेखराचा 'चिताचक्रं···' इत्यादी (उदाहरणपद्य २०) श्लोक उद्धृत करून त्यावरील वृत्तीत तो 'योऽर्थस्तु हृदयसंवादी स यद्यनौचित्यस्पर्शलेशरहितस्तदधिकतरामलंकारशोभां पुष्णाति ॥' असा एक स्वतंत्र विचार मांडतो. पण क्षेमेन्द्र केवळ एवढा विचार मांडून स्वस्थ बसत नाही, तर त्या विचाराचे ज्यात प्रतिबिंब आढळेल असा कार्पटिकाचा एक श्लोकही उद्धृत करण्याची दक्षता बाळगतो, इतकेच नव्हे तर आपण व्यक्त केलेल्या विचाराची त्या श्लोकात कशी प्रतीती येते, ते वृत्तीत विवरून सांगण्यास विसरत नाही. रसौचित्यविचारचर्चेत त्याची ही साक्षेपशीलता विशेषच उठून दिसते. वस्तुतः, रसौचित्याची एखाद-दोन व औचित्यहानीची दोन-तीन उदाहरणे देऊन क्षेमेन्द्राला वेळ मारून नेता आली असती. पण असली चालढकल क्षेमेन्द्राच्या शब्दकोशात नाही ! त्यामुळे तो शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स, अद्भुत व शान्त त्या सर्वच्या सर्व रसांची प्रत्येकी दोन-दोन, तीन-तीन उदाहरणे देऊन चर्चा करतो. त्यानंतर रस-

संकराचे औचित्य व अनौचित्य विशद करण्यासाठी दोन स्वतंत्र कारिका रचितो (कारिका १७ व १८) व ह्या मुद्याच्या स्पष्टीकरणासाठी पुन्हा उदाहरणांची वृष्टी करतो. ह्याच विषयावरील विवेचनाच्या ओघात त्याला अमरकाच्या 'गन्तव्यं···'इत्यादी श्लोकात (श्लोक क्रमांक ४९) अनौचित्य प्रतीत होते. ते अनौचित्य काव्यगत प्रधान रसाला विरोधी असलेल्या दुसऱ्या रसाच्या परिपोषामुळे उत्पन्न झालेले असते. हा एक अपूर्वप्रतिपादित विचार असल्याची जाणीव होताच क्षेमेन्द्र 'विरोधी वाऽविरोधी···' इत्यादी आनंदवर्धनाची कारिका उतरून घेऊन लगेच तिची वृत्तीत फोड करून, कारिकागत विचाराला पोषक असे राजशेखराचे 'माणं···' इत्यादी (उदाहरणश्लोक ५०) प्राकृत पद्य उद्धृत करून व त्यावर पुनः स्पष्टीकरणात्मक व्याख्यान करून मुद्याची परिसमाप्ती करतो. अर्थात् , इतका दक्ष ग्रंथकार रसौचित्यविचारान्ती 'अनया दिशा रससंकरे भेदप्रपंचौचित्यं विपश्चिद्भिः स्वयं विचार्यम् ॥' असे अत्यंत विनीतभावाने म्हणतो, त्यात आश्चर्य मुळीच नाही. त्याच्या ह्या शिस्तप्रिय वृत्तीचा नमुना क्रियापदौचित्यविचाराच्या प्रारंभीच पाहावयास मिळतो. क्षेमेन्द्राने आठ-नऊ-दहा ह्या कारिकांमध्ये औचित्य स्थानांचा उद्देश (नामतः निर्देश) केला आहे. त्यात रसानंतर क्रियेचा क्रम लाविलेला आहे. अर्थात्, रसौचित्यविचारानंतर क्रियौचित्यविचार होणार हे वाचक गृहीतच धरून असतो पण रसौचित्यविचाराने ग्रंथाची बरीच जागा अडवलेली आहे (कारिका १६ ते १८ व उदाहरणश्लोक २२ ते ५०, शिवाय काही उदाहरणश्लोकांवरील दीर्घ वृत्ती). त्यामुळे वाचकाला उद्दिष्ट विषयक्रमाचा विसर तर पडला नसेल ना ह्या शंकेने क्षेमेन्द्र जणू व्याकुळ होतो ! एकदा विकल्प मनी उपजला की, त्याचे निराकरण केल्याशिवाय राहावयाचे नाही, हा तर त्याचा शिरस्ता आहे. त्यास अनुसरून 'रसौचित्यविचारानन्तरम् उद्देशानुसारेण क्रमोपगतं क्रियापदौचित्यं दर्शयितुं आह', असे म्हटल्याशिवाय त्याचा जीव भांड्यात पडत नाही! कारकौचित्याच्या विवरणातही संस्कृत व्याकरणाला अभिमत असलेल्या कर्तृ, कर्म, करण, संप्रदान, अपादान व अधिकरण ह्या सहाही कारकांचा सोदाहरण विचार केल्याशिवाय त्यास समाधान वाटत नाही. संस्कृत भाषेत एक, द्वि व बहु अशी तीन वचने आहेत, हे संस्कृत जाणणाऱ्या प्रत्येकालाच ठाऊक आहे. पण क्षेमेन्द्र काहीही गृहीत धरून चालावयास राजी नाही. तो वचनौचित्यपर बाविसाव्या कारिकेवरील वृत्तीत 'उचितैः एकद्विवचनबहुवचनैः' असा खुलासा करण्यास चुकत नाही. कालौचित्यविषयक कारिकेत अथवा तीवरील वृत्तीत क्षेमेन्द्राने जरी भूत, वर्तमान व भविष्यत् ह्या

त्रिकालांचा निर्देश केला नसला तरी उदाहरणे मात्र तिन्ही काळांची व ह्याच क्रमाने कटाक्षाने दिली आहेत. प्रतिभौचित्य-प्रकरणी स्वतःचाच 'अद्य! दशसि···' इत्यादी (उदाहरणश्लोकांक ९१) श्लोक व त्यावरील वृत्ती लिहून झाल्यावर तो भट्टतौतांची 'प्रज्ञा नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा मता' ही व्याख्या आठवणीने उद्धृत करतो. तसेच, मुद्याच्या स्पष्टीकरणार्थ उद्धृत केलेला श्लोक कोणाचा ते सांगण्याची टाळाटाळ करणे क्षेमेन्द्राच्या गावी नाही. अर्थात् असा साक्षेपी ग्रंथकार, पदापासून आशीर्वचनौचित्यापर्यंतच्या मर्मस्थानांचे सोपपत्तिक व सोदाहरण विवेचन संपवल्यावर, ग्रंथविस्तार होऊ नये ह्यासाठी, 'अन्येषु काव्यांगेपु अनयैव दिशा स्वयं औचित्यं उत्प्रेक्षणीयम् ।' असे संतसज्जनांना विनवून सांगावयास विसरत नाही. मात्र ह्याबाबतीत क्षेमेन्द्रावर जो आक्षेप डॉ॰ दे यांनी घेतला आहे त्याचा अवश्य समाचार घ्यावयास हवा. डॉ॰ दे * म्हणतात, "...and the cases of application are dogmatically summarised as twenty-seven in number."[1] पुन्हा, "He dogmatically summarises the cases of application as twenty-seven in number."[2] तसेच, "The cases of application are dogmatically summarised as twenty-seven in number."[3] डॉ॰ देसारख्या 'विबुधमान्य' ग्रंथकारावर तेचतेच शब्द वापरण्याची पाळी यावी, हे इंग्रजी भाषेचे केवढे दुर्भाग्य आहे! डॉ॰ दे म्हणतात त्याप्रमाणे क्षेमेन्द्राने सत्तावीस मर्मस्थाने मानलेली नाहीत, त्याने अठ्ठावीस मर्मस्थाने मानली असून शेवटच्याचे फक्त विवेचन केलेले नाही. डॉ॰ दे समजतात त्याप्रमाणे क्षेमेन्द्र dogmatic असता तर त्याने 'अनयैव दिशा···' इत्यादि शब्दांनी ग्रंथोपसंहार केला असता का, ह्याचा विचार डॉ॰ दे ह्यानी करावयास हवा होता. क्षेमेन्द्राचे उपर्युक्त उद्गार त्याची हट्टवादी

* ह्या मुद्याचा किंचित् विचार पुढे छापलेल्या औचित्यविचारचर्चेच्या सविवरण अनुवादात पृष्ठ० १५७ वर केला आहे. येथे त्याचा सविस्तर व साधार प्रपंच थाटला आहे

1. Dr. S. K. De—History of Sanskrit Poetics, 1960, vol. II, p. 285.

2. Dr. S.K.De—Sanskrit Poetics as a Study of Aesthetic, 1963, p. 40.

3. Dr. S. K. De—Some Problems of Sanskrit Poetics, 1959, p. 44.

वृत्ती न दाखविता उलट त्याची विनीतवृत्तीच दाखवितात. आणि क्षेमेन्द्राने सत्तावीसच मर्मस्थानांचे निरूपण केल्यामुळे व एका मर्मस्थानाचे निरूपण वगळल्यामुळे तो जर dogmatic ठरत असेल तर संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांपैकी भामहापासून ध्वन्यालोककारांपर्यंतच्या क्षेमेन्द्रपूर्व शास्त्रज्ञांनाही तसाच बोल लावता येईल. उदा० दण्डी, 'ते चाद्यापि विकल्प्यन्ते कस्तान् कार्त्स्न्येन वक्ष्यति ॥' काव्यादर्श २।१ असे म्हणून हात टेकतो. तसेच 'तद्भेदास्तु न शक्यन्ते वक्तुं प्रतिकविस्थिताः ॥' काव्यादर्श १।१०१, 'तथापि न तदाख्यातुं सरस्वत्यापि शक्यते ॥' तत्रैव १।१०२ असा निर्वाळा देतो. एवढेच नव्हे तर ६६० श्लोकांचा बृहद्ग्रंथ लिहूनही शेवटी तो 'गुणा दोषाश्च काव्यानामिह संक्षिप्य दर्शिताः ॥'— ३।१८६ असे म्हणतोच. तर मग सविस्तर विवेचन करण्याचे टाळणाऱ्या दंडीला डॉ० दे dogmatic का म्हणत नाहीत? भामहानेही 'समासेनोदितमिदं धीखेदायैव विस्तरः। असंगृहीतमप्यन्यदभ्यूह्यमनया दिशा' (काव्यालंकार २।९२) असेच उद्गार काढले आहेत. डॉ० दे भामहाची संभावना कोणत्या शब्दांनी करणार? वामनाने पंचाधिकरणात्मक व द्वादशाध्यायी काव्यालंकारसूत्रे हा ग्रंथ लिहिला आहे. त्यात ३१९ सूत्रे असून त्यांवर त्याचीच स्वतःची वृत्तीही आहे. इतका मोठा ग्रंथ लिहून हातावेगळा करताना वामन अखेरच्या सूत्रावरील वृत्तीनंतर म्हणतो, 'सदसन्तो मया शब्दा विधिनाल्पेन दर्शिताः। अनयैव दिशा कार्यं शेषाणामप्यवेक्षणम् ॥'. येथे वामनानेही क्षेमेन्द्रासारखेच 'अनयैव दिशा' हे शब्द वापरून सज्जनांच्या माथ्यावर काही भार टाकला आहे. मग ज्या न्यायाने क्षेमेन्द्र हट्टवादी ठरतो त्याच न्यायाने वामनही हट्टवादी ठरावयास नको काय? रुद्रटाचा काव्यालंकार म्हणजे ७३४ श्लोकांचा, १६ अध्यायात विभागलेला ग्रंथराज आहे. त्यानेही पददोषांचे विवरण केल्यावर 'इत्थं पददोषाणां दिङ्मात्रमुदाहृतं हि सर्वेषाम्। तस्मादनयैव दिशा ततोऽन्यदभ्यूह्यमभियुक्तैः ॥' ६।२८ असे अभियुक्तांना, क्षेमेन्द्राचेच शब्द वापरून, बजावले आहे. पण त्याला मात्र डॉ० दे dogmatic म्हणणार नाहीत! ध्वन्यालोक हा संस्कृत साहित्यशास्त्रावरील एक श्रेष्ठ आकरग्रंथ होय. परंतु, त्यातही अनेक ठिकाणी 'ह्याच मार्गाने वाचकांनी विचार करून आणखी उदाहरणे शोधावीत, किंवा इतर मुद्यांची कल्पना करावी', असे वाचकांना विनविले आहे. उदा० 'अनया दिशा सहृदयैरन्येऽपि व्यंजकविशेषा स्वयं उत्प्रेक्षणीयाः।'[1] 'एवमेषां रसविरोधिनामन्येषां

१. 'ध्वन्यालोकः', हरिदास-संस्कृत-ग्रंथमाला ६६, १९५३, पृ० ३४७.

चानया दिशा स्वयं उत्प्रेक्षितानां परिहारे सत्कविभिरवहितैर्भवितव्यम् ।'[१] 'अनया दिशाऽन्येऽपि प्रकारा उत्प्रेक्षणीयाः ।'[२] 'अनन्ता हि ध्वनेः प्रकाराः सहृदयानां व्युत्पत्तये तेषां दिङ्मात्रं कथितम् ।'[३] 'तत्तु अतिविस्तारकारीति नोदाहृतम् ।'[४] 'सहृदयैः स्वयं उत्प्रेक्षणीयम् ।'[५] 'तदिदं अत्र संक्षेपेण अभिधीयते सत्कवीनां उपदेशाय'[६] अशा वचनांचा पाऊस पाडता येईल, तथापी ग्रंथविस्तारभयास्तव आम्हीही येथे संक्षेपानेच दिग्दर्शनमात्र केले आहे! वस्तुतः ह्यातील रहस्य असे आहे की, कोणत्याही शास्त्रीय ग्रंथात एकाच गटात वा वर्गात पडणाऱ्या पदार्थांचे सामान्य लक्षण-वर्णन करण्याचा रिवाज आहे. त्या वर्गातील प्रत्येक पदार्थाचे वर्णन-निरूपण करू म्हटले तर ग्रंथ कधीच पूर्ण व्हावयाचा नाही. ग्रंथकार विचारांची दिशा दाखवून देतो. त्या दिशेस अनुसरून स्वतः विचार करून इतर पदार्थांचे आकलन करून घेणे हे 'बुधां'[७]चे काम असते, हा सर्व विचार ध्यानी न घेतल्यामुळेच डॉ० दे यांनी क्षेमेन्द्राला dogmatic म्हणून अकारण दोष दिला आहे, हे वरील विवेचनावरून आता स्पष्ट होईल. मात्र गंमतीखातर असे अवश्य म्हणावेसे वाटते की, क्षेमेन्द्राने आपल्या ग्रंथात इतर सर्व ठिकाणी जरी साक्षेपी वृत्ती दाखविली असली तरी लिंगौचित्यविचारप्रकरणी कारिका एकवीसमध्ये तसेच तीवरील वृत्तीमध्येही 'पुंलिंग-स्त्रीलिंग-नपुंसकलिंग' ह्या तीन लिंगांचा निर्देश करण्याची तत्परता दाखविली नाही!!

(इ) उदाहरण-पद्यांचे वैपुल्य हे क्षेमेन्द्राच्या विवेचनपद्धतीचे एक उज्ज्वल वैशिष्ट्य होय. भामह-दण्डी-वामन-आनंदवर्धनप्रभृती क्षेमेन्द्रपूर्वकालीन शास्त्रज्ञ तात्त्विक विवेचनाच्या स्पष्टीकरणासाठी उदाहरणे देतात हे खरे. दण्डीने ह्याबाबतीत विशेष दक्षता बाळगलेली दिसते हेही तितकेच खरे. तथापी, हे ग्रंथकार काही तात्त्विक मुद्यांची उदाहरणे न देता विवेचन करून मोकळे होतात असेही आढळून येते. अर्थात् ह्याबाबतीत त्यांना दोष देण्याचा येथे उद्देश नाही. काही मुद्दे स्वतःस्पष्ट असल्यामुळे म्हणून म्हणा, काही मुद्दे हे वस्तुतः उपमुद्दे असल्यामुळे म्हणून म्हणा किंवा काही मुद्दे फारसे महत्त्वाचे नसल्यामुळे म्हणून म्हणा, हे ग्रंथकार उदाहरणे न देता पुढे सरकतात, असे दिसून येते. परंतु, क्षेमेन्द्र मुद्दा लहान असो की मोठा असो, विचार महत्त्वाचा असो की क्षुल्लक असो, त्याला अनुरूप असे उदाहरण दिल्यावाचून पुढे

१. तत्रैव, पृ० ३६२. २. तत्रैव पृ० ३९५. ३. तत्रैव पृ० ५७६. ४. तत्रैव पृ० ६२८. ५. तत्रैव पृ० ६२९. ६. तत्रैव पृ० ६४९. ७. 'दिङ्मात्रं तूच्यते येन व्युत्पन्नानां सचेतसाम् । बुद्धिरासादितालोका सर्वत्रैव भविष्यति ॥' ध्वन्यालोक २।३६

सरकत नाही. त्याची ह्याबाबतीतली शिस्त अतिशय स्पृहणीय आहे. आपण शास्त्रीय ग्रंथ लिहावयास बसलो आहोत, शास्त्रे दुर्बोध[1] असल्यामुळे वाचकांना त्यांची भीतीच वाटत असते, त्यामुळे शास्त्रीय विषयावर ग्रंथ रचणाऱ्याने आपला ग्रंथ यावच्छक्य सुबोध व सुविशद करण्याची खबरदारी घेतली पाहिजे, हे सर्व विचार मनात बागवूनच क्षेमेन्द्राने आपल्या प्रत्येक शास्त्रीय ग्रंथात वाचकांवर उदाहरणांची वृष्टी केली आहे. क्षेमेन्द्राने लिहिलेल्या तिन्ही शास्त्रीय ग्रंथांचा साकल्याने विचार केला तर असे आढळून येते की, त्याने एकूण साठाहून अधिक ग्रंथकारांची सुमारे २६० पद्ये आपल्या ग्रंथात उदाहरणांदाखल उद्धृत केली आहेत. ह्यावरून त्याच्या विस्तृत व मर्मग्राही वाचनाचा व बहुश्रुतपणाचा वाचकाला चांगलाच परिचय होतो. औचित्यविचार-चर्चेतही त्याने उदाहरणे देण्याचे बाबतीत मुळीसुद्धा हयगय केलेली नाही हे खालील कोष्टकावरून समजून येईल.

[कविनामांपुढे दिलेले आकडे उदाहरणश्लोकांचे आहेत].

कारिकांक	औचित्यस्थान	उपभेद	पोषक उदाहरणे कविनामे	मारक उदाहरणे
६	गुणालंकारांची औचित्याधीनता		(१)	
११	पद	—	परिमल (२), श्रीहर्ष (४)	धर्मकीर्ती (३)
१२	वाक्य	—	क्षेमेन्द्र (५), राजशेखर (६)	राजशेखर (७)
१३	प्रबन्धार्थ	—	कालिदास (८), भवभूती (९,१०)	राजशेखर (११), कालिदास (१२)
१४	गुण	—	भट्टनारायण (१३), भट्टबाण (१४)	चन्द्रक (१५), राजशेखर (१६)
१५	अलंकार		श्रीहर्ष (१७), कार्पटिक (२१)	चन्द्रक (१८), मालवरुद्र (१९), राजशेखर (२०)
१६	रस	शृंगार	श्रीहर्ष (२२), कालिदास (२३)	कालिदास (२४)
		हास्य	क्षेमेन्द्र (२५,२६)	श्यामल (२७)
		करुण	क्षेमेन्द्र (२८)	परिमल (२९)
		रौद्र	भट्टनारायण (३०)	प्रवरसेन (३१)

१. 'प्रायेण दुर्बोधतया शास्त्राद् बिभ्यति अमेधसः ।'—भामह, काव्यालंकार ५।२.

कारिकांक	औचित्यस्थान	उपभेद	पोषक उदाहरणे	मारक उदाहरणे
		वीर	क्षेमेन्द्र (३२), राजशेखर (३३),	भवभूती (३४)
		भयानक	श्रीहर्ष (३५,३६)	मुक्तापीड (३७)
		बीभत्स	क्षेमेन्द्र (३८)	चन्द्रक (३९)
		अद्भुत	चन्द्रक (४०)	क्षेमेन्द्र (४१)
		शान्त	क्षेमेन्द्र (४२,४३)	उत्पलराज (४४)
१७–१८	रससंकर	{ शान्त-शृंगार	व्यास (४५)	
		{ बीमत्स-शृंगार	क्षेमेन्द्र (४६)	
		वीर-करुण	क्षेमेन्द्र (४७)	
		{ शान्त-शृंगार-करुण-बीभत्स	क्षेमेन्द्र (४८)	
		शृंगार-शांत		अमरक (४९)
		विरोधीचा-अपरिपोष	राजशेखर (५०)	
१९	क्रियापद		क्षेमेन्द्र (५१)	प्रवरसेन (५२)
२०	कारक	कर्तृ	भट्टबाण (५३)	परिमल (५४)
		कर्म	क्षेमेन्द्र (५५)	क्षेमेन्द्र (५६)
		करण	गौडकुंभकार (५७)	भट्टबाण (५८)
		संप्रदान	भट्टप्रभाकर (५९)	राजशेखर (६०)
		अपादान	मालवरुद्र (६१)	भट्टेन्दुराज (६२)
		अधिकरण	कालिदास (६३)	परिमल (६४)
२१	लिंग	(स्त्रीलिंग)	क्षेमेन्द्र (६५)	क्षेमेन्द्र (६६)
२२	वचन	(बहु)	क्षेमेन्द्र (६७)	मातृगुप्त (६८)
२३	विशेषण		क्षेमेन्द्र (६९)	भट्टलट्टन (७०)
२४	उपसर्ग		क्षेमेन्द्र (७१)	कुमारदास (७२)
२५	निपात		क्षेमेन्द्र (७३)	भीचक (४७)

कारिकांक	औचित्यस्थान	उपभेद	पोषक उदाहरणे	मारक उदाहरणे
२६	काल		क्षेमेन्द्र (७५), मालव-कुवलय (७६), भट्टमल्लट (७७)	वराहमिहिर (७८)
२७	देश		भवभूती (७९)	राजशेखर (८०)
२८	कुल		कालिदास (८१)	यशोवर्मदेव (८२)
२९	व्रत		क्षेमेन्द्र (८३)	दीपक (८४)
३०	तत्त्व		क्षेमेन्द्र (८५)	माघ (८६)
३१	सत्त्व		क्षेमेन्द्र (८७)	भट्टेन्दुराज (८८)
३२	अभिप्राय		दीपक (८९)	दीपक (९०)
३३	स्वभाव		क्षेमेन्द्र (९१)	क्षेमेन्द्र (९२)
३४	सारसंग्रह		क्षेमेन्द्र (९३)	परिव्राजक (९४)
३५	प्रतिभा		क्षेमेन्द्र (९५)	क्षेमेन्द्र (९६)
३६	अवस्था		क्षेमेन्द्र (९७)	राजशेखर (९८)
३७	विचार		क्षेमेन्द्र (९९)	क्षेमेन्द्र (१००)
३८	नाम		कालिदास (१०१), क्षेमेन्द्र (१०२)	कालिदास (१०३)
३९	आशीर्वचन		गंगक (१०४), क्षेमेन्द्र (१०५)	अमरक (१०६)

वरीलपैकी कारिका सहाच्या संदर्भात आलेले उदाहरण हे तात्त्विक विचाराच्या समर्थनार्थ आलेले आहे. ते वजा करता उरलेल्या १०५ उदाहरणांचा विचार करता असे लक्षात येते की, ह्यांपैकी ६० उदाहरणपद्ये औचित्य-परिपोषाची असून उरलेली ४५ औचित्यभंगाची आहेत. ह्या उदाहरणपद्यांचा भाषादृष्ट्या विचार केला तर असे लक्षात येते की, ह्यांपैकी ३ पद्ये प्राकृत भाषेतील असून त्यांपैकी १ औचित्यपोषाचे व २ औचित्य-भंगाची आहेत. उरलेली १०२ पद्ये संस्कृत भाषेतील आहेत. वाङ्मयप्रकारदृष्ट्या विचार करता असे जाणवते की, एकूण १४ श्लोक अभिनेयार्था(नाटका)तील असून बाकीचे ९१ श्लोक खंडकाव्य, महाकाव्ये, चरित्रपर काव्य, शृंगारिक काव्य ह्या काव्यप्रभेदांतील आहेत. नाटकातील उदाहरणपद्यांपैकी १२ पद्ये औचित्यपोषाची असून २ पद्ये औचित्यभंगाची आहेत. औचित्य-स्थानांच्या दृष्टीने पाहता असे दिसून येते की, करुण–रौद्र–बीभत्स–अद्भुत–रस, क्रियापद, कर्तृ–कर्म–करण–संप्रदान–

अपादान–अधिकरण–कारके, लिंग, वचन, विशेषण, उपसर्ग, निपात, देश, कुल, व्रत, तत्त्व, सत्त्व, अभिप्राय, स्वभाव, सारसंग्रह, प्रतिभा, अवस्था व विचार ह्या मर्मस्थानांच्या स्पष्टीकरणासाठी प्रत्येकी औचित्यपोषाचे एक व औचित्यभंगाचे एक अशी उदाहरणे दिलेली आहेत. पद, वाक्य, शृंगाररस, हास्यरस, वीररस, भयानकरस, शान्तरस, नाम व आशीर्वचन ह्या औचित्यस्थानांच्या विशदीकरणासाठी प्रत्येकी औचित्यपोषाची दोन व औचित्यभंगाचे एकेक अशी उदाहरणे दिलेली आहेत. प्रबन्धार्थौचित्याच्या चर्चेत पोषक तीन व मारक दोन अशी उदाहरणे आढळतात तर अलंकारौचित्यविचारात नेमकी ह्याच्या उलट स्थिती दिसून येते. गुणौचित्यपोषाची व हानीची प्रत्येकी दोनदोन उदाहरणे असून कालौचित्यपोषाची तीन व भंगाचे एक अशी उदाहरणे आढळतात. रससंकराच्या प्रत्येक उपभेदाचे एकेक उदाहरण आढळते. ग्रन्थस्थ १०५ पद्ये एकूण ३३ कवींच्या काव्यनाटकादींतून उद्धृत करण्यात आली असून त्यांचे कविनिहाय वर्गीकरण असे होईल—क्षेमेन्द्राची पोषक २९ व मारक ६ मिळून एकूण ३५, श्रीहर्षाची ५ (सर्व पोषक), राजशेखराची पोषक ३ व मारक ७ मिळून एकूण १०, कालिदासाची पोषक ५ व मारक ३ मिळून एकूण ८, भवभूतीची पोषक ३ व मारक १ मिळून एकूण ४, भट्टनारायणाची दोन (दोन्ही पोषक), प्रवरसेनाची २ (दोन्ही मारक), मालवरुद्राची दोन (एक पोषक व एक मारक), चंद्रकाची चार (एक पोषक व ३ मारक), परिमलाचीही तशीच चार, दीपकाची तीन (एक पोषक, दोन मारक), अमरक व भट्टेन्दुराज या उभयतांची दोन-दोन (दोन्ही मारक) अशी पद्ये आढळून येत असून उरलेल्या कवींची म्हणजे धर्मकीर्ती, कार्पटिक, श्यामल, मुक्तापीड, उत्पलराज, व्यास, गौडकुंभकार, भट्टप्रभाकर, मालवकुवलय, मातृगुप्त, भट्टलट्टन, कुमारदास, श्रीचक्र, भट्टभल्लट, वराहमिहिर, यशोवर्मदेव, माघ, परिव्राजक व गंगक या कवींची प्रत्येकी एकेक अशी उदाहरणपद्ये उद्धृत केलेली आढळून येतात. क्षेमेन्द्राने स्वतःच्या अकरा, श्रीहर्षाच्या एका, राजशेखराच्या तीन, कालिदासाच्या पाच, भवभूतीच्या एका व भट्टनारायणाच्या तसेच प्रवरसेनाच्या एकेका ग्रंथांतील पद्ये उद्धृत केली आहेत. एवंच, क्षेमेन्द्रदत्त उदाहरणपद्यांची विविधता व विपुलता लक्षणीय आहे यात शंकाच नाही. येथे कार्पटिक, दीपक, मुक्तापीड, चन्द्रक इत्यादी अप्रसिद्ध कवीही कालिदास, भवभूती, बाणभट्ट, भट्टनारायण, श्रीहर्ष, राजशेखर इत्यादी प्रथितयशांच्या मांडीला मांडी लावून बसलेले आढळून येतात. क्षेमेन्द्राने प्रथितयशांचा केवळ गौरव केलेला नाही किंवा केवळ औचित्यपोषाच्या निदर्शनासाठी त्यांची

पद्ये उद्धृत केलेली नाहीत. तसेच, चन्द्रक, भट्टलट्टन, दीपक इत्यादी अप्रसिद्ध वा अल्पप्रसिद्ध कवींचे केवळ दोष दाखवण्यासाठी त्यांची पद्ये उद्धृत केली आहेत असेही नाही. क्षेमेन्द्राला पंक्तिप्रपंच करणे आवडत नाही. त्यामुळे त्याने काव्यात औचित्य आढळताच अप्रसिद्धांचीही मुक्तपणे प्रशंसा केली आहे, तसेच औचित्यहानी प्रतीत होताच प्रख्यातकीर्ती कवींवर कोरडे ओढावयासही मागेपुढे पाहिलेले नाही. ह्याबाबतीत त्याने कालिदास, राजशेखर, भवभूती, बाणभट्ट ह्या लब्धप्रतिष्ठांचीही गय केलेली नाही, ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे. त्याने काही औचित्यस्थानांच्या चर्चेच्या प्रसंगी एकाच कवीची पोषक व मारक उदाहरणपद्ये उद्धृत करून एक प्रकारचा चमत्कारही साधला आहे, उदा० वाक्य, प्रबन्धार्थ, शृंगाररस, कर्मपद, लिंग, अभिप्राय, स्वभाव, प्रतिभा, विचार व नाम ह्या औचित्यस्थानांच्या चर्चेत क्षेमेन्द्राने अनुक्रमे राजशेखर, कालिदास, कालिदास, क्षेमेन्द्र, क्षेमेन्द्र, दीपक, क्षेमेन्द्र, क्षेमेन्द्र, क्षेमेन्द्र व कालिदास ह्या कवींची उभयकोटिक पद्ये उदाहृत केली आहेत. एवंच, क्षेमेन्द्राची औचित्यविचारचर्चा उदाहरणांनी संपन्न आहे व म्हणूनच डॉ० सूर्यकान्त ह्या संदर्भात 'Aucityavicārcarcā is a mine of quotations from his contemporaries as well as his predecessors'[1] असा जो अभिप्राय देतात तो पूर्णपणे पटतो.

(६) समीक्षाशैली—क्षेमेन्द्रदत्त उदाहरणांमुळे औचित्यविचारचर्चेतील काव्याची तात्त्विक चिकित्सा सुगम, सुबोध व रोचक झाली आहे, हे वर म्हटलेच आहे. परंतु ती चिकित्सा आकर्षक बनविण्यास क्षेमेन्द्राची समीक्षाशैली कारणीभूत झाली आहे. किंबहुना प्रस्तुत ग्रंथाचे सौंदर्य औचित्य ह्या टीकामूल्याच्या नावीन्यात जितके आहे तितकेच त्या मूल्याच्या मंडनात व उपपादनातही निहित आहे असे म्हणावेसे वाटते. आणि म्हणूनच ह्या विचारकणिकेचा एका स्वतंत्र सदरात परामर्श घेतला जात आहे.

प्रस्तुत प्रबंधाच्या सुरुवातीच्या कलमात म्हटल्याप्रमाणे संस्कृत साहित्यशास्त्राची परंपरा सुदीर्घ व समृद्ध आहे. ह्या शास्त्रावर ग्रंथोपग्रंथ लिहिणारे मिळून उणेपुरे ४५० ग्रंथकार होऊन गेले आणि त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांची संख्याही जवळजवळ तितकीच भरते. भरतोत्तर काळात ह्या शास्त्राच्या चर्चेला बहर आला व भामहोत्तर काळात तर ह्या शास्त्राची केवळ संख्यादृष्ट्याच वाढ झाली असे नाही तर ह्या शास्त्राचा गुणदृष्ट्या विकासही झाला. ह्याच शास्त्राच्या

1. Kṣemendra Studies, 1954, p. 2.

चर्चेच्या योगे जागतिक टीकावाङ्मयाला रससिद्धान्तासारखा अमोलिक विचार लाभला. संस्कृत भाषेत एकीकडे काव्य-नाटके लिहिली जात होती व दुसरीकडे त्यांच्या सौंदर्याची चिकित्सा करणारे हे साहित्यशास्त्र परिपुष्ट होत होते. या शास्त्रामुळे संस्कृत भाषेत काव्याच्या रसग्रहणाला आवश्यक ती परिभाषाही सिद्ध झाली होती. ह्या शास्त्राची सेवा करणारे मनीषी सूक्ष्म दृष्टीचे, चोखंदळ अभिरुचीचे व प्रगल्भ-प्रौढ विचारांचे होते. ह्यांचे विवेचन वाचणारे 'विचक्षण' जरी अल्पसंख्य असले तरीही काव्यांचा आस्वाद घेणाऱ्यांची व नाटकांच्या प्रयोगांनी परितुष्ट होणाऱ्यांची संख्या फार मोठी होती. संस्कृत काव्य-नाटकांचे तसेच भामहादींच्या साहित्यशास्त्रपर ग्रंथांचे प्राक्कालीन पाठशाळांमधून अध्ययन-अध्यापन वा पटन-पाठनही होत होते. असे असूनही काव्य-नाटकांची समीक्षा करणारे, सौंदर्यचिकित्सा करणारे, एखादे टीकामूल्य मनाशी निश्चित करून त्याच्या अनुरोधाने एखाद्या प्रसिद्ध महाकाव्याचे वा नाटकाचे सर्वांगीण समालोचन करणारे ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिले गेले नाहीत. हे असे का घडून आले त्याची कारणमीमांसा[१] करण्याचे हे स्थळ नव्हे. परंतु, 'शाकुन्तलम्-एक विवेचक रसास्वाद,' 'उत्तरराम-एक रसग्रहण,' 'रघुवंश-एक सौंदर्यसमीक्षा' अशासारखे ग्रंथ लिहिले गेले नाहीत हे सत्य आहे. आणि म्हणूनच क्षेमेन्द्रासारखा एखादा समीक्षक जेव्हा औचित्यासारखे एखादे मूल्य घेऊन पुढे सरसावतो व त्याच्या प्रकाशात अनेक ग्रंथकारांच्या काव्यनाटकातील श्लोकांची चर्चा करू लागतो तेव्हा त्याचे पृथगात्मत्व चटकन् नजरेत भरल्याशिवाय राहात नाही. क्षेमेन्द्राने एखादे समस्त काव्य वा नाटक घेऊन त्याची औचित्यदृष्ट्या चर्चा केली नाही हे खरे. त्याने केलेल्या चर्चेत अनेक उणीवा आहेत व कित्येक ठिकाणची त्याची चर्चा पुस्तकी थाटाची झाली आहे, हेही खरे. तथापि, हे सर्व जमेस धरूनही असेच म्हणावेसे वाटते की, औचित्यविचारचर्चेचे मोल क्षेमेन्द्राच्या समीक्षासरणीमुळे वाढले आहे. त्या समीक्षासरणीच्याच काही प्रमुख पैलूंचे आता दर्शन घ्यावयाचे आहे.

(अ) कलावंत साक्षात् जीवनरसाचे ग्रहण करतो, तर समीक्षक कलावंताने निर्मिलेल्या कलासुंदर कृतीचे रसग्रहण करीत असतो. अशाप्रकारे दोघांचे साहित्यधन जरी भिन्न असले तरी दोघांची कार्यपद्धती प्रायः सारखीच असते.

१. ह्या मुद्याची अल्पशी मीमांसा प्रस्तुत लेखकाने 'संस्कृत साहित्यशास्त्रविषयक एक समस्या' ह्या लेखात करण्याचा प्रयत्न केला आहे. लेखप्रकाशन–नवभारत मासिक, सप्टेम्बर १९६६.

निवड करणे, विश्लेषण करणे, अनुभवणे, चिंतन करणे, मूल्यमापन करणे, वर्गीकरण करणे, रचना करणे व निर्मिती करणे हीच दोघांची पद्धती असते. त्यामुळे ग्रंथकार व समीक्षक (म्हणजेच उत्पादक व भावक) यांमध्ये वैर असण्याचे कारण नसते. उलट समीक्षक हा कवीचा वा नाटककाराचा सुहृद[1] असतो. क्षेमेन्द्राला स्वतःला विपुल काव्यलेखनाचा अनुभव होता. वर एके ठिकाणी दर्शविल्याप्रमाणे त्याने सारांश-काव्यांपासून तो स्वतंत्र काव्यांपर्यंत सर्व प्रकारची काव्ये स्वतः रचिली होती. पुन्हा, त्याची रचना सर्वरसात्मक, भिन्न-वृत्तात्मक व विविधविषयपर होती. त्याने कवित्वशक्ती परिश्रमपूर्वक संपादिलेली होती. त्याला व्यासकालिदासादी इतर कवींबद्दल आदर वाटत असे. त्यामुळेच तो इतर कवींची काव्ये औचित्याच्या निकषावर घासून पाहताना कसायाचा अवतार आणीत नाही! त्याचे परकाव्यरसग्रहण सहानुभूतीने ओथंबलेले व सौंदर्यदृष्टीने विनटलेले असते. त्याने परिमलाच्या (उदाहरणश्लोकांक २) पद्याचे रसग्रहण करताना 'सकलकविकुलललामभूतां विच्छित्तिं आतनोति ।' असे प्रशंसोद्गार मुक्तपणे काढले आहेत. श्री हर्षाच्या श्लोकाची (उदाहरणपद्य ४) त्याने 'परमौचित्यं पुष्णाति' या शब्दात वाखाणणी केली आहे. कालिदासाची 'जातं वंशे' इत्यादी श्लोकाबद्दल स्तुती करताना क्षेमेन्द्रवाणीला 'निरतिशयमौचित्यमुद्योतितम्' असा बहर आला आहे. क्षेमेन्द्र श्रीहर्षाच्या 'उद्दामोत्कलिकां' ह्या श्लोकातील (उदाहरणपद्य २२) शृंगारौचित्याबद्दल कवीचा 'नितरां औचित्यरुचिरचमत्कार-कारिणी दीप्तिरुपपादिता' अशा शब्दांनी गौरव करतो. इतकेच नव्हे तर तो गौडकुंभकारासारख्या एका अप्रथितकीर्ती कवीच्या पद्यातील (उदाहरणश्लोक-५७) करणौचित्याचेहि स्तवन तितक्याच मोकळ्या अंतःकरणाने व तरतमात्मक शब्दांनी ('औचित्यातिशयः प्रकाशितः ।') करून आपली दिलदार वृत्ती, सरळ, सौंदर्यैकलोलुप अभिरुची व सत्त्वशीलता यांचेच प्रकटीकरण करतो. येथे दिलेली उदाहरणे केवळ उपलक्षणात्मक होत. अशा उदाहरणांवरून क्षेमेन्द्राच्या सहृदयतेचा वाचकांना चांगलाच बोध होतो.

(आ) क्षेमेन्द्राच्या ठायी सहृदयतेबरोबरच सूक्ष्म व अन्तर्भेदी दृष्टीही आहे. कोणत्याही श्रेष्ठ समीक्षकाचे अंगी सौंदर्यदृष्टीबरोबरच चिकित्सक बुद्धी असणे अत्यंत आवश्यक असते. कवी चिकित्सक बुद्धीने जीवनातील सौंदर्या-सौंदर्यातील तारतम्य जाणून घेतो, तर समीक्षक कविनिर्मित सुंदरासुंदरात विवेक

1. Prof. V. N. Bhushan—'The Light from Heaven' (The Moving Finger) First impression 1945, P. XV.

करीत असतो. दोघांचीही कार्ये परस्परपूरक असतात, इतकेच नव्हे आवश्यकही असतात क्षेमेन्द्राने प्रस्तुत ग्रंथात एकूण १०५ उदाहरणपद्ये उतरून घेतली असल्याचे वर म्हटलेच आहे. पण त्याने ही उदाहरणपद्ये उद्धृत करताना व त्यांचे मर्मोद्घाटन करताना आपली पराकाष्ठेची विश्लेषकशक्ती प्रदर्शित केली आहे. त्याने परकवींचे अनेक ग्रंथ नुसतेच वाचून काढले आहेत असे नव्हे तर त्याने ते वाचन अत्यंत काळजीपूर्वक, साक्षेपाने व ससंदर्भ केले आहे ह्याच्या खाणाखुणा औचित्यविचारचर्चेत उद्धृत केल्या गेलेल्या उदाहरणपद्यांवरील, अनेक ठिकाणच्या गद्यवृत्तीत आढळून येतात. कालिदासाच्या 'क्रोधं प्रभो...' इत्यादी (उदाहरणपद्यांक १०३) श्लोकातील 'भव' शब्दावरील त्याची टीका त्याच्या सूक्ष्म दृष्टीचा उत्कृष्ट पुरावा होय. त्याने राजशेखराच्या 'ज्यायान्धवी...' इत्यादी श्लोकाचे (उदाहरण पद्यांक ९८) समालोचन करताना 'राम परशुरामाहून लहान व अननुभवी आहे असे वर्णावयाचे असताना कवीने रामकृत ताडकावधाचे वर्णन करण्यात चूक केली आहे' असे जे उद्गार काढले आहेत ते त्याच्या अंतर्भेदी दृष्टीचेच द्योतक आहेत. राजशेखराने 'कर्णाटी...' इत्यादी श्लोकात (पद्यांक ८०) स्वीकृतक्रमाचा भंग केल्याचे जे क्षेमेन्द्राने दाखवले आहे, त्यात त्याचे बुद्धिचापल्यच दिसून येते. स्वतःच्याच 'वरुणरणसमर्था...' इत्यादी श्लोकातील (पद्यांक ६५) भुजमंडली ह्या स्त्रीलिंगी शब्दाने प्रतापाची कठोरताच नाश पावली आहे असे म्हणून क्षेमेन्द्राने कविकृत प्रमादावर अचूकपणे बोट ठेवले आहे. 'यः प्रख्यातजवः...' इत्यादी स्वरचित पद्यातील (श्लोकांक ५१) 'स्मर्यते' पदावरील त्याच्या टिप्पणीत त्याच्या तरल दृष्टीचेच उत्कृष्ट दर्शन घडते. धर्मकीर्तीने 'लावण्यद्रविण......' इत्यादी श्लोकात (पद्यांक ३) 'तव्याः' हे पद केवळ शब्दानुप्रासाच्या हव्यासाखातर वापरल्याचे प्रतिपादून क्षेमेन्द्र आपल्या सूक्ष्मदर्शी विद्वत्तेची चांगलीच चुणूक दाखवून देतो. राजशेखराच्या 'नाले' इत्यादी श्लोकातील (पद्यांक ७) असमुचित तुलनेकडे अंगुलिनिर्देश करून क्षेमेन्द्राने जणू राजशेखराच्या अंतरंगातच प्रवेश केला आहे. काव्यनाटकातील पात्रांच्या स्वभावच्छटांशीही त्याचा कसा उत्तम परिचय होता त्याचे गमक १६व्या उदाहरणश्लोकावरील वृत्तीत मिळते. मात्र काही ठिकाणी ह्या सूक्ष्म दृष्टीचा इतका अतिरेक होतो की, वाचकाचा विरस झाल्याविना राहत नाही. अशा ठिकाणी क्षेमेन्द्राची चिकित्सक बुद्धी रसिकता व सौंदर्यदृष्टी यांचा परित्याग करून 'पुस्तकी' वळणाने वाटचाल करू लागते. या प्रकाराचे एक नमुनेदार उदाहरण म्हणून जिज्ञासूंनी श्लोकांक ६८ वरील क्षेमेन्द्राची वृत्ती पाहावी.

(इ) क्षेमेन्द्राच्या समीक्षणशैलीचा तिसरा स्पृहणीय विशेष म्हणजे त्याची स्वतःच्या विचारसरणीवरील अव्यभिचारी निष्ठा. कोणत्याही श्रेष्ठ समीक्षकाला खास स्वतःचा असा टीका-दृष्टिकोण असणे आवश्यक असते. प्रत्येक आदर्श, सुसंस्कृत व निःपक्षपाती टीकाकाराचे स्वतःचे टीका-तत्त्वज्ञान (critical credo) असते. अनेक कलाकृतींच्या वाचनाने, चिंतनाने, मननाने ते स्थिरावलेले असते, निश्चित झालेले असते. टीकाकाराला कलावंत व रसिक ह्यांमधील केवळ दलालाची भूमिका वठवावयाची नसते (ते काम करावयास प्रकाशक समर्थ असतात !). समीक्षकाला काव्य-नाटकांचा अन्वयार्थ लावावयाचा असतो, त्यांतील सौंदर्य हुडकून काढावयाचे असते, दोष टिपावयाचे असतात, काव्यनाटकांतील प्रच्छन्न सौंदर्यस्थळांचे मार्मिकपणे विश्लेषण व रसग्रहण करावयाचे असते. एकीकडे कवि-नाटककारांना विश्वासात घेऊन त्यांच्या चुका, वेळप्रसंगी कडक शब्दप्रयोग करूनही, त्याना दाखवून द्यावयाच्या असतात व दुसरीकडे वाचकांच्या अभिरुचीला इष्ट वळण लावावयाचे असते. कारण साहित्याचा सतत विकास होत असतो, त्याचा प्रवाह अविच्छिन्नपणे वाहात असतो, त्यात काही नवीन मूल्ये येऊन समाविष्ट होत असतात. कलावंत त्यांचा स्वीकार करून त्यांस अनुसरून काही साहित्यिक प्रयोग[1] करून पाहात असतात. समीक्षकाला साहित्याचे प्रतिकविस्थित स्वरूप समजून घ्यावे लागते, प्रत्येक साहित्यकृतीच्या मागील प्रयोजन, प्रेरणा व तिची पद्धत यांचे आकलन करावे लागते. जो समीक्षक साहित्याच्या ह्या परिवर्तनशील व सौंदर्यगर्भ स्वरूपाशी समरस होऊनही आपला पृथगात्म दृष्टिकोण कायम ठेवून पुढ्यातील काव्यकृतीचे रसग्रहण करू शकतो, तोच वाचकांवर आपला ठसा उमटवू शकतो. ह्या दृष्टीने क्षेमेन्द्राच्या कामगिरीकडे अमळ बारकाईने पाहावयास हवे. क्षेमेन्द्राचे साहित्यशास्त्र ह्या स्वतंत्र कलमात क्षेमेन्द्राच्या साहित्यविषयक तत्त्वज्ञानाचा परिचय वर करून दिलाच आहे. क्षेमेन्द्राची अशी काही वैशिष्ट्यपूर्ण विचारसरणी नसती तर त्याला चमत्काराचा अभिनव विचारही मांडता आला नसता किंवा औचित्याचा पृथक् सिद्धान्तही प्रतिपादिता आला नसता. काव्याकडे पाहण्याची एक निश्चित दृष्टी क्षेमेन्द्राचे ठायी अध्ययन, अध्यापन, चिंतन, मनन, प्रेक्षण, श्रवण इत्यादींच्या द्वारे उत्पन्न झाली होती ह्यात शंकाच नाही. एरव्ही त्याने औचित्यविचारचर्चेत औचित्य हे काव्याचे जीवित होय हे व असे शब्दप्रयोग वारंवार कशाला

१. ध्वन्यालोकात पृ. २८२ वर उल्लेखिलेले मुक्तक, सन्दानितक, विशेषक, कालापक, पर्यायबन्ध, परिकथा, सकलकथा, खंडकथा, सर्गबंध, अभिनेयार्थ, आख्यायिका व कथा इत्यादी काव्यप्रभेद म्हणजे संस्कृत साहित्यिकांनी करून पाहिलेले विविध प्रयोगच होत.

केले असते ! परंतु, औचित्यविषयक ही दृष्टी जितकी विकास पावावयास हवी होती, जितकी प्रौढ-प्रगल्भ व्हावयास हवी होती, तितकी ती झालेली नव्हती असेच ग्रंथ-वाचनान्ती जाणवते. प्रथमतः क्षेमेन्द्राने स्वमान्य सिद्धान्तानुसार इतर कवींचा तसेच स्वतःचाही कसा सडेतोडपणे परामर्श घेतला आहे ते पाहू व मग क्षेमेन्द्राच्या सामर्थ्याच्या उणिवा समजून घेऊ.

धर्मकीर्तीच्या 'लावण्य......' इत्यादी श्लोकावरील क्षेमेन्द्राची टीका जितकी स्पष्ट तितकीच समतोल आहे. त्या टीकेत क्षेमेन्द्राच्या अनाग्रही बुद्धीचेही उत्तम दर्शन घडते. ती समग्र टीका वाचून 'Criticism is judgement, ideally as well as etymologically' हे जॉन ड्यूईचे[१] उद्‌गार आठवतात. कवीची केवळ स्तुती करणे हें समीक्षकाचे कार्य नव्हे, किंवा कवीची लांडगेतोड करणे हेही त्याचे कार्य नव्हे, तर स्वीकृत दृष्टिकोणामधून कविकृतीचे मूल्यमापन करणे हे त्याचे खरे कार्य होय, हा विचार मनात वागवून क्षेमेन्द्राने ती टीका केल्यासारखे वाटते. कालिदासाने (उदाहरणपद्यांक १२ मध्ये) सामान्य स्त्रियोचित असे पार्वतीच्या संभोगाचे वर्णन केल्याचे आढळताच दक्ष असलेल्या क्षेमेन्द्राने कालिदासावर 'खरप्रखर' टीका केली आहे. चन्द्रकाने (उदाहरणपद्यांक १८) कोल्हीची सुरतकेलितृप्त स्त्रीशी तुलना केल्याचे आढळताच क्षेमेन्द्र येथे 'मोठे वैपरीत्य प्रकट झाले' असे निर्भीडपणे सांगावयास डरत नाही. क्षेमेन्द्र श्यामलाला (उदाहरणश्लोक २७), तत्कृत वृद्धेच्या चुंबनाच्या वर्णनात बीभत्साचेच प्राधान्य झाले आहे, असे ठणकावून बजावयास कमी करीत नाही. प्रवरसेनाच्या 'दणुइन्द...' इत्यादी प्राकृत श्लोकात (३१) रौद्ररसप्रतीती तर राहोच पण रौद्ररसाचे क्वचित् मुखमुद्धा दिसत नाही असे सडेतोडपणे सांगून मोकळा होतो. क्षेमेन्द्र कधीकधी किती फटकळ बनतो ते पाहावयाचे असेल तर त्याची भवभूतीच्या 'वृद्धास्ते...' इत्यादी प्रसिद्ध श्लोकावरील (उदाहरणपद्यांक ३४) टीका अवलोकावी. त्या श्लोकातील अनौचित्य प्रदर्शित करताना क्षेमेन्द्र 'स्ववचसा कविना विनाशः कृतः' इतके परखड उद्‌गार काढावयास मागेपुढे पाहात नाही. ह्याबाबतीत तो स्वतःचाही मुलाहिजा ठेवीत नाही. जितक्या स्पष्टपणे, निःसंदिग्धपणे व सडेतोडपणे क्षेमेन्द्र इतरांवर टीका करतो तितक्याच स्पष्टपणे व सडेतोडपणे तो स्वतःवरही टीका करतो. ह्या दृष्टीने त्याने उदाहरणश्लोकांक ४१,५६,६६,९२,९६,१०० ह्या स्वरचित पद्यांचा घेतलेला समाचार अवलोकनीय आहे. क्षेमेन्द्र हे साधू शकतो त्याचे कारण तो

१. 'Art as Experience' p. 298.

प्रत्येक श्लोकाकडे एखाद्या निर्विकार व स्वपरनिरपेक्ष अशा शास्त्रज्ञाच्या भूमिकेतून पाहू शकतो. हे सर्व कितीही श्लाघनीय असले तरी काही ठिकाणी क्षेमेन्द्राच्या बुद्धीच्या मर्यादा स्पष्टपणे जाणवतात. उदा० क्षेमेन्द्रकृत समस्त प्रतिभौचित्य-विचार पूर्णपणे फसलेला आहे. कविप्रतिभेचे सामर्थ्य व सौंदर्य त्याला कारिकेत स्पष्ट करून सांगता आलेले नाही. तसेच त्याने दिलेल्या उदाहरणांनी तर सहृदयाला धक्काच बसतो, इतकी ती वैरस्यकारक आहेत. सारसंग्रहौचित्याचा विचार करणेदेखील कितीसे उचित व आवश्यक होते अशीही शंका मनात उपजतेच. क्षेमेन्द्राने दिलेली स्वभावौचित्याची उदाहरणेही प्रत्ययकारी वाटत नाहीत. क्षेमेन्द्रकृत अभिप्रायौचित्यविचार वाचून तर रसिक हतबुद्धच होतो. परंतु हा सर्व विचार औचित्यविचारचर्चेच्या अंतरंग-परीक्षणाच्या कक्षेत पडत असल्यामुळे व ते परीक्षण पुढे करावयाचेच असल्यामुळे एतद्विषयक विस्तार येथे नको. येथे इतकेच म्हणणे पुरेसे आहे की, क्षेमेन्द्राने काव्याचा अनेक अंगांनी विचार केला होता हे खरे, त्याची बुद्धि व्यापक होती हेही खरे, त्याने एक स्वतंत्र समीक्षामूल्य डोळ्यांसमोर ठेवून अनेक कवींच्या पद्यांचे मूल्यमापन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे ह्यातही शंका नाही, तथापी त्याने स्वमान्य सिद्धान्ताचा जितक्या गंभीरपणे विचार करणे आवश्यक होते तितक्या गंभीरपणे केला नव्हता, यात शंका नाही. क्षेमेन्द्र पूर्वसूरींच्या खांद्यावर उभा होता त्यामुळे तो त्यांहून अधिक दूरवरचे पाहू शकला असता. परंतु, त्याची दृष्टीच पुरेशी पल्लेदार नसल्यामुळे (क्षेमेन्द्र 'short-sighted' तर नव्हता ना !!) त्याची समीक्षा अंशतः सफल व अंशतः विफल झाली आहे ! असो, अधिक विचार पुढे यथास्थल करूच.

(ई) **प्रसन्न वृत्ती**— क्षेमेन्द्राच्या सडेतोड, निर्भीड व स्पष्टवक्त्या समीक्षाशैलीचा उल्लेख वर केलाच आहे. क्षेमेन्द्र सडेतोड असला तरी रासवट नाही. त्याची वृत्ती क्रूर नाही. काव्यसमीक्षा करणे म्हणजे काव्याचे लचके तोडणे नव्हे, ह्याची जाणीव क्षेमेन्द्राला अवश्य आहे. त्यामुळेच तो आपले मनोगत स्पष्टपणे व्यक्त करूनही ते कवीला बोचू-टोचू नये अशीच भाषा वापरतो. राजशेखराच्या 'यत्पार्वती···'इत्यादि श्लोकात (उदाहरणपद्यांक ११) 'आविरस्तु समं सीतया' हे अनुचितार्थक शब्द आलेले पाहून क्षेमेन्द्र 'न चैतद्विद्मः कथं भक्ष्यभूता कुसुमकोमलांगी पुरुषादाय प्रतिपाद्यते ।' असे प्रथम स्पष्टपणे म्हणतो व मग लगेच 'इत्यनौचित्येन प्रसिद्धेन वृत्तवैपरीत्यं परं हृदयविसंवादमादधाति' । अशा शब्दांनी कवीची समजूत घालतो. कधीकधी एखाद्या कवीने केलेली एखादी

ढोबळ चूक आढळात येताच ती एखाद्या रमणीय उपमेच्या साह्याने दाखवून देतो. उदा० चन्द्रकाची 'युद्धेषु···' इत्यादी उक्ती (उदाहरणपद्यांक १५) ओजोगुणशून्य असल्याचे दिसून येताच क्षेमेन्द्र तिच्यावर पुढीलप्रमाणे मत देतो— "सुभटोक्तिरुचितार्थापि तेजोजीवितरहिता दुर्गतगृहदीपशिखेव मन्दायमाना न विद्योतते।" काव्यगत मुख्य रसाचा विघात होईल अशा रीतीने गौण रसाचे वर्णन केल्यास रसिकाचा कसा विरस होतो ते स्पष्ट करताना क्षेमेन्द्र एक हृद्य व चित्रमय उपमा देतो—'विरुद्धवर्णनोदितेन ह्यनौचित्येन स्थायी कुञ्जर इव श्वभ्रपातितः पुनरुत्थातुं नोत्सहते······' (उदाहरणश्लोक ५० वरील वृत्ती). काही श्लोक मोठे अडचणीत टाकणारे असतात. त्यांच्या रचनेत कवीने केलेल्या प्रमादाची कठोर समीक्षा करणेच इष्ट व आवश्यक असते. परंतु, अशी टीका केल्यास ती कवीला झोंबल्याशिवाय राहत नाही. तेव्हा ती टाळणेही अगत्याचे असते. अशा अडचणीच्या स्थळी क्षेमेन्द्राची प्रसन्नमधुर विनोदी वृत्ती त्याच्या मदतीला धावून येते. उदा० श्रीचक्राच्या 'देवो जानाति······' इत्यादी पद्यातील (श्लोकांक ७४) 'च' हा निपात अगदीच निरर्थक आहे. परंतु तसे स्पष्टपणे म्हटल्यास श्रीचक्रास राग येईल म्हणून क्षेमेन्द्र म्हणतो, "निरर्थक एव निरुपयोगश्चकारः प्रततोत्सवबहुजनभोजनपंक्तौ अपरिज्ञातः स्वयमेव मध्ये समुपविष्टः पश्चादभिव्यक्तः परं लज्जादुर्मना इवानौचित्यं प्रतनोति।". ही टीका जितकी मार्मिक तितकीच आल्हादकारक नाही असे कोण म्हणेल? एवंच, क्षेमेन्द्राच्या विनोदबुद्धीमुळे त्याच्या स्पष्ट व निर्भीड समीक्षेचे सौंदर्य निश्चितपणे वाढले आहे.

(उ) **सिद्ध परिभाषेचा प्रयोग**—येथे एक प्रश्न उपस्थित होतो. त्याचे स्वरूप असे. क्षेमेन्द्राच्या पूर्वीही अनेक साहित्यशास्त्रज्ञ होऊन गेले. ते सर्वच उत्तम विचारवंत होते. त्यांनीही काव्याच्या अंगोपांगांचा बारकाईने विचार करून काही सिद्धान्त मांडले होते. कोणी काव्यात अलंकारांना महत्त्व असते असे म्हटले (उदा० भामह, काव्यालंकार १।१३), कोणी रीती हा काव्याचा आत्मा होय असे पुकारले (उदा० वामन-काव्यालंकारसूत्र १.२.६), कोणी ध्वनीची काव्यात्मपदी प्रतिष्ठापना केली (ध्वन्यालोक १.१), कोणी तो मान रसाला दिला (राजशेखर, काव्यमीमांसा, तृतीयोऽध्याय). पुन्हा, ह्या सर्वच शास्त्रकारांनी आपापली मते उचित उदाहरणे देऊन मंडित केली. असे असताना क्षेमेन्द्राने वेगळे ते काय साधले असा प्रश्न साहजिकपणेच उत्पन्न होतो. जर क्षेमेन्द्राची पद्धती व त्याचे विवेचन ही पूर्वीलांच्या

पद्धती-विवेचनांसारखीच असतील तर मग क्षेमेन्द्राचे वैशिष्ट्य काय राहिले ? बरे, क्षेमेन्द्राचे काही वैशिष्ट्य असलेच तर त्याचे स्वरूप नेमके स्पष्ट झाल्याशिवाय त्याचा स्वीकार-अस्वीकार कसा करावयाचा ? ह्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी पूर्वीच्या ग्रंथकारांनी कोणत्या पद्धतीने स्वविषय-प्रतिपादन केले ते पाहणे आवश्यक आहे. ह्या दृष्टीने भामह, दण्डी, वामन, रुद्रट व ध्वन्यालोककार ह्या पाच ग्रंथकारांच्या पद्धतीचा संक्षेपाने मागोवा घेऊ. भामहाने आपल्या काव्यालंकारात दोष, गुण, अलंकार इत्यादी काव्यघटकांचा विचार केला आहे, हे प्रसिद्धच आहे. प्रथमतः तत्त्व प्रतिपादावयाचे व लगेच त्याला साजेसे उदाहरण द्यावयाचे अशी भामहाची सर्वसाधारण रीत आहे. उदा० तो गूढशब्दाभिधान दोषासंबंधी असे म्हणतो—'गूढशब्दाभिधानं च न प्रयोज्यं कथञ्चन। सुधियामपि नैवेदमुपकाराय कल्पते ॥ असितर्तितुगद्रिच्छित्स्वःक्षितां पतिरद्विदक्। आमिद्भिः शुभ्रदृग्दष्टैर्द्विषो जेघ्नीयिषीष्ट वः ॥' काव्यालंकार १।४५-४६. येथे कोणतीही टीकाटिप्पणी आढळत नाही. भामह ओजोगुणासंबंधी म्हणतो—'केचिदोजोऽभिधित्सन्तः समस्यन्ति बहून्यपि । यथा मन्दारकुसुमरेणुपिंजरितालका ॥' काव्यालंकार २।२. आता त्याचे अतिशयोक्ती-अलंकाराचे विवरण पाहा—'निमित्ततो वचो यत्तु लोकातिक्रान्तगोचरम्। मन्यन्तेऽतिशयोक्तिं तामलंकारतया यथा ॥ स्वपुष्पच्छविहारिण्या चंद्रभासा तिरोहिताः। अन्वमीयन्त भृंगालिवाचा सप्तच्छदद्रुमाः ॥' काव्यालंकार २-८१-८२. दण्डीनेही स्वरचित काव्यादर्शात हीच पद्धत अंगीकारिली आहे. उदा० तो 'प्रसादवत् प्रसिद्धार्थमिन्दोरिन्दीवरद्युति। लक्ष्म लक्ष्मीं तनोतीति प्रतीतिसुभगं वचः ॥' (१।४५) असे प्रसाद गुणाचे लक्षण व उदाहरण देतो पण त्याचे स्पष्टीकरण करीत नाही. मात्र तो 'प्रसादविपरीत' गुणाने युक्त श्लोक तेथल्या तेथे रचून देऊन गौडीयांना कशा प्रकारची रचना आवडते ते दर्शवून देतो, इतकेच. दण्डीने अलंकारनिरूपण कसे केले आहे ते पाहा—'ज्ञेयः सोऽर्थान्तरन्यासो वस्तु प्रस्तुत्य किंचन। तत्साधनसमर्थस्य न्यासो योऽन्यस्य वस्तुनः ॥' (२-१६९) असे अर्थान्तरन्यासाचे लक्षण करून व पुढच्याच श्लोकात त्याचे प्रकारभेद सांगून मग एकेका प्रकाराचे उदाहरणमात्र दिले आहे (उदा० 'भगवन्तौ जगन्नेत्रे सूर्याचन्द्रमसावपि। पश्य गच्छत एवास्तं नियतिः केन लंघ्यते ॥' २-१७२). दण्डीकृत दोषनिरूपणही ह्याच स्वरूपाचे आहे. उदाहरणार्थ तो 'एकवाक्ये प्रबन्धे वा पूर्वापरपराहतम्। विरुद्धार्थतया व्यर्थमिति दोषेषु पठ्यते ।' (३-१३१) असे 'व्यर्थ' नामक दोषाचे लक्षण करून पुढच्याच श्लोकात त्याचे 'जहि शत्रुबलं कृत्स्नं जय विश्वंभरामिमाम्। न च ते कोऽपि विद्वेष्टा सर्वभूतानुकंपिनः ।' (३-१३२)

असे उदाहरण देतो. मात्र स्पष्टीकरण मुळीसुद्धा करीत नाही. वामनाने स्वरचित काव्यालंकारसूत्रांवर स्वतःच वृत्ती लिहिली आहे, त्यामुळे वामन भामह-दण्डींहून ह्याबाबतीत वेगळा ठरतो. परंतु, त्याच्या ग्रंथाची पद्धत काव्यालंकार-काव्यादर्शी-सारखीच आहे. उदा० 'कष्ट' ह्या पददोषाचे लक्षण त्याने 'श्रुतिविरसं कष्टम् ।' २. १. ६ असे करून त्यावर 'श्रुतिविरसं श्रोत्रकटुपदं कष्टम् । तद्धि रचनागुंफित-मप्युद्वेजयति ।' अशी वृत्ती लिहून पुढील उदाहरण दिले आहे—'अचूचुरच्चण्डि-कपोलयोस्ते कान्तिद्रवं द्राग्विशदः शशाङ्कः ।'. आता वामनकृत ओजोगुण-विवरण अवलोका—"गाढबन्धत्वमोजः ॥ ३. १. ५—बन्धस्य गाढत्वं यत्तदोजः । यथा—विलुलितमकरन्दा मञ्जरीर्नर्तयान्ति । न पुनः, विलुलितमधुधारा मञ्जरी-र्लोलयन्ति ।". वामनाची अलंकारनिरूपणाचीही धाटणी अशीच आहे. त्याने प्रतिवस्तूपमेचे निरूपण असे केले आहे—"उपमेयस्योक्तौ समानवस्तुन्यासः प्रतिवस्तु ॥ ४. ३. २. समानं वस्तु वाक्यार्थः । तस्य न्यासः समानवस्तुन्यासः । उपमेयस्य अर्थाद् वाक्यार्थस्य उक्तौ सत्यामिति । अत्र द्वौ वाक्यार्थौ । एको वाक्यार्थः प्रतिवस्तूपमाया इति भेदः । तद्यथा—देवीभावं गमिता परिवारपदं कथं भजत्येषा । न खलु परिभोगयोग्यं दैवतरूपांकितं रत्नम् ॥". आता रुद्रटाच्या विवेचनशैलीचा परिचय करून घेऊ.-रुद्रटाने काव्यालंकार नामक ग्रंथ लिहिला आहे, परंतु त्यावर स्वतः वृत्ती लिहिलेली नाही. त्यामुळे तो भामह-दण्डींच्या वर्गात मोडतो. त्याची शैलीही भामह-दण्डींसारखीच विवरणरहित आहे. उदा० त्याने दीपक अलंकाराचे 'यत्रैकमनेकेषां वाक्यार्थानां क्रियापदं भवति । तद्वत्कारकपदमपि तदेतदिति दीपकं द्वेधा ॥' (८—६४) ह्या शब्दांनी लक्षण सांगून पुढील श्लोकात दीपकाचे आदि-मध्य-अन्त असे भेद सांगितले आहेत व त्यानंतर त्यांची क्रमशः उदाहरणे दिली आहेत. पैकी मध्यदीपकाचे उदाहरण येथे उतरून घेऊ—'तारुण्यमाशु मदनं मदनः कुरुते विलासविस्तारम् । स च रमणीषु प्रभवञ्जनहृदयावर्जनं बलवत् ॥ (८—६७). रुद्रटाने, उदाहरणार्थ, अप्रतीत दोषाचे एकाच श्लोकात लक्षण व उदाहरण दिले आहे—'अर्थोऽयम-प्रतीतो यः सन्नपि, न प्रयुज्यते वृद्धैः । शरदिव विभाति तन्वी विकसत्पुलकोत्करेय-मिति ॥' (११.५). रुद्रटाला गुणचर्चेत स्वारस्य नाही, त्याने गुणांची लक्षणेही दिलेली नाहीत. मग उदाहरणे देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. ह्यानंतर ध्वन्यालोकाकडे वळावयाचे—ध्वन्यालोक हा आद्योपान्त चर्चाप्रचुर ग्रंथ आहे. पुन्हा ती चर्चा राजशेखराच्या काव्यमीमांसेतल्या चर्चेप्रमाणे विस्खळित नाही, ती सुसूत्र, सोपप-त्तिक, प्रौढ व भारदस्त आहे. त्यामुळे ध्वन्यालोककार चिंतनीय विचार मांडला की

त्यावर उदाहरण देऊन त्याचे स्पष्टीकरणही करतात असे सामान्यपणे म्हणता येते. उदा० वाच्य व व्यंग्य ह्यांपैकी प्राधान्य कशाचे असते हा मुद्दा उपस्थित झाला असता ध्वन्यालोककार* म्हणतात—"चारुत्वोत्कर्षनिबन्धना हि वाच्यव्यंग्ययोः प्राधान्यविवक्षा। यथा—अनुरागवती संध्या दिवसस्तत्पुरःसरः। अहो दैवगतिः कीदृक्तथापि न समागमः॥ अत्र सत्यामपि व्यंग्यप्रतीतौ वाच्यस्यैव चारुत्वमुत्कर्षवदिति तस्यैव प्राधान्यविवक्षा।"—(ध्वन्यालोक पृ० ५०–५१) ध्वन्यालोककारांनी द्वितीयोद्योतात अविवक्षितवाच्य ध्वनीचे अर्थान्तरसंक्रमितवाच्य व अत्यन्ततिरस्कृतवाच्य असे दोन भेद केले आहेत. पैकी पहिल्या भेदाचे उपपादन त्यांनी असे केलेले आढळते—'तत्रार्थान्तरसंक्रमितवाच्यो यथा—स्निग्धश्यामलकान्तिलिप्तवियतो वेल्लद्बलाका घना। वाताः शीकरिणः पयोदसुहृदामानन्दकेकाः कलाः। कामं सन्तु दृढं कठोरहृदयो रामोऽस्मि सर्वं सहे। वैदेही तु कथं भविष्यति हहा हा देवि! धीरा भव॥' इत्यत्र रामशब्दः। अनेन हि व्यंग्यधर्मान्तररूपपरिणतः संज्ञी प्रत्याय्यते, न तु संज्ञिमात्रम्।' (ध्वन्यालोक पृ० ८७–८९). ओजोगुणासंबंधाने ध्वन्यालोककार काय म्हणतात ते श्रवणीय आहे—काव्यातील रौद्रादी रस दीप्तीमुळे लक्षित होतात. त्या रौद्रादींच्या अभिव्यक्तीस कारणीभूत होणाऱ्या शब्दार्थांच्या आश्रयाने काव्यात ओजोगुण अवस्थित असतो, असे २।१२ ह्या कारिकेमध्ये प्रतिपादून दीर्घसमासात्मक संघटनेने (रचनेने) युक्त वाक्य ओजोगुण व्यक्त करते असा खुलासा करतात. त्याच्या समर्थनासाठी 'चञ्चद्भुज…' इत्यादी श्लोक देतात. पुढे 'तत्प्रकाशनपरश्चार्थोऽनपेक्षितदीर्घसमासरचनःप्रसन्नवाचकाभिधेयः।' असे तत्त्व प्रतिपादून त्याच्या स्पष्टीकरणासाठी 'यो यः शस्त्रं बिभर्ति—' हा भट्टनारायणाचा सुप्रसिद्ध श्लोक (औचित्यविचारचर्चा, उदाहरणपद्यांक ३०) उद्धृत करून त्यावर 'इत्यादौ द्वयोरोजस्त्वम्।' (शब्दाची व अर्थाची ओजस्विता) अशी वृत्ती देतात. एवंच, ध्वन्यालोककारांनी रुद्रटादींहून पुढचा पल्ला गाठला आहे यात शंका नाही. ह्या समस्त पार्श्वभूमीवर आता क्षेमेन्द्राची समीक्षा उभी केली की, तिची विशेषता चटकन् नजरेत भरते. क्षेमेन्द्र प्रत्येक कारिकेवर गद्यवृत्ती देतो, मग कारिका कितीही कठीण वा सोपी असो. तसेच तो प्रत्येक श्लोकावर स्पष्ट वृत्ती लिहून औचित्य-

*येथे कारिकाकार व वृत्तिकार एकच की भिन्न ह्या वादात पडण्याचे प्रयोजन नसल्यामुळे दोघे एकच असे गृहीत धरले आहे. कारण ते भिन्न असले तरीही क्षेमेन्द्रपूर्ववर्तीच आहेत.

दृष्टया त्या त्या श्लोकाचे परीक्षण करून त्यात औचित्याचा परिपोष झाला आहे की भंग झाला आहे, त्यासंबंधी असंदिग्ध निर्णय देतो. आपल्या विचारप्रतिपादनाला व निर्णयाला प्रमाणभूतता व ग्राह्यता लाभावी ह्यासाठी तो संस्कृत साहित्यशास्त्राच्या सिद्ध परिभाषेचा पदोपदी, व्यवस्थितपणे व विवेचकपणे उपयोग करतो. आपला औचित्यसिद्धांत प्रत्येक पद्याला लागू करून दाखविण्यापूर्वी तो त्या पद्याचा संदर्भ, वक्ता, पद्यगत भावना, पद्यस्थ विषय, इत्यादी अंगांचा परिपूर्ण विचार करतो व मगच औचित्यशलाकेने त्या पद्यांतील औचित्यानौचित्याचा विवेक करतो. त्याच्या ह्या चतुर व चतुरस्र तसेच साहित्यशास्त्राधिष्ठित व रसिकतापूर्ण समालोचनशैलीची कल्पना यावी ह्यासाठी दोन-तीन पद्यांवरील गद्यवृत्ती येथे उतरून घेऊ—(श्लोक ६ वरील वृत्ती)—'अत्रापि चन्द्रमसः शृंगारान्तरंगैरनंगोद्दीपनैः पदैर्निर्वर्तितो वाक्यार्थः सदर्थौचित्यसामर्थ्येनात्यर्थमर्थनीयतां प्राप्तः ॥'. श्लोक १६ वरील वृत्ती अशी—'अत्र विरहविधुररमणीमनोभवावस्थानुरूपं माधुर्यमुत्सृज्य तडत्कारिणो लाजस्फोटं स्फुटन्तीत्योजःस्फूर्जितोर्जितस्वभावाधिशासिता सूक्तिर्लावण्यपेशलतनुर्ललितललनेव परुषभाषिणी झटित्यनौचित्यं चेतसि संचारयति ।''. श्लोक २३ वरील वृत्ती पाहा—"अत्र पार्वत्यां परमेश्वरस्य अभिलापशृङ्गारे वक्ष्यमाणे प्रथममुद्दीपनविभावभूतस्य वसन्तस्य वर्णनायां कामुकाध्यारोपेण वनस्थलीललनानां कुटिललोहितपलाशकलिकाभिर्नवसंगमयोग्यनखक्षतानि उत्प्रेक्षितानि परमौचित्यचारुतां प्रतिपादयन्ति ।" आणखी एकच उदाहरण देऊन ह्या मुद्याचा निरोप घेऊ. श्लोक २८ वरील वृत्ती अशी आहे—'अत्र प्रत्यग्रोपनत–प्रियतरतनयवियोगोपजनितशोकाख्यस्थायिभावोचितं दृषदामपि हृदयद्रावणं सुभद्रया यत्प्रलपितं तदर्जुनचेतसि प्रतिफलितं न केवलमुद्दीप्ततामुपगतं यावत्तिरश्चां तुरंगमाणामप्यन्तः संक्रान्तमुद्बाष्पविमुक्तशष्पकवलनिःस्पन्दस्थितादिभिरनुभावैः उदीर्णतरुणकरुणरसप्रतिपत्तिं किमप्यादधाति ॥'. एवंच, संस्कृत साहित्यशास्त्रातील अंगांगिभाव, अंगी, अद्भुत-वीर-करुणादी रस, अनुप्रासोपमादी अलंकार, विभाव, अनुभाव, संचारीभाव, प्रधाननायक, प्रतिनायक, प्रधानरस, प्रतिफलन, रस, रसाभास इत्यादी पारिभाषिक शब्दांचा सहजपणे परंतु विवेकाने उपयोग करून क्षेमेन्द्र प्रत्येक उदाहरणपद्यावरील आपले समीक्षण शास्त्रशुद्ध प्रमाणभूत व ग्राह्य बनविण्याचा कसोशीने प्रयत्न करतो हे त्याच्या समीक्षाशैलीचे उज्ज्वल वैशिष्ट्य होय. ह्या वैशिष्ट्यामुळेच क्षेमेन्द्राचा वाग्विलास भामहादींच्या वाग्विलासाहून वेगळा उमटून दिसतो.

(७) पूर्वजांचे ऋण - बहिरंग-परीक्षणाच्या संदर्भात ह्यानंतरचा विचार-

णीय व महत्त्वाचा मुद्दा म्हणजे क्षेमेन्द्र कोणकोणत्या पूर्वजांचा किती-किती प्रमाणात ऋणी आहे त्याचा परामर्श घेणे हाय होय. हा परामर्श घेण्यापूर्वी अमळ तात्त्विक विवेचन करणे आवश्यक आहे.

एखाद्या विशिष्ट विषयाचे एकाग्र-चित्ताने चिंतन करणाऱ्या कोणत्याही दोन विचारकांच्या विचारात साम्य आढळून येणे सहज शक्य असते. त्यात त्या विचारवंतांची परंपरा वा पद्धती समान असेल तर साम्य प्रतीत होणे अधिकच संभवते. वर एके ठिकाणी म्हटलेच आहे की, भामहोत्तर काळात साहित्यशास्त्राच्या वल्लरीला चांगलाच बहर आला. ह्या काळातील सर्वच विचारवंत काव्याचे स्वरूप, प्रयोजन, कारण, गुण, दोष, अलंकार ह्या एकाच विषयाच्या चिंतनमननात गढून गेले होते. त्यांची पद्धती ही सामान्यपणे एकसाची होती. त्यामुळे त्यांच्या ग्रंथांनी एक विशिष्ट परंपरा निर्माण केली. अनेक ग्रंथकार आपल्या पूर्वसूरींचा व त्यांच्या विचारांचा खंडनमंडनासाठी अपरे, अन्ये, पूर्वाचार्यैः, पूर्वसूरिभिः इत्यादि शब्दांनी उल्लेख करतात,[1] त्याचे कारण हेच. आणि म्हणूनच अनेकांच्या गुणदोषालंकारादी विषयांच्या विवेचनात अभेद आढळून येतो. ध्वन्यालोककारांनी निरनिराळ्या कवींच्या काव्यार्थात आढळून येणाऱ्या 'संवादा' संबंधी जे काही तात्त्विक विचार मांडले आहेत ते येथेही लागू पडतात. ध्वन्यालोककार म्हणतात 'संवादास्तु भवन्त्येव बाहुल्येन सुमेधसाम् । कारिका ४।११५. तीवरील वृत्ती अशी—'स्थितं ह्येतत्—संवादिन्यो मेधाविनां बुद्धयः ।'[2]

अशा प्रकारे भिन्नभिन्न चिंतकांच्या विचारात यद्यपी काही साम्य आढळून येत असले तथापी ते सगळे विचारवंत केवळ एकमेकांचा 'अनुवाद' करणारे आहेत असे म्हणून आपण त्यांची उपेक्षा करीत नाही, करू शकत नाही. कारण त्या साम्यातच काही वैषम्येही आढळून येत असतात. प्रत्येक विचारवंताच्या बुद्धीचे सामर्थ्य वेगळे असते. तिचा परिसर वेगळा असतो व तिचे पोषण वेगळ्या प्रकारे झालेले असते. त्यामुळेच ती पूर्वसूरींच्या विचारातील स्थूलसूक्ष्म प्रमाद पाहू शकते, पूर्वसूरींच्या विचारांचा वेगळा अन्वयार्थ लावू शकते आणि

१, उदा० भामह-काव्यालंकार, अन्यैः—१।१३, १।२४, २।४, परे-१।१४, अपरे-१।३१, २।६, ४।६; केचित्-२।२, २।९३; दण्डी—काव्यादर्श, तैः १।१०, पूर्वाचार्यैः-२।२, ३।१८६, पूर्वसूरिभिः-२।७; वामन-काव्यालंकारसूत्रवृत्ती, केचित्-३.१.१३, एके—४.२.१८; रुद्रट-काव्यालंकार, तैः-२।२, आचार्यैः-१२।४; ध्वन्यालोक—बुधैः-१।१, सूरिभिः—१।१३ इ इ.

२ ध्वन्यालोक, हरिहर संस्कृत ग्रंथमाला ६६, १९५३, पृ० ६५१.

पूर्वसूरींच्या पुरातन विचारांवर स्वतःच्या नवकल्पनांचा साज चढवू शकते. आणि ह्यालाच बुद्धीचे स्वातंत्र्य म्हणतात. सर्वथा नवीन, अपूर्व व अलौकिक विचार लाखो माणसांमध्ये एखाद्यालाच स्फुरत असतो. बाकीच्या बुद्धिमान विचारवंतांची प्रतिभा त्यांच्या हितासाठी काही वेगळा अर्थ[1] उत्पन्न करते आणि अशा अर्थामध्येच[2] (म्ह० कल्पनेमध्येच वा विचारामध्येच) त्या विचारवंतांचे पृथक्त्व समावलेले असते. तेव्हा एखाद्या विचारवंताने आपल्या पूर्वजांचे ऋण किती काढले आहे त्याचा आढावा घेताना त्या विचारवंताचे विचार म्हणजे त्याच्या पूर्वसूरींच्या विचारांची केवळ प्रतिबिंबे[3] आहेत की त्याने त्या विचारात नवतत्त्व सन्निविष्ट करून त्यांचा पुनर्विन्यास केला आहे, ते साक्षेपीपणाने पाहणे हे समालोचकाचे कर्तव्य ठरते. ही सर्व तात्त्विक विचारसरणी मनी बाळगून आता क्षेमेन्द्राच्या औचित्यविचारचर्चेकडे वळू या. वर एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे क्षेमेन्द्र हा संस्कृत साहित्यशास्त्राच्या उत्कर्षकाळातील अखेरचा ग्रंथकार आहे. त्याच्या पूर्वी भामह, दण्डी, वामन, रुद्रट, उद्भट, ध्वनिकार, अभिनवगुप्त, कुन्तक, इत्यादी मातबर 'वाग्भट' होऊन गेले. त्या सर्वांनी आपापल्या बुद्धिप्रकर्षाने काव्यविषयक विपुल व सकस विचार केला होता. अनेकांनी अनेक युगप्रवर्तक विचार मांडले होते. त्या सर्व विचारांचे परिशीलन-आलोडन क्षेमेन्द्राने अवश्य केलेले असले पाहिजे. क्षेमेन्द्र हा हिमालयवत् उच्च अशा अभिनवगुप्ताचा शिष्य होता हेही ह्या संदर्भात लक्षात ठेवायास हवे. साहजिकपणेच क्षेमेन्द्राच्या औचित्यसिद्धान्त-प्रतिपादनात पूर्वसूरींच्या विचारांचे प्रतिसाद ऐकू आले तर त्यात मुळीच नवल नाही. आपण फक्त सावधचित्ताने इतकाच विचार करावयास हवा की, क्षेमेन्द्राचे प्रत्यक्ष ऋण किती आहे व अप्रत्यक्ष ऋण किती आहे. त्याच्या औचित्यसिद्धान्ताचा साक्षात् उल्लेख पूर्वसूरींच्या ग्रंथात कोठे मिळतो व क्षेमेन्द्राने स्वप्रतिभाबळावर पूर्वीलांच्या विचारांत आपल्या नवकल्पना मिसळून देऊन औचित्यतत्त्वाला नवरूप कसे दिले आहे ते पाहावयास हवे. तेच आता करू या. प्रथम औचित्याचे क्षेमेन्द्रपूर्वकालीन उल्लेख कोठेकोठे आढळतात ते पाहू. ह्या अभ्यासाला भामहाच्या काव्यालंकारापासून प्रारंभ करू.

---

१. छाया—'सुकवेः सरस्वत्यैषा भगवती यथेष्टं घटयति वस्तु ।' ध्वन्यालोक पृ० ६५९

२. छाया—'अलोकसामान्यं अभिव्यनक्ति परिस्फुरन्तं प्रतिभाविशेषम् ।' ध्वन्यालोक १।६

३. छाया—'संवादो हि अन्यसादृश्यं, तत् पुनः प्रतिबिंबवत् आलेख्याकारवत् तुल्यदेहिवच्च शरीरिणाम् ॥' तत्रैव ४।११६.

(अ) भामहाने[1] औचित्य शब्दाचा प्रयोग केलेला आढळत नाही. मात्र त्याच्या काव्यालंकारातील १।५९ ह्या श्लोकात (एतद्ग्राह्यं सुरभि कुसुमं ग्राम्य-मेतन्निधेयं, धत्ते शोभां विरचितमिदं स्थानमस्यैतदस्य । इ. इ.) जो स्थान शब्द आला आहे तो 'औचित्य' ह्या अर्थाचा व्यंजक आहे. (स्थान म्हणजे योग्य वा उचित स्थान)

(आ) दंडीनेही औचित्याचा उल्लेख केलेला आढळत नाही. तथापी, दंडीने औचित्य सुचविले असे डॉ० सूर्यकान्त[2] म्हणतात व स्वतःच्या विधानाच्या पुष्टयर्थ काव्यादर्शाच्या २.५१ व १.१०४ ह्या दोन श्लोकांचा हवाला देतात. इतकेच नाही तर १.१०४ श्लोकामधील गुण शब्दाचा औचित्य असा अर्थ टीकाकाराने दिला असल्याचा निर्वाळा देतात. त्यामुळे ह्या सर्व उल्लेखांचा अमळ बारकाईने विचार करणे प्राप्त ठरते. डॉ. सूर्यकान्तांसमोर काव्यादर्शाची कोणती प्रत होती ते कळावयास साधन नाही. तथापी, आमच्यासमोर असलेल्या प्रतीतील[3] २.५१ हा श्लोक असा आहे–'न लिंगवचने भिन्ने न हीनाधिकतापि वा । उपमादूषणायालं यत्रोद्वेगो न धीमताम् ॥' अर्थात्, जी काव्ये वाचताना सहृदयांची मने व्याकुळ होत नाहीत, त्या काव्यातील उपमाने व उपमेये यांच्या लिंगवचनात विरोध असला किंवा हीनता-अधिकता अशी विषमता असली तरी त्या विसंगती उपमा अलंकाराचा दोष ठरू शकत नाहीत. वरील श्लोक, आचार्य रामचन्द्र मिश्र, श्रीप्रेमचन्द्रतर्कवागीश, श्रीनृसिंहदेवशास्त्री व जीवानन्द विद्यासागर ह्या सर्वांनी संपादिलेल्या काव्यदर्शात वरील स्वरूपातच आढळतो. तेव्हा ह्या श्लोकात औचित्याचा संबंध कोठे आला ते कळत नाही. आता डॉ. सूर्यकान्तोल्लिखित दुसऱ्या श्लोकाकडे वळू या. तो श्लोक असा—'न विद्यते यद्यपि पूर्ववासनागुणानुबन्धि प्रतिभानमद्भुतम् । श्रुतेन यत्नेन च वागुपासिता ध्रुवं करोत्येव कमप्यनुग्रहम् ॥' काव्यादर्श १.१०४ अर्थात् यद्यपी आश्चर्यावह काव्यनिर्मिती करणारी व जन्मांतरीच्या संस्कारांमुळे प्राप्त झालेली प्रतिभाशक्ती एखाद्याचे ठायी नसली तरीही शास्त्रानुशीलन करून किंवा काव्यज्ञांकडून उपदेश घेऊन व प्रयत्न करून जर त्याने सरस्वतीची उपासना केली तर सरस्वती त्याचेवर थोडीतरी कृपा अवश्य करतेच. यातही औचित्याचा संबंध कोठे येतो ते समजत नाही. आचार्य

१ आचार्य भामह-विरचित-'काव्यालंकार'—बिहार-राष्ट्रभाषा-परिषद्-प्रकाशन, पटना १९६२.

२ Ksemendra Studies, 1954, p. 64,

३. काव्यादर्श-अनुवादक व्रजरत्नदास, श्रीकमलमणि-ग्रंथमाला ७; साहित्यलड़ी- ५, प्रथमसंस्करण १९८८ संवत्.

रामचन्द्र मिश्र आपल्या 'प्रकाश' नामक संस्कृत टीकेत 'पूर्ववासनागुणानुबन्धि' ह्या शब्दाचे स्पष्टीकरण 'प्राक्तनसंस्कारसंबद्धम्' असेच करतात. एवंच, वस्तुस्थिती स्पष्ट होत असल्यामुळे अधिक मल्लिनाथी नलगे !

(इ) वामनाच्या काव्यालंकारसूत्रात[१] औचित्यतत्त्वाचा उल्लेख आढळत नाही.

(ई) रुद्रटाने (काळ इ० स० ८२५–८५०–डॉ० काणेमत—पाहा—History of Sanskrit Poetics, 1961. Part I, p. 151–160) औचित्य शब्दाचा उपयोग केलेला आढळतो तो असा—'एताः प्रयत्नाद् अधिगम्य सम्यग् औचित्यं आलोच्य तथार्थसंस्थम् । मिश्राः कवीन्द्रैः अघनाल्प-दीर्घाः कार्याः मुहुश्चैव गृहीतमुक्ताः ॥ काव्यालंकार २।३२ अर्थात् सत्कवींनी, ह्यापूर्वी वर्णिलेल्या मधुरा, प्रौढा, परुषा, ललिता व भद्रा ह्या पाच वृत्ती, प्रयत्न-पूर्वक चांगल्या प्रकारे जाणून घ्याव्यात. पात्रगत व अर्थगत औचित्याचा चांगला विचार करावा आणि त्या वृत्तींची संमिश्र रचना करावी. एकाच वृत्तीची फार लांबण लावू नये. शिवाय, 'इति यमकशेषं सम्यग् आलोच्यद्भिः सुकविभिरभि-युक्तैर्वस्तु चौचित्यविद्भिः ।......' (काव्यालंकार ३।५९) अर्थात् 'सत्कवींनी सावध चित्ताने यमकाच्या सर्व प्रकारांचा, काव्यविषयाचा आणि यमकरचनेच्या औचित्याचा विचार करावा. म्हणजे असे की, रसपूर्ण काव्यात यमक, श्लेष, चित्र ही साधल्यास ती रसखंडना करतात. शृंगार व करुण या रसांना तर यमकादी विशेषेकरून घातक आहेत. त्यांचा प्रयोग खंडकाव्ये, देवतास्तोत्रे, रणवर्णने यांमध्ये करावा. तेव्हा औचित्यविवेक करावा म्हणजे यमकयोजनेच्या स्थाना-स्थानाचा विचार करावा व त्यांची योजना सर्गबद्ध महाकाव्यात करावी, नाट-कात करू नये. हे विवेचन काव्यालंकारावरील नमिसाधूच्या टिप्पणाच्या (काव्यमाला २, निर्णयसागर, मुंबई, १९२८) आधारे केले आहे. एवंच, रुद्रटाने पात्रगत, अर्थगत, विषयगत व अलंकारगत औचित्यांचा विचार केला होता असा निष्कर्ष निघतो.

(उ) उद्भटकृत काव्यालंकारसारसंग्रहात 'ऊर्जस्वि' अलंकाराचे लक्षण असे दिलेले आढळते—'अनौचित्यप्रवृत्तानां कामक्रोधादिकारणात् । भावानां च रसानां च बन्ध ऊर्जस्वि कथ्यते ॥' काव्यालंकारसारसंग्रह ४.५. उद्भटाच्या

---

१. श्रीवामनविरचिता 'काव्यालंकारसूत्रवृत्तिः ।' Oriental Book Agency, Poona, 1927.

ग्रंथावर प्रतीहारेन्दुराजाने लघुवृत्ती लिहिली आहे. वरील कारिकेवरील लघुवृत्तीचा[1] सारांश असा आहे—काही काव्यांमध्ये शास्त्रनियमांना धरून रस व भाव यांचे वर्णन (निबन्धन) केलेले असते, काही ठिकाणी ते वर्णन शास्त्रनियमांच्या विरुद्ध असते. जेथे ते नियमांना धरून असते तेथे प्रेयस् व रसवत् हे अलंकार होतात. जेव्हा ते नियमांना सोडून तसेच नियमांच्या मुळाशी असलेल्या लोकव्यवहारालाही सोडून असते तेव्हा ऊर्जस्वी काव्य होते. अशा काव्यात राग, द्वेष, मोह इत्यादी कारणांमुळे अनौचित्याने रसभावादींचे उपनिबन्धन झालेले असते. म्हणूनच अशा काव्यात कविकल्पनापरिकल्पित बल विद्यमान असल्यामुळे अशा काव्याला ऊर्जस्वी हे नाव दिले जाते. अशा काव्याचे उदाहरण म्हणजे 'तथा कामोस्य ववृधे यथा हिमगिरेः सुताम् । संग्रहीतुं प्रववृते हठेनापास्य सत्पथम् ॥' अर्थात् शंकराचा कामविकार इतका प्रबळ झाला की, तो हठाने पार्वतीचे ग्रहण करण्यास प्रवृत्त झाला. येथे भगवान शंकराचे जे वर्णन केले आहे ते शास्त्रनियमांना सोडून आहे. परंतु शंकराचा कामविकार बळावल्यामुळेच तो तसे वागण्यास उद्युक्त झाला. ह्या विवेचनावरून हे स्पष्ट होईल की, उद्भटाने रसभावांच्या अनौचित्याचा विचार केला होता.

(ऊ) ह्यानंतरचा विचारणीय ग्रंथकार म्हणजे ध्वन्यालोककार.[2]—ध्वन्यालोकाच्या तृतीय उद्योतात ध्वनीचे स्वरूप व प्रभेद यांचे व्यंजकमुखाने निरूपण करण्यात आले आहे. त्यामध्ये असंलक्ष्यक्रमव्यंग्य ध्वनी वर्ण, पदे, वाक्ये, संघटना व प्रबन्ध यांत प्रकाशित होतो (ध्वन्यालोक ३.५८) असे म्हणून व वर्णादींचे विवेचन आटोपल्यावर संघटनेचे तीन प्रकार (ध्वन्यालोक ३.६१) सांगून झाल्यावर ग्रंथकार म्हणतात—'गुणानाश्रित्य तिष्ठन्ती माधुर्यादीन् व्यनक्ति सा । रसांतन्नियमे हेतुरौचित्यं वक्तृवाच्ययोः ॥' (ध्वन्यालोक ३.६२). अर्थात्, वक्त्याचे व वाच्यार्थाचे औचित्य गुणाधिष्ठित रसव्यंजक संघटनेचे (रीतीचे) नियामक असते. पैकी वक्ता म्हणजे 'कविः, कविनिबद्धो वा कश्चित् ।' (ध्वन्यालोक, पृ० २७३). पुन्हा कविनिबद्ध वक्ताही रसभावरहित अथवा रसभावसमन्वित असतो (तत्रैव). वाच्यार्थदेखील ध्वन्यात्मरसांग, रसाभासांग,

---

१. उद्भटकृत काव्यालंकारसारसंग्रह, भांडारकर-संशोधन-मंदिरप्रत, आवृत्ती १९२५, पृ० ९४

१. येथे ध्वन्यालोकाचे कारिकाकार व वृत्तिकार हे दोघे एकच होत असे गृहीत धरले आहे. तसेच विवेचन, 'ध्वन्यालोक':—हरिदास-संस्कृत-ग्रन्थमाला ६६,१९५३ ह्या प्रतीच्या आधारे केले आहे.

अभिनेयार्थ, उत्तमप्रकृत्याश्रय वा तद्भिन्न असा त्रिविध प्रकारचा असतो (तत्रैव पृ० २७४). एवंच येथे कविगत, कविनिर्मितपात्रगत, रसभावगत व काव्यप्रकारगत एवढ्या औचित्यांचा विचार आला आहे. ह्यानंतर ग्रंथकारांनी 'विषयाश्रयमप्यन्यदौचित्यं तां नियच्छति । काव्यप्रभेदाश्रयतः स्थिता भेदवती हि सा ॥' (तत्रैव ३।६३) ह्या कारिकेत मुक्तक, सन्दानितक, विशेषक, पर्यायबन्ध, परिकथा, सकलकथा, खंडकथा, महाकाव्य, नाटक, आख्यायिका, कथा इत्यादी काव्यप्रभेदगत औचित्याचा विचार केला आहे. आणि ह्यांपैकी प्रत्येक काव्यप्रभेदातील संघटनेचे स्वरूप कसे असावे ते निरूपिले आहे. ह्याच संदर्भात ग्रंथकारांनी परुषा, उपनागरिका इत्यादी वृत्तींच्या औचित्याचाही उल्लेख केला आहे (पाहा–'वृत्त्यौचित्यं तु यथारसं अनुसर्तव्यम् ।'–तत्रैव पृ० २८९). ग्रंथकारांनी वक्तृवाच्यविषयौचित्य केवळ पद्यगत संघटनेचेच नव्हे तर गद्यरचनेचेही नियामक असते असे ('एतद् यथोक्तं औचित्यमेव तस्या नियामकम् । सर्वत्र गद्यबन्धेऽपि च्छंदोनियमवर्जिते ॥' तत्रैव ३.६४) प्रतिपादून त्याची व्यापकता दर्शविली आहे. ह्यानंतर ध्वन्यालोककारांनी इतिहासाश्रय वा कविकल्पित प्रदीर्घ कथामय प्रबंधातील रसाची अभिव्यक्ती भावौचित्यपूर्ण कथारचना, अनुरूप संध्यंगविन्यास, समुचित रसभावविलास व सुसंगत अलंकारयोजना ह्यांच्या द्वारे होत असते असे निरूपिले आहे (तत्रैव ३. ६६-७०). ह्या संदर्भात ग्रंथकारांनी दिव्यमानुषादी पात्रांच्या स्थायीभावादींच्या औचित्याचे विवेचन केलेले आहे (तत्रैव, पृ० २९९-३०१). ह्या सर्व भूमिकेचा परमार्थ सांगताना ग्रंथकार 'अनौचित्यादृते नान्यद् रसभंगस्य कारणम् । प्रसिद्धौचित्यबन्धस्तु रसस्योपनिषत् परा' (तत्रैव पृ० ३०२) हा श्लोक उद्धृत करतात. त्यांच्या मती रससंपोष औचित्यामुळेच होतो, रसहानीही औचित्यहानीमुळेच होते. तात्पर्य, औचित्य उपनिषदांप्रमाणे रसरूप ब्रह्मतत्त्वाचे प्रकाशक होय. म्हणूनच नायकाच्या स्वभावाच्या वर्णनात अनौचित्य उपजू नये ह्यासाठी कवीने प्रख्यात कथा व नायक यांवरच नाटक रचावे, या भरतवचनाचा हवाला ग्रंथकारांनी दिला आहे (तत्रैव पृ० ३०३). ह्यानंतर औचित्यतत्त्वाचा उल्लेख 'वाच्यानां वाचकानां च यदौचित्येन योजनम् । रसादिविषयेणैतत्कर्म मुख्यं महाकवेः ॥' (३।८८) ह्या कारिकेत व तीवरील वृत्तीत आला आहे. रसादींनाच मुख्यतया काव्यार्थ बनवून त्यांच्या अभिव्यक्तीला अनुरूप अशा शब्दांची व अर्थांची (इतिवृत्तविशेषांची) योजना करणे हे महाकवीचे मुख्य कर्म होय (तत्रैव पृ० ४१४) असे स्पष्टीकरण ग्रंथकारांनी केले आहे. ध्वन्यालोकाच्या चवथ्या उद्योतात ध्वनिमार्गानुसारी कवीची प्रतिभा

अनेक गुणांनी डवरून येते आणि त्यामुळे त्याच्या उक्तिवैचित्र्याला अन्त राहात नाही हा विचार सत्कवींच्या उपदेशासाठी संक्षेपाने सांगताना ग्रंथकार म्हणतात- 'रसभावादिसंबद्धा यद्यौचित्यानुसारिणी । अन्वीयते वस्तुगतिर्देशकालादिभेदिनी ॥' (ध्वन्यालोक ४।११३). अर्थात् कवीने जर रसभावपरिपूर्ण तसेच देश-काल-अवस्थादी भेदांनी युक्त कथावस्तूचे औचित्यानुरूप वर्णन केले तर काव्यार्थपरंपरा न घटता उलट नावीन्याने व सौन्दर्याने वृद्धिंगतच होईल (तत्रैव ४।११४ व तीवरील वृत्ती).

(ए) वक्रोक्तिजीवितकार कुन्तक हा ह्यानंतरचा विचारणीय ग्रंथकार आहे (काळ इ. स. ९५०-१०५०—डॉ० दे-मत; पाहा—S. K. De—कुन्तक's वक्रोक्तिजीवित, Calcutta Oriental Series N. 8, 1928, Introduction p. xiii). कुन्तकाने औचित्य हा गुण मानला आहे. तो म्हणतो—'आंजसेन स्वभावस्य महत्त्वं येन पोष्यते । प्रकारेण तदौचित्यं उचिताख्यानजीवितम् ॥ यत्र वक्तुः प्रमातुर्वा वाच्यं शोभातिशायिना । आच्छाद्यते स्वभावेन तदप्यौचित्यं उच्यते ॥' (वक्रोक्तिजीवित १।५३-५४) अर्थात् ज्या सुस्पष्ट अभिधावैचित्र्याने पदार्थाच्या उत्कर्षाचे पोषण होते त्यास औचित्य म्हणतात व ते उचिताख्यानाचे जीवित होय. ज्यामध्ये बोलणाऱ्याच्या वा ऐकणाऱ्याच्या स्वभावाच्या योगे काव्यविषय रमणीय सौंदर्याने आच्छादिला जातो त्यासही औचित्य म्हणतात. उदा० राजाच्या स्वभावाच्या वर्णनप्रसंगी वक्त्याने अनुभवसिद्ध व्यवहारास अनुसरून अलंकारप्रचुर शब्दयोजना करणे. कुन्तकाच्या मती औचित्य हा गुण काव्यातील पद, वाक्य व सकल काव्यप्रबन्ध ह्या तिहींना व्यापून असतो (१।५७ वरील वृत्ती, पृ० ७६). तो पुढे म्हणतो की, पदौचित्य म्हणजे बहुविधभेदभिन्न वक्रत्व (तत्रैव). प्रबन्धाच्याही एखाद्या भागात औचित्य नसेल तर तो प्रबन्ध ज्याचा एखादा कोपरा जळला आहे अशा वस्त्रासारखा दिसतो (तत्रैव). कुन्तकाने आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ रघुकुमारातील श्लोकही उद्धृत केले आहेत. त्याने औचित्य म्हणजे वस्तूचा स्वभावोत्कर्ष हा अर्थ २।६ ह्या कारिकेतही ग्रहण केलेला आढळतो. त्याने १।४, २।२,२।१७, २।२३, २।२६, ३।५ इत्यादी कारिकांमध्ये तसेच पृ० १०, ४२, १३५ इत्यादी पृष्ठांवरील गद्यवृत्तींतही औचित्य शब्द वापरला आहे, परंतु त्या सर्व ठिकाणी त्याचा अर्थ 'उचिताचा भाव' हाच आहे. एवंच, कुन्तकाने औचित्य हा गुण मानला असून त्याचे वस्तूचा स्वभावोत्कर्ष व वक्त्याश्रोत्याचा स्वभाव असे दोन प्रकार मानले आहेत. शिवाय पद, वाक्य व प्रबन्ध ही औचित्याची विलासस्थाने मानली आहेत.

(ऐ) व्यक्तिविवेकाचा[1] कर्ता महिमभट्ट यानेही आपल्या ग्रंथात द्वितीय विमर्शारंभी 'इह खलु द्विविधं अनौचित्यं उक्तम् अर्थविषयं शब्दविषयं चेति ।' असे म्हणून शब्दविषय-अनौचित्याचे अनेक भेद असतात असे प्रतिपादिले आहे ('अपरं पुनः बहिरंगं बहुप्रकारं संभवति । तद्यथा—विधेयाविमर्शः प्रक्रमभेदः क्रमभेदः पौनरुक्त्यं वाच्यावचनं चेति ।'—पृ. १५०-१५१). तथापी, महिमभट्ट हा क्षेमेन्द्रपूर्ववर्ती की क्षेमेन्द्रोत्तरवर्ती ते निश्चितपणे ठरविता येत नाही. कारण डॉ. काणे[2] त्याचा उत्कर्ष-काळ इ. स. १०२०-१०५० असा देतात तर डॉ. दे[3] महिमभट्ट अकराव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला असे म्हणतात. एवंच, महिमभट्टाच्या काळाविषयी संदेह असल्यामुळे तत्कृत औचित्यानौचित्यविचाराचा परामर्श न घेणेच इष्ट आहे.

वर औचित्यतत्त्वाच्या पूर्वपीठिकेची जी तपासणी केली आहे तिचा निष्कर्ष असा की, क्षेमेन्द्रपूर्वकाळात पात्र, काव्यार्थ, विषय, यमकरचना, कवि, कविनिर्मित वक्ता, काव्यप्रभेद, परुषादी वृती, गद्यरचना, कथारचना, कथावयव, रस, विभावादी भाव, शब्द, देश, काल (ऋतुमान), अवस्था, वस्तुस्वभावोत्कर्ष, वक्तृ-स्वभाव, श्रोतृ-स्वभाव, पद, वाक्य व प्रबन्ध एवढया विषयांसंबंधीच्या औचित्याचा विचार झाला होता. ध्वनिकारांनी औचित्य संघटनेचे नियामक असून त्याचा रसाशी म्हणजेच काव्यार्थाशी अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध असतो असा तात्त्विक विचार मांडला होता. शिवाय, त्यांनी औचित्याचा व्यापक व तलस्पर्शी विचार केला होता, असे स्पष्टपणे जाणवते. गद्यपद्यात्मक काव्याच्या अंतर्बाह्य स्वरूपाला त्यांनी गवसणी घातली होती. उलट कुन्तकाचा औचित्यविचार एकंदरीने गुणनिष्ठ व मर्यादित होता. औचित्य हे काव्याचे जीवित होय व त्याचा आढळ काव्याच्या अमुक-अमुक अंगांमध्ये होतो असे मात्र क्षेमेन्द्रापूर्वी कोणीच म्हटले नाही. कुन्तकाने जीवित शब्द वापरला खरा, परंतु तो आख्यानाच्या संदर्भात वापरला.

आता वरील पार्श्वभूमीवर क्षेमेन्द्राची विचारसरणी (मागील पृ० ३५) उभी करता असे स्पष्टपणे जाणवते की, ध्वनिकार हाच क्षेमेन्द्राचा, ह्या संदर्भात, प्रमुख स्फूर्तिदाता होता. क्षेमेन्द्र हा अभिनवगुप्ताचा शिष्य असल्या-

---

१. व्यक्तिविवेक, काशी संस्कृत सीरीज् १२१, १९३६.

२. History of Sanskrit Poetics, Part I, p. 256,

३. कुन्तक's वक्रोक्तिजीवित, Calcutta Oriental Series No. 8, 1928, Introduction p. xiii

मुळे व अभिनवगुप्ताने ध्वन्यालोकावर लोचन नामक टीका लिहिलेली असल्यामुळे क्षेमेन्द्राने ध्वन्यालोकाचे गुरुमुखाने उत्तम अध्ययन केलेले असले पाहिजे असे गृहीत धरावयास हरकत नाही. ते करीत असताना 'अनौचित्यादृते नान्यद्रसभंगस्य कारणम् ।' ह्या ध्वनिकारांच्या विचाराचा क्षेमेन्द्राचे मनावर चांगलाच पगडा बसला असला पाहिजे. आणि ध्वनिकारांच्या त्या विचाराचे व एकूण औचित्यविचाराचे चिंतन करता-करता क्षेमेन्द्राला औचित्य हे काव्याचे स्थिर व अविनश्वर जीवित होय व ते रसाचेही नियामक असते[1] हा सिद्धान्त सुचला असला पाहिजे. अशा प्रकारे क्षेमेन्द्रप्रणीत औचित्यसिद्धान्ताच्या तळघडीच्या तत्त्वाचे श्रेय ध्वनिकारांनाच द्यावयास हवे असेच कोणीही म्हणेल. ह्याहीपुढे जाऊन असे म्हणावसे वाटते की, क्षेमेन्द्राने औचित्यसिद्धान्ताच्या तपशीलाच्या कल्पनाही ध्वन्यालोक व वक्रोक्तिजीवित ह्या दोन ग्रंथांमधूनच उचललेल्या दिसतात. उदा० क्षेमेन्द्राने मानलेल्या क्रियापदौचित्याचे मूळ वक्रोक्तिजीविताच्या 'पदपूर्वार्धस्य धातोः क्रियावैचित्र्यवक्रत्वं नाम वक्रत्वप्रकारान्तरं विद्यते ।' (उपर्युल्लिखित प्रत, पृ. ३६) ह्या वृत्तीत व तीनंतर दिलेल्या तीन उदाहरणांतील 'जयति,' व ध्वनन्ति ह्या क्रियापदांच्या समालोचनात दिसते. तद्वत् क्षेमेन्द्रकृत कारकविचार वक्रोक्तिजीवितातील 'रसादिपरिपोषणार्थं कर्तृत्वादि कारकं निबध्यते ।' उपर्युल्लिखित प्रत, पृ. ३८-३९) ह्या विवरणामधून स्फुरलेला दिसतो. ध्वन्यालोककारांनी तृतीयोद्योतात जी अनेक ध्वनिव्यंजके निरूपिली आहेत त्यांत वचनाचाही समावेश आहे (पाहा, ध्वन्यालोक पृ. ३२९). त्या विवरणावरून वचनौचित्याची कल्पना क्षेमेन्द्राला सुचली असावी. क्षेमेन्द्रकृत विशेषणौचित्यचर्चेस वक्रोक्तिजीविताचा 'विशेषणस्य माहात्म्यात्......' इत्यादी (२।१५) विचार प्रेरक झाला असावा, असे वाटते. क्षेमेन्द्राने औचित्याच्या मर्मस्थानांचा विचार करताना उपसर्ग (कारिका २४) व निपात (कारिका २५) असा क्रम स्वीकारला आहे. ध्वन्यालोककारांनी असंलक्ष्यक्रम ध्वनीच्या व्यंजकांचा नामोल्लेख करताना निपातोपसर्ग (ध्वन्यालोक, पृ. ३२४) असा उल्लेख केला आहे, इतकेच नव्हे तर त्यांनीही च, हा, धिक् , बत, याच निपातांची चर्चा केली आहे (तत्रैव पृ. ३३५-३४१). तसेच प्र, सम्, उद् , वि, उप, इत्यादी उपसर्गांची उदाहरणे दिली आहेत (तत्रैव,पृ.३३७-३४०).कुन्तकाने 'उपसर्गनिपातयोः'(वक्रोक्तिजीवित-कारिका २।३३) असे म्हणून तु, हहा इत्यादी निपातपरंपरेची तसेच सु, दुः इत्यादी उपसर्गांची वक्रता उलगडून दाखविली आहे. क्षेमेन्द्रकृत कालौचित्यविचार (कारिका

१. औचित्यविचारचर्चा, कारिका ५ व तीवरील वृत्ती.

२६) म्हणजे तर कुन्तककृत कालौचित्यविचाराचा (वक्रोक्तिजीवित, कारिका २।२६ व तीवरील वृत्ती) प्रतिसाद वाटतो, इतके साम्य त्या दोहोत आहे. ध्वन्यालोककारानेही काल हे ध्वनिव्यंजक मानले असून (ध्वन्यालोक, पृ.३२४) त्याचे सोदाहरण निरूपणही केलेले आढळते (तत्रैव, पृ. ३४३.३४४). ध्वन्यालोककारांनी ४।१११ व ११२ ह्या दोन कारिकांमध्ये अवस्था व देश यांच्या औचित्याचा जो परामर्श घेतला आहे त्यामधूनच क्षेमेन्द्राची देशावस्थाचर्चा (कारिका २७ व ३६) प्रसूत झालेली दिसते. कुन्तकाने वक्रोक्तिजीवितात (पृ० ९०- ९४ मध्ये) नामौचित्य-विवेचन विस्ताराने व सोदाहरण केले आहे. त्याने 'ततः प्रहस्य······' (रघुवंश ३. ५१) ह्या श्लोकातील 'रघु', 'आज्ञा शक्रशिखा······' (बालरामायण १.३६) ह्यातील 'रावण', 'नाभियोक्तुं···' (किरातार्जुनीयम् १३.५८) ह्यातील 'वज्रिणः,' 'संबंधी······' (औचित्यविचारचर्चा, श्लोकांक ७) ह्यातील 'चन्द्र' इत्यादी शब्द रमणीय कसे आहेत ते विवरून सांगितले आहे. इतकेच नव्हे तर 'संज्ञाशब्दानां नियतार्थनिष्ठत्वात् सामान्यविशेषभावो न कश्चित् संभवतीति न वक्तव्यम्। यस्मात्तेषां अपि अवस्थासहस्रसाधारणवृत्तेः वाच्यस्य नियतदशाविशेषवृत्तिनिष्ठता सत्कविविवक्षता संभवत्येव, स्वरश्रुतिन्यायेन लग्नांशुकन्यायेन चेति।' (वक्रोक्ति जीवित, पृ. ९१) असा एतद्विषयक न्यायही सांगितला आहे ! कुन्तकाचे हे विवेचन खाली ठेवून त्यावर क्षेमेन्द्रकृत नामौचित्यचर्चा (कारिका ३८ व तीवरील सोदाहरण वृत्ती) ठेवली की, खालचे कुन्तकाचेच विवेचन स्पष्टपणे दिसू लागते इतके क्षेमेन्द्राचे विवेचन झिरझिरीत आहे ! ही सर्व तुलना करण्यामागील हेतू, क्षेमेन्द्र ध्वनिकार व कुन्तक ह्या दोहोंचा वैचारिक दृष्टया नितान्त ऋणी आहे हे दाखविणे, एवढाच आहे. क्षेमेन्द्राचीच शब्दसंहती वापरून बोलावयाचे झाल्यास असे म्हणावयास हवे की, त्याच्या औचित्यविचारचर्चा ह्या ग्रंथाच्या सकलशरीरात सिद्धान्तरूप जीवितसर्वस्व ओतण्याचे कार्य ध्वनिकारांनी केले आहे व ग्रंथशरीराचा सांगाडा उभारण्यास ध्वनिकार व कुन्तक ह्या दोघांनी साह्य केले आहे. अर्थात् येथे क्षेमेन्द्राला दोष देण्याचा मुळीच मानस नाही. प्रस्तुत मुद्याच्या सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे सर्वस्वी नवीन, अपूर्व-प्रतिपादित असा विचार लक्षावधी व्यक्तींमधून एखाद्यालाच सुचत असतो. बाकीचे बुद्धिमान लोक पूर्वीलांनी स्पष्टपणे मांडलेल्या वा अप्रत्यक्षपणे सुचविलेल्या विचारांत रंग भरून त्यांना नवरूप देत असतात. क्षेमेन्द्रानेही ध्वनिकार व कुन्तक ह्यांच्या विचारांचा स्वीकार करून त्यांना औचित्य-तत्त्वाचा मुलामा चढविला व ह्यातच त्याचे प्रज्ञा-स्वातंत्र्य दिसून येते. क्षेमेन्द्राच्या औचित्यसिद्धान्ताची मुळीसुद्धा उपेक्षा होता कामा नये. संस्कृत

साहित्यशास्त्रातील प्रमुख सिद्धान्तांची परिगणना करताना औचित्यसिद्धान्ताला डावलणे म्हणजे क्षेमेन्द्रावर अन्याय करण्यासारखे आहे. असा काहीसा अन्याय डॉ. काणे[१] यांनी केलाही आहे, असे नम्रपणे म्हणावेसे वाटते. सिद्धान्त-प्रस्थापक ह्या नात्याने वामन, कुन्तक इत्यादी विचारवंतांचे जे स्थान तेच क्षेमेन्द्राचेही आहे. पूर्वसूरींनी प्रतिपादिलेल्या औचित्यतत्त्वाची व्याप्ती वाढविणाऱ्या व उपयोजनी टीकेचा पायंडा पाडणाऱ्या ह्या एकांड्या शिलेदाराचा यथोचित गौरव अवश्य व्हावयास हवा. मात्र क्षेमेन्द्राच्या बाजूने इतके सारे म्हणूनही शेवटी असे निरुपायास्तव म्हणावे लागते की, औचित्याच्या ह्या नवतत्त्वाला पुरेसा प्रतिभाशाली पुरस्कर्ता लाभला नाही. क्षेमेन्द्र विचारवंत नव्हता असे नाही, त्याला काव्यसौंदर्याकलनाचे 'इंद्रिय' नव्हते असे नाही किंवा सिद्धान्तप्रणेत्यास आवश्यक ती बौद्धिक शिस्त त्याचे अंगी नव्हती असेही नाही. तरीही औचित्यसिद्धान्ताची समस्त गभीरता व उत्तुंगता क्षेमेन्द्राच्या प्रज्ञेला कवटाळता आली नाही एवढे बरीक खरे! क्षेमेन्द्राच्या ह्या अपयशाचीच मीमांसा आता 'औचित्यविचारचर्चेच्या अंतरंग-परीक्षणात' करावयाची आहे.

८. 'औचित्यविचारचर्चाः—अंतरंग-परीक्षण'

औचित्य हे काव्याचे जीवित होय असे निःसंदिग्धपणे व आत्मविश्वासाने उद्घोषित करणारा आद्य व अन्तिम ग्रंथकार क्षेमेन्द्रच होय व त्याबद्दल तो स्तुतीस पात्र आहे. तथापी, वर जी औचित्यतत्त्वाची ऐतिहासिक पहाणी केली आहे तीवरून हे स्पष्ट होते की, उद्भट, आनंद, रुद्रट व कुन्तक यांनी औचित्यविचार अवश्य केला होता व तो क्षेमेन्द्रालाही नाकारता येणार नाही. पैकी उद्भट व रुद्रट ह्यांनी आपापल्या ग्रंथांवर स्वतः टीका लिहिलेल्या नसल्यामुळे त्यांची एतद्विषयक निश्चित विचारसरणी काय होती ते कळावयास साधन नाही. तथापी, इतर दोघांच्या व त्यातही विशेषतः आनंदवर्धनाच्या चर्चेची पडछाया क्षेमेन्द्रविचारात स्पष्टतया दृग्गोचर होते. त्यामुळे आता क्षेमेन्द्रकृत विवेचनाचा पुढीलप्रमाणे त्रिभागात्मक परामर्श घेऊन त्याच्या यशापयशाची जोखणी करू या. भाग १—आनन्द, कुन्तक व क्षेमेन्द्र या सर्वांनीच पद, वाक्य व प्रबन्धार्थ ह्या तीन औचित्यस्थानांची समीक्षा केलेली आढळते. एतद्विषयक क्षेमेन्द्रकृत निरूपण कारिका ११ ते १३ मध्ये (पुढे छापलेल्या औचित्यविचारचर्चेच्या सविवरण अनुवादाची पृ० १३-२७) आले असून ते विवेचनाचा

१. History of Sanskrit Poetics, 1961, Part II, p. 354.

रेखीवपणा, काव्यमयता, सूक्ष्म सौंदर्यदृष्टी, पद्यांचे यथान्याय रसग्रहण, विधायक टीका, सदभिरुची, कविनिबद्ध पात्रांच्या स्वभावच्छटांचे ज्ञान इत्यादी अनेक गुणांनी मंडित असून प्रत्ययोत्पादक आहे. अलंकार हे त्यानंतरचे उभयसमान औचित्यस्थान. क्षेमेन्द्ररचित एतद्विषयक कारिका क्रमांक १५ (उपर्युक्त अनुवाद पृ. ३१-३७) ही जरी तरुणीस्तनजघनांना स्पर्श करण्याची धृष्टता करीत असली तरी क्षेमेन्द्राचे एकूण विवेचन सदभिरुचिसंपन्न, स्वयंपूर्ण व टाकीव अतएव पृथगात्म आहे. आनंदवर्धन व क्षेमेन्द्र ह्या दोघांनीही रसौचित्यचर्चा केली आहे. किंबहुना क्षेमेन्द्रकृत एतद्विषयक विवरण (कारिका १६-१८.- अनुवाद पृ. ३७-७३) आद्योपान्त 'आनन्द'मय आहे ! क्षेमेन्द्रचर्चा नवरसरुचिर असून तीत स्थायीभाव, विभाव, अनुभाव, उद्दीपन, प्रतिफलन, रसाभास इत्यादी पारिभाषिक शब्दांचा सढळपणे व अचूकपणे प्रयोग करण्यात आला आहे. उदाहरणश्लोकांक ३९ (अनुवाद पृ. ५४-५५) अशासारख्या एखाद्या पद्यावरील क्षेमेन्द्ररचित वृत्तिगत विचारांशी सहृदयाचा जरी मतभेद होण्यासारखा असला तरी रसौचित्यविचाराचा साकल्याने विचार करता त्यात क्षेमेन्द्राचे साहित्यशास्त्राचे ज्ञान, प्रौढ पाण्डित्य, रसिकता, सूक्ष्म व चौफेर दृष्टी यांचे मनोज्ञ दर्शन घडते असेच म्हणावयास हवे. एकंदरीने आनंदकृत रसविचाराला औचित्यविचाराची 'गवसणी' घालण्यात क्षेमेन्द्राला यश आले आहे. कालौचित्याची चर्चा आनंदवर्धनानेही केली आहे हे खरे (ध्वन्यालोक कारिका ४।१११ व ११३) तथापी त्याची चर्चा ऋतुसंबद्ध आहे (पाहा—'कालभेदाच नानात्वं-यथर्तुभेदाद् दिग्व्योमसलिलादीनां अचेतनानाम् । चेतनानां च औत्सुक्यादयः कालविशेषाश्रयिणः प्रसिद्धा एव ।' ध्वन्यालोक, हरिदास संस्कृत ग्रंथमाला ६६,- १९५३, पृ. ६४०). एवंच ती क्षेमेन्द्रकृत भूतकालादिनिष्ठ चर्चेहून भिन्न आहे. क्षेमेन्द्रकृत एतद्विषयक विचार कारिका २६ (अनुवाद पृ. १०७-११२) मध्ये झाला आहे. त्या कारिकेत कालोचित अर्थ म्हणजे लोकाकर्षक परिवेष असे म्हटलेले असल्याने कालौचित्याची मर्मस्थान-पदवीच हिरावून घेतली गेली आहे. शिवाय, भूतकालीन क्रियासाठी भूतकालीन क्रियापदे हवीत इत्यादी क्षेमेन्द्रकृत विवरण अत्यंत प्राथमिक स्वरूपाचे वाटते. 'उचितं प्राहुराचार्याः सदृशं किल यस्य तत् ।' (कारिका ७) ही क्षेमेन्द्रदत्त औचित्यव्याख्या स्मरूनही असेच म्हणावेसे वाटते की, क्षेमेन्द्रकृत कालौचित्यविचार प्रतीत्युत्पादक नाही. देशौचित्य हे ह्यानंतरचे विचारणीय उभयसमान औचित्यस्थान आहे. आनंदवर्धनाने (उपर्युल्लिखित प्रत, पृ. ६३९-६४०) प्रथमतः चेतनगत व अचेतनगत असे

द्विविध देशनिष्ठ भेद सांगून त्यानंतर चेतनांपैकी ग्रामवासी, अरण्यवासी, जल-निवासी इत्यादी मनुष्ये, पशू व पक्षी यांतील भेद तारतम्याने वर्णावेत असे कवींना आदेशिले आहे. त्याने मनुष्यांच्या व विशेषतः स्त्रियांच्या अनन्त देश-निष्ठ व दिङ्निष्ठ व्यापारांचे, व्यवहारांचे, व स्वभावधर्मांचे वर्णन कवीने स्वप्रति-भेनुसार करावयास हवे असे म्हटले आहे. एवंच, आनंदवर्धनकृत विचार पद्धतशीर, सूक्ष्म व व्यापक आहे. क्षेमेन्द्राचा एतद्विषयक विचार कारिका २७ (अनुवाद पृ. ११३-११५) मध्ये आला आहे. क्षेमेन्द्राची कारिकाच सदोष आहे. विचारपुष्ट्यर्थ उद्धृत केलेला श्लोक क्र. ७९ तेवढाच समुचित आहे. श्लोकांक ८० चा देशौचित्याशी संबंधसुद्धा नाही, त्यात फक्त क्रमभंग आहे! शिवाय, क्षेमेन्द्राला विपुल उदाहरणेही देता आलेली नाहीत. एवंच, आनंदकृत चर्चेच्या पार्श्वभूमीवर क्षेमेन्द्रचर्चा अगदीच सामान्य व थिटी वाटते! स्वभावौचित्याचा विमर्शही उभयसमान आहे. आनंदवर्धनाने ह्या मुद्याची चर्चा उपर्युल्लिखित प्रत पृ० २७३-२८१ व २९९-३१० एवढ्या भागात केली आहे. तिचे सार असे- काव्यनायक स्वभावाने धीरोदात्त, धीरललित इत्यादी असतो. त्याची भाषा त्याच्या ह्या स्वभावाला अनुरूप असली पाहिजे. काव्यगत पात्रे उत्तम, मध्यम व अधम स्वभावाची तसेच दिव्य, मानुष इत्यादी प्रकृतींची असतात. त्यांच्या विभावादी भावांचे काव्यगत वर्णन त्यांच्या स्वभावधर्माला अनुरूप असावे. स्वभावविरुद्ध वर्णने वैरस्योत्पादक ठरतात. कवीने नायकादींच्या स्वभावचित्रणात काव्यकथा परंपराप्रसिद्ध आहे की कल्पित आहे ह्याचाही विचार अवश्य करावा. ह्याबाबतीत अनौचित्य उत्पन्न झाल्यास कवीची असमीक्ष्यकारिता दिसून येऊन त्याचा उपहास मात्र होतो. एवंच ध्वनिकारांचे एतद्विषयक चिंतन बृहद् अधिष्ठानावर (broad-based) उभे आहे व ते त्यांच्या प्रगल्भ प्रज्ञेस साजेसेच आहे. क्षेमेन्द्रालाही कविनिर्मित पात्राच्या स्वभावाचा महिमा पटलेला होता ह्याच्या खुणा त्याने श्लोकांक २,१०,१२ व ५२ ह्यांवर लिहिलेल्या वृत्तींत अवश्य मिळतात. तो पात्राच्या वृत्तीच्या औचित्याचाही विचार आवर्जून करतो असेही श्लोक १५ वरील वृत्तीवरून लक्षात येते. मात्र प्रत्यक्षपणे स्वभावौचित्य-विचारासारखा अतिशय महत्त्वाचा मुद्दा क्षेमेन्द्राने (अनुवाद पृ. १३०-१३३ मध्ये) फक्त दोन उदाहरणांच्या साह्याने हातावेगळा केला आहे. एतद्विषयक कारिकेमध्ये (क. ३३) पात्रांचा स्वभावालेख अकृत्रिम व असामान्य असला पाहिजे असे क्षेमेन्द्राने कटाक्षाने प्रतिपादिले आहे, परंतु उदाहरणे मात्र अगदीच सामान्य दिली आहेत! उदाहरणपद्यांक ९२ वरील वृत्ती (अनुवाद पृ. १३२)

केवळ शब्दावडंबरात्मक आहे. क्षेमेन्द्राने रामायण, महाभारत, बृहत्कथा इत्यादी ग्रंथांचे आलोडन केले होते, स्वतःही उणेपुरे सदतीस ग्रंथ लिहिले होते. इतकी बहुश्रुतता अंगी असूनही स्वभावौचित्याची उचित व रसमुंदर उदाहरणे क्षेमेन्द्राला का देता येऊ नयेत याचेच नवल वाटते! आता अवस्थौचित्याकडे वळू या. ह्या मर्मस्थानाचे विवरण क्षेमेन्द्राने कारिका ३६ व तीवरील उदाहरणद्वय (अनुवाद-पृ० १४०-१४३) ह्यांमध्ये केले आहे. अवस्थानुरूप काव्य पूज्य ठरते हा त्याचा विचार ग्राह्य मानण्यासारखाच असला व त्याने दिलेल्या उदाहरणात व त्यांवरील वृत्तींत, आक्षेपार्ह असे काहीच नसले, तरी आनंदवर्धनविवेचनाशी त्याच्या विवेचनाची तुलना करता ते अनुज्ज्वलच वाटते. ध्वनिकारांनी (उपर्युल्लिखित प्रत पृ० ६३३-६३८) अवस्थोचित वर्णने स्वभावोक्त असली तरीही काव्यार्थाला अनन्तत्व प्राप्त करून देतात असा प्रस्ताव करून कालिदासाने कुमारसंभवात सुंदर भगवती पार्वतीच्या विवाहसमयपर्यंतच्या भिन्नभिन्न अवस्थांचे कसे बहारदारपणे वर्णन केले आहे ते संक्षेपाने पण मार्मिकपणे निरूपिले आहे. त्यानंतर अचेतनांचे चेतनवत् वर्णन करणे ह्या अवस्थौचित्याच्या द्वितीय प्रभेदाचे कुमारसंभवाच्याच आधारे ध्वनिकारांनी विवेचन केले आहे. त्यानंतर चेतनांच्या बाल्यादी अवान्तर अवस्था, विनीताविनीत स्वभावाच्या कुमारींच्या विविधा अवस्था, अचेतनांच्या आरंभादी पृथक् अवस्था इत्यादींच्या वर्णनांच्या योगे काव्यात अनन्तताजन्य सौंदर्य निर्माण होते असे विवेचून ह्या मुद्याचा समारोप केला आहे. ध्वनिकारांचे विवेचन लक्षात घेता कोठे ध्वनिकार व कोठे क्षेमेन्द्र असेच निरुपायास्तव म्हणावे लागते! येथवर ध्वनिकारांच्या संगतीत राहून क्षेमेन्द्राने केलेल्या औचित्यस्थानांच्या निरूपणाचा जो परामर्श घेतला त्याचा निष्कर्ष असा की, क्षेमेन्द्राला पद, वाक्य, प्रबन्धार्थ, अलंकार व रस ह्या मर्मस्थानांच्या विवेचनात जरी यश लाभले असले तरी काल, देश स्वभाव व अवस्था ह्या मर्मस्थानांच्या निरूपणात अपयशच आले आहे. **भाग २**–आता ध्वनिकारांनी वरीलखेरीज कोणत्या औचित्यस्थानांचा परामर्श घेतला आहे व त्या औचित्यस्थानांची चर्चा गाळण्यात क्षेमेन्द्राने औचित्य दाखविले आहे की अनौचित्यच प्रदर्शित केले आहे, त्याची चर्चा करू या. आनंदवर्धनांनी कविनिष्ठ औचित्य काव्यगत संघटनेचे नियामक असते असा मुद्दा मांडून (उपर्युल्लिखित प्रत पृ० २७३) पुढे कवीला रसभाव-रहित काव्यरचना करावयाची असेल तर त्याने स्वेच्छेनुसार संघटना योजावी पण रसभावसमन्वित काव्यरचना करावयाची असेल तर मात्र शृंगारादी रसविलासाला अनुरूप असमासा, दीर्घसमासा किंवा मध्यमसमासा संघटना योजावी, असे त्याचे

विवेचन केले आहे. संस्कृत साहित्यात रीतीला किंवा संघटनेस असलेले महत्त्व लक्षात घेता, ध्वनिकारांचे हे विवेचन ग्राह्यच वाटते. क्षेमेन्द्राने मात्र त्याची उपेक्षा केली आहे. ध्वनिकारांनी कारिका ३।६३ मध्ये मुक्तकादी काव्यभेदांचे औचित्य म्हणजेच विषयाश्रय औचित्य संघटनेस बंधक असते असा फार महत्त्वाचा विचार मांडून तो पृ० २८२ ते २९१ मध्ये पल्लवित केला आहे. मुक्तक, परिकथा, खंडकथा, महाकाव्य, नाटक, आख्यायिका इत्यादी विविध काव्य-प्रकारांतील संघटना भिन्नरूपात्मक असलीच पाहिजे हा विचार कोणालाही पटण्यासारखाच आहे. ध्वनिकारांनी काव्यभेद व संघटना यांची सांगड घालून स्पृहणीय प्रागतिकता दाखविली आहे ह्यात संदेह नाही. परंतु क्षेमेन्द्राला त्याचे महत्त्व मुळीच प्रतीत झाले नाही, ह्यापरते दुर्दैव ते कोणते ? ध्वनिकारांनी वृत्त्यौचित्याची चर्चा पृ० २८९ वर तसेच कारिका ३।३९ मध्ये केली आहे. रसानुगुण वाच्यार्थनिष्ठ व्यवहाराला वृत्ती म्हणतात. त्या वाच्याश्रय व वाचकाश्रय अशा द्विविध असून रसादी त्यांचे प्राण होत. काव्याची कथावस्तू म्हणजे जणू वृत्तींचे शरीर (ध्वन्यालोक पृ० ४१५) होय. एवंच ज्या वृत्तींचा काव्यगत रसांशी निकटचा संबंध असतो त्या वृत्तींच्या औचित्याची दखलदेखील क्षेमेन्द्राला घ्यावीशी वाटली नाही. ध्वनिकारांनी गद्यबन्धौचित्याचाही मोठ्या साक्षेपाने व आठवणीने विचार केला आहे (ध्वन्यालोक पृ० २९१-२९५). क्षेमेन्द्राला त्याकडे लक्ष द्यावेसे वाटले नाही. संस्कृत साहित्यिकांपैकी अनेकांनी इतिहासाश्रय कथावस्तूंवर काव्ये लिहिली, काहींनी उत्पाद्यवस्तूवरही काव्यरचना केली. कथा-वस्तूच्या सप्रमाण व समुचित रचनेला कथाकाव्यरचनेत महत्त्व असते हे कोणा-लाच नाकारता येणार नाही. ध्वनिकारांनी एतद्विषयक औचित्याचे (कारिका (३।६६-६८ व पृ० २९९) स्मरणपूर्वक विवेचन केले आहे. त्यांच्या मती प्रबन्ध(दीर्घकाव्य)गत कथानक रसोचित असले पाहिजे, कथेला उपकारक अंशांचेच ग्रहण कवीने केले पाहिजे, कथांशांची मांडणी यथान्याय केली पाहिजे व प्रबन्धगत प्रधानरसावर अखेरीपावेतो लक्ष खिळविले पाहिजे. दीर्घकाव्यात कथा-वस्तूच्या रससंपन्नतेइतकेच अलंकरणालाही महत्त्व असते, ह्या बाबीकडे आनंदवर्ध-नाचे दुर्लक्ष झाले नाही. क्षेमेन्द्राने मात्र ह्या गोष्टीकडे पूर्णपणे काणाडोळा केलेला दिसतो. अशा प्रकारे काव्याचे अंतरंग व बहिरंग, काव्याचे आत्मरूप सरस कथा-नक व त्या रसपूर्ण कथानकाला साकार व समूर्त करणारे काव्यशिल्प ह्यांच्या संदर्भात अतिशय महत्त्वाच्या अशा ज्या औचित्यस्थानांचा आनंदवर्धनांनी विचार केला त्यांची उपेक्षा करून क्षेमेन्द्राने मोठेच अनौचित्य प्रदर्शित केले आहे असे

वाटते. क्षेमेंद्राच्या कार्याविषयी लिहिताना डॉ॰ काणे[1] म्हणतात—"In The औचित्य. he simply developes what the ध्वन्यालोक had laid down (in III. 7-14 and pp. 174-186)···" अर्थात्—ध्वन्यालोकाने जे काही विचार मांडले आहेत त्यांचाच केवळ विस्तार क्षेमेन्द्राने औचित्यविचारचर्चेत केला आहे. ध्वनिकार व क्षेमेन्द्र यांची तुलना मनात उभी राहिली व तिच्यावर चिंतन-मनन करू लागले की, पुष्कळदा असे वाटू लागते की, क्षेमेन्द्राने ध्वन्यालोकगत विचारांचा नुसता विस्तार केला असता तरी किती बहार झाली असती! परंतु, क्षेमेन्द्राने तेवढेही केले नाही. आणि म्हणूनच "Clearly Kṣemendra's 'Aucityavicārcarcā' shows great improvement on Ānandavardhana's and Kuntaka's treatment of Propriety." हे डॉ॰ सूर्यकान्तांचे म्हणणे (Kṣemendra Studies, 1954, P. 73) निव्वळ अर्थवादात्मक वाटते.

भाग ३—औचित्यतत्त्वाची ऐतिहासिक सर्वेक्षणा करताना हे दाखवून दिले आहे की, क्षेमेन्द्रचर्चित क्रियापद-कारक-लिंग-वचन-प्रभृती औचित्यस्थानांची मुळे ध्वन्यालोक व वक्रोक्तिजीवित ह्या ग्रंथात, त्या त्या विषयांच्या अन्य संदर्भातील चर्चेत, आढळून येतात. तथापी, ह्या बाबतीत क्षेमेन्द्राला संशयाचा फायदा देऊ! तसा तो देऊन व त्याने क्रियापदांचे औचित्यविवरण स्वबुद्धीने केले आहे असे गृहीत धरून त्या विवरणात क्षेमेन्द्र कितपत यशस्वी झाला आहे ते ठरविण्याचा प्रयत्न करू. क्षेमेन्द्राने क्रियापदौचित्य (अनुवाद पृ॰ ७३-७६) संक्षेपाने, सुटसुटीतपणे व सुंदरपणे विचारात घेतले आहे. त्याने कारिका १९ च्या पुष्ट्यर्थ दिलेली दोन्ही उदाहरणपद्ये अर्थसुंदर व समर्पक असून त्यावरील त्याची टीकाही विदग्ध रसिकांना आनंदाने मान डोलावयास लावणारी अशीच उतरली आहे. श्लोक ५२ वरील त्याची टीका विशेष हृदयंगम आहे. क्षेमेन्द्रकृत कारकविचार (कारिका २०) क्रियापदविचाराचा पाठलाग करीत आला असून तो अमळ विस्तृत आहे (अनुवाद पृ॰ ७६-८९). क्षेमेन्द्राच्या मताशी रसिकाचा दोन-तीन ठिकाणी (उदा॰ श्लोक ५४, ५६, ५७ व ६४ ह्यांवरील गद्य वृत्ती) जरी थोडासा विरोध होत असला तरी क्षेमेन्द्राचे एकूण विवेचन तपशीलवार, परिपूर्ण व टाकटिकीचेच आहे. क्षेमेन्द्रकृत लिंगविचारही (कारिका २१, अनुवाद पृ॰ ९०-९२) त्याच्या सूक्ष्म रसिकतेने व तरल चिकि-

1. History of Sanskrit Poetics, 1961, Part I, P. 264.

त्सक बुद्धीने विनटलेला असल्यामुळे प्रत्ययोत्पादक झाला आहे. लिंगविचारा-नंतर लगेच झालेल्या वचनविचारामधील कारिका (क्र० २२) जरी कल्पनासंकर-दोषाने डागाळलेली असली व उदाहरणश्लोक ६८ वरील क्षेमेन्द्राची टीका जरी 'पुस्तकी' थाटाची असली तरी एकूण वचनविचार सुसह्यच आहे! विशेषणौचित्यपर कारिकाच (क्र० २३) मुळात प्रत्यायक नाही. शिवाय तद्गत तत्त्वाच्या पुष्ट्यर्थ दिलेली दोन्ही उदाहरणे श्लोक क्रमांक ६९ व ७०) विशेषणौचित्य मानणे अनिवार्य आहे असे मुळीसुद्धा मनावर ठसवू शकत नाहीत. क्षेमेन्द्राने त्यानंतरच्या म्हणजे उपसर्गौचित्याच्या कारिकेत (क्रमांक २४) 'विवर्धते' व 'उन्नतिं' हे पदद्वय वापरून औचित्यतत्त्वाचा 'स्ववचसा विनाशः कृतः।' (उदाहरणश्लोक ३४ वरील वृत्ती, अनुवाद पृ० ५१) असेच म्हणावेसे वाटते. शिवाय, ह्या मुद्याच्या पुष्ट्यर्थ दिलेल्या उदाहरणपद्यावरील (श्लोकांक ७२) क्षेमेन्द्राची 'आलोचना' वाचून तर 'झटिति अनौचित्यं चेतसि संचारयति!' (श्लोकांक १६ वरील क्षेमेन्द्रवृत्ती, अनुवाद पृ. ३०). उपसर्गौचित्योत्तर निपातौ-चित्यचर्चा (कारिका २५-अनुवाद पृ. १०४-१०७) म्हणजे दीर्घकालीन अवर्षणा-नंतरची सुखद जलवृष्टीच! त्याची प्रस्तुत कारिका अधिक सुन्दर आहे की, तद्गत विचाराच्या पुष्ट्यर्थ दिलेली उदाहरणे व त्यांवरील वृत्ती अधिक सुन्दर आहेत, त्याचा निर्णय करताना चिकित्सक रसिक भांबावून जातो! ह्यानंतर कुलौचित्याकडे वळल्यावर (कारिका २८-अनुवाद पृ० ११५-११८) रसिकाचा पुन्हा विरसच होतो. क्षेमेन्द्राने कुलौचित्य काव्यसौंदर्यवर्धक ठरते असे म्हटले असल्याने ह्या मर्मस्थानावर आघातच झाला आहे! क्षेमेन्द्राने ८२ व्या उदाहरण श्लोकावर केलेली टीका वाचून कुलौचित्यानौचित्याचा परिपूर्ण व सखोल विचार न करताच कुलौचित्य हे मर्मस्थान क्षेमेन्द्राने मानले आहे, ह्याबद्दल वाचकाची खात्री पटते. जी दुर्दशा कुलौचित्याची तीच व्रतौचित्याचीही (कारिका २९, अनुवाद पृ० ११८-१२१), त्यामुळे अधिक मल्लिनाथी न करता पुढील म्हणजे तत्त्वौचित्याकडे (कारिका ३०, अनुवाद पृ० १२१-१२३) वळणेच इष्ट. क्षेमेन्द्राने दिलेल्या दोन उदाहरणापैकी श्लोकांक ८५ मधील तत्त्व शुद्ध दार्शनिक स्वरूपाचे आहे तर श्लोकांक ८६ मधील तत्त्व व्यावहारिक शहाणपणाचा उपदेश करणारे आहे. दर्शन व व्यवहार यांचा मेळ जमणे एकंदरीनेच कठीण! त्यामुळे येथील उदाहरणे निवडण्यात क्षेमेन्द्राने फारसे तारतम्य दाखविले आहे असे वाटत नाही. शिवाय शैव तत्त्वज्ञानात मुरलेल्या अभिनवगुप्ताचा शिष्य असलेल्या व स्वतः चारुचर्या, चतुर्वर्गसंग्रह इत्यादी ग्रंथ रचून तात्त्विक विचार पचविलेल्या

क्षेमेन्द्राकडून तत्त्वौचित्याचे अधिक प्रत्ययोत्पादक व भरदार विवेचन अपेक्षित होते. क्षेमेन्द्राची सत्त्वौचित्यपर कारिका क्रमांक ३१ ही वदतोव्याघात व पुनरुक्ती (अनुवाद पृ. १२४) या दोषांनी दूषित आहेच. शिवाय त्याने दिलेली दोन उदाहरणे (श्लोकांक ८७ व ८८) ही देखील सत्त्वौचित्य हे स्वतंत्र औचित्यस्थान मानणे अगत्याचे आहे असे निःशंकपणे प्रतिपादू शकत नाहीत. तथापी, क्षेमेन्द्राचे सत्त्वौचित्यनिरूपण निदान दुःसह तरी नाही, परंतु त्याचे अभिप्रायौचित्यनिरूपण (कारिका ३२, अनुवाद पृ. १२७-१३०) नुसतेच दुःसह नाही तर अत्यत उद्वेगकारक आहे. त्याच्या मती काव्यगत पात्राचा अभिप्राय अक्लिष्टपणाने अभिव्यक्त झाला पाहिजे. काव्यार्थ सरल, ऋजू असला पाहिजे ही क्षेमेन्द्राची भूमिका आहे व ती भामहापासून ध्वन्यालोककारांपर्यन्त सर्वांनीच घेतली आहे. परंतु, ह्या भूमिकेच्या मंडनार्थ क्षेमेन्द्राने दिलेली उदाहरणे पाहून रसिक वाचक हतबुद्ध होतो! एक उदाहरण (पद्यांक ८९) स्वैरिणीची उक्ती असून दुसऱ्या उदाहरणात (पद्यांक ९०) एका तरुणीने आपल्या सखीला तिचे पापकर्म लपविण्यासाठी केलेला उपदेश ग्रथित केला आहे! क्षेमेन्द्राचे लेखन-वाचन अफाट होते हे वर एकाधिक वेळा सांगितले आहे. त्या लेखनवाचनामधून अभिप्रायौचित्याला अनुकूल असे एकही उदाहरण-पद्य क्षेमेन्द्राला देता येऊ नये ही महान् आश्चर्याची बाब आहे! आपल्याला अभिप्रायौचित्य प्रस्थापित करावयाचे आहे, आपण देत असलेल्या उदाहरणद्वयाने ते साधणार आहे की नाही, ह्याचा जरासुद्धा विचार क्षेमेन्द्राने करू नये होता काय? क्षेमेन्द्राचे हे सर्वच निरूपण वाचून ह्या दोन उदाहरणश्लोकांच्या योगे आत्यंतिक अनौचित्याचाच परिपोष झाला आहे असे निरुपायास्तव म्हणावेसे वाटते. क्षेमेन्द्रोपवर्णित सारसंग्रहौचित्यवर्णन (कारिका ३४, अनुवाद पृ० १३३-१३६) निष्प्रभ असले तरी क्षेमेन्द्रकालीन काव्यलेखनाच्या संकेतांच्या प्रकाशातच त्याचा विचार करावयास हवा. तसा तो केला म्हणजे क्षेमेन्द्राचे एतद्विषयक निरूपण ग्राह्य आहे असेच म्हणावे लागते. मात्र निर्जीव असे सारसंग्रहौचित्य ओलांडून आपण प्रतिभौचित्य-प्रांतात प्रवेश केला की, मनाला मनस्वी वेदनाच होऊ लागतात. प्रतिभेची थोरवी क्षेमेन्द्रपूर्वकाली सर्वच साहित्यशास्त्रज्ञांनी मुक्तकंठाने गायिली होती. राजशेखराने 'या शब्दग्रामं अर्थसार्थं अलंकारतंत्रं उक्तिमार्गं अन्यदपि तथाविधं अधिहृदयं प्रतिभासयति सा प्रतिभा। अप्रतिभस्य पदार्थसार्थः परोक्ष इव, प्रतिभावतः पुनरपश्यतोऽपि प्रत्यक्ष इव।' (काव्यमीमांसा, चतुर्थोऽध्यायः।) इतक्या भरघोस शब्दात प्रतिभेची स्तुती केली होती. खुद्द क्षेमेन्द्राने कवित्वशक्तीचा महिमा कविकंठाभरणात गायिला होता; ती शक्ती दिव्य व मानवी उपायांनी प्राप्त होते

असेही प्रतिपादिले होते (कविकंठाभरण, प्रथम संधी). इतकेच नव्हे तर त्याला भट्टतौतांची 'प्रज्ञा नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा मता ॥' ही प्रतिभेची व्याख्याही माहीत व मान्य होती. एवढे सगळे असूनही त्याने प्रतिभौचित्याचे स्पष्टीकरण (कारिका ३५ अनुवाद पृ. १३६-१४०) करण्यासाठी दिलेली दोन उदाहरणे (पद्यांक ९५ व ९६) अवलोकिली की, क्षेमेन्द्राच्या प्रातिभ उंचीची, वेगळ्या अर्थाने, यथार्थ कल्पना येते !! उदाहरणपद्य ९५ म्हणजे आपले नीच कर्म लपविणाऱ्या नायिकेची उक्ती असून उदाहरणपद्य ९६ मध्ये एका वेश्येने आपल्या प्रियकराला लताप्रहार करून कसे फुलविले (!) त्याचे वर्णन आहे !! जी प्रतिभा सरस, सुवर्णयुक्त, सालंकृत, सुसंधियुक्त व चिरंतन स्वरूपाची काव्ये निर्मिते त्या समुज्ज्वल प्रतिभेचे क्षेमेन्द्रकृत प्रस्तुत विवरण वाचून सहिष्णू रसिकही क्षेमेन्द्रावर नाराज होतो, तर तरल बुद्धीचा चिकित्सक संतप्त झाला तर त्यात नवल कसले ? प्रतिभौचित्यचर्चेच्या पाठीला पाठ लावून आलेली विचारौचित्यचर्चा कठोर चिकित्सकालाही सन्तुष्ट करणारी आहे. कारिका ३७ (अनुवाद पृ. १४३-१४६) मध्ये काव्याला समुचित विचारांनी सौंदर्य प्राप्त होते हा सर्वग्राह्य व अभिनंदनीय विचार क्षेमेन्द्राने मांडला आहे. क्षेमेन्द्राने स्वविचारसमर्थनार्थ दिलेले उदाहरणपद्य १०० जरी तितकेसे प्रत्ययोत्पादक नसले, तरी उदाहरणपद्य ९९ निश्चितपणे अर्थरुचिर आहे. त्यावरील क्षेमेन्द्राची टीकाही प्रशंसनीय आहे. क्षेमेन्द्राने नामौचित्याच्या प्रतिपादनासाठी रचिलेली कारिका (क्रमांक ३८) जरी अमळ गोंधळात टाकणारी असली व तीवरील वृत्तीचे जरी बरेच सायासाने समर्थन करावे लागत असले तरी क्षेमेन्द्राने दिलेली तिन्ही उदाहरणे अर्थदृष्ट्या रमणीय व प्रस्तुत मुद्याचा परिपोष करणारीच आहेत. उदाहरणश्लोक १०३ वरील त्याची वृत्ती म्हणजे त्याच्या सूक्ष्म चिकित्सक दृष्टीचे उत्तम स्मारकच होय ! क्षेमेन्द्रकृत आशीर्वचनौचित्यविचार (कारिका ३९, अनुवाद पृ. १५२-१५६) सर्वसामान्य असला तरी तो क्षेमेन्द्रकालाला साजेसाच आहे.

क्षेमेन्द्राने स्वबुद्धीने ज्या औचित्यस्थानांची चर्चा केली आहे त्यांचा येथवर जो आढावा घेतला त्याचा निष्कर्ष असा की, क्षेमेन्द्राची क्रियापद, कारक, लिंग, वचन, निपात, सारसंग्रह, विचार, नाम व आशीर्वचन ह्या औचित्यस्थानांची चर्चा निःसंशयपणे यशस्वी झाली असून विशेषण, उपसर्ग, कुल, व्रत, तत्त्व, सत्त्व, अभिप्राय व प्रतिभा ह्या मर्मस्थानांची समीक्षा बहुतांशी फसलेली आहे. वरील भाग १ च्या अखेरीस क्षेमेन्द्रकृत काल, देश, स्वभाव व अवस्था ह्या चार औचित्यस्थानांचे निरूपण फिके झाल्याचे म्हटलेच

आहे. ते जमेस धरता क्षेमेन्द्राने सोदाहरण निरूपिलेल्या २७ औचित्यस्थानांपैकी १५ स्थानांच्या विवरणात त्याला यश लाभले असून उरलेल्या १२ स्थानांचे निरूपण त्याला आत्मविश्वासाने व प्रतीतिपूर्ण रीतीने करता आलेले नाही असाच इत्यर्थ निघतो. क्षेमेन्द्र बहुश्रुत नव्हता असे नाही, तो चिकित्सक नव्हता असे नाही, त्याच्या अंगी लेखनाची शिस्त वा पद्धत नव्हती असेही नाही, तो रसिक नव्हता असेही म्हणता येत नाही, त्याचा साहित्यशास्त्राशी दृढ परिचय नव्हता असे तर मुळीच म्हणता येत नाही. तथापी, त्याची प्रतिभा आनंदवर्धन, कुन्तक व अभिनवगुप्त यांच्याप्रमाणे अत्युज्ज्वल, मर्मग्राही व अन्तस्तत्त्वस्पर्शी नसल्यामुळे औचित्यसिद्धान्त क्षेमेन्द्राच्या डोक्यापासून काही आंगळे वरच राहिला, असाच निर्वाळा द्यावा लागतो. आणि म्हणूनच "Kṣemendra has propounded a school of thought which might be called the Propriety School" व "Kṣemendra is the propounder of this school" ही डॉ. सूर्यकान्तांची[१] दोन्ही विधाने सत्य असल्यामुळे पूर्णपणे पटण्यासारखीच असली तरी "In Kṣemendra the theory of propriety found a real champion" हे त्यांचे[२] म्हणणे निरुपायास्तव नाकबूल करावे लागते. The theory of propriety did not find an adequately competent champion हेच खरे गाऱ्हाणे आहे, हीच मनात सतत सलत राहणारी रुखरुखआ है !

९. औचित्य-सिद्धान्ताचा महिमा

चिंतनशील प्रकृतीच्या एखाद्या पुरुषाने एखाद्या विशिष्ट विषयाचे दीर्घ काल चिंतन-मनन-निदिध्यासन केल्याने त्याला एखादा नवा विचार वा नवी कल्पना सुचणे सहज शक्य असते. तो विचार वा ती कल्पना लोकोपकारक आहे अशी मनोमन खात्री पटल्यास तो पुरुष त्या विचाराचे वा कल्पनेचे प्रतिपादन करतो. तथापी, त्या नवविचाराचे सांगोपांग अध्ययन न करता किंवा त्याचे समस्त पैलू ध्यानी न घेता प्रतिपादन झाल्यास ते सर्वग्राह्य बनत नाही. क्वचित्प्रसंगी विचारकाच्या बुद्धीचीच झेप मर्यादित असल्यामुळे तो त्या नवविचाराच्या गाभ्यापर्यंत/पोचण्यास असमर्थ ठरतो व त्यामुळे त्याच्या प्रतिपादनात अपक्वता जाणवते. क्षेमेन्द्रप्रणीत औचित्यसिद्धान्ताचाही काहीसा असाच प्रकार झाला आहे. क्षेमेन्द्राला औचित्य हे काव्याचे जीवित होय, ते

१. Kṣemendra Studies, 1954, p. 73, 2. तत्रैव, p. 77.

रसादींचेही नियामक असते ह्या नवविचाराचे स्फुरण झाले व त्याबद्दल तो अभिनंदनास पात्र आहे. परंतु त्याला आपल्या प्रतिभेच्या नैसर्गिक मर्यादांमुळे ह्या नवविचाराचे पुरेसे परिपुष्ट विवेचन करता आले नाही. पण म्हणून क्षेमेन्द्राच्या ह्या नवसिद्धान्ताची मौलिकता मुळीसुद्धा उणावत नाही. किंबहुना ह्या सिद्धान्ताचे महत्त्व जाणवल्यामुळेच मम्मट, विश्वनाथ, हेमचन्द्र, जगन्नाथ इत्यादी क्षेमेन्द्रोत्तरकालीन साहित्यशास्त्रज्ञांनी आपापल्या ग्रंथांमधून कमी-अधिक प्रमाणात औचित्यचर्चा केलेली आढळते. संस्कृत साहित्यशास्त्रावरील शेवटचा अधिकारी ग्रंथकार जो जगन्नाथ त्याने तर 'अनौचित्यं तु रसभङ्गहेतुत्वात्परिहरणीयम्। भङ्गश्च पानकादिरसादौ [1]सिकतादिनिपातजनितेवारुन्तुदता। तच्च जातिदेशकालवर्णाश्रमवयोवस्थाप्रकृतिव्यवहारादेः प्रपञ्चजातस्य तस्य तस्य यल्लोकशास्त्रसिद्धमुचितद्रव्यगुणक्रियादि तद्भेदः।' (रा० ब० आठवलेकृत रसगंगाधराचा मराठी अनुवाद १९५८, पृ० १३०) असे अनौचित्याचे तात्त्विक निरूपण करून त्यानंतर जात्यादिगत अनौचित्याची उदाहरणेही दिलेली आढळतात. एवंच, क्षेमेन्द्रोत्तरकालीन ग्रंथकारांनाही औचित्यसिद्धान्ताची उपेक्षा करता आली नाही, ह्यातच त्या सिद्धान्ताची थोरवी सामावलेली आहे. तिचेच स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न करू.

(अ) इसवी सनाच्या प्रारंभापासून तो इ. स. १००० पर्यंतचा सहस्र वर्षांचा कालावधी संस्कृत साहित्याच्या वैभवाचा काळ होता असे त्या साहित्याचा इतिहास लक्षात घेता दिसून येते. ह्या काळात अश्वघोष, भास, कालिदास, शूद्रक, भवभूती, श्रीहर्ष, विशाखदत्त, राजशेखर, मुरारी, भारवी, माघ, कुमारदास, रत्नाकर प्रभृती थोर कवी व नाटककार होऊन गेले. त्यांच्या नाटकांचे प्रयोग उत्सवपर्वणीच्या प्रसंगी मोठ्या थाटामाटाने होत असत. ती नाटके पाहून, भामहाचा शब्द वापरून बोलावयाचे म्हणजे विद्वान, स्त्रिया, लहान मुले इत्यादी भिन्न रुचीच्या प्रेक्षकांचे समाराधन होत असे; प्रयोगविज्ञ विद्वानांचा परितोष होत असे. आज संस्कृत भाषेतल्या समस्त खाचाखोचा न जाणणाऱ्या प्रेक्षकवर्गासमोरही त्या नाटकांचे प्रयोग कसे रंगतात ते प्रसिद्धच आहे. अर्थात्, संस्कृतभाषा बोलीस्वरूपात प्रचारात असतानाच्या काळात ते नाट्यप्रयोग रसिकांची अंतःकरणे आनंदाने कशी उचंबळवून टाकीत

१. जगन्नाथ अनौचित्याला 'सिकता' (म्ह० वाळू, रेती) म्हणतो, क्षेमेन्द्र 'अनौचित्यरजसा' असा प्रयोग (कारिका १७-१८, अनुवाद पृ० ६२) करतो, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

असतील ह्याची सहज कल्पना करता येईल. जी गोष्ट नाटकांची तीच वरील कवींच्या महाकाव्यांचीही. आजदेखील रघुवंश, कुमारसंभव, मेघदूत किंवा किरातार्जुनीय इत्यादी काव्ये वाचताना रसिकांच्या चित्तवृत्ती उचंबळून येतात, शृंगारकरुणादी रसांची उत्कट प्रतीती येते. एवंच, संस्कृत साहित्याच्या उत्कर्ष-काळातील कवींच्या साहित्यकृती 'नित्यनूतन' स्वरूपाच्या आहेत. त्या तशा होण्यास त्यात्या कवींची नैसर्गिक विमल प्रतिभा जितकी कारणीभूत होती तित-काच त्यांचा अमंद अभियोगही कारणीभूत होता. महाकवीपासून तो मुक्तका-सारखी सुटी पण सरस श्लोकरचना करणारांपर्यंत सर्वच कवी रसविलास[1] साधणे हे आपले उद्दिष्ट मानीत असत. तो साधता यावा ह्यासाठी ते व्याकरण, धर्म-शास्त्र, शब्दकोश, छंदःशास्त्र, कामशास्त्र, इत्यादी नाना शास्त्रांचे कसून अध्ययन करीत, त्यामुळेच त्यांच्या काव्यातील निपातापासून तो वाक्यापर्यंतची सर्व रचना रेखीव व सुंदर होत असे. ती प्रसादादी गुणांनी मंडित व उपमादी विविध व रमणीय अलंकारांनी विनटलेली असे. काही कवी वैदर्भी रीतीचा आश्रय करून आपली काव्ये लिहीत तर इतर काही गौडी, पांचाली इत्यादी इतर रीतींना जवळ करीत असत. त्यांच्या काव्यादीत आढळणाऱ्या प्रसादादी गुणांची, उपमा-रूपकादी अलंकारांची, वैदर्भ्यादी रीतींची व शब्दनिष्ठ, अर्थनिष्ठ इत्यादी अनेक प्रकारच्या दोषांची चर्चा करणारे भामह-दण्डी-वामनप्रभृती साहित्यशास्त्रज्ञांचे ग्रंथ क्षेमेन्द्रपूर्वकाळात होऊन गेले. त्यांनी वरील काव्यांगाची सूक्ष्म छाननी केली, त्यांची लक्षणे बांधली, त्यांमधील तरतमभाव निश्चित केला. एकूण साहित्याचे शास्त्र सिद्ध केले व साहित्यासंबंधीचे विविध सिद्धान्तही मांडले. परंतु ह्या सर्व सिद्धान्तांना वा विचारसरणींना आपल्या पोटात सामावून घेऊन भामह-दण्डी-वामन-प्रभृतींनी चर्चिलेल्या काव्यांगांच्या प्रकाशात साहित्याचे प्रत्यक्ष मूल्यमापन करणारी विचारसरणी आविर्भूत होणे नितान्त आवश्यक होते. ती उणीव क्षेमेन्द्राच्या औचित्यसिद्धान्ताने भरून काढली. क्षेमेन्द्राला आनंद-वर्धनादींप्रमाणे कुशाग्रबुद्धी लाभली नसल्यामुळे औचित्यसिद्धान्त परिपूर्णपणे मांडण्यात यश आले नाही हे वर दाखविलेच आहे. तरीही त्या सिद्धान्ताचे अन्तःस्थ सामर्थ्य नाकारता येत नाही. तो सिद्धान्त संस्कृत साहित्याच्या विका-सातील योग्य काळात आविर्भूत झाला. किंबहुना त्याचे प्रणयन करण्यात क्षेमेन्द्राने कालौचित्यच दाखविले ! औचित्यसिद्धान्त म्हणजे रसिकांच्या व

१. 'अयमेव हि महाकवेर्मुख्यो व्यापारो यद् रसादीन् एव मुख्यतया काव्यार्थीकृत्य··· ।' ध्वन्यालोक, पृ. ४९३

समीक्षकांच्या हाती पडलेला एक विश्वसनीय निकष आहे. तो काव्याच्या मूल्य-मापनाचा एक उत्तम मानदण्ड आहे. त्याच्या साह्याने आपल्याला काव्यातील नामे, सर्वनामे, क्रियापदे, विशेषणे, अव्यये, गुण, अलंकार, रस, रीती, तत्त्वे इत्यादि सर्व अंगांचे साधार व सप्रमाण परीक्षण करता येते. प्रत्येक अंगाचा पात्र, प्रसंग, भावना इत्यादी सर्व घटक लक्षात घेऊन परामर्श घेता येतो; अमुक एक शब्द वा गुण योग्य स्थानी पडला आहे की नाही, असल्यास का व नसल्यास का नाही त्याची विचिकित्सा करता येते. औचित्यसिद्धान्त रसांनाही आपल्या कक्षेत बांधून टाकीत असल्यामुळे काव्यातील रसोल्लास उत्कटतेने साधला गेला आहे किंवा नाही, हेही ठरविता येते; एवढेच नव्हे तर रसविलासात कोठे दोष उत्पन्न झाला असेल तर तो का झाला आहे व त्याचा परिहार कसा करावयाचा तेही साहित्यशास्त्राची सिद्ध परिभाषा वापरून सांगता येते. एवंच, औचित्यतत्त्व म्हणजे दण्डी-वामन-प्रभृतींनी प्रणीत केलेल्या तात्त्विक सिद्धान्तांना प्रत्यक्ष व्यवहारात लागू करून काव्याच्या सौंदर्यासौंदर्याचा निर्णय करण्याची व असुंदरतेचा परिहार करण्याची एक विश्वसनीय कसोटी होय. अशा प्रकारे क्षेमेन्द्राने काव्यशास्त्ररूपी दर्शनाला व्यवहाराच्या पातळीवर आणून सोडले, ही त्याची अतिशय मौलिक कामगिरी आहे. येथे एका गोष्टीचा खुलासा करणे आवश्यक आहे. ती गोष्ट ही की, औचित्यतत्त्वाच्या साह्याने काव्याचा साकल्याने विचार करून रसाच्याही परिपोषापरिपोषाचा साधार निर्णय करता येत असला तरी डॉ॰ सूर्यकान्त[१] समजतात त्याप्रमाणे रस किती प्रमाणात पुष्ट झाला आहे, ते ठरविता येत नाही. कारण रस हा एकघन असतो त्यामुळे त्याला extent वगैरे शब्द लागू पडत नाहीत.

(आ) औचित्यसिद्धान्ताच्या साह्याने कवी व समीक्षक ह्यांमधील तेढ कमी करता येतं हा त्याचा दुसरा मोठा गुण होय. वस्तुतः, कवी व समीक्षक ह्यांमध्ये शत्रुत्व असण्याचे कारणच नाही. वर एके ठिकाणी दाखवून दिल्याप्रमाणे दोघांची साहित्यसामग्री भिन्न असली तरी कार्यपद्धती एकरूप व परस्परपूरकच असते. सहृदय, चिकित्सक व शास्त्रसंस्कारसंपन्न समीक्षकाकडून कवीला आपल्या उणिवा जाणून घेता येतात. अशा प्रकारे समीक्षकाचे कार्य कवीच्या

१. "We can measure the extent to which 'flavour' is present in a particular verse by assessing the propriety in each part of it. Thus, we can know the extent to which 'flavour' has been developed"—Kṣemendra Studies, 1954, p. 38

कार्याइतकेच महत्त्वाचे असले तरी समीक्षक व कवी ह्यांचे संबंध अहि-नकुलवत् असतात. असे संबंध प्राचीन काळीही होते असे राजशेखराच्या पुढील उद्गारांवरून वाटते—"ते च द्विधाऽरोचकिनः, सतृणाभ्यवहारिणश्च' इति मङ्गलः।··· 'चतुर्धा' इति यायावरीयः मत्सरिणस्तत्त्वाभिनिवेशिनश्च । ···मत्सरिणस्तु प्रतिभातमपि न प्रतिभातं, परगुणेषु वाचंयमत्वात् । स पुनरमत्सरी ज्ञाता च विरलः । ···तत्त्वाभिनिवेशी तु मध्येसहस्रं यदि एकः··· ।" (काव्यमीमांसा, चतुर्थ-अध्याय) एवंच, अरसिकतेमुळे किंवा मत्सरामुळे कवीच्या गुणांचे योग्य कौतुक न झाल्यामुळे कवी व समीक्षक यांमध्ये जे वितुष्ट पूर्वी निर्माण होत असे व आजही होते ते दूर सारण्यास औचित्यसिद्धान्त साह्यभूत ठरतो. कारण समीक्षकाने एकदा ही औचित्यशलाका आपल्या हातात घेतली की, त्याला आपल्या वैयक्तिक आवडीनिवडी, ग्रहपूर्वग्रह, खासगी मते बाजूला सारावीच लागतात आणि ह्या सिद्धान्ताने घालून दिलेल्या दंडकांच्या प्रकाशात वस्तुनिष्ठपणे काव्य-निर्णय करून योग्य ते श्रेय कवीला देणे प्राप्त ठरते. एवंच, काव्यमूल्यमापनाला विधायक वळण लागते.

(इ) औचित्यतत्त्वाच्या साह्याने क्षेमेन्द्राने अनेक श्लोकांची समीक्षा केली आहे व ती बऱ्याच अंशी सफलही झाली आहे. अशी समीक्षा सहृदय रसिकाच्या सौंदर्यास्वादाच्या शिक्षणास नकळत कारणीभूत होते हा औचित्यसिद्धान्ताचा तिसरा मोठा गुण होय. काव्य व त्यावरील समीक्षण वाचणारा रसिक स्वतः काव्य-निर्मितिक्षम नसला तरी काव्यास्वादलोलुप अवश्य असतो. काव्यरस चाखताना रसिकाची इतकी तंद्री लागते की, त्याची तहानभूकही हरपते. अशा रसिकाला काव्यातील गुण कसे ओळखावेत, दोष कसे समजून घ्यावेत याचे शिक्षण मिळाल्यास त्याच्या काव्यास्वादात उत्तरोत्तर अधिक मर्मग्राहित्व येऊ शकेल; तो अधिक सहृदयतेने पण चोखंदळपणे काव्यरसपान करू शकेल. औचित्यसिद्धान्त रसिकाची अशी मानसिक तयारी करवून घेऊन विदग्ध रसिक निर्मू शकतो.

येथवर विवेचिलेल्या त्रिगुणात औचित्यसिद्धान्ताचा मोठेपणा सामावलेला आहे. तथापी, ज्या संस्कृत साहित्यिकांसाठी ह्या सिद्धान्ताचे प्रणयन झाले त्यांनी ह्याच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. क्षेमेन्द्रोत्तर काव्यशास्त्रज्ञांनीही ह्या सिद्धान्ताचे अन्तःस्थ मोल (intrisic value) जाणून घेण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे इ.सनाच्या अकराव्या शतकापासून अत्यंत कृत्रिम, नीरस व रटाळ अशी साहित्यरचना संस्कृत भाषेत होऊ लागली आणि रुय्यकापासून रसगंगा-धरपर्यंतच्या शास्त्रज्ञांनी गुणालंकारदोषांची तीचतीच चर्वितचर्वणा करीत

बसण्यात कालापव्यय केला. साहित्यिक व साहित्यशास्त्रज्ञ ह्या उभयतांनी औचित्यसिद्धान्ताचे खरे महत्त्व ओळखले असते तर एकीकडे संस्कृत भाषेत सरस, सामोद व सुन्दर काव्यकुसुमे अविरतपणे फुलत राहिली असती व दुसरीकडे प्रगल्भ काव्यसमीक्षाशास्त्र विकसित होत राहून त्यामधूनच भारतीय सौंदर्यशास्त्र साकार झाले असते. पण हे व्हावयाचे नव्हते. हीच संस्कृत साहित्याची व साहित्यशास्त्राची शोकांतिका आहे !

१०. औचित्यसिद्धान्ताची पुनर्व्यवस्था

सद्यःकालीन संस्कृत साहित्याचा विचार करण्याचे प्रयोजनच नाही. कारण आज कालिदास-भवभूतींच्या तोडीची तर सोडाच परंतु क्षेमेन्द्रोल्लिखित चन्द्रक, कार्पटिक यांच्या तोडीची काव्यरचना करणाराही कवी आढळून येणे मुश्कील आहे. त्यामुळे आपण आपल्यासमोर बहुमुखांनी व विपुल प्रमाणात येणाऱ्या मराठी वाङ्मयापुरताच विचार करणे इष्ट आहे. गद्य-पद्यनिरपेक्ष कोणत्याही ललित वाङ्मयकृतीची सशास्त्र, बिनचूक व वस्तुनिष्ठ समीक्षा करण्यास उपयुक्त, कलावंत व समीक्षक यांत समझोत्याचे व सौहार्दाचे वातावरण निर्मिण्यास सहायक व रसिकांच्या वाङ्मयीन अभिरुचीस इष्ट ते वळण लावून ती अधिक सूक्ष्म व चोखंदळ बनविण्यास उपकारक असा हा औचित्यसिद्धान्त चालू काळातही अत्युपादेय आहे. अर्थात् असे म्हणताच वावदूक उपहासाने हसतील आणि उसळून म्हणतील—"किती असमंजस धारणा आहे ही ! काय आज तुमचे भामह-रुद्रट-वामन साहित्यचर्चा करीत आहेत ? आज ती ऋषिकुळे व 'रम्य आश्रमपदे' कोठे दिसतात काय ? ती व्रतवैकल्ये, ते यज्ञयाग, उपासतापास, त्या श्रावण्या इत्यादी धार्मिक विधीत का आजचा समाज गुरफटून गेला आहे ? लोकजीवनाच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, राजनैतिक अशा सर्व अंगोपांगांमध्ये अन्तर्बाह्य बदल घडून आला आहे. जीवनाचे स्वरूप पूर्णपणे पालटले आहे. त्यात एक प्रकारची क्रान्ती घडून आली आहे. जीवनमूल्येच बदलल्यामुळे साहित्यविषयक अपेक्षाही बदलल्या आहेत. आजच्या वाचकाची अभिरुची भिन्न व त्यामुळे त्याचा साहित्यविचारही भिन्न आहे. साहित्याचेच परिवर्तन झालेले असल्यामुळे त्याच्या मूल्यांकनाचे निकषही पालटले आहेत. अशा स्थितीत भिन्न जीवनाची तृषा भागविण्यासाठी लिहिल्या गेलेल्या मुक्तके, परिकथा, खण्डकथा, महाकाव्य, नाटक, आख्यायिका इत्यादि भिन्न प्रकृतीच्या गद्यपद्यात्मक साहित्याच्या समीक्षेला साह्यभूत ठरणारा हा औचित्यसिद्धान्त आजच्या मराठी साहित्यालाही लागू पडतो असे म्हणणे केवळ

अप्रयोजकपणाचे आहे. तुमचा तो सर्वंकष साहित्यनिकष संस्कृत वाङ्मयापुरताच मर्यादित ठेवण्याची मेहेरबानी करा !"

वावदूकांच्या ह्या सरबत्तीने गांगरून जाण्याचे मुळीच कारण नाही. समाजजीवनात बदल झालेला नाही असे कोणीच म्हणत नाही. समाजमूल्ये व वाङ्मयीन मूल्ये यांचा परस्पराश्रयी संबंध असतो व त्यामुळे एकाचे मूल्यान्तर झाल्यावर दुसऱ्याचेही होणे अपरिहार्य आहे हेही नाकबूल करण्याचे कारण नाही. प्राचीन मराठी वाङ्मयाहून प्रचलित मराठी वाङ्मय आशय व आविष्कारपद्धती ह्या दोन्ही दृष्टींनी भिन्न आहे ही बाब उघड आहे. आज ते ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, मोरोपंत किंवा रामजोशी कोठे दिसत आहेत ? आजचा कोणता कवी महाभारत, रामायण, भागवत किंवा वेदान्त यांवर लेखणी झिजविताना दिसतो ? नरेन्द्राच्या रुक्मिणी-स्वयंवरासारखी किंवा भास्कराच्या शिशुपालवधासारखी संस्कृत महाकाव्यांवर आधारित महाकाव्ये कोठे लिहिली जात आहेत ? आज ओवी, अभंग इत्यादी छंदांची जागा मुक्तच्छंदाने घेतल्याचे स्पष्टपणे दिसत नाही काय ? इंग्रजी वाङ्मयाशी संपर्क आल्यापासून गद्य व पद्य यांमध्ये अनेक नवीन रचना-विन्यास रूढ झालेच आहेत की नाहीत ? पन्नास वर्षांपूर्वीच्या कादंबरीपेक्षा आजची कादंबरी, तंत्र व मंत्र ह्या दोन्ही दृष्टींनी अधिक लवचीक झाली आहे, हे नाकारता येणार नाही. कादंबरीसाठी निवडावयाचे विषय, त्यांची गुंफण, प्रकरणांची रचना, पात्रांचे स्वभावदर्शन, भाषाशैली इत्यादी कादंबरीच्या सर्व अंगोपांगांत नित्य परिवर्तने होत आहेत. आजच्या लघुकथेचे भावाभिव्यंजनेचे सामर्थ्य हरिभाऊकालीन लघुकथेच्या तुलनेने खूपच वाढले आहे. आजचा लघुनिबंध क्वचित् लघुकथेच्या तर क्वचित् उत्कृष्ट गद्य-काव्याच्या सीमारेषेवर वावरताना आढळतो. नाटकाच्या क्षेत्रात तर मराठी वाङ्मयाने किर्लोस्कर-देवलांच्या पारंपरिक नाटकांपासून सुरुवात करून आज 'न-नाट्या' पर्यंत मजल गाठली आहे ! एकंदरीने मराठी साहित्यात प्राचीन कालापासून आजपर्यंत अनेक परिवर्तने होत आली आहेत, होत आहेत व होत राहतीलही. कारण प्रो. भूषण ह्यांनी अन्वर्थकपणे म्हटल्याप्रमाणे, "Literature, like life, is not a flux but a growth, and growth implies new experiments, new experiences and new expressions."[१] वर दाखविलेच आहे की, आजच्या मराठी साहित्यातही साहित्यिक

१. The Moving Finger—(The Light from Heaven), 1945, P. xii.

नित्य नवे अनुभव घेत आहेत, त्यांच्या अभिव्यक्तीसाठी नवीन शब्दसंहती रूढ करू पाहात आहेत, साहित्य-रचनेचे नवीन प्रयोग करीत आहेत. अशा स्थितीत औचित्याचा हा आमचा जुना सिद्धान्त कसा काय लागू पडणार ? प्रो० भूषण तर स्पष्टपणे इशारा देतात, "And that which is new cannot be cast in old moulds. Since matter and form are inseparable, new (subject-) matter seeks the help of new forms."[१]

प्रो० भूषण यांचा युक्तिवाद पूर्णपणे पटण्यासारखाच आहे. तथापी, औचित्याचा प्राचीन सिद्धान्त जसाच्या तसा स्वीकारा असे कोणताच समंजस मनुष्य म्हणणार नाही. त्यात बदलत्या साहित्य-स्वरूपानुसार बदल करणे इष्ट व आवश्यक आहे, ह्याबद्दल दुमत नाही. ती पुनर्रचना कशी करावयाची त्याचे दिग्दर्शनमात्र करून ह्या प्रबंधाचा समारोप करावयाचा आहे. परंतु तत्पूर्वी एका मुद्याचा अवश्य विचार केला पाहिजे. त्याकडेच वळू या.

संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांनी मानलेल्या गुण, अलंकार, रीती ह्या तत्त्वांना फार तर सद्यःकालीन साहित्याच्या संदर्भात, जीर्ण व निरुपयोगी तत्त्वे असे म्हणता येईल. कारण आजच्या साहित्यिकाला उपमा-रूपक-उत्प्रेक्षा ह्या साध्या अलंकारांचाही फारसा सोस राहिलेला नाही. मग व्याजोक्ती, निपुण इत्यादी प्रयत्नसाध्य अलंकारांची गोष्टच बाजूला. आजच्या लेखकाचा कल सुगम, सुबोध व साधे लिहिण्याकडे आहे. आज कोणताही लेखक समासप्रचुर गद्य लिहिताना आढळत नाही. त्यामुळेच अल्पसमासा, मध्यमसमासा, दीर्घसमासा इत्यादी संघटनांचा विचार करण्याचे प्रयोजन आज उरलेले नाही. असे असले तरी काव्यातील वा ललित गद्यातील शब्दकळा रस-पात्र-प्रसंग यांना अनुरूप आहे की नाही, कादंबरीतील वर्णने प्रसंगानुकूल आहेत की नाहीत, कथेतील पात्रांचा स्वभाव-परिपोष योग्य प्रकारे झाला आहे किंवा नाही, विषयाचे प्रतिपादन समर्पकपणे झाले आहे की नाही, ह्या प्रश्नांची विवंचना आपण आजही अगत्याने करतो. आज सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक इत्यादी जीवनांगांत कितीही परिवर्तन घडून आले असले तरीही परीक्षणासाठी नागेशासारख्या एखाद्या प्राचीन कवीचे काव्ये समोर आले असता आपण, नागेशाने वर्णनांची योग्य मर्यादा राखलेली नाही, नागेश कथानकाचा प्रमाणाला सोडून विस्तार करतो, तो

१. The Moving Finger—1945, p xii.

वर्ण्यविषयासंबंधी तारतम्य दाखवीत नाही, इत्यादी आक्षेप अवश्य घेतो. हे आक्षेप म्हणजे उचितानुचिताचाच विचार नव्हे काय ? मुक्तेश्वराने महाभारतीय कथेच्या वर्णनात स्वकालीन स्थितीचे चित्रण केले आहे ही आपली तक्रारही मुक्तेश्वरकृत अनौचित्यालाच वाचा फोडीत नाही काय ? फडक्यांच्या कादंबऱ्यांत अनाठायी येणाऱ्या शृंगारिक वर्णनांवर आपण रुष्ट होत नाही काय ? खांडेकरांच्या कथा-कादंबऱ्यातील पात्र-प्रसंगाननुरूप अलंकारसृष्टी आपला विरस करीत नाही काय ? वा. म. जोशी यांच्या कादंबऱ्यातील चर्चा कितीही विचारप्रवर्तक असल्या तरी त्या कादंबऱ्यात शोभून दिसत नाहीत असे गाऱ्हाणे आपण गातोच ना ? डॉ. केतकरांच्या कादंबऱ्या म्हणजे समाजशास्त्रावरील प्रबंध होत, असा निर्वाळा देऊन आपण केतकरांची कादंबरीरचना कादंबरी ह्या वाङ्मयप्रकाराच्या कसोट्यांना उतरणारी नाही असेच सुचवीत नाही काय ? एवंच, आजच्या स्थित्यंतरित साहित्याच्या समीक्षण-परीक्षणातही आपण 'हे ह्याला अनुरूप आहे', 'हे वर्णन योग्य आहे', 'ही भाषा अमुक पात्राच्या तोंडी शोभून दिसत नाही', इत्यादी विवेक करतो. हाच औचित्य-विवेक होय. आजही आपण तो करतो ह्यावरूनच त्याची उपयुक्तता सिद्ध होत आहे. तात्पर्य, औचित्यसिद्धान्त संस्कृत साहित्यशास्त्रातील गुणालंकाररीतीप्रभृती सिद्धान्तांप्रमाणे टाकाऊ झालेला नाही, त्याची व्याप्ती केवळ संस्कृत साहित्यापुरती मर्यादित नाही. तो आजच्या साहित्यालाही लागू पडतो. ह्यावरून तो नित्यनूतन आहे हेच सिद्ध होते. आणि जे नित्यनूतन ते नूतन परिस्थितीतही स्वीकारार्ह ठरते.

वर म्हटलेच आहे की, संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांनी प्रणीत केलेला औचित्यसिद्धान्त स्वीकारार्ह असला तरी मूल-स्वरूपात स्वीकारता येत नाही. ज्या जीवनमूल्यांच्या परिवर्तनानंतरही त्या सिद्धान्ताची स्वीकारार्हता कायम टिकून आहे, त्या जीवनमूल्यांच्या परिवर्तनामुळेच त्याची पुनर्व्यवस्था करणे अगत्याचे होऊन बसते. क्षेमेन्द्राने पदादी औचित्यस्थानांच्या जोडीने सत्त्व, व्रत, सारसंग्रह इत्यादी औचित्यस्थानेही मानलेली आहेत. आजचा कादंबरीकारही पात्राच्या व्रताचा विचार करीत नाही, मग समीक्षकाने करणे दूरच राहिले. आजच्या साहित्यिकाला ग्रंथांती सारसंग्रहपर उक्ती देण्याची कल्पना हास्यास्पद वाटेल. तीच स्थिती आशीर्वचनाचीही. संस्कृत साहित्यिकाप्रमाणे आजच्याही साहित्यिकाचे माध्यम शब्द हेच असले तरी तो कर्तृ, कर्म इत्यादी कारकांची काळजी करीत बसत नाही. निपातविचाराचा तर प्रश्नच उद्भवत नाही. तात्पर्य,

संस्कृत साहित्याची प्रकृती भिन्न, त्यामुळे तन्निष्ठ औचित्यविचारही भिन्न. मराठी साहित्याची प्रकृती वेगळी असल्यामुळे तन्निष्ठ औचित्यविचारही वेगळा होणे अपरिहार्य व आवश्यक आहे. तोच कसा करता येणे शक्य आहे त्याची दिशा तेवढीच दाखविण्याचा येथे यत्न केला जात आहे—

(१) शब्द—साहित्यिक प्राचीन असो अथवा अर्वाचीन असो त्याला 'शब्द' हे माध्यम टाळता येत नाही. कारण साहित्य म्हणजेच मुळी शब्द व अर्थ यांचा यथावत् सहभाव (राजशेखर, काव्यमीमांसा, तृतीयोऽध्याय). मात्र कुन्तकाने म्हटल्याप्रमाणे साहित्यातील शब्द 'विशिष्ट' असतात. असे विशिष्ट शब्द वक्ता, त्याची भावना, प्रसंग, विषय, वाङ्मयप्रकार या सर्वांस अनुरूप आहेत की नाहीत ते पाहणे म्हणजे शब्दौचित्य-विचार करणे. आधुनिक वाङ्मयाच्या दृष्टीने 'शब्द' या संज्ञेत नामे, सर्वनामे, क्रियापदे, विशेषणे, क्रियाविशेषणे, व तिन्ही अव्यये या सर्वांचा समावेश करणे इष्ट.

(२) बन्ध—अनेक शब्दांचे मिळून वाक्य बनते. वाक्याच्या विन्यासाला कुन्तकाने वापरलेला 'बन्ध' शब्द अधिक उचित वाटतो (वक्रोक्तिजीवित १।२२). बन्धौचित्यात वाच्यार्थाच्या 'सौभाग्या'चा परिपोष झाला आहे की नाही, हे विचारात घ्यावयाचे. अर्थात्, वाक्याच्या व्याकरणशुद्धीपेक्षा काव्याच्या व्यापारशालित्वाकडे अधिक लक्ष द्यावयाचे. येथे पूर्वापर संदर्भ, भावना, प्रसंग, वर्ण्यविषय, वाङ्मयप्रकार यांचा विचार अवश्य करावयास हवा.

(३) गुण—संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांनी गुणसंख्येचा कडेलोट केला. आपण प्रसाद, ओज व माधुर्य एवढे तीनच गुण मानिले तरी पुरे आहेत. ध्वन्यालोककारांप्रमाणे प्रसाद हा गुण सर्व प्रकारच्या वाङ्मयविलासात अनिवार्य मानावा ('सर्वासु च संघटनासु प्रसादाख्यो गुणो व्यापी ।' ध्वन्यालोक-पृ. २७९). उद्भटाचा टीकाकार प्रतीहारेन्दुराज यानेही प्रसाद गुणाचा रसाभिव्यक्तीशी साक्षात् संबंध असतो असे प्रतिपादिले असल्याचे येथे लक्षात घ्यावे. (पाहा—उद्भटकृत काव्यालंकारसारसंग्रह, भांडारकर-संशोधन-मंदिर प्रत, १९२५, पृ. ८१). इतर दोन गुणांची तारतम्याने अवस्थिती पाहून औचित्यविवेक करावा.

(४) प्रतिमा—उपमारूपकादी अलंकारांची भाषा आजचे समीक्षाशास्त्र वापरत नाही. ह्या बाबतीत आपण पाश्चिमात्यांचे अनुकरण करीत आहोत. त्यांनी आपल्या साहित्यचिकित्सेत वापरलेले Image व Imagery हे शब्द आपण उचलले आहेत. रूढ शब्द हटविण्यापेक्षा आपल्या नवव्यवस्थेत

त्यांना सामावून घेणे चांगले. मात्र प्रतिमौचित्याच्या अन्तर्गत वाक्यगत नावीन्यपूर्ण व रमणीय कल्पनांच्या औचित्याचा तेवढाच विचार करावा. तात्पर्य, प्रतिमा शब्दाने प्राचीनांचे अलंकार व नवीनांच्या वाक्यमात्रनिष्ठ कल्पना एवढ्यांचेच ग्रहण करून त्यांचे पात्र-प्रसंग-रसादीदृष्ट्या औचित्य ठरवावे.

(५) **स्वभाव**—स्वभावदर्शन हा आजच्या साहित्याचा प्राण होय. क्षेमेन्द्रानेही स्वभावौचित्य विचारात घेतले आहे, परंतु त्याची ती सर्व चर्चा थिटी वाटते. आपण व्यक्तीची वृत्ती, व्यवसाय, वय, प्रदेश, काल, अवस्था इत्यादींच्या संदर्भात स्वभावौचित्यविवेक करावा.

(६) **भाव**—भाव शब्दाने रसाचेही ग्रहण करावे. संस्कृतातील रसाभास, भावाभास, रससंकर ही वितत व्यवस्था मानण्याचे कारण नाही. पण कविकृत भावाभिव्यंजना सर्व अंगांनी योग्य आहे किंवा नाही ह्याचा विचार अवश्य करावा.

(७) **काल**—कथानक, पात्रे, त्यांचे स्वभाव ह्या सर्वांचाच ऋतुमान, भूतादी कालत्रय व पौराणिक-ऐतिहासिक इत्यादी कालविशेष यांच्या संदर्भात औचित्यविवेक करावा.

(८) **देश**—आजच्या मराठी वाङ्मयाच्या कक्षा रुंदावत आहेत. साहित्याने 'सदाशिवपेठी' वेस केव्हाच ओलांडली आहे. तेव्हा महाराष्ट्रातील प्रदेशविशेष, भारतातील प्रांतविशेष, जगातील खंडविशेष येथील भूगोल, इतिहास, वातावरण, परंपरा इत्यादींना धरून वर्णन केले गेले आहे किंवा नाही,त्याची चिकित्सा करावी.

(९) **प्रतिभा**—पूर्वप्रसिद्ध कथानकाच्या निवडीत, त्याच्या पुनर्रचनेत, प्रसंगपात्र वैशिष्ट्यादींच्या कल्पनेत, नवीन विषय हुडकण्यात व सजीव करण्यात साहित्यिकाच्या नवनवोन्मेषशाली प्रतिभेचे दर्शन घडते की नाही, त्याचाविवेक करावा.

(१०) **जीवनमूल्य**—लेखकाचा जीवनविषयक दृष्टिकोण विधायक आहे की विघातक आहे, पुरोगामी आहे की प्रतिगामी आहे, त्याला कोणती तत्त्वे श्रद्धेयाश्रद्धेय वाटतात, ह्यांची विचिकित्सा ह्या सदरात करावी. तात्पर्य, लेखकाने घडविलेले जीवनदर्शन उचित आहे की अनुचित आहे, त्याचा परामर्श घ्यावा.

(११) **निबन्धन**—कादंबरी, कथा, नाटक इत्यादी विविध वाङ्मयप्रकारांच्या संकेतांचे, नियमांचे यथावत् पालन झाले आहे की नाही ते पाहावे. थोडक्यात अशी औचित्य-सिद्धान्ताच्या पुनर्व्यवस्थेची 'एकादशी' विद्वत्परामर्शार्थ येथे सादर केली आहे.

येथवर क्षेमेन्द्रप्रणीत औचित्यसिद्धान्ताची यथामती चिकित्सा केली. हा सर्वच विषय मराठी भाषेत पहिल्यांदाच मांडला जात आहे. सुरुवातीस क्षेमेन्द्राच्या चरित्राची त्रोटक रूपरेषा देऊन झाल्यावर मग त्याच्या ग्रंथावलीचा करून दिलेला परिचय मराठी वाचकांना आकर्षक वाटेल. त्यानंतर क्षेमेन्द्राच्या 'साहित्यशास्त्रा-'ची पुनर्रचना करण्याचा उपक्रम मराठीत तरी नवीन आहे. तो विद्वानांना विचारार्ह वाटेल अशी आशा आहे. त्यानंतर क्षेमेन्द्रकृत औचित्यविचारचर्चेचे यावच्छक्य दृष्टिकोणांतून केलेले परीक्षणही मराठी वाचकांपुढे प्रथमच प्रकट होत आहे. क्षेमेन्द्राची आनंदवर्धन व कुन्तक यांच्याशी तुलना करून 'औचित्यसिद्धान्ताला समर्थ पुरस्कर्ता लाभला नाही,' असा काढलेला निष्कर्षही स्वतंत्र आहे. शेवटी औचित्यसिद्धान्ताचा महिमा गाऊन त्याची सुचविलेली पुनर्व्यवस्था नावीन्यामुळे विचारकांच्या बुद्धीला निश्चितपणे खाद्य पुरवील. प्रबंधाला जोडलेला औचित्यविचारचर्चेचा सविवरण अनुवादही मराठीत प्रथमतःच प्रकाशित होत आहे.

औचित्यविचारचर्चेच्या संपादनाच्या कामी त्या ग्रंथाच्या पुढील संस्करणांचे अतिशय साहाय्य झाले आहे हे येथे कृतज्ञतापूर्वक नमूद करतो—(१) हरिदास संस्कृत ग्रंथमाला २५, वाराणसी, १९३३; (२) हरिहर प्रकाशन, वाराणसी, संवत् २०१७ व (३) मोतीलाल बनारसीदास प्रकाशन, पटना, १९६०.

माझे ज्येष्ठ स्नेही प्रा. डॉ. गजाननशास्त्री मुसळगांवकर यांनी औचित्यविचारचर्चेचा सविवरण अनुवाद वाचून पाहून काही सूचना केल्या, त्याबद्दल मी त्यांचा अतिशय ऋणी आहे. औचित्यसिद्धान्त हा प्रबंध मात्र ते काही कारणामुळे नजरेखालून घालू शकले नाहीत ह्याबद्दल चुटपूट वाटते.

संदर्भग्रंथांचा उल्लेख जागोजागी केलेला असल्यामुळे त्यांची वेगळी सूची दिली नाही.

गेले अनेक महिने क्षेमेन्द्राच्या सहवासात आनंदाने गेल्यामुळे त्याचे व प्रस्तुत ग्रंथ पूर्ण करविल्याबद्दल 'अच्युता'चे कृतज्ञतापूर्वक स्मरण करून लेखणीस विश्रांती देतो.

पुणे विद्यापीठाने प्रस्तुत ग्रंथाच्या प्रकाशन-खर्चाच्या पोटी ग्रंथकारास एक हजार रुपयांचे उदार अनुदान दिले. त्याबद्दल ग्रंथकार पुणे विद्यापीठाचा नितान्त ऋणी आहे.

वाराणसी, २९-९-१९६६. वा. के. लेले.

प्रमुख मुद्रणदोषांची दुरुस्ती

क्षेमेन्द्रप्रणीत औचित्यसिद्धान्त

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१५	१	पद्य	श्लोक
२७	१९	अनुट्टुप्	अनुष्टुप्
२७	२१	वृत	वृत्त
४४	१५	वृती	वृत्ती
४६	१०	बीमत्स	बीभत्स
४६	३१	श्रीचक्र (४७)	श्रीचक्र (७४)
६१	२	हाय	हा
६२	६	समावलेले	सामावलेले
६४	४	बामनाच्या	वामनाच्या
८०	१९	रुखरुखआ हे !	रुखरुख आहे !

क्षेमेन्द्रकृता औचित्यविचारचर्चा

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१८	२८	एकशे आठ	एकशे सहा
३२	२८	निर्मितिमादधति	निर्मितिमादधती
४३	८	घेण्यासखोर	घेण्यासारखे
६८	९	४७.	४८.
७०	१०	'दूसरा	'दुसरा
९०	९	भव्यत ।	भव्यता
९५	२९	विशेषणोचित्यं	विशेषणौचित्य
९९	१९	करिका	कारिका
१००	२५	कारिकांनी	कारकांनी
११९	७	कार्य ?	काय ?
१३९	७	वाराहवारेऽन्नया ।	वाराहवारेऽनया ।

क्षेमेन्द्रकृता

औचित्यविचारचर्चा

कृतारिवञ्चने दृष्टिर्येनाञ्जनमलीमसा ।
अच्युताय नमस्तस्मै परमौचित्यकारिणे ।। १ ।।

पाठभेद—क्षेमेन्द्रप्रतिबोधिता (ग्रन्थशीर्षक), कृता हि वञ्चने (मङ्गलाचरण).

सरलार्थ—शत्रूंची वंचना करताना ज्याने (आपली) दृष्टी काजळाने मलिन केली त्या, परमावधीचे औचित्य साधणाऱ्या, अच्युतास (विष्णूस) नमस्कार असो.

विवरण—औचित्य हे गुण, रीति, अलंकार, रस इत्यादींहून स्वतंत्र तत्त्व आहे, असा क्षेमेन्द्राचा महासिद्धान्त आहे. त्याचे मंडन करण्यासाठीच प्रस्तुत ग्रंथाची रचना झाली आहे. ग्रंथाच्या शीर्षकात विचार हा शब्द आला आहे. विचार करणे म्हणजे प्रमाणांच्या साह्याने एखाद्या तत्त्वाची पारख करणे (प्रमाणेन तत्त्वपरीक्षा विचारः ।). ह्यापुढील ग्रंथात क्षेमेन्द्राने औचित्य ह्या तत्त्वाची युक्तिवादांनी परीक्षा तर केली आहेच पण त्याशिवाय त्याने काव्यात औचित्य निर्माण करण्याचे उपायही सांगितले आहेत. त्यामुळे येथील विचार शब्दाला "युक्तिवाक्यैरनेकैश्च अप्रत्यक्षार्थसाधनः । अनेकोपायसंयुक्तो विचारः इति कीर्तितः ।।" हेच लक्षण[१] अधिक लागू पडते. तात्पर्य, एवंविशिष्ट औचित्य-विचाराची चर्चा ह्या ग्रंथात करण्यात आली आहे. येथील 'औचित्यविचार-चर्चा' हे शब्द वृत्तचर्चाविचार (सुवृत्ततिलक २।४६) ह्या शब्दांशी तुलनीय आहेत.

सर्वच आस्तिक ग्रंथकार अंगीकृत ग्रंथरचनाकार्य तडीस जावे व त्याच्या समाप्तीस अडथळा आणणाऱ्या विघ्नांचे निरसन व्हावे ह्यासाठी ग्रंथारंभी आपल्या अभीष्ट देवतेस नमन करतात. हे नमन मानसिक, कायिक व वाचिक असे

१. भिक्षु-गौरीशंकर-संगृहीतः 'सर्वतन्त्रसिद्धान्तपदार्थलक्षणसंग्रहः'--संवत् २००६, पृ० १७२

त्रिविध असते.[२] क्षेमेन्द्रही येथे त्याच परंपरागत प्रथेचे पालन करीत आहे. विष्णूने मोहिनीचे रूप धारण करून अमृताचा कलश पळविला व अशा प्रकारे अरींना म्हणजे असुरांना अमृतपानापासून वंचित केले ह्या पौराणिक कथेचा अरिवञ्चने शब्दाने निर्देश झाला आहे. मुळात निर्गुण असूनही जो मायेने नाना रूपे धारण करतो पण तरीही आपल्या मूळ रूपापासून च्युत होत नाही तो अच्युत अशी अच्युत शब्दाची व्युत्पत्ति आहे. अच्युत म्हणजे विष्णू. तो विश्वरूप असून त्यानेच विश्वातील सर्व वैचित्र्ये निर्माण केली आहेत, हीच त्याची परमोचित कृती. प्रस्तुत मंगलाचरणावरून क्षेमेन्द्र विष्णुभक्त होता हे स्पष्ट होते. त्याने आपल्या इतर काही ग्रंथांच्या सुरुवातीसही विष्णुस्तुतीच केलेली आढळते.[३]

प्रस्तुत मंगलाचरणांत 'औचित्य' ह्या ग्रंथगत मध्यवर्ती सिद्धान्ताचा कौशल्याने निर्देश करून क्षेमेन्द्राने जणू काही औचित्य हे तत्त्व विष्णूप्रमाणेच काव्याच्या विश्वात अनेक लहानमोठ्या रूपांनी वावरणारे, काव्यातील यच्चयावत् वैचित्र्यपूर्ण रचनांना सौंदर्य प्राप्त करून देणारे व काव्यरूपी लोक (जग) धारण करणारे आहे, असे सूचित केले आहे.

कृत्वापि काव्यालङ्कारां क्षेमेन्द्रः कविकर्णिकाम् ।
तत्कलङ्कं विवेकं च विधाय विबुधप्रियम् ॥ २ ॥
औचित्यस्य चमत्कारकारिणश्चारुचर्वणे ।
रसजीवित-भूतस्य विचारं कुरुतेऽधुना ॥ ३ ॥

सरलार्थ—(प्रस्तुत ग्रंथापूर्वी) काव्यातील अलंकारांचे (निरूपण करणारा) कविकर्णिका (नामक ग्रंथ) रचूनही आणि काव्याचे दोष (व) काव्याचे गुण यांचे विद्वानांना आवडलेले विवेचन करूनही (शब्दशः केल्यावर) आता (म्हणजे प्रस्तुत ग्रंथात) क्षेमेन्द्र, काव्याच्या सुन्दर आस्वादात चमत्कृती निर्माण

---

२. 'तन्मानसं वाचिकं च कायिकं चेत्यपि त्रिधा । समष्टिव्यष्टिरूपेण सर्वत्रास्ति इति केचन ॥'– लक्ष्मीपुर श्रीनिवासाचार्यप्रणीत 'मानमेयरहस्यश्लोकवार्तिकम्'––१९२५, पृ० ९

३. स्वच्छन्दलघुरूपाय त्रिजगद्गुरवे नमः ।
स्पष्टवामनवृत्ताय मायावक्राय चक्रिणे ॥ सुवृत्ततिलक १–२
अशेषविश्ववैचित्र्यरचनारुचये नमः ।
मायागहनगूढाय नानारूपाय विष्णवे ॥ दशावतारचरित १–१
जितं भगवता तेन हरिणा लोकधारिणा ।
अजेन विश्वरूपेण निर्गुणेन गुणात्मना ॥ रामायणमंजरी १–१

करणाऱ्या व रसाचे (ही) जीवित असलेल्या औचित्यतत्त्वाची युक्तिवाद व उपाय यांनी युक्त (अशी) परीक्षा करीत आहे.

विवरण—प्रस्तुत श्लोकयुग्म अनेक दृष्टींनी महत्त्वाचे आहे. येथे उल्लेखिलेला कविकर्णिका हा स्वतंत्र ग्रंथ होय असे नारायण राम आचार्य व डॉ० दे मानतात तर डॉ० काणे व डॉ० सूर्यकान्त या दोघांना ह्याबाबातीत शंका आहे.[४] हा स्वतंत्र ग्रंथ असलाच तर त्यात अलंकार, गुण व दोष या काव्यघटकांचे विवेचन असावे व ग्रंथाचे नांव कविकर्णिका असावे असे वाटते. कारण कविकण्ठाभरण व सुवृत्ततिलक ह्या ग्रंथानामांवरून ग्रंथशीर्षकही काव्यमय करण्याची क्षेमेन्द्राची वृत्ती स्पष्टपणे दिसते. श्लोक क्रमांक दोन-मधील अपि व विबुधप्रिय हे दोन्ही शब्द महत्त्वाचे आहेत. अलंकार, गुण व दोष ह्या प्रमुख काव्यांगांचे विद्वन्मान्य विवेचन करूनही क्षेमेन्द्राचे समाधान झाले नाही, त्याचा कविकर्णिका ग्रंथ प्रमाणग्रंथ होता, सदरहू काव्यांगे वरपांगी होत अशी त्याची धारणा होती व त्याला काव्यविषयक मूलभूत तत्त्वाची मीमांसा करावयाची होती एवढ्या गोष्टी उपर्युक्त दोन शब्दांनी सूचित झाल्या आहेत. ह्या मूलभूत तत्त्वाचा उल्लेख त्याने श्लोकांक तीनमध्ये केला आहे. क्षेमेन्द्राला काव्याच्या बाह्य अथवा शारीर सौंदर्याहून आन्तरिक अथवा भावात्मक सौंदर्याचें महत्त्व अधिक वाटत होते हे त्याने वापरलेल्या 'चारुचर्वणे' शब्दावरून स्पष्ट होते. ('चर्वण' शब्दाचा उपयोग त्याने कविकंठाभरण २/४ मध्येही केला आहे.) काव्य ही केवळ शोभेची वस्तू नसून ती आस्वाद्य, सजीव कलाकृती होय, हा क्षेमेन्द्राचा दृष्टिकोण दिसतो. काव्यास्वादात औचित्यामुळे चमत्कृती उत्पन्न होते. क्षेमेन्द्राच्या मते ज्यात चमत्कार नाही ते

४. (अ) सुभाषितरत्नभाण्डागारम्—निर्णयसागर, १९५२, Abbreviations & Sources, पृ० १

(आ) S. K. De—History of Sanskrit Poetics, 1960, Vol. I, p. 132.

(इ) P. V. Kane—History of Sanskrit Poetics, 1961, p. 265

(ई) Sūryakānta—Kṣemendra Studies, 1954, Chapter I, p. 26

(उ) E. V. V. Rāghavāchārya & D. G. Padhye—Minor Works of Kṣemendra, 1961, Introduction. p. 11.

काव्य नाही व ज्याला चमत्कार निर्मिता येत नाही तो कवी नाही.[५] तसेच काव्यात अनिवार्य असलेला हा चमत्कार दशविध असतो.[६] औचित्य केवळ चमत्कृती निर्माण करते असे नाही तर ते रसाचेही जीवित अथवा मूळ आहे. अशा प्रकारे क्षेमेन्द्राला एक स्वतंत्र सिद्धान्त प्रतीत झाला व त्याच्या सविस्तर विवरणासाठीच त्याने प्रस्तुत ग्रंथाचा प्रपंच थाटला. म्हणूनच तो आपल्या ग्रंथाला 'नवौचित्यविचारचर्चाम्' (ग्रंथसमाप्तिपर श्लोक, क्रमांक २) म्हणतो. शास्त्रीय ग्रंथ अनुष्टुप् वृत्तात रचावे असा नियम तो आपल्या सुवृत्ततिलक ग्रंथात[७] सांगतो. त्याचे त्याने प्रस्तुत ग्रंथात काटेकोरपणे पालन केले आहे, हेही एक वैशिष्टय ध्यानात घेण्याजोगे आहे. ग्रंथरचनेची येथे दृग्गोचर होणारी शिस्त क्षेमेन्द्राच्या सर्वच ग्रंथांत आढळून येते. वरील श्लोकांक तीनशी सुवृत्त-तिलकातील १/५ ह्या श्लोकाची तुलना करून पाहावी.

काव्यस्यालमलङ्कारैः किं मिथ्यागणितैर्गुणैः ।
यस्य जीवितमौचित्यं विचिन्त्यापि न दृश्यते ॥ ४ ॥

सरलार्थ—ज्या काव्यात जीवतस्वरूप औचित्याचे दर्शन विशेष विचार करूनसुद्धा घडत नाही त्या काव्याचे अलंकार व्यर्थ होत आणि त्याच्या गुणांची व्यर्थ गणना तरी काय करावयाची ?

विवरण—औचित्य हे रस, अलंकार व गुण ह्यांहून पृथक् तत्त्व आहे ही क्षेमेन्द्राची भूमिका येथे अधिक स्पष्ट झाली आहे. अलंकारांवाचून काव्याला शोभा नाही (भामह–काव्यालंकार १।१३), तसेच काव्यात शब्दालंकार व अर्थालंकार हे दोन्ही इष्ट आहेत (तत्रैव १।१५); रीती हा काव्याचा आत्मा होय (वामन-काव्यालंकारसूत्रे १.२.६); रस हेच काव्याचे जीवित होय (अग्निपुराण ३३६.३३ व राजशेखरकृत काव्यमीमांसा-तृतीय अध्याय); काव्याचा आत्मा ध्वनी होय (ध्वन्यालोक १।१) आणि वक्रोक्ती हे काव्याचे जीवित होय (वक्रोक्तिजीवित १.२७) ह्या काव्याच्या आत्म्याविषयीच्या सर्व विचारसरणी

५. नहि चमत्कारविरहितस्य कवेः कवित्वं, काव्यस्य वा काव्यत्वम् ।'—कविकंठाभरण–तृतीय संधी

६. तत्र दशविधश्चमत्कारः-अविचारितरमणीयः, विचार्यमाणरमणीयः, समस्तसूक्तव्यापी, सूक्तैकदेशदृश्यः, शब्दगतः, अर्थगतः, शब्दार्थगतः, अलंकारगतः, रसगतः, प्रख्यात-वृत्तिगतश्च ॥' तत्रैव

७. शास्त्रं कुर्यात् प्रयत्नेन प्रसन्नार्थमनुष्टुभा ।
येन सर्वोपकाराय याति सुस्पष्टसेतुताम् ॥ सुवृत्ततिलक ३–६

क्षेमेन्द्रपूर्वकाळात निर्माण झाल्या होत्या, त्यांपैकी काही दृढमूल झाल्या होत्या व त्या सर्व क्षेमेन्द्राला अवगत होत्या. तरीही त्यांपैकी एकसुद्धा मान्य न करता क्षेमेन्द्र औचित्य हेच काव्याचे जीवित होय हा आपला सिद्धान्त पुनः-पुन्हा उल्लेखितो यावरून त्याला नवतत्त्वाचे प्रणयन करावयाचे होते हे स्पष्ट होते. क्षेमेन्द्रपूर्वकालीन भामह, भट्टि, दण्डी, वामन रुद्रट इत्यादी सर्वच ग्रंथकार 'अलंकार काव्याची शोभा वाढवतात' असेच सर्वसामान्यपणे मानतात. ते अलंकारांचा काव्य-जीविताच्या संदर्भात विचार करीत नाहीत. ह्याबाबतीत थोडीशी सूक्ष्मता वामनाच्या काव्यालंकारसूत्रात आढळते. त्याच्या मते गुण काव्याची शोभा निर्माण करतात तर अलंकार ती वाढवतात. (तदतिशय-हेतवस्त्वलंकाराः ॥ ३.१.२) परंतु, अलंकारांना काव्यात गुणनिरपेक्ष स्थान-नाही; केवळ अलंकार काव्यात सौंदर्य उत्पन्न करू शकत नाहीत. असा अमळ तात्त्विक विचार वामनाने केला आहे, परंतु तो रीतिपंथी असल्यामुळे त्याने रीतीचा महिमा गायिला आहे. 'मिथ्यागणितैर्गुणैः' ह्या शब्दांनी क्षेमेन्द्राने पूर्वसूरींच्या विचारसरणीवर टीका केलेली आहे. भामहाने प्रसाद, ओज व माधुर्य हे तीनच गुण मानिले (काव्यालंकार २-१ ते ३), तर दण्डीने प्रसादादी दहा गुणांची वैदर्भी रीतीचे 'प्राण' म्हणून गणना केली (काव्यादर्श १ ४१.४२). वामनाने आपल्या काव्यालंकारसूत्राच्या तृतीयाध्यायात दहा शब्दगुण व तेवढेच अर्थगुण मानून त्यांचे निरूपण केले. भामहादींची ही समस्त गुणपरिगणना क्षेमेन्द्राला निष्प्रयोजन वाटते. कारण त्याच्या दृष्टीने रस, अलंकार, गुण ही सर्वच काव्यांगे औचित्य-परतंत्र असतात. औचित्याविना अलंकार नाहीत, गुण नाहीत, इतकेच नव्हे तर रसही नाही, ही त्याची ठाम भूमिका आहे. म्हणूनच तो येथे तसेच कविकंठाभरणातही अलंकार-गुणादींचा विस्ताराने विचार करीत नाही. कविकंठाभरणात त्याने शब्दवैमल्य, अर्थवैमल्य व रसवैमल्य असे तीन काव्यगुण सांगितले तरी आहेत (चतुर्थ संधि) पण अलंकारांचे प्रकारभेद मुळीसुद्धा सांगितलेले नाहीत. त्याची ही एतद्विषयक उदासीनता व मितभाषिता औचित्य-तत्त्वावरील त्याच्या अनन्यनिष्ठेचीच द्योतक आहे. प्रस्तुत श्लोकात आणखीही दोन महत्त्वाच्या गोष्टी स्पष्टपणे प्रतीत होतात. त्यापैकी एक म्हणजे औचित्य हा अलंकारही नाही वा गुणही नाही, हे क्षेमेन्द्राने सुस्पष्ट केले आहे दुसरी गोष्ट म्हणजे काव्यगत औचित्य हेरण्यास विशेष विचार करावा लागत नाही. मनुष्य जीवंत आहे की मृत आहे हे जसे एका दृष्टिक्षेपात कळते, त्याप्रमाणेच काव्य सजीव आहे की निर्जीव आहे (औचित्यसहित आहे की औचित्यरहित आहे) ते चटकन

लक्षात येते. खेरीज, ज्या जीवित शब्दाच्या साह्याने वामनादींनी आपापली मते मांडली, त्याच जीवित शब्दाच्या उपयोगाने क्षेमेन्द्रही आपले मत मांडतो.

अलङ्कारास्त्वलङ्काराः गुणा एव गुणाः सदा ।
औचित्यं रससिद्धस्य स्थिरं काव्यस्य जीवितम् ॥ ५ ॥

सरलार्थ—अलंकार तर अलंकारच (दागिनेच) असतात आणि गुण नेहमी गुणच राहतात. (परंतु) औचित्य हे रससिद्ध काव्याचे स्थिर जीवित होय.

विवरण—वर म्हटलेच आहे की, काव्यातील अलंकार व गुण यांमध्ये तात्त्विक भेद करण्याचा प्रयत्न वामनाने केला आहे. त्याच्या मते गुण हे काव्यात सौंदर्य निर्माण करणारे धर्म (काव्यालंकारसूत्रे ३.१.१) असून ते नित्य असतात (तत्रैव ३.१.३). शिवाय ते सहृदयांना प्रतीत होत असल्यामुळे तुच्छ नसतात (तत्रैव ३.१.२६), गुणविषयक प्रतीती निष्कंप असल्यामुळे गुण भ्रान्त होत असेही म्हणता येत नाही (तत्रैव ३.१.२७), शिवाय ते सर्वत्र दिसत नसल्यामुळे त्यांना पाठधर्मही म्हणता येत नाही (तत्रैव ३.१.२८). एवंच काव्यात गुण अपरिहार्य होत, ते अलंकारनिरपेक्षपणेदेखील काव्यशोभा साधतात. अलंकार हे गुणनिर्मित सौंदर्य वाढवणारे असून ते गुणसापेक्ष असतात. अतएव ते अनित्य असतात. (तत्रैव ३.१.१-२). वामनाचे हे सर्व विवेचन डोळयांसमोर ठेवूनच जणू काही क्षेमेन्द्राने प्रस्तुत कारिका लिहिली आहे. त्याच्या दृष्टीने अलंकार हे कितीही सौंदर्याधायक असले तरी सरतेशेवटी ते बाह्य धर्म होत, गुणही तसेच. म्हणजे अलंकार व गुण हे अस्थिर होत. त्यामुळे अर्थातच त्यांचा काव्याच्या जीवित-पदवीवर हक्क पोचत नाही. तो मान केवळ औचित्यालाच प्राप्त होतो. क्षेमेन्द्राने जणू औचित्य व अलंकारगुण त्या दोहोंतील फरकच येथे विशद केला आहे. तो असा की, काव्यात पूर्वोक्त तत्त्व अवश्य, न चुकता असते, मग उत्तरोक्त तत्त्वे असोत अथवा नसोत. रसांनी काव्य सिद्ध होत असते व असे काव्य प्रसिद्धी पावते हे क्षेमेन्द्राला अमान्य नाही. तथापी, अशा काव्याचेही प्राणतत्त्व औचित्यच होय हा त्याचा दृढ दृष्टिकोण आहे. अशा प्रकारे औचित्याचा आपला नवसिद्धान्त विमर्शकांच्या गळी उतरावा ह्यासाठी तो त्याचा पुनःपुन्हा साभिप्राय उच्चार करीत आहे, ही बाब दुर्लक्ष करण्यासारखी नाही.

परस्परोपकारक—रुचिरशब्दार्थरूपस्य काव्यस्योपमोत्प्रेक्षादयो ये प्रचुरालङ्कारास्ते कटककुण्डलकेयूरहारादिवदलङ्कारा एव, बाह्यशोभा-

हेतुत्वात्। येऽपि काव्यगुणाः केचन तल्लक्षविचक्षणैः समाम्नातास्तेऽपि श्रुतसत्यशीलादिवद्गुणा एव, आहार्यत्वात्। औचित्यं त्वग्रे वक्ष्यमाण-लक्षणं, स्थिरमविनश्वरं जीवितं काव्यस्य, तेन विनास्य गुणालंकारयुक्त-स्यापि निर्जीवत्वात्। रसेन शृङ्गारादिना सिद्धस्य प्रसिद्धस्य काव्यस्य धातुवादरससिद्धस्येव तज्जीवितं स्थिरमित्यर्थः॥ कारिका–५

पाठभेद—तत् स्थिरं जीवितम् (शेवटची ओळ).

सरलार्थ—एकमेकांना उपकारक (असणाऱ्या) रमणीय शब्द व अर्थ ह्यांच्या (साहित्य) स्वरूपी काव्याचे उपमा, उत्प्रेक्षा इत्यादि जे अनेक अलंकार असतात ते (केवळ) बाह्य सौंदर्यास (सौंदर्यनिर्मितीस) कारणीभूत होत असल्यामुळे सोन्याची कंकणे, कर्णभूषणे, सलकडी, माळ इत्यादी (शरीरावरील दागिन्यांप्रमाणे केवळ) अलंकारच असतात. (पुनः) त्याचे (काव्याचे) लक्षण जाणणाऱ्या विद्वानांनी जे काव्यगुणदेखील विवेचिले आहेत तेदेखील उपार्जित असल्यामुळे (मनुष्याच्या अंगच्या) विद्याभ्यास, सत्यप्रियता, शीलसंपन्नता इत्यादी (गुणांप्रमाणे) गुणच होत. तथापि, ज्याची व्याख्या पुढे सांगितली जाणार आहे ते औचित्य काव्याचे स्थिर (व) अविनाशी जीवित होय, कारण त्याचे वाचून गुण व अलंकार यांनी परिपूर्ण असणारे काव्यही निर्जीव ठरते. ज्याप्रमाणे रसायनांनी परिपुष्ट व्यक्तीचे जीवन स्थिर असते त्याप्रमाणे शृंगारादी रसांनी सिद्ध (झाल्यामुळे) प्रसिद्धी पावलेल्या काव्याचे ते (औचित्य) चिरस्थायी जीवित होय, हा अभिप्राय.

विवरण—वरील पांचव्या कारिकेवरील ह्या गद्यवृत्तीत क्षेमेन्द्राने आपले मत निःसंदिग्धपणे मांडून दृढ केले आहे. काव्यातील शब्द व अर्थ वाच्य-वाचकसंबंधाने एकमेकांना उपकारक असून काव्य रमणीय शब्द व रमणीय अर्थ ह्यांच्या साहित्याचे बनलेले असते हे क्षेमेन्द्राला मान्य असल्याचे येथे स्पष्ट झाले आहे. (क्षेमेन्द्राची उक्ती कुन्तकाच्या वक्रोक्तिजीवित १.१६ शी तुलनीय आहे.) क्षेमेन्द्रपूर्व प्रमुख ग्रंथकारांपैकी भामहाने त्रेचाळीस, भट्टीने अडतीस, दंडीनेही तितक्याच, उद्भटाने एकेचाळीस, वामनाने छत्तीस व रुद्रटाने अडुसष्ट शब्दार्थालंकारांचे निरूपण केलेले आढळते. क्षेमेन्द्राने उपमा, उत्प्रेक्षा इत्यादी दोन-तीन अलंकारांचाच उल्लेख केलेला दिसून येतो, त्यामुळे त्याला किती अलंकार मान्य होते ते कळावयास साधन नाही. तथापी, अलं-कारांचे संदर्भात क्षेमेन्द्राने वापरलेली कटककुण्डलांची भाषा इतरही काही ग्रंथकार वापरतात. उदाहरणार्थ, भामह (काव्यालंकार १.७) इतरांचे मत

म्हणून उद्धृत करतो की, 'रूपकादिमलंकारं बाह्यं आचक्षते परे।'. रुद्रटाच्या काव्यालंकाराचा टीकाकार नमिसाधू १२/२ ह्या श्लोकावरील टीकेत म्हणतो— "काव्यस्य हि शब्दार्थौ शरीरम्। तस्य च वक्रोक्तिवास्तवादयः कटककुण्डलादय इव कृत्रिमा अलंकाराः।"[८] मम्मटवचनही ह्याच आशयाचे आहे. (पाहा— हारादिवदलङ्कारास्तेनुप्रासोपमादयः॥ काव्यप्रकाश ८.२). वामन अलंकारांना अनित्य व गुणांना नित्य मानतो, ह्याविषयीचा उल्लेख वर आलाच आहे. क्षेमेन्द्र दोहोंना अनित्यच मानतो व त्यामुळे त्याच्या दृष्टीने काव्यगुण हे सत्यप्रियता, ज्ञान इत्यादी मानवी गुणांप्रमाणे परिश्रमांनी मिळविलेले अर्थात् आगंतुक होत, त्यामुळे ते असले तर काव्य सजीव होते असे नाही किंवा ते नसले तर त्यायोगे काव्य निर्जीव होते असेही नाही. काव्याचा जिवंतपणा औचित्यावर अवलंबून असतो ही क्षेमेन्द्राची विचारधारा आहे. औचित्य हेच काव्यातील अचल चैतन्य व त्याचेमुळेच काव्याला अचल प्रतिष्ठा प्राप्त होते.

उक्तार्थस्यैव विशेषमाह—

उचितस्थानविन्यासादलंकृतिरलंकृतिः।
औचित्यादच्युता नित्यं भवन्त्येव गुणा गुणाः॥ ६॥

अलङ्कृतिरुचितस्थानविन्यासादलङ्कर्तुं क्षमा भवति, अन्यथा त्वलंकृतिव्यपदेशमेव न लभते। तद्वदौचित्यादपरिच्युता गुणाः गुणतामासादयन्ति, अन्यथा पुनरगुणा एव॥

यदाह—

१. कण्ठे मेखलया नितम्बफलके तारेण हारेण वा
पाणौ नूपुरबन्धनेन चरणे केयूरपाशेन वा।
शौर्येण प्रणते रिपौ करुणया नायान्ति के हास्यताम्
औचित्येन विना रुचिं प्रतनुते नालंकृतिर्नो गुणाः॥ ६॥

सरलार्थ—सांगितलेल्या अर्थाचेच (अभिप्रायाचेच) वैशिष्ट्य सांगतात— योग्य जागी घातला गेल्यामुळेच अलंकार अलंकार ठरतो. (तसेच) ज्यांमधील औचित्य ढळलेले नसते असे गुणच नेहमी गुण ठरतात. ॥ ६ ॥

दागिना योग्य जागी घातल्याने (शरीर) सुशोभित करण्यास समर्थ होतो, नाहीतर त्यास अलंकार हे नामाभिधानच प्राप्त होत नाही. तद्वत्

८. काव्यमाला क्रमांक २, १९२८, पृ. १५०.

औचित्यापासून भ्रष्ट न झालेल्या गुणांनाच गुणीपणा प्राप्त होतो, नाहून ते अगुणच ठरतात.

जसे म्हटले आहे—

गळयात कमरपट्टा किंवा कमरेभोवती चकाकणारी माळ घालणारे, हातांत पैंजण बांधणारे वा पायांत सलकडी घालणारे, शरणागतापुढे शौर्याने वागणारे (आणि) शत्रूचे बाबतीत दीनवाणे वर्तन करणारे कोणते (महाभाग) हास्यास्पद होत नाहीत ? औचित्याविना अलंकार (काय) किंवा गुण (काय) रमणीयता प्रकट करीत नाहीत, (हेच खरे).

विवरण—अलंकार व गुण हे दोन्ही काव्यघटक औचित्यसापेक्ष आहेत हा वर सांगितलेला अभिप्रायच क्षेमेन्द्राने येथे थोडेसे विवेचन करून व एक उदाहरणपद्य देऊन अधिक बळकट केला आहे. उक्तार्थाचाच विशेष सांगण्यामागे आपला पंथ रसाचा नाही, अलंकारांचाही नाही अथवा गुणांचा (रीतींचा)-ही नाही, तर आपला पंथ ह्या सर्वांहून भिन्न आहे व तो म्हणजे औचित्याचा होय, हेच वाचकांच्या मनावर पक्केपणाने बिंबविण्याचा क्षेमेन्द्राचा हेतू आहे. संक्षेपाने क्षेमेन्द्राची भूमिका अशी—औचित्य नाही म्हणजे अलंकार नाही, औचित्य नाही म्हणजे गुण नाही, औचित्य नाही म्हणजे रस नाही व म्हणूनच औचित्य नाही म्हणजे काव्य नाही ! वरील 'परस्पर—' इत्यादी परिच्छेदात क्षेमेन्द्राच्या विवेचनकुशल, पांडित्यपूर्ण व निश्चयार्थप्रतिपादक शैलीचे दर्शन घडते तर प्रस्तुतच्या गद्य-वृत्तीमध्ये व पद्योदाहरणात त्याच्या शैलीच्या सुटसुटीतपणा व स्पष्टपणा या गुणांचे ईषद्दर्शन घडते. कण्ठे मेखलया इत्यादी श्लोक श्रीहर्षाचा होय असे डॉ० सूर्यकान्त[९] मानतात. ह्या श्लोकातील पहिल्या दोन चरणांचा अनुवाद करणारा एक श्लोक क्षेमेन्द्राच्या सुवृत्ततिलकात आढळतो, तो असा—'वृत्तरत्नावली कामादस्थाने विनिवेशिता ॥ कथयत्यज्ञतामेव मेखलेव गले कृता ॥" (३-१३). क्षेमेन्द्राचा कण्ठे इत्यादी श्लोक म्हणजे भरताच्या "अदेशजो हि वेषस्तु न शोभां जनयिष्यते । मेखलोरसि बन्धे च हास्याय एव उपजायते ॥" (नाट्यशास्त्र २३.६९) ह्या श्लोकाचे अनुकरण होय असे पं० बलदेव उपाध्याय[१०] म्हणतात. तथापि, तसे मानण्यास सबळ प्रमाण दिसत नाही. दोन भिन्न विचारवंतांच्या विचारांत साम्य असणे सहजशक्य आहे.

---

९. Kṣemendra Studies, 1954, Index, p. 210.

१०. भारतीय साहित्यशास्त्र, दूसरा भाग, २०१२ संवत, द्वितीय संस्करण, पृ० ४३.

किं तदौचित्यमित्याह—

उचितं प्राहुराचार्याः सदृशं किल यस्य तत् ।
उचितस्य च यो भावस्तदौचित्यं प्रचक्षते ॥ ७ ॥

यत्किल यस्यानुरूपं तदुचितमुच्यते, तस्य भावमौचित्यं कथयन्ति ॥७॥

सरलार्थ—ते औचित्य म्हणजे काय ते सांगतात—

ज्याला जे साजून दिसते त्यास आचार्य उचित म्हणतात. आणि उचिताचा जो भाव (धर्म) त्याला औचित्य म्हणतात. ॥ ७ ॥

ज्याला जे अनुरूप (असते) त्याला खरोखर उचित (असे) म्हणतात, त्याच्या भावाला (धर्माला) औचित्य म्हणतात. ॥ ७ ॥

विवरण—'औचित्य हे काव्याचे जीवित होय' ह्या आपल्या अभिनव सिद्धान्ताची युक्तिवाद व उदाहरण ह्यांच्या द्वारे प्रतिष्ठापना करून झाल्यावर आता क्षेमेन्द्र औचित्याच्या व्याख्येकडे वळला आहे. ज्याला जे शोभून दिसते ते त्याच्या बाबतीत उचित ठरते. काव्याच्या संदर्भात, उदाहरणार्थ, रस, पात्र, प्रसंग, विषय इत्यादींना साजेसे जे वर्णन ते उचित म्हणता येईल. क्षेमेन्द्राने 'प्राहुराचार्याः' असे म्हणून आपल्या ह्या नव्या सिद्धान्ताला पूर्वसूरींचा पाठिंबा आहे, किंबहुना औचित्यविचार ही एक सर्वथा मनःपूत अतएव परंपराहीन, निराधार अशी कल्पना नाही, हेच सूचित केले आहे. ध्वनिकारांनीही ध्वन्यालोकाच्या सुरुवातीस 'काव्यस्य आत्मा ध्वनिरिति बुधैर्यः समाम्नातपूर्वः ।' (१।१) असेच उद्गार काढून आपल्या नवसिद्धान्ताला पूर्वसूरींचे अनुमोदन असल्याचे सूचित केले आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. वस्तुतः औचित्यतत्त्वाचा सविस्तर प्रपंच क्षेमेन्द्रानेच प्रथम थाटला. तरीही तो जे वरील उद्गार काढतो ते त्याच्या विनम्रतेचेच द्योतक आहेत, असे लक्षात येते. जे. टी. शिप्लेने[११] ही आपल्या कोशात Propriety शब्दाचे Fitness, Suitability, Conformity with requirement, असेच अर्थ दिले आहेत.

अधुना सकलकाव्यशरीरजीवितभूतस्यौचित्यस्य प्राधान्येनोपलभ्यां स्थितिं दर्शयितुमाह—

पदे वाक्ये प्रबन्धार्थे गुणेऽलङ्करणे रसे ।
क्रियायां कारके लिङ्गे वचने च विशेषणे ॥ ८ ॥

११. Dictionary of World Literary Terms, 1955, P. 78-79.

उपसर्गे निपाते च काले देशे कुले व्रते ।
तत्त्वे सत्त्वेऽप्यभिप्राये स्वभावे सारसंग्रहे ॥ ९ ॥
प्रतिभायामवस्थायां विचारे नाम्न्यथाशिषि ।
काव्यस्याङ्गेषु च प्राहुरौचित्यं व्यापि जीवितम् ॥ १० ॥

एतेषु पदप्रभृतिषु स्थानेषु मर्मस्विव काव्यस्य सकलशरीरव्यापि जीवितमौचित्यं स्फुटत्वेन स्फुरदवभासते ।। ८-१० ॥

सरलार्थ—आता समग्र काव्यशरीराच्या जीवितस्वरूप औचित्याची प्रामुख्याने उपलब्ध होणारी स्थिती दाखवण्यासाठी म्हणतात—

(१) पद, (२) वाक्य, (३) प्रबन्धार्थ, (४) गुण, (५) अलंकार, (६) रस, (७) क्रिया, (८) कारक, (९) लिंग व (१०) वचन, (११) विशेषण, (१२) उपसर्ग व (१३) निपात, (१४) काल, (१५) देश, (१६) कुल, (१७) व्रत, (१८) तत्त्व, (१९) सत्त्व, (२०) अभिप्रायही, (२१) स्वभाव, (२२) सारसंग्रह, (२३) प्रतिभा, (२४) अवस्था, (२५) विचार, (२६) नाम, तदनंतर (२७) आशीर्वचन आणि (२८) काव्यांगे यांमध्ये व्याप्त असणाऱ्या चैतन्याला औचित्य म्हणतात ॥ ८-१० ॥

ज्याप्रमाणे (शरीरातील चैतन्य) मर्मस्थानांमध्ये स्पष्टपणे प्रतीत होते त्याप्रमाणे काव्याच्या समस्त शरीराला व्यापून असणारे चैतन्य-औचित्य ह्या पदप्रभृती स्थानांमध्ये स्पष्टपणाने सळसळताना भासमान होते.

विवरण—क्षेमेन्द्राने काव्याचा किती सूक्ष्मपणाने तसेच व्यापक बुद्धीने अभ्यास केला होता, ते येथे स्पष्ट होत आहे. पदप्रभृती औचित्य-उगमस्थानांना क्षेमेन्द्राने काव्यातील मर्मस्थाने म्हटले आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. ज्याप्रमाणे मनुष्य स्वशरीरातील मर्मस्थानांची (नाजूक भागांची) कसोशीने जपणूक करतो व त्यांना इजा पोचल्यास विव्हळू लागतो, त्याप्रमाणे सत्कवीने उपर्युक्त पदादी मर्मस्थानांची सौंदर्यदृष्ट्या जोपासना करावयाची असते. त्या मर्मस्थानांना अनौचित्याचा स्पर्श झाल्यास समस्त काव्यशरीर विकलार्त होऊन जाते. ह्यावरून काव्यशरीर औचित्याधिष्ठित असून ते एकघन, अखंड व सजीव असते, ही क्षेमेन्द्राची कल्पना स्पष्ट होते. पद-वाक्यादींना काव्यात एकैकशः तसेच संघशः निरतिशय महत्त्व असते हेच क्षेमेन्द्राला येथे प्रतिपादावयाचे आहे.

वरील तीन कारिकांचे आणखीही एका दृष्टीने महत्त्व ध्यानात घेण्याजोगे आहे. ती दृष्टी अशी—काव्यनाटकादींतून कवींनी त्रैगुण्योद्भव, नानारसात्मक

लोकचरित्राचे (सूक्तिमुक्तावलिः—१०९।७२) वर्णन केलेले असते. काव्यादीत लहान बालके, तरुण-तरुणी, वृद्ध स्त्री-पुरुष इत्यादींच्या जीवनातील वा जीवनाच्या विशिष्ट कालखंडातील हर्षामर्षाचे, भयविस्मयाचे, सुखदुःखांचे नानाविध, लहान-मोठे प्रसंग वर्णिलेले असतात. काव्यादींतील विविध पात्रे निरनिराळ्या वयांची, भिन्नभिन्न मनःप्रवृत्तींची, विभिन्न स्वभावांची, वेगवेगळ्या भाषा बोलणारी, विविध व्यवसाय करणारी, विभिन्न थरांतील असतात. थोडक्यात, त्यांच्यामध्ये साम्यापेक्षा वैषम्यच अधिक असते. त्यामुळे प्रत्येक पात्राचे बोलणे, वागणे, वावरणे, त्याचा स्वभाव इत्यादींचे यथावत् वर्णन कवीला करावे लागते. इतका साक्षेप बाळगून काव्य लिहिले गेले तरच ते रससंपोषक बनून सद्वेद्य होते. नाहीतर ते दोषांनी डागळून जाऊन सहृदयांच्या मर्जीतून उतरते. आपले काव्य सहृदयांच्या चित्तावर आरूढ व्हावे (दण्डीकृत काव्यादर्श १।७२), ते सर्वथा निर्दोष असावे व तद्गत सौंदर्यसंपत्तीने विदग्ध रसिकांना संतोष लाभावा (तत्रैव १।८०) ही महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या कवीला काव्यातील साध्या पदांची योजना करतानादेखील पदोपदी शतदा विचार करावा लागतो. आणि हा सर्व अभिप्राय मनात बाळगूनच क्षेमेन्द्राने वरील पदादी मर्मस्थानांचा उद्देश (पदार्थाचे केवळ नामनिर्देशन करणे) केला आहे. वरील यादीकडे बारकाईने लक्ष दिल्यास असे ध्यानात येते की, काव्यातील शब्द, त्यांची व्याकरणदृष्ट्या निर्दोष रूपे, त्यांमधून प्रकट होणारा सरळ वाक्यार्थ, समस्त प्रबंधगत अर्थ, काव्याची कलात्मक रचना, काव्यगत पात्रे, त्यांचे स्वभावदर्शन, काव्यातून घडणारे जीवनदर्शन, काव्यातील कल्पनाविलास इत्यादी सर्व काव्यांगांचा क्षेमेन्द्राने अत्यंत सूक्ष्म दृष्टीने परामर्श घेतला आहे.

प्रस्तुत यादीची आणखीही काही वैशिष्ट्ये ध्यानात घेण्यासारखी आहेत. औचित्य हे काव्याचे जीवित होय ह्या आपल्या नवसिद्धान्ताची जाणीव वाचकाच्या मनात सतत तेवत राहावी ह्यासाठी क्षेमेन्द्राने येथे 'सकलकाव्यशरीरजीवितभूतस्य औचित्यस्य' ही पदावली बुद्धिपुरस्सर वापरली आहे. दुसरी गोष्ट म्हणजे समस्त ग्रंथात प्रतिपादावयाच्या विषयाचा संपूर्ण आलेख क्षेमेन्द्राच्या डोळ्यांसमोर असल्याची जाणीव ह्या यादीवरून चांगल्या प्रकारे होते. क्षेमेन्द्राने आपल्या प्रियसिद्धान्ताचे चांगले मनन करून, त्याचे यच्चयावत् पैलू पूर्णपणे ध्यानात घेऊन व त्यांचा क्रम निश्चित करून मगच ग्रंथलेखनासाठी लेखणी हाती धरली आहे, हे स्पष्टपणे जाणवते. ह्यावरून क्षेमेन्द्राच्या बौद्धिक उंचीची तसेच शिस्तीची चांगली कल्पना येते. तिसरी गोष्ट जाणवते ती अशी की, क्षेमेन्द्राची ग्रंथरचनेची पद्धती पूर्णतया वैज्ञानिक स्वरूपाची आहे. शास्त्रग्रंथकार प्रथमतः वर्ण्य विषयांचा

केवळ नामोल्लेख करून त्यांचा वाचकांना परिचय करून देतात व मग क्रमशः त्यांचे लक्षणोदाहरणांसह विवेचन करतात. ह्या पद्धतीलाच न्यायवैशेषिक दर्शनात उद्देश-लक्षण-परीक्षा प्रवृत्ती असे म्हटले आहे. क्षेमेन्द्राने त्या पद्धतीचे काटेकोरपणे पालन केले आहे, हे पुढील ग्रंथावरून समजेलच.

मर्मस्थान पहिले—पद.

तेषूदाहरणानि क्रमेण दर्शयितुमाह—

तिलकं बिभ्रती सूक्तिर्भात्येकमुचितं पदम् ।
चन्द्राननेव कस्तूरीकृतं श्यामेव चान्दनम् ॥११॥

एकमेवोचितं पदं तिलकायमानं बिभ्राणा सूक्तिः समुचित-परभाग-शोभातिशयेन रुचिरतामावहति ।

सरलार्थ—त्यांमध्ये (म्हणजे पदप्रभृती मर्मस्थानांमध्ये स्पष्टपणे भासमान होणाऱ्या औचित्याची) उदाहरणे क्रमाक्रमाने दर्शविण्यासाठी म्हणतात—

एका समुचित पदाने युक्त (असणारे) सुन्दर वचन (काव्य) कस्तूरीचा (काळ्या रंगाचा) तिलक (भाळी) धारण करणाऱ्या चंद्रमुखीप्रमाणे (म्हणजे गौर वर्णाच्या सुंदर स्त्रीप्रमाणे) तसेच चन्दनाचा (शुभ्र रंगाचा) तिलक धारण करणाऱ्या सावळ्या वर्णाच्या सुंदरीप्रमाणे शोभून दिसते. ॥११॥

तिलकाप्रमाणे एकच उचित पद धारण करणारे सुन्दर वचन (स्वतःच्या) समुचितत्वामुळे (काव्याच्या) इतर भागांचे सौंदर्य वाढवून, रमणीयता प्राप्त करते.

विवरण—औचित्यविलासस्थानांच्या निरूपणास आता क्षेमेन्द्राने प्रारंभ केला आहे. त्याचे निरूपण किती रेखीव आहे त्याचा प्रत्यय ह्यापुढे येत जाईलच. प्रस्तुत कारिकेतही त्याने सुन्दर उपमाद्वय सन्निविष्ट केले आहे. जणू, आपण काव्याच्या शास्त्रावर लिहीत आहोत, त्यामुळे आपले शास्त्रीय विवेचनही काव्यमय झाले पाहिजे, अशी एक सूक्ष्म जाणीव क्षेमेन्द्राच्या मनात वावरत आहे. पद व तिलक हे दोन्ही नपुंसकलिंगी व सूक्ति आणि चन्द्रानना-श्यामा हे दोन्ही स्त्रीलिंगी शब्द निवडण्यातही त्याची सूक्ष्म सौंदर्यदृष्टीच दिसून येते. (ह्या सारख्या कारिकांमध्ये क्षेमेन्द्राचे हातून अनवधानाने काही विसंगती झाल्या आहेत, त्या यथास्थल दाखविण्यात येतीलच.) भाळावरील टिळा म्हणजे मुखावरील रंगसुंदर प्रसाधन ही कल्पना क्षेमेन्द्राने अन्यत्रही[१२]

---

१२. क्षेमेन्द्रेण सुशिष्याणां सरस्वत्याः प्रसाधनम् । सुवृत्ततिलकं वर्णरुचिरं क्रियते मुखे ॥ सुवृत्ततिलक १.४

मांडली आहे. तिलक, सूक्ति, शोभा, रुचिरता इत्यादी काही शब्द क्षेमेन्द्राला विशेष प्रिय असून त्यांचा त्याने आपल्या तिन्ही शास्त्रीय ग्रंथातून सर्रास प्रयोग केला आहे.

यथा परिमलस्य—

२. 'मग्नानि द्विषतां कुलानि समरे त्वत्खड्गधाराकुले
नाथाऽऽस्मिन्निति बन्दिवाचि बहुशो देव ! श्रुतायां पुरा ।
मुग्धा गुर्जरभूमिपालमहिषी प्रत्याशया पाथसः
कान्तारे चकिता विमुञ्चति मुहुः पत्युः कृपाणे दृशौ ॥'

अत्र मुग्धापदेनार्थौचित्यचमत्कारकारिणा सूक्तिः शरदिन्दुवदनेव श्यामतिलकेन श्यामेव शुभ्रविशेषकेण विभूषिता सकलकविकुलललामभूतां विच्छित्तिमातनोति ।

सरलार्थ—उदाहरणार्थ, परिमलाचा पुढील श्लोक—

"'महाराज, तुमच्या तरवारीच्या धारेमुळे (म्हणजे पराक्रमामुळे) क्षुब्ध झालेल्या ह्या रणभूमीमध्ये शत्रूंची कुले (म्हणजे समूह) निमग्न झाली," अशी भाटांनी केलेली स्तुति जिच्या नुकतीच पुनःपुन्हा (बहुशः, अनेकवार) कानांवर पडली होती ती गुजरातच्या राजाची भाबडी पट्टराणी अरण्यात (गेली असता) चकित होऊन, जलाच्या आशेने (आपल्या) पतीच्या तरवारीवर पुनः पुन्हा दृष्टिक्षेप टाकती झाली (तिने आपल्या पतीच्या तरवारीकडे पाण्याच्या आशेने पुनःपुन्हा पाहिले.)

ज्याप्रमाणे शरदृतूतील चंद्राप्रमाणे शुभ्र मुख असलेली सुंदरी सावळ्या रंगाच्या तिलकाने आणि सावळ्या रंगाची सुंदरी शुभ्र टिळ्याने शोभून दिसते त्याप्रमाणे येथे अर्थाच्या औचित्याचा चमत्कार (लावण्य) उत्पन्न करणाऱ्या मुग्धा (ह्या) पदाने खुलणारे हे सुवचन (म्हणजे प्रस्तुतचा श्लोक) समस्त कविकुळाला ललामभूत (भूषणभूत) होणारे सौंदर्य प्रसृत (प्रकट) करीत आहे.

विवरण—क्षेमेन्द्राची विवेचनपद्धती टापटिपीची अतएव आदर्श आहे. तो प्रथमतः औचित्याच्या मर्मस्थानाचे लक्षण देऊन, त्याचे थोडक्यात स्पष्टीकरण करून व मग परिमलाचा समुचित श्लोक देऊन त्यात औचित्याचा परिपोष का व कसा झाला आहे, ते विशद करून सांगतो. त्याच्या त्या विशदीकरणातही काव्यच्छटा आहेत ही बाब क्षेमेन्द्राची अभिजात रसिकताच प्रकट करते.

क्षेमेन्द्रोद्धृत पद्य काव्यदृष्ट्या सरस आहेच परंतु, त्याचे जे क्षेमेन्द्राने मुक्तकंठाने रसग्रहण केले आहे, त्यावरून त्याची मोकळी व निर्मत्सरी वृत्तीच दिसून येते. वाणीवर प्रभुत्व मिळविलेल्या कवीने दुसऱ्या कवींच्या सूक्तींचा संग्रह करावा (कविकंठाभरण २।१६) व दुसऱ्या कवीची स्तुति करावी (तत्रैव २।१३) हे जे दोन दंडक त्याने इतरांना सांगितले आहे त्यांचे तो स्वतःच येथे कसोशीने पालन करून इतरांना जणू उदाहरण घालून देत आहे. शिवाय क्षेमेन्द्राने इतर कवींची काव्ये किती सूक्ष्म दृष्टीने व रसिक अंतःकरणाने वाचली होती, त्याची साक्षही येथे पटते. ह्या परिमलाचा एक श्लोक क्षेमेन्द्राने सुवृत्ततिलकातही उद्धृत केला आहे.

न तु यथा धर्मकीर्तेः—

३. 'लावण्यद्रविणव्ययो न गणितः क्लेशो महान् स्वीकृतः
स्वच्छन्दस्य सुखं जनस्य वसतश्चिन्ताज्वरो निर्मितः ।
एषाऽपि स्वयमेव तुल्यरमणाभावाद् वराकी हता
कोऽर्थश्चेतसि वेधसा विनिहतस्तन्व्यास्तनुं तन्वता ।।'

अत्र 'तन्व्याः' इति पदं केवलं शब्दानुप्रासव्यसनितया निबद्धं, न कांचिदर्थौचित्यचमत्कारकणिकामाविष्करोति । 'सुन्दर्याः' इत्यत्र पदमनुरूपं स्यात् । अन्यानि वा निरतिशयरूपलावण्यव्यंजकानि । तन्वीपदं तु विरहविधुररमणीजने प्रयुक्तमर्थौचित्यशोभां जनयति ।।

पाठभेद—महानर्जितः (प्रथम पाद), स्वच्छन्दं (द्वितीय पाद), स्वगुणानुरूपरमणाभावाद् वराकी हता (तृतीय पाद), स्तन्वीमिमां तन्वता (चतुर्थ पाद).

सरलार्थ—परंतु, धर्मकीर्तीच्या पुढील श्लोकात (औचित्य) नाही—

(ब्रह्मदेवाने ह्या सुंदरीचे शरीर निर्माण करतेवेळी) लावण्यरूपी धनाचा अगणित खर्च केला, फार कष्ट सहन केले, स्वच्छन्दाने व सुखाने जगणाऱ्या लोकांसाठी चिंतेचा ताप निर्माण केला. पुनः ही हतभागिनीदेखील स्वतःच्या तोलामोलाचा (स्वतःच्या गुणांना व लावण्याला साजेसा) पती न लाभल्यामुळे आपल्या आपण मरून गेली. (ह्या) 'तन्वी' चे शरीर निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवाने मनात कोणते प्रयोजन बाळगले होते (कोणास ठाऊक) ?

येथील 'तन्व्याः' हे पद केवळ शब्दानुप्रासाच्या हव्यासाखातर वापरले गेले आहे. (ते) कणभर (ही) अर्थौचित्यचमत्कार प्रकट करीत नाही.

'सुन्दर्याः' हे पद येथे शोभून दिसले असते. अथवा, निरतिशय रूपलावण्याची अभिव्यक्ती करणारी इतर पदे (शोभून दिसली असती). परंतु, 'तन्वी' शब्द विरहार्त सुंदरीच्या बाबतीत वापरल्यास अर्थौचित्याचे सौंदर्य निर्माण करतो.

विवरण—टीकाकार क्षेमेन्द्राच्या अंगचे अनेक उज्ज्वल गुण येथे झळकतांना प्रतीत होतात. परिमलाचे पद्य उद्धृत करून त्याने विवेचनाचे अर्धवर्तुळ काढले आणि प्रस्तुतचा धर्मकीर्तीचा श्लोक उद्धृत करून त्याने त्या वर्तुळाला पूर्णता आणून दिली. क्षेमेन्द्राची सूक्ष्म दृष्टी काव्यातील तरल सौंदर्यस्थळे हुडकण्यात जितकी तरबेज आहे तितकीच ती प्रच्छन्न दोषस्थळे टिपण्यातही निष्णात आहे, ह्याचे प्रत्यंतर येथील विवेचनात येते. धर्मकीर्तीने शब्दानुप्रासाच्या नादी लागून तन्व्याः हा शब्द वापरला असे सांगून क्षेमेन्द्र नेमके मर्मावर बोट ठेवतो आणि अत्यंत स्पष्टपणे व निडरपणे प्रस्तुत काव्यात लवमात्र अर्थौचित्य नाही असे घोषित करतो. पण, क्षेमेन्द्र केवळ दोषदिग्दर्शन करून थांबत नाही. कारण टीकाकार क्षेमेन्द्राची वृत्ति विघातक नाही, ती विधायक आहे. म्हणूनच तो लगेच सुन्दर्याः हे पद शोभून दिसले असते, अशी सूचना करतो. अशा स्थळी, क्षेमेन्द्राच्या 'औचित्यविचारात' केवळ युक्तिवादांनी केलेली तत्त्वपरीक्षा नाही, तर युक्तिवादांना उपायांची जोड दिलेली आहे, अशी खात्री पटते. क्षेमेन्द्र टीकाकार असला तरी दुराग्रही नाही, त्यामुळे 'सुन्दर्याः हे पद सुचवून पुढे तत्काळ 'अन्यानि···' असा विकल्पही सांगून टाकतो. शेवटी विवेचनास प्रमाणभूतता लाभावी म्हणून 'तन्वीपद' कोणत्या संदर्भात औचित्यपोषक ठरते त्याचाही खुलासा करतो. एवंच, क्षेमेन्द्राने समालोचनात यत्किंचितही चालढकल केलेली नसल्याचे पाहून अतिशय समाधान होते. क्षेमेन्द्राचे हे संक्षिप्त पद्य-समालोचन होतकरू कवींबरोबरच रसिकांनाही खचित मार्गदर्शक ठरणारे आहे. शिवाय, ते उपयोजनी समीक्षेचा (Applied criticism) उत्कृष्ट मासला ठरण्याच्या योग्यतेचे आहे. [ध्वन्यालोककाराच्या मते प्रस्तुत श्लोकात अप्रस्तुतप्रशंसा अलंकार आहे. (ध्वन्यालोक ३।९७ वरील वृत्ती.)]

यथा श्रीहर्षस्य —

४. 'परिम्लानं पीनस्तनजघनसङ्गादुभयत-
स्तनोर्मध्यस्यान्तः परिमिलनमप्राप्य हरितम् ।
इदं व्यस्तन्यासं श्लथभुजलताक्षेपवलनैः
कृशाङ्ग्याः सन्तापं वदति बिसिनी-पत्र-शयनम् ॥'

[रत्नावली २.११]

अत्र सागरिकाया विरहावस्थासूचकं 'कृशाङ्ग्याः' इति पदं परममौचित्यं पुष्णाति ॥ ११ ॥

पाठभेद—नलिनीपत्रशयनम् (चतुर्थ पाद)

सरलार्थ—पुष्ट स्तन व नितंब यांच्या संपर्कामुळे दोन बाजूंकडे (उशा-पायथ्याशी) चुरगळलेले, दोन स्तनांच्या मधल्या भागाशी संबंध न आल्यामुळे हिरव्या रंगाचे, लतेसारखे सैल बाहू आपटणे व लोळणे यांच्या योगाने विस्कट-लेले हे 'कृशांगी' चे कमळाच्या पानांचे अंथरुण (तिची) प्रबळ मदनबाधा प्रकट करीत आहे.

येथील सागरिकेच्या विरहावस्थेचे सूचक (असे) 'कृशाङ्ग्याः' (सडसडीत स्त्री) हे पद परम औचित्याचा परिपोष करते.

विवरण—परिमल व धर्मकीर्ती यांची अनुक्रमे औचित्यपरिपोष व औचित्य-भंग यांची उदाहरणे दिल्यावर शेवटी प्रस्तुतचे श्रीहर्षाचे उदाहरण देऊन क्षेमेन्द्र आपल्या मुद्याला पीळ भरून तो वाचकांच्या मनात स्थिरपद करतो. क्षेमेन्द्र कविकंठाभरण व सुवृत्ततिलक ह्या ग्रंथांतही श्रीहर्षाचे प्रत्येकी एकेक पद्य उद्धृत करतो.

मर्मस्थान दुसरे–वाक्य

वाक्यगतमौचित्यं दर्शयितुमाह—

> **औचित्यरचितं वाक्यं सततं संमतं सताम् ।**
> **त्यागोदग्रमिवैश्वर्यं शीलोज्ज्वलमिव श्रुतम् ॥१२॥**

औचित्यरचितं वाक्यं काव्यविवेकविचक्षणानामभिमतम् ॥

पाठभेद—अभिमततमम् (गद्यवृत्ती)

सरलार्थ—वाक्यातील औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—त्यागामुळे उन्नत बनलेल्या ऐश्वर्याप्रमाणे (आणि) सच्चारित्र्यामुळे उज्ज्वल बनलेल्या ज्ञाना-प्रमाणे (विद्वत्तेप्रमाणे) औचित्याने रचिलेले वाक्य (म्हणजे औचित्ययुक्त काव्य) साहित्यशास्त्रज्ञांना नेहमी मान्य होते (आवडते).

काव्याच्या गुणदोष-विवेकात निष्णात (असलेल्या) पंडितांना औचित्य राखून रचिलेले काव्य अतिशय पसंत पडते.

विवरण—सहृदयांना प्रिय काव्यातील औचित्य म्हणजे ऐश्वर्याची शोभा वाढवणारा त्याग किंवा ज्ञानाला उजळा देणारे चारित्र्य, ह्या उपमा क्षेमेन्द्राची

एकूण सद्‌भिरुची व मानसिक सुसंस्कृतता दाखवून देतात. कारिकेतील सत् शब्दाची त्याने काव्यविवेकविचक्षण शब्दाने फोड केलेली पाहिली की, त्याच्या कविकंठाभरणातील 'कुर्वीत साहित्यविदः सकाशे……' (१-१५) इत्यादी पद्य स्मरते.

यथा मम विनयवल्ल्याम्—

५. 'देवो दयावान् विजयो जितात्मा यमौ मनःसंयममाननीयौ ।
इति ब्रुवाणः स्वभुजं प्रमार्ष्टि यः कीचकाकालिककालदण्डम् ॥
धीरः स किर्मीरजटासुरारिः कुबेरशौर्यप्रशमोपदेष्टा ।
दृष्टो हिडिम्बादयितः कुरूणां पर्यन्तरेखागणनाकृतान्तः ॥'

अत्र भीमस्य भीमचरितोचितकीचकाकालिककालदण्डहिडिम्बादयितादिभिः पदैरुन्निद्ररौद्ररसस्वरूपानुरूपो वाक्यार्थः सजीव इव अवभासते ॥

सरलार्थ—जसे माझ्या विनयवल्लीतील (ह्या श्लोकात औचित्य दिसते)—

"महाराज (युधिष्ठिर), आपण कनवाळू आहात, अर्जुन जितात्मा आहे, नकुळ व सहदेव (हे दोघे) मनःसंयमाचे आदर्श आहेत," असे म्हणणारा कीचकाचा अकाली कालदण्ड (यमदण्ड) झालेला जो आपला हात रगडू लागला तो, किर्मीराच्या जटांचा नाश करणारा, कुबेराच्या शौर्याला शान्तीचा उपदेश करणारा, हिडिम्बेचा प्रिय, धैर्यशाली भीम सैन्याच्या शेवटच्या कतारीची गणना करणाऱ्या कौरवांचा यम (असा) दिसला.

येथील कीचकाचा अकाली कालदंड, हिडिंबेचा प्रियकर इत्यादी शब्द भीमाच्या भीम (भयंकर) चरित्राला अनुरूप असून त्यांच्या योगे आविर्भूत होणाऱ्या रौद्ररसाच्या स्वरूपाला अनुरूप वाक्यार्थ सजीव झाल्यासारखा भासतो. (वाक्यार्थ जणू मूर्तिमंत झालासा भासतो.)

विवरण—वाक्यगत औचित्याच्या परिपोषाचे निदर्शक म्हणून स्वतःचेच पद्य येथे क्षेमेन्द्राने दिले आहे. त्याने आपल्या सर्वच तात्त्विक ग्रंथांमधून स्वतःची पद्ये विपुल प्रमाणात उदाहृत केली आहेत–उदाहरणार्थ कविकंठाभरणातील एकूण त्रेसष्ट उदाहरणपद्यांपैकी खुद्द क्षेमेन्द्राची अठ्ठावीस आहेत, तर सुवृत्ततिलकात एकूण पद्ये सत्याऐंशी असून त्यांपैकी सदतीस त्याची स्वतःची आहेत. प्रस्तुत ग्रंथातील एकूण एकशे आठ पद्यांपैकी पस्तीस क्षेमेन्द्राची आहेत. स्वतःची पद्ये उदाहरणादाखल उद्‌धृत करण्याची संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांची प्रथाच आहे. उदाहरणार्थ, भामह आपल्या काव्यालंकारात (२।९६) 'स्वयं

कृतैरेव निदर्शनैरियं मया प्रक्लृप्ता खलु वागलङ्कृतिः।' अशी प्रतिज्ञा करतो. दंडीनेही आपल्या काव्यादर्शात दोन-तीन पद्यांचा अपवाद वगळता बाकीची सर्व स्वरचित पद्ये उदाहृत केली आहेत. रुद्रटानेही हाच पंथ स्वीकारला आहे. उद्भटाने तर स्वतःच्याच 'कुमारसंभवम्' नामक महाकाव्यातील सुमारे पंचाण्णव श्लोक अलंकारसारसंग्रहात उद्धृत केले आहेत. क्षेमेन्द्रही ह्या प्राचीन परंपरेचे येथे परिपालन करीत आहे. शिवाय, त्याने कविकंठाभरणात होतकरू कवींना जो 'शतोपदेश' केला आहे त्यात तो एके ठिकाणी (२.२०) म्हणतो की, कवीने आपली स्वतःची स्तुती करू नये हे खरे, तथापी अगदीच लीनदीन असू नये हेही तितकेच खरे. होतकरूने आपले काव्य विवरण्यास नेहमी तत्पर असावे[13]. ह्या ठिकाणीही क्षेमेन्द्र नम्रतेनेच स्वतःच्या काव्याचे स्पष्टीकरण करीत आहे, हे लक्षात येईल.

यथा वा राजशेखरस्य—

६. 'सम्बन्धी पुरुभूभुजां मनसिजव्यापारदीक्षागुरु—
गौराङ्गीवदनोपमापरिचितस्तारावधूवल्लभः ।
सद्योमार्जितदाक्षिणात्यतरुणीदन्तावदातद्युति—
श्चन्द्रः सुन्दरि ! दृश्यतामयमितश्चण्डीशचूडामणिः ॥'

[बालरामायण १०·४१]

अत्रापि चन्द्रमसः शृङ्गारान्तरङ्गैरनङ्गोद्दीपनैः पदैर्निर्वर्तितो वाक्यार्थः सदर्थौचित्यसामर्थ्येनात्यर्थमर्थनीयतां प्राप्तः ॥

सरलार्थ—अथवा, उदाहरणार्थ राजशेखराच्या (ह्या पद्यात औचित्य आढळेल)—हे सुन्दरी, दुर्गेशाचा मुकुटमणि (झालेला) हा चन्द्र पाहा ! (हा) पुरुवंशीय राजांचा आप्त आहे, कामव्यापाराची (म्ह० कामविकाराची) दीक्षा देणारा गुरु आहे, गौरवर्णीय सुंदरींच्या वदनास ह्याची उपमा (दिली जात असल्यामुळे) परिचित आहे, तारारूपी वधूचा प्रियकर आहे (आणि) दाक्षिणात्य तरुणींच्या नुकत्याच घासलेल्या दातांच्या शुभ्र रंगासारखा आहे.

येथसुद्धा शृंगाररसाच्या अंतरंगीच्या, कामदेवाचे उद्दीपन करणाऱ्या, चंद्राच्या (विशेषणवाचक) शब्दांनी निष्पादिलेला वाक्यार्थ सुंदर अर्थौचित्याच्या सामर्थ्यामुळे अतिशय रमणीय झाला आहे.

टीप—ह्यापूर्वीच्या स्वतःच्या श्लोकाची प्रशंसा क्षेमेन्द्र मर्यादा राखून करतो,

१३. सदा स्वकाव्यव्याख्यानं वैरमत्सरवर्जनम् ॥ कविकंठाभरण २.१४.

पण राजशेखराच्या प्रस्तुतच्या पद्याची वाखाणणी करताना तो तरतमात्मक भाषा वापरतो, हा फरक उल्लेखनीय आहे. यात क्षेमेन्द्राची सुजनताच दिसून येते.

न तु यथास्यैव—

७. 'नाले शौर्यमहोत्पलस्य विपुले सेतौ समिद्वारिधेः
शश्वत्खड्गभुजंगचन्दनतरौ क्रीडोपधाने श्रियः।
आलाने जयकुञ्जरस्य सुदृशां कंदर्पदर्पे परम्
श्रीदुर्योधनदोष्णि विक्रमपरे लीनं जगन्नन्दतु ॥'

[प्रचंडपांडव २.११]

अत्रातिशयपरकर्कशसोत्कर्षसुभटभुजस्तम्भस्यासमुचितेन कुवलयनाल तुलाधिरोपणेन वाक्यार्थः सोपहासतयेव निबद्धः परिज्ञायते ॥ १२ ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ राजशेखराच्या (पुढील श्लोकात औचित्य) नाही.

श्रीदुर्योधनाच्या विक्रमपरायण बाहूंत अत्यंत लीन असलेले (बाहूंचा-आश्रय घेणारे) जग प्रसन्न राहो. (हे बाहू) शौर्यरूपी विशाल कमळाचे देठ आहेत, युद्धरूपी महासागरावरील बळकट (सुदीर्घ) सेतू आहेत, खड्गरूपी भुजंगाचे चिरंतन चन्दनतरू आहेत, लक्ष्मीच्या विलासाची भूमी आहेत, जयरूपी हत्तींचे खुंटे आहेत (आणि) सुंदरींच्या मदनविकाराचा दर्प आहेत.

येथे शत्रूंविषयीचा ज्याचा कठोरपणा शिगेला पोचलेला आहे अशा थोर योध्याच्या बाहुरूपी खांबांची कमलदेटांशी अयोग्य तुलना केलेली असल्याने प्रस्तुत वाक्यार्थ उपहास्यास्पद रीतीने रचिलासा प्रतीत होतो.

विवरण—राजशेखराचे पद्यद्वय उद्धृत करण्यात क्षेमेन्द्राचा चोखंदळपणाच दिसून येतो. एकेका वाक्याने त्याने त्या पद्यांचे जे रसग्रहण केले आहे त्यावरून त्याच्या अल्पाक्षर-अर्थगुरू भाषाशैलीचा चांगलाच परिचय होतो. क्षेमेन्द्र संस्कृत साहित्यशास्त्राच्या सिद्ध व प्रगल्भ परिभाषेचा प्रभुत्वाने उपयोग करताना दिसतो. ह्यावरून त्याची संस्कृत साहित्यशास्त्रात चांगलीच गती होती, हे उघड होते. दुसऱ्या श्लोकातील अनौचित्याचा आविष्कार करताना तो काव्यगत पात्राच्या स्वभावच्छटेचाही विचार करतो, ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे. शिवाय औचित्यपोष व औचित्यभंग ह्या दोन्ही प्रकारची उदाहरणे एकाच ग्रंथकाराची पद्ये उद्धृत करून देतो, हेही वैशिष्ट्यच होय. क्षेमेन्द्र सम्बन्धी इत्यादी श्लोकाबद्दल राजशेखरावर स्तुतिसुमने उधळतो पण नाले इत्यादी पद्याबद्दल राजशेखरावर परखडपणे टीका करावयासही मागेपुढे पाहात नाही.

मर्मस्थान तिसरे—प्रबन्धार्थ

प्रबन्धार्थौचित्यं दर्शयितुमाह :—

उचितार्थविशेषेण प्रबन्धार्थः प्रकाशते ।
गुणप्रभावभव्येन विभवेनेव सज्जनः ॥१३॥

अम्लानप्रतिभाप्रकर्षोत्प्रेक्षितेन सकलप्रबन्धार्थव्यापिपीयूषवर्षेण समुचितार्थविशेषेण महाकाव्यं स्फुरदिव चमत्कारकारितामापद्यते ॥

सरलार्थ—प्रबंधार्थातील औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे (एखादा) सज्जन मनुष्य गुणांच्या प्रभावामुळे भव्य (होणाऱ्या) वैभवाने प्रकाशमान होतो, त्याप्रमाणे समुचित वैशिष्ट्यपूर्ण अर्थाने प्रबन्धगत अर्थ प्रकाशित होतो. ॥ १३ ॥

तेजस्वी प्रतिभेच्या प्रकर्षाने कल्पिलेल्या, समस्त प्रबन्धाच्या अर्थाला व्यापणाऱ्या, अमृतवर्षी अशा समुचितार्थविशेषाने जणू लखलखणारे महाकाव्य चमत्कार (आल्हाद) कारकता प्राप्त करते.

विवरण—प्रबन्धगत विषय वैशिष्ट्यपूर्ण समुचित अर्थाने उजळून निघतो. असा वैशिष्ट्यपूर्ण उचितार्थ तजेलदार प्रतिभेच्या उत्कर्षामुळे स्फुरतो (सुचतो). असा उचितार्थ समस्त प्रबन्धविषयावर जणू अर्थामृताची (अर्थसौंदर्याची) वृष्टी करतो. अशा प्रतिभाकल्पित, सौंदर्यपूर्ण व उचित अर्थाने तळपणारे महाकाव्य आल्हाददायक होते. औचित्यपूर्ण अर्थविशेषाने प्रबन्धगत अर्थ (कथावस्तू) वैभवशाली बनतो, हा क्षेमेन्द्राचा भावार्थ. [प्रबन्ध, योग्य जागी योजिलेल्या निर्दोष व गुणपूर्ण सुन्दर वृत्तांनी, शोभतो असे क्षेमेन्द्राने सुवृत्ततिलकात (३।१) म्हटले आहे].

यथा कालिदासस्य—

८. 'जातं वंशे भुवनविदिते पुष्करावर्तकानां
जानामि त्वां प्रकृतिपुरुषं कामरूपं मघोनः ।
तेनार्थित्वं त्वयि विधिवशाद् दूरबन्धुर्गतोऽहं
याच्ञा मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा ॥'

[मेघदूत ६.]

अत्र अचेतनस्य चेतनाध्यारोपेण मेघस्य दौत्ययोग्यताधानाय प्रथितपुष्करावर्तकपर्जन्यवंश्यत्वममात्यप्रकृतिपुरुषत्वं च यदुपन्यस्तं तेन समस्त-

प्रबन्धस्याभिधानतोऽप्रेक्षितेतिवृत्तरुचिरतरस्य निरतिशयमौचित्यमुद्योतितम् ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, कालिदासाच्या (पुढील श्लोकात औचित्य आढळेल)

पुष्कर व आवर्तक ह्या श्रेष्ठ मेघांच्या त्रिभुवनविख्यात वंशात तू जन्मला आहेस, तू इंद्राचा प्रधान पुरुष (प्रधान अमात्य) असून इच्छेनुरूप शरीर धारण करतोस, हे मी जाणतो. तेव्हा दुर्दैवामुळे भार्येपासून वियुक्त झालेला मी तुझी प्रार्थना करीत आहे. गुणवंताला केलेली प्रार्थना विफळ झालेली बरी, (पण) नीचाला (केलेली प्रार्थना) सफल झालेलीही बरी नाही.

येथे अचेतनावर चेतनाचा आरोप करून मेघाच्या ठायी दूतकर्म करण्याची योग्यता निर्माण करण्यासाठी (योग्यता असल्याचे प्रतिपादण्यासाठी) मेघाचा पुष्कर व आवर्तक ह्या प्रसिद्ध वंशात जन्म झाल्याचे व तो प्रधान अमात्य असल्याचे जे वर्णिले आहे त्यायोगे सबंध प्रबंधाच्या अर्थद्वारे कल्पिलेले सुंदरतर कथावस्तूचे निरतिशय औचित्य प्रकट झाले आहे.

विवरण—मेघदूतातील ह्या प्रसिद्ध श्लोकावरील क्षेमेन्द्राची टीका आपल्यासमोर आहेच. मेघदूतावर अनेक[१४] प्राचीन टीकाकारांनीही टीका लिहिलेल्या आहेत. क्षेमेन्द्राच्या पृथगात्म विचारसरणीचे तसेच समीक्षाशैलीचे स्वरूप लक्षात यावे ह्यासाठी वरील श्लोकावरील स्थिरदेवाची (काळ ९वे ते ११वे शतक[१५]) व्याख्या[१६] उतरून घेऊ—

"जातं वंशे भुवनविदिते इत्यादि । यतस्त्वामहं एवंविधं जानामि अवबुध्ये । जातं उत्पन्नं वंशे अन्वये भुवनविदिते लोकविख्याते पुष्करावर्तकानां प्रलयकालजलदानां इति । अनेन आभिजात्यप्ररूपणम् । प्रकृतिपुरुषम् प्रकृतिश्चासौ पुरुषश्च तम् प्रधानपुरुषम् । कस्य । मघोनः पाकशासनस्य । तस्य मेघाः परिवार इति प्रसिद्धिः । कीदृशम् । कामरूपम् । वक्ष्यति च पुष्पमेघीकृतात्मेति । अमुना सामर्थ्यकथनम् । तेनार्थित्वं अर्थिभावं त्वयि गतः प्राप्तः । तदपि कस्मात् । दूरबन्धुः विप्रकृष्टभार्य इत्यर्थित्वकारणम् । स्वपौरुषापराधं निषेध्याभिधत्ते । विधिवशाद् दैवपारतन्त्र्यात् । अहं सारवान् कथमर्थी इत्याह । याच्ञा प्रार्थना मोघा निष्फलापि वरं अदैन्यकारिणी । कस्मिन् । अधिगुणे जात्याद्युत्कृष्टे । भिन्नलिङ्गे विशेषणं यथा वरं कूपशताद्वापी । न पुनरधमे निकृष्टे लब्धकामा प्राप्ता अभीष्टापि

१४ मेघदूतावर सुमारे ४० टीका हस्तलिखित स्वरूपात उपलब्ध आहेत, असे डॉ. वा. गो. परांजपे १९४१ सालच्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत पृ. ३० वर म्हणतात.

१५ तत्रैव.

१६ तत्रैव पृ. १०.

त्रपाकारित्वात्। ननु पूर्वमचेतनत्वदोषो यावदस्य निन्दा प्रस्तुता तस्यैव पुनर्जात्यादिभिः स्तुतिरिति दुर्निषेध्यः पूर्वापरविरोधः। समाधीयते। श्रुतिस्मृतिबहिर्भूतं यावत्सामान्यजनप्रवादमात्रमुररीकृत्य दूषणं प्रतिपादितमिदानीं चेहादिप्रतिपाद्यपदार्थत्वेन प्रशंसेति न दोषः। अर्थान्तरन्यासः।" क्षेमेन्द्राचा समकालीन स्थिरदेव श्रुतिस्मृतींना आवाहन करतो, क्षेमेन्द्र उत्प्रेक्षित-इतिवृत्तरुचिरतराची भाषा बोलतो. दोहोंतील फरक स्वतः स्पष्ट आहे. क्षेमेन्द्राचे सुवृत्ततिलक, कविकंठाभरण व औचित्यविचारचर्चा हे तीन शास्त्रीय ग्रंथ विचारात घेता असे दिसते की, त्याने एकूण एकसष्ट ग्रंथकारांच्या ग्रंथातील पद्ये उदाहरणादाखल अथवा तात्त्विक विवेचनाच्या पुष्ट्यर्थ उद्धृत केली आहेत. परंतु, ह्या एकसष्टांपैकी कालिदासावर त्याची विशेष भक्ती दिसते. यद्यपी त्याने तिन्ही ग्रंथांत मिळून कालिदासाची फक्त तेवीसच पद्ये उद्धृत केलेली असली तथापी कवित्वशक्तीच्या प्राप्तीसाटी प्रयत्न करणाऱ्या शिष्याला तो कालिदासाचे समस्त प्रबन्ध अभ्यासण्याचा उपदेश करतो[१७], ही बाब त्याची कालिदासप्रीतीच दर्शविते. प्रस्तुत म्हणजे तेराव्या कारिकेच्या गद्यवृत्तीत क्षेमेन्द्र महाकाव्य शब्दाचा प्रयोग करतो व उदाहरण देतो कालिदासाच्या मेघदूतातले. मेघदूत महाकाव्य म्हणून प्रसिद्ध नाही. तथापी, क्षेमेन्द्राच्या काळात मेघदूत हे खण्डकाव्य की महाकाव्य हा चर्चेचा विषय झाला असावा असे वाटते. कारण क्षेमेन्द्राप्रमाणेच वल्लभ व स्थिरदेव हे दोघे मेघदूताचे टीकाकारही मेघदूताला महाकाव्य मानतात.[१८] वल्लभ मेघदूताला केलिकाव्य म्हणतो, तर स्थिरदेव त्याला क्रीडाकाव्य मानतो.

यथा वा भवभूतेः—

(नेपथ्ये)

९. 'योऽयमश्वः पताकेयमथवा वीरघोषणा।
सप्तलोकैकवीरस्य दशकण्ठकुलद्विषः॥'

[उत्तररामचरित ४.२७]

लवः—(सगर्वमिव) अहो सन्तापनान्यक्षराणि। भो भोः! किमक्षत्रिया पृथिवी यदेवमुद्घुष्यते। (विहस्य) आः, किं नाम स्फुरन्ति शस्त्राणि। (धनुरारोपयन्)।

---

१७. पठेत्समस्तान्किल कालिदासकृतप्रबन्धानितिहासदर्शी॥ (कविकंठाभरण १.१९)

१८. डॉ परांजपे-संपादित मेघदूताची उपर्युल्लिखित आवृत्ती—प्रस्तावना-पृ. २९.

१०. 'ज्याजिह्वा बलयितोत्कटकोटिदंष्ट्र–
मुद्गारिघोरघनघर्घरघोषमेतत् ।
ग्रासप्रसक्तहसदन्तकवक्त्रयन्त्र–
जृम्भाविडम्बि विकटोदरमस्तु चापम् ॥'

[उत्तररामचरित ४.२९]

अत्रार्थे रामायणकथातिक्रमेण नूतनोत्प्रेक्षिता रामतनयस्य सहजविक्रमानुसारिणी शौर्योत्कर्षभूमिः परप्रतापस्पर्शासहिष्णुता प्रबन्धस्य रसबन्धुरामौचित्यच्छायां प्रयच्छति ॥

सरलार्थ—अथवा, उदाहरणार्थ, भवभूतीच्या (ह्या श्लोकात औचित्य आढळेल) (पडद्यात)—

सप्तलोकींच्या एकमात्र वीराचा ऊर्फ दशमुखा (रावणा) च्या कुलाच्या शत्रूचा हा जो अश्व किंवा ही पताका (अथवा) वीर घोषणा (आहे.)

लव—(जणू गर्वाने) छे:, हे शब्द (अक्षरशः ही अक्षरे) संतापजनक आहेत. अहो, पृथ्वी निःक्षत्रिय झाली असे समजून तर अशी घोषणा केली जात नाही ना ! (टर उडवण्यासाठी हसून), वा:, शस्त्रांना कसे स्फुरण चढले आहे ! (धनुष्य सज्ज करून)

प्रत्यंचारूपी जिभेच्या योगे बळकट (अथवा वलयाकार 'वलयित'), उत्कट कोटीच्या दाढेने युक्त, हा प्रचंड घनघोर आवाज करणारे हे धनुष्य हसत हसत घास खाणाऱ्या (मटकावणाऱ्या) यमाच्या तोंडाने दिलेल्या जांभईचे आपल्या उदराच्या साह्याने अनुकरण करीत आहे (शब्दशः अनुकरण करो.)

येथील अर्थामध्ये वाल्मीकि-रामायणाच्या कथेला सोडून (अतिक्रमण करून), रामाच्या मुलाच्या (लवाच्या) स्वाभाविक पराक्रमाला अनुसरून, शौर्याचा उत्कर्ष प्रकट करणारी, दुसऱ्याच्या पराक्रमाचा स्पर्श (ही) सहन न करणारी, (कविप्रतिभेने) नवीनशी कल्पिलेली (ही लवोक्ती) समस्त प्रबंधाला रससुंदर (असे) औचित्यलावण्य प्राप्त करून देते.

टीप—क्षेमेन्द्राच्या समालोचनावरून रामायणीय कथेचे क्षेमेन्द्रकृत सूक्ष्म अध्ययन जसे लक्षात येते तसेच काव्यनाटकादिगत पात्रांच्या स्वभावच्छटांशीही त्याचा सम्यक् परिचय होता हेही लक्षात येते. क्षेमेन्द्राने भवभूतीची स्तुति कशी मुक्तकंठाने केली आहे, ते पाहाण्यासारखे आहे.

न तु यथा राजशेखरस्य—

११. "रावणः—यत्पार्वतीहठकचग्रहणप्रवीणे
पाणौ स्थितं पुरभिदः शरदां सहस्रम् ।
गीर्वाणसारकणनिर्मितगात्रमत्र
तन्मैथिलीक्रयधनं धनुराविरस्तु ॥

[बालरामायण १.३९]

जनकः—आविरस्तु सममगर्भसंभवया सीतया ॥"

अत्र 'आविरस्तु समं सीतया' इति जनकराजेन यदुच्यते तेनास्य पिशिताशनाय तनयाप्रतिपादनमभिमतमिवोपलक्ष्यते । न चैतद्विद्मः कथं भक्ष्यभूता कुसुमकोमलाङ्गी पुरुषादाय प्रतिपाद्यते, इति अनौचित्येन प्रसिद्धेन वृत्तवैपरीत्यं परं हृदयविसंवादमादधाति ।

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, राजशेखराच्या (ह्या श्लोकात औचित्य) नाही.

रावण—पार्वतीच्या केसांचे हटपूर्वक ग्रहण करण्यात निपुण असलेल्या शंकराच्या हातात सहस्रो वर्षे असलेले, देवांच्या शक्तिकणांनी ज्याचे शरीर निर्माण झाले आहे असे आणि मैथिलीच्या खरेदीचे धन असलेले धनुष्य येथे आविर्भूत (प्रकट) होवो.

जनक · गर्भापासून उत्पन्न न झालेल्या सीतेसह आविर्भूत होवो.

येथे 'आविरस्तु समं सीतया' (सीतेसह प्रकट होवो) असे जनकराजाने जे म्हटले आहे त्यावरून त्याला मांसभक्षक रावणाला कन्यादान करणे संमत होते, असे वाटते. फुलासारखे कोमल शरीर असलेल्या भक्ष्यभूत, सीतेचे दान नरभक्षकाला (रावणाला) कसे केले जात आहे, ते आम्हांला समजत नाही. अशा प्रकारे प्रसिद्ध अनौचित्यामुळे घटनांचा विपर्यास होऊन तो मनाचा अत्यंत विरस करतो.

यथा वा कालिदासस्य—

१२. 'ऊरुमूलनखमार्गपङ्क्तिभिस्तत्क्षणं हृतविलोचनो हरः ।
वाससः प्रशिथिलस्य संयमं कुर्वतीं प्रियतमामवारयत् ॥'

[कुमारसंभव ८.८७]

अत्र अम्बिकासंभोगवर्णने पामरनारीसमुचितनिर्लज्जसज्जनखराजिविराजितोरुमूलहृतविलोचनत्वं त्रिलोचनस्य भगवतस्त्रिजगद्गुरोर्यदुक्तं तेनानौचित्यमेव परं प्रबन्धार्थः पुष्णाति ॥ १३ ॥

सरलार्थ—अथवा, उदाहरणार्थ, कालिदासाच्या (ह्या श्लोकात औचित्य नाही)

(पार्वतीच्या) मांडीवरील नखक्षतांच्या पंक्तींनी (अनेक नखक्षतांनी) शंकराचे नेत्र तत्काळ लुब्ध झाले (व त्याने) सैल झालेले वस्त्र सावरणाऱ्या प्रियतमेला अडविले (वस्त्र सावरू दिले नाही).

येथे (शंकर व) पार्वती यांच्या संभोगाचे वर्णन करताना त्रिभुवनांचा गुरु जो भगवान् शंकर त्याची दृष्टी नखक्षतावलीने अंकित (अशा) पार्वतीच्या मांड्यांवर खिळून गेल्याचे जे वर्णिले आहे (ती म्हणजे) निव्वळ निर्लज्जता होय. (असले वर्णन) सामान्य स्त्रियांना साजेसे आहे. ह्या वर्णनाच्या योगे प्रबन्धार्थ आत्यन्तिक अनौचित्यच परिपुष्ट करतो.

विवरण—प्रस्तुत श्लोक अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे. पहिली गोष्ट अशी की, क्षेमेन्द्राची कालिदासावर कितीही भक्ती असली तरी तो कालिदासकृत औचित्यभंगावर झणझणीत टीका करतो. येथील 'पामर''' इत्यादी शब्द क्षेमेन्द्राची कालिदासभक्ती आंधळी नसून विवेकाधिष्ठित आहे हेच दर्शवितात. दुसरी गोष्ट अशी की, कालिदासाने भगवान शंकर व जगन्माता पार्वती (जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ । रघुवंश १।१) या उदात्तचरित व्यक्तींच्या संभोगाचे सामान्य स्त्री-पुरुषांच्या संभोगाचे करावे तसे वर्णन केले आहे, म्हणून क्षेमेन्द्राने कालिदासाचा निषेध केला आहे. काव्यगत वर्णने पात्राचा दर्जा लक्षात घेऊन करावयास हवीत, असा क्षेमेन्द्राचा कटाक्ष दिसतो. तो आपल्या कविकंठाभरणातही (चतुर्थ संधि) 'भानुमत्या नकुलप्राणिस्वप्न-दर्शने पाण्डवनकुलस्वैरसङ्गमेर्ष्यासद्भावश्चक्रवर्तिमहिष्याः सामान्यनीचवनितावत्' असे म्हणून भट्टनारायणावर टीकेचे आसूड ओढतो. तेथही नाटककाराने भानु-मतीचा दर्जा लक्षात न घेता एखाद्या सामान्य नीच स्त्रीच्या संगमोत्सुकतेचे वर्णन करावे तसे वर्णन केल्याबद्दल तो नाटककाराला दोषी ठरवतो ह्यावरून क्षेमेन्द्र काव्यातील स्वभावदर्शनाला किती महत्त्व देतो ते स्पष्ट होते. सामान्य स्त्रीपुरुषांच्या संभोगादींचे वर्णन करूच नये असला सोवळेपणा क्षेमेन्द्राला कधीच अभिप्रेत नव्हता. कारण क्षेमेन्द्राची ती भूमिका असती तर त्याने 'चतुर्वर्गसंग्रहात' कामपुरुषार्थाचे बहारदार वर्णनही केले नसते आणि वेश्याव्यवसायावर आधारलेल्या 'समयमातृका'ही लिहिल्या नसत्या. जी पात्रे मुळातच नीचप्रवृत्तीची आहेत त्यांचे वर्णन करताना ग्राम्यता झाली तरी ती निषिद्ध नाही, पण जी पात्रे मुळात भव्योदात्तचरित आहेत त्यांचे वर्णन ग्राम्यतेने कलंकित होता कामा नये, ही क्षेमेन्द्राची दृष्टी आहे. क्षेमेन्द्राच्या

अन्तर्भेदी टीकादृष्टीचे कौतुक करताना डॉ. दे ह्यांनी काढलेले उद्गार ह्या संदर्भात उद्धृत करण्यासारखे आहेत. ते म्हणतात[१९]—"He takes even Kālidāsa to task against the authority of Ānandavardhana, for the vulgarity of canto VIII of the Kumārasambhava, which he considers improper to the particular conception of his great poem."

मर्मस्थान चवथे-गुण

गुणौचित्यं दर्शयितुमाह—

प्रस्तुतार्थोचितः काव्ये भव्यः सौभाग्यवान्गुणः ।
स्यन्दतीन्दुरिवानन्दं संभोगावसरोदितः ॥ १४ ॥

प्रस्तुतार्थस्यौचित्येनौजःप्रसादमाधुर्यसौकुमार्यादिलक्षणो गुणः काव्ये भव्यः सौभाग्यवत्तामवाप्तः सहृदयानन्दसन्दोहमिन्दुरिव स्यन्दति ॥

सरलार्थ—गुणाचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे संभोगसमयी उदयास आलेला चंद्र आनंद देतो (त्याप्रमाणे) काव्यातील प्रस्तुत अर्थाला अनुरूप, भव्य व रमणीय गुण आनंद देतो.

प्रस्तुत अर्थास अनुरूप असल्याने काव्यातील ओज, प्रसाद, माधुर्य, सौकुमार्य इत्यादि स्वरूपाचा भव्य गुण सौंदर्य प्राप्त करून, सहृदय (रसिकांना) चन्द्राप्रमाणे अतिशय आनंद देतो.

विवरण—'गुणौचित्य' ह्या शब्दप्रयोगानेच औचित्य हा गुण नाही हे क्षेमेन्द्राने स्पष्ट करून टाकले आहे. काव्यातील गुण हा काव्यातील वर्ण्यविषयास साजेसा, भव्य व सौंदर्यपरिपूर्ण हवा, तरच तो सहृदयांच्या हृदयांना आल्हाद देतो, अशी जणू अट क्षेमेन्द्र घालतो. गुण चन्द्राप्रमाणे आहार्य (आगंतुक) आहे हेही क्षेमेन्द्राने सुचविले आहे. तसेच संभोग जसा मुळातच सरस असतो तसेच काव्यही मुळातच आस्वाद्य असते, हीही आणखी एक व्यंजना आहे. वर एके ठिकाणी म्हटलेच आहे की, क्षेमेन्द्राने कविकंठाभरणाच्या चतुर्थ संधीत शब्दवैमल्य, अर्थवैमल्य व रसवैमल्य असे तीन काव्यगुण निरूपिले आहेत. येथे त्याने ओज, प्रसाद, माधुर्य व सौकुमार्य या चार गुणांचा स्पष्टतया निर्देश केला असून इतरांचा 'आदि' शब्दाने समुच्चय केला आहे. ह्यावरून त्याला कदाचित् दशगुण अभिप्रेत असावेत असे वाटते. अर्थात् हे केवळ अनुमान आहे. ह्याबाबतीत काहीच निश्चित सांगता येत नाही.

१९. Sanskrit Poetics as a Study of Aesthetic, 1963, p. 41.

यथा भट्टनारायणस्य—

१३. 'महाप्रलयमारुतक्षुभितपुष्करावर्तक-
प्रचण्डघनगर्जितप्रतिरवानुकारी मुहुः ।
रवः श्रवणभैरवः स्थगितरोदसीकन्दरः
कुतोऽद्य समरोदधेरयमभूतपूर्वः पुरः ॥'

[वेणीसंहार ३.४]

अत्रौजस्विनः सुभटमुकुटमणेरश्वत्थाम्नः स्फूर्जदूर्जितप्रतापानुरूपं वाक्यमोजसा काव्यगुणेनोदग्रतामवाप्तं सहस्रगुणमिव विक्रमौचित्यगौरवमावहति ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, भट्टनारायणाच्या (ह्या पद्यात गुणौचित्य आढळेल.) हा रणांगणरूपी महासागराचा अभूतपूर्व प्रचंड आवाज आज मजसमोर पुनःपुन्हा का उठत आहे ? (हा आवाज) महाप्रलयकालीन सोसाट्याच्या वाऱ्यांनी क्षुब्ध झालेल्या पुष्कर व आवर्तक मेघांच्या प्रचंड व गंभीर गर्जनेसारखा (गडगडाटासारखा) आहे. (ह्या आवाजाने) कानठळ्या बसल्या असून स्वर्ग व पृथ्वी यातील पोकळी भरून काढली आहे.

येथे श्रेष्ठ योध्यांचा मुकुटमणी जो ओजस्वी अश्वत्थामा त्याच्या स्फुरणाऱ्या ऊर्जस्वी पराक्रमाला अनुरूप वाक्य ओज (ह्या) काव्यगुणाने तीव्रता (प्रखरता) पावून जणू काही हजारो पटींनी वाढलेल्या पराक्रमाच्या औचित्याच्या महत्तेस धारण करीत आहे.

टीप—हेच पद्य क्षेमेन्द्राने सुवृत्ततिलकात (२।२८) पृथ्वीवृत्ताचे आदर्श उदाहरण म्हणून दिले आहे. प्रस्तुत ग्रंथात क्षेमेन्द्राने भट्टनारायणाच्या वेणीसंहारातलाच आणखी एक श्लोक उद्धृत केला असून हे दोन्ही श्लोक औचित्यपरिपोषाची उदाहरणे म्हणून दिले आहेत. कविकंठाभरणात (चतुर्थ संधि) वेणीसंहारातील एका गद्यखंडातील रसकालुष्य क्षेमेन्द्राने दाखवले आहे. क्षेमेन्द्राच्या काळात वेणीसंहार, रत्नावली, उत्तररामचरित इत्यादी नाटकांचे प्रयोग विपुलतेने होत होते काय ?

यथा वा भट्टबाणस्य—

१४. 'हारो जलार्द्रवसनं नलिनीदलानि
प्रालेयशीकरमुचस्तुहिनांशुभासः ।
यस्येन्धनानि सरसानि च चन्दनानि
निर्वाणमेष्यति कथं स मनोभवाग्निः ॥'

अत्र विप्रलंभभरभग्नधैर्यायाः कादंबर्या विरहव्यथावर्णना माधुर्यसौकुमार्यादिगुणयोगेन पूर्णेन्दुवदनेव प्रियंवदत्वेन हृदयानन्ददायिनीं दयिततमतां आतनोति ।

सरलार्थ—अथवा, उदाहरणार्थ, भट्टबाणाच्या ह्या श्लोकात औचित्य आढळेल—

हार, जलार्द्र वस्त्र, कमळाची पाने, दंवबिंदूंचा वर्षाव करणारे चंद्रकिरण व चन्दनाचा सरस लेप ही ज्याची इंधने आहेत तो कामाग्नी कसा विझणार ?

येथे वियोगाच्या भाराने धीर खचलेल्या कादंबरीच्या विरहार्ततेचे वर्णन (केले आहे. ते) माधुर्य, सौकुमार्य इत्यादी गुणांच्या योगाने, एखादी सुंदरी आपल्या प्रिय (मधुर) भाषणाने हृदयाला आनंद देती झाल्यामुळे अत्यंत प्रिय व्हावी त्याप्रमाणे, रसिकांच्या हृदयांना आनंद देऊन त्यांना निरतिशय प्रिय बनले आहे.

टीप—हृदयानन्ददायिनीं दयिततमतां' इत्यादी शब्दप्रयोगांवरून क्षेमेन्द्र भट्टबाणावर कसा निहायत खूष झाला आहे ते पाहाण्यासारखे आहे. ह्या श्लोकावरून बाणाने 'पद्यकादंबरी' लिहिली असावी असे वाटते, (कारण हा श्लोक त्याच्या गद्यकादंबरीत आढळत नाही). हर्षचरिताचे प्रस्तावनाकारही ह्याचा उल्लेख करतात[२०]. बाणाची रचना पाहूनच कदाचित् क्षेमेन्द्रालाही पद्यकादंबरी लिहावीसे वाटले असावे. प्रस्तुतचा श्लोक अमरुशतकात (क्रमांक ९८) आढळतो.

न तु यथा चन्द्रकस्य—

१५. 'युद्धेषु भाग्यचपलेषु न मे प्रतिज्ञा
दैवं नियच्छति जयं च पराजयं च ।
एषैव मे रणगतस्य सदा प्रतिज्ञा
पश्यन्ति यन्न रिपवो जघनं हयानाम् ॥'

अत्र क्षत्रवृत्तिरिवजसा काव्यगुणेनास्पृष्टा सुभटोक्तिरुचितार्थापि तेजोजीवितविरहिता दुर्गतगृहदीपशिखेव मन्दायमाना न विद्योतते ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, चन्द्रकाच्या (ह्या श्लोकात) औचित्य नाही.

दैवाप्रमाणे चंचल असलेल्या युद्धांचे बाबतीत माझी कोणतीच प्रतिज्ञा नाही. दैव जय व पराजय प्राप्त करून देते. परंतु, रणभूमीवर उभे टाकल्यावर माझी

२०. The Harshacharita of Banabhatta-Introduction by A. B. Gajendragadkar, p. 34.

सदा हीच प्रतिज्ञा असते की, शत्रूंना माझ्या घोड्यांच्या पाठी पाहावयास मिळू नयेत.

येथील योध्याचे भाषणास क्षत्रियात असणाऱ्या ओज ह्या काव्यगुणाचा स्पर्श झालेला नसल्यामुळे (ते) उचितार्थयुक्त असूनही, एखाद्या मोडकळीस आलेल्या घरातील दिव्याची ज्योत ज्याप्रमाणे मन्द होऊन निस्तेज बनते त्याप्रमाणे, तेजोजीविताने रहित असल्याने प्रकाशत (शोभून दिसत) नाही.

विवरण—भट्टनारायणाच्या 'महाप्रलयादी' पद्यात ओज ह्या काव्यगुणाचा कसा उत्कृष्ट परिपोष झाला आहे ते क्षेमेन्द्राने दाखवून दिले आहे. प्रस्तुत पद्यात औचित्यभंग कसा झाला आहे, ते दाखवून दिले आहे. ओजोगुणास समासप्रचुर रचनेची अपेक्षा असते. किंबहुना समासभूयस्त्व, विकटाक्षरत्व व दृढबंधत्व हे ओजोगुणाचे प्राण होत. चन्द्रकाच्या प्रस्तुत श्लोकात ह्या तिहींचाही अभाव आहे. त्यामुळे पद्यगत अर्थ जरी विक्रमी योद्धाला साजेसा असला तरी तो त्याच्या वृत्तीस अनुरूप शब्दात व्यक्त झालेला नाही. म्हणूनच तो अर्थ समुचित असूनही क्षेमेन्द्राला तेजस्वितारूपी जीवितावाचून आहेसा भासतो. एवंच, क्षेमेन्द्राच्या दृष्टीने अर्थौचित्याइतकेच काव्यगत पात्राच्या वृत्यनुरूपतेलाही महत्त्व आहे. क्षेमेन्द्राने येथे वापरलेले दीपशिखेचे उपमान सुवृत्ततिलकाच्या २।१० ह्या श्लोकातही वापरले आहे.

यथा वा राजशेखरस्य—

१६. 'एतस्याः स्मरसंज्वरः करतलस्पर्शैः परीक्ष्यो न यः
स्निग्धेनापि जनेन दाहभयतः प्रस्थंपचः पाथसाम् ।
निर्वीर्यीकृतचन्दनौषधविधौ तस्मिंस्तडत्कारिणो
लाजस्फोटममी स्फुटन्ति मणयः सर्वेऽपि हारस्रजाम् ॥'

[बालरामायण ५.११]

अत्र विरहविधुरमणीमनोभवावस्थानुरूपं माधुर्यमुत्सृज्य तडत्कारिणो लाजस्फोटं स्फुटन्तीत्योजःस्फूर्जितोर्जितस्वभावाधिवासिता सूक्तिर्लावण्यपेशल-तनुर्ललितललनेव परुषभाषिणी झटित्यनौचित्यं चेतसि संचारयति ॥ १४॥

सरलार्थ—अथवा, उदाहरणार्थ, राजशेखराच्या (ह्या पद्यात) अनौचित्य आढळेल.

हिचा कामज्वर प्रिय व्यक्तींनाही, चटक्याच्या भीतीमुळे, तळहाताच्या स्पर्शांनी पाहावत नाही. तो (शब्दशः जो) प्रस्थभर (शेरासारखे एक माप) पाणी उकळवतो, (त्याने) चन्दनादी औषधींचा प्रयोग प्रभावहीन केला आहे (चंदनादी औषधांच्या प्रयोगानेही हा ताप कमी होत नाही). (त्या तापात)

तिच्या (गळयातील) माळांचे हे सर्व मणी लाह्या फुटाव्यात त्याप्रमाणे, तड्तड् करीत फुटतात.

येथे विरहार्त सुंदरीच्या कामबाधेला साजेसे माधुर्य नसलेले व लाह्यांप्रमाणे तड्तड् आवाज करीत (मणी) फुटतात अशा प्रकारे ओजोगुणाने कडाडणाऱ्या ऊर्जस्वी स्वभावाने अधिवासित (युक्त) असलेले प्रस्तुत काव्य, लावण्ययुक्त व सुकुमार शरीर असलेली सुंदर स्त्री आपल्या कठोर भाषणाने करते त्याप्रमाणे, झटकन् मनांत अनौचित्य उत्पन्न करते.

विवरण—भट्टबाणाच्या 'हारो' इत्यादी श्लोकात माधुर्याचा उत्कृष्ट परिपोष कसा झाला आहे ते क्षेमेन्द्राने दाखवले आहे. येथे माधुर्याची हानी कशी झाली आहे ते दाखवून दिले आहे. माधुर्य ह्या मुळातच सुकुमार असलेल्या गुणाला मधुर-सुकुमार-कान्त पदावलीची अपेक्षा असते. तिला जेथे तडा जातो तेथे माधुर्यनाश होतो, हे क्षेमेन्द्राला सांगावयाचे आहे. क्षेमेन्द्राच्या विवरणातील उपमा मोठ्या गमतीच्या असतात. चंद्रकाच्या श्लोकातील तेजोरहित उक्ती क्षेमेन्द्राला मोडकळीस आलेल्या दीपशिखेप्रमाणे वाटते तर राजशेखराच्या प्रस्तुत सूक्तीला तो मुन्दरीच्या कठोर भाषणाची उपमा देतो. प्रस्तुत ग्रंथात क्षेमेन्द्राने राजशेखराची संस्कृत-प्राकृत मिळून एकूण दहा पद्ये उद्धृत केली आहेत, पैकी सात पद्ये औचित्यभंगाच्या स्पष्टीकरणार्थ दिली आहेत. क्षेमेन्द्र एकूण राजशेखरावर बराच नाराज दिसतो !

मर्मस्थान पाचवे-अलङ्कार—

अलङ्कारौचित्यं दर्शयितुमाह—

अर्थौचित्यवता सूक्तिरलंकारेण शोभते ।
पीनस्तनस्थितेनेव हारेण हरिणेक्षणा ।। १५ ।।

प्रस्तुतार्थस्यौचित्येनोपमोत्प्रेक्षारूपकादिनाऽलंकारेण सूक्तिश्चकास्ति कामिनीवोच्चकुचचुम्बिना रुचिरमुक्ताकलापेन ॥

सरलार्थ—अलंकाराचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे (एखादी) हरिणाक्षी (मुन्दरी) (तिच्या) मोठ्या स्तनांवर रुळणाऱ्या हाराने शोभून दिसते त्याप्रमाणे अर्थास अनुरूप अलंकाराने काव्य शोभून दिसते.

ज्याप्रमाणे (एखादी) मुन्दरी (तिच्या) उन्नत स्तनांना स्पर्श करणाऱ्या

सुन्दर मोत्यांच्या माळेने शोभून दिसते, त्याप्रमाणे प्रकृत अर्थास साजेशा उपमा, उत्प्रेक्षा, रूपक इत्यादी अलंकारांनी काव्य लखलखते (सुन्दर दिसते).

विवरण—अलंकारही अर्थोचित असला तरच तो काव्यशोभाकर ठरतो, नहून तो काव्यशोभेस गालबोट लावतो ही क्षेमेन्द्राची भूमिका आहे. कारिकागत उपमेच्या द्वारे क्षेमेन्द्राला जणू हे सुचवावयाचे आहे की, पीनस्तनरूपी पृष्ठभूमीवर रुळणारा हारच शोभतो, तद्वत् अर्थौचित्यरूपी पृष्ठभूमीवर रचिलेला अलंकारच काव्यास शोभतो. म्हणजे असा अर्थ निष्पन्न होतो की, क्षेमेन्द्राच्या दृष्टीने काव्यात उचितार्थ अवश्य असला पाहिजे, मग अलंकार असो—नसो, कारण अलंकार गौण असतो. क्षेमेन्द्राने गुणांनाही गौण स्थान दिले आहे हे कारिका ५ व त्यावरील वृत्ती ह्यांवरून स्पष्ट आहे. अशा स्थितीत तो, चन्द्रकाच्या 'युद्धेषु'… इत्यादी श्लोकात उचितार्थ असूनही ओजोगुण नसल्याने तो श्लोक सदोष होय, असे का म्हणतो त्याचा नीटपणे उलगडा होत नाही. शिवाय, कारिका नीरस, रूक्ष असू नयेत, त्या काव्यमय असाव्यात हा आदर्श जरी यथायोग्य असला तरी कारिकात तरुणींच्या स्तनजघनांचा उल्लेख आलाच पाहिजे का, हाही एक विचारणीय प्रश्न आहे. मात्र असे उल्लेख क्षेमेन्द्राच्या शास्त्रीय ग्रंथात वारंवार येतात. उदा० 'नहि नाम नवोन्मेषिकुचायाश्चारुचक्षुषः। चिरत्यक्तस्मरा नारे जराजीर्णकचे रुचिः' ॥ सुवृत्ततिलक ३।१४.

अलंकार अर्थानुरूप असला तरच शोभून दिसतो. नाहीतर तो काव्यशोभेची हानी करतो असे मोठ्या साक्षेपाने प्रतिपादणाऱ्या क्षेमेन्द्राने स्वतःच वेश्येची कविभारतीशी तुलना केलेली पाहून 'परोपदेशे पाण्डित्यम्' या सूक्तीची आठवण होते व विषाद वाटतो. क्षेमेन्द्राची ती उपमा अशी—

सालंकारतया विभक्तिरुचिरच्छाया विशेषाश्रया
वक्रा सादरचर्वणा रसवती मुग्धार्थलब्धा परम् ।
आश्चर्योचितवर्णनानवनवास्वादप्रमोदार्चिता
वेश्या सत्कविभारतीव हरति प्रौढा कलाशालिनी ॥

[समयमातृका-समाप्तिपर श्लोक १]

मम्मटाने आपल्या काव्यप्रकाशाच्या आरंभी (१।१) 'नियतिकृतनियमरहितां ह्लादैकमयीं अनन्यपरतंत्राम् । नवरसरुचिरां निर्मितिमादधति भारती कवेर्जयति ॥' ह्या शब्दांनी केलेली कविभारतीची प्रशंसा कोणीकडे आणि क्षेमेन्द्राची वरील उक्ती कोणीकडे ! वरील श्लोक रचिताना क्षेमेन्द्राचा औचित्यविवेक कसा संपुष्टात आला तेच समजत नाही !

यथा श्रीहर्षस्य—

१७. 'विश्रान्तविग्रहकथो रतिमाञ्जनस्य
चित्ते वसन्प्रियवसन्तक एव साक्षात् ।
पर्युत्सुको निजमहोत्सवदर्शनाय
वत्सेश्वरः कुसुमचाप इवाभ्युपैति ॥' [रत्नावली १-८]

अत्र वत्सेश्वरस्य कुसुमचापेनोपमा शृंगारावसरसरसचारुतरतामौचित्येन कामपि चेतश्चमत्कारिणीमाविष्करोति ॥

सरलार्थ— उदाहरणार्थ, श्रीहर्षाच्या (ह्या श्लोकात औचित्य आढळेल).
ज्यांची युद्धाची भाषा बंद झाली आहे, जे प्रजेविषयी वत्सल आहेत, ज्यांना प्रजाजनांच्या हृदयांत स्थान आहे, वसन्तक (विदूषक) ज्यांचा आवडता आहे असे, आपण सुरू केलेला (मदन)महोत्सव पाहण्यासाठी आतुर झालेले वत्सराज (उदयन), (ज्याच्या शरीराची नांवनिशाणी उरलेली नाही, रती ज्याची पत्नी आहे, जो लोकांच्या मनांत उत्पन्न होतो, वसंतऋतू ज्याचा प्रिय मित्र आहे, अशा मूर्तिमंत मदनाप्रमाणे आपल्यासाठी सुरू झालेला महोत्सव पाहण्यासाठी) इकडे येत आहेत.

येथे वत्सराजाला (दिलेली) मदनाची उपमा औचित्यामुळे चित्तात चमत्कार (आल्हाद) उत्पन्न करणाऱ्या शृंगारसमयीच्या रसपूर्ण रमणीयतेचा आविष्कार करीत आहे.

टीप—प्रस्तुत ग्रंथात क्षेमेन्द्राने श्रीहर्षाच्या रत्नावली नाटकातीलच एकूण पाच पद्ये औचित्यपोषाची उदाहरणे म्हणून उद्धृत केली आहेत.

न तु यथा चन्द्रकस्य—

१८. 'खगोत्क्षिप्तैरन्त्रैस्तरुशिरसि दोलेव रचिता
शिवा तृप्ताहारा स्वपिति रतिखिन्नेव वनिता ।
तृषार्तो गोमायुः सरुधिरमसिं लेढि बहुशो
बिलान्वेषी सर्पो हतगजकराग्रं प्रविशति ॥'

अत्र अनुचितस्थानस्थितायाः पुरुषपिशिततृप्तसुप्तायाः शिवायाः सुरतकेलिक्लान्तकान्तया विच्छायैवोपमा परं वैपरीत्यं प्रकाशयति ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, चन्द्रकाच्या (ह्या श्लोकात औचित्य) नाही.

पक्ष्यांनी आतड्यांच्या साह्याने झाडांच्या फांद्यावर जणू हिंदोळा तयार केला आहे; कोल्ही खाऊन-पिऊन तृप्त होऊन रतिक्रीडेने थकून गेलेल्या स्त्रीप्रमाणे झोपली आहे; तहानेने व्याकुळ झालेला कोल्हा रक्ताने माखलेली तरवार पुन्हापुन्हा चाटीत आहे (आणि) बिळाच्या शोधात असलेला सर्प मारल्या गेलेल्या हत्तीच्या सोंडेत प्रवेश करीत आहे.

येथे पुरुषाचे मांस खाऊन तृप्त होऊन झोपलेल्या कोल्हीला रतिक्रीडेने थकलेल्या स्त्रीची जी उपमा दिली आहे ती अनुचित स्थानी प्रयुक्त असल्याने सौंदर्यहीनच असून (ती) अत्यन्त वैपरीत्य (विरुद्ध भाव) प्रकट करते.

विवरण—येथील उपमा सर्वथा सौंदर्यहीन आहे यात शंकाच नाही. काव्यातील अलंकार हा अलंकार असलाच पाहिजे, अर्थात् त्याने काव्याची शोभा अवश्य वाढविली पाहिजे ही संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांची भूमिका आहे. उद्भटाच्या काव्यालंकारसारसंग्रहाचा (भांडारकर संशोधन-मंदिर प्रत, आवृत्ती, १९२५, पृ.१८) टीकाकार प्रतीहारेन्दुराज म्हणतो, "तस्याश्च (उपमायाश्च) अलंकाराधिकारात् चेतोहारित्वं लब्धमेव काव्यशोभावहानां धर्माणां गुणव्यतिरिक्ते सति अलंकारत्वात्।...तेन अलंकारत्वादेव उपमायाश्चेतोहारित्वं लब्धम्।" म्हणूनच प्रस्तुत पद्यातील उपमेचा अलंकार पदवीवर हक्क पोचत नाही, हे क्षेमेन्द्राचे म्हणणे योग्य आहे. भामहाने उपमेत सात प्रकारचे दोष येऊ शकतात असे (काव्यालंकार २।३९-४०) म्हटले आहे.वामनाने (काव्यालंकारसूत्रे ४-२-८) उपमेचे षड्विध दोष वर्णिले आहेत. दण्डी मात्र चारच दोष सांगून उपमा वैरस्योत्पादक असू नये ह्यावर भर देतो. तो म्हणतो—'न लिंगवचने भिन्ने न हीनाधिकताऽपि वा। उपमा दूषणायालं यत्रोद्वेगो न धीमताम्॥' (काव्यादर्श २-५१). डॉ॰ सूर्यकान्त वरील पद्य चन्द्रकाच्या नांवावर दाखल करतात (पाहा—Kṣemendra Studies, 1954, Index p.-209) क्षेमेन्द्राने प्रस्तुत ग्रंथात चन्द्रकाची एकूण चार पद्ये उद्धृत केली असून त्यांपैकी तीन औचित्यभंगाची उदाहरणे आहेत.

यथा वा मालवरुद्रस्य—

१९. 'अभिनववधूरोषस्वादः करीषतनूनपा-
दसरलजनाश्लेषक्रूरस्तुषारसमीरणः।
गलितविभवस्याज्ञेवाद्य द्युतिर्मसृणा रवे-
र्विरहिवनितावक्त्रौपम्यं बिभर्ति निशाकरः॥'

अत्र कोमलकामिनीकोपेन करीषकृशानोः सादृश्यं शीतसमयस्वादुतया हृदयसंवादसुन्दरमप्यनुचितत्वेन सहसैव चेतसः संकोचमिवादधाति ॥

सरलार्थ—अथवा, उदाहरणार्थ, मालवरुद्राच्या (ह्या श्लोकात औचित्य) नाही—

(शरद-ऋतूत) शेणगोळ्यांची (अथवा शेण्यांची, गोवऱ्यांची) आच नववधूच्या रोषाप्रमाणे सुखावह (आस्वाद्य) वाटते, थंडगार हवा कुटिल मनुष्याच्या आलिंगनाप्रमाणे क्रूर वाटते, सूर्याचा प्रकाश वैभव गमावून बसलेल्या पुरुषाच्या आशेप्रमाणे मिळमिळीत (मन्द) वाटतो, (आणि) चन्द्र विरहिणीच्या मुखाचे सादृश्य धारण करतो (विरहिणीच्या मुखाप्रमाणे कळाहीन बनतो).

येथे शेण्यांच्या आचीचे कोमल सुंदरीच्या कोपाशी सादृश्य वर्णिले आहे. ती आच हिवाळ्यात सुखावह असल्याने चित्तास अनुकूलत्वामुळे आल्हाद देणारी असली तरीही येथील उपमा अनुचित असल्याने एकाएकी चित्ताचा जणू संकोच घडवून आणते.

टीप—क्षेमेन्द्राच्या सूक्ष्म सौंदर्यग्राही दृष्टीचा व उच्च वाङ्मयाभिरुचीचा हा एक उत्तम नमुनाच आहे.

यथा वा राजशेखरस्य—

२०. 'चिताचक्रं चन्द्रः कुसुमधनुषो दग्धवपुषः
कलङ्कस्तत्रत्यः स्पृशति मलिनाङ्गारकलनाम् ।
यदेतत्सज्योतिर्दरदलितकर्पूरधवलं
मरुद्भिर्भस्मैतत्प्रसरति विकीर्णं दिशि दिशि ॥'

अत्राप्यानन्दसुधावस्यन्दसुन्दरस्येन्दोश्चिताचक्रत्वमनुचिततया कर्णकटुकमातङ्कमिवातनोति । योऽर्थस्तु हृदयसंवादी स यद्यनौचित्यस्पर्शलेशरहित स्तदाधिकतरामलंकारशोभां पुष्णाति ॥

सरलार्थ—अथवा, उदाहरणार्थ राजशेखराच्या (ह्या श्लोकात औचित्य आढळणार नाही.)

चन्द्र शरीर जळून गेलेल्या कामदेवाच्या चिताचक्राची आणि त्यावरील (चन्द्रावरील) कलंक विझलेल्या निखाऱ्याची कळा धारण करीत आहे. चूर्ण केलेल्या कापरासारखी धवल अशी ही जी ज्योत आहे ती वाऱ्यांनी दशदिशात विखुरलेले भस्मच पसरत आहे अशी भासते.

येथेदेखील आनन्ददायी सुधेचा सुन्दर वर्षाव करणाऱ्या चन्द्राला चिताचक्राची दिलेली उपमा अनुचित असल्याने कर्णकटु पीडाच निर्माण करते. जो अर्थ हृदयाकर्षक (हृदयाल्हादक) असतो तो जर अनौचित्याच्या लवमात्र स्पर्शाने

रहित असेल तर अलंकारसौंदर्याचा अधिकतर परिपोष करतो. (हृदयाल्हादक अर्थात थोडेसे ही अनौचित्य असता कामा नये, तरच त्या अर्थातील अलंकाराचे सौंदर्य वृद्धिंगत होते हा आशय.)

विवरण—क्षेमेन्द्राने प्रस्तुत ग्रंथात आपल्या आवडत्या औचित्यसिद्धान्ताखेरीज स्वतःला अभिमत असलेली काही काव्यशास्त्रविषयक तत्त्वे प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे व्यक्त केली आहेत. त्यांपैकीच प्रस्तुतचे एक होय. क्षेमेन्द्राच्या दृष्टीने काव्यगत अर्थ मुळात हृदयानंदकारक असला पाहिजे. त्याला अनौचित्याचा जरासुद्धा स्पर्श झालेला असता कामा नये. अशा अर्थाने युक्त काव्य अलंकारहीन असले तरी सरसच ठरते. अशा काव्यात अलंकार असला तर अर्थातच दुधात साखर पडल्यासारखे होऊन काव्यसौंदर्य द्विगुणित होते. परंतु, केवळ अलंकाराच्या योगे काव्यात सरसता उत्पन्न होत नाही.

यथा कार्पटिकस्य— [सुभाषितसुधारत्नभांडागारम् ३६३/७३]

२१. 'शीतेनोद्धृषितस्य माषशिमिवच्चिन्तार्णवे मज्जतः
शान्ताग्निं स्फुटिताधरस्य धमतः क्षुत्क्षामकण्ठस्य मे ।
निद्रा क्वापि विमानितेव दयिता संत्यज्य दूरं गता
सत्पात्रप्रतिपादितेव वसुधा न क्षीयते शर्वरी ॥'

अत्रानौचित्यस्पर्शपरिहारेण केवलं हृदयसंवादसौन्दर्यमेव स्वादुतामादधाति ॥१५॥

पाठभेद—शीतेनाध्युषितस्य माघजलवच्चिन्तार्णवे मज्जतः
शान्ताग्नेः स्फुरिताधरस्य धमतः क्षुत्क्षामकुक्षेर्मम ।
निद्रा काप्यवमानितेव दयिता सन्त्यज्य दूरं गता
सत्पात्रप्रतिपादितेव कमला नो हीयते शर्वरी ॥

—श्रीबल्लाळकृत भोजप्रबंध, चौखंबा प्रकाशन (१९३५), श्लोकांक २३२, पृ. ५७

सरलार्थ—उदाहरणार्थ, कार्पटिकाच्या (ह्या श्लोकात औचित्य आढळेल)—

थंडीमुळे उडदाच्या शेंगाप्रमाणे दाटर झालेल्या, काळजीच्या समुद्रात बुडालेल्या, शांत (विझलेल्या) अग्नीला प्रज्वलित करण्याच्या प्रयत्नामुळे ओठ फुटलेल्या व भुकेने गळा क्षीण झालेल्या मला सोडून निद्रा, एखाद्या अपमानित स्त्रीप्रमाणे, कोठेतरी दूर गेली आहे. तसेच योग्य व्यक्तीला दान दिलेल्या पृथ्वीप्रमाणे असलेली (ही) रात्र (ही लवकर) सरत (क्षीण होत) नाही.

येथे अनौचित्याचा स्पर्श टाळलेला असल्याने (होऊ दिलेला नसल्याने) निखळ हृदयंगम सौंदर्यच माधुर्य प्राप्त करते झाले आहे.

विवरण—क्षेमेन्द्राने 'योऽर्थस्तु…' इत्यादी शब्दांनी जे तत्त्व वर सांगितले आहे त्याचे स्पष्टीकरण करण्यासाठीच प्रस्तुतचे उदाहरण दिले आहे. मुद्दा लहान असो की मोठा असो, तो एकदा मांडला की त्याचे उदाहरणपूर्वक स्पष्टीकरण केल्याशिवाय राहावयाचे नाही, हा क्षेमेन्द्राचा शिरस्ता आहे. त्याचेच त्याने येथे परिपालन केले आहे. एवंच, समस्त ग्रंथ स्वयंसिद्ध व स्वतःस्पष्ट व्हावा ह्यासाठी क्षेमेन्द्र किती दक्षता बाळगतो ते दिसून येईल.

बल्लाळकृत भोजप्रबंधात उपर्युल्लिखित पृष्ठावर उपर्युक्त श्लोकापूर्वी असा मजकूर आहे—"ततः कदाचिद्धारानगरे रात्रौ विचरन्राजा कंचन देवालये शीतालुं ब्राह्मणमित्थं पठन्तमवलोक्य स्थितः—" ह्यानंतर पाठभेदात उल्लेखिलेला श्लोक असून त्यानंतर पुनः पुढील मजकूर आहे—

"इति श्रुत्वा राजा प्रातस्तमाहूय पप्रच्छ—'विप्र, पूर्वेद्यू रात्रौ त्वया दारुणः शीतभारः कथं सोढः।' विप्र आह—

"रात्रौ जानुर्दिवा भानुः कृशानुः सन्ध्ययोर्द्वयोः।
एवं शीतं मया नीतं जानुभानुकृशानुभिः॥ २३३॥

राजा तस्मै सुवर्णकलशं प्रादात्। ततः कवी राजानं स्तौति—

धारयित्वा त्वयात्मानं महात्यागधनायुषा।
मोचिता बलिकर्णाद्याः स्वयशोगुप्तकर्मणः॥ २३४॥
राजा तस्मै लक्षं ददौ।"

मर्मस्थान सहावे—रस

रसौचित्यं दर्शयितुमाह—

कुर्वन्सर्वाशये व्याप्तिमौचित्यरुचिरो रसः।
मधुमास इवाशोकं करोत्यङ्कुरितं मनः॥ १६॥

औचित्येन भ्राजिष्णुः शृंगारादिलक्षणो रसः सकलजनहृदयव्यापी वसन्त इवाशोकतरुमङ्कुरितं मनः करोति॥

सरलार्थ—रसाचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे वसंतऋतू अशोक वृक्षाला अंकुरित करतो (धुमारे फोडतो) त्याप्रमाणे औचित्याने सुन्दर झालेला रस (काव्याच्या) समस्त आशयाला

(स्थानांना, अंगोपांगांना) व्यापून मनात आल्हादाचा अंकुर उत्पन्न करतो.

औचित्याने सतेज (झालेला) शृंगारादि-स्वरूपी रस सर्व (रसिक) जनांची हृदये व्यापून, वसंत (ऋतू) ज्याप्रमाणे अशोकवृक्षास अंकुरित करतो त्या-प्रमाणे, (रसिकांची) मने फुलवितो.

विवरण—प्रायः बहुतेक साहित्यशास्त्रज्ञ रस हा काव्याचा आत्मा होय असे मानतात. विश्वनाथाने तर आपल्या साहित्यदर्पणात (प्रथम परिच्छेद) 'वाक्यं रसात्मकं काव्यम्'—रसपूर्ण वाक्याला काव्य म्हणावे, अशी काव्याची व्याख्याच केली. भारतीयांचा रससिद्धान्त म्हणजे विश्वसाहित्याला लाभलेली एक मौलिक देणगी होय, असेही मानण्यात येते. रसतत्त्व हे भारतीय शास्त्रकारांनी मानिलेल्या गुणतत्त्व, अलंकारतत्त्व इत्यादी तत्त्वांपैकी शेखरीभूत तत्त्व होय, असेच प्रायशः मानले जाते. क्षेमेन्द्राने मात्र रसदेखील औचित्यानेच तेजस्वी बनतो व तेव्हाच तो रसिकांची मने आनंदनिर्भर करतो असा नवविचार मांडून रसालाही औचित्यसापेक्ष मानले आहे, ह्यातच त्याचे विचारवैशिष्ट्य आहे.

यथा श्रीहर्षस्य—

२२. 'उद्दामोत्कलिकां विपाण्डुररुचं प्रारब्धजृम्भां क्षणा-
दायासं श्वसनोद्गमैरविरतैरातन्वतीमात्मनः ।
अद्योद्यानलतामिमां समदनां नारीमिवान्यां ध्रुवम्
पश्यन्कोपविपाटलद्युति मुखं देव्याः करिष्याम्यहम् ॥

[रत्नावली २.४]

अत्रेर्ष्याविप्रलंभरूपस्य शृंगाररसस्य वासवदत्तायामवेक्ष्यमाणस्य नवमालिकालताया ललितवनितातुल्यतया विरहावस्थारोपणेन नितरामौचित्यरुचिरचमत्कारकारिणी दीप्तिरुपपादिता ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, श्रीहर्षाच्या (ह्या श्लोकात औचित्य आढळेल)—

'आज खात्रीने मी, ज्याप्रमाणे तत्काळ विपुल कळ्यांनी डवरलेल्या, पांढऱ्या रंगाची कांती असलेल्या, विकास पावलेल्या, वाऱ्यांच्या अविरत आघातांनी (तडाख्यांनी) आपले क्लेश वाढवणाऱ्या उद्यानातील ह्या वेली-कडे (पाहावे) त्याप्रमाणे (प्रियकराविषयी) अनिवार उत्कंठा असलेल्या, (वियोगाने) अंगकांती अगदी फिकट झालेल्या, आळसावलेल्या, एकसारखे

मुरकारे सोडल्यामुळे स्वतःला थकवा आणणाऱ्या, प्रेमात सापडलेल्या दुसऱ्या स्त्रीकडे पाहिले म्हणजे महाराणीचे मुख रागाने तांबडेलाल होईल.'

येथे मोगऱ्याची वेल सुंदर स्त्रीसारखी असल्याने तिच्यावर विरहावस्थेचा आरोप करून, वासवदत्तेत आढळून येणाऱ्या ईर्ष्यारूप विप्रलंभ शृंगाररसाची अत्यंत औचित्यसुंदर चमत्कार उत्पन्न करणारी उत्कटता उपपादिली (वर्णिली) आहे.

विवरण—विप्रलंभ शृंगाराच्या अभिलाषादी पंचभेदांपैकी ईर्ष्या हा एक होय. प्रियकराची परस्त्रीविषयक आसक्ती समजल्यावर स्त्रीला होणाऱ्या रोषाला ईर्ष्यामान विप्रलंभ म्हणतात.

यथा वा कालिदासस्य—

२३. 'बालेन्दुवक्राण्यविकासभावाद्बभु पलाशान्यतिलोहितानि ।
सद्यो वसन्तेनसमागतानां नखक्षतानीव वनस्थलीनाम् ॥

[कुमारसंभव ३.२९]

अत्र पार्वत्यां परमेश्वरस्याभिलाषशृंगारे वक्ष्यमाणे प्रथममुद्दीपनविभावभूतस्य वसन्तस्य वर्णनायां कामुकाध्यारोपेण वनस्थलीललनानां कुटिललोहितपलाशकलिकाभिर्नवसंगमयोग्यनखक्षतान्युत्प्रेक्षितानि परमामौचित्यचारुतां प्रतिपादयन्ति ॥

सरलार्थ—अथवा, उदाहरणार्थ, कालिदासाच्या (ह्या श्लोकात औचित्य आढळेल.)

अतिशय लाल, बालचंद्राप्रमाणे वक्र व अविकसित (असे) पळसाच्या वृक्षाचे कळे वसंताशी नुकत्याच समागम पावलेल्या वनस्थळींच्या नखक्षतांप्रमाणे झाले.

येथे पार्वतीविषयी परमेश्वराच्या (म्ह० शंकराच्या मनातील) पुढे वर्णावयाच्या अभिलाष शृंगाराच्या आद्य उद्दीपनविभाव झालेला (जो) वसंतऋतू (त्याच्या) वर्णनात कामुकाच्या आरोपाने वनस्थलीरूपी ललनांच्या (सुंदरींच्या) वक्र, लाल पळसाच्या कळ्या नवसंगमोचित नखक्षतरूपी झाल्याचे कल्पिल्याने अत्यंत औचित्यसौंदर्याचे प्रतिपादन झाले आहे.

विवरण—कालिदासाच्या जातं वंशे (मेघदूत ६) इत्यादि श्लोकावरील क्षेमेन्द्रसमकालीन स्थिरदेवाची व्याख्या वर एके ठिकाणी उद्धृत केलीच आहे.

आता आधुनिक विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन मुद्दाम लिहवून घेतलेली एका प्राचीन पठडीच्या पण आधुनिक काळात होऊन गेलेल्या संस्कृत पंडिताची 'बालबोधिनी' नामक व्याख्या, ह्या श्लोकापुरती, उतरून घेऊ.

"बालेति । अविकाशभावाद्विकाशराहित्यात्कलिकावस्थायां विद्यमानत्वादिति यावद्बालोऽपूर्णेन्दुः प्रतिपच्चन्द्र इव वक्राणि कुटिलान्यतिलोहितान्यत्यन्तं रक्तवर्णानि पलाशानि पलाशपुष्पाणि वसन्तेन तदाख्यर्तुना नायकेन च सद्यः प्रवासागमनानन्तरं समागतानां वनस्थलीनां वनस्थाकृत्रिमभुवां नायिकानां च नखक्षतानीव सुरतक्रीडायां वक्षोजादिस्थलेषु कृतानि नखव्रणानीव बभुः शुशुभिरे। चिरकालादुपावृत्तो नायको यथा नायिकाङ्गेषु बहूनि नखव्रणानि विदधाति तद्वच्चिरादागतो वसन्त आगमनसमये एव वनस्थलीशरीरेषु पलाशकुसुमरूपाण्यतिलोहितानि वक्राणि च नखक्षतानि चकार इत्युत्प्रेक्षा समासोक्तिमूलिका । सद्य इति नखक्षतविशेषणं वा । तदा च नूतननखक्षतानां लौहित्यातिशयो व्यज्यते । सद्य इत्यस्य समागतानामित्यनेन संबंधे तु नखक्षतबाहुल्यं पुष्पबाहुल्यादित्यवधेयम् । अत्र विशेषणमहिम्ना नायिकानायकव्यवहारप्रतीत्या समासोक्तिस्तन्मूला च वक्रत्वलौहित्यमूलिकोत्प्रेक्षेति संकर उभयोः ॥ २९ ॥'

[कुमारसंभव (सर्ग १-४)-सेतुमाधवाचार्य गजेन्द्रगडकरकृत 'बालबोधिनी' सह, संपादक—र. दा. करमरकर, प्रथमावृत्ती १९२३, पृ-८०-८१]

वरील बालबोधिनीत क्षेमेन्द्राच्या औचित्याधिष्ठित सौंदर्यदृष्टीचा साक्षात्कार होत नाही. ह्यातच क्षेमेन्द्राची विशेषता सामावलेली आहे. परस्परानुरक्त स्त्रीपुरुषांचा समागम न घडल्याचे वर्णिल्यास अभिलाष विप्रलंभशृंगार होतो.

न तु यथास्यैव—

२४. 'वर्णप्रकर्षे सति कर्णिकारं दुनोति निर्गन्धतया स्म चेतः ।
प्रायेण सामग्र्यविधौ गुणानां पराङ्मुखो विश्वसृजः प्रवृत्तिः ॥'

[कुमारसंभव ३.२८]

अत्र केवलकर्णिकारकुसुमवर्णनमात्रेण विधातृवाच्यतागर्भेणैव प्रस्तुतशृंगारानुपयोगिना तदुद्दीपनविभावोचितं न किंचिदभिहितम् ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, त्याच्याच (म्ह० कालिदासाच्याच) ह्या श्लोकात (औचित्य आढळणार) नाही—

पांगाऱ्याच्या फुलाचा रंग अत्युत्कृष्ट असताही त्याला सुगंध नसल्याने ते मनास दुःख देते. समस्त गुण (एकाच पदार्थांचे ठायी) निर्मिण्याचे बाबतीत ब्रह्मदेवाची प्रवृत्ती प्रायः प्रतिकूल (विरुद्ध) असते.

येथे केवळ पांगाऱ्याच्या फुलाचे तेवढेच वर्णन करून ब्रह्मदेवाची निन्दा केली आहे. एवढेच निन्दागर्भ वचन प्रस्तुत शृंगाररसास उपयोगी नाही. त्याच्या (शृंगाररसाच्या) उद्दीपनविभावास अनुरूप (असे) काहीच म्हटलेले नाही.

विवरण—ब्रह्मदेवाने पांगाऱ्यास मोहक रंग दिला परंतु मादक गंध दिला नाही म्हणून कवीने ब्रह्मदेवाची निन्दा केली आहे. प्रस्तुत श्लोक शृंगाररसवर्णनप्रसंगीचा आहे. एकांत स्थळ, सुंदर उपवन, चंद्रोदय, वसंतऋतू, पुष्पादिकांचा सुगंध, गायन हे स्त्रीपुरुषोभयनिष्ठ उद्दीपनविभाव होत. त्यांचे वर्णन प्रस्तुत श्लोकात नसल्यामुळे अनौचित्याचाच परिपोष झाला आहे.

हास्यरसे यथा मम लावण्यवतीनाम्नि काव्ये—

२५. **'सीधुस्पर्शभयान्न चुम्बसि मुखं किं नासिकां गूहसे**
रे रे ! श्रोत्रियतां तनोषि विषमां मन्दोऽसि वेश्यां विना ।
इत्युक्त्वा मदघूर्णमाननयना वासन्तिका मालती-
लीनस्यात्रिवसोः करोति बकुलस्येवासवासेचनम् ॥'

अत्र श्रोत्रियस्यात्रिवसोरपवित्रसीधुस्पर्शशङ्कासंकोचनिलीनस्य शुष्कबकुलवृक्षस्येव सरसतापादनाय वेशविलासिन्या यदासवासेचनं तदङ्गभूतशृंगाररसाभासस्पर्शेन हास्यरसस्य वरासवस्येव सहकाररसवेधेन चमत्कारमौचित्यमाचिनोति ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, हास्यरसातील औचित्य माझ्या लावण्यवती नामक काव्यातील ह्या श्लोकात आढळेल—

"दारूच्या स्पर्शाच्या भयामुळे तू मुखाचे चुंबन का घेत नाहीस ? नाकावर हात का ठेवतोस ? (नाक का झाकतोस ?) अरे, तू विपरीत वेदाध्यायित्व दाखवीत आहेस. वेश्येवाचून तर तू एकदम मंद दिसतोस !" असे म्हणून, मदाने चंचलनेत्र झालेल्या वासन्तिकेने, बकुलवृक्षावर रेलावे त्याप्रमाणे 'मालती'-वर रेलून पहुडलेल्या अत्रिवसूवर, मद्याचे सिंचन केले.

येथे, अपवित्र दारूच्या स्पर्शाच्या शंकेने शरीर संकुचित केलेल्या (आखडून घेतलेल्या) अत्रिवसू नामक वेदाध्यायीच्या (ठायी) शुष्क बकुलवृक्षाचे ठायी व्हावी त्याप्रमाणे सरसता (कामभावना) उत्पन्न व्हावी ह्यासाठी वेश्येने जे

मद्यसिंचन केले ते, अंगभूत शृंगाररसाच्या आभासाच्या स्पर्शाने हास्यरसाचे, आम्ररसाच्या मिश्रणाने श्रेष्ठ मदिरेप्रमाणे, चमत्कारपूर्ण औचित्य प्रकट करीत आहे.

विवरण—वासन्तिका नामक वारयोषितेने अत्रिवसू नामक वेदपाठ्यावर मद्याचे सिंचन केले. अत्रिवसू वेदपाटी असला तरी सदाचारपराङ्मुख होता. तो केवळ ललनासक्त नसून वेश्यासक्त होता. त्यामुळे मद्यसिंचन झाल्या-बरोबर त्याने अंगावर शहारे आल्याचे ढोंगच केले, वस्तुतः ते त्याला अभीष्ट (अत्यंत प्रिय) होते. येथे हास्यरस अंगी (प्रधान) असून शृंगार अंगभूत (गौण) आहे.

कोणत्याही रसाचे अयोग्य रीतीने किंवा अयोग्य प्रसंगी वर्णन केले असता रसाभास होतो. स्त्रीपुरुषांपैकी एकाच पक्षाचे प्रेम, वेश्याविषयक प्रेम, परस्त्री-विषयक प्रेम, एका स्त्रीचे अनेक पुरुषांवर प्रेम, नीच स्त्रीवर उत्तम पुरुषाचे वा नीच पुरुषावर उत्तम स्त्रीचे प्रेम, असे अनुचित प्रेम वर्णिले असता शृंगार-रसाभास होतो. प्रस्तुत श्लोकात अत्रिवसू ह्या श्रोत्रियाचे वेश्येवरील प्रेम वर्णिलेले असल्याने येथे शृंगाररसाभास झाला आहे. प्रस्तुत श्लोकात हास्यरस प्रधानत्वाने आलेला असल्यामुळे तो ध्वनी होय.

यथा वा मम लावण्यवत्यामेव—

२६. 'मार्गे केतकसूचिभिन्नचरणा सीत्कारिणी केरली
रम्यं रम्यमहो पुनः कुरु विटेनेत्यर्थिता सस्मिता ।
कान्ता दन्तचतुष्कबिम्बितशशिज्योत्स्नापटेन क्षणं
धूर्तालोकनलज्जितेव तनुते मन्ये मुखाच्छादनम् ॥'

अत्रापि हास्यरसस्य कुटिलविटनर्मोक्तिवचनौचित्येन शृंगाररसाभासाधि-वासितस्य सचमत्कारः परः परिपोषः समुन्मिषति ॥

सरलार्थ—अथवा, उदाहरणार्थ, माझ्या लावण्यवती काव्यातीलच पुढील पद्यात औचित्य आढळेल—

रस्त्यात केवड्याचा काटा पायात भरल्यामुळे केरलदेशीय तरुणी 'सी', 'सी' करू लागली. (त्यावर) 'सुंदर, अहो सुंदर ! पुन्हा कर,' असे विटाने (धूर्ताने) विनविले असता तिने स्मित केले. तत्क्षणी तिच्या चार दातांवर प्रतिबिंबित झालेल्या चंद्रप्रकाशाच्या पटलाने (पटलाच्या साह्याने), धूर्तांच्या

दृष्टिक्षेपामुळे सलज्ज झालेल्या (त्या) रमणीने जणू आपले मुख झाकून घेतले, असे मला वाटते.

येथेदेखील कुटिल विटाच्या नर्मोक्तींच्या (प्रेमचेष्टापर वचनांच्या) औचित्यामुळे शृंगार रसाभासाने युक्त (अशा) हास्यरसाचा चमत्कारपूर्ण उत्कृष्ट परिपोष झाला आहे.

टीप:—क्षेमेन्द्र हा 'शुष्क' समालोचक नाही. तो अभिजात रसिक आहे. प्रस्तुत श्लोकातील औचित्यजनित आल्हादाच्या विवरणार्थ त्याने वापरलेले 'सचमत्कारः परः परिपोषः समुन्मिषति' हे शब्द लक्षात घेण्यासखोर आहेत.

न तु यथा श्यामलस्य—

२७. 'चुम्बनसक्तः सोऽस्या दशनं च्युतमूलमात्मनो वदनात् ।
जिव्हामूलप्राप्तं खाडिति कृत्वा निरष्ठीवत् ॥'

अत्र हास्यरसस्य बीभत्सरसाधिवासितस्य लशुनलिप्तस्येव कुसुमशेखरस्यातिजुगुप्सितत्वादनीप्सितस्य परमानौचित्येन चमत्कारस्तिरोहितः । वृद्धाचुम्बने जिव्हामूलप्राप्तस्य च्युतदशनस्य कण्ठलोठिनः ष्ठीवनेन बीभत्सस्यैव प्राधान्यं, न तु हास्यरसस्य ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, श्यामलाच्या ह्या श्लोकात औचित्य नाही—

'(नायक नायिकेचे) मुखचुंबन घेऊ लागला तोच तिचा दात मुळापासून तुटला (आणि नायकाच्या) तोंडातून जिभेच्या मुळापर्यंत (घशापर्यंत) पोचला (तेव्हा त्याने) खाड् असे करून (म्ह० खाकरून) थुंकून टाकला'.

येथील बीभत्सरसयुक्त हास्यरस लसणीने लिप्त पुष्पगुच्छाप्रमाणे, अतिशय किळसवाणा असल्यामुळे त्याचा चमत्कार (आल्हाद) आत्यंतिक अनौचित्याच्या योगे नाश पावला आहे. वृद्धेच्या चुंबनाच्या वर्णनात, मुळापासून तुटलेला दात घशात गेल्यामुळे तो खाकरून थुंकून टाकल्याच्या उल्लेखाने बीभत्सालाच प्राधान्य लाभले आहे, हास्यरसाला नाही.

विवरण—समीक्षक क्षेमेन्द्राच्या भाषाशैलीची लपेट येथे लक्षात घेण्याजोगी आहे. 'लशुनलिप्तस्येव' ह्या उपमेने प्रस्तुत श्लोकांतील अनुचित रसमिश्रणाला क्षेमेन्द्राने चांगलीच वाचा फोडली आहे. संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांनी रसमैत्री व रसविरोध यांचे निरूपण केल्याचे अनेक ग्रंथांत आढळते. त्या निरूपणानुसार उदाहरणार्थ, करुण, बीभत्स, रौद्र, वीर, भयानक हे रस शृंगाररसविरुद्ध असून हास्य रस शृंगारानुकूल मानण्यात आला आहे. तसेच, करुण व

भयानक हे हास्याचे विरोधी म्हणून सांगण्यात आले आहेत. हास्य व शृंगार हे करुणाचे विरोधी गणण्यात आले आहेत, इत्यादी. हे परस्परविरोधी रस एकत्र आले असता दोष होतो, परंतु ते देशभेदाने, समयभेदाने, अन्य रसाच्या मिश्रणाने, स्मृतीने, साम्याने किंवा अंगांगीभावाने एकत्र आले तर तेथे दोष होत नाही, असे साहित्यशास्त्रज्ञ मानतात. क्वचित् ही देशभेदादी कारणे नसतानाही विरोधी रस एकत्र आले असता दोषास्पद ठरत नाहीत, असाही विचार साहित्यशास्त्रज्ञांनी मांडला आहे. श्यामलाच्या प्रस्तुत पद्यातील वृद्धाचुंबनाची कल्पना मुळातच घृण्य आहे. त्यात वृद्धेचा दात तुटल्याचे, तो नायकाच्या घशात अडकल्याचे व त्याने तो खाकरून थुंकल्याचे कविकृत सर्वच वर्णन मनात किळस उत्पन्न करते. त्यामुळे येथील क्षेमेन्द्रकृत टीका ग्राह्यच आहे. असल्या वर्णनांचाच नव्हे तर खाड् इत्यादी शब्दप्रयोगांचाही निषेध दंडीने (काव्यादर्श १/९५) केलेला आढळतो.

करुणो यथा मम मुनिमतमीमांसायाम्—

२८. 'प्रत्यग्रोपनताभिमन्युनिधने हा वत्स ! हा पुत्रके-
त्यश्मद्रावि सुभद्रया प्रलपितं पार्थस्य यत्तत्पुरः ।
येनोद्बाष्पविमुक्तशष्पकवलैः सेनातुरंगैरपि
न्यञ्चत्पार्श्वगतैककर्णकुहरैर्निःस्पन्दमन्दं स्थितम् ॥'

अत्र प्रत्यग्रोपनतप्रियतरतनयवियोगोपजनितशोकाख्यस्थायिभावोचितं दृषदामपि हृदयद्रावणं सुभद्रया यत्प्रलपितं तदर्जुनचेतसि प्रतिफलितं न केवलमुद्दीप्ततामुपगतं यावत्तिरश्चां तुरंगमाणामप्यन्तः संक्रान्तमुद्बाष्पविमुक्तशष्पकवलनिःस्पन्दस्थितादिभिरनुभावैरुदीर्णतरुणकरुणरसप्रतिपत्तिं किमप्यादधाति ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, करुणरसाचे औचित्य माझ्या मुनिमतमीमांसेतील (ह्या श्लोकात आढळेल)—

नुकताच अभिमन्यूचा वध झाला असता सुभद्रेने अर्जुनापुढे 'बाळा, पुत्रा,' अशा शब्दांनी दगडाला पाझर फोडणारा जो विलाप केला, त्याने (तो ऐकून) सैन्यातील घोडेही, तोंडात घेतलेले गवताचे घास डोळ्यांतील आसवांसह खाली टाकीत, कानाच्या पाळ्या खाली करीत, निःस्तब्धपणे, चूपचाप उभे राहिले.

येथे, अत्यंत प्रिय पुत्राच्या नुकत्याच झालेल्या वियोगापासून उत्पन्न शोक नामक स्थायीभावाला अनुरूप, दगडांचेही हृदयास पाझर फोडणारा (असा)

जो सुभद्रेचा विलाप (वर्णिला आहे) तो अर्जुनाच्या अंतःकरणात फलद्रूप होऊन केवळ उत्कट (उद्दीप्त) बनतो असे नाही तर घोड्यांसारख्या पशूंच्याही अंतःकरणात संक्रान्त होऊन अश्रू गाळणे, गवताचा घास टाकणे, निश्चल उभे राहणे इत्यादी अनुभावांनी उत्कट बनलेल्या सुकुमार करुण रसाची प्रतिपत्ती (ज्ञान) प्रकट करतो. (करुणरसप्रतीती वाचकाला आणून देतो.)

विवरण—प्रस्तुत श्लोकातील क्षेमेन्द्राची गद्यवृत्ती अतिशय महत्त्वाची आहे. ह्या संदर्भात प्रथमतः जी गोष्ट ध्यानात येते ती ही की, क्षेमेन्द्राने 'शोक' नामक स्थायीभाव, स्थायीचे प्रतिफलन, त्याची उद्दीप्तता, अनुभाव, करुणरस व प्रतिपत्ती हे संस्कृत साहित्यशास्त्रांतर्गत रसविवेचनातील पारिभाषिक शब्द स्पष्टपणे व यथार्थस्वरूपात वापरले आहेत. उदा० विभाव, अनुभाव व व्यभिचारीभाव ह्यांच्या योगाने अभिव्यक्त होणाऱ्या मनोविकारास स्थायीभाव म्हणतात. स्थायीभावाच्या अभिव्यक्तीला किंवा परिपोषाला रस म्हणतात. शोक हा करुणरसाचा स्थायीभाव होय. इष्टाचा नाश व अनिष्टाची प्राप्ती ह्याच्यामुळे जो चित्तवृत्तिविशेष होतो त्यास शोक म्हणतात. क्षेमेन्द्राने शोक ह्या स्थायीभावाचा उल्लेख योग्य अर्थानेच केलेला आढळतो. साहित्यशास्त्रदृष्ट्या प्रस्तुत पद्यातील अभिमन्यू हा आलंबनविभाव (ज्याला अवलंबून मनोविकार उत्पन्न होतो तो आलंबनविभाव) होय. सुभद्रागत शोक हा स्थायीभाव आहे. अर्जुनाचे सुभद्रेला झालेले दर्शन हा उद्दीपनविभाव होय. घोड्यांचे अश्रू ढाळणे, गवत न खाणे, निश्चल उभे राहणे व सुभद्रेचे विलाप करणे हे अनुभाव होत. मनोगत भावाच्या (म्हणजे प्रधान मनोविकाराच्या) कटाक्ष, भुजक्षेप, अश्रुपात इत्यादी कार्यरूप शरीरचेष्टांना (शारीरिक व्यापारांना) अनुभाव म्हणतात. ह्यांच्या योगाने मनोविकार उत्पन्न झाल्याचे दुसऱ्याच्या अनुभवास येते म्हणून ह्यांना अनुभाव म्हणतात. ह्या अनुभावांनी स्थायीभाव उत्कट वा परिपुष्ट बनतो. तोच रस होय. एतावता, क्षेमेन्द्राला रससिद्धान्ताची समस्त परिभाषा चांगल्या प्रकारे अवगत होती हे स्पष्ट होते. 'रसाची प्रतिपत्ती' होते असा क्षेमेन्द्राचा पक्ष असल्याचे येथे स्पष्ट झाले आहे. यावरून, ह्या बाबतीत, क्षेमेन्द्र श्रीशंकुकाचा अनुयायी असावा असे वाटते. प्रस्तुतचे विवरण काव्यप्रकाश, रसतरंगिणी इत्यादी ग्रंथांच्या आधारे केले आहे.

न तु यथा परिमलस्य—

२९. 'हा शृंगारतरंगिणीकुलगिरे ! हा राजचूडामणे !
हा सौजन्यसुधानिधान ! हहहा वैदग्ध्यदुग्धोदधे !

हा देवोज्जयिनीभुजङ्ग ! युवतिप्रत्यक्षकन्दर्प ! हा
हा सद्बान्धव ! हा कलामृतकर ! कासि प्रतीक्षस्व नः ॥'

अत्र हाहेति हतमहीपतिविरहे तद्गुणामन्त्रणपदैर्वक्तृवक्त्रगत एव शोकः केवलमुपलक्ष्यते, न तु विभावानुभावव्यभिचारिसंयोगेन शोकाख्यास्य स्थायिभावस्योचितं रसीकरणं किंचिन्निष्पन्नम् ।

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, परिमलाच्या (ह्या श्लोकात औचित्य) नाही—

हाय ! शृंगाररूपी नदीच्या कुलपर्वता !, हाय ! राजांच्या मुकुटमणे !, हाय ! सौजन्यरूपी अमृताच्या निधाना !, हाय, हाय ! वैदग्ध्यरूपी क्षीरसागरा !, हाय ! महाराज, उज्जयिनीच्या भुजंगा !, हाय ! तरुणींच्या साक्षात् मदना !, हाय ! सद्बान्धवा !, हाय ! चन्द्रा !, तू कोठे आहेस ? आमची प्रतीक्षा कर.

येथे, हाय ! हाय ! ह्या उद्गारांनी, मारल्या गेलेल्या राजाच्या विरहाच्या वर्णनात, त्याच्या (राजाच्या) गुणांचे स्मरण करविणाऱ्या पदांच्या योगे वक्त्याचा मौखिक शोकच केवळ उपलक्षित (सूचित) होतो. परंतु, विभाव, अनुभाव व व्यभिचारीभाव ह्यांच्या संयोगाने शोक नामक स्थायीभावाचे उचित रसीकरण (रस होणे) मुळीच निष्पन्न होत नाही.

विवरण—शृंगारतरंगिणीकुलगिरे इत्यादी शब्द केवळ संबोधने असून त्यांद्वारे मृत राजाच्या गुणांचा तेवढाच बोध होतो. ती संबोधने रसनिष्पत्ती साधू शकत नाहीत. रसनिष्पत्ती कशी होते ते भरताने 'विभावानुभावव्यभिचारिसंयोगाद्रसनिष्पत्तिः ।' (नाट्यशास्त्र ६.३४) ह्या सूत्रात सांगितले आहे. त्याचाच उल्लेख क्षेमेन्द्राने प्रस्तुतच्या गद्यवृत्तीत केला आहे. स्थायीभावाचा उचित परिपोष म्हणजेच रस, स्थायीभावाचाच रस होतो, हीच क्षेमेन्द्राचीही भूमिका आहे. येथील 'गुणामंत्रण' म्हणजे केवळ अनुभाव होय.

रौद्रे यथा भट्टनारायणस्य—

३०. 'यो यः शस्त्रं बिभर्ति स्वभुजगुरुमदः पाण्डवीनां चमूनां
यो यः पांचालगोत्रे शिशुरधिकवया गर्भशय्यां गतो वा ।
यो यस्तत्कर्मसाक्षी चरति मयि रणे यश्च यश्च प्रतीपः
क्रोधान्धस्तस्य तस्य स्वयमपि जगतामन्तकस्यान्तकोऽहम् ॥'

[वेणीसंहार, ३-३२]

अत्र क्रूरक्रोधस्थायिभावात्मकस्योन्निद्ररौद्ररसस्योचिता शिशुस्थविरगर्भगतविशसननिस्त्रिंशकर्माध्यवसायाधिरोहणसंवादिनी द्रोणवधविधुरामर्ष-

विषमव्यथाकश्मलशिथिलमश्वत्थाम्नः स्थेमानं प्रतिज्ञापयति ।

पाठभेद—अमर्षविषविषमव्यथा – गद्यवृत्ती.

सरलार्थ—रौद्ररसातील औचित्य, उदाहरणार्थ, भट्टनारायणाच्या ह्या श्लोकात आढळेल—

पांडवांच्या सैन्यांतील जो जो स्वतःच्या बाहुसामर्थ्याचा गर्व करून शस्त्र धारण करील, पांचाळांच्या कुळातील जो जो—मग तो शिशु असो, वयस्कर असो अथवा गर्भस्थ असो—त्या कर्माचा साक्षी आहे, मी रणांगणावर फिरत असता जो जो मला प्रतिकार करील त्या त्या प्रत्येकाचा (म्हणजे त्या सर्वांचा) क्रोधाने अंध झालेला मी संहार करीन. मी जगताच्या अंतकाचा (म्हणजे मृत्यूचाही) काळ आहे.

येथे क्रूरक्रोध ह्या स्थायीभावस्वरूपी जागृत रौद्ररसाला अनुकूल (अशी) शिशू, वृद्ध, गर्भस्थ (येथपर्यंतच्या सर्वांची) क्रूर हत्या करण्याच्या कर्माची उद्योगोन्मुखानुरूपता, द्रोणाचार्यांच्या वधाच्या दुःखापासून (उत्पन्न झालेल्या) क्रोध व विषम व्यथा ह्यांनी मोहवश झालेल्या अश्वत्थाम्याच्या स्थिरतेची, जाणीव करवून देते.

टीप—प्रस्तुत श्लोकार्थाच्या अंतरंगात शिरून क्षेमेन्द्र त्याचे मर्मोद्घाटन कसे अचूकपणे करतो ते लक्षात घेण्यासारखे आहे.

न तु यथा श्रीप्रवरसेनस्य—

३१. ‘दणुइन्दरुहिरलग्गे जस्स फुरन्ते णहप्पहाविच्छड्डे ।
गुप्पन्ती विवलआ गलिए व्व थणंसुए महासुरलच्छी ॥

[रावणवह महाकाव्य १।२]

अत्र क्रोधव्यंजकपदविरहिततया ‘दनुजेन्द्ररुधिरलग्ने यस्य नरसिंहस्य स्फुरति नखप्रभाविच्छर्दे गुप्यन्ती विपलायिता गलिते इव स्तनांशुके महासुरलक्ष्मीः’ इति वर्णनया रुधिरलग्न इति बीभत्सरससंस्पर्शो व्याकुलीभवन्ती दैत्यश्रीः पलायितेति भयानकरससंकरेण प्रकृतोचितप्रधानभूतस्य रौद्ररसस्य कचिन्मुखमपि न दृश्यते ।

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ श्रीप्रवरसेनाच्या (ह्या श्लोकात औचित्य) नाही.

हिरण्यकशिपूच्या रक्ताने माखलेल्या नृसिंहाच्या नखांची प्रभा फाकली असता गोंधळून गेलेली महासुराची लक्ष्मी स्तनांवरील आवरक वस्त्र गळलेल्या (अशा) स्थितीतच पळाली.

येथे, 'हिरण्यकशिपूच्या रक्ताने माखलेल्या ज्या त्या (= त्याच्या) नृसिंहाच्या नखांच्या प्रभेचे स्फुरण झाले असता गोंधळून गेलेली, स्तनावरण गळून गेलेली, महासुरलक्ष्मी पळाली,' असे क्रोधव्यंजक पदांनी रहित वर्णन केलेले असल्याने, 'रक्ताने माखलेल्या' ह्या शब्दांमुळे बीभत्सरसाचा स्पर्श होऊन गोंधळून गेलेली दैत्यश्री पळून गेली अशा शब्दांच्या योगे भयानक रसाशी संकर झालेला आहे. त्यामुळे प्रस्तुत (विषयास) उचित जो प्रधानभूत रौद्ररस त्याचे कोठे तोंडसुद्धा दिसत नाही.

टीप--केवळ संस्कृत भाषेतील काव्यनाटकांमधील पद्ये उदाहृत करून क्षेमेन्द्राचे समाधान होत नाही. तो स्वमतपुष्ट्यर्थ प्राकृतातील पद्येही उद्धृत करतो. ह्यावरून त्याच्या विस्तृत वाचनाचा चांगलाच परिचय होतो. (प्रवरसेनाने आपल्या 'रावणवह' महाकाव्याच्या सर्गांना आसास (आश्वास) असे नाव दिले आहे.)

वीरे यथा मम नीतिलतायाम्—

३२. 'शौर्याराधितभर्गभार्गवमुनेः शस्त्रग्रहोन्मार्गिणः
संक्षेपेण निवार्य संक्षयमयीं क्षत्रोचितां तीक्ष्णताम् ।
आकर्णायतकृष्टचापकुटिलभ्रूभंगसंसर्गिणा
येनान्यायनिषेधिना शममयी ब्राह्मी प्रदिष्टा स्थितिः ॥'

अत्र 'सोऽयं रामः' इति रावणाग्रे शुकसारणाभ्यां दूरान्निर्दिश्यमानस्य रामस्य निःसंरभगंभीरावष्टंभसंभाव्यमानप्रभावोचितायां शस्त्रसंग्रहोन्मार्गगामिनो भार्गवस्य मुनेः स्वजातिसमुचितस्थित्युपदेशे सति प्रभविष्णुतायां चापरूपभंग्या भ्रूभंगः प्रदर्शितः, न तु स्वाभाविकः, वीरस्य क्रोधे विकारासंभवात् । प्रसन्नमधुरधीरा हि वीरवृत्तिः, तदुचितमत्राभिहितम् । भार्गवाभिभवेन च प्रधाननायकस्योत्कर्षः प्रतिपादितः ॥

सरलार्थ—वीर (रसातील) औचित्य, उदाहरणार्थ, माझ्या नीतिलतेतील ह्या श्लोकात आढळेल—

ज्याने (ज्या रामाने) शौर्याने भर्गाची (शिवाची) आराधना करून मर्यादेविरुद्ध शस्त्रग्रहण करणाऱ्या भार्गवमुनीची (परशुरामाची) क्षत्रियोचित, संहारक प्रखरता संक्षेपाने निवारली (शब्दशः, निवारण करून) आणि आपल्या वक्र भुवयांशी संपर्क पावलेल्या, कानापर्यंत ताणलेल्या धनुष्याने अन्यायाचा निषेध करून (भार्गवाला) शांतिपूर्ण ब्राह्मी स्थितीचा उपदेश केला (तोच हा राम).

येथे 'सोऽयं रामः' (तो हा राम होय) ह्या शब्दांनी रावणासमोर, शुक व सारण या दोघा दूतांनी दुरून अंगुलीने निर्दिष्ट केला जाणारा राम, त्याच्या अक्षुब्ध व गंभीर उपक्रमावरून अनुमित होणाऱ्या प्रभावास साजेसा असताना आणि शस्त्रग्रहणाचे बाबतीत उन्मार्गगामी झालेल्या (वाट चुकलेल्या, स्वतःचा पंथ सोडलेल्या) परशुरामाला स्वजातीला अनुरूप वर्तन करण्याचा उपदेश देण्याच्या बाबतीत समर्थ असताना, त्याच्या भुवया धनुष्यरूपी पद्धतीने वक्र झाल्याचे दाखविले आहे. भुवयांची ही कुटिलता (वक्रता) स्वाभाविक नाही. (कारण) वीराच्या क्रोधात विकार संभवत नाही. वीराची वृत्ती प्रसन्न, मधुर व निश्चयी असते. त्या वृत्तीस योग्य असे येथील वर्णन आहे. आणि परशुरामाचा पराभव झाल्याचे वर्णून मुख्य नायकाचा उत्कर्ष झाल्याचे प्रतिपादिले आहे.

विवरण—प्रस्तुत श्लोकात उल्लेखिलेल्या ब्राह्मी स्थितीचे वर्णन गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील पुढील श्लोकात आढळते—"आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत् । तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे स शान्तिमाप्नोति न कामकामी ॥ २.७०, विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः । निर्ममो निरहंकारः स शान्तिमधिगच्छति ॥" २.७१ व 'एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति । स्थित्वाऽस्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ॥' २.७२. संस्कृत नाट्यशास्त्रामध्ये नायकाचे ललित, शान्त, उदात्त व उद्धत असे चार भेद मानले आहेत (दशरूपक २.३). रामायणाचा नायक राम हा शास्त्र-नियमानुसार धीरोदात्त वर्गात मोडतो. धीरोदात्त नायकाचे लक्षण धनंजय असे देतो—'महासत्त्वोऽतिगंभीरः क्षमावानविकत्थनः ॥ (२।४) 'स्थिरो निगूढा-हङ्कारो धीरोदात्तो दृढव्रतः ॥' (२।५) अर्थात् धीरोदात्त कोटीचा नायक महासत्त्वशील, अतिशय गंभीर, क्षमाशील, आत्मश्लाघा न करणारा, निश्चयी स्वभावाचा, निगूढ अहंकारयुक्त (म्हणजे ज्याचा अहंकार विनयाने झाकलेला असतो) व अंगीकृत कार्य तडीस नेणारा (दृढव्रत) असतो. क्षेमेन्द्राने वरील गद्यवृत्तीत 'वीरस्य क्रोधे विकारासंभवात्' म्हटले आहे. धनंजयाच्या उपर्युद्धृत कारिकेतील 'महासत्त्व' शब्दाचे स्पष्टीकरण 'शोकक्रोधाद्यनभिभूतान्तः-सत्त्वः' या शब्दांनी अवलोककारांनी केले आहे. त्याचा अर्थदेखील ज्याचे अंतःकरण क्रोध, शोक इत्यादी विकारांच्या आहारी जात नाही असा, असाच होतो. [पाहा-धनंजयविरचितं दशरूपकम् (सावलोकम्)-विद्याभवन संस्कृत ग्रंथमाला ७, सं २०११, पृ० ७९.] काव्यनाटकातील प्रधान नायकाचा उत्कर्ष झाल्याचेच कवीने वर्णिले पाहिजे, असा संस्कृत साहित्यशास्त्राचा

दंडक आहे. उदाहरणार्थ, दंडी म्हणतो, "वंशवीर्यश्रुतादीनि वर्णयित्वारिपोरपि । तज्जयान्नायकोत्कर्षवर्णनं च धिनोति नः ॥ काव्यादर्श १.२२. संस्कृत साहित्य-शास्त्राला शिरसावंद्य असलेल्या ह्या काही तत्त्वांचा क्षेमेन्द्राने येथे केलेला उल्लेख पाहिला की, त्याने आचार्यशेखरमणी अभिनवगुप्त यांचेकडून साहित्याचे खरोखरीच उत्कृष्ट श्रवण केलेले असल्याची खात्री पटते.

यथा वा राजशेखरस्य—

३३. 'स्त्रीणां मध्ये सलीलं भ्रमितगुरुगदाघातनिर्नष्टसंज्ञः
सद्यो वध्योऽभवस्त्वं पशुरिव विवशस्तेन राज्ञाऽर्जुनेन ।
तस्य च्छेत्तापि योऽसौ सकलनृपरिपुर्जामदग्न्यो भुजानां
जित्वोच्चैः सोऽपि येन द्विज इति न हतस्तापसस्त्वेष रामः ॥'

[दूतांगद ३.७८]

अत्र रावणकार्तवीर्यजामदग्न्योत्कर्षोत्कर्षसोपानपरंपराधिरोहणक्रमेण प्रधान-नायकस्य प्रतापः परां कोटिमारोपितः ॥

पाठभेद—उत्कर्षोत्कर्षतरसोपान (गद्यवृत्ती)

सरलार्थ—अथवा, उदाहरणार्थ, राजशेखराच्या ह्या श्लोकात औचित्य आढळेल—

हे रावणा, सहज फिरणाऱ्या भारी गदेच्या प्रहाराने निश्चेष्ट झालेला तू सहस्रार्जुनाकडून तत्काळ विवश केला गेला होतास आणि स्त्रियांच्या मध्ये पशूप्रमाणे वध्य झाला होतास. त्याचे (म्हणजे सहस्रार्जुनाचे) बाहू छाटणाराही, सर्व राजांचा शत्रू (असा) जो हा प्रसिद्ध (वा श्रेष्ठ) जामदग्न्य परशुराम त्यालासुद्धा ज्याने जिंकले (परंतु ब्राह्मण आहे असे कळताच न मारता सोडले, तो हा तापस (वेषधारी) राम होय. (तो हा राम येथे आला आहे.)

येथे रावण, कार्तवीर्य अर्जुन, जामदग्न्य परशुराम यांच्या उत्कर्षाचे, जिन्याच्या पायऱ्यांप्रमाणे उत्तरोत्तर चढत्या क्रमाने (वर्णन केलेले असल्याने) प्रधान नायकाचा (रामाचा) पराक्रम पराकोटीला पोचविला गेला आहे.

टीप—क्षेमेन्द्राच्या ह्या गद्य वृत्तीची 'गुणतः प्रागुपन्यस्य नायकं तेन विद्विषाम् । निराकरणमित्येष मार्गः प्रकृतिसुन्दरः ॥' (काव्यादर्श १.२१) ह्या दंडीच्या उक्तीशी तुलना करण्यासारखी आहे.

न तु यथा भवभूतेः—

३४. 'वृद्धास्ते न विचारणीयचरितास्तिष्ठन्तु हुं वर्तते
युद्धं स्त्रीदमनेऽप्यखण्डयशसो लोके महान्तो हि ते ।

यानि त्रीणि कुतोमुखान्यपि पदान्यासन्खरायोधने
यद्वा कौशलमिन्द्रसूनुदमने तत्राप्यभिज्ञो जनः ।।'

[उत्तररामचरित ५.३५]

अत्राप्रधानस्य रामसूनोः कुमारलवस्य परप्रतापोत्कर्षासहिष्णोर्वीररसोद्दीपनाय सकलप्रबन्धजीवितसर्वस्वभूतस्य प्रधाननायकगतस्य वीररसस्य ताडकादमनखररणापसरणान्यरणसंसक्तवालिव्यापादनादिजनविहितापवादप्रतिपादनेन स्ववचसा कविना विनाशः कृतः इत्यनुचितमेतत् ।।

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, भवभूतीच्या ह्या श्लोकात औचित्य नाही.

त्या वृद्धांच्या चरित्राचा विचार करू नये. हं, युद्ध होऊ दे. ताडका नामक स्त्रीचेनिर्दालन करूनसुद्धा त्यांची कीर्ती अखंड (अभंग) राहिली व जगात ते मोठेच ठरले. ते खर (नामक राक्षसाशी) युद्ध करतेवेळी तीन पावले मागे हटले होते. अथवा इन्द्रपुत्राच्या (वालीच्या) संहाराच्या वेळी (त्यांनी) कौशल्य (प्रकट केले होते). तेही (म्ह० ते सर्व) जगाला चांगलेच परिचित आहे.

येथे दुसऱ्याच्या पराक्रमाचा उत्कर्ष सहन न करणारा जो अप्रधान, रामपुत्र कुमार लव त्याच्या (अंगच्या) वीररसाचे उद्दीपन करण्यासाठी, कवीने समस्त प्रबन्धाचे जीवितसर्वस्व असलेल्या प्रधान नायकाच्या ठिकाणच्या वीर रसाचा, ताडकेची हत्या, खराशी झालेल्या युद्धात घेतलेली माघार, दुसऱ्याशी युद्ध करण्यात गुंतलेल्या वालीचा नाश, इत्यादी लोकांनी पसरविलेल्या प्रवादांचे प्रतिपादन करून स्वतःच्या(च) उक्तींनी संपूर्ण नाश केला आहे, म्हणून हे (वर्णन) अनुचित होय.

विवरण—क्षेमेन्द्राच्या चौफेर व सूक्ष्म दृष्टीचा येथे चांगलाच प्रत्यय येतो. काव्यनाटकातील प्रधानाप्रधान नायकातील तारतम्य कवीने औचित्यपूर्वक पाळले पाहिजे, ह्यावर क्षेमेन्द्राचा, इतर शास्त्रज्ञांप्रमाणेच कटाक्ष आहे. भवभूतीने अप्रधाननायकगत वीररसाचा उठाव साधता साधता प्रधाननायकाच्या चरित्राचाच बळी घेतला, हे क्षेमेन्द्राने अतिशय कठोर शब्दात स्पष्ट केले आहे. भवभूतीसारख्या मान्यवराच्याही काव्यातील दोष दाखविताना क्षेमेन्द्र 'स्ववचसा कविना विनाशः कृतः' इतकी कठोर भाषा वापरण्यास भीत नाही, हे लक्षात घेण्याजोगे आहे. क्षेमेन्द्राच्या वरील उक्तींशी भामहाच्या पुढील उक्तींची तुलना करणे बरेच उद्बोधक ठरेल—"नायकं प्राक् उपन्यस्य वंशवीर्यश्रुता-

दिभिः। न तस्यैव वधं ब्रूयात् अन्योत्कर्षाभिधित्सया ॥ यदि काव्यशरीरस्य न स व्यापितयेष्यते। न च अभ्युदयभाक्तस्य मुधादौ ग्रहणं स्तवे ॥"

(काव्यालंकार १. २१-२३)

भयानके यथा श्रीहर्षस्य—

३५. 'कण्ठे कृत्तावशेषं कनकमयमधः शृंखलादाम कर्षन्
क्रान्त्वा द्वाराणि हेलाचलचरणरणत्किंकिणीचक्रवालः।
दत्तातङ्कोऽङ्गनानामनुसृतसरणिः संभ्रमादश्वपालैः
प्रभ्रष्टोऽयं प्लवंगः प्रविशति नृपतेर्मन्दिरं मन्दुरायाः ॥'

[रत्नावली २.२]

अपि च —

३६. 'नष्टं वर्षवरैर्मनुष्यगणनाभावादकृत्वा त्रपा-
मन्तः कंचुकिकंचुकस्य विशति त्रासादयं वामनः।
पर्यन्ताश्रयिभिर्निजस्य सदृशं नाम्नः किरातैः कृतं
कुब्जा नीचतयैव यान्ति शनकैरात्मेक्षणाशंकिनः ॥'

[रत्नावली २.३.]

अत्राङ्गनानां निशितदशननखशिखोल्लेखातङ्कदानेन प्रचुरतरवानराभिसरणभयसंभ्रान्तान्तःपुरिकवृद्धवामनकिरातकुब्जादीनां पुरुषगणनाविहीनतया धैर्यविरहकातराणामुचितचेष्टानुभाववर्णनया भयानकरससंवादिरुचिरौचित्यमाचकास्ति ॥

सरलार्थ—भयानक रसातील औचित्य, उदाहरणार्थ, श्रीहर्षाच्या पुढील पद्यांत आढळेल--

पागेतून निसटलेला, तोडल्यानंतर उरलेली गळ्यातील सोन्याची दाव्याची साखळी खाली खेचणारा, [माकड] चेष्टांमुळे ज्याच्या हलणाऱ्या पायांतील घुंगरांची माळ वाजत आहे असा, दारे ओलांडून ज्याने स्त्रियांना घाबरवून सोडले आहे असा आणि मोतद्दारांनी घाईने ज्याचा पाठलाग केलेला आहे असा हा वानर राजाच्या वाड्यात शिरत आहे.

आणि शिवाय—

माणसांत जमा होत नसल्यामुळें लाज सोडून (गुंडाळून) हिजडे पळून गेले; हा ठेंगू घाबरून कंचुकीच्या अंगरख्याच्या आत शिरत आहे; (राणीवशाच्या) जवळपास राहणाऱ्या किरातांनी आपल्या नांवाला शोभेल असे केले

[म्हणजे ते जवळपास निघून गेले]; आणि आपण दिसू या भीतीने कुबडे सावकाश वाकून-वाकूनच चालत आहेत—

येथे (वानर) तीक्ष्ण दात व नखे यांचे ओरखडे ओढून पीडा देईल या भीतीने धीर सुटलेल्या स्त्रियांच्या, (तसेच) वानर जवळ येईल ह्या भीतीने गोंधळून गेलेल्या अंतःपुरस्थ वृद्ध-कंचुकी, खुजे, किरात व कुबडे इत्यादींच्या (व) पुरुषात गणना होत नसल्यामुळे धीर सुटल्याकारणाने घाबरून गेलेल्या नपुंसकांच्या उचित चेष्टारूप अनुभावांच्या वर्णनाने भयानक रसाला अनुकूल (असे) सुंदर औचित्य शोभून दिसत आहे.

न तु यथा राजपुत्रमुक्तापीडस्य—[सुभाषितसुधारत्नभांडागारम् ६२६।३२]

३७. 'नीवारप्रसवाग्रमुष्टिकवलैर्यो वर्धितः शैशवे
पीतं येन सरोजपत्रपुटके होमावशेषं पयः।
तं दृष्ट्वा मदमन्थरालिवलयव्यालोलगण्डं गजं
सानन्दं सभयं च पश्यति मुहुर्दूरे स्थितस्तापसः ॥'

अत्र गजस्याघातकविकृतचेष्टानुवर्णनाविरहिततया स्थायिभावस्य भयस्य अनुभाववर्जितस्य केवलं नाममात्रोदीरणेन च भयानकरसोचित-संभ्रमाभावादुपचितमौचित्यं न किंचिदुपलभ्यते ।

पाठभेद—नीवारप्रसराग्र (श्लोकाचा प्रथम पाद), व्यालुप्तगण्डं (तृतीय पाद), सोत्कंठं (चतुर्थ पाद).

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, राजपुत्र मुक्तापीडाच्या पुढील श्लोकात भयानक रसाचे औचित्य नाही—

कोमल तृणधान्यांच्या मुठींच्या घासांनी ज्याचे लहानपणी पालन केले गेले, ज्याने होमानंतरचे अवशिष्ट दूध कमलाच्या पानांच्या द्रोणामधून प्राशन केले, त्या मदाने मत्त व गंडस्थळ भुंग्यांच्या पंक्तींनी व्यापिलेल्या (तरुण) हत्तीस दूर बसलेला तपस्वी आनंदाने व भीतीने पाहात आहे.

येथे गजाच्या (हत्तीच्या) आघातकारी विकृत शारीर व्यापारांच्या वर्णनाचा अभाव असल्याने आणि भय ह्या स्थायीभावाचे अनुभावरहित (असे) केवळ (भय शब्द उच्चारून) नाममात्रेकरून वर्णन झालेले असल्याने, भयानक रसाला अनुकूल संभ्रमाचा (गोंधळाचा) अभाव आहे, त्यामुळे थोडेसुद्धा वृद्धिंगत औचित्य उपलब्ध होत नाही.

टीप—स्थायीभावाचा शब्दांनी उल्लेख करणे हा रसदोष होय असे साहित्यशास्त्रज्ञ मानतात, ही बाब प्रसिद्धच आहे, राजपुत्रांच्या रचना उद्धृत करून त्यातील दोष दाखवण्यास क्षेमेन्द्र कचरत नाही, हे येथे स्पष्ट झाले आहे. हे पद्य वल्लभदेवकृत सुभाषितावलीत (क्रमांक ६३७) आढळते.

बीभत्से यथा मम मुनिमतमीमांसायाम्—

३८. 'सर्वापायचयाश्रयस्य नियतं कुत्सानिकायस्य किं
कायस्यास्य विभूषणैः सुवसनैरानन्दनैश्चन्दनैः ।
अन्तर्यस्य शकृद्यकृत्कृमिकुलक्लोमान्त्रमालाकुले
क्लेदिन्यन्तदिने प्रयान्ति विमुखाः कौलेयकाका अपि ॥'

अत्र वैराग्यवासनाच्छुरितबीभत्सरसस्य जुगुप्साख्यस्थायिभावोचितकायगतकुत्सिततरान्त्रतन्त्रादिसमुदीरणेन परा परिपुष्टिर्निःसारशरीराभिमानवैरस्य जननी प्रतिपादिता ॥

सरलार्थ—बीभत्स रसातील औचित्य, उदाहरणार्थ, माझ्या मुनिमतमीमांसेतील ह्या श्लोकात आढळेल—

ज्याच्या आतमध्ये विष्ठा, पित्ताशय, कृमींचा समूह, मूत्राशय, आतड्यांच्या माळा भरलेल्या आहेत, जे ओले असते व ज्याचेकडे अंती कुत्रे व कावळेदेखील पाठ फिरवितात, त्या (ह्या) सर्व अपायांचे आश्रयस्थान व तिरस्करणीय गोष्टींचा समूह असलेल्या शरीराचे दागिन्यांनी, सुंदर वस्त्रांनी (कपड्यालत्त्यांनी) व सुखकारक चंदनलेपांनी प्रसाधन साधण्यात काय हशील आहे !

येथे वैराग्यवासनेने मिश्रित बीभत्सरसाचा, जुगुप्सा नामक स्थायीभावास अनुकूल शरीरगत अत्यंत तिरस्करणीय (घृणास्पद) आतड्यांचा ढीग वगैरे वर्णनाने, अत्यंत परिपोष झाला आहे. त्यायोगे असार शरीराच्या अभिमानाच्या शत्रूचे प्रतिपादन झाले आहे (म्ह० असार शरीराविषयीच्या अभिमानाची व्यर्थता प्रतिपादिली गेली आहे)

टीप—जुगुप्सा नामक स्थायीभावाचा नामनिर्देश न करताही क्षेमेन्द्राने प्रस्तुत पद्यात त्या भावाचा परिपोष प्रत्ययोत्पादक रीतीने साधला आहे.

न तु यथा चन्द्रकस्य— [सुभाषितसुधारत्नभांडागारम् २६८।१८]

३९. 'कृशः काणः खञ्जःश्रवणरहितः पुच्छविकलः
क्षुधाक्षामो रूक्षः पिठरकपालार्दितगलः ।

व्रणैः पतिक्लिन्नैः कृमिपरिवृतैरावृततनुः
- शुनीमन्वेति श्वा तमपि मदयत्येष मदनः ॥'

अत्राशुचिचर्वणश्चेरपचितविचिकित्सकुत्सानिकायकायस्य स्वभावजुगुप्सितयोनेः शुनकाय किमेतैर्बीभत्सविशेषणैरतिशयनिर्बन्धानुबद्धैरधिकमुद्भासितम् । एतैरेव पुरुषगतैर्जुगुप्सा परं गौरवमावहति ॥

पाठभेद—'कृशः काणः खञ्जः श्रवणरहितः पुच्छविकलः
व्रणी पयक्लिन्नः कृमिकुलशतैराचिततनुः
क्षुधाक्षामो जीर्णः पिठरककपालावृतगलः
शुनीमन्वेति श्वा हतमपि निहन्त्येव मदनः ॥

[वल्लभदेवकृत सुभाषितावलिः—क्रमांक ३३९०]

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, चन्द्रकाच्या ह्या श्लोकात बीभत्सौचित्य नाही.

कृश, काणा, लंगडा, कान नसलेला (कान तुटलेला; बहिरा), शेपूट तुटलेला, भुकेने रोडावलेला, वाळलेला, भांडयांची खापरे चावून चावून घसा खरवडून गेलेला आणि पुवाने व कृमींनी भरलेल्या व्रणांनी युक्त शरीराचा कुत्रा कुत्रीचे मागे धावतो, त्यालाही हा कामदेव काममत्त करतो.

येथे अत्यंत ओंगळ पदार्थ खाणाऱ्या, वेड्यावाकड्या अवयवांच्या, ढिगाच्या स्वरूपाच्या, अतिशय घृणास्पद शरीराच्या (व) स्वभावतः किळसवाण्या योनीच्या (जातीच्या) कुत्र्याचे, ह्या बीभत्स विशेषणांच्या अतिशय निमयपूर्वक गुंफणीने कोणते विशेष वर्णन साधले आहे ? ह्याच विशेषणांचा पुरुषाच्या वर्णनार्थ प्रयोग केला असता तर जुगुप्सेचा उत्तम परिपोष झाला असता.

विवरण—चन्द्रकाचा प्रस्तुतचा श्लोक वाचकाच्या मनात घृणा निर्मिण्यास समर्थ आहे यात शंका नाही. परंतु, ह्या विशेषणांनी कुत्र्याचे वर्णन करण्यात विशेष काय साधले, असे क्षेमेन्द्राने का विचारावे ते कळत नाही. ह्याच विशेषणांनी पुरुषाचे वर्णन केले असते तर ते जुगुप्सापोषक अतएव ग्राह्य झाले असते, ही क्षेमेन्द्राची विचारसरणी पटत नाही. काव्यगत वर्णने मनुष्यप्राणिनिष्ठच असली पाहिजेत, पशुनिष्ठ असता कामा नयेत, असा एकूण क्षेमेन्द्राचा आग्रह दिसतो, किंवा किमान बीभत्सरसपर वर्णने तरी पशुसृष्टिनिष्ठ नसावीत असे त्याचे मत असावे असे अनुमान येथे निघते. यांपैकी कोणतीच भूमिका स्वीकारार्ह नाही. कारण अमुक एका रसाची वर्णने पशुविषयक असू

नयेत हा कोठला न्याय ! शिवाय, काव्यगत वर्णने मनुष्यविषयकच असली पाहिजेत असा जर दंडक असेल तर भाषाप्रभू कवीने पशुपक्ष्यांची घरटी पाहावीत, प्राण्यांच्या स्वभावाचे अवलोकन करावे इत्यादी उपदेश क्षेमेन्द्राने आपल्या कविकंठाभरणात (द्वितीय संधी, श्लोकक्रमांक ८ व १०) का केला आहे ! एवढेच कशाला, प्रस्तुत ग्रंथातील ह्यापूर्वीच्या भागात खगोत्क्षिप्तः······इ., कण्ठे कृत्तावशेषं······इ., नीवारप्रसवाग्र······इ. श्लोकात पक्षी, पशु, वानर, हत्ती इत्यादींचीच वर्णने आलेली आहेत ना ? मग तत्तत्स्थळी मनुष्यवर्णने हवी होती असा आग्रह क्षेमेन्द्राने का धरिला नाही ? पशुपक्ष्यांची सरस, उत्कृष्ट-स्वभावोक्त वर्णने संस्कृत साहित्यात काय थोडी आहेत ? की ती सर्व हेय समजावयाची ? एवंच, क्षेमेन्द्राची येथील विचारसरणी मान्य करण्याजोगी नाही. प्रस्तुत पद्य चन्द्रकाचे असे डॉ० सूर्यकान्त (Kṣemendra Studies, 1954, Index, p. 209) मानतात.

अद्भुते यथा चन्द्रकस्य—[सुभाषितसुधारत्नभांडागारम् ४०।८१].

४०. 'कृष्णेनाम्ब ! गतेन रन्तुमधुना मृद्भक्षिता स्वेच्छया
सत्यं कृष्ण ! क एवमाह मुसली मिथ्याम्ब ! पश्याननम् ।
व्यादेहीति विकासिते‍ऽथ वदने दृष्ट्वा समस्तं जगत्
माता यस्य जगाम विस्मयपदं पायात्स वः केशवः ॥'

अत्र पाण्डुरांगकरसाक्षिलक्षितमृद्भक्षणाक्षेपोद्यतजननीभयचकितस्यापन्हव-कारिणः शिशोर्विकासितास्यस्यान्तः समस्तजगद्दर्शनेन मातुश्च तत्प्रभावानभिज्ञतया वात्सल्यविह्वलाया विस्मयगमनेनात्युचितोऽयमद्भुतातिशयः ॥

पाठभेद—रन्तुमसकृद् (प्रथम पाद), विकासिते च (तृतीय पाद), श्रीपतिः (चतुर्थ पाद).

सरलार्थ—अद्भुत रसाचे औचित्य, उदाहरणार्थ, चन्द्रकाच्या पुढील श्लोकात आढळेल—

'आई, खेळावयास गेलेल्या कृष्णाने आता इच्छेनुसार माती खाल्ली'. 'कृष्णा ! हे खरे का ?' 'हे तुला कोणी सांगितले, बलभद्रदादाने ? आई, हे (सारे) खोटे आहे, (माझे) तोंड पाहा (हवे तर).' 'तोंड उघड बघू', असे (आईने) म्हटल्यावर उघडलेल्या ज्याच्या तोंडात समस्त जग पाहून आई विस्मय पावली, तो श्रीकृष्ण तुमचे रक्षण करो.

येथे धुळीने माखलेले शरीर व हात या खुणांनी लक्षित (दृग्गोचर) होणाऱ्या मृद्भक्षणाचा आक्षेप घ्यावयास उद्युक्त झालेल्या म्ह० (माती खाण्याबद्दल

कृष्णाला (रांगे भरणाऱ्या) आईच्या धाकामुळे सत्य लपविणाऱ्या शिशूच्या उघडलेल्या तोंडात समस्त जगाचे दर्शन झाल्याने, त्याचा (बाल-कृष्णाचा) प्रभाव न जाणल्याने वात्सल्यव्याकुळ मातेला (परमावधीचे) नवल वाटल्याचे जे वर्णिले आहे त्यायोगे उचित (असा) अद्भुतरसाचा प्रकर्ष झाला आहे.

हे पद्य डॉ० सूर्यकान्त (Kṣemendra Studies, 1954, Index, p. 209) चन्द्रकाच्या नांवावर दाखल करतात.

न तु यथा मम मुनिमतमीमांसायाम्—

४१. 'समस्ताश्चर्याणां जलनिधिरपारः स वसति-
स्ततोऽप्याश्चर्यं यत्पिबति सकलं तं किल मुनिः।
इदं त्वत्याश्चर्यं लघुकलशजन्मापि यदसौ
परिच्छेत्तुं को वा प्रभवति तवाश्चर्यसरणिम् ॥'

अत्रापारसरित्पतिप्रभावेण मुनिना तस्यैकचुलकाचमनेन मुनेश्च लघुकलशजन्मना क्रमाक्रान्तिसमारूढोऽप्यसमविस्मयमयोऽयमद्भुतप्रसरः संसारस्यैवंविधैवाश्चर्यसरणिरपरिच्छिन्ना न किंचिदेतत्कौतुकमित्यर्थान्तरन्याससामर्थ्येन सहसैवावरोपित इव तिरोभूततामुपगतः।

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, माझ्या मुनिमतमीमांसेतील ह्या श्लोकात अद्भुतौचित्य नाही.

तो अपार (अथांग) महासागर समस्त आश्चर्यांचे वसतिस्थान (घर) आहे. त्याहूनही आश्चर्य हे की, त्यासमस्त महासागराला मुनी पिऊन टाकतो. हा मुनी एका लहानशा घड्यापासून जन्मलेला असूनही (सागरप्राशन करतो) हे तर अत्यंत आश्चर्यकारक होय. (प्रपंचा), तुझ्या आश्चर्य परंपरेचे मोजमाप करण्यास कोण समर्थ आहे?

येथे अथांग महासागराचा प्रभाव, मुनीने त्या महासागराचे एक ओंजळीने आचमन करणे, मुनीचा लहानशा घड्यापासून जन्म होणे अशा प्रकारे चढत्या क्रमाच्या वर्णनाने वर्धिष्णु झालेला अद्भुत रसाचा हा विस्तार, प्रपंचाची आश्चर्यपरंपरा अशीच अमर्याद आहे, त्यामुळे (वरील प्रकारात) कोणतेच कौतुकास्पद आश्चर्य नाही अशा प्रकारच्या अर्थान्तरन्यासाच्या सामर्थ्याच्या योगे एकाएकी अवरुद्ध होऊन जणू नाहीसा झाला आहे.

विवरण—आतापर्यंत क्षेमेन्द्राने धर्मकीर्ती, राजशेखर, कालिदास, चंद्रक, मालवरुद्र, श्यामल, परिमल, प्रवरसेन, भवभूती व मुक्तापीड ह्या लहानमोठ्या

कवींच्या काव्यातील श्लोक उद्धृत करून त्यातील औचित्यभंग स्पष्टपणे दाखवून दिला. तसे करताना त्याने कवींच्या प्रतिष्ठेचा बाऊ न करता कठोर, मर्मभेदक टीका करण्यासही मागेपुढे पाहिले नाही. अर्थात दुसऱ्यावर टीका करण्यात प्रायशः सर्वच टीकाकारांना सुख होत असते! परंतु, स्वतःवरही तितक्याच स्पष्टपणे टीका करणारा टीकाकार विरळाच आढळतो. क्षेमेन्द्र ह्या कोटीतला समीक्षक आहे व म्हणूनच त्याच्याबद्दलचा आदरभाव दुणावतो. प्रस्तुत स्थळी त्याने स्वतःचाच एक श्लोक उद्धृत करून त्यातील औचित्यभंगाचे विशदीकरण केले आहे. ते करताना त्याची भाषा मुळीसुद्धा सौम्यरूप धारण करीत नाही. तो 'अद्भुतप्रसरः...सहसैवावरोपित इव तिरोभूततामुपगतः' असेच परखड शब्द वापरतो. अशा प्रसंगी टीकाकार क्षेमेन्द्राची आत्मनिरपेक्ष अथवा निर्मम वृत्तीच प्रतीत होते. आणि क्षेमेन्द्राने एखाद्याच स्थळी स्वतःवर टीका केली आहे अशातला प्रकार नाही. तर प्रस्तुत ग्रंथात त्याने अशा प्रकारे स्वतःवर एकूण सहा वेळा कोरडे ओढून घेतले आहेत. त्याच्या ह्या वृत्तीची अंशतः दखल डॉ॰ काणे यांनीही घेतली आहे. ते आपल्या संस्कृत साहित्यशास्त्राचा इतिहास (मराठी अनुवाद, १९३१, अनुवादक–के.ल. ओगले) या ग्रंथाच्या पृ. ४५ वर लिहितात—"औचित्यविचारचर्चा याचा कर्ता क्षेमेन्द्र कवि यानें तर आपल्याच काव्यांतील दोष आपल्या चर्चाविषयक ग्रंथांत २० व २१ कारिकांत दाखविले आहेत." तात्पर्य, काव्यकृतीचा टीकाकार सहृदय, चिकित्सक, निर्भीड, सदसन्निर्णयपटू व 'मध्यस्थ' वृत्तीचा असावा, असा दंडक टीकाशास्त्राने घालून दिला आहे. क्षेमेन्द्र म्हणजे ह्या दंडकाचे जणू मूर्तिमत उदाहरणच होय.

शान्ते यथा मम चतुर्वर्गसंग्रहे—

४२. 'भोगे रोगभयं सुखे क्षयभयं वित्तेऽग्निभूभृद्भयं
दास्ये स्वामिभयं गुणे खलभयं वंशे कुयोषिद्भयम्।
माने ग्लानिभयं जये रिपुभयं काये कृतान्ताद्भयं
सर्वं नाम भवे भवेद्भयमहो वैराग्यमेवाभयम्॥'

[चतुर्वर्गसंग्रह ४.७]

अत्र सकलजनाभिमतभोगसुखवित्तादीनां भयमयतया हेयतां प्रतिपाद्य वैराग्यमेव सकलभयायासशमनमुपादेयतया यदुपन्यस्तं तेन शान्तरसस्य निरर्गलमार्गावतरणमुचिततरमुपदिष्टं भवति॥

सरलार्थ—शान्तरसाचे औचित्य, उदाहरणार्थ, माझ्या चतुर्वर्गसंग्रहामधील ह्या श्लोकात आढळेल—

भोगात रोगाचे (रोग होण्याचे) भय (असते), सुखात क्षयाचे भय, धनसंपत्तीचे बाबतीत अग्नी व राजा यांचे भय, गुलामगिरीत मालकाचे भय, गुणांमध्ये दुष्टांचे भय, कुलात दूषित स्त्रीचे भय (दुष्ट स्त्री उत्पन्न होण्याचे भय), अभिमानात ऱ्हासाचे भय, विजयात (यशस्वीपणात) शत्रूचे (शत्रू उत्पन्न होण्याचे) भय, शरीराचे बाबतीत मृत्यूचे भय असते. ह्या प्रपंचातील सर्व (वस्तूत) भय आहे, परंतु (ऐका !) फक्त वैराग्य तेवढे अभय आहे.

येथे सर्व लोकांना मान्य (प्रिय) भोग, सुखे, धनसंपत्ती इत्यादी भयमय असल्याने त्याज्य होत असे प्रतिपादून, वैराग्य तेवढेच समस्त भयांच्या दुःखाचे शमन करण्यास समर्थ असल्याने उपादेय (ग्राह्य) होय असे जे वर्णिले आहे त्यायोगे शांतरसाचा अप्रतिहत रीतीने आविष्कार झाला असून त्याचा अतिशय उचित उपदेश झाला आहे.

विवरण—प्रस्तुत श्लोकावर भर्तृहरीच्या खालील श्लोकाची दाट छाया आहे.

'भोगे रोगभयं कुले च्युतिभयं वित्ते नृपालाद्भयं
मानें दैन्यभयं बले रिपुभयं रूपे जराया भयम् ।
शास्त्रे वादभयं गुणे खलभयं काये कृतान्ताद्भयं
सर्वं वस्तु भयान्वितं भुवि नृणां वैराग्यमेवाभयम् ॥'

[वैराग्यशतक ३.३२]

खुद्द क्षेमेन्द्रानेच कविकंठाभरणाच्या द्वितीय संधीत केलेल्या 'उपजीवी' कवींच्या वर्गीकरणानुसार येथे क्षेमेन्द्र 'छायोपजीवी' कवींच्या वर्गात मोडतो. प्रस्तुत श्लोकावरील वृत्तीत क्षेमेन्द्राने मार्ग शब्द पद्धती ह्या अर्थाने वापरला आहे. क्षेमेन्द्राला दंडीचा 'मार्ग' ('रीति') शब्द मान्य असावा असे वाटते. क्षेमेन्द्राने 'वर्त्म' शब्दाचाही प्रयोग कविकंठाभरणात (३।९) केलेला आढळतो.

यथा वा मम मुनिमतमीमांसायाम्—

४३. 'कुसुमशयनं पाषाणो वा प्रियं भवनं वनं
प्रतनु मसृणस्पर्शं वासस्त्वगप्यथ तारवी ।
सरसमशनं कुल्माषो वा धनानि तृणानि वा
शमसुखसुधापानक्षैब्ये समं हि महात्मनाम् ॥'

अत्र सकलविकल्पतल्परहिताभेदावभासमानात्मतत्त्वविश्रान्तिजनितसर्वसाम्यसमुल्लसितशमसुखपीयूषपानोदितनित्यानन्दघूर्णमानमानसानां प्रियाप्रियसुखदुःखादिषु महतां सदृशी प्रतिपत्तिरिति जीवन्मुक्तिसमुचितमभिहितम् ॥

सरलार्थ—अथवा, उदाहरणार्थ, माझ्या मुनिमतमीमांसेतील ह्या श्लोकात औचित्य आढळेल—

फुलांची शेज असो वा दगड असो, सुंदर हवेली असो वा अरण्य असो, मऊ स्पर्शाचे तलम वस्त्र असो अथवा झाडाची सालही असो, सरस भोजन असो वा सातूचे पीठ असो, धनसंपत्ती असो वा तृण असो, शांतीसुखरूपी अमृतपानात मत्त (दंग) असलेल्या महात्म्यांना सर्व सारखेच असते (वाटते).

येथे समस्त विकल्पपरंपरेने रहित अभेदाने अवभासित (प्रतीत) होणाऱ्या आत्मतत्त्वरूपी अन्तापासून उत्पन्न होणाऱ्या सर्वांविषयीच्या समतेच्या भावनेने परिपूर्ण अशा शांतिसुखरूपी अमृताच्या प्राशनापासून उदय पावणाऱ्या नित्यानन्दात निमग्न राहणाऱ्या महात्म्यांची प्रिय, अप्रिय, सुख, दुःख इत्यादींविषयी सारखीच धारणा असते असे (जे वर्णन केले आहे) ते जीवन्मुक्तांना अनुरूप असेच आहे.

टीप—क्षेमेन्द्राने स्वतःच्या काव्यातील जो विविध उदाहरणपद्ये सादर केली आहेत त्यांवरून त्याची वाणी भिन्न रसांनी युक्त काव्यरचना करण्यात सारखीच तरबेज होती असे वाटते. क्षेमेन्द्राचे हे काव्यरचनावैदग्ध्य परिश्रमपूर्वक कमावलेले आहे.

न तु यथा श्रीमदुत्पलराजस्य—[सुभाषितसुधारत्नभांडागारम् २६३।४२]

४४. 'अहौ वा हारे वा बलवति रिपौ वा सुहृदि वा
मणौ वा लोष्टे वा कुसुमशयने वा दृषदि वा।
तृणे वा स्त्रैणे वा मम समदृशो यान्तु दिवसाः
क्वचित्पुण्यारण्ये शिव शिव शिवेति प्रलपतः ॥'

अत्र जीवन्मुक्तोचितं प्रियाप्रियरागद्वेषोपशमलक्षणमोक्षक्षमं सर्वसाम्यमहिहारसुहृदरिसमदृष्टिरूपमभिदधता क्वचित्पुण्यारण्ये यदभिहितं तद्विकल्पप्रतिपादकमभेदवासनाविरुद्धमनुचितमवभासते। धाराधिरूढसर्वसाम्यविगलितभेदाभिमानग्रन्थेर्हि सर्वत्र सर्वं शिवमयं पश्यतस्तपोवने नगरावस्करकूटे च विमलात्मलाभतृप्ततया समानदृशः क्वचित्पुण्यारण्यादिवचनमनुचितोच्चारणमेव।

पाठभेद—यान्ति (तृतीय चरण), क्वचित्पुण्येऽरण्ये (चतुर्थ चरण)

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, श्रीमत् उत्पलराजाच्या पुढील श्लोकात औचित्य नाही—

सर्पात अथवा हारात, बलशाली शत्रूत अथवा मित्रात, रत्नात अथवा

मातीच्या ढेकळात, पुष्पांच्या शेजेत अथवा दगडात, गवतात वा तरुण स्त्रियांच्या समूहात समान दृष्टी असलेल्या माझे दिवस एखाद्या पुण्य अरण्यात शिव, शिव, शिव असे म्हणत जावोत.

येथे जीवन्मुक्ताला अनुरूप, प्रियाविषयीचा अनुराग व अप्रियाविषयीचा द्वेष यांच्या उपशमाच्या स्वरूपाचा मोक्ष देणारे, सर्प-हार-शत्रु-मित्र इत्यादींविषयीचे समदृष्टिरूप सर्वसाम्य (आपल्या ठायी आहे असे) म्हणणाऱ्याने क्वचित् पुण्यारण्ये असे जे म्हटले आहे ते भेदप्रतिपादक असून अभेद वासनेच्या विरुद्ध (अतएव) अनुचित वाटते. (कारण) सर्वसाम्यदृष्टी शिगेला पोचल्यामुळे (धारा = शिखर) ज्याची भेदाभिमानाची ग्रंथी नष्ट झाली आहे अशा सर्वत्र सर्व मंगलमय (शिवमय) पाहणाऱ्या आणि तपोवनाचे तसेच शहरातील उकिरड्याचे बाबतीत निर्मळ आत्मज्ञानाच्या लाभामुळे आत्मा संतृप्त असल्याने समान दृष्टी झालेल्या महात्म्याच्या तोंडचे क्वचित्पुण्यारण्ये इत्यादी वचन अनुचितच होय.

विवरण—जीवन्मुक्ताची लक्षणे अशी—'जीवदवस्थायां त्यक्तसंसारः, हर्षशोकादिरहितत्वे सति स्वस्वरूपज्ञानवत्त्वम् ।' (भिक्षु-गौरीशंकरकृत सर्वतंत्रसिद्धान्तपदार्थलक्षणसंग्रहः–संवत् २००६, पृ. ८८). श्रीमत् उत्पलराजाने तापसाच्या तोंडी पुण्यारण्य शब्द घातला आहे. वस्तुतः समदर्शी ('सर्वत्रब्रह्मदर्शी; मित्रारिपक्षयोः अपक्षपाती ।'–तत्रैव–पृ. २१५) तापसाने पुण्यापुण्याचा विवेक करता कामा नये. म्हणूनच क्षेमेन्द्राला पुण्यारण्य शब्द आक्षेपार्ह वाटतो. प्रस्तुत गद्यवृत्तीवरून क्षेमेन्द्राची तत्त्वज्ञानातही किती उत्तम गती होती, ते दिसून येते. क्षेमेन्द्राने सोळाव्या कारिकेपासून येथपर्यंतच्या विवेचनात ईर्ष्याविप्रलंभ शृंगार, अभिलाष शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स, अद्भुत, शान्त एवढ्या रसांच्या औचित्याचा सोदाहरण विचार केला आहे. त्यावरून त्याला 'नव' रस मान्य होते असा निष्कर्ष निघतो. भरताने शान्तरसाव्यतिरिक्त उरलेले आठ रस मानले आहेत. (अष्टौ नाट्ये रसाः स्मृताः । नाट्यशास्त्र ६.१६.१७) कालिदासालाही भरताचे अष्टरसच माहीत होते. (अष्टरसाश्रयः प्रयोगः । विक्रमोर्वशीय २.१८). दंडीदेखील आपल्या काव्यादर्शात 'इह त्वष्टरसायत्ता रसवत्ता स्मृता गिराम् ।' (काव्यादर्श २.२९२) असेच म्हणतो. शान्त रसाचा आद्य उल्लेख उद्भटाच्या काव्यालंकारसारसंग्रहात (४–४) आढळतो, तो असा-बीभत्साद्भुतशान्ताश्च नव नाट्ये रसाः स्मृताः ॥ रुद्रटानेही आपल्या काव्यालंकारात (१५. १५-१६) 'सम्यग्ज्ञानप्रकृतिः शान्तो विगतेच्छनायको भवति' असे म्हटले आहे. आनंदवर्धनाने ध्वन्यालोकात (४-५) तृष्णाक्षयसुख हा

शान्ताचा स्थायीभाव मानला आहे. ध्वन्यालोक म्हणतो—'मोक्षलक्षण एवैकः परः पुरुषार्थः शास्त्रनये काव्यनये च तृष्णाक्षयसुखपरिपोषलक्षणः शान्तो रसो महाभारतस्य अंगित्वेन विवक्षितः ॥' दशरूपककार धनंजय रति, उत्साह, जुगुप्सा, क्रोध, हास, स्मय, भय व शोक हे अष्ट स्थायीभाव नाटकात परिपुष्ट होतात व त्यांनाच अनुक्रमे श्रृंगार, वीर, बीभत्स, रौद्र, हास्य, अद्भुत, भयानक व करुण रस म्हणतात तसेच शम नांवाचा स्थायीभावही काही शास्त्रज्ञ मानतात व त्याचा परिपोष म्हणजेच शान्त रस होय, असे म्हणतो. (दशरूपक ४-३५, ४४ व ४५). एकंदरीने क्षेमेन्द्र उद्भटोत्तरकालीन विचारसरणीचा अनुयायी दिसतो.

रससंकरौचित्यं दर्शयितुं आह—

यथा मधुरतिक्ताद्याः रसाः कुशलयोजिताः ।
विचित्रास्वादतां यान्ति श्रृङ्गाराद्यास्तथा मिथः ॥ १७ ॥

तेषां परस्पराश्लेषात्कुर्यादौचित्यरक्षणम् ।
अनौचित्येन संस्पृष्टः कस्येष्टो रससंकरः ॥ १८ ॥

रसाः कटुकमधुराम्ललवणाद्याः कुशलसूदेन वेसवारपानादिषु योजिता विचित्रास्वादतामुपयान्ति तथैव परस्परमविरुद्धाः श्रृंगारादय इति । तेषामन्योन्यमङ्गाङ्गभावयोजनायामौचित्यस्य जीवितसर्वस्वभूतस्य रक्षां कुर्यात् । अनौचित्यरजसा रससंयोगः स्पृष्टो न कस्यचिदभिमत इत्यर्थः ॥

सरलार्थ—रसांच्या संकराचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे कुशल स्वयंपाक्याने (चातुर्याने) योजिलेल्या गोड, कडू इत्यादी रसांना सुंदर गोडी प्राप्त होते त्याप्रमाणे श्रृंगार इत्यादी (काव्यगत रसांची) परस्परांशी (अनुकूलपणे) कौशल्याने योजना केली गेल्यास त्यांना (रसांना) सुंदर आस्वाद्यता प्राप्त होते.

त्यांच्या (श्रृंगारादी रसांच्या) परस्पर-मिश्रणाच्या साह्याने औचित्याचे संरक्षण करावे. अनौचित्याचा स्पर्श झालेला रसांचा संकर कोणाला अभीष्ट (प्रिय) वाटतो ?

(ज्याप्रमाणे) कुशल स्वयंपाक्याने वेसवार (मेतकुटासारखे तोंडीलावणे) पेय इत्यादीं (पदार्थां) मध्ये योजिलेल्या तिखट, गोड, आंबट इत्यादी रसांना आल्हादकारक रुची प्राप्त होते, त्याप्रमाणेच परस्परांना अनुकूल श्रृंगारादी रसांनाही (आह्लादकारक आस्वाद्यता प्राप्त होते). त्यांची परस्परांच्या प्रधान-

अप्रधान-भाव-स्वरूपाने योजना करताना (काव्याचे) जीवितसर्वस्व असलेल्या औचित्याचे संरक्षण करावे (औचित्य पाळावे). अनौचित्यरूप धुळीने मिश्रित (असा) रसांचा संयोग कोणाला (च) अभिमत नसतो, हा अभिप्राय.

विवरण—जेव्हा दोन वा अधिक रस कथानकाच्या संबंधाने किंवा कवीच्या इच्छेने एकमेकात मिसळलेले असतात तेव्हा रससंकर झाला असे म्हणतात. आता वस्तुतः रस हा आनंदरूप असल्यामुळे त्याच्या ठायी अंगांगी-भाव इत्यादी संभवत नाहीत. म्हणून रससंकर शब्दातील 'रस' शब्दाचा अर्थ स्थायीभाव असा घ्यावयाचा असतो. रससंकरही रसाप्रमाणेच चमत्कारोत्पादक असून तो अंगांगीभावाने, जन्यजनकभावाने (एक रस दुसऱ्या रसाचा उत्पादक) व स्वातंत्र्याने (अनेक रस परस्परनिरपेक्षपणे एकत्र येणे) असा तीन प्रकारे होत असतो. क्षेमेन्द्राने फक्त पहिल्याच प्रकाराचा निर्देश केला आहे. जेव्हा काव्यातील एक रस प्रधान (अंगी) असून दुसरा वा दुसरे रस अंगभूत (अप्रधान) असतात तेव्हा त्यांचा अंगागीभावाने संकर झाला असे म्हणण्यात येते. परस्पर-अविरोधी (म्ह० मित्रवत्) असलेल्या रसांचा संकर होत असतो, म्हणूनच क्षेमेन्द्राने गद्यवृत्तीत अविरुद्ध शब्द योजिला आहे.

व्यवहारगत रस शब्दाचा अर्थ पदार्थाचे सार असा आहे. उदा० उसाचा रस, इत्यादी. हा रस अर्थात् रुची गुण असून तो केवळ रसनेंद्रियालाच (जिभेच्या अंगच्या शक्तीलाच) जाणवतो. (रसनेंद्रियमात्रग्राह्यो गुणः रसः ।) ह्या रसाचे न्यायवैशेषिक दर्शनात सहा किंवा सात प्रकार मानण्यात आले आहेत. उदा० तर्कसंग्रह, तर्कसार, तर्ककौमुदी, तर्कामृत, हे न्यायवैशेषिकांचे प्रकरणग्रंथ मधुर, अम्ल, लवण (खारट), तिक्त (कडू), कषाय (तुरट) व कटु (तिखट) असे सहा प्रकार मानतात. आणि काणादसिद्धान्तचन्द्रिका व सप्तपदार्थी हे ग्रंथ वरील सहा प्रकारांखेरीज 'चित्र' रस हा सातवा प्रकार मानतात. चित्ररस म्हणजे वरील सहांहून विलक्षण (वेगळी) प्रतीती देणारा रस. रस हा पार्थिव व जलीय पदार्थांमध्ये राहात असून मानवनिर्मित जल व पार्थिव पदार्थ ह्यांमधील रस अनित्य (कायम न टिकणारा) असून जलीय परमाणूंतील रस नित्य (कायम टिकणारा) असतो असे वैशेषिक मानतात. आपल्या दैनंदिन खाण्यातील पदार्थात तिखट, खारट, इत्यादी रसांचे उत्तम मिश्रण साधलेले असते म्हणून ते पदार्थ आस्वाद्य (रुचकर, चविष्ट) लागतात. अर्थात हे मिश्रण योग्य (उचित) प्रमाणात झालेले असणे आवश्यक असते. तद्वत् काव्यातही शृंगारादी रसांचे परस्परमिश्रण उचित प्रमाणात व स्वरूपात होणे आवश्यक असते, नाहून काव्याची आस्वाद्यता दूषित होते किंवा कमी

होते, ही क्षेमेन्द्राची विचारसरणी आहे. एवंच, रसांप्रमाणेच रसांच्या संकराला औचित्याचे अधिष्ठान असणे अत्यावश्यक असते. औचित्य नाही म्हणजे रस नाही हे जसे खरे, तसेच औचित्य नाही म्हणजे रससंयोगही नाही, हेही तितकेच खरे. क्षेमेन्द्राने गद्यवृत्तीत उल्लेखिलेला 'वेसावार' हा शब्द मेतकूटासारख्या तोंडीलावण्याच्या पदार्थाचा वाचक असून तो पदार्थ अजून कोकणात प्रचारात आहे.

रससंकरौचित्ये शान्तश्रृंगारयोरंगांगिभावो यथा भगवतो महर्षेर्व्यासस्य—

४५. 'सत्यं मनोरमा रामाः सत्यं रम्या विभूतयः।
किन्तु मत्तांगनाऽपांगभंगिलोलं हि जीवितम्॥'

अत्र भगवता जन्तुहिताभिनिविष्टेन मोक्षक्षमोपदेशेऽङ्गिनः शान्तरसस्य रागिजनानिष्टत्वात्सकलजनमनःप्रल्हादने बालगुडजिह्विकया श्रृंगारेऽङ्गभावमुपनीते पर्यन्ते शान्तस्यैव लोलं जीवितमित्यनित्यताप्रतिपादनपरिनिर्वाहेण परममौचित्यमुच्चैः कृतम्।

सरलार्थ—रसांच्या संकराच्या औचित्यामध्ये शांत व श्रृंगार (ह्या दोन) रसांचा अंगांगीभाव (प्रधान-अप्रधान-भाव), उदाहरणार्थ, पूज्य महर्षी व्यास ह्यांच्या (श्लोकात) आढळेल—

रमणी सुंदर असतात हे खरे; विभूती (ऐश्वर्ये) रमणीय असतात (हे ही) खरे; परंतु जीवन मत्त (मस्त !) स्त्रियांच्या कटाक्षपातासारखे चंचल असते.

येथे पूज्यपाद व्यास महर्षींनी प्राण्यांच्या कल्याणाच्या अभिनिवेशाने, मोक्षास (मोक्षप्राप्तीस) समर्थ उपदेशात प्रधान शांतरसाला, तो अनुरागी व्यक्तींना इष्ट वाटत नसल्यामुळे व श्रृंगार सकल लोकांच्या मनांना आल्हादकारक असल्याने 'बालगुडजिव्हिका' न्यायाने, श्रृंगार रसाचे अंग बनविले आहे. शेवटी, जीवन चंचल असते अशा शब्दांनी (जीवनाच्या) अनित्यतेच्या प्रतिपादनाने समारोप करून शांत रसाचेच श्रेष्ठ औचित्य उत्कृष्टपणे प्रकट केले आहे.

विवरण—हाच श्लोक ध्वन्यालोकात (३।८६ कारिकेवरील विवेचनात) 'कश्चन विरक्तो वदति' असा प्रस्ताव करून उद्धृत करण्यात आला आहे. व्यास महर्षींबद्दल क्षेमेन्द्राच्या मनात विलक्षण पूज्यबुद्धी दिसते. त्याने आपल्या तिन्ही शास्त्रीय ग्रंथात व्यासांचे प्रत्येकी एकेक पद्य उद्धृत केले आहे. तिन्ही

ग्रंथांमधून क्षेमेन्द्राने व्यासांना 'भगवान व्यास' असेच संबोधिले आहे. कवि-कंठाभरणात (द्वितीय संधी) व्यास हे भुवनोपजीव्य कवी होत असा त्यांचा गौरव केलेला आहे. क्षेमेन्द्राने आपल्या भारतमंजरीत हरिवंशसमाप्तीनंतरच्या श्लोकांक ११ मध्ये सत्यवतीपुत्र व्यासांना 'ज्ञाननिधि' हे विशेषण लावले आहे. आणि त्यानंतर त्यांच्या स्तुतिपर 'व्यासाष्टक' रचिले आहे. क्षेमेन्द्राने आपल्या सुवृत्ततिलकात (१।३) व्यासांना 'नमश्छन्दोनिधानाय सुवृत्ताचार-वेधसे। तपःसत्यनिवासाय व्यासायामिततेजसे' ॥ अशी यथार्थ आदरांजली वाहिली आहे. तो स्वतःला व्यासदास म्हणवतो. त्याच्या मती व्यासांचे महा-भारत म्हणजे इतर लहानमोठ्या कवींना आपापल्या काव्यरचना करून उप-जीविका चालविण्यास उपयोगी पडणारे साधन होय (इदं कविवरैः सर्वैराख्यान-मुपजीव्यते। उदयं प्रेप्सुभिर्भृत्यैरभिजातः इवेश्वरः ॥—कविकंठाभरण-द्वितीय संधी). प्रस्तुतच्या 'सत्यं-मनोरमा···' इत्यादी श्लोकातील जीवित चंचल आहे ह्या कल्पनेची क्षेमेन्द्राच्या 'कान्ताकटाक्षचटुलानि च जीवितानि।' (रामायणमंजरी, समाप्तिपर श्लोकक्रमांक ७) ह्या चरणावर कशी छाप पडली आहे ते बघण्यासारखे आहे.

बीभत्सशृंगारयोरंगांगिभावो यथा मम बौद्धावदानकल्पलतायाम्—(२४.१११)

४६. 'क्षीबरयेवाचलस्य द्रुतहृतहृदया जम्बुकी कण्ठसक्ता
रक्ताभिव्यक्तकामा कमपि नखमुखोल्लेखमासूत्रयन्ती।
आस्वाद्यास्वाद्य यूनः क्षणमधरदलं दत्तदन्तव्रणांकम्
लग्नानंगक्रियायामियमतिरभसोत्कर्षमाविष्करोति॥'

अत्रश्लेषोपमया तुल्यकक्षाधिरूढयोरपि परस्परविरुद्धयोरर्थयोर्बीभत्सशृंगा-रांगांगिभावयोजनायां जम्बुकी तरुणशवस्य क्षीबस्येव निश्चलस्थितेः सहसैव हृतहृदयपद्मा कृष्टचित्ता वा, कण्ठे लग्ना शोणिते भृशमभिव्यक्तस्पृहा रक्ता-भिव्यक्तकामा वा, नखोल्लेखमासूत्रयन्ती दत्तदन्तव्रणमधरमास्वाद्यास्वाद्यांग-च्छेदक्रियायामनंगभोगक्रियायां वा, लग्ना गात्राणामूर्ध्वगतं कर्षणं रतकौशलोत्कर्षं वा, प्रकाशयतीति समानयोर्बीभत्सशृंगारयोः कामिनीपदपरित्यागेन केवलं जम्बुक्याः कर्तृत्वेन बीभत्सस्यैव प्राधान्ये शृंगारेऽङ्गतामुपगते वक्तुर्बोधि-सत्त्वस्यान्तर्गतगाढवैराग्यवासनाधिवासितचेतसः कुत्साईजुगुप्सया नितम्बिनी-रतिविडम्बनमौचित्यरुचिरतामादधाति। यद्यप्यत्र महावाक्ये शान्तस्यैव प्राधान्यं तथाप्युदाहरणश्लोकवाक्ये बीभत्सस्यैव ॥

सरलार्थ—बीभत्स व शृंगार ह्या दोन रसांच्या (संकराच्या औचित्यातील)

प्रधानाप्रधानभाव, उदाहरणार्थ, माझ्या बौद्धावदानकल्पलतेतील ह्या श्लोकात दिसेल.

मत्त तरुणाप्रमाणे असलेल्या निश्चल तरुणावर आकृष्ट झालेली ही कोल्ही त्याच्या गळ्यास झोंबली आहे (पक्षीं, मत्त तरुणावर आसक्त झालेली कामिनी त्याच्या गळ्याला भिडली आहे), रक्तप्राशनाच्या आत्यंतिक इच्छेने त्याच्या मुखावर नखांनी ओरखडे ओढीत आहे (पक्षीं, कामिनी आपली अनुरक्ती अभिव्यक्त करून कामक्रीडेच्या इच्छेने तरुणाचे मुख नखांकित करीत आहे), त्याच्या खालच्या ओठाचा पुनःपुन्हा चावा घेऊन त्यावर दाताचे व्रण उठवीत आहे (पक्षीं, कामिनी पुन्हापुन्हा तरुणाच्या अधराचे उत्कटतेने चुंबन घेऊन त्यावर आपले दंतव्रण उमटवीत आहे), शरीराचे लचके तोडण्याच्या क्रियेत निमग्न झाली आहे (पक्षीं, रतिक्रीडेत कामिनी लीन होऊन गेली आहे) आणि शरीराची गात्रे वर जोराने खेचीत आहे (पक्षीं, आपले रतिक्रीडेतील परमोच्च कौशल्य आविष्कृत करीत आहे).

येथे, श्लेषोपमेच्या साह्याने, समान पातळीवर पोचलेले असूनही परस्परांहून विरुद्ध असलेले जे दोन अर्थ (आहेत त्यांच्या) बीभत्सरस व शृंगाररस यांच्या अंगांगीभावात्मक (प्रधानाप्रधानभावात्मक) योजनेत, कोल्ही निश्चेष्ट तरुणाच्या शवावर, मत्ततरुणाच्या हृदयकमलावर लुब्ध व्हावे त्याप्रमाणे, एकाएकीच आकृष्ट झाली अथवा गळ्याला झोंबली; तिने रक्ताविषयी इच्छा अभिव्यक्त केली अथवा अनुरक्त होऊन कामेच्छा अभिव्यक्त केली; नखांनी ओरखडे ओढले; दाताचे व्रण निर्मिले अथवा खालच्या ओठाचा पुन्हापुन्हा आस्वाद घेतला; ती शरीराचे लचके तोडण्याच्या क्रियेत अथवा कामोपभोगांच्या क्रियेत मग्न झाली; शरीराचे अवयव वर खेचती झाली अथवा स्वतःचे उत्कृष्ट रतिकौशल्य प्रदर्शित करती झाली, अशा प्रकारे (प्रस्तुत श्लोकात) बीभत्स व शृंगार हे समान असले तरीही कामिनी शब्द वापरलेला नसल्याने केवळ कोल्हीच्या कर्तृत्ववर्णनाने बीभत्साचेच प्राधान्य झाले असून शृंगार अंगभूत (अप्रधान) झाला आहे. ज्याच्या अंतरंगात प्रगाढ वैराग्याची वासना वसत आहे अशा बोधिसत्त्वाचे (बुद्धभिक्षूचे) वक्तव्य (हे वचन) निंदार्ह जुगुप्सेने सुन्दरीच्या रतिक्रीडेचे अनुकरण करणारे औचित्यसौंदर्य प्रकट करीत आहे. जरी येथील महावाक्यात (बौद्धावदानकल्पलता ह्या दीर्घ काव्यात) शान्तरसच प्रधान असला तरीदेखील उदाहरणादाखल दिलेल्या (प्रस्तुत) श्लोकवाक्यात बीभत्सरसच प्रधान आहे.

विवरण—उदाहरणश्लोकात एका तरुणपुरुषाच्या शवाचे एक कोल्ही

भक्षण करीत असल्याचे वर्णन करण्यात आले आहे. परंतु, श्लिष्ट पदांच्या साह्याने, एक तरुणी एका मत्त तरुणाशी रतिक्रीडा करीत असल्याचेही चित्रण साधले आहे. रतिक्रीडासमयी नखोल्लेख करणे, दंतव्रण करणे, इत्यादी क्रिया सामान्यतः होतात. त्या क्रियांचेही वर्णन श्लेषोपमेने येथे साधले आहे. श्लेषालंकारामुळे कोल्हीच्या घृणास्पद क्रियांमध्ये शृंगाराचीही अभिव्यक्ती होत आहे.

वीरकरुणयोर्यथा मम मुनिमतमीमांसायाम्—

४७. 'गाण्डीवस्रुवमार्जनप्रणयिनः स्नातस्य बाष्पाम्बुभि—
श्चण्डं खाण्डवपावकादपि परं शोकानलं बिभ्रतः।
जिष्णोर्नूतनयौवनोदयदिनाच्छिन्नाभिमन्योश्चिरं
हा वत्सेति बभूव सैन्धववधारब्धाभिचारे जपः॥'

अत्र त्रिगर्तसंग्रामगतस्य गाण्डीवधन्वनः शत्रुभिर्नवयौवनोदयसमयनिहततनयस्य कार्मुकस्रुवमुन्मार्जयतः प्रसरदश्रुस्नातस्य शोकाग्निमुद्वहतश्चिरं हा पुत्रेति जयद्रथवधारब्धाभिचारे जपो बभूवेति यदुपन्यस्तं, तेनारिक्षये दीक्षासमुचितव्रतवर्णनया शोकाग्नेश्चण्डत्वेन खाण्डवपदोदीरणेन वीररसस्यांगिनः सहसैवागन्तुके करुणरसे प्रज्वलिते सैन्धववधारब्धाभिचाराभिधानेन पर्यन्ते शौर्यनिर्वाहेण परममौचित्यमुज्जृम्भते ॥

सरलार्थ—वीर व करुण या दोन रसांच्या (संकराच्या औचित्यातील प्रधानाप्रधानभाव), उदाहरणार्थ, माझ्या मुनिमतमीमांसेतील ह्या श्लोकात आढळेल.

गाण्डीव धनुष्यरूपी पळी (स्रुव म्हणजे होमात तूप वगैरे पदार्थ टाकण्याची लाकडी पळी) घासण्यास आवडीने लागलेल्या, आसवांच्या जलाने न्हालेल्या, खांडवाग्नीहूनही प्रचंड व प्रखर शोकानल धारण करणाऱ्या अशा अर्जुनाने, ऐन तारुण्यात (शब्दशः नवतारुण्याच्या उदयकाली) अभिमन्यूचा वध झाला असता, 'बाळा, मुला !' असा केलेला शोक जयद्रथवधासाठी सुरू केलेल्या जारणमारणमंत्रातील जप झाला (जपासारखा भासला).

येथे, त्रिगर्तांशी युद्ध करण्यास गेलेल्या, गांडीवधनुष्य धारण करणाऱ्या, शत्रूंनी ज्याचा नुकताच तारुण्यात पदार्पण केलेला पुत्र मारला आहे अशा, कार्मुक (धनुष्य) रूपी लाकडी पळी घासणाऱ्या, गळणाऱ्या अश्रूंनी न्हालेल्या, आणि शोकरूपी अग्नी वाहणाऱ्या (अर्जुनाचा) 'मुला ! वत्सा ! 'असा दीर्घकाल

चाललेला शोक जयद्रथाच्या वधासाठी आरंभिलेल्या जारणमारणमंत्राच्या जपासारखा झाला असे जे वर्णन केले आहे त्यायोगे, शत्रूच्या संहारार्थ (घेतलेल्या) दीक्षेस अनुरूप व्रताचे वर्णन झाले असल्यामुळे, शोकरूपी अग्नीच्या प्रचंडत्वामुळे, खांडव शब्दाच्या उच्चारामुळे, वीर ह्या प्रधान रसाच्या वर्णनात एकाएकी करुण-रस आगंतुकासारखा प्रज्वलित झाला आहे. (परंतु) जयद्रथवधासाठी सुरू केलेल्या जारणमारणाच्या उल्लेखाने शेवटी शौर्यात समारोप होऊन उत्कृष्ट औचित्य प्रकट झाले आहे.

शान्त-शृंगार-करुण-बीभत्सानां यथा मम तत्रैव—

४७. 'तीक्ष्णान्तस्त्रीकटाक्षक्षतहृदयतया व्यक्तसंसक्तरक्ताः
क्रोधादिक्रूररोगव्रणगणगणनातीततीव्रव्यथार्ताः ।
स्नेहक्लेदातिलग्नैः कृमिभिरिव सुतैः स्वांगजैर्भक्ष्यमाणाः
संसारक्लेशशय्यानिपतिततनवः पश्य सीदन्ति मन्दाः ॥'

अत्र मुख्यस्य अंगिनः शान्तरसस्यैवोद्दीपने कारणीभूतास्तीक्ष्णान्तस्त्री-कटाक्षक्षतहृदयव्यथार्तस्नेहक्लेदातिलग्नकृमितुल्यतनयादिपदोपादानेन शृंगार-करुणबीभत्साः शान्तमुखप्रेक्षिणः संलीनतया सीमितवृत्तयो भृत्या इव परममौ-चित्यं दर्शयन्ति ॥

सरलार्थ—शान्त, शृंगार, करुण व बीभत्स ह्या चार रसांच्या (संकराच्या औचित्यातील प्रधानाप्रधानभाव), उदाहरणार्थ, माझ्या त्याच (म्ह० मुनिमत-मीमांसा ह्या ग्रंथातील) ह्या श्लोकात आढळेल—

स्त्रियांच्या तीक्ष्ण कटाक्षांनी अंतःकरणे विद्ध झाल्यामुळे आसक्ती व अनुरक्ती व्यक्त करणारे, क्रोध इत्यादी क्रूर (वेदनादायक) रोगांच्या असंख्य व्रणांमुळे तीव्र वेदनांनी व्याकुळ झालेले, स्नेहाच्या (प्रेमाच्या) ओलाव्याला चिकटलेल्या कृमींप्रमाणे (असलेल्या) स्वतःच्याच संततीकडून भक्षिले जाणारे, संसाराच्या क्लेशरूपी शेजेवर पडलेले मन्द पुरुष दुःखीकष्टी आहेत, त्यांना बघ.

येथे, स्त्रियांच्या तीक्ष्ण कटाक्षांमुळे विद्धहृदय, व्यथार्त, स्नेहरूपी ओला-व्याला बिलगलेले, कृमीसदृश पुत्र इत्यादी शब्दांच्या प्रयोगामुळे, मुख्य म्हणजे प्रधान जो शान्त रस त्याच्याच उद्दीपनास कारणीभूत झालेले शृंगार, करुण व बीभत्स (हे रस) शान्त रसाचे मुख पाहणारे (शान्त रसावर अवलंबून)

आहेत. ते उत्कृष्टपणे (शान्त रसात) लीन झालेले असल्याने, जणू मर्यादा राखून वागणाऱ्या सेवकांप्रमाणे, उच्च श्रेणीचे औचित्य प्रदर्शित करीत आहेत.

रससंकरस्यानौचित्यमुद्भावयितुमाह । शृंगारशान्तयोर्यथाऽमरकस्य—

४९. 'गन्तव्यं यदि नाम निश्चितमहो गन्तासि केयं त्वरा
द्वित्राण्येव दिनानि तिष्ठतु भवान्पश्यामि यावन्मुखम् ।
संसारे घटिकाप्रणालविगलद्वारा समे जीविते
को जानाति पुनस्त्वया सह मम स्याद्वा न वा सङ्गमः ॥'

[अमरुशतक—१६३]

अत्र प्रकरणवर्तिनः शृंगाररसस्य पश्यामि यावन्मुखमित्युत्कण्ठोत्कण्ठासमुज्जृम्भमाणस्य स्वभावविरोधिनि शान्तेऽङ्गभावमुपनीते विस्तीर्णतरनित्यतावर्णनया वैराग्येण रतेर्न्यग्भावमापादयन्त्या प्रधानरससम्बन्धेनाधिकमनौचित्यमुत्साहितम् । निःसारसंसाराचारुताश्रवणेन हि कठिनक्रियाक्रूरचेतसामप्युत्साहभङ्गादङ्गान्यलसीभवन्ति, किमुत कुसुमसुकुमारशृंगाररसकोमलमनसां विलासवताम् । प्रान्ते च शान्तपरिपोषनिर्वाहेण रागवैरस्यमेव पर्यवस्यति । तदुक्तमानन्दवर्धनेन—

**'विरोधी वाऽविरोधी वा रसोऽङ्गिनि रसान्तरे ।
परिपोषं न नेतव्यस्तेन स्यादविरोधिता ॥**

तदेवात्र वैपरीत्येनोपलभ्यते । परिपोषविपरते स्वभावविरोधिन्यपि प्रधानानुपरोध एव ॥

सरलार्थ—रसांच्या संकराचे अनौचित्य प्रतीत करविण्यासाठी म्हणतात. शृंगार व शान्त या रसांच्या संकराचे अनौचित्य, उदाहरणार्थ, अमरकाच्या ह्या श्लोकात आढळेल—

असो, जाण्याचा निश्चयच असेल तर अवश्य जा. पण इतकी घाई कसली ? आणखी दोन-तीनच दिवस थांब. तोपर्यंत तुझे मुख मी चांगले न्याहाळीन. जीवन घटिकापात्रामधून ठिबकणाऱ्या जलबिंदूप्रमाणे (विनाशी) आहे. त्यामुळे तुझ्याशी फिरून माझे मीलन होईल की न होईल, ते कोणी सांगावे ?

येथे, 'तोपर्यन्त मी तुझे मुख न्याहाळीन' इत्यादी सोत्कंठ शब्दांनी परिपुष्ट झालेल्या प्रकरणगत (प्रधान) शृंगार रसाचा स्वाभाविक विरोधी जो शान्त रस तो अंगभूत असून, (संसाराच्या) अनित्यतेच्या विस्तृत वर्णनाने

वैराग्यभावाचा (परिपोष होऊन) त्यायोगे रती (श्रृंगाराच्या स्थायीभावा) चा तिरस्कार झाल्याने प्रधान (मुख्य) रसाविषयी अधिक अनौचित्य निर्माण झाले आहे. संसार निःसार व असुंदर असल्याचे ऐकून क्रूर कर्मे करणाऱ्या निष्ठुर अंतःकरणाच्या पुरुषांचाही उत्साहभंग होऊन त्यांची गात्रे गळून जातात, तर मग फुलाप्रमाणे सुकुमार अशा श्रृंगार रसाप्रमाणे कोमल अंतःकरणे असलेल्या विलासी जनांची (संसाराची निःसारता व असुंदरता ऐकून काय स्थिती होत असेल) ते काय सांगावे ? आणि सरतेशेवटी शान्त रसाच्या परिपोषाच्या समारोपाने अनुरागवैरस्यातच (प्रकरणाचे) पर्यवसान होते. आनन्दवर्धनाने म्हटले आहे—

'दूसरा रस अंगी (प्रधान) असताना विरोधी वा अविरोधी (अनुकूल) रसाचा परिपोष साधू नये. त्यायोगे अविरुद्धता उत्पन्न होईल.'

तेच येथे विपरीतपणे उपलब्ध होत आहे. (विरोधी वा अविरोधी अंगभूत रसाचा) परिपोष झाला नाही तर (तो रस अंगी रसाचा) स्वाभाविक विरोधी असला तरीदेखील तो प्रधान रसाला अडथळा न करणाराच ठरतो (म्हणजे प्रधान रसाला अनुकूलच ठरतो).

विवरण—रससंकराच्या औचित्याची उदाहरणे देऊन झाल्यावर क्षेमेन्द्राने येथे अनौचित्याचे उदाहरणही स्मरणपूर्वक दिले आहे. आपला ग्रंथ पद्धतशीर व स्वयंपूर्ण व्हावा ह्यासाठी क्षेमेन्द्राने बाळगलेली ही दक्षता कौतुकास्पद आहे. वरील उदाहरणश्लोक क्षेमेन्द्राने आपल्या कविकंठाभरणाच्या द्वितीय संधीत 'पादोपजीवी' कवीचे विवेचन करताना उद्धृत केला आहे. हाच श्लोक सुभाषितावलीतही (क्रमांक १०५९) आढळतो. वस्तुतः, रसाप्रमाणेच रससंकरही चमत्कार उत्पन्न करणारा असतो. परंतु, रससंकर रसांची परस्परमैत्री व रसांचा परस्पर-विरोध लक्षात घेऊन साधावयाचा असतो. श्रृंगाररस चित्तवृत्तींचे उद्दीपन करतो तर शान्त रस त्यांचा उपशम करतो. त्यामुळे शान्त रस श्रृंगाराचा विरोधी मानण्यात आला आहे. प्रस्तुत श्लोकात श्रृंगाररस प्रधान असूनही सबंध श्लोकाच्या चार पादांपैकी अखंड दोन पादात संसाराच्या असारतेचे म्हणजेच वैराग्याचे वर्णन करण्यात आले आहे. ते अर्थातच 'रति' भावाच्या वर्णनाहून विस्तृत असल्यामुळे रतिभावाची उत्कटता नष्ट झाली आहे. त्यामुळे क्षेमेन्द्राची टीका योग्यच आहे. विलासीजनांविषयी क्षेमेन्द्राने काढलेले उद्गार एकीकडे त्याचे मानसशास्त्राचे ज्ञान प्रकट करतात व दुसरीकडे त्याची रसिकता प्रदर्शित

करतात. स्वतःच्या भूमिकेच्या पुष्ट्यर्थ क्षेमेन्द्र सरतेशेवटी आनंदवर्धनाची एक कारिका उद्धृत करून व तिच्या आधारे विवेचन करून प्रस्तुत श्लोकातील रससंकराचे अनौचित्य स्पष्टपणे दाखवून देतो. विवेचन परिपूर्ण व सांगोपांग करण्याची कोण ही खबरदारी! आनन्दवर्धनाची म्हणून क्षेमेन्द्राने उद्धृत केलेली कारिका ध्वन्यालोकात खालीलप्रमाणे थोड्याशा फरकाने आढळते—

'अविरोधी विरोधी वा रसोऽङ्गिनि रसान्तरे।
परिपोषं न नेतव्यस्तथा स्यादविरोधिता॥

[ध्वन्यालोक ३.२४]

ज्या अमरुकाचा श्लोक क्षेमेन्द्राने येथे उद्धृत केला आहे त्या अमरुकाविषयी आनंदवर्धन ध्वन्यालोक ३.७ ह्या कारिकेवरील वृत्तीत पुढीलप्रमाणे उद्गार काढतो–'मुक्तकेषु हि प्रबन्धेष्विव रसबन्धाभिनिवेशिनः कवयो दृश्यन्ते। यथा ह्यमरुकस्य कवेर्मुक्तकाः शृंगाररसस्यन्दिनः प्रबन्धायमानाः प्रसिद्धा एव।'

यथा राजशेखरस्य—

५०. 'माणं मुञ्चध देह वल्लहजणे दिट्ठं तरंगुत्तरम्
तारुण्णं दिअहाइं पंच दह वा पीणत्थणुत्थंभणं
इत्थं कोइलमंजुसिंजिदमिसा देवस्स पंचेसुणो
दिण्णा चेत्तमहूसवेण सहसा आणव्व सव्वंकसा॥'

[कर्पूरमंजरी १.१७]

अत्र 'मानं मुञ्चत ददत वल्लभजने दृष्टिं तरङ्गितां, तारुण्यं दिनानि पञ्च दश वा पीनस्तनस्तम्भनमित्थं कोकिलमधुरध्वनिव्याजेन देवस्य पंचेषोश्चैत्रमहोत्सवेनाज्ञेवसर्वंकषा दत्ता,' इति वाक्ये मुख्यः शृंगाररसः प्रारंभपर्यन्तव्यापिशाली कतिपयदिवसस्थायि यौवनमित्यनित्यतारूपशान्तरसबिन्दुना मध्यमुद्रितेनेव विरसतां न नीतः, विरुद्धस्य परिपोषाभावात्। विरुद्धवर्णनोदितेन ह्यनौचित्येन स्थायी कुंजर इव श्वभ्रपातितः पुनरुत्थातुं नोत्सहत इत्यलं विस्तरेण। अनया दिशा रससंकरे भेदप्रपंचौचित्यं विपश्चिद्भिः स्वयं विचार्यम्॥ १८॥

वरील प्राकृत श्लोकाचे संस्कृत रूपान्तर असे—

'मानं मुञ्चत ददतवल्लभजने दृष्टिं तरंगोत्तराम्
तारुण्यं दिवसानि पंच दश वा पीनस्तनस्तंभनम्।

इत्थं कोकिलमञ्जुशिञ्जितमिषाद् देवस्य पंच-इषोः
दत्ता चैत्रमहोत्सवेन सहसा आज्ञेव सर्वंकषा ॥'

सरलार्थ—(विरोधी रसाचा परिपोष न साधल्याचे) उदाहरणार्थ, राजशेखराच्या ह्या श्लोकात आढळेल—

अभिमान सोड, प्रियकराकडे तरंगपूर्ण कटाक्ष फेक, पुष्ट स्तनांचे स्तंभन करणारे तारुण्य पांच अथवा दहा दिवस (अल्पकाळ) टिकेल, अशा प्रकारे कोकिळेच्या मंजुळ कूजनाचे निमित्त करून चैत्रातील महोत्सवाने मदनदेवाची सर्वंकष आज्ञाच एकाएकी दिली.

येथे, 'अभिमान (ताठा) टाक, प्रियकराकडे तरंगित दृष्टिक्षेप टाक, पुष्ट स्तनांचे स्तंभन करणारे यौवन पांचदहा दिवस टिकेल, अशाप्रकारे कोकिलेच्या मधुर ध्वनीचे निमित्त करून मदनदेवतेची सर्वंकष आज्ञाच चैत्रातील महोत्सवाने दिली,' ह्या वाक्यात शृंगार हा प्रधान रस प्रारंभापासून अखेर-पर्यंत (सर्व श्लोकास) व्यापून आहे. तारुण्य थोडेच दिवस टिकणारे असते, अशा प्रकारच्या मध्येच काढलेल्या अनित्यतारूपी शान्तरसपर उद्गारबिन्दूने (किंचिद् वर्णनाने) शृंगार रसाचा विरस झालेला नाही, कारण विरुद्धाचा परिपोष (साधलेला) नाही. विरुद्धाच्या (विरोधी रसाच्या) वर्णनापासून उत्पन्न होणाऱ्या अनौचित्यामुळे स्थायीभाव, खड्डयात पाडल्या गेलेल्या हत्ती-प्रमाणे, पुन्हा वर उठण्यास समर्थ होत नाही. असो, अधिक विस्तार नको. ह्याच पद्धतीने रससंकरविषयक इतर भेदांच्या औचित्याचा विद्वानांनी स्वतःच विचार करावा.

विवरण—ह्यापूर्वीच्या 'गन्तव्यं...' इत्यादी श्लोकावरील विवेचनात क्षेमेन्द्राने विरोधी...' इ. आनंदवर्धनाची कारिका उद्धृत करून प्रकृत रसाला स्वभावतः विरोधी असलेल्या रसाचा जर परिपोष साधला नाही तर तो रस विरोधी असूनही प्रधान रसाला मारक न ठरता पोषक वा अनुकूलच ठरतो असे निरूपण केले आहे. त्यात येऊन गेलेल्या एका महत्त्वाच्या विचाराच्या स्पष्टीकरणासाठीच प्रस्तुतचा राजशेखराचा प्राकृत उदाहरणश्लोक क्षेमेन्द्राने दिला आहे. प्रस्तुत श्लोकात शृंगार हा मुख्य रस आहे. शृंगाराचा विरोधी जो शान्त रस त्याची पुसटशी छटा 'यौवन हे अल्पकाळ टिकणारे असते' ह्या वचनात उमटलेली आहे हे खरे, परंतु ती छटा गडद नाही, तिचा परिपोष साधलेला नाही. तसा तो साधला गेला असता तर शृंगारविपरीत (विरुद्ध)

जो शान्त रस त्याच्या परिपोषामुळे प्रधान रस जो शृंगार त्याची हानी झाली असती. राजशेखराने ती होऊ दिलेली नाही व त्यामुळेच स्वभावविरोधी रसही येथे मुख्यानुरोधकच झाला आहे.

विरुद्धरसवर्णनोत्पन्न अनौचित्य स्थायीभावाला खड्ड्यात टाकते हे क्षेमेन्द्राचे वर्णन जितके अचूक तितकेच गमतीदारही आहे. येथील क्षेमेन्द्राच्या विवेचनावरुन समीक्षक क्षेमेन्द्राचा साक्षेपच प्रकर्षाने जाणवतो.

मर्मस्थान सातवे—क्रियापद

रसौचित्य-विचारानन्तरमुद्देशानुसारेण क्रमोपगतं क्रियापदौचित्यं दर्शयितुमाह—

सगुणत्वं सुवृत्तत्वं साधुता च विराजते ।
काव्यस्य सुजनस्येव यद्यौचित्यवती क्रिया ॥ १९ ॥

काव्यस्य माधुर्यादिगुणवत्ता वसन्ततिलकादि-सुवृत्तता परिपूर्णलक्षणसाधुता च विराजते, यद्यौचित्ययुक्तं क्रियापदं भवति । सुजनस्येवेति तत्तुल्यत्वं स्पष्टार्थमेव ॥

सरलार्थ—रसाच्या औचित्याच्या विचारानंतर पूर्वोद्दिष्ट क्रमानुसार (क्रम) प्राप्त क्रियापदाचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे एखाद्या सज्जनाची क्रिया (म्ह० त्याचा व्यवहार) औचित्ययुक्त असेल तर त्याचा सद्गुणीपणा, सद्वर्तन व संभावितपणा हे सगळे शोभून दिसते, त्याप्रमाणे काव्यातील क्रिया (क्रियापद) जर औचित्ययुक्त असेल तर त्या काव्याचे गुण, त्यातील सुंदर वृत्ते व इतर लक्षणांची परिपूर्णतारूपी सुंदरता ह्या गोष्टी शोभून दिसतात.

काव्याची माधुर्यादी गुणवत्ता, वसन्ततिलकादी सुंदर वृत्तरचना, आणि परिपूर्णलक्षणरूपी निर्दोषता ही सर्व, जर काव्यातील (म्ह० वाक्यातील) क्रियापद औचित्ययुक्त असेल, तर शोभून दिसतात. 'सुजनस्येव' इत्यादी शब्दांनी जे काव्यसादृश्य दाखवले आहे, त्याचा अर्थ स्पष्टच आहे.

विवरण—शिस्तप्रिय क्षेमेन्द्र रसौचित्यविचारानंतर आता क्रियापदौचित्यविचाराकडे वळला आहे. 'रसौचित्यविचार—' हे शब्द आपल्याला औचित्यविचारचर्चा ह्या ग्रंथशीर्षकाची तसेच ग्रंथस्थ मध्यवर्ती प्रतिपाद्याची आठवण करून देतात. क्षेमेन्द्राने कारिका ८ ते १० मध्ये प्रतिपाद्य विषयाच्या अर्थात् औचित्यस्थानांचा उद्देश केला आहे (उद्देश करणे म्हणजे वस्तूचा केवळ

नामनिर्देश करणे). त्यामध्ये रसानंतर क्रियेचा क्रमांक लावलेला आहे. त्याचाच त्याने येथे प्रारंभी उल्लेख केला आहे. रसौचित्यविचारचर्चेने ग्रंथकायेची बरीच जागा व्यापिलेली असल्यामुळे वाचकांना उद्दिष्ट क्रमाचा कदाचित् विसर पडला असेल, ह्या आशंकेने तो उद्देशाचे स्मरण करवीत आहे. यावरून त्याची सावधानता व त्याचा पद्धतशीरपणा हे गुण किती परिणत झाले होते, त्याची साक्ष पटते. क्षेमेन्द्राने गुणौचित्याची चर्चा चौदाव्या कारिकेत सोदाहरण केलेलीच आहे. त्यामुळे प्रस्तुत कारिकेतील 'सगुणत्वं' पद उपेक्षून 'सुवृत्तत्वं' पदाकडे वळावयास हरकत नाही. क्षेमेन्द्राने आपल्या सुवृत्ततिलकात 'सुवृत्तत्वाविषयी' अनेक जागी विचार केलेला आहे. त्यांपैकी प्रकृतास लागू असे काही विचारकण असे—सुवृत्ते चमत्कारोत्पादक असतात (१।५); प्रसंगोचित 'सुवृत्त' बद्ध काव्य म्हणजे प्रसंगोचित सज्जनाचे सद्वर्तन (३।१२); निर्दोष व सगुण सुवृत्तांनी काव्य शोभते (३।१); वर्ण्यविषय व भावना यांना उचित ते सुवृत्त (३।७). एवं च सुवृत्ततिलक व औचित्यविचारचर्चा ह्या दोन ग्रंथातील क्षेमेन्द्राची वैचारिक भूमिका परस्परपूरक आहे. त्याने सुवृत्ततिलकात वसन्ततिलका इत्यादी सत्तावीस वृत्तांची लक्षणोदाहरणपूर्वक गुणदोषचर्चा केली आहे. [वसन्ततिलका वृत्ताची लक्षणोदाहरणे २।२०-२१ मध्ये देण्यात आली असून हे वृत्त वीर व रौद्र या रसांच्या संकराच्या वर्णनात शोभते, असा अभिप्राय त्याने ३।१९ मध्ये व्यक्त केला आहे. त्याच्या मती रत्नाकर कवीची वाणी वसन्ततिलका वृत्त हाताळण्यात विशेष प्रवीण आहे. (३।३२)] क्षेमेन्द्राच्या म्हणण्याचा आशय असा की, काव्यात माधुर्यादी गुण, सुंदर वृत्तरचना व इतर लक्षणांची परिपूर्णता एवढ्याच गोष्टी असून भागत नाही, त्यात औचित्यपूर्ण क्रियापदाची नितान्त आवश्यकता असते.

क्रियापदौचित्यं यथा मम नीतिलतायाम्—

५१. 'यः प्रख्यातजवः सदा स्थितिविधौ सप्ताब्धिसंध्यार्चने
दोर्दर्पेण निनाय दुन्दुभिवपुर्यः कालकङ्कालताम् ।
यः पातालमसृङ्मयं प्रविदधे निष्पिष्य मायाविनं
सुग्रीवाग्र्यविभूतिलुण्ठनपटुर्वाली स किं स्मर्यते ॥'

अत्र सप्ताब्धिसंध्यार्चनप्रख्यातजवो महिषरूपदुन्दुभिदानवोन्माथी मायाविदानवनिष्पेषोद्भूतशोणितपूरितपातालतलः स किं वाली स्मर्यत इति क्रियापदेन शुकसारणाभ्यां रावणस्य दुर्नयाभिनिवेशिनस्तद्विरामाय हितोपदेशेन भवान् वसनकोणनियमिततनुः कक्षायां निःक्षिप्त इत्युचितयुक्तियुक्तमुक्तं भवति ॥

सरलार्थ—क्रियापदाचे औचित्य, उदाहरणार्थ, माझ्या नीतिलतेतील ह्या श्लोकात आढळेल.

जो सप्तसागरांच्या तटावर संध्यार्चनासाठी नेहमी उपस्थित असल्यामुळे वेगशाली म्हणून प्रख्यात आहे, ज्याने आपल्या बाहूंच्या दर्पाने दुन्दुभि नामक राक्षसाच्या शरीराला हाडांच्या सापळ्याची स्थिती आणून दिली, ज्याने मायावीला पिळून पाताळ रक्तमय केले आणि जो सुग्रीवाचे ऐश्वर्य लुटण्यात निष्णात होता, अशा वालीचे का स्मरण केले जात आहे ?

येथे, सप्तसागराच्या किनाऱ्यावर संध्येसाठी येत असल्यामुळे आपल्या वेगासाठी प्रसिद्ध, महिषरूपी दुंदुभी नामक दानवाचा निर्दालक, मायावीदानवाला पिळल्यामुळे निर्माण झालेल्या रक्ताने पाताळ भरून काढणारा, असा जो वाली त्याचे का स्मरण केले जात आहे, ह्यामधील 'स्मर्यते' ह्या क्रियापदाने शुक व सारण (नामक रावणाचे दोन दूत) यांनी, दुर्नीतीविषयी अभिनिवेश बाळगणाऱ्या रावणाला दुर्नीतीपासून परावृत्त करण्यासाठी '(त्याने) आपणास वस्त्राच्या टोकाला बांधून बाजूस ठेवून दिले', असा उचित युक्तिवादपूर्ण हितोपदेश दिला.

टीप—क्षेमेन्द्राची गद्यवृत्ती वाचून विदग्ध रसिकाच्या तोंडामधून 'साधु-साधु' असे उद्गार नकळत निघतात.

न तु यथा श्रीप्रवरसेनस्य—

५२. 'सग्गं अपारिजाअं कोत्थहलच्छिरहिअं महुमहस्स उरं ।
सुमिरामि महणपुरओ अमुद्धअन्दञ्च हरजडापब्भारं ।।'

अत्र जाम्बुवताभिधीयमाने 'स्वर्गमपारिजातं कौस्तुभलक्ष्मीभ्यां विरहितं, मधुमथनस्योरः, स्मराम्यमृतकथनपुरतोऽप्यबालचन्द्रं हरजटाप्राग्भारम्' इति प्रगुणगुणाख्यानप्रसङ्गे क्रियापदेन जटाजर्जरशरीरत्वमात्रमेव प्रतिपादितम् । न तु पौरुषोत्कर्षविशेषातिशयः कश्चिदुचितः संसूचितः ।। १९ ।।

वरील प्राकृत पद्याचे संस्कृत रूपान्तर असे—

'स्वर्गमपारिजातं कौस्तुभलक्ष्मीरहितं मधुमथनस्योरः ।
स्मरामि मथनपुरतोऽमुग्धचन्द्रं च हरजटाप्राग्भारम् ।।'

(रावणवह महाकाव्य ४।२०)

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, प्रवरसेनाच्या ह्या श्लोकात क्रियापदौचित्य नाही.

समुद्रमंथनापूर्वीचा पारिजात(वृक्ष)रहित स्वर्ग, मधुदैत्याचे मंथन करणाऱ्या श्रीविष्णूचे कौस्तुभमणी व लक्ष्मी यांनी रहित उर व मुग्धचंद्ररहित असा शंकराचा जटाभार या (सर्वांचे) मी स्मरण करतो.

येथे, गुणोत्कर्षाच्या वर्णनप्रसंगीच्या 'समुद्रमंथनपूर्वकालीन पारिजातरहित स्वर्ग, कौस्तुभ व लक्ष्मी यांनी रहित विष्णूचे उर, चंद्रकोररहित शंकराचा जटाभार यांचे मी स्मरण करतो' ह्या जांबवंताच्या उक्तीतील 'स्मरामि' ह्या क्रियापदाने जटांनी जर्जर झालेल्या शरीराचेच प्रतिपादन झाले आहे. परंतु, पौरुषोत्कर्षाच्या अतिशयाचा कोणताच विशेष येथे चांगल्या प्रकारे सूचित झाला नाही.

विवरण—देव-दानवांनी समुद्रमंथन केले व त्या प्रसंगी लक्ष्मी, कौस्तुभ, पारिजातक, चंद्र इत्यादी चौदा रत्ने उपलब्ध झाली ही पौराणिक कथा सर्वज्ञात आहे. तिचा येथे उल्लेख आहे. समुद्रमंथनापूर्वीचा पारिजातरहित स्वर्ग, कौस्तुभ व लक्ष्मी यांनी रहित विष्णूचे उर व चंद्रकोररहित शंकराचा जटाभार ह्या सर्व गोष्टी पाहिल्याचे आपल्याला आठवते असे जांबवत प्रस्तुत पद्यात म्हणतो. अर्थात्, तो समुद्रमंथनाच्या काळाइतका प्राचीन ठरतो. साहजिकपणेच इतक्या वयोवृद्ध जांबवताच्या डोक्यावरील केस पिकून त्यांच्या जटा झालेल्या असल्याच पाहिजेत. आणि नेमक्या ह्याच गोष्टीवर क्षेमेन्द्राने अचूकपणे बोट ठेवले आहे. जांबवंताच्या स्वगतामधून त्याच्या पौरुषाचे यत्किंचितही दर्शन घडत नाही. फक्त त्याचे शरीर जटांनी जर्जरित झाल्याचे तेवढेच ध्वनित होते. म्हणूनच येथील 'स्मरामि' हे क्रियापद अनुचित आहे अशी टीका क्षेमेन्द्र करतो व ती रास्तच आहे श्लोकस्थ 'जटा' शब्दाधिष्ठित क्षेमेन्द्राचा श्लेष अतिशय रमणीय आहे. त्याची सूक्ष्म दृष्टीही कौतुकास्पद आहे.

प्रवरसेन हा कालिदासाचा समकालीन असून त्याला काव्यरचनेच्या तसेच काव्यशुद्धीच्या बाबतीत कालिदासाने मदत केली असावी असे रावणवह महाकाव्याचे संपादक डॉ० राधागोविंद बसाक त्या ग्रंथास जोडलेल्या प्रस्तावनेत म्हणतात.

मर्मस्थान आठवे—कारक

कारकौचित्यं दर्शयितुमाह—

सान्वयं शोभते वाक्यमुचितैरेव कारकैः ।
कुलाभरणमैश्वर्यमौदार्यचरितैरिव ॥ २० ॥

उचितैरेव कारकैः सदन्वयवद्वाक्यं विराजते सद्वंशभूषितमैश्वर्यं सच्चरितैरिव ।

सरलार्थ—कारकाचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे कुळाचे भूषण असलेले ऐश्वर्य औदार्ययुक्त चरितांनी शोभून दिसते, त्याप्रमाणे अन्वययुक्त वाक्य समुचित अशाच कारकांनी शोभते.

सत्कुलाला ललामभूत ऐश्वर्य सच्चरितांनीच शोभून दिसते. तद्वत् योग्य अन्वयाने युक्त वाक्य उचित कारकांनीच शोभते.

कर्तृपदौचित्यं यथा भट्टबाणस्य—

५३. 'स्तनयुगमश्रुस्नातं समीपतरवर्ति हृदयशोकाग्नेः ।
चरति विमुक्ताहारं व्रतमिव भवतो रिपुस्त्रीणाम् ॥'

[कादंबरी पूर्वभाग २१]

अत्र शत्रुस्त्रियो व्रतं चरन्तीति वक्तव्ये, स्तनयुगं बाष्पसलिलस्नातं शोकाग्निसमीपवर्ति विमुक्तभोजनं विगतमुक्ताहारं च सद्व्रतं चरतीत्युक्ते कर्तृपदमौचित्यमुपचितं जनयति ॥

सरलार्थ—कर्तृपदाचे औचित्य, उदाहरणार्थ, बाणभट्टाच्या ह्या श्लोकात आढळेल.

अश्रूंनी न्हाऊन निघालेले, हृदयस्थ शोकरूपी अग्नीच्या जवळ असणारे, मोत्यांच्या माळेचा त्याग केलेले असे आपल्या शत्रूच्या स्त्रियांचे स्तनयुगल जणू काही व्रत आचरीत आहे.

येथे शत्रूच्या स्त्रिया व्रत आचरीत आहेत, असे (वस्तुतः) म्हणावयाचे असताना, आसवांनी न्हालेले, शोकरूपी अग्नीच्या जवळ असलेले, भोजनाचा व मोत्यांच्या माळेचा त्याग केलेले स्तनयुगल सद्व्रताचे पालन करीत आहे असे म्हटल्याने कर्तृपदाचे औचित्य निर्माण झाले आहे.

टीप—वस्तुतः व्याकरणनैपुण्य हा वैयाकरणांचा प्रांत. तरीही कविचक्रवर्ती होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्याने व्याकरण, न्याय, राजनीती इत्यादी अनेक शास्त्रांशी परिचय करून घेतला पाहिजे असा उपदेश क्षेमेन्द्राने कविकंठाभरणाच्या पांचव्या संधीत केला आहे. त्याच्या अनुषंगानेच येथील विवेचन लक्षात घ्यावयाचे आहे.

न तु यथा परिमलस्य—

५४. 'आहारं न करोति नाम्बु पिबति स्त्रैणं न संसेवते
शेते यो सिकतासु मुक्तविषयश्चण्डातपं सेवते ।

त्वत्पादाब्जरजःप्रसादकणिकालोभोन्मुखस्तन्मरौ
मन्ये मालवसिंह ! गुर्जरपतिस्तीव्रं तपस्तप्यते ॥'

अत्र गुर्जरपतिर्विद्रुतो मरुगहनं प्रविष्टः परित्यक्ताहारादिसमस्तविषयश्चण्डातपोपसेवी तपश्चरतीति यदुक्तं तत्कर्तृपदस्य विशेषाभिप्रायोचितं न किंचिदुपलक्ष्यते, शत्रुत्रासतरलतया मरुकान्तारान्तरावसन्नः सकलविषयसुखभोगपरिभ्रष्टः किमन्यत्कुरुताम् । स्तनयुगवत्कर्तृपदस्य चमत्कारोचितं न किंचिदभिहितम् ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ परिमलाच्या ह्या श्लोकात कर्तृपदौचित्य नाही—

हे मालवाधीश ! गुजरातचा राजा भोजन करीत नाही, पाणी पीत नाही, स्त्रीसमागम करीत नाही, वाळूवर झोपतो. त्याने सर्व प्रकारच्या विषयांचा (उपभोगांचा) त्याग केला असून तो सूर्याच्या प्रखर प्रकाशाचे सेवन करीत आहे. मला असे वाटते की, तुमच्या चरणकमलांच्या धूलिकणांच्या अल्पशा कृपाप्रसादाच्या लोभाने तो मरुभूमीवर घोर तपश्चर्या करीत आहे.

येथे, (पराजित होऊन) पळालेला 'गुजरात देशाचा राजा गहन मरुभूमीत प्रविष्ट झाला असून त्याने आहारविहारादी समस्त विषयोपभोगांचा त्याग केला असून तो प्रखर सूर्यप्रकाश सहन करीत घोर तपश्चर्या करीत आहे,' असे जे वर्णिले आहे ते कर्तृपदाच्या विशेष अभिप्रायाला अनुरूप असे काहीच प्रकट करीत नाही. शत्रूच्या भीतीने थरकाप उडाल्यामुळे मरुकान्तारात ठाण देऊन बसलेला व समस्त विषयोपभोग व सुखे यांना मुकलेला (गुर्जरनृपती) दुसरे काय करणार ? 'स्तनयुग' या शब्दप्रयोगाप्रमाणे कर्तृपदाच्या चमत्कारास उचित असे येथे काहीच म्हटलेले नाही.

विवरण—वस्तुतः प्रस्तुत उदाहरणश्लोकात 'गुर्जरपतिः' ह्या कर्तृपदासंबंधीच कांही विशेष अभिप्राय व्यक्त केला आहे. पराभूत झाल्यामुळे वाळवंटी पळून गेलला तो राजा खात-पीत नाही, वाळूवर झोपतो. त्याने विषयोपभोगांचा व इतर सर्व सुखांचा त्याग केला आहे, इत्यादी वर्णनावरून पराभवाचे शल्य त्याच्या मनात किती तीव्रतेने सलत आहे तेच कवीने दाखवून दिले आहे. त्याच्या ह्या विमनस्क स्थितीचे वर्णन कवीने आणखी कोणत्या शब्दांनी करावयास हवे होते ? पराभूत राजा दुसरे काहीच करू शकणार नाही, हे उघडच आहे. त्यामुळे कर्तृपदाच्या विशेषाभिप्रायाला उचित असे

येथे वर्णन नाही, ही क्षेमेन्द्राची टीका पटत नाही. स्तनयुगाप्रमाणे येथेही एखादे चमत्कारपूर्ण कर्तृपद हवे होते असे म्हणणे अत्याग्रहाचे वाटते. शिवाय, 'स्तनयुगं.........' इत्यादी श्लोकातील विमुक्तभोजनं हा शब्द तरी स्तनयुगाला सरळ कोठे लागू पडतो ? त्या उदाहरणश्लोकात ध्वनिकाव्याची छटा आहे हे मान्य करताना प्रस्तुत उदाहरणश्लोकात औचित्यभंग झालेला आहे असे क्षेमेन्द्राप्रमाणे मानण्याची आवश्यकता नाही.

कर्मपदौचित्यं यथा मम लावण्यवत्याम्—

५५. 'सदा सक्तं शैत्यं विमलजलधारापरिचितं
घनोल्लासः क्ष्माभृत्पृथुकटकपाती वहति यः ।
विधत्ते शौर्यश्रीश्रवणनवनीलोत्पलरुचिः
स चित्रं शत्रूणां ज्वलदनलतापं भवदसिः ॥'

अत्र निश्चलममलजलधारागतं शैत्यं तैक्ष्ण्यं शीतलत्वं च, घनोल्लासः निबिडोत्साहः, पर्जन्यतुल्योदयश्च, क्ष्माभृतां सानुसैन्यनिपाती वहति स शौर्यश्रीश्रवणनवनीलोत्पलतुल्यस्त्वत्खड्गश्चित्रं शत्रूणां संतापं करोतीति यदुक्तं तत्कर्मभूतस्य तापस्य शिशिरतरसामग्रीजन्मनः परं वैचित्र्यं रुचिरमौचित्यमासूत्रितम् ॥

सरलार्थ—कर्मपदाचे औचित्य, उदाहरणार्थ, माझ्या लावण्यवती काव्यातील ह्या श्लोकात आढळेल—

अतिशय तळपणारी व शत्रुराजांच्या प्रचंड सैन्यांचा निःपात करणारी जी तुझी तरवार निर्मळ जलधारांनी वृद्धिंगत केलेली शीतलता नेहमी धारण करते, तीच शौर्यश्रीच्या कानातील नवनीलकमलांचा वर्ण धारण करणारी तुझी तरवार तुझ्या शत्रूंना ज्वलंत अग्नीचा ताप देते, हे विचित्र नव्हे काय ?

येथे निश्चल विमलजलधारेत असणारे शैत्य म्हणजे तीक्ष्णता आणि शीतलता, घनोल्लास म्हणजे दृढ उत्साह व मेघसदृश उदय प्राप्त करणारी राजांची सैन्ये व पर्वतांची शिखरे यांचा निःपात करणारी, शौर्यश्रीच्या कानातील नवनीळकमळाप्रमाणे असलेली तुझी तरवार शत्रूंना ताप देते, हे विचित्र होय, असे जे म्हटले आहे ते अत्यंत शीतल सामग्रीपासून जन्मणाऱ्या कर्मभूत तापाचे फार मोठे वैचित्र्य व सुंदर औचित्य प्रकट करते.

न तु यथा ममैवावसरसारे—

५६. 'भग्नाहितश्वसितवातविबोध्यमानः
काष्ठाश्रयेण सहसैव विवृद्धिमाप्तः ।
तापं तनोति निहतारिविलासिनीनां
वह्निद्युतिर्भुवननाथ ! भवत्प्रतापः ॥'

अत्र विद्रुताराातिनिःश्वसितानिलप्रबोध्यमानः काष्ठाश्रयेण दिक्चक्रपूरणेन प्रौढतां प्राप्तः पावकतुल्यस्त्वत्प्रतापः शत्रुकान्तानां तापमात्रं तनोतीति तत्समुचितमाश्चर्यं न किंचित् ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, माझ्याच अवसरसारातील ह्या श्लोकात कर्मपदौचित्य नाही—

राजन् , अग्नीसारखा तेजस्वी (असा) आपला पराक्रम पराभूत शत्रूंच्या उच्छ्वासवायूंनी प्रज्वलित होऊन दिशारूपी काष्ठाच्या आश्रयाने (म्ह० काष्ठाशी संपर्क झाल्याने) एकाएकीच भडकतो (आणि) मारल्या गेलेल्या शत्रूंच्या स्त्रियांना ताप देतो.

येथे, पराभूत शत्रूंच्या निःश्वासरूपी वायूने प्रज्वलित होणारा, काष्ठांच्या आश्रयाने म्हणजे सर्व दिशात पसरून प्रौढता पावलेला, अग्निसदृश (असा) तुझा पराक्रम शत्रूंच्या स्त्रियांना तापच देतो, असे वर्णन त्याला (म्ह० पराक्रमाशीला) साजेसे आहे, त्यात आश्चर्य काहीच नाही.

विवरण—औचित्याचा पाठलाग करता करता क्षेमेन्द्र कल्पनासौंदर्याच्या आस्वादास कसा मुकतो, त्याचे येथे उत्तम दर्शन घडते ! वस्तुतः, प्रस्तुत उदाहरणश्लोकाचे सारसर्वस्व पहिल्या दोन पादातील रमणीय कल्पनाविलासात सामावलेले आहे. परंतु, तापं ह्या कर्मवाचक शब्दात काही आश्चर्यकारकत्व नसल्यामुळे क्षेमेन्द्राला तो कल्पनाविलास दिसतच नाही ! अनौचित्य असलेच तर ते वह्नि शब्दाच्या प्रयोगात आहे असे म्हणता येईल ! मागे म्हटलेच आहे की, क्षेमेन्द्राने प्रस्तुत ग्रन्थात स्वतःचे सहा श्लोक औचित्यभंगाच्या स्पष्टीकरणासाठी उद्धृत केले आहेत. ह्या प्रकारावरून असे वाटते की, त्याच्या काळातील कविगोष्ठींमध्ये त्याच्याही रचनांवर प्रतिकूल टीका होत असावी व ती ऐकूनच स्वतःची सदोष पद्ये साहित्य-चर्चेत उद्धृत करण्याइतका प्रांजलपणा व 'अहं'-निरपेक्षपणा त्याचे अंगी बाणला असावा. ह्या वृत्तीमधूनच त्याने भाषाप्रभू कवीला शतोपदेश करताना (कविकंठाभरण, द्वितीय संधी) दुसऱ्यांनी घेतलेले

आक्षेप सहन करावेत, मनाचे गांभीर्य ढळू देऊ नये, मन विकारांच्या आहारी जाऊ देऊ नये (२।१९) इत्यादी उपदेश केला असावा.

करणौचित्यं यथा गौडकुम्भकारस्य—

५७. 'लाङ्गूलेन गभस्तिमान्वलयितः प्रोतः शशी मौलिना
व्याधूता जलदाः सटाभिरुडवो दंष्ट्राभिरुत्तम्भिताः।
प्रोत्तीर्णो जलधिर्दृशैव हरिणा स्वैराट्टहासोर्मिभि—
र्लङ्केशस्य च लङ्घितो दिशि दिशि प्राज्यः प्रतापानलः ॥'

अत्र हरिणा हनुमता जलनिधितरणे तरणिर्लाङ्गूलेन वलयितः, किरीटप्रान्तेन शशी प्रोतः, सटाभिर्मेघाः व्याधूतास्तारा दंष्ट्राभिरायासितास्तीर्णोऽब्धिर्दृष्ट्यैवाट्टहासतरङ्गैर्लङ्केशस्य विस्तीर्णः प्रतापाग्निः शमितः इति बहुभिः करणपदैरुत्साहाधिवासितैर्विस्मयशिखरारोहणसोपानैरिव रघुपतिप्रभावारंभविजयध्वजायमानस्य पवनसूनोरौचित्यातिशयः प्रकाशितः ॥

सरलार्थ— करणाचे औचित्य, उदाहरणार्थ, गौडकुंभकाराच्या ह्या श्लोकात दिसेल.

हनुमंताने आपल्या शेपटीने सूर्याला घेरले, किरीटाने चंद्राला स्पर्श केला, केसांच्या मदतीने मेघांना अस्तव्यस्त केले, दाढांनी तारकागण उखडून टाकला, एका दृष्टिक्षेपानेच समुद्र पार केला आणि स्वतःच्या अट्टाहासाच्या लाटांनी लंकेशाचा (रावणाचा) दशदिशात पसरलेला विस्तृत पराक्रमाग्नी उल्लंघून टाकला.

येथे, हरीने म्हणजे हनुमंताने सागर तरून जातेवेळी, शेपटीने सूर्याला घेरले, डोक्यावरील मुकुटाच्या टोकाने चंद्राला स्पर्शिले, केसांनी मेघांना अस्तव्यस्त केले, दाढांनी तारकांना उखडले, दृष्टीनेच सागर पार केला, आणि अट्टाहासतरंगांच्या मदतीने लंकाधिपति रावणाचा विस्तीर्ण प्रतापाग्नी विझविला, अशा प्रकारे विस्मयरूपी शिखरावर चढण्यास (उपयुक्त) जिन्यांप्रमाणे असलेल्या उत्साहयुक्त अनेक करणपदांनी रामाच्या प्रभावाच्या सुरू झालेल्या विजयाची ध्वजपताका असलेल्या हनुमंताचे उत्कृष्ट औचित्य प्रदर्शित झाले आहे.

टीप—प्रस्तुत श्लोकात लाङ्गूलेन इत्यादी तृतीयान्त पदांचा प्रयोग अनिवार्य आहे. त्यात औचित्यातिशय काय आहे, ते क्षेमेन्द्राच्या विवेचनावरून स्पष्ट होत नाही. 'करणपदैः…सोपानैरिव" इत्यादीतील सोपानपरंपरेत वस्तुमहत्त्वक्रम पाळलेला नाही.

न तु यथा भट्टबाणस्य—

५८. 'जयत्युपेन्द्रः स चकार दूरतो
बिभित्सया यः क्षणलब्धलक्ष्यया ।
दृशैव कोपारुणया रिपोरुरः
स्वयं भयाद्भिन्नमिवास्रपाटलम् ॥'

[कादंबरी पूर्वभाग ३]

अत्र भगवतो नृसिंहस्य कोपरक्तया दृष्ट्यैव क्षणलब्धलक्ष्यया हिरण्यकशिपोर्वक्षः स्वयं भयाद्भिन्नमिवेति यदुक्तं तन्महोत्साहपराक्रमस्य प्रतिनायकस्य रिपोः प्रधाननायकप्रतापोद्दीपनोपकरणीभूताधिकधैर्यस्य स्वयं भयविह्वलतया हृदयस्फुटनमित्युपचितमनौचित्यं 'दृशैव' इति करणपदस्य शिरसि विश्रान्तम् ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, बाणभट्टाच्या ह्या श्लोकात करणौचित्य नाही.

ज्याने आपल्या शत्रूचे ऊर दुरून छिन्नभिन्न करण्याच्या इच्छेने, कोपाने लाल झालेल्या व लक्ष्याशी क्षणमात्र गाठ पडलेल्या दृष्टीक्षेपाच्याच साह्याने (ते ऊर) स्वतःच भीतीमुळे एखाद्या लाल फुलाप्रमाणे भिन्न झालेसे केले, तो उपेन्द्र (विष्णू) विजयी होतो (होवो).

येथे कोपाने लाल झालेल्या, लक्ष्याशी क्षणभरच संपर्क पावलेल्या अशा भगवान नृसिंहाच्या दृष्टिक्षेपानेच हिरण्यकशिपूचे ऊर भयामुळे जणू आपोआप भिन्न झाले असे वर्णिले आहे. येथील प्रधान नायक (जो नृसिंह) त्याच्या पराक्रमाच्या उद्दीपनास ज्याचा धैर्यातिशय कारणीभूत होतो आणि जो उत्साही व पराक्रमी आहे अशा प्रतिनायकाचे अथवा शत्रूचे म्हणजे हिरण्यकशिपूचे हृदय आपोआप भयव्याकुळ होऊन विदीर्ण झाले, ह्या वर्णनात अनौचित्याचा परिपोष झाला असून ते (अनौचित्य) 'दृशैव' या करणरूप शब्दाच्या माथ्यावरच विसावत आहे, (दृशैव या शब्दाच्या माथीच येथील अनौचित्याचे खापर फोडले पाहिजे, दृशैव शब्दच अनौचित्यास जबाबदार.)

विवरण—क्षेमेन्द्राच्या सूक्ष्म दृष्टीचा येथे चांगलाच प्रत्यय येतो. नृसिंहाने दुरूनच प्रतिनायक जो हिरण्यकशिपू त्याचा वध करावयास हवा होता. त्यात त्याच्या प्रतापाचा प्रकर्ष जाणवला असता. त्याऐवजी निव्वळ दृष्टिक्षेपानेच प्रतिनायकाचे हृदय विदीर्ण झाल्याचे वर्णन केल्याने नायकाच्या प्रतापप्रदर्शनास अवसरच उरला नाही. पुनः, दृष्टिक्षेपानेच हृदयविदारण झाले अशा वर्णनामुळे अत्युक्तीचे गालबोट काव्याला लागले, ते वेगळेच. एकंदरीने येथील 'दृशैव'

हे तृतीयान्त पद अनौचित्यास जबाबदार आहे, ही क्षेमेन्द्राची विचारसरणी पटते.

संप्रदानौचित्यं यथा भट्टप्रभाकरस्य—

५९. 'दिङ्मातङ्गघटाविभक्तचतुरा घाटा मही साध्यते
सिद्धा सापि वदन्त एव हि वयं रोमाञ्चिताः पश्यत।
विप्राय प्रतिपाद्यते किमपरं रामाय तस्मै नमो
यस्मादाविरभूत्कथाद्भुतमिदं यत्रैव चास्तं गतम् ॥'

अत्र दिग्गजचतुरस्रा भूः साध्यते, सा च सिद्धा हेलयैवान्नमुष्टिरिवैकस्मै विप्रमात्राय प्रतिपाद्यते इति निरतिशयौदार्याश्चर्यचमत्काररुचिरौचित्यचर्वणया वयं रोमाञ्चाञ्चिताः पश्यत, रोमाञ्चस्य प्रत्यक्षपरिदृश्यमानत्वात्, किमपरमपूर्वत्यागिने भार्गवाय तस्मै नम इति विप्रायेति सम्प्रदानपदगत एवोत्कर्षविशेषः प्रकाशते।

सरलार्थ—संप्रदानाचे औचित्य, उदाहरणार्थ, भट्टप्रभाकराच्या ह्या श्लोकात आढळेल—

दिशारूपी हत्तींनी विभागली गेलेली, चारी दिशांस पसरलेली ही विस्तीर्ण पृथ्वी मिळविली (जिंकली) जाते; तीही जिंकली गेली असे म्हणताच आम्ही पुलकित होतो, पाहा! (अशा जिंकलेल्या तिचे) ब्राह्मणाला दान केले जाते, आणखी काय पाहिजे? त्या परशुरामाला प्रणाम असो. त्याचेपासूनच (शब्दशः ज्याचेपासून) ही अद्भुत कथा आविर्भूत झाली व त्याचेच ठायी समाप्तही झाली.

येथे, दिग्गजरूपी टोके असलेली पृथ्वी मिळविली जाते (लोक पृथ्वीला अंकित करण्याचा प्रयत्न करतात) आणि ती प्राप्त झाली असता अगदी सहजासहजी मूठभर धान्य द्यावे त्याप्रमाणेच एका ब्राह्मणाला दान म्हणून दिली जाते अशा प्रकारच्या, आत्यंतिक औदार्याच्या आश्चर्यजनक व चमत्कारसुंदर औचित्यवर्णनाच्या आस्वादाने आम्ही पुलकित झालो आहोत, पाहा. असे वर्णन करण्याचे कारण असे की, शरीरावरील रोमांच प्रत्यक्ष स्पष्टपणे दिसतात. आणखी काय सांगावे? अपूर्व त्याग करणाऱ्या त्या भार्गवाला नमस्कार असो, अशा वर्णनात 'विप्राय' ह्या संप्रदानपर शब्दातच विशेष उत्कर्ष प्रकट होत आहे.

विवरण—क्षेमेन्द्राला 'विप्राय' शब्दात औचित्योत्कर्ष प्रतीत होतो. प्रस्तुत

लेखकाला मात्र 'परशुरामासारखा दाता झाला नाही व होणार नाही,' असे सुच-विणारा चवथा पाद सर्वाधिक महत्त्वाचा व सौंदर्यपूर्ण वाटतो.

न तु यथा राजशेखरस्य—

६०. 'पौलस्त्यः प्रणयेन याचत इति श्रुत्वा मनो मोदते
देयो नैष हरप्रसादपरशुस्तेनाधिकं ताम्यति ।
तद्वाच्यः स दशाननो मम गिरा दत्ता द्विजेभ्यो मही
तुभ्यं ब्रूहि रसातलत्रिदिवयोर्निर्जित्य किं दीयताम् ॥
[बालरामायण २.२०]

अत्र रावणदूतेन परशुं याचितो भार्गवो ब्रूते—"नैष हरप्रसादलब्धः परशुर्दानयोग्यः । तत्तस्माद् अस्मद्वचसा स दशग्रीवो वाच्यः–पृथ्वी मया कश्यपाय प्रतिपादिता, तुभ्यं पातालत्रिदिवयोर्मध्यात् किं निर्जित्य दीयताम्" इत्यनुचितं मुनेर्लोकहितप्रवृत्तस्य त्रैलोक्यकण्टकभूताय राक्षसाय भुवनप्रतिपादनम् ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, राजशेखराच्या (ह्या श्लोकात संप्रदानौचित्य) नाही—

पौलस्त्य (रावण) प्रेमपूर्वक (अथवा नम्रतेने) याचना करीत आहे, हे ऐकून मन आनंदित होते. (परंतु) हा शिवकृपाप्रसादस्वरूप परशू दानार्ह नाही ह्या जाणीवेने (मन) अधिकच संतप्त होते. तेव्हा माझा निरोप म्हणून त्या दशानना(रावणा)ला सांग की, मी पृथ्वी ब्राह्मणांना दिली आहे. पाताळ व स्वर्ग यांपैकी कोणते जिंकून मी तुला द्यावे, ते तू(च) सांग.

येथे रावणाच्या दूताने परशुरामाकडे परशूची मागणी केली असता परशुराम म्हणतो—-शंकराच्या कृपाप्रसादामुळे प्राप्त झालेला हा परशू दान करण्यास योग्य नाही. म्हणून माझ्या वतीने त्या दशग्रीव रावणाला असे सांग की, पृथ्वी मी कश्यप ऋषीला दान म्हणून दिली आहे. पाताळ व स्वर्ग यांपैकी कोणते जिंकून मी तुला देऊ ? ह्या शब्दांनी, तिन्ही जगांचे कल्याण करण्यास प्रवृत्त झालेल्या मुनीने तिन्ही जगांना काट्याप्रमाणे त्रास देणाऱ्या राक्षसाला भुवनाचे दान करण्यास उद्युक्त व्हावे, हे अनुचित आहे.

विवरण—परशुराम लोकहितैषी आहे. लोकांचे कल्याण करण्यास तो प्रवृत्त झाला आहे. त्याने पृथ्वी जिंकून तिचे ब्राह्मणांना दान करण्यात औचि-

त्यच दाखविले. परंतु, त्रैलोक्यहिततत्पर परशुरामाने त्रैलोक्यास काट्याप्रमाणे सलगाऱ्या रावणाला 'तुला कोणती वस्तू जिंकून देऊ ?' असे विचारण्यात मोठेच अनौचित्य दाखविले. कारण त्रिभुवनकंटकभूत रावण दानार्ह नाही, त्यामुळे त्यास दान करण्यास परशुरामाने उद्युक्त व्हावयास नको होते. म्हणूनच येथे संप्रदानौचित्य आहे. या संदर्भात 'यत्पार्वती······' इत्यादी श्लोकावरील क्षेमेन्द्राची पुढील टीका प्रस्तुत श्लोकावरील टीकेशी कशी समान्तर आहे, ते पाहण्यासारखे आहे—"न चैतद्विद्मः कथं भक्ष्यभूता कुसुमकोमलाङ्गी पुरुषादाय प्रतिपाद्यते इत्यनौचित्येन प्रसिद्धेन वृत्तवैपरीत्यं परं हृदयविसंवादमादधाति ।।" विचार व शब्द ह्या दोहोंचे साम्य लक्षणीय आहे. मात्र प्रस्तुत म्हणजे पौलस्त्यः इ. श्लोकात द्विजेभ्यो हे बहुवचनी पद आहे, वृत्तीत कश्यपाय असे एकवचनी पद आहे, ह्याची दखल क्षेमेन्द्राने घेतलेली दिसत नाही.

अपादानौचित्यं यथा मालवरुद्रस्य—

६१. 'एतस्माज्जलधेर्मिताम्बुकणिकाः काश्चिद्गृहीत्वा ततः
पाथोदाः परिपूरयन्ति जगतीं रुद्धाम्बरा वारिभिः ।
भ्राम्यन्मन्दरकूटकोटिघटनाभीतिभ्रमत्तारकां
प्राप्यैकां जलमानुषीं त्रिभुवने श्रीमानभूदच्युतः ।।'

अत्र यदुक्तमेतस्मान्महोदधेः परिमिताम्बुकणिकाः प्राप्य जलदा जगत्पूरयन्ति, तथा भ्रमन्मन्दरकूटकोटिसंघट्टत्रासतरलतारकामेकां जलमानुषीं श्रियं प्राप्य श्रीमानच्युतोऽभूदिति तेन सागरगतनिरतिशयोत्कर्षविशेषः प्रदर्शितः । तत्र एतस्माज्जलधेरित्येतत्पदमौचित्यस्य मूलभूमिः ॥

सरलार्थ—अपादानाचे औचित्य, उदाहरणार्थ, मालवरुद्राच्या ह्या श्लोकात आढळेल.

ह्या सागरामधून काही जलकण ग्रहण करून त्यांच्या साह्याने आकाशाला झाकोळून टाकणारे मेघ पाण्यांनी (म्ह० पाण्याने) जग भरून टाकतात. भ्रमण करणाऱ्या मन्दार पर्वताच्या कोटयवधी शिखरांवर आदळण्याच्या भीतीमुळे दृष्टी चंचल झालेल्या एका जलपरीस प्राप्त करून विष्णू त्रिभुवनात श्रीमान (श्रीने म्ह० लक्ष्मीने) युक्त झाला.

ह्या महासागरापासून मर्यादित जलकण मिळवून मेघ जग भरून टाकतात, तसेच भ्रमण करणाऱ्या मंदार पर्वताच्या अनेक शिखरांवर आपटण्याच्या भीतीमुळे चंचल दृष्टी झालेल्या जलपरीरूपी ऐश्वर्याला प्राप्त करून विष्णू श्रीमान झाला

असे जे येथे म्हटले आहे त्यायोगे सागराच्या आत्यंतिक उत्कर्षाचा विशेष प्रदर्शित झाला आहे. ह्या उत्कर्षविशेषाचे बाबतीत 'ह्या जलधीपासून' हे पद औचित्याची उत्थानभूमी होय.

विवरण—समुद्रमंथनप्रसंगी जी चौदा रत्ने उत्पन्न झाली त्यांपैकी लक्ष्मी हे एक होय. ते रत्न सागरापासून प्राप्त झाले. ते लाभल्यामुळे श्रीविष्णू लक्ष्मीने युक्त म्हणजे श्रीमान झाला. म्हणूनच 'एतस्माज्जलधेः' हे पद औचित्याचे मूल उद्गमस्थान आहे असे क्षेमेन्द्राचे समर्थन आहे. मात्र काव्यार्थच इतका रमणीय आहे की, 'एतस्माज्जलधेः' पदाचे काव्यात काही विशेष स्थान आहे असे चटकन प्रतीत होत नाही. येथील 'अच्युत' शब्द रसिकाला क्षेमेन्द्राच्या इष्ट देवतेची व औचित्य-सिद्धान्ताची आठवण करून देतो.

न तु यथा भट्टेन्दुराजस्य—

६२. 'आदाय वारि परितः सरितां मुखेभ्यः
किं नाम साधितमनेन महार्णवेन ।
क्षारीकृतं च वडवादहने हुतं च
पातालमूलकुहरे विनिवेशितं च ॥'

अत्र महार्णवव्यपदेशेनान्यायोपार्जितद्रविणदुर्व्ययकारिणः सत्संविभागविमुखस्य कस्यचिदुच्यते । सरितां मुखेभ्यः समन्तात्तोयमादाय अपात्रेभ्यः प्रतिपादितं दूषितम् । यत्त्वत्र सरिद्भ्यः समादायेति वक्तव्ये सरिन्मुखेभ्यः इति यदुक्तं मुखशब्दस्य नैरर्थक्यादत्रानौचित्यमेव पर्यवस्यति ॥

पाठभेद—किं तावदर्जितमनेन दुरर्णवेन (द्वितीय पाद), पातालकुक्षिकुहरे (चतुर्थ पाद)

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, भट्टेन्दुराजाच्या ह्या श्लोकात अपादानौचित्य नाही.

ह्या महासागराने भोवतालच्या नद्यांच्या मुखांमधून पाणी घेऊन, खरोखर, काय साधले ? (ग्रहण केलेले पाणी) खारट बनविले, वडवानलात टाकले (आहुती दिली) आणि पाताळाच्या मूळ विवरात ठेवून दिले.

येथे महार्णवाच्या वर्णनाच्या मिषाने अन्यायाने संपत्ती मिळवून तिचा अपव्यय करणाऱ्या व तिची यथायोग्य विभागणी करण्यापासून दूर राहणाऱ्या (योग्य विभागणी न करणाऱ्या) व्यक्तीचे वर्णन केले आहे. चहूकडील नद्यांच्या मुखांमधून पाणी घेऊन (गोळा करून) ते अपात्र व्यक्तींना देणे हा दोष होय. परंतु येथे, नद्यांपासून घेऊन असे म्हणावयाचे असताना नद्यांच्या मुखांपासून

घेतले असे जे म्हटले आहे, त्यातील मुख शब्द निरर्थक असल्यामुळे येथे अनौचित्यातच पर्यवसान झाले आहे.

विवरण—विवक्षित अर्थाचा बोध होण्यास ज्या शब्दांची आवश्यकता असते त्यापेक्षा जास्त शब्द जेव्हा विनाकारण वाक्यात घातलेले असतात तेव्हा अधिकपदत्व नावाचा दोष होतो असे संस्कृत साहित्यशास्त्रज्ञ मानतात. (पाहा —काव्यप्रकाश ७।८). प्रस्तुत काव्यात मुखेभ्यः हा शब्द अधिकचा म्हणजे विनाकारण वापरलेला आहे. म्हणून परंपरागत संस्कृत साहित्यशास्त्राच्या दृष्टीने येथे अधिकपदत्व हा दोष झाला आहे.

अधिकरणौचित्यं यथा कुन्तलेश्वरदौत्ये कालिदासस्य—

६३. 'इह निवसति मेरुः शेखरः क्ष्माधराणां
इह विनिहितभाराः सागराः सप्त चान्ये ।
इदमहिपतिभोगस्तम्भविभ्राज्यमानं
धरणितलमिहैव स्थानमस्मद्विधानाम् ॥'

अत्र महाराजदूतोऽपि सामन्तास्थाने स्वप्रभुसमुचितगौरवपूजार्हमासनमनासाद्य कार्यवशेन भूमावेवोपविष्टः प्रागल्भ्यगांभीर्येणैवं ब्रूते—यथाऽस्मद्विधानां वसुधातल एव भुजगपतिभोगस्तंभप्राग्भारनिष्कम्पे धरासने स्थानं युक्तं यस्मादिहैव मेरुरचलचक्रवर्ती समुपविष्टः सप्तमहाब्धयश्च, तत्तुल्यतैवास्माकमित्यौचित्यमधिकरणपदसंबद्धमेव ॥

वरील उदाहरणश्लोक बल्लाळकृत भोजप्रबंधात क्रमांक ११३ वर पुढील स्वरूपात आढळतो—

इह निवसति मेरुः शेखरो भूधराणा-
मिह हि निहितभाराः सागराः सप्त चैव ।
इदमतुलमनन्तं भूतलं भूरिभूतोद्-
भवधरणसमर्थं स्थानमस्मद्विधानाम् ॥

तसेच, हे पद्य क्रीडाचन्द्राचे असल्याचे भोजप्रबंधाच्या ११५ व्या श्लोकात म्हटले आहे.

सरलार्थ—अधिकरणाचे औचित्य, उदाहरणार्थ, कालिदासाच्या कुन्तलेश्वरदौत्यातील ह्या श्लोकात आढळेल—

येथे पर्वतांचा मुकुटमणी (असलेला) मेरुपर्वत राहातो आणि येथे इतर सात समुद्रांनी आपापला भार ठेवला आहे. येथे धरणीतल सर्पश्रेष्ठ शेषाच्या फणेवर विराजमान आहे (आणि) येथेच आमच्यासारख्यांना योग्य स्थान आहे.

कोणा महाराजाचा दूत मांडलीक राजाकडे गेला असता स्वतःच्या धन्याला (म्ह० महाराजाला) अनुरूप गौरवास्पद व पूजार्ह आसन न लाभल्याने कार्य-वशात् भूमीवरच बसता झाला व (स्वतःच्या) प्रगल्भतेने व गंभीरपणे असे म्हणाला—पृथ्वीतलाचा प्रचंड भार सर्पश्रेष्ठा(शेषा)च्या फणारूपी स्तंभावर अचलपणे स्थित आहे. त्या वसुधातलावरच आमच्यासारख्यांनी बसणे युक्त आहे. कारण ह्यावरच (धरातलावरच) पर्वतश्रेष्ठ मेरू बसला (स्थित) आहे. तसेच सप्तसागरही. आम्ही त्यांच्यासारखेच आहोत. अशा प्रकारे (प्रकट झालेले) औचित्य अधिकरण-शब्दाशी संबद्धच आहे.

टीप:—प्रस्तुत उदाहरण श्लोकातील ध्वन्यर्थ हृद्य आहे.

न तु यथा परिमलस्य—

६४. 'तत्र स्थितं स्थितिमतां वर देव ! दैवाद्-
भृत्येन ते चकितचित्तमियन्त्यहानि ।
उत्कम्पिनि स्तनतटे हरिणेक्षणानां
हारान्प्रवर्तयति यत्र भवत्प्रतापः ॥'

अत्र त्वद्भृत्येन मया तत्र तस्मिन्देशे स्थितं यत्र भवत्प्रतापः कंपतरलस्त-नतटे हरिणदृशां हारान्प्रवर्तयतीति यदुक्तं तेन शौर्यशृंगारगुणोत्कर्षस्तुतौ सर्वतो दिग्गमनाविच्छिन्नप्रसरः प्रतापः पारिमित्यं प्राप्तः । एकत्र परिच्छिन्ने देशे मया तत्र स्थितं यत्र त्वत्प्रतापस्तरुणीस्तनतटेषु हारतरलनं करोत्यन्यदेशे विलक्षणमुपलक्षणम् । सर्वगतश्चेत्प्रतापस्तत्सर्वत्रैव मया स्थितमिति वक्तव्ये तत्रेत्येकदेशाभिधायि पदं न उपपद्यते, दस्युमात्रस्याप्येकदेशे जृम्भमाणप्रताप-त्वात् । तदत्राधिकरणपदगतमनौचित्यमुपलभ्यते । तत्र तत्र मया स्थितं यत्र यत्र भवत्प्रताप इत्येव स्तुत्युचितं युक्तमुक्तं स्यात् ॥ २० ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, परिमलाच्या ह्या श्लोकात अधिकरणौचित्य नाही.

स्थितियुक्तांमध्ये श्रेष्ठ (असलेल्या) महाराज ! जेथे आपला पराक्रम

सुंदरींच्या स्तनांवर रुळणाऱ्या हारांस चंचल करतो तेथे आश्चर्यचकित झालेला तुमचा हा सेवक दैववशात् इतके दिवस राहिला.

जेथे आपला पराक्रम हरिणाक्षींच्या कंपायमान स्तनांवरील हारांना प्रवृत्त करतो तेथे म्हणजे त्या देशात तुमच्या ह्या भृत्याने (इतके दिवस) वास्तव्य केले असे जे येथे म्हटले आहे त्यायोगे शौर्य व शृंगारप्रियता ह्या दोन गुणांच्या उत्कर्षाच्या स्तुतीत सर्व दिशांमध्ये जाऊन अप्रतिहतपणे पसरणाऱ्या पराक्रमाला मर्यादित्व लाभले आहे. ज्या देशात तुझा पराक्रम तरुणींच्या स्तनतटांवरील हारांना कापवितो त्या मर्यादित देशात मी राहिलो, दुसऱ्या देशात परिस्थिती विलक्षण (वेगळी) होती (म्हणजे तेथे तुझा पराक्रम नव्हता) असा उपलक्षणात्मक अर्थ प्राप्त होतो. पराक्रम सर्वगत असेल तर मी सर्वत्रच राहिलो असे म्हणावयास हवे होते. तेथे (राहिलो) असे जे एकदेशाचे वाचक पद वापरले आहे ते उपपन्न नाही. (त्या पदाने सर्वगत प्रताप व सर्वगत स्थिती हा अर्थ निष्पन्न होत नाही) कारण चोरांचाही पराक्रम (प्रभाव) एकादेशात (विशिष्ट प्रदेशात) विशेष वाढत असतो. तेव्हा येथे अधिकरण पदातील अनौचित्य उपलब्ध होते. जेथे जेथे आपला पराक्रम (होता) तेथे तेथे मी राहिलो असेच म्हणणे स्तुत्य व युक्त झाले असते.

विवरण—उदाहरणश्लोकातील 'चकितचित्तं' हा शब्दच सौंदर्याची मूलभूमि आहे असे वाटते. अधिकरणपदामुळे प्रस्तुत श्लोकात अनौचित्य निर्माण झाले आहे हे क्षेमेन्द्राचे म्हणणे तितकेसे पटत नाही. कारण 'हे स्थितिमंताच्या श्रेष्ठा, मीही तिकडे चकितचित्त होत्साता स्थितिमान (स्थित) झालो', हे सांगणे, हा वक्त्याचा अभिप्राय दिसतो व ह्यात चमत्कृती निश्चितपणे आहे. क्षेमेन्द्राच्या सूचनेप्रमाणे 'तत्र तत्र...' इत्यादी रचनेने 'चकितचित्तं' शब्दातील 'रुचिरौचित्या'ची हानीच होईल.

संस्कृत भाषेच्या व्याकरणात कर्तृ, कर्म, करण, संप्रदान, अपादान व अधिकरण अशी एकूण सहाच कारके मानण्यात आली आहेत. षष्ठी विभक्तीला कारक मानण्यात आलेले नाही. म्हणूनच क्षेमेन्द्राने येथे षष्ठ्यन्त पदांचा विचार केलेला नाही. मात्र काव्यगत वाक्यातील सविभक्तिक पदांमध्येही औचित्यसौंदर्य असते हे क्षेमेन्द्राचे प्रतिपादन वाचून त्याच्या सूक्ष्म सौंदर्यशोधक दृष्टीचे कौतुक वाटू लागते. शिवाय, निरनिराळ्या कारकांमुळे उत्पन्न झालेल्या औचित्य-अनौचित्याविषयीचे क्षेमेन्द्रकृत विवेचन लक्षात घेतले की, त्याच्या भक्कम पांडित्याचा चांगलाच बोध होतो.

मर्मस्थान नववे—लिंग

लिंगौचित्यं दर्शयितुमाह—

उचितेनैव लिंगेन काव्यमायाति भव्यताम्।
साम्राज्यसूचकेनेव शरीरं शुभलक्ष्मणा ॥ २१ ॥

प्रस्तुतार्थोचितेन लिंगेन काव्यं भव्यतामुपयाति, राजलक्षणेनेव शरीरम् ॥

सरलार्थ—लिंगाचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे साम्राज्यसूचक शुभचिन्हाने शरीराला भव्यता प्राप्त होते, त्याप्रमाणे समुचित अशाच लिंगाने काव्याला भव्यता प्राप्त होते.

प्रकृत अर्थास साजेशा लिंगाने काव्याला भव्यता प्राप्त होते, ज्याप्रमाणे राजचिन्हाने शरीराला.

टीप—क्षेमेन्द्राने काव्यगत शब्दांच्या लिंगाचा भलताच बडिवार माजवल्यासारखे वाटते.

यथा मम ललितरत्नमालायाम्—

६५. 'निद्रां न स्पृशति त्यजत्यपि धृतिं धत्ते स्थितिं न क्वचित्—
दीर्घां वेत्ति कथां व्यथां न भजते सर्वात्मना निर्वृतिम्।
तेनाराधयता गुणस्तवजपध्यानेन रत्नावलीं
निःसङ्गेन पराङ्गनापरिगतं नामापि तो सह्यते ॥'

अत्र वत्सेश्वरस्य रत्नावली-विरह-विधुरचेतसः स्मरावस्था-समुचितं विदूषकेण सुसंगतार्थं यदभिहितं-निद्रां न स्पृशति, धृतिं त्यजति, स्थितिं न धत्ते, दीर्घां कथां व्यथामिव वेत्ति, निर्वृतिं न भजते, तां विना तेन तद्गुणजापिना तद्ध्याननिरतेन जनसङ्गत्यागिनाऽन्यासामङ्गनानां नाममात्रमपि न सह्यते इति। तत्र स्थिति-धृति-कथा-निर्वृतीनां स्त्रीलिंगाभिधानेनाङ्गनात्वाध्यारोपेण परममौचित्य प्रतिपादितम् ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, माझ्या ललितरत्नमालेतील (ह्या श्लोकात लिंगौचित्य आढळेल)—

तो निद्रेला स्पर्श करीत नाही (त्याचा डोळ्याला डोळा लागत नाही), त्याने धीर सोडलाही आहे, त्याला कोठेही स्थिरता लाभत नाही, तो दीर्घ कथा व्यथांसारख्या मानतो, कोणत्याही प्रकारे त्याला आनंद लाभत नाही. रत्नावलीचे गुणगान, तिच्या नावाचा जप, तिचे (अहर्निश) ध्यान यांच्या

योगाने (तिची) आराधना करणारा (तो इतका) निःसंग झाला आहे की, दुसऱ्या स्त्रीचे नावसुद्धा (त्याला) सहन होत नाही.

तो निद्रेला स्पर्श करीत नाही, त्याने धैर्य सोडले आहे, स्थिरता टाकली आहे, त्याला दीर्घ कथा व्यथांप्रमाणे वाटतात, त्याला (कोणत्याही उपायाने) आनंद होत नाही; तिच्यावाचून असलेल्या, तिच्या गुणांचा जप करणाऱ्या, तिचे(च) नित्य ध्यान करणाऱ्या, लोकांचा संपर्क टाळणाऱ्या त्याच्याच्याने दुसऱ्या स्त्रियांचे साधे नांवसुद्धा सहन करवत नाही, असे विदूषकाने सुसंगतेला जे म्हटले आहे ते रत्नावलीच्या विरहामुळे अंतःकरण आर्त झालेल्या वत्सेश्वराच्या स्मरावस्थेला साजेसे आहे. येथे स्थिति, धृति, कथा, निर्वृति ह्यांच्या स्त्रीलिंगी प्रयोगाने स्त्रीत्वाच्या आरोपाच्या द्वारे उत्कृष्ट औचित्य प्रकट केले आहे.

टीप—स्मरावस्था हा शब्द स्त्रीलिंगी आहे. तद्वत् स्थिती, निद्रा इत्यादी शब्दही आहेत. म्हणून लिंगौचित्य हा क्षेमेन्द्राचा अभिप्राय.

न तु यथा मम नीतिलतायाम्—

६६. 'वरुणरणसमर्था स्वर्गभंगैः कृतार्था
यमनियमनशक्ता मारुतोन्माथसक्ता ।
धनदनिधनसज्जा लज्जते मर्त्ययुद्धे
दहनदलनचण्डा मण्डली मद्भुजानाम् ॥'

अत्र रावणः कपिनिकारामर्षविषमविकाराविष्कारोचितं ब्रूते—वरुणादिलोकपालविशालबलावलेपविप्लवकारिणी मर्त्यमात्रयुद्धे लज्जते प्रचण्डा मद्भुजमण्डलीति स्त्रीलिंगेन निर्देशस्त्रैलोक्यविजयोर्जितस्य प्रतापस्य कठोरतामपहरन्ननौचित्यं सूचयति ॥ २१ ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, माझ्या नीतिलतेतील (ह्या श्लोकात लिंगौचित्य) नाही.

वरुण देवतेशी युद्ध करण्यास समर्थ, स्वर्गाच्या विध्वंसाने कृतार्थ (झालेली), यमराजाचे नियंत्रण करण्यास समर्थ, मरुत् देवतेस छळण्यात आसक्त, कुबेराच्या हत्येस सज्ज आणि अग्नीचे दहन करण्याएवढी प्रचण्ड (अशी) माझ्या बाहूंची 'मण्डली' मर्त्यांशी (मानवांशी) युद्ध करण्यास लाजते.

येथे रावण वानरसमूहाच्या (दर्शनाने आलेल्या) राग ह्या विषम विकाराच्या आविष्काराला उचित असे उद्‌गार (पुढीलप्रमाणे) काढीत आहे—'वरुणादी

लोकपालांना (स्वतःच्या) विशाल बलाविषयी असलेल्या गर्वाचा चक्काचूर करणारी माझी प्रचण्ड भुजमंडली मर्त्यांशी युद्ध करतांना मात्र लाजते.' ह्या उक्तीतील (भुजमंडली ह्या) स्त्रीलिंगी निर्देशाने त्रैलोक्य जिंकण्याच्या आवेशपूर्ण पराक्रमाची कठोरता नष्ट होऊन अनौचित्य सूचित झाले आहे.

विवरण—क्षेमेन्द्राने स्वरचित पद्याचा येथे घेतलेला परामर्श यथायोग्यच आहे. त्याचा एकूणच लिंगौचित्य-विचार त्याच्या सूक्ष्म रसिकतेचा व तरल चिकित्सक बुद्धीचा उत्कृष्ट परिचायक आहे.

मर्मस्थान दहावे—वचन

वचनौचित्यं दर्शयितुमाह—

उचितैरेव वचनैः काव्यमायाति चारुताम् ।
अदैन्यधन्यमनसां वदनं विदुषामिव ॥ २२ ॥

उचितैरेकवचनद्विवचनबहुवचनैः काव्यं चारुतामायाति । अदैन्योदारचेतसां विदुषामिव वदनमयाञ्चारुचिरौचित्यचारुभिर्वचोभिः ।

सरलार्थ—वचनाचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे अदैन्यामुळे धन्य मने असलेल्या विद्वानांचे वदन शोभून दिसते, त्याप्रमाणे उचित अशाच वचनांमुळे काव्याला सौंदर्य प्राप्त होते.

उचित एकवचन, द्विवचन बहुवचन ह्यांच्या योगे काव्यास सौंदर्य प्राप्त होते. ज्याप्रमाणे अदैन्यामुळे उदार अंतःकरणांच्या विद्वानांचे याचनारहितत्वामुळे सुंदर मुख औचित्यरमणीय उक्तींनी शोभून दिसते.

विवरण—क्षेमेन्द्राने प्रस्तुत कारिकेत अनेक कल्पनांची गर्दी करून सोडली आहे. एकवचन, द्विवचन व बहुवचन ह्यांच्या उचित प्रयोगाने काव्याला सौंदर्य प्राप्त होते ही प्रधान कल्पना आहे. अदैन्यामुळे धन्य (कृतार्थ) झाली आहेत अंतःकरणे ज्यांची अशा विद्वानांचे वदन उचित उक्तींनी सौंदर्य प्राप्त करते, ही उपमानगत कल्पना आहे. येथे उचित वचने (व उक्ती) हा उभयपक्षगत समानघटक असून काव्य व वदन ह्यांची परस्परतुलना केली आहे. परंतु, काव्य पद निर्विशेषण आहे, उलट वदन पदाचे 'अदैन्यधन्यमनसां' हे वैशिष्ट्य उक्त आहे. तेव्हा, येथे उपमेयगत (म्ह० काव्यगत) धर्माचा उल्लेख नसल्यामुळे व उपमानगत (म्ह० वदनगत) धर्माचा उल्लेख असल्यामुळे पारंपरिक साहित्य-शास्त्रदृष्ट्या 'अधिकपदत्व' हा अलंकारदोष झाला आहे. हा कारिकाविषयक विचार झाला. आता गद्यवृत्तीकडे वळू. अदैन्यामुळे अंतःकरणाने उदार झालेली

माणसे कोणापुढे याचना करीत नाहीत. साहजिकपणेच त्यांच्या तोंडून याचना-वाचक शब्द निघतच नाहीत. तेव्हा, अयाचनारूप जे सुंदर औचित्य त्याच्या योगे-सुंदर अशा ज्या उक्ती त्यांच्या द्वारे वदनास सुंदरता प्राप्त होते असा गद्य-वृत्तीचा अर्थ होतो. ह्या गद्यवृत्तीतील रुचिर व चारु हे दोन शब्द एकाच अर्थाचे वाचक असल्यामुळे परंपरागत साहित्यशास्त्रदृष्ट्या येथे पुनरुक्तता दोष झाला आहे.

यथा मम नीतिलतायाम्—

६७. 'त्रैलोक्याक्रमणैर्वराहविजयैर्निःसंख्यरत्नाप्तिभिः
प्रख्यातः स्वरमस्वयंवरशतैर्युद्धाब्धिमध्ये श्रिया
साश्चर्यैर्बलिबन्धनैश्च बहुभिर्नित्यं हसत्युत्थितः
पौलस्त्यः सकृदुद्यमश्रमवशाद्व्यासक्तनिद्रं हरिम् ।'

अत्र शुकसारणाभ्यां रघुपतेरग्रे दशग्रीवपराक्रमेऽभिधीयमाने यदुक्तं पौलस्त्यः शेषशायिनं हरिमेकवारोद्योगश्रमवशेन संसक्तालस्य निद्रमेकत्रैलोक्याक्रमणै-र्वराहविजयिनां सुभटानां जयैरनेकरत्नप्राप्तिभिः समरसमुद्रमध्ये बहुवारविहितैः श्रियः स्वयंवरशतैर्बलिनां च लोकपालानां बन्धनैः प्रख्यातः सदोत्थितः सोत्साहः सततं हसतीति बहुवचनैरेव हरिवैलक्षण्यलक्षणमुपचितमौचित्य-मुद्भिन्नम् ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, माझ्या नीतिलता काव्यातील ह्या श्लोकात वचनौ-चित्य आढळेल—

त्रैलोक्याच्या आक्रमणांमुळे, वराह(रूपी विष्णूच्या) विजयांमुळे व अगणित रत्नांच्या प्राप्तींमुळे ख्याती पावलेला, युद्धरूपी सागरामधून स्ववृत्त्यनुकूल अनेक स्वयंवरांच्या योगे विजय-श्री (व श्री म्हणजे लक्ष्मी) प्राप्त केलेला, आणि लोकपालांच्या अनेक आश्चर्यकारक बंधनांनी नित्य उत्साहित असलेला रावण, (वरील बाबतीत) एकदा(च) प्रयत्न केल्यामुळे थकून जाऊन निद्राधीन झालेल्या विष्णूला हसतो.

येथे शुक व सारण या दोघा दूतांनी रघुपती(रामा)समोर दशग्रीवा (रावणा) चा पराक्रम वर्णन करताना 'त्रैलोक्याच्या अनेक आक्रमणांनी, वराहास जिंकणाऱ्या योद्धयांच्या अनेक जयांनी, अनेक रत्नांच्या प्राप्तींनी, समररूपी समुद्रामध्ये अनेकवार केलेल्या मंथनांनी, शतावधी स्वयंवरांनी लक्ष्मीस जिंकून आणि बलिष्ठ लोकपालांना अनेकदा बंधनात टाकून ख्याती मिळविलेला व

सदा उत्साही असलेला रावण एकदाच्या उद्योगाच्या श्रमांमुळे थकून निद्रावश झालेल्या विष्णूस हसतो', असे म्हटले आहे. त्यात बहुवचनांमुळेच, विष्णूहून रावणाच्या वेगळेपणाच्या स्वरूपाचे श्रेष्ठ औचित्य प्रकट होते (बहुवचनांनीच औचित्य वर आणले आहे)

विवरण—येथे रावण विष्णूहून श्रेष्ठ असल्याची प्रतीती रसिकाला येते. श्लोकात वर्णिलेले अनेक पराक्रम विष्णूने एकदाच केले तरीही तो थकून निद्रा-देवीच्या अधीन झाला, तर उलट ते पराक्रम रावणाने अनेकवार केले असताही त्याचा उत्साह कायम राहिला हा अर्थ श्लोकगत त्रैलोक्याक्रमणैः इत्यादी बहु-वचनी शब्दांमुळेच प्रतीत होतो. येथे प्रतिनायक जो रावण त्याच्या गुणोत्कर्षाचे जे वर्णन केले आहे ते 'वंशवीर्यश्रुतादीनि वर्णयित्वा रिपोरपि ।' (दण्डीकाव्यादर्श १।२२) ह्या नियमानुसार केलेले आहे हे लक्षात घ्यावयास हवे. प्रतिनायकाचा गौरव करण्याचा कवीचा उद्देश नाही. कारण प्रतिनायकाचा उत्कर्ष संस्कृत साहि-त्यशास्त्रज्ञांना अभीष्ट नाही (तज्जयान्नायकोत्कर्षवर्णनं च धिनोति नः ।' तत्रैव) 'तरीही प्रतिनायकाचे कुळ, शील, शौर्य इत्यादींचे वर्णन एवढ्यासाठी करावयाचे की, प्रतिनायकाचेही गुण वाचकास प्रतीत व्हावेत व अशा गुणशाली व बलाढ्य प्रतिनायकाचा पराजय करणाऱ्या नायकाबद्दल रसिकांना अत्यादर वाटू लागावा. अर्थात असे वर्णन साधताना कवीलाही आपली प्रतिभा सर्वस्वी पणाला लावावी लागते. क्षेमेन्द्राने येथे स्वतःच्याच रचनेचे जे व्याख्यान केले आहे ते कविकंठा-भरणातील २।१४ श्लोकात त्यानेच प्रतिपादिलेल्या नियमानुसार केले आहे, हे लक्षात घ्यावयास हवे.

न तु यथा मातृगुप्तस्य—

६८. 'नायं निशामुखसरोरुहराजहंसः
कीरीकपोलतलकान्ततनुः शशाङ्कः ।
आभाति नाथ ! तदिदं दिवि दुग्धसिन्धु-
डिण्डीरपिण्डपरिपाण्डु यशस्त्वदीयम् ॥'

अत्र नायं शशी, त्वदीयमिन्दुदुग्धाब्धिफेनपिण्डपाण्डुरं यश इति यद-भिहितं तदविच्छिन्नप्रसराणां यशसां बहुवचनेन वर्णनायां समुचितायामेकवच-नोपन्यासश्चन्द्रबिम्बाकारेण पिण्डमात्रपरिच्छिन्नतया संकोचरूपमनौचित्यमुद्-भावयति ॥ २२ ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, मातृगुप्ताच्या ह्या श्लोकात (वचनौचित्य) नाही—

नाथ ! निशामुखरूपी कमळात विहरणारा राजहंस असलेला व काश्मीरी तरुणींच्या गालाप्रमाणे रमणीय शरीर असलेला हा चन्द्र नाही. तर क्षीरसागराच्या फेसाच्या गोळ्याप्रमाणे शुभ्र (असे) तुझे हे यश आकाशात प्रकाशत आहे.

येथे, हा चंद्र नाही, तर चंद्राप्रमाणे (शुभ्र) असलेल्या क्षीरसागराच्या फेसाच्या गोळयासारखे शुभ्र असे तुझे यश होय, असे जे म्हटले आहे, ते (वर्णन), अप्रतिहतपणे पसरणाऱ्या यशांचे वर्णन बहुवचनी शब्दांनी करणे समुचित असताना एकवचनी शब्दाचा प्रयोग केल्याने चंद्रबिंबाच्या आकाराने गोळयापुरते मर्यादित झाल्यामुळे, संकोचरूपी अनौचित्य उत्पन्न करते.

विवरण—क्षेमेन्द्राची येथील टीका 'पुस्तकी' (bookish) वाटते. तीत वैयाकरणोचित अथवा नैयायिकोचित पांडित्यच प्रतीत होते. अविच्छिन्नपणे प्रसृत होणाऱ्या यशाचे अनेकवचनी शब्दानी वर्णन केले तरच ते समुचित होते असे म्हणणे हा निव्वळ आग्रह आहे. वस्तुतः, प्रस्तुत उदाहरणश्लोकातील 'निशामुख······' व 'कीरीकपोल······' ह्या दोन शब्दातील कल्पनेवरच जातिवंत रसिकाची दृष्टी खिळते व त्याचे चित्त आल्हादैकमय होते. एकवचनी शब्दप्रयोगामुळे संकोचरूपी अनौचित्य प्रतीत होतच नाही. समुद्र, नद्या, पर्वत इत्यादींच्या वर्णनांच्या बाबतीत कवीने पाळावयाचे संकेत ऊर्फ कविसमय संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी निश्चित केले होते. अनेक ग्रंथांतून ह्या विषयावर स्वतंत्र अध्याय आढळून येतात—उदा० राजशेखरकृत काव्यमीमांसा अध्याय सोळावा, वामनकृत काव्यालंकारसूत्रे-अध्याय पहिला अधिकरण पांचवे, वाग्भटालंकार प्रथम परिच्छेद, अरिसिंह—अमरचन्द्रकृत कवितारहस्य—प्रथम प्रतान, देवेश्वरकृत कविकल्पलता इ. शुक्लत्वादी गुण जरी परिच्छिन्न परिमाणाने युक्त द्रव्यांवर राहणारे असले व यश हे जरी अदृश्य असले तरी त्याचा रंग शुभ्र वर्णावा असा कविसमय आहे. ('अप्यदृशां सितां कीर्तिमकीर्तिं च ततोऽन्यथा ।' वाग्भटालंकार १-१८). ह्या कविसमयास अनुसरूनच प्रस्तुत उदाहरणश्लोकात वर्णन करण्यात आले आहे.

मर्मस्थान अकरावे—विशेषण

विशेषणोचित्यं दर्शयितुमाह—

विशेषणैः समुचितैर्विशेष्योऽर्थः प्रकाशते ।
गुणाधिकैर्गुणोदारः सुहृद्भिरिव सज्जनः ॥ २३ ॥

काव्ये विशेष्योऽर्थः समुचितैरेव विशेषणैः शोभां लभते । गुणोदारः साधुर्यथाभ्यधिकगुणैः सुहृद्भिः ।।

सरलार्थ – विशेषणाचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे गुणोदार सज्जनाची शोभा (त्याचेहून) अधिक गुणी मित्रांमुळे प्रकट होते, त्याप्रमाणे समुचित विशेषणांच्या योगे विशेष्य अर्थ प्रकाशतो (शोभून दिसतो).

काव्यातील विशेष्य अर्थ समुचित अशाच विशेषणांनी शोभिवंत होतो. ज्याप्रमाणे गुणोदार सज्जन अधिक गुणी मित्रांनी.

विवरण—येथील कारिका व तीवरील वृत्ती ह्या दोन्ही बारकाईने लक्षात घेण्याजोग्या आहेत. काव्यातील विशेष्य अर्थ समुचित विशेषणांनी प्रकाशतो असे क्षेमेन्द्र येथे म्हणतो. काव्यात विशेष्य व अविशेष्य असा काही अर्थभेद असतो काय ? काव्यात वस्तुतः एकच अर्थ संभवतो व तो म्हणजे सहृदयांच्या हृदयांना आल्हाद देणारा रमणीय अर्थ. त्याचे प्रकारभेद संभवत नाहीत. पुनः, काव्यगत अर्थ निर्विशेषण असेल तर तो प्रकाशत नाही असे थोडेच आहे ? 'समुचितैरेव' असे म्हणण्याचे प्रयोजन दिसत नाही. शिवाय, काव्यप्रकाश, कुवलयानन्द, चन्द्रालोक इत्यादी अनेक ग्रंथांत दिलेल्या परिकर अलंकाराहून (साभिप्राय विशेषणांनी विशेष्याचे वर्णन करणे, ह्याला परिकर अलंकार म्हणतात) विशेषणौचित्य कोणत्या बाबतीत वेगळे ठरते ? खुद्द परिकर अलंकार रसिकांनी स्वीकारावा ह्यासाठी देखील आलंकारिकांना बरीच 'रदबदली' करावी लागली आहे (पाहा, काव्यप्रकाश १०।५९ कारिकेखालील उदाहरणानंतरची वृत्ती) हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. प्रस्तुत कारिकागत उपमाही किंचित् सदोष आहे. गुणाधिक मित्रांमुळे गुणोदार सज्जन उठून दिसण्याऐवजी गुणाधिक मित्रच उठून दिसण्याची शक्यता अधिक !! कारिका सोपम असलीच पाहिजे ह्या अट्टहासामुळे हा दोष उत्पन्न झाला आहे. सज्जन शोभून दिसतात ही क्षेमेन्द्राची एक अत्यंत आवडती कल्पना दिसते. उदा० सुवृत्तैरेव शोभन्ते प्रबन्धाः सज्जना इव ।। सुवृत्ततिलक ३।१२

यथा मम मुनिमतमीमांसायाम्—

६९. 'चैत्रे सूत्रितयौवनान्युपवनान्यामोदिनी पद्मिनी
ज्योत्स्नाप्रावरणानि रत्नवलभीहर्म्याणि रम्याः स्त्रियः ।
सर्वं चारुतरं न कस्य दयितं यस्मिंस्तु तद्भुज्यते
तन्मूर्ध्निर्मितमामभाजनमिव क्षिप्रक्षयं जीवितम् ।।'

अत्र युधिष्ठिरस्यासादितमहाविभूतेर्मयनिर्मितमणिमयसभाभिमानिनो विभवप्रभावे वर्ण्यमाने सकलभवाभावस्वरूपाभाववादोपदेशिनो महामुनेराशयविचारावसरे यदुक्तं कुसुमसमयसमुपचितयौवनान्युपवनानि, मकरन्दामोदसुन्दरारविन्दिनी, ज्योत्स्नापटप्रावृतानि रत्नवल्लभहर्म्याणि, रमणीया रमण्यश्चेति सर्वमेतच्चारुतरं सर्वस्याभिमतम्। किन्तु यस्मिन्भुज्यते तज्जीवितमाममृत्पात्रनिःसारं क्षिप्रक्षयमिति तद्विशेष्यपदोत्कर्षकारिविशेषणपदोदितसौन्दर्येण पर्यन्तनिःसारतानिर्वेदसंवादि स्फुरदौचित्यमातनोति ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, माझ्या मुनिमतमीमांसेतील (ह्या श्लोकात) औचित्य आढळेल—

चैत्रातील यौवनभरी (उत्फुल्ल) उपवने, सुगंधयुक्त कमलिनी, चंद्रप्रकाशाने आच्छादित रत्नजडित वाडे, रम्य स्त्रिया (हे) सर्व अतिशय सुंदर (असून ते) कोणाला प्रिय नाही ? परंतु, ज्या (जीवनात) ह्या सर्वांचा उपभोग घ्यावयाचा ते जीवन मातीपासून बनविलेल्या कच्च्या घड्याप्रमाणे शीघ्रभंगुर आहे.

येथे महान ऐश्वर्ये संपादिलेल्या व मयासुराने निर्मिलेल्या रत्नजडित सभागाराविषयी अभिमान बाळगणाऱ्या युधिष्ठिराच्या वैभवाच्या प्रभावाचे वर्णन केले जात असता, समस्त जगताच्या अभाव(नाश)रूपी 'अभाववादा'चा उपदेश करणाऱ्या महामुनी व्यासांनी त्या वैभवाविषयी प्रकट केलेल्या अभिप्रायाच्या विचारप्रसंगी, 'वसंतानुकूल बहरलेली उपवने, मकरंदाच्या सुगंधाने सुंदर कमलिनी, ज्योत्स्नारूपी पटाने (वस्त्राने) झाकलेले रम्य रत्नजडित प्रासाद, रमणीय रमणी हे सर्व सुंदरतर (असून) सर्वांना आवडतं. परंतु, ज्यात (हे सर्व) उपभोगले जाते ते जीवन, मातीच्या कच्च्या घड्याप्रमाणे निःसार व शीघ्रतेने नाश पावणारे आहे', असे जे म्हटले आहे त्यायोगे विशेष्य पदाचा उत्कर्ष साधणाऱ्या विशेषण पदाने सौंदर्य निर्माण होऊन अंतीच्या (श्लोकान्तीच्या) निःसारतेच्या (उल्लेखाने मनी उपजणाऱ्या) निर्वेदास अनुकूल, चमकदार औचित्य प्रसृत (प्रकट) झाले आहे.

विवरण—क्षेमेन्द्राने अमरकाचा 'गन्तव्यं यदि···' इत्यादी श्लोक, त्यात अनुचित रससंकर असल्यामुळे, सदोष ठरविल्याचे मागे पाहिलेच आहे. ज्या न्यायाने अमरकाचा तो श्लोक अनुचित (सदोष) ठरतो, त्याच न्यायाने खुद्द क्षेमेन्द्राचाच प्रस्तुतचा उदाहरणश्लोक सदोष होय, असा आक्षेप कोणालाही घेता येऊ नये म्हणून क्षेमेन्द्राने वृत्तीत 'महामुनेराशयविचारावसरे यदुक्तं' असे आवर्जून व सावधपणाने म्हटले आहे. येथे, युधिष्ठिराच्या

वैभवाचे वर्णन चालले असता ते ऐकणाऱ्या महामुनीच्या मनात कोणते विचार तरंगून गेले, त्यांचे कथन केले आहे व महामुनी अभाववादी असल्यामुळे त्याने जीवित 'क्षिप्रक्षय' मानणे योग्यच होय. मात्र प्रस्तुत श्लोकातील कोणतेच विशेषण वैशिष्ट्यपूर्ण अतएव 'समुचितच' आहे, असे प्रतीत होत नाही. सर्वच विशेषणे (Commonplace) सर्वसाधारणतया प्रयुक्त होणारीच आहेत.

न तु यथा भट्टलट्टनस्य—

७०. 'ग्रीष्मं द्विषन्तु जलदागममर्थयन्तां
ते संकटप्रकृतयो विकटास्तडागाः ।
अब्धेस्तु मुग्धशफरीचटुलाचलेन्द्र-
निष्कम्पकुक्षिपयसो द्वयमप्यचिन्त्यम् ॥'

अत्र ग्रीष्मं द्विषन्तु, मेघागमं संकटस्वभावा विकटाः विस्तीर्णाश्च तडागाः प्रार्थयन्ताम्, महाब्धेस्तु बालशफरीलोलाचलेन्द्रनिश्चलकुक्षिपयसो ग्रीष्मघनागमावप्यगणनीयाविति यदुक्तं, तत्र तडागविशेषणयोः संकटविकटपदयोः परस्परविरुद्धार्थयोरनौचित्यं स्पष्टमवभासते, संकटस्वभावस्य हि विकटत्वं विस्तीर्णत्वं नोपपद्यते । अथ स्वभावे संकटत्वमाकारे विकटत्वं, तदपि तडागस्य निश्चेतनस्य स्वभावाभावादनुपपन्नमेव ॥ २३ ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, भट्टलट्टनाच्या ह्या श्लोकात (विशेषणौचित्य) नाही.

ते संकटग्रस्त विस्तीर्ण तलाव ग्रीष्म ऋतूचा (उन्हाळ्याचा) द्वेष करोत (व) मेघागमाची (पावसाळ्याची) प्रार्थना करोत. परंतु, चिमुकल्या, चंचल माशांसारखे (असलेले) पर्वतराज ज्याच्या कुशीत (फिरत राहूनही) ज्याचे पाणी निष्कंप (स्थिर) राहते त्या महासागराला दोन्हीही अचिंत्य आहेत (म्ह० महासागराला ग्रीष्मर्तू व वर्षर्तू यांपैकी कशाचाच विचार करावा लागत नाही. तलावांचे पाणी आटते म्हणून ते ग्रीष्माचा द्वेष व वर्षा-ऋतूची प्रार्थना करतात.)

येथे संकटग्रस्त विस्तीर्ण तलाव ग्रीष्माचा द्वेष करोत, वर्षर्तूची प्रार्थना करोत, परंतु लहान माशांसारखे चंचल (म्ह० हालचाल करणारे) प्रचंड पर्वत ज्याच्या कुशीत (हालचाल करीत असूनही) ज्याचे पाणी निश्चल राहते त्या महासागराला ग्रीष्मर्तू व वर्षर्तू हे दोन्ही अवगणनीय (अविचारणीय) वाटतात असे जे म्हटले आहे त्यात, तलावाला लावलेल्या विशेषणांमध्ये (संकटप्रकृतयः व विकटाः ह्या विशेषणांमध्ये) संकट व विकट ही दोन परस्पर-विरुद्ध अर्थाची

पदे असल्यामुळे अनौचित्य स्पष्टपणे प्रतीत होते. (कारण) संकटग्रस्त विकट अर्थात् विस्तीर्ण असणे उपपन्न होत नाही. पुनः स्वभावात संकटत्व व आकारमानात विकटत्व असे मानले तरी तेदेखील, अचेतन तलावाला स्वभाव नसल्यामुळे, उपपन्न होत नाही.

विवरण—क्षेमेन्द्राची ही सर्वच टीका अग्राह्य वाटते. प्रस्तुत उदाहरणश्लोकात कवीला अनेक विरोधांच्या साह्याने अर्थाची रमणीयता वर्णावयाची आहे असे वाटते. ते अनेक विरोध असे—(१) उन्हाळ्यात तलावाचे पाणी आटते, महासागराचे पाणी उन्हाळ्यातच काय पण कधीच आटत नाही. (२) पाणी आटल्यामुळे तलाव संकटग्रस्त होतात, महासागरांवर संकटग्रस्त होण्याची पाळी कधीच येत नाही. (३) तलाव विकट नसतात, महासागर तसे असतात. (४) तलावात पर्वत उभे राहू शकत नाहीत, महासागरात ते लीलया उभे राहू शकतात. (५) महासागरांना पर्वतराजही चिमुकल्या 'मछली' सारखे अगण्य वाटतात. महासागरांत प्रचण्ड पर्वत लोळत राहिले तरी त्यांचे पाणी निश्चल राहते, ह्या अर्थच्छटेतही रमणीयता आहे. एवंच, काव्यदृष्ट्या विचार केला तर क्षेमेन्द्राच्या चैत्रे-इत्यादी श्लोकापेक्षा प्रस्तुतचा भट्टलट्टनाचा श्लोकच अधिक सरस आहे. संकट व विकट या दोन शब्दातील नादसौंदर्यानेही मोहित होऊन लट्टनाने त्यांची योजना केली असावी. पुनः, परस्परविरुद्धार्थता मानली तरी तिचा संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांनी मानलेल्या व्याहतत्व दोषात समावेश होऊ शकतो. (व्याहतत्वलक्षणासाठी काव्यप्रकाश ७।६ करिका पाहावी.) 'संकटस्वभावस्य हि विकटत्वं विस्तीर्णत्वं नोपपद्यते ।' हे क्षेमेन्द्राचे म्हणणे पटत नाही. विशाल वस्तू संकटग्रस्त होत नाहीत, असा नियम थोडाच आहे ! प्रचंड वादळ झाले असता एरव्ही निश्चल असलेल्या महासागरातही प्रक्षोभ माजतोच की ! तलाव अचेतन असल्यामुळे त्याला स्वभाव नसतो व त्यामुळे स्वभावातील संकटत्व त्याचे बाबतीत उपपन्न होत नाही, हा क्षेमेन्द्राचा युक्तिवाद ग्राह्य वाटत नाही. कारण, कविसम्राट् पदवीची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या भाषाप्रभू व सुशिक्षित कवीने तर्कादी अनेक शास्त्रांशी परिचय करून घेणे आवश्यक असल्याचे क्षेमेन्द्राने कविकंठाभरणाच्या पंचम संधीत प्रतिपादिले आहे. त्या शास्त्रात त्याने अचेतनावर चेतनाचा अध्यारोप करण्याच्या कलेचाही अन्तर्भाव केला असून आपल्या भूमिकेच्या स्पष्टीकरणार्थ स्वशिष्य भट्टोदयसिंह ह्याचा 'वसंतऋतू कामभावनेने अतिशय रक्त (तांबड्या रंगाचा) झाला असून त्रिभुवनविजयार्थ सज्ज झाला आहे'''इत्यादी आशयाचा उदाहरणश्लोकही उद्धृत केला आहे. तेथे जर निश्चेतन वसंत कामातिशयरक्त होऊ शकतो तर

येथे निश्चेतन तलावाचे स्वभावगत संकटत्व मानण्यात आपत्ती कोणती? एवंच, विशेषणौचित्य स्वतंत्रतया मानण्याची गरज नाही. जेथे उचित विशेषणे असतील तेथे परिकर अलंकार मानल्याने काम होते, जेथे विशेषणाचे औचित्य भग्न झाले असेल तेथे अनुचितार्थत्व वा व्याहतत्व दोष मानल्याने निर्वाह होतो.

मर्मस्थान बारावे-उपसर्ग

उपसर्गौचित्यं दर्शयितुमाह—

योग्योपसर्गसंसर्गैर्निरर्गलगुणोचिता ।
सूक्तिर्विवर्धते संपत्सन्मार्गगमनैरिव ॥ २४ ॥

उचितैः प्रादिभिरुपसर्गैः सूक्तिरुन्नतिमासादयति, विभूतिरिव सन्मार्गगमनैः ॥

सरलार्थ—उपसर्गांचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे सन्मार्गाने जाण्याने (सन्मार्गाचा अवलंब करून व्यवहार करण्याने) संपत्ती वाढते, त्याप्रमाणे योग्य उपसर्गांच्या संपर्कांनी (संपर्कांच्या योगे) अप्रतिहत व उचित गुणांनी युक्त काव्याचे सौंदर्य वाढते.

'प्र' इत्यादी उचित उपसर्गांच्या योगे काव्य उत्कर्ष पावते, जशी सन्मार्गगमनाने संपत्ती.

विवरण—ही कारिका एका दृष्टीने महत्त्वाची आहे. येथे क्षेमेन्द्राने कारिकेत 'विवर्धते' व वृत्तीत 'उन्नतिं' हे जे दोन शब्द वापरले आहेत, ते दोन्ही महत्त्वाचे आहेत. त्यांचे महत्त्व लक्षात येण्यासाठी आतापर्यंतच्या सर्व कारिका जरा बारकाईने तपासल्या पाहिजेत. प्रथमतः तेच करू—उचित पदाने सूक्ती शोभते (कारिका ११), औचित्ययुक्त वाक्य विदग्धांना आवडते (कारिका १२), उचितार्थविशेषाने प्रबन्धार्थ प्रकाशतो (कारिका १३), अर्थोचित गुण आनंदवृष्टी करतो (कारिका १४), अर्थोचित अलंकाराने सूक्ती शोभते (कारिका १५), औचित्यरुचिर रस मनात आनंद अंकुरित करतो (कारिका १६), औचित्ययुक्त क्रियापदामुळे सगुणत्व, सुवृत्तत्व व लक्षणपूर्णता यांना शोभा येते (कारिका १९), उचितच कारिकांनी वाक्य शोभते (कारिका २०), उचितच लिंगाने काव्य भव्य होते (कारिका २१), उचितच वचनाने काव्य सुंदर बनते (कारिका २२) व उचितच विशेषणांनी विशेष्यार्थ प्रकाशतो (कारिका, २३) ह्या सर्व कारिका रचिताना 'औचित्यं रससिद्धस्य स्थिरं काव्यस्य जीवितम्' (कारिका ५) तसेच 'औचित्यं त्वग्रे वक्ष्यमाणलक्षणं स्थिरं अविनश्वरं जीवितं

काव्यस्य' (कारिका ५ वरील वृत्ती) ह्या आपल्या नवसिद्धान्ताचा क्षेमेन्द्राला विसर पडलेला नाही, हे स्पष्ट होते. औचित्य नाही म्हणजे गुण नाही, अलंकार नाही; थोडक्यात काव्य नाही हे क्षेमेन्द्राच्या विचारसरणीचे केन्द्र आहे. ह्या केन्द्रवर्ती तत्त्वालाच त्याने प्रस्तुतच्या म्हणजे चोवीसाव्या कारिकेत मुरड घातली आहे, असे जाणवते. त्याने कारिकेत उपसर्गाने (अर्थात् उचित उपसर्गाने) सूक्ती शोभते असे म्हटले नसून योग्य उपसर्गाने काव्य वाढते, म्हणजे काव्याचे सौंदर्य वाढते असे म्हटले आहे. वृत्तीतही उपसर्गांनी काव्याची उन्नती होते असे तो म्हणतो. याचा अर्थ असा की, उपसर्ग मुळात इतर घटकांनी निर्मिलेल्या काव्यसौंदर्याची वृद्धी करण्याचे काम करतो. तो काव्यसौंदर्य निर्माण करीत नाही. म्हणजेच उचितोपसर्ग हा काव्यशोभाकर नसून काव्यशोभावृद्धिकर होय, असे ठरते. अर्थात्, उचितोपसर्ग क्षेमेन्द्राच्याच भाषेत बोलावयाचे म्हणजे, गुण व अलंकार ह्यांप्रमाणे आहार्य (कारिका ५ वरील वृत्ती) ठरतो. त्याच्या अभावी काव्य निर्जीव होण्याची धास्ती नाही. म्हणजेच योग्योपसर्ग काव्याचे स्थिर व अविनाशी जीवित नव्हे, मग त्याची सकलकाव्यशरीरगत मर्मस्थानात कशी गणना करावयाची ? एवंच, येथील कारिका म्हणजे वदतोव्याघाताचेच उत्तम उदाहरण होय. आणखी एक विचारणीय बाब अशी—सूक्तीची सौंदर्यवृद्धी, क्षेमेन्द्रमती, केवळ योग्योपसर्गाने होत नाही. त्यासाठी सूक्ती अप्रतिबद्ध व उचित गुणांनी युक्त असण्याचीही आवश्यकता आहे. आता अर्थोचित गुण आनंदवृष्टी करतो असे क्षेमेन्द्राने चौदाव्या कारिकेत म्हटले आहे. तेव्हा योग्योपसर्ग त्या आनंदाची वाढ करतो असे ठरते. ह्या दृष्टीने उपसर्ग स्वाभाविक न ठरता आगन्तुक ठरतो. आणखी एक बारीकसा मुद्दा विचारणीय आहे. क्षेमेन्द्राने विसाव्या कारिकेत सच्चरित्राने कुलभूषणरूप ऐश्वर्य (वैभव, संपत्ती) विराजमान होते असे म्हटले आहे. येथे सन्मार्गनिष्ठ आचरणाने संपत्ती (म्हणजेही वैभवच) वाढते असे म्हटले आहे. सच्चरित्र व सन्मार्गनिष्ठ आचरण यात काहीच फरक नाही. मग त्या एकाच कारणाने वैभवशोभा व वैभववृद्धी ही दोन भिन्न कार्ये कशी घडतात ? एवंच, क्षेमेन्द्राच्याच शब्दात बोलावयाचे म्हणजे 'अलंकारव्यसनितेने अशा विसंगत अर्थांची गुंफण त्याचे हातून झाली आहे. क्षेमेन्द्राने उपसर्ग काव्याची शोभा निर्माण करतो असे म्हटले असते म्हणजे दोषपरिहार झाला असता.

यथा मम मुनिमतमीमांसायाम्—

७१. 'आचारं भजते, त्यजत्यपि मदं, वैराग्यमालम्बते
कर्तुं वाञ्छति संगभंगगलितोत्तुंगाभिमानं तपः ।

दैवन्यस्तविपर्ययैः सुखशिखाभ्रष्टः प्रणष्टो जनः
प्रायस्तापविलीनलोहसदृशीमायाति कर्मण्यताम् ॥'

अत्र दुर्योधनस्य घोषयात्रायां गन्धर्वबन्धपराभवभग्नाभिमानस्य प्राज्यसाम्राज्यमुत्सृज्य तपःप्रयत्नाभिनिविष्टस्य दुर्ग्रहे वर्ण्यमाने यदुक्तं— सर्वो जनः सुखभ्रष्टः प्रणष्टविभवः सदाचारं भजते, मदं त्यजति, वैराग्यमाश्रयति, संगभंगेन विगलितोत्तुंगाभिमानं तपः कर्तुं वाञ्छति, प्रायो बाहुल्येन तापविगलितलोहपिण्डसदृशीं कर्मण्यतामायाति इति । अत्र उत्पूर्वतया सोपसर्गस्य तुंगशब्दस्य स्वभावोन्नतिर्द्विगुणतामुपयाता दुर्मदाभिमानार्थौचित्यमुच्चैः करोति ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, माझ्या मुनिमतमीमांसेतील ह्या श्लोकात उपसर्गौचित्य आढळेल—

दैवाचे फासे उलटे फिरल्याने सुखाच्या शिखरापासून च्युत झालेला वैभवहीन पुरुष, प्रायः उष्णताहीन लोखंडाप्रमाणे, कर्मठपणा अंगीकारतो (कर्मठ बनतो). तो (धर्मविहित) आचाराचे पालन करतो, गर्वाचा त्याग करतो, वैराग्याची कास धरतो (देवपूजेला लागतो !) आणि संगत तुटल्यामुळे उत्तुंग अभिमान गळून गेलेला तो तपश्चर्या करू इच्छितो.

येथे घोषयात्राप्रसंगी गंधर्वकृत बंधनरूप पराभवामुळे अभिमान खंडित झालेल्या, विस्तीर्ण साम्राज्याचा त्याग करून तपश्चरणाविषयी अभिनिवेश बाळगणाऱ्या व दुराग्रही दुर्योधनाचे वर्णन करावयाचे असताना, 'सुखच्युत व वैभवहीन सर्व माणसे सदाचाराचे पालन करतात, अभिमान सोडतात, वैराग्याकडे वळतात, संगत तुटल्याने उत्तुंगत अभिमान गलित होऊसाती तपश्चर्या करू इच्छितात, प्रायः म्हणजे बहुतकरून, उष्णताहीन लोखंडाच्या गोळ्याप्रमाणे कर्मठ बनतात' असे म्हटले आहे. येथे 'उत्' (उपसर्ग) पूर्वी असल्याने उपसर्गयुक्त 'तुंग' शब्दाची (म्हणजे 'उत्तुंग' शब्दाची) स्वाभाविक उन्नती द्विगुणित झाली आहे. (परिणामी) दुर्मदरूप अभिमानाचे अर्थौचित्य विशेषेकरून (साधले गेले) आहे.

विवरण—'उत्पूर्वतया…'इत्यादी क्षेमेन्द्रकृत समालोचन अतिशयोक्त वाटते. रसिकाचे सारे लक्ष उदाहरणश्लोकाच्या अन्तिम चरणद्वयावर खिळून राहते. त्याला त्या दोन ओळी वाचून/'करून करून भागले व देवपूजेला लागले' ह्या म्हणीची तत्काळ आठवण होते व कवीने लोकाचारपरिज्ञान (कविकंठाभरण २.६) अचूकपणे प्रकट केल्याचे पाहून सन्तोष वाटतो. त्याचे'उत्' उपसर्गाकडे लक्ष

जात नाही. पुनः, क्षेमेन्द्राच्या गद्यवृत्तीतील 'तुंगशब्दस्य स्वभावोन्नतिर्द्विगुणतामुपयाता' हे शब्द 'औचित्य हे काव्याचे जीवित होय' ह्या त्याच्या मूलभूत सिद्धान्तावर 'मूले कुठारः' घालणारे आहेत. उपसर्ग मूळ शब्दाच्या अर्थसौंदर्याचा उत्कर्ष साधतो, मूळ शब्दाचे सौंदर्य निपजवीत नाही, असा क्षेमेन्द्रकृत वृत्तीचा अर्थ होतो. हा अर्थ ग्रंथस्थ महासिद्धांताला मारक आहे. शिवाय त्यजत्यपि मदं म्हटल्यानंतर गलितोत्तुंगाभिमानं म्हटल्याने दुष्क्रमत्व दोष झाला आहे.

न तु यथा कुमारदासस्य—

७२ 'अयि ! विजहीहि दृढोपगूहनं त्यज नवसंगमभीरु ! वल्लभम् ।
अरुणकरोद्गम एष वर्तते वरतनु ! सम्प्रवदन्ति कुक्कुटाः ॥'

अत्राभिनवानंगसंगमगाढमालिंगननिश्चलांगच्छन्नांगनाप्रबोधने सख्या यदुक्तं—वल्लभं मुंच प्रभातसंध्यायामरुणकिरणोद्गमो वर्तते, कुक्कुटाश्च संप्रवदन्ति, तत्र संप्रोपसर्गशून्यशब्दापूरणमात्रेण निरर्थकत्वादनुचितमेव ॥ २४ ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, कुमारदासाच्या ह्या श्लोकात उपसर्गौचित्य नाही—

अगे, प्रथम संगमास घाबरलेल्या (नायिके)! घट्ट मिठी शिथिल कर, प्रियकराला सोड. सुंदरी ! आता (शब्दशः हा) अरुणाच्या किरणांचे आगमन झाले आहे (असे) कोंबडे आरवून (जणू) एकमुखाने सांगत आहेत.

येथे प्रथमसमागमसमयी (प्रियकरास) गाढ आलिंगन दिल्यामुळे जिची गात्रे निश्चल झाली आहेत अशा नवोढेस जागे करताना तिची सखी म्हणते 'प्रियकरास सोड, प्रभातकालीन संध्येमध्ये अरुणाच्या किरणांचे आगमन झाले आहे, कोंबडे(ही) आरवत आहेत.' येथील 'सम्' व 'प्र' हे उपसर्ग केवळ शब्दाची पूर्ती करणारे असल्याने निरर्थक होत. त्यामुळे (त्यांचा प्रयोग) अनुचितच होय.

विवरण—ह्या अर्थसुंदर उदाहरणश्लोकावरील क्षेमेन्द्राची सर्व टीका त्याच्या अरसिकत्वाची द्योतक आहे असे निरुपायास्तव म्हणावे लागते. वस्तुतः, 'सम्' म्हणजे एकत्र, 'प्र' म्हणजे प्रकर्षाने ह्या दोन उपसर्गांच्या साह्याने कुमारदासाने 'अरुणोदय झाला आहे हे सत्य कोंबडे एकत्र मोठ्याने आरवून सूचित करीत आहेत,' असा रमणीय अर्थ प्रतिपादिला आहे. किंबहुना, ह्या दोन उपसर्गांतच प्रस्तुत श्लोकातील सौंदर्याचे सारसर्वस्व सामावलेले आहे. परंतु, ते क्षेमेन्द्राला जाणवत नाही, उलट त्याला येथे अनौचित्य प्रतीत

होते, हे रसिकांचे दुर्भाग्य होय !! ह्याउलट डॉ. कीथ ह्या पाश्चिमात्यालाही ह्या श्लोकातील तरल चारुतेचे किती यथार्थ आकलन झाले होते, ते त्याने ह्या श्लोकाच्या केलेल्या पुढील भाषांतरावरून समजून येईल.

"Loved one, timid in our first joy of love, relax thy clinging grasp and let me go; do not the cocks, fair one, proclaim in unison the advent of ruddy dawn ?" [Dr. A. B. Keith, A History of Sanskrit Literature (1953) p. 209] दुर्दैवाने कीथच्या भाषांतरांतील our व me हे दोन्ही शब्दही चुकीचे आहेत ! प्रस्तुत काव्याचा वक्ता प्रियकर नसून नायिकेची सखी आहे, ह्या वस्तुस्थितीकडे कीथचे लक्ष गेले नाही ! हा श्लोक चुकीने कुमारदासाच्या नावावर दाखल केला गेला आहे, असे डॉ. दे (History of Sanskrit Literature, 1947, p. 19, foot-note 2) म्हणतात. हाच श्लोक सरस्वती-कंठाभरणात (२·२६) शब्दालंकारगतीचे उदाहरण म्हणून दिलेला आहे. ह्या श्लोकातील 'वरतनु ! संप्रवदन्ति कुक्कुटा···।' एवढा भाग पतंजलि-महाभाष्यात (Vol.I,P. 283) आढळतो. हा श्लोक म्हणजे समस्यापूरणाचे उत्कृष्ट उदाहरण होय, असे कीथ (उपर्युक्त पृ० २०९) म्हणतो.

मर्मस्थान तेरावे—निपात

निपातौचित्यं दर्शयितुमाह—

उचितस्थानविन्यस्तैर्निपातैरर्थसंगतिः ।
उपादेयैर्भवत्येव सचिवैरिव निश्चला ॥ २५ ॥

उपादेयैश्चादिभिर्निपातैरुचितपदविनिवेशितैः काव्यस्यार्थसंगतिरसंदिग्धा सत्सहायैरिव भवति ।

सरलार्थ—निपाताचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे योग्य स्थानी नियुक्त केलेल्या सचिवांच्या द्वारे अर्थसंगती म्हणजे राज्यलक्ष्मी निश्चल होते, त्याप्रमाणे योग्य स्थानी वापरलेल्या, उपयुक्त निपातांच्या योगे काव्याच्या अर्थाची संगती स्थिर होते (म्हणजे अर्थसंगती चांगली बसते).

उपयुक्त 'च' आदी निपातांची योग्य जागी योजना केल्याने काव्याच्या

अर्थाची संगती, चांगल्या सहायकांनी व्हावी त्याप्रमाणे, निःसंदिग्ध होते. (म्ह० अर्थसंगतीबद्दल संदेह उरत नाही.)

विवरण—संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांनी च, वै, तु, हि ह्या पादपूरणार्थकांचा उपयोग करण्याची मुभा कवींना दिली आहे. क्षेमेन्द्रानेही येथे 'च' चा स्पष्ट उल्लेख केला आहे. तथापि, क्षेमेन्द्राला निपातरूप (अव्ययरूप) सार्थ 'च' अभिप्रेत आहे, निरर्थक 'च' (जो पादपूरणार्थ वापरला जातो तो) अभिप्रेत नाही. प्रस्तुत कारिकेत त्याने, निपात योग्य जागी वापरलेले असले पाहिजेत व ते उपादेय (उपयुक्त) असले पाहिजेत, ह्या निपातविषयक दोन महत्त्वाच्या अटी घातल्या आहेत, त्यांवरूनही त्याला सार्थ निपात अभिप्रेत आहेत, हे स्पष्ट होते. निपातांना त्याने दिलेली सचिवांची उपमा अन्वर्थक व मनोरम आहे. 'उचितस्थानविन्यस्तैः' हा शब्द सहाव्या कारिकेची आठवण करून देतो.

यथा मम मुनिमतमीमांसायाम्—

७३. 'सर्वे स्वर्गसुखार्थिनः क्रतुशतैः प्राज्यैर्यजन्ते जडा-
स्तेषां नाकपुरे प्रयाति विपुलः कालः क्षणार्धं च तत् ।
क्षीणे पुण्यधने स्थितिर्न तु यथा वेश्यागृहे कामिनां
तस्मान्मोक्षसुखं समाश्रयत भोः सत्यं च नित्यं च तत् ॥'

अत्र स्वर्गसुखस्य वेश्याभोगवदवसानविरसचपलतायां प्रतिपादितायां निश्चलमोक्षसुखस्य निःसन्देहनिश्चिता प्रतिपत्तिर्निपातपदोपबृंहिता वाक्यार्थौचित्यं जनयति ।

सरलार्थ—उदाहरणार्थ, माझ्या मुनिमतमीमांसेतील ह्या श्लोकात निपातौचित्य आढळेल—

स्वर्गाच्या सुखाची इच्छा करणारे सर्व मूर्ख लोक शतावधी लंब्याचौड्या यज्ञयागांनी यजन करतात. आणि स्वर्गलोकात त्यांचा सुदीर्घ काळ क्षणार्धासारखा जातो. ज्याप्रमाणे वेश्येची माडी चढलेला कामी पुरुष धनरूपी पुण्य क्षीण झाले असता तेथे राहू शकत नाही, त्याप्रमाणे (स्वर्गलोकी गेलेले हे मूर्ख) पुण्यरूपी धन क्षीण झाले असता तेथे टिकू शकत नाहीत. म्हणून, लोक हो ! मोक्षाच्या सुखाला जवळ करा. (कारण) ते सत्य व नित्य आहे. (तेच सुख खरे व अविनाशी.)

येथे, स्वर्गसुख वेश्योपभोगाप्रमाणे शेवटी वैरस्यकारक व क्षणिक असल्याचे प्रतिपादून निश्चल मोक्षसुख निःसंदिग्ध व निश्चित असल्याचे ज्ञान करविले

आहे. ते (ज्ञान) निपात शब्दांनी परिपुष्ट झाले असून वाक्यार्थाचे औचित्य उत्पन्न करते.

टीप—प्रस्तुत उदाहरणश्लोकातील द्वितीय व चतुर्थ पादांतील 'च' कार व तृतीय पादातील 'तु' योग्य स्थळी पडले असून उपादेय आहेत यात शंका नाही.

न तु यथा श्रीचक्रस्य—

७४. 'देवो जानाति सर्वं यदपि च तदपि ब्रूमहे नीतिनिष्ठं
सार्धं संधाय जालान्तरधरणिभुजा निर्वृतो बान्धवेन।
म्लेच्छानुच्छिन्धि भिन्धि प्रतिदिनमयशो रुन्धि विश्वं यशोभिः
सोदन्वन्मेखलायां परिकलय करं किं च विश्वंभरायाम्॥'

अत्र क्षितिपतिस्तुतिप्रस्तावे 'देवो जाति सर्वं यदपि च तदपि' इति यदुक्तं तत्र पूर्वापरपदयोरसंबद्धत्वेन निरर्थक एव निरुपयोगश्चकारः प्रततोत्सवबहुजनभोजनपंक्तावपरिज्ञातः स्वयमिव मध्ये समुपविष्टः पश्चादभिव्यक्तः परं लज्जादुर्मनौचित्यं प्रतनोति॥ २५॥

सरलार्थ—परन्तु, उदाहरणार्थ श्रीचक्राच्या ह्या श्लोकात निपातौचित्य नाही—

महाराज! आपण सर्व जेसुद्धा जाणता, तरीसुद्धा आम्ही (काही) नीतीच्या गोष्टी सांगणार आहोत. आपला बांधव असलेल्या जालान्तराच्या राजाशी तह करून आपण शांत व्हावे. राजन्! यवनांचा (अनार्यांचा) उच्छेद कर, दररोज आपले अपयश धुऊन काढ, विश्व यशाने भरून काढ आणि सागराचा कमरपट्टा ल्यालेल्या वसुंधरेत काय आहे ते हात पसरून जाणून घे.

येथे राजाच्या प्रशंसेच्या प्रारंभी, 'महाराज जे सुद्धा सर्व काही जाणता' असे जे म्हटले आहे त्यातील चकारापूर्वीचा (म्हणजे यदपि) व नंतरचा (म्हणजे तदपि) परस्परांशी संबद्ध नसल्याने (तो चकार) निरर्थकच म्हणजे निरुपयोगी होय. फार मोठ्या उत्सवात अनेक लोकांची भोजनाची पंगत बसली असता तीत (एखादा) अपरिचित (अनाहूत) मनुष्य आपण होऊन बसतो (व) मागाहून (अनाहूत म्हणून) ओळखला गेल्यावर अतिशय शरमिंदा होऊन खिन्न होतो, तद्वत् तो (चकार) अनौचित्य प्रकट करतो.

विवरण—क्षेमेन्द्राच्या सूक्ष्मदृष्टीचे येथे चांगलेच प्रत्यन्तर येते. प्रस्तुत उदाहरणश्लोकातील 'च' कार क्षेमेन्द्राने म्हटल्याप्रमाणे खरोखरीच निरर्थक

म्हणजे निरुपयोगी आहे. तो पादपूर्तीसाठी वापरला गेला आहे हे उघड आहे. अशा स्थळीं पारंपरिक शास्त्रदृष्टया निरर्थकत्व दोष होतो. क्षेमेन्द्राची त्या चकारावरील टीका जितकी 'सरस' तितकीच त्याच्या विनोदबुद्धीची साक्ष पटविणारी आहे. प्रस्तुत टीकेचे श्रीचक्रानेही (तो क्षेमेन्द्रकाली हयात असता तर) मनापासून स्वागतच केले असते ! क्षेमेन्द्राने 'च' काराला दिलेली भोजनभाऊची उपमा नुसतीच हृद्य नाहीत, तर ती चित्रमयही आहे. क्षेमेन्द्राची येथील टीका वाचून काव्यात शब्दालाच नव्हे तर अक्षरालासुद्धा अतिशय महत्त्व असते ह्याची खात्री पटून लॉर्ड बायरन्च्या एका कवितेतील दोन ओळींची आठवण होते:—

"One shade the more, one ray the less,
Had half impair'd the nameless grace ?"

मर्मस्थान चौदावे—काल

कालौचित्यं दर्शयितुमाह—

> कालौचित्येन यात्येव वाक्यमर्थेन चारुताम् ।
> जनावर्जनरम्येण वेषेणेव सतां वपुः ॥ २६ ॥

कालकृतौचित्ययुक्तेनार्थेन वाक्यं चारुतामेति वेषपरिग्रहेणेव कालयोग्येन सतामवसरज्ञानां वपुः ॥

सरलार्थ—कालाचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे लोकांना आकृष्ट करणाऱ्या रमणीय वेषाने सज्जनांचे शरीर सुंदर दिसते, त्याप्रमाणे कालाला अनुरूप अर्थाच्या योगे वाक्याला सुंदरता प्राप्त होतेच.

ज्याप्रमाणे काळवेळेचे भान राखणाऱ्या सज्जनांचे शरीर काळाला (प्रसंगाला) उचित वेष धारण केल्याने शोभते, त्याप्रमाणे कालकृत औचित्याने युक्त अर्थामुळे वाक्याला शोभा येते.

विवरण—येथे कालौचित्य व लोकाकर्षक वेष यांची परस्परतुलना केलेली आहे. क्षेमेन्द्राचे म्हणणे असे की, भूतकालीन प्रसंग, घटना इत्यादींच्या वर्णनार्थ भूतकालीन; वर्तमानकालीन क्रिया, प्रसंग इत्यादींच्या वर्णनासाठी वर्तमानकालीन व भविष्यत्कालीन अर्थाच्या प्रतिपादनासाठी भविष्यत्कालीन क्रियाशब्दाचा उपयोग कवीने केला पाहिजे. तत्तत्कालीन घटनांच्या वर्णनासाठी

कवीला तत्तत्कालीन क्रियापदाचा प्रयोग करावाच लागतो. तसे न करणारा कवी अ-कवीच म्हटला पाहिजे! मग येथे क्षेमेन्द्राने अभिनव असे काय सांगितले आहे, असा प्रश्न उत्पन्न होतो. कारिकागत आणखी एक दोषही लक्षात घेण्याजोगा आहे. तो असा की, कालोचित अर्थ म्हणजे लोकाकर्षक परिवेष असे म्हटल्याने 'काल' हे मर्मस्थान बाह्यशोभासाधक अलंकारासारखे ठरते. परिवेष कितीही आकर्षक व शरीरशोभा साधणारा असला तरी तो सरतेशेवटी बाह्यच होय. त्याचा संबंध शरीराशीच, आत्म्याशी नव्हे. जे शरीर-संबद्ध ते आहार्य (उपार्जित, अस्वाभाविक) असल्यामुळे त्याचा काव्या-त्म्याशी संबंध नाही, ही तर क्षेमेन्द्राची ठाम भूमिका आहे. (पाहा—कारिका ५ वरील वृत्ती.) अशा स्थितीत कालौचित्य हे काव्याचे स्थिर, अविनश्वर जीवित ठरणे कठीण आहे! आणखी एक लहानसा मुद्दा आहे. क्षेमेन्द्राने बाराव्या कारिकेतील 'सतां' शब्दाचे स्पष्टीकरण वृत्तीत 'काव्यविवेक-विचक्षणानां' ह्या शब्दाने केले आहे. येथे 'सतां' चे विवरण 'अवसरज्ञानां' पदाने केले आहे. ही ही विसंगतीच नव्हे का?

यथा मम मुनिमतमीमांसायाम्—

७५. 'योऽभूद्गोपशिशुः पयोदधिशिरश्चौरः करीषंकष-
स्तस्यैवाद्य जगत्पते! खगपते! शौरे! मुरारे! हरे!
श्रीवत्साङ्क! जडैरितिस्तुतिपदे कर्णौ नृणां पूरितौ
हा कालस्य विपर्ययप्रणयिनी पाकक्रियाश्चर्यभूः ॥'

अत्रामर्षविषविषमात्रिष्कारमुमूर्षुणा शिशुपालेनाभिधीयमाने यत्किल गोपालबालः पयोदधिशिरश्चौरः करीषंकषोऽभूत् तस्यैवाद्य जगन्नाथादिभिः स्तुतिपदैर्नृणां कर्णौ पूरितौ हा बत कालस्य विपर्ययकारिणी पाकक्रियाऽऽश्चर्य-भूमिरिति वाक्येऽभूत् इतिभूतकालेनाश्चर्यपरिपोषरुचिरमारब्धाधिक्षेपलक्षणं वाक्यौचित्यं कृतम् ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, माझ्या मुनिमतमीमांसेतील ह्या श्लोकात कालौचित्य आढळेल—

जो गवळ्याचा मुलगा (पूर्वी) दूध-दही चोरणाऱ्यांचा नायक (किंवा दूध-दही-लोणी चोरणारा) व गोवऱ्या वेचणारा होता त्यालाच आज मूर्ख लोक 'जगत्पती! देवेश! शौरी! मुरारी! हरी! श्रीवत्सांक!' अशा प्रशंसापर शब्दांनी संबोधितात. (ह्या शब्दांनी) लोकांचे कान भरून गेले आहेत. खरच, कालाचा विपर्यय साधणारी पाकक्रिया आश्चर्याची जन्मभूमी आहे.

येथे जळफळाटाच्या विषमविषाच्या आविष्काराने मुमूर्षू (झालेल्या) शिशुपालाने उच्चारलेल्या, 'जो गुराख्याचा पोर पूर्वी दही-दूध चोरणाऱ्यांचा पुढारी व गोवऱ्या वेचणारा होता त्यालाच आज जगन्नाथ इत्यादी स्तुतिपर शब्दांनी संबोधिलेले ऐकून लोकांचे कान भरून गेले आहेत. खरोखरच कालाचा विपर्यय (विपरीतता) साधणारी ही पाकक्रिया (परिपक्वतेची क्रिया) आश्चर्यांची जन्मभूमी आहे,' ह्या वाक्यातील 'अभूत्' (होता) ह्या भूतकालीन शब्दाने आश्चर्याचा सुंदर परिपोष झाला असून (शिशुपालाने) आरंभिलेल्या अधिक्षेपपर वाक्याचे औचित्य साधले आहे.

विवरण—वस्तुतः, पूर्वीची स्थिती व सद्यःस्थिती ह्यातील विरोधच हृदयाकर्षक आहे. पूर्वीचा गुराख्याचा पोर आता जगत्पती झाला आहे, ह्या वर्णनातच प्रस्तुत उदाहरणश्लोकाची खरी रुचिरता आहे. पूर्वस्थितीच्या वर्णनासाठी 'अभूत्' किंवा तत्सदृश भूतकालीन क्रियापदप्रयोग अनिवार्यच होता, तेथे कवीने वर्तमानकालीन वा भविष्यत्कालीन क्रियाप्रयोग केला असता तर त्यास भाषानभिज्ञ असेच कोणीही म्हटले असते! मग अशा स्थितीत येथे कवीने भूतकालीन प्रयोग करून अनपेक्षित, चमत्कृतिपूर्ण असे काय साधले आहे?

यथा वा मालवकुवलयस्य—

७६. 'च्युतसुमनसः कुन्दाः पुष्पोद्गमैरलसा द्रुमा
मनसि च गिरं गृह्णन्तीमे किरन्ति न कोकिलाः।
अथ च सवितुः शीतोल्लासं लुनन्ति मरीचयो
न च जरठतामालम्बन्ते क्लमोदयदायिनीम्॥'

अत्र शिशुतरवसन्तकान्तोपवमनवरसोल्लाससूच्यमानमनसिजोत्कण्ठावर्णनायामृतुसंधिसमुचिताः कुन्दाः कुसुमावसानशून्यतनवः, किंशुकाशोकाः कलिकोद्गमभरालसाः, मनसि कोकिलाः कलकूजितान्यनुसंदधाति, रवेर्मरीचयः शीतोल्लासमथ च निवारयन्ति न च संतापदायिनीं प्रौढतामालम्बन्ते, इत्युक्ते वर्तमानकालपदेनैव हृदयसंवादसुन्दरमौचित्यं किमप्यामोदते॥

सरलार्थ–अथवा, उदाहरणार्थ, मालवकुवलयाच्या ह्या श्लोकात कालौचित्य आढळेल—

कुन्दाच्या लतांची फुले गळली आहेत, (किंशुक, अशोक इत्यादी) वृक्ष फुलांनी बहरल्यामुळे आळसावले (भारावले) आहेत, हे कोकिल पक्षी शब्द मनातच धरून आहेत, (अद्यापी) कूजन करू लागले नाहीत, जरी सूर्याची

किरणे थंडीचा काटा मोडीत आहेत तरी त्यानी (अजून) शीण-भागोटा आणणारा प्रखरपणा धारण केला नाही.

येथे नुकत्याच सुरू झालेल्या वसंतऋतूने रमणीय बनलेल्या उपवनांमध्ये (सर्वत्र पसरलेल्या) उल्हसित वातावरणामुळे अभिव्यक्त होणाऱ्या कामजन्य उत्कंठेच्या वर्णनात, 'दोन ऋतूंच्या संक्रमणकालाला अनुरूप कुन्दलता फुले गळून गेल्यामुळे शून्य (भकास) झाल्या आहेत; पळस, अशोक ह्या झाडांवर कळ्या आल्यामुळे ती आळसावली (भागवली) आहेत; कोकिळा मनातल्या मनात कूजनाचे अनुसंधान करीत आहेत; सूर्याचे किरण थंडीच्या कडाक्यापासून निवारण करीत आहेत; परंतु त्यांनी अद्यापी तापदायक प्रखरता धारण केलेली नाही,' असे जे म्हटले आहे त्यातील वर्तमानकालीन पदांमध्येच एक हृदयाकर्षक सुंदर औचित्य दरवळत आहे.

टीप—शिशिर ऋतू नुकताच संपला असून वसंताने नुकतेच पदार्पण केले आहे. अशा दोन ऋतूंच्या संक्रमणकाळाचे वर्णन येथे कवीने केले आहे. अर्थात्, त्याने अशा वर्णनात वर्तमानकालीन क्रियांचाच प्रयोग करावयास हवा.

यथा वा भट्टभल्लटस्य—

७७. 'मृत्योरास्यमिवाततं धनुरिदं मूर्च्छद्विषाश्चेषवः
शिक्षा सा विजितार्जुना प्रतिलयं सर्वांगलग्ना गतिः ।
अन्तः क्रौर्यमहो शठस्य मधुनो हा हारि गीतं मुखे
व्याधस्यास्य यथा भविष्यति तथा मन्ये वनं निर्मृगम् ।।'
[भल्लटशतक ९७]

अत्र लुब्धकस्य धनुःसायकशिक्षागतिक्रौर्यगीतानि तथा यथा वनं निर्मृगं भविष्यतीति भविष्यत्कालः प्रकृतार्थपरिपोषेण हृदयसंवादौचित्यमादधाति ।

सरलार्थ—अथवा, उदाहरणार्थ, भट्टभल्लटाच्या ह्या श्लोकात कालौचित्य आढळेल—

ह्या मधु नामक पारध्याचे हे ताणलेले धनुष मृत्यूच्या तोंडासारखे आहे, आणि बाण मूर्च्छेचा द्वेष करणारे (म्ह० नित्य स्फुरण पावणारे) आहेत. त्याचे शिक्षण अर्जुनाच्या शिक्षणास जिंकणारे (अर्जुनाच्या शिक्षणावर मात करणारे) असून सर्व शरीरात लयबद्ध गती आहे. हृदय अत्यंत क्रूर असून, अहो! ह्या शठाच्या मुखात 'हा हारि' असे गीत आहे. (ह्या व्याधाच्या ह्या सर्व गोष्टींकडे पाहून)

मला वाटते की, अरण्य पशुरहित होईल. (हा व्याध अरण्यातील सर्व पशूंची हत्या करून वन पशुरहित बनवील.)

येथे, पारध्याची धनुष्य, बाण, शिक्षण, गती, क्रौर्य व गीत ही सारी अशी आहेत की त्यांयोगे अरण्य पशुशून्य होईल, अशा प्रकारे भविष्यत्कालीन शब्दप्रयोगाने प्रस्तुत अर्थाचे सर्वतोपरी पोषण होऊन हृदयानुकूल औचित्य प्रकट झाले आहे.

टीप :—येथेही 'हा व्याध अरण्यातील सर्व पशूंची हत्या करील' हे सांगताना भविष्यत्कालीन प्रयोग होणे अगदी अपरिहार्यच आहे. त्यात वेगळेपणा तो कोणता ?

न तु यथा वराहमिहिरस्य—

७८. 'क्षीणश्चन्द्रो विशति तरणेर्मण्डलं मासि मासि
लब्ध्वा कांचित्पुनरपि कलां दूरदूरानुवर्ती ।
संपूर्णश्चेत्कथमपि तदा स्पर्धयोदेति भानो-
र्नो दौर्जन्याद्विरमति जडो नापि दैन्याद् व्यरंसीत् ॥'

अत्र रवेर्मण्डलं क्षीणः शशी प्रतिमासं प्रविशति ततः कांचिदाप्यायिकां कलां प्राप्य दूरे दूरे भवति । परिपूर्णश्च तस्यैव स्पर्धयाऽभ्युदेति । दौर्जन्याच्च विरमति न च दैन्याद् व्यरंसीदिति 'विरमति', 'व्यरंसीत्' इति परस्परासङ्गतं कालपदद्वयं चंद्रस्य सदृशयोर्दौर्जन्यदैन्ययोः सर्वकालमभिनिर्वृत्तयोर्यदुपन्यस्तं तत्र व्यरंसीदिति विरुद्धार्थत्वादनुचितमेव ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, वराहमिहिराच्या ह्या श्लोकात कालौचित्य नाही—

चंद्र क्षीण होऊन दरमहा सूर्यमंडलामध्ये प्रवेश करतो. पुनरपि एखादी कला प्राप्त करून दूरदूर निघून जातो. (षोडशकलांनी) कसाबसा पूर्ण झाला की मग सूर्याशी स्पर्धा करण्याच्या बुद्धीने उगवतो. हा मूर्ख चंद्र दुर्जनतेपासून परावृत्त होत नाही की, दैन्यापासूनही दूर हटला नाही.

येथे, क्षीण (झालेला, निस्तेज बनलेला) चन्द्र प्रत्येक महिन्यात सूर्याच्या मण्डलात प्रवेश करतो, तेथून एखादी परिपोषक कला मिळवून दूर दूर निघून जातो, परिपूर्ण (सकलकलांनी युक्त) झाल्यावर त्याच्याशीच (सूर्याशीच) स्पर्धा करण्याच्या बुद्धीने उदय पावतो, दुर्जनता टाकीत नाही की दैन्यापासून

कधी दूर सरला नाही, या वर्णनातील 'विरमति' व 'व्यरंसीत्' हे दोन परस्परविसंगत असे कालवाचक शब्द आहेत. चंद्राचे ठायी दौर्जन्य व दैन्य हे दोन्ही धर्म नेहमी (सर्वकाळ) राहात असल्यामुळे हे दोन्ही (धर्म चंद्रास) सारखेच आहेत. त्यांच्या वर्णनासाठी 'व्यरंसीत्' असा जो शब्द वापरला आहे तो विरुद्धार्थक असल्यामुळे अनुचितच होय.

विवरण—'विरमति' हे क्रियापद वर्तमानकालीन असून 'व्यरंसीत्' हे भूतकालीन आहे. चंद्र हा नेहमीच (म्ह० सर्व काळीच) दुर्जन व दीन असल्यामुळे त्याचे वर्णन करताना अशी दोन परस्परविरुद्ध अर्थाची क्रियापदे वापरलेली असल्याने काळाचे अनौचित्य झाले, हा क्षेमेन्द्राचा आक्षेप आहे. शुद्ध व्याकरणाच्या दृष्टीने प्रस्तुतचा आक्षेप रास्त आहे. कारण प्रस्तुत वाक्यात क्रियापदांच्या कालगत एकरूपतेचा भंग झाला आहे हे खरे. तथापी, दंडीच्या शब्दात बोलावयाचे म्हणजे काव्याकडे काव्यदृष्टीने पाहावयास हवे, शास्त्रदृष्टीने पाहाता कामा नये (प्रतिज्ञाहेतुदृष्टान्तहानिर्दोषो न वेत्यसौ विचारः कर्कशः प्रायः तेनालीढेन किं फलम् ॥ काव्यादर्श ३।१२७). प्रस्तुत उदाहरणश्लोकाकडे रसिकतेने पाहता असे लक्षात येते की, कवीला येथे चंद्राच्या मिषाने जडाचे वर्णन करावयाचे आहे. जड (मूर्ख) प्रज्ञावंतांकडून मदत मिळवितो व पुनः त्यांच्याशीच स्पर्धा करू पाहातो. असे करताना तो आपल्या स्वाभाविक दुष्टतेला बिलगूनच असतो. बरे, कधी बापुडवाणा झाला आहे असे म्हणाल, तर तेही नाही. चंद्र पुन्हापुन्हा क्षीण होतो व पुन्हापुन्हा सूर्यामुळे तेजस्वी बनतो. पण तो कधी दीनवाणा झाला का ? कधीच नाही. तोसुद्धा जर कधीच दीनवाणा झाला नाही तर त्याच्याचसारखा असलेला मूढ कधीकाळी दैन्य प्रदर्शित करील अशी अपेक्षा का करता ? एवंच, जडांचा हा स्वभावच होय, असा जणू अजडांना कवी उपदेश करीत आहे. हीच ध्वन्यर्थच्छटा कवीला येथे अभिप्रेत असावी असे वाटते. कालविषयक औचित्यानौचित्याची सर्व उदाहरणे व त्यांवरील गद्यवृत्ती वाचूनही असेच म्हणावेसे वाटते की, कालौचित्य हे पृथक् औचित्यस्थान मानण्याची आवश्यकता आहे हे क्षेमेन्द्राला प्रभावीपणाने व प्रत्ययोत्पादक रीतीने पटविता आलेले नाही. क्षेमेन्द्र उदाहरणे देताना वराहमिहिरासारख्या ज्योतिषाच्या ग्रंथाकडेही धाव घेतो, ह्यावरून त्याच्या विस्तृत वाचनाध्ययनाचा व ग्रंथ सजविण्यासाठी मनःपूर्वक प्रयत्न करण्याच्या प्रवृत्तीचा चांगलाच बोध होतो.

मर्मस्थान पंधरावे–देश

देशौचित्यं दर्शयितुमाह—

देशौचित्येन काव्यार्थः ससंवादेन शोभते ।
परं परिचयाशंसी व्यवहारः सतामिव ॥ २७ ॥

देशविषयौचित्येन हृदयसंवादिना काव्यार्थः सतां व्यवहार इव परिचय-सूचकः शोभते ।

सरलार्थ—देशाचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे दाट परिचय प्रकट करणारा सज्जनांचा व्यवहार शोभतो त्याप्रमाणे सुसंवादी देशौचित्याने काव्यार्थाला शोभा प्राप्त होते.

हृदयाकर्षक देशविषयक औचित्याच्या योगे काव्याचा अर्थ, सज्जनांच्या व्यवहाराप्रमाणे परिचयाचा सूचक बनून शोभून दिसतो.

विवरण—मागील एकोणिसाव्या कारिकेत क्षेमेन्द्राने, 'सज्जनाची क्रिया (म्हणजे त्याचा व्यवहार) औचित्ययुक्त असेल तर त्याचे गुण, सद्वर्तन, संभावितपणा ह्या सर्व गोष्टी शोभून दिसतात', असे म्हटले आहे. तेथे सज्जनाचा व्यवहार व काव्यातील क्रियापद यातील साम्य प्रदर्शित केले आहे, येथे (कारिका २७ मध्ये) सज्जनाचा व्यवहार व काव्यार्थ यातील साम्य निरूपिले आहे. दोन्ही वाक्यातील सज्जनव्यवहाराला छेद दिला तर काव्यगत क्रियापद म्हणजे काव्यार्थ अशा समीकरणाची बाकी उरते ! शिवाय, सज्जनव्यवहार ह्या उपमानाचा पुनः उपयोग केल्यामुळे पुनरुक्तत्व हा अलंकारदोष झाला आहे तो वेगळाच !

यथा भवभूतेः—

७९. 'पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरितां
विपर्यासं यातो घनविरलभावः क्षितिरुहाम् ।
बहोर्दृष्टं कालादपरमिव मन्ये वनमिदं
निवेशः शैलानां तदिदमिति बुद्धिं द्रढयति ।'

[उत्तररामचरित २.२७]

अत्र बहुभिर्वर्षसहस्रैरतिक्रान्तैः शम्बूकवधप्रसंगेन दण्डकारण्यं रामः पूर्वपरिचितं पुनः प्रविष्टः समन्तादवलोक्यैवं ब्रूते—'पुरा यत्र नदीनां प्रवाहस्तत्रेदानीं तटम्, वृक्षाणां घनविरलत्वे विपर्ययश्चिराद्दृष्टं वनमिदमपूर्वमिव मन्ये, पर्वतसन्निवेशस्तु तदेवैतदिति बुद्धिं स्थिरीकरोति', इत्युक्ते चिरकाल-

विपर्ययपरिवृत्तसंस्थानकाननवर्णनया हृदयसंवादी देशस्वभावः परममौचित्यमुद्योतयति ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, भवभूतीच्या ह्या श्लोकात देशौचित्य आढळेल—

पूर्वी जेथे नद्यांचा प्रवाह होता तेथे आता पुळण (तट, किनारा) (निर्माण) झाली आहे. वृक्षांच्या घनत्वाचा व विरलत्वाचा विपर्यास झाला आहे (जेथे दाट वृक्ष होते तेथे त्यांची संख्या घटली आहे, जेथे झाडी विरळ होती तेथे ती घनदाट झाली आहे), बऱ्याच काळावधीनंतर बघितलेले हे वन मला वेगळेच वाटते. (परंतु) पर्वतांची (यथापूर्व) स्थिती (हे वन) तेच होय, अशी धारणा दृढ करते.

येथे, मध्यंतरी हजारो वर्षे लोटल्यानंतर शंबूकाच्या वधाच्या निमित्ताने (प्रसंगी) राम पूर्वपरिचित दंडकारण्यात पुनः गेला असता आवतीभोवती बघून असे म्हणाला—'पूर्वी जेथे नद्यांचा प्रवाह होता तेथे आता (सांप्रत) तट (निर्माण झाला) आहे, वृक्षांच्या घनविरलत्वात उलटसुलट स्थिती (उत्पन्न) झाली आहे. बऱ्याच वर्षांनी पाहिलेले (आज पुनः पाहात असलेले) हे वन अपूर्व असेच मला वाटते, परंतु पर्वतांच्या (पूर्ववत्) स्थितीकडे पाहून तेच हे होय अशी धारणा स्थिर होते,' ह्या रामोक्तीमधील, दीर्घकालजनित फेरफारांमुळे ज्यातील रचनेत परिवर्तन झाले आहे अशा अरण्याच्या वर्णनाच्या योगे चित्ताकर्षक देशस्वभाव श्रेष्ठ औचित्य प्रकटवीत आहे.

टीप—'कविसम्राट्' पदवी मिळवू इच्छिणाऱ्या होतकरूने ज्या अनेक शास्त्रांचे अध्ययन केले पाहिजे असे क्षेमेन्द्राने कविकंठाभरणाच्या पंचम संधीत बजावले आहे, त्या शास्त्रांमध्ये देशज्ञानाचाही समावेश होतो.

न तु यथा राजशेखरस्य—

८०. 'कर्णाटीदशनाङ्कितः शितमहाराष्ट्रीकटाक्षाहतः
प्रौढान्ध्रीस्तनपीडितः प्रणयिनीभ्रूभंगवित्रासितः ।
लाटीबाहुविवेष्टितश्च मलयस्त्रीतर्जनीतर्जितः
सोऽयं संप्रति राजशेखरकविर्वाराणसीं वाञ्छति ॥'

अत्र कर्णाटमहाराष्ट्रान्ध्रलाटमलयललनासंभोगसुभगः कालेन गलितरागमोहः संप्रति राजशेखरकविर्वाराणसीं गन्तुमिच्छतीत्युक्ते शृंगाररसतरंगितवरांगनाप्रसंगेऽनंगनिरर्गलदक्षिणापथदेशोद्देशमध्ये प्रणयिनीभ्रूभंगवित्रासित इति देशोपलक्षणविरहितकेवलप्रणयिनीपदेन देशौचित्यमुपचितमप्यनुचिततां नीतम् ॥ २७ ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, राजशेखराच्या ह्या श्लोकात देशौचित्य नाही—

कर्नाटकीय स्त्रियांच्या दंतव्रणांनी अंकित, महाराष्ट्रीय स्त्रीच्या तीक्ष्ण कटाक्षांनी घायाळ (झालेला), आंध्र देशातील प्रौढांगनांच्या स्तनांनी पीडित, प्रणयिनींच्या भ्रुकुटीभंगांनी भयभीत, लाटदेशीय स्त्रियांच्या बाहूंनी वेढिलेला, आणि मलय देशातील स्त्रीने तर्जनीने झिडकारलेला असा (तो) हा राजशेखर कवी सांप्रत काशीस जाऊ इच्छितो.

येथे कर्नाटक—महाराष्ट्र—आंध्र—लाट—मलय या देशातील स्त्रियांच्या संभोगाचा प्रेमी असा राजशेखर कवी, कालांतराने अनुराग व मोह नाहीसा होत्साता आता वाराणसीस जाऊ इच्छितो ह्या उक्तीत, शृंगाररसाने तरंगित सुंदरींच्या वर्णनप्रसंगी कामदेवाचा अप्रतिहत संचार असलेल्या दक्षिणापथातील देशांच्या नामनिर्देशामध्ये 'प्रणयिनीभ्रूभंगवित्रासित' असे देशाचा नामनिर्देश न करता केवळ प्रणयिनी शब्दाने (जे वर्णन केले आहे), त्यायोगे देशौचित्यालाही अनौचित्य प्राप्त झाले आहे.

विवरण—राजशेखराने सुरुवातीपासून देशाचा नामनिर्देश करण्याचा क्रम स्वीकारला आहे. परंतु, तो क्रम शेवटपर्यंत न पाळता मध्येच सोडला आहे (देशनामनिर्देश केला नाही). अशा रीतीने, संस्कृत साहित्यशास्त्राच्या दृष्टीने, येथे प्रक्रमभंग किंवा भग्नप्रक्रमत्व हा दोष झाला आहे. हा अनौचित्याचा पृथक् आविष्कारमानण्याचे प्रयोजन नाही.

लाट हे गुजरातचे जुने नांव असून भडोच, बडोदे, अहमदाबाद व खेडा ह्या जिल्ह्यांचा लाटदेशात समावेश होत असे. (Dr. G. V. Devasthali—The Students' New Sanskrit Dictionary, 2nd edition, 1955, P. 1032). मलय म्हणजे सह्याद्रीचा दक्षिण भाग. मलय पर्वत म्हैसूरच्या दक्षिणेपासून त्रावणकोरच्या पूर्व सरहद्दीपर्यंत पसरलेला आहे. मिरी, पोफळ व चंदनाची झाडे ह्या पर्वतावर विपुल प्रमाणावर वाढतात. (तत्रैव–पृ. १०२३)

मर्मस्थान सोळावे-कुल

कुलौचित्यं दर्शयितुमाह—

> कुलोपचितमौचित्यं विशेषोत्कर्षकारणम् ।
> काव्यस्य पुरुषस्येव प्रियं प्रायः सचेतसाम् ॥ २८ ॥

पुरुषस्येव काव्यस्य कुलोन्नतमौचित्यं सविशेषोत्कर्षजनकं प्रायेण बाहुल्येन सहृदयानामभिमतम् ।

सरलार्थ—ज्याप्रमाणे एखाद्या पुरुषाचे कुलोपचित औचित्य त्याच्या विशेष उन्नतीस कारणीभूत होते, त्याप्रमाणे काव्याचे कुलोपचित औचित्य सहृदयांना प्रायः प्रिय वाटते.

पुरुषाप्रमाणे काव्याचे कुलोन्नत औचित्य त्याच्या (काव्याच्या) विशेष उन्नतीचे उत्पादक असते असे प्रायः सहृदयांचे अभिमत आहे.

विवरण—उपसर्गौचित्यप्रतिपादक चोवीसाव्या कारिकेत जो दोष आहे तो ह्या कारिकेतही आहे, त्यामुळे तेथील टीका येथेही लागू पडते. काव्याचे कुलोन्नत औचित्य त्याचा विशेष उत्कर्ष साधते, ह्यावरून ते काव्यसौंदर्य-वर्धक ठरते, सौंदर्योत्पादक ठरत नाही. अतएव ते आगन्तुक अथवा आहार्य होय, स्वाभाविक नव्हे. म्हणूनच ते काव्यजीवित ठरू शकत नाही. क्षेमेन्द्राने प्रायः शब्दाचा प्रयोग करून स्वपक्ष अधिक कमजोर बनवला आहे. औचित्य जर स्थिर व अविनश्वर असे काव्याचे जीवित असेल तर त्याचे संदर्भात प्रायः हा शब्दप्रयोग 'उचित' नाही ! जीवितातही 'प्रायिकत्व' मानल्यास अनर्थच ओढवेल ! एकंदरीने कारिकारचना शिथिल व दूषित आहे.

यथा कालिदासस्य—

८१. 'अथ स विषयव्यावृत्तात्मा यथाविधि सूनवे
नृपतिककुदं दत्त्वा यूने सितातपवारणम् ।
मुनिवनतरुच्छायां देव्या तया सह शिश्रिये
गलितवयसामिक्ष्वाकूणामिदं हि कुलव्रतम् ॥'

[रघुवंश ३.७०]

अत्र 'अथ स राजा वृद्धस्तरुणाय सूनवे राज्यं प्रतिपाद्य तया देव्या सह तपोवनं भेजे । विरक्तचेतसामिक्ष्वाकूणामन्ते हि कुलव्रतमिदमेव' इत्युक्ते भूत-वर्तमानभाविनां तद्वंश्यानामौचित्यमुन्मीलितम् ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, कालिदासाच्या ह्या श्लोकात कुलौचित्य आढळेल—

त्यानंतर, विषयोपभोगांपासून चित्त परावृत्त झालेल्या त्या (दिलीप) राजाने आपल्या तरुण पुत्रास यथाशास्त्र श्वेतच्छत्रादी राजचिन्हे देऊन त्या महाराणी(सुदक्षिणे)सह वानप्रस्थाश्रम स्वीकारला. इक्ष्वाकू गोत्रात जन्मलेल्या वृद्धांचे हे (वनगमन) कुलव्रत होय.

विवरण—वस्तुतः कालिदासाने प्रस्तुत उदाहरणश्लोकाच्या द्वारे रघुवंशीय राजांची एक आदरणीय स्वभावच्छटा प्रकट केली आहे. हिचा संबंध व्यक्ति-

दर्शनकलेशी आहे. क्षेमेन्द्रकृत व्यवस्थेतच ह्या मर्मस्थानाचा अन्तर्भाव करावयाचा झाला तर तो पुढे वर्णिल्या गेलेल्या स्वभावौचित्यात करणे योग्य ठरेल.

क्षेमेन्द्राला प्रस्तुत श्लोकात कुलौचित्याचा विलास प्रतीत होतो. तर प्रसिद्ध संस्कृत टीकाकार मल्लिनाथ कोणत्या प्रश्नाने चिंतित झाला आहे ते पाहाण्यासारखे आहे. वरील श्लोकावर टीका लिहिताना पदपदार्थ विवरून झाल्यावर तो लिहितो—"देव्या सह इत्यनेन सपत्नीकवानप्रस्थाश्रमपक्ष उक्तः। तथा च याज्ञवल्क्यः (प्राय० ३।४५)—'सुतविन्यस्तपत्नीकस्तया वाऽनुगतो वनम्। वानप्रस्थो ब्रह्मचारी साग्निः सोपासनो व्रजेत् ॥' इति ॥"

(The Raghuvaṁśa of Kālidasa, Nirṇaya Sagar Press, 1948, p. 81) क्षेमेन्द्र मल्लिनाथाइतका 'कर्मठ' नाही ही केवढी दिलासा देणारी बाब आहे !

न यथा तु यशोवर्मदेवस्य—

८२. 'उत्पत्तिर्भण्डकुले यदभीष्टं तत्पदं समाक्रान्तम्।
भोगास्तथापि दैवात्सकृदपि भोक्तुं न लभ्यन्ते ॥'

अत्र ममोत्पत्तिर्भण्डकुले समीहितपदाक्रमणं च निष्पन्नं तथापि दैवार्पितप्रियाविप्रयोगाद्भोगा भोक्तुं न लभ्यन्ते इत्यभिहिते स्वसंवेद्यमेव भण्डकुलमन्यत्राप्रसिद्धं स्वयमेव निर्दिश्यमानमुत्कर्षविशेषणविरहितकेवलपदोपादानेन निरर्थकतया निरौचित्यमेव। इक्ष्वाकुकुलस्य तु निर्विशेषणत्वमुपपद्यत एव, त्रिभुवनप्रसिद्धौचित्यचरित्रत्वात् ॥ २८ ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, यशोवर्मदेवाच्या ह्या श्लोकात कुलौचित्य नाही—

माझा जन्म भण्डकुलात झाला, (तसेच) जे स्थान मला अभीष्ट होते तेही मी मिळविले. परंतु दैवामुळे भोग एकदासुद्धा भोगावयास मिळत नाहीत.

येथे मी भण्डकुळात जन्मलो, अभीष्ट पद प्राप्त करून घेतले, परंतु, दैवाने प्रियेपासून माझा वियोग घडवून आणल्यामुळे भोग भोगावयास मिळत नाहीत असे म्हटले आहे. ह्यातील भण्डकुल स्वतःलाच (म्ह० प्रस्तुत उक्तीच्या वक्त्यालाच) ठाऊक आहे, ते इतरत्र प्रसिद्ध नाही. वक्त्याने स्वतःच त्याचा (त्या कुळाचा) उत्कर्ष प्रतिपादक विशेषणरहित असा केवळ 'भण्ड' ह्या शब्दाच्या उच्चारणाने निर्देश केला आहे. त्यामुळे हा निर्देश निरर्थकच अस-

त्याने औचित्यरहितच होय. इक्ष्वाकू कुळाचे औचित्यपूर्ण चरित्र त्रिभुवनप्रसिद्ध असल्यामुळे त्याचा (इक्ष्वाकू कुळाचा) विशेषणरहित उल्लेख उपपन्नच होय.

विवरण—प्रत्येक काव्यनाटकात इक्ष्वाकू कुळासारख्या त्रैलोक्यविख्यात कुळातील व्यक्तींचे चरित्रचित्रण केलेले असते असा नियम नाही. इतिहासाश्रय कथानके वगळता अन्य कल्पित कथानके असलेल्या काव्यादींतील नायकांची कुळे प्रख्यात नसतातच. मग त्या सर्व काव्यादींत कुल-अनौचित्याचा दोष निर्माण होईल. ही स्थिती अर्थातच इष्ट व न्याय्य नाहीं. म्हणूनच कुलौचित्य हे पृथक् औचित्यस्थान न मानता त्याचा स्वभावऔचित्यात समावेश करावा, हे योग्य. प्रत्येक काव्यनाटकामध्ये पात्रांच्या स्वभावांचे दर्शन अवश्य घडविलेले असते. पात्राच्या कुळाचा निर्देश हा त्या पात्राच्या व्यक्तिदर्शनाचाच घटक होय; तसा तो मानावा. मात्र कुळाचा अनिर्देश दोषास्पद समजण्याचे कारण नाही. तसेच कुलनिर्देश स्वभाववर्णनप्रसंगी अवश्य केलाच पाहिजे असाही दंडक घालू नये.

मर्मस्थान सतरावे—व्रत

व्रतौचित्यं दर्शयितुमाह—

> काव्यार्थः साधुवादार्हः सद्व्रतौचित्यगौरवात् ।
> सन्तोषनिर्भरं भक्त्या करोति जनमानसम् ।। २९ ।।

काव्यार्थः समुचितव्रतगौरवात्साधुवादयोग्यः संतोषपूर्णं जनमनः करोति । भक्तिर्विच्छित्तिः ।।

सरलार्थ—व्रताचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

समुचित व्रताच्या औचित्याच्या गौरवामुळे (मोठेपणामुळे) काव्यार्थ 'चांगला' असे म्हणवून घेण्यास योग्य बनतो. (तो) सौंदर्याच्या योगे रसिकांचे मन संतोषनिर्भर करतो.

काव्यार्थ समुचित व्रताच्या मोठेपणामुळे प्रशंसनीय बनून लोकांची मने आनंदमय करतो. भक्ती म्हणजे विच्छित्ती (म्हणजे सौंदर्य).

विवरण—वरील कारिका व तीवरील गद्यवृत्ती दोन्ही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. प्रस्तुत कारिकेत 'उपमा' नाही हे तिचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. आतापर्यंतच्या सर्व कारिका उपमालंकृत असल्याचे आपण पाहिलेच आहे. काव्यात अनुरूप व्रताचे औचित्य असले की त्या काव्याला रसिक 'साधु साधु' म्हणतात, अर्थात्

असे काव्य साधुवादार्ह ठरते, ही क्षेमेन्द्राची भूमिका आहे. ती पटण्यासारखी नाही. एक तर प्रत्येक काव्यात सद्व्रतौचित्यगौरव असतोच असा नियम नाही. जी काव्ये असा गौरव नसताना साधुवादार्ह ठरली आहेत, त्यांची साधुवादार्हता शंकास्पद समजावयाची काय? तसेच ती काव्ये आपल्या अंगच्या इतर घटकांच्या सौंदर्याच्या योगे रसिकचित्त हर्षनिर्भर करीत नाहीत असे थोडेच आहे! शिवाय, सद्व्रतौचित्य असूनही इतर दोषांमुळे काव्य 'असाधुवादार्ह' ठरू शकणार नाही काय? ऋषी, मुनी, तपस्वी, वैरागी, इत्यादींच्या व्रताचे कवी वर्णन करू शकेल पण, क्षेमेन्द्राचेच शब्द वापरावयाचे तर असे म्हणावयास हवे की, कुसुमसुकुमारशृंगाररसकोमलमनांच्या विलासी स्त्रीपुरुषांचे (रससंकरानौचित्यप्रकरण पाहा) कोणते व्रत कवी वर्णिणार? आणि बहुसंख्य काव्यात अशाच व्यक्तींचे वर्णन केलेले नसते काय? एवंच, व्रत प्रत्येक काव्यात अनिवार्यपणे असतेच असे नाही. तस्मात् ते आगंतुक असल्यामुळे मर्मस्थान पदवीवर हक्क सांगू शकत नाही. भक्ती शब्दाचे विभागणी, निष्ठा, पूज्यभाव, श्रद्धा, उपासना, रचना हे अर्थ प्रसिद्ध आहेत. परंतु भक्ती म्हणजे विच्छित्ती हा क्षेमेन्द्रदत्त अर्थ अप्रसिद्ध आहे. मात्र विच्छित्ती म्हणजे सौंदर्य ह्या अर्थाचा प्रयोग त्याने सुवृत्ततिलकात (२।१८) केला आहे.

यथा मम मुक्तावलीकाव्ये—

८३. 'अत्र वल्कलजुषः पलाशिनः पुष्परेणुभरभस्मभूषिताः।
लोलभृङ्गवलयाक्षमालिकास्तापसा इव विभान्ति पादपाः॥'

अत्र तपोधनोचितव्रतव्यंजकवल्कलभस्माक्षसूत्रप्रणयिपादपवर्णनायामचेतनानामपि शमसमयविमलचित्तवृत्तिरौचित्यमुपजनयति ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, माझ्या मुक्तावली काव्यातील ह्या श्लोकात व्रतौचित्य आढळेल—

येथे वल्कले धारण करणारे, फुलांच्या परागांच्या रूपाच्या भस्माने विभूषित आणि चंचल भृंगावलीरूपी जपाची माळ घेतलेले पळसाचे वृक्ष तपस्व्यांसारखे शोभून दिसत आहे.

येथें तपस्व्यांस उचित व्रताच्या सूचक वल्कल, भस्म, जपमाळा ह्या वस्तूंना जवळ करणाऱ्या वृक्षांच्या वर्णनामध्ये अचेतनांचीही वैराग्यकालीन विमल चित्तवृत्ती औचित्य उपजवीत आहे.

विवरण—वस्तुतः येथे अचेतनावर चेतनाध्यारोप करून चेतनगुणोक्ती

अलंकार साधला आहे. अशी वर्णने संस्कृतात वैपुल्याने आढळतात. प्रस्तुत उदाहरणश्लोकातील, क्षेमेन्द्राभिप्रेत, व्रतौचित्याकडे रसिकाचे लक्ष वळत नाही. त्याला कविकृत पलाशवर्णन चमत्कृतिपूर्ण वाटून आल्हाद होतो. क्षेमेन्द्राने कविकंठाभरणाच्या तृतीय संधीत केलेल्या चमत्कारांच्या वर्गीकरणानुसार येथे अलंकारगत चमत्कार असून तो अविचारितरमणीय व समस्तसूक्तव्यापी आहे.

न तु यथा दीपकस्य—

८४. 'पुण्ये ग्रामे वने वा महति सितपटच्छन्नपालीकपाली-
मादाय न्यायगर्भद्विजहुतहुतभुग्धूमधूम्रोपकण्ठम् ।
द्वारं द्वारं प्रवृत्तो वरमुदरदरीपूरणाय क्षुधार्तो
मानी प्राणी सनाथो न पुनरनुदिनं तुल्यकुल्येषु दीनः ॥'

अत्र वैराग्यनिरर्गलवर्णनायां भिक्षाकपालीमादाय क्षुत्क्षामः कुक्षिपूरणाय प्रवृत्तो मानी वरं द्वारं द्वारं यष्टिनिविष्टपाणिः परिभ्रान्तो न पुनरनिशं तुल्यकुल्येषु दीन' इत्युक्ते सहजप्रशमविमलमानसविश्रान्तिसन्तोषमुत्सृज्य तुल्यकुल्यद्वेषविजिगीषापरमेव वाक्यं भृशमनौचित्यमुद्भावयति । वरमेतत्तीव्रव्रतकष्टं न तु स्वजनदैन्ययाचनमिति संसारग्रन्थिबन्धाभिमानोपन्यासः ॥

सरलार्थ—परन्तु, उदाहरणार्थ, दीपकाच्या ह्या श्लोकात व्रतौचित्य नाही—

भुकेने व्याकूळ झालेला स्वाभिमानी मनुष्य पोटाची खळगी (दरी) भरण्यासाठी (हातात) शुभ्र वस्त्राने आच्छादिलेले भिक्षापात्र घेऊन एखाद्या तीर्थक्षेत्री वा मोठ्या वनात, ज्याचा आजूबाजूचा भाग ब्राह्मणांनी आहुती दिलेल्या अग्नीपासून उठणाऱ्या धुराने भरला आहे अशा ठिकाणी दारोदार हिंडलेला बरा. परंतु, त्याने दीनवाणे होऊन दररोज आपल्या भाईबंदांकडे जाणे योग्य नाही.

येथे, वैराग्याच्या अप्रतिबद्ध वर्णनामध्ये 'भुकेने पीडिलेल्या मानी पुरुषाने पोट भरण्यासाठी (हातात) भिक्षापात्र घेऊन, हातात काठी घेऊन दारोदार हिंडणे चांगले, परंतु बापुडवाणे होऊन सतत नातलगांकडे जाणे चांगले नाही,' असे जे म्हटले आहे त्यामध्ये वैराग्यसहज निर्मळपणा, मानसिक विश्रांती (शांती) व सन्तोष यांचा त्याग केला असून स्वकुळाचा द्वेष जिंकण्याचीच भाषा आहे. म्हणून हे वाक्य फार मोठे अनौचित्य उद्भावित करते. ह्या तीव्र (घोर) व्रताचे कष्ट परवडले, परंतु दीन होऊन स्वबांधवांकडे याचना करणे चांगले नाही, अशा शब्दांनी प्रपंचग्रंथिबंधनविषयक अभिमानाचे वर्णन केले आहे.

विवरण—क्षेमेन्द्राने येथे दाखवून दिलेला दोष योग्यच आहे. वैराग्याचे वर्णन अभिप्रेत असतांना कवीने अभिमानाची भाषा बोलणे बरोबर नाही, हे खरे. तथापी, व्रताचा संबंध व्यक्तीच्या चरित्राशी येत असल्यामुळे व्रतौचित्याचा अन्तर्भावही स्वभावौचित्यात करणेच युक्त ठरेल. त्या दृष्टीने येथे अशी टीका करिता आली असती की, येथील कविकृत वर्णन विरागयाच्या स्वभावाला उचित नाही, ते प्रापंचिकाला उचित असे झाले आहे. म्हणून ते सदोष होय. हा श्लोक भर्तृहरीच्या शतकत्रयात (३. २४) आढळतो.

मर्मस्थान अठरावे-तत्त्व

तत्त्वौचित्यं दर्शयितुमाह—

काव्यं हृदयसंवादि सत्यप्रत्ययनिश्चयात् ।
तत्त्वोचिताभिधानेन यात्युपादेयतां कवेः ॥ ३० ॥

तत्त्वोचिताख्यानेन कवेः सूक्तं सत्यप्रत्ययस्थैर्यात्संवादि गृह्यतां याति ।

सरलार्थ—तत्त्वाचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

उचित तत्त्वाच्या प्रतिपादनाने चित्ताकर्षक बनलेले कवीचे काव्य सत्याच्या निश्चयात्मक प्रतीतीमुळे उपादेय (ग्राह्य) बनते.

उचित तत्त्वाच्या वर्णनाच्या योगे कवीचे सूक्त (काव्य) सत्याच्या स्थिर प्रत्ययामुळे हृदयाकर्षक व ग्राह्य बनते.

विवरण—तत्त्व म्हणजे वस्तूचे यथार्थ अथवा अनारोपित रूप. वेगळ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे 'तत् तादृशविषयनिष्ठविषयत्वम् ।' तत् म्हणजे विषय, तो जसा असेल तेवढ्यापुरते विषयत्व ते तत्त्व. तत्त्वाच्या प्रतिपादनाने सत्याचा स्थिर प्रत्यय येतो, वस्तूचे चिरस्थायी रूप समजते. अशा तत्त्ववर्णनाने युक्त काव्य ग्राह्य (आस्वाद्य) बनते, हा क्षेमेन्द्राचा अभिप्राय.

यथा मम बौद्धावदानकल्पलतायाम् [८३.३४]—

८५. 'दिवि भुवि फणिलोके शैशवे यौवने वा
जरसि निधनकाले गर्भशय्याश्रये वा ।
सहगमनसहिष्णोः सर्वथा देहभाजां
नहि भवति विनाशः कर्मणः प्राक्तनस्य ॥'

अत्र प्राक्तनस्य कर्मणः त्रैलोक्ये शैशव-यौवन-वृद्धत्वावस्थासु देहिनां सहगमने समर्थत्वान्न विनाशोऽस्तीत्युक्ते निःसंशयसकलजनहृदयसंवादितत्त्वाख्यानमौचित्यं ख्यापयति ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, माझ्या बौद्धावदानकल्पलतेतील ह्या श्लोकात तत्त्वौचित्य आढळेल—

स्वर्गामध्ये, पृथ्वीवर, पाताळलोकात, शिशु-अवस्थेत अथवा तारुण्यात, वृद्धापकाळात, निधनसमयी वा गर्भावस्थेत देहधाऱ्यांच्या बरोबर राहण्यास समर्थ असलेल्या पूर्वजन्मीच्या कर्मांचा सर्वतोपरी संपूर्ण नाश होत नाही.

येथे पूर्वजन्मीचे कर्म त्रैलोक्यात आणि शैशव, यौवन व वृद्धत्व या अवस्थांमध्ये देहधाऱ्यांबरोबर जाण्यास समर्थ असल्यामुळे विनाश पावत नाही, ह्या उक्तीत सकल जनांच्या हृदयांना निःसंशयपणे रुचणाऱ्या तत्त्वाचे (केलेले) वर्णन औचित्य प्रकट करते.

विवरण—प्रस्तुत श्लोकगत तत्त्व दार्शनिक स्वरूपाचे आहे. तत्त्वाचा विचार दार्शनिक व व्यावहारिक अशा दोन पातळ्यांवरून करता येतो. व्यवहाराचे पर्यवसान जरी अंतिम अर्थाने आत्मज्ञानप्रयासात होत असले तरी व्यवहार व दर्शन ही दोन्ही नेहमीच समेवर येतात असे नाही. जे तत्त्व व्यावहारिक दृष्ट्या उपादेय असते ते उच्च दार्शनिक दृष्टीने हेयही असू शकते. ह्याच्या उलटही परिस्थिती असू शकते. शिवाय, विश्वव्यापी मूलभूत तत्त्वांच्या स्वरूपासंबंधी वेगवेगळ्या दर्शनांत वेगवेगळे विचार मांडलेले असतात. इतकेच नव्हे तर एकाच दर्शनाचेही अनेक मतसंप्रदाय असू शकतात. हे सगळे ध्यानात घेऊनच तत्त्वौचित्याचा विचार करावयास हवा.

न तु यथा माघस्य—

८६. 'बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते न पीयते काव्यरसः पिपासितैः ।
न विद्यया केनचिदुद्धृतं कुलं हिरण्यमेवार्जय निष्फलाः कलाः ॥'

अत्रार्थार्थितापरत्वेन धनमेवार्जय, क्षुधितैर्व्याकरणं न भुज्यते, न च काव्यरसः पिपासितैः पीयते, न च विद्यया कुलं केनचिदुद्धृतमित्युक्ते सर्वमेतद्दारिद्र्यदैन्यविद्रुतधैर्यकातरतया तत्त्वविरहितं विपरीतमुपन्यस्तमनौचित्यं सुयुक्तमेव । विद्यानामेव सर्वसंपत्प्रसविनीनां कुलोद्धरणक्षमत्वं नान्यस्य ॥ ३० ॥

पाठभेद:—बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते, पिपासितैः काव्यरसो न पीयते ।
न च्छन्दसा केनचिदुद्धृतं कुलं, हिरण्यमेवार्जय निष्फला गुणाः ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, माघाच्या ह्या श्लोकात तत्त्वौचित्य नाही.

भुकेलेल्यांकडून व्याकरण खाल्ले जात नाही, तहानेलेल्यांकडून काव्याच्या रसाचे प्राशन केले जात नाही, कोणीही विद्येच्या साह्याने आपला कुलोद्धार साधला नाही, पैसा (सोने) मिळव, सर्व कला व्यर्थ होत.

येथे श्रेष्ठ अर्थाचे महत्त्व सुचविण्यासाठी धनच मिळव, भुकेलेले व्याकरण खात नाहीत, तृषार्त काव्यरसाचे पान करीत नाहीत, कोणीही विद्या संपादून कुल उद्धरले नाही, ह्या उक्तीत हे सर्व दारिद्र्यजन्य दैन्यामुळे धैर्य गळून गेल्याने तत्त्वविरहित असे विपरीत वर्णिले असून त्याद्वारे अनौचित्यच प्रकट झाले आहे. विद्याच सर्व प्रकारच्या संपत्तीच्या निर्मात्या असून त्याच कुलाचा उद्धार करू शकतात, दुसरे काहीच कुलोद्धार करू शकत नाही.

विवरण—वर म्हटलेच आहे की, तत्त्वाचा विचार शुद्ध दार्शनिक व व्यावहारिक अशा दोन पातळ्यांवरून करता येतो. प्रस्तुत उदाहरणश्लोकात तत्त्वविचार पूर्णपणे व्यावहारिक दृष्टिकोणातून केलेला आहे. केवल धनच सर्व काही आहे, कुलोद्धारही धनामुळेच होऊ शकतो, हा विचार उच्च दार्शनिक दृष्ट्या मिथ्या ठरेल हे खरे, तथापी ऐहिक व्यवहाराच्या दृष्टीने 'सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते' हे तत्त्वच सत्याचा स्थिर प्रत्यय आणून देते. हेच तत्त्व व्यवहारात अधिक लागू पडते आणि सर्वसाधारण मनुष्य नित्याच्या व्यवहारात वागताना दार्शनिकाची भूमिका घेऊ शकत नाही. ती भूमिका प्रायः हानिकारक ठरते. म्हणूनच दार्शनिक दृष्ट्या असत्य ठरणारी तत्त्वे व्यवहारात सत्य ठरून स्वीकार्य ठरतात. ह्या दृष्टीने विचार केला असता प्रस्तुत श्लोकात तत्त्वानौचित्य नाही, असेच म्हणावे लागेल. विद्याच सर्व संपदा निर्मितात, हा केवळ आदर्श झाला, व्यवहारात तो सर्वदा, सर्वत्र व सर्वथा उतरतोच असे नाही. प्रस्तुत पद्य भर्तृहरि-सुभाषितसंग्रहात (क्रमांक ६२१) आढळते. क्षेमेन्द्राची येथील गद्यवृत्ती वाचून, 'लक्ष्मीं तनोति वितनोति च दिक्षु कीर्तिम् । किं किं न साधयति कल्पलतेव विद्या ॥' ह्या सुभाषितांशाचे स्मरण होते.

मर्मस्थान एकोणिसावे—सत्त्व

सत्त्वौचित्यं दर्शयितुमाह—

चमत्कारं करोत्येव वचः सत्त्वोचितं कवेः ।
विचाररुचिरोदारचरितं सुमतेरिव ॥ ३१ ॥

सत्त्वोचितं कवेर्वचश्चमत्कारं करोति, सुमतेरिव विचार्यमाणं रुचिरमुदारचरितम् ॥

सरलार्थ—सत्त्वाचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे सद्बुद्धी असलेल्या व्यक्तीचे विचारसुंदर उदारचरित्र आल्हाद देते, त्याप्रमाणे कवीचे सत्त्वोचित वचन (काव्य) चमत्कार उत्पन्न करते.

कवीचे सत्त्वोचित वचन चमत्कार निर्मिते, ज्याप्रमाणे सद्बुद्धी व्यक्तीचे विचार्यमाण सुंदर व उदारचरित्र.

विवरण—विसाव्या कारिकेत क्षेमेन्द्राने उदार चरित्रांनी कुलभूषणभूत ऐश्वर्य शोभते असे म्हटले आहे. येथ त्याने विचारसुंदर उदारचरित्र चमत्कार उत्पन्न करते, असे म्हटले आहे. ह्या दोन कल्पनात विरोध नसला तरी त्याच त्याच कल्पना व तीच तीच उपमाने क्षेमेन्द्राने पुन्हापुन्हा वापरून त्यांची सौंदर्यमत्ता नष्ट करून टाकली आहे, असे वाटू लागते. पुनः, कवीचे सत्त्वोचित वचन तेवढेच चमत्कारोत्पादक असते असे थोडेच आहे ! कव्युक्ती म्हटली की ती चमत्कारसहितच असते, ही तर क्षेमेन्द्राची दृढ धारणा आहे. तो आपल्या कवि-कंठाभरणाच्या तृतीय संधीत 'नहि चमत्कारविरहितस्य कवेः कवित्वं, काव्यस्य वा काव्यत्वम् ।' असा सिद्धान्तच मांडतो. काव्यगत चमत्कार दशविध असून अलंकारगत, रसगत इत्यादी ते दहा प्रकार होत, अशी त्याने व्यवस्थाही लावली आहे. तात्पर्य असे की, त्याच्या सिद्धान्तानुसार काव्य म्हटले की ते सचमत्कारच असावयाचे. अशा परिस्थितीत सत्त्वोचित कविवचन चमत्कार उत्पन्न करते हे त्याचे म्हणणे स्वसिद्धान्तविरुद्ध वाटते. शिवाय, सत्त्वाचा संबंध स्वभावाशी असल्यामुळे सत्त्वौचित्याचा अन्तर्भाव स्वभावौचित्यातच करणे युक्त ठरेल. कारिकागत शब्दांशी 'औदार्यरुचिरौचित्यविचारे…' (सुवृत्ततिलक ३।२०) ह्या शब्दांची तुलना करण्यासारखी आहे.

यथा मम चित्रभारते नाटके—

८७. 'नदीवृन्दोद्दामप्रसरसलिलापूरिततनुः
स्फुरत्स्फीतः ज्वालानिबिडवडवाग्निक्षतजलः ।
न दर्पं नो दैन्यं स्पृशति बहुसत्त्वः पतिरपा-
मवस्थानां भेदाद् भवति विकृतिर्नैव महताम् ॥'

अत्र पयोधिव्यपदेशेन युधिष्ठिरस्य सत्त्वोत्कर्षेऽभिधीयमाने सरित्पूरप्रवर्धिततनुर्वडवाग्निनिष्पीतश्च नोत्सेकं न संकोचमब्धिर्विपुलसत्त्वः स्पृशति ।

न ह्यवस्थानां भेदान्महाशयानां विकारो भवतीत्युक्ते गंभीरधारा सत्त्ववृत्ति-रौचित्यमातनोति ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, माझ्या चित्रभारत नाटकातील ह्या श्लोकात सत्त्वौचित्य आढळेल—

जलांच्या पती (सागरा) चे शरीर नद्यांच्या (शब्दशः नद्यांच्या समूहाच्या) उद्दाम प्रवाहांच्या पाण्याने पूर्णपणे भरून जाते, (आणि दुसरीकडे) दाट ज्वाला असलेल्या, प्रज्वलित व प्रसरणशील अशा वडवाग्नीमुळे ते (शरीर) घटते. (तरीदेखील) अतिशय सत्त्वसंपन्न (असा तो सागर) गर्वही वाहात नाही की दीनताही धारण करीत नाही. परिस्थितीच्या भेदामुळे (बदलामुळे) मोठ्यांचे ठायी बदल (विकार) घडून येत नाहीच.

येथे सागराच्या मिषाने युधिष्ठिराच्या सत्त्वाच्या प्रकर्षाचे वर्णन केले आहे. (ते असे की) अतिशय सत्त्वसंपन्न सागर नद्यांच्या पुराच्या पाण्याने फुगला तरी गर्व करीत नाही व वडवाग्नीने प्राशिला गेला तरी संकोचत नाही. परिस्थितीच्या बदलामुळे महात्म्यांच्या चित्तवृत्तीत बदल घडून येत नाही. ह्या वर्णनात धीरगंभीर सात्त्विक वृत्ती औचित्य प्रसृत (प्रकट) करते.

विवरण—प्रस्तुत श्लोकाचे खरे सौंदर्य अंतिम चरणात सामावलेले आहे असे वाटते. तद्गत अर्थान्तरन्यास मोठा रम्य आहे. सागराचे निमित्त करून धीरगंभीर पुरुषांच्या अविकार्य मनोवृत्तीचेच कवीला येथे वर्णन करावयाचे आहे. मानवी स्वभावाच्या एका पैलूवर—स्पृहणीय पैलूवर—कवीला प्रकाश टाकावयाचा आहे. अर्थात् प्रस्तुत श्लोकगत अर्थाचा संबंध साहित्यातील स्वभावदर्शनकलेशी आहे. त्यामुळे सत्त्वौचित्याचा अन्तर्भाव, पुढे वर्णिल्या जाणाऱ्या, स्वभावौचित्यात करणेच योग्य ठरेल. प्रस्तुत श्लोक अर्थदृष्ट्या 'विकृतिं नैव गच्छन्ति संगदोषेण साधवः। आवेष्टितं महासर्पैश्चन्दनं न विषायते ॥' ह्या श्लोकासारखा आहे. तसेच, प्रस्तुत श्लोक, 'नाप्राप्यमभिवाञ्छन्ति नष्टं नेच्छन्ति शोचितुम्। आपत्स्वपि न मुह्यन्ति नराः पण्डितबुद्धयः ॥' या सुभाषिताची आठवण करवितो.

न तु यथा भट्टेन्दुराजस्य—

८८. 'आश्चर्यं वडवानलः स भगवानाश्चर्यमम्भोनिधि-
र्यत्कर्मातिशयं विचिन्त्य मनसः कम्पः समुत्पद्यते।
एकस्याशयघस्मरस्य पिबतस्तृप्तिर्न जाता जलै-
रन्यस्यापि महात्मनो न वपुषि स्वल्पोऽपि जातः श्रमः ॥'

अत्र वडवानलसमुद्रयोः सत्त्वमहत्त्वे वक्ष्यमाणे नातिविपुलाशयत्वादेकस्य पिबतः पयोभिस्तृप्तिर्न जाता, द्वितीयस्य तदुपजीव्यमानस्य न मनागपि खेदः, तदेतदुभयमाश्चर्यमित्युक्ते निःसंतोषतया सततया च कस्य न वडवाग्नेर्लज्जा, न च जलनिधेराश्रितैकार्थिपूरणसामर्थ्यमित्यसत्त्वे सत्त्वस्तुतिरनौचित्यमावहति ॥ ३१ ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, भट्टेन्दुराजाच्या ह्या श्लोकात सत्त्वौचित्य नाही—

तो वडवानल (समुद्रगत अग्नी) म्हणजे एक आश्चर्य आहे. ऐश्वर्यसंपन्न (विपुलजलसंपन्न) समुद्र (सुद्धा एक) आश्चर्य आहे. त्यांच्या (शब्दशः ज्यांच्या) कर्मांच्या प्रकर्षाचा विचार केल्याने मनाचा थरकाप उडतो. जलाशयाचे आधाराप्रमाणे प्राशन करणाऱ्या एकाची (वडवानलाची) जलांनी तृप्ती होत नाही. दुसऱ्याही महात्म्याच्या शरीराला थोडेसुद्धा कष्ट होत नाहीत.

येथे वडवानल व समुद्र या दोहोंच्या सत्त्वाचा महिमा वर्णावयाचा असताना पिणाऱ्याचा आशय (शक्ती) अतिविपुल असल्यामुळे जलांनी त्याची तृप्ती होत नाही. त्याचा आश्रयस्वरूप जो दुसरा त्याला यत्किंचितही खेद होत नाही. तेव्हा हे दोघे आश्चर्योत्पादक आहेत. ह्या म्हणण्यात निरंतर असंतुष्ट राहणाऱ्या वडवाग्नीला लाज नाही आणि आपल्या एकमात्र आश्रिताची मागणी पुरी करण्याचे त्राण समुद्रात नाही, असे असत्त्व-वर्णन होते. त्यायोगे (मुळातील श्लोकगत) सत्त्वाची प्रशंसा अनौचित्य प्रकट करते.

विवरण—येथे मतभेदाला बराच वाव आहे. वडवानल सागरजलाचे प्राशन करीत राहतो तरी त्याची तृप्ती होत नाही, म्हणजेच सागर वडवानलाची तृप्तेसारखी क्षुल्लक याचनाही पुरी करू शकत नाही. असा अर्थ निष्पन्न होत असल्यामुळे प्रस्तुत श्लोकात अनौचित्याचाच परिपोष झाला आहे असे क्षेमेन्द्राला वाटते. सहृदय रसिक क्षेमेन्द्राशी ह्याबाबतीत सहमत होऊ शकत नाही. वडवानल विलक्षण खादाड (अधाशी) आहे. इतका की समुद्राचे पाणी तो कितीही प्याला तरी त्याचे समाधान होत नाही. त्याचे हे अचाट कृत्य खरोखरीच आश्चर्यकारक आहे. बरे, समुद्राचे जल वडवानल अतिरिक्तपणे प्राशन करीत असला तरी समुद्राला त्यामुळे त्रास होत असेल असे म्हणाल तर तेही नाही. तो यथापूर्व अविचलच आहे. अविचल राहण्याचे त्याचेही कृत्य वडवानलकृत्याइतकेच लोकविलक्षण अतएव आश्चर्योत्पादक आहे. हाच अभिप्राय कवीला व्यक्त करावयाचा आहे असे आश्चर्य शब्दद्वय व यत्कर्मातिशयं

हे पद ह्यांच्या द्वारे प्रतीत होते. वडवानलाची निर्लज्जता व सागराची असमर्थता प्रकट करण्याकडे कवीचा रोख असावा असे दिसत नाही. एवंच, प्रस्तुत श्लोकात क्षेमेन्द्राने म्हटल्याप्रमाणे असत्त्ववर्णन असल्याचे जाणवत नाही. शिवाय, वर म्हटल्याप्रमाणे, 'सत्त्व' हा स्वभावाचा पैलू असल्यामुळे सत्त्वौचित्याचा अन्तर्भाव स्वभावौचित्यात करणेच रास्त आहे.

मर्मस्थान विसावे–अभिप्राय

अभिप्रायौचित्यं दर्शयितुमाह—

अकदर्थनया सूक्तमभिप्रायसमर्पकम् ।
चित्तमावर्जयत्येव सतां स्वस्थमिवार्जवम् ॥ ३२ ॥

अक्लेशेनाभिप्रायसमर्पकं काव्यं हृदयमावर्जयति, सज्जनानां निर्मलमार्जवमिव ।

सरलार्थ—अभिप्रायाचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे सज्जनांच्या अंगची ऋजुता (सरलता) चित्त आकृष्ट करते त्याप्रमाणे क्लिष्टताराहित्याने समर्पक अभिप्राय व्यक्त करणारे काव्य काव्यज्ञांचे हृदय आकृष्ट करते.

क्लेशावांचून समर्पक अभिप्राय व्यक्त करणारे काव्य काव्यज्ञांचे हृदय आकृष्ट करते, ज्याप्रमाणे सज्जनांची निर्मळ सरळता.

विवरणः—प्रस्तुत कारिका व तीवरील वृत्ती ह्या दोहोंचे अमळ स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. क्षेमेन्द्राच्या म्हणण्याचा आशय असा आहे की, सज्जन मनुष्य नेहमीच सरळपणाने वागतो. त्याचा हा सरळपणा उपार्जित नसतो तर तो स्वाभाविक असतो. तेव्हा, अशा प्रकारच्या स्वाभाविक आर्जवाने युक्त असलेला सज्जन मनुष्य आपले हृदय आकृष्ट करतो. काव्यातही कवी काही अभिप्राय व्यक्त करीत असतोच—मग तो त्याचा स्वतःचा असो वा काव्यगत नायकनायिकादींचा असो. कवीच्या स्वतःच्या अभिप्रायाचा अन्तर्भाव, क्षेमेन्द्राच्या व्यवस्थेप्रमाणे, तत्त्व, व विचार ह्या औचित्यमर्मस्थानांमध्ये होऊ शकतो. प्रस्तुत कारिकेत क्षेमेन्द्राला अभिप्रायाचा हा अर्थ अभिप्रेत नाही असे त्याने दिलेल्या दोन उदाहरणांवरून स्पष्टपणे जाणवते. त्याला येथे काव्यगत पात्राचा अभिप्राय अभिप्रेत आहे. हा अभिप्राय समर्पक असला पाहिजे व तो सरळपणाने (अकदर्थनया) व्यक्त झाला पाहिजे, ही क्षेमेन्द्राची अपेक्षा आहे व ती योग्यच आहे. काव्यातील पात्रांचे हृद्गत खटाटोपावाचून प्रकट झाले पाहिजे,

हा आग्रह मुळीच वावगा नाही, नव्हे, त्यास परंपरेचा पाठिंबाच आहे. दंडी (काव्यादर्श) १।४१ व वामन (काव्यालंकारसूत्र ३.१.२४ व ३.२.१४) ह्या दोघांही पूर्वसूरींनी अर्थव्यक्ती हा शब्दार्थगुण मानला आहेच. मात्र क्षेमेन्द्रदत्त उदाहरणे पाहून त्याचे हातून औचित्यभंगच घडला आहे असे वाटू लागते. कारण अभिप्रायौचित्यपोषाचे उदाहरण हे एका स्वैरिणीचे वचन असून, अभिप्रायौचित्य-भंगाचे उदाहरण म्हणजे पतीच्या गैरहजेरीत चोरून रतिक्रीडा करणाऱ्या विनयवतीच्या (!) पापकर्मावर तिच्या सखीने पांघरूण घालताना काढलेले उद्गार आहेत ! हेच जर अभिप्रायौचित्य असेल तर मग बोलणेच खुंटले ! क्षेमेन्द्रासारख्या बहुश्रुत पंडिताला ह्याहून 'उचित' उदाहरणश्लोक देता येऊ नयेत, हे दुर्दैवच नव्हे काय ?

यथा दीपकस्य—

८९. 'श्येनाङ्घ्रिग्रहदारितोत्तरकरो ज्याङ्कप्रकोष्ठान्तरः
आताम्राधरपाणिपादनयनप्रान्तः पृथूरःस्थलः
मन्येऽयं द्विजमध्यगो नृपसुतः कोऽप्यम्ब ! निःशम्बलः
पुत्र्येवं यदि कोष्ठमेतु सुकृतैः प्राप्तो विशेषातिथिः॥'

अत्र स्वैररमणी रमणीयं दिनावसाने युवानं पथिकमालोक्याभिप्रायसूचकं जननीमेवं ब्रूते—'यदसौ राजपुत्राकृतिः श्येनग्रहनाराचपरिचयोचितः सायं समये प्राप्तः' इत्युक्ते मात्राप्यभिप्रायपूरकमभिहितम्—'पुत्री यद्येवं तत्कोष्ठाङ्कं प्रविशतु सुकृतैर्विशेषोऽतिथिः प्राप्तः पूज्यः' इत्यनेन स्फुटाभिप्रायसूचकमौचित्य-मुपचितमाचकास्ति ।

सरलार्थ—उदाहरणार्थ, दीपकाच्या ह्या श्लोकात अभिप्रायौचित्य आढळेल—

"आई ! मला वाटते की, ब्राह्मणांच्या मध्ये असलेला हा कोणीतरी आश्रय-हीन राजपुत्र असावा. (कशावरून तर) ह्याच्या हाताचा पुढचा भाग ससाण्याच्या पायांनी फाडलेला दिसत आहे, हाताचा आतला भाग (तळहात) धनुष्याच्या दोरीच्या (घट्टयांनी) अंकित आहे, ह्याचा खालचा ओठ तसेच हात, पाय व डोळ्याच्या कडा लालसर आहेत, ह्याची छाती विशाल आहे." 'मुली ! असे असेल तर तो कोठीकडे जावो. आपल्या पुण्याईने लाभलेला हा खास पाहुणा आहे.'

येथे (कोणी एक) स्वैरिणी तिनसांजाच्या वेळी एका देखण्या, तरुण वाटसरूस पाहून आपल्या आईला अभिप्रायसूचक असे म्हणते की, ससाण्याची

धरपकड, धनुष्याचे (घट्टे) इत्यादींवरून हा कोणी राजपुत्र सायंकाळी आला असावा, अशी ओळख पटते. ह्यावर (त्या स्वैरिणीची) आई देखील अभिप्रायपूरक असे म्हणाली की, मुली ! जर असे असेल तर त्याला कोठीत शिरू दे. पुण्याईमुळे विशेष पाहुण्याचा लाभ झाला आहे, त्याचे स्वागत केले पाहिजे. ह्या शब्दांच्या योगे स्पष्ट अभिप्रायाचे सूचक (असे) औचित्य परिपुष्ट होऊन प्रकाशते (प्रकट होते).

विवरण—क्षेमेन्द्राचे विवेचन वाचून दण्डीच्या पुढील पंक्ती आठवतात—

कन्ये कामयमानं मां न त्वं कामयसे कथम् ।
इति ग्राम्योऽयमर्थात्मा वैरस्याय प्रकल्पते ।। काव्यादर्श १.६३
कामं कन्दर्पचाण्डालो मयि वामाक्षि ! निर्दयः ।
त्वयि निर्मत्सरो दिष्ट्येत्यग्राम्योऽर्थो रसावहः ।। काव्यादर्श १.६४

अर्थात्मा ग्राम्य असू नये असे दण्डीला वाटते, क्षेमेन्द्रालाही तसेच वाटते.

न तु यथाऽस्यैव—

९०. 'अयि विरहविचित्ते ! भर्तुरर्थे तथार्ता
सपदि निपतिता त्वं पादयोश्चण्डिकायाः ।
स्वयमुपहितधूपस्थालकच्छत्रशृंगो—
दलितमपि ललाटं येन नैवाललक्षे ।।'

अत्र विनयवत्याः सुचिरात्पत्यावागते ललाटनखोल्लेखापन्हववचने सख्या समुपदिश्यमाने, हे विरहोन्मत्ते भर्तुरर्थे चण्डिकापादपतने स्वयं स्थापितधूपस्थालकोटिक्षतमपि न लक्षितं भवत्या ललाटमित्युक्तौ स्वैरापन्हवशिक्षामात्रमेवोपलक्ष्यते, न तु तस्याः सख्या वा कश्चिदभिप्रायविशेषः ॥ ३२ ॥

सरलार्थ—परंतु, ह्याच्याच (म्हणजे दीपकाच्याच) ह्या श्लोकात अभिप्रायौचित्य नाही—

'अग, विरहामुळे चित्त ठिकाणावर नसलेल्या (मैत्रिणी) ! पतीसाठी तू इतकी व्याकुळ झालीस की, दुर्गादेवीच्या पाया पडलीस (तेव्हा) तू स्वतःच ठेवलेल्या धुपाटण्याच्या काटाने तुझ्या कपाळाला खोक पडलेलीदेखील पाहिली नाहीस.

येथे, एका विनयवतीचा पती दीर्घकाळानंतर परतला असता (तिच्या) ललाटावरील नखांचे ओरखडे लपविण्यासाठी (तिने काय) बोलावे त्याबाबतीत उपदेश करताना (तिची) सखी तिला सांगते, 'अग, विरहाने वेडीपिशी !

झालेल्या! पती (लवकर परत यावा ह्या) साठी देवी दुर्गेच्या पायावर तू डोके ठेवलेस तेव्हा (तू) स्वतःच ठेवलेल्या धुपाटण्याच्या टोकामुळे कपाळावर झालेली जखमही तू पाहिली नाहीस.' ह्या (उपदेशपर) वचनात स्वैराचाराच्या लपवाछपवीचे शिक्षण तेवढेच दिसून येते. त्यात (म्ह० त्या वचनात) तिचा (म्ह० नायिकेचा) अथवा (तिच्या) मैत्रिणीचा विशेष अभिप्राय प्रतीत होत नाही.

विवरण—पती दीर्घकाळपावेतो बाहेर राहिल्यामुळे पुरुषसमागमोत्सुक झालेली स्त्री विनयवती कशी, ते क्षेमेन्द्रच जाणो! वस्तुतः, प्रस्तुत श्लोकातील अर्थच अनुचित आहे. क्षेमेन्द्र काव्यगत हृदयसंवादी अर्थाला सर्वाधिक महत्त्व देतो हे आपण मागे पाहिलेच आहे ('योऽर्थस्तु हृदयसंवादी स यत्रनौचित्य-स्पर्शलेशरहितस्तदधिकतरामलंकारशोभां पुष्णाति ।'—राजशेखराच्या 'चिता-चक्रं…' इ. श्लोकावरील वृत्ती). इतकेच नव्हे तर चन्द्रकाच्या 'युद्धेषु…' इ. श्लोकामध्ये उचित अर्थ असूनही त्यात क्षत्रियोचित ओजस्विता गुणाचे दर्शन घडत नसल्यामुळे तो श्लोक क्षेमेन्द्राला मोडकळीस आलेल्या घरातील मन्द दीपज्योतीसारखा वाटतो, हेही आपण मागे पाहिले आहे. अशा स्थितीत, प्रस्तुत श्लोकातील हृदय-असंवादी अर्थ क्षेमेन्द्राला प्रतीत कसा होत नाही, ह्याचेच नवल वाटते. शिवाय, जारकर्म लपविणाऱ्या सखीच्या काय किंवा नायिकेच्या काय, बोलण्यात अभिप्रायविशेष कसा शोधता येणार?

मर्मस्थान एकविसावे-स्वभाव

स्वभावौचित्यं दर्शयितुं आह—

स्वभावौचित्यमाभाति सूक्तीनां चारुभूषणम् ।
अकृत्रिममसामान्यं लावण्यमिव योषिताम् ॥ ३३ ॥

स्वभावोचितत्वं कविवाचामाभरणमाभाति, अकृत्रिममनन्यसामान्यं लावण्यमिव ललनानाम् ॥

सरलार्थ—स्वभावाचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे स्त्रियांचे अकृत्रिम (सहज, नैसर्गिक), असामान्य लावण्य (रूप) शोभून दिसते, त्याप्रमाणे काव्यांचे स्वभावौचित्य सुन्दर भूषण (म्हणून) शोभते.

स्वभावाचे औचित्य कवींच्या वाणीचे भूषण ठरते, ज्याप्रमाणे स्त्रियांचे अकृत्रिम व अनन्यसामान्य रूपलावण्य.

विवरण—ही कारिका तसेच तीवरील वृत्ती ह्या दोन्ही अमळ बुचकळयात टाकणाऱ्या आहेत. येथे क्षेमेन्द्राला काव्यगत वाक्यांचे स्वाभाविक औचित्य अभिप्रेत आहे की, काव्यगत पात्रांच्या स्वभावाचे औचित्य अभिप्रेत आहे, ते स्पष्ट होत नाही. म्हणजे भाषिक औचित्य हेच स्वभावौचित्य की काय, असा संदेह उत्पन्न होतो. परंतु, पुढे दिलेली दोन उदाहरणे व त्यांवरील क्षेमेन्द्राची वृत्ती ह्या सर्व गोष्टी नीटपणे विचारात घेतल्या की, क्षेमेन्द्राला येथे काव्यगत पात्रांच्या स्वभावाचे औचित्य अभिप्रेत आहे हे स्पष्ट होते. कारिकागत उपमेकडे वळता असे लक्षात येते की, काव्यगत पात्रांचा स्वभावालेख अकृत्रिम (सहज) व असामान्य असला पाहिजे, अशी क्षेमेन्द्राची अपेक्षा दिसते व ती योग्यच आहे.

यथा मम मुनिमतमीमांसायाम्—

९१. 'कर्णोत्तालितकुन्तलान्तनिपतत्तोयक्षणासंगिना
हारेणेव वृतस्तनी पुलकिता शीतेन सीत्कारिणी ।
निर्धौताञ्जनशोणकोणनयना स्नानावसानेऽङ्गना
प्रस्यन्दत्कबरीभरा न कुरुते कस्य स्पृहार्द्रं मनः ।।'

अत्र व्याससूनोः शुकस्य गाढवैराग्यनिःसंगस्य गगनगंगातीरे स्नानोत्तीर्णास्त्रिदशयोषितो विवसनास्तद्दर्शननिःसंकोचाः पश्यतः प्रशमविमलमनसः स्मरव्यतिकरनिर्विकारतायां प्रतिपाद्यमानायां कर्णमूलोत्क्षिप्तालकपर्यन्तनिपतत्तोयकणसंतानेन स्तनयोः कृतमुहूर्तहारविभ्रमा, शीतेन रोमांचसीत्कारिणी, धौताञ्जनारुणनयनान्ता, प्रस्रवन्मुक्तकेशकलापा, स्नानोत्तीर्णा, तरुणी कस्य स्पृहार्द्रं न मनः करोतीत्युक्ते स्वयमार्द्रस्वभावः परमप्यार्द्रीकरोतीत्युचितमेतत् ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, माझ्या मुनिमतमीमांसेतील ह्या श्लोकात स्वभावौचित्य आढळेल—

स्नानोत्तर जिचे स्तन कानांवर लोंबकळणाऱ्या केसांमधून ठिपकणाऱ्या हारसदृश जलबिंदूनी व्याप्त आहेत, गारठ्यामुळे शरीर रोमांचित होऊन जी 'सी सी' करीत आहे, डोळयातील काजळ धुतले गेल्यामुळे जिच्या डोळयाचे कोपरे लाल झाले आहेत, आणि जिचे केस ओले झाले आहेत, अशी स्त्री कोणाचे हृदय अभिलाषेने आर्द्र करीत नाही ! (प्रत्येकाचेच करते, हा आशय.)

येथे, स्वर्गंगेत स्नान करून स्नानोत्तर किनाऱ्यावर विवस्त्र स्थितीत व

निःसंकोचपणे वावरत असलेल्या देवस्त्रियांकडे पाहणाऱ्या, गाढ वैराग्यामुळे अभिलाषाशून्य बनलेल्या, व्यासपुत्र शुकाचे मन, कामक्षोभानुकूल स्थिती असूनही, वैराग्याच्या विमलत्वामुळे निर्विकार राहिल्याचे वर्णिले आहे. त्यात कानाच्या पाळयांवर रुळणाऱ्या केसांच्या टोकांवरून निथळणाऱ्या जलबिंदूंच्या प्रवाहाने स्तनांवर जणू काही हार रुळत आहे असा भ्रम क्षणभर उत्पन्न करविणारी, शीतलत्वामुळे अंग शहारल्याकारणाने 'स्‌ स्‌' करणारी, डोळ्यातील काजळ धुतले गेल्यामुळे जिच्या डोळ्याचे कोपरे लाल झाले आहेत अशी, जिचा मोकळा सोडलेला केशसंभार आर्द्र आहे अशी, स्नान करून आलेली तरुणी कोणाचे मन स्पृहार्द्र (अभिलाषेने आर्द्र) करीत नाही ! ह्या उक्तीत स्वतः आर्द्र स्वभावाची (तरुणी) दुसऱ्यासही आर्द्र करते असे जे म्हटले (सुचविले) आहे ते उचित आहे.

विवरण—क्षेमेन्द्राच्या दृष्टीने येथे वैराग्यसंपन्न शुकाचार्यांच्या निर्विकारतेचे वर्णन आहे. रसिकाला कदाचित् स्नानोत्तर तरुणीचे स्वाभाविक चित्रण अधिक मनोरम वाटेल. प्रस्तुत श्लोकाचा रोख काय ह्याविषयी जरी क्षेमेन्द्राशी सहृदयाचा मतभेद होऊ शकत असला, तरी ह्यासारख्या श्लोकांवरून कवी ह्या नात्याने क्षेमेन्द्राचा दर्जा चांगल्या प्रकारे लक्षात येतो. पारंपरिक साहित्यशास्त्राच्या दृष्टीने प्रस्तुत श्लोक स्वभावोक्ती अलंकाराचे उत्कृष्ट उदाहरण ठरेल.

न तु यथा मम तत्रैव—

९२. 'भक्तिः कातरतां क्षमा सभयतां पूज्यस्तुतिर्दीनतां
धैर्यं दारुणतां मतिः कुटिलतां विद्याबलं क्षोभताम् ।
ध्यानं वञ्चकतां तपः कुहकतां शीलव्रतं पण्ढतां
पैशुन्यव्रतिनां गिरां किमिव वा नायाति दोषार्द्रताम् ॥'

अत्र पिशुनस्वभावे वर्ण्यमाने भक्त्यादीनां गुणानां वैपरीत्ये प्रतिपादिते पिशुनानां वचसां किं वा दोषार्द्रतां नायातीत्यभिहिते स्वयमनार्द्रस्वभावस्य परार्द्रीकरणमनुचितमेव ॥ ३३ ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, माझ्या त्याच काव्यातील (म्हणजे मुनिमत-मीमांसेतील) ह्या श्लोकात स्वभावौचित्य नाही—

चहाडखोरीचे व्रत स्वीकारलेल्यांच्या भाषेत भक्ती म्हणजे भित्रेपणा, क्षमा म्हणजे भेदरटपणा, पूज्य (व्यक्तींची) प्रशंसा म्हणजे दैन्य, धैर्य म्हणजे दारुणपणा, बुद्धि म्हणजे वक्रता, ज्ञानसामर्थ्य म्हणजे मनाची खळबळ

(प्रक्षुब्धता) ध्यान म्हणजे ठकबाजी, तपश्चर्या म्हणजे ढोंगबाजी, शीलसंपन्नता म्हणजे नपुंसकता ठरतात. अथवा (त्यांच्या दृष्टीने) कोणती गोष्ट दोषास्पद ठरत नाही !

येथे चहाडखोरांच्या स्वभावाचे वर्णन करावयाचे असताना भक्त्यादी गुणांचा विपरीतपणा (विरुद्धभाव) प्रतिपादिला असून चहाडखोरांच्या भाषेत कोणती गोष्ट दोषास्पद ठरत नाही असे म्हटले आहे. येथे (या उक्तीत) स्वतः अनार्द्र स्वभावाच्या असलेल्यांनी इतरांना आर्द्र करण्याचे जे वर्णिले आहे ते अनुचितच आहे.

विवरण—क्षेमेन्द्राचे हे विवेचन पटत नाही. चहाडखोर माणसे भक्ती, क्षमा, पूज्यस्तुती, धैर्य, बुद्धिमत्ता, ज्ञानबळ, ध्यान, तपश्चर्या, शील इत्यादी सर्व गुणांना, आदर्शांना व मूल्यांना नावे ठेवितात; त्यांच्या लेखी हे सर्वच गुणधर्म दोषपूर्ण होत, असे कवीला सांगावयाचे आहे. म्हणजेच कवीला चहाडखोरांच्या स्वभावाचे यथार्थ वर्णन करावयाचे आहे व ते त्याने समर्थपणे केलेही आहे. असे यथार्थ वर्णन हाच ह्या उदाहरणश्लोकाचा गाभा आहे, तेच त्याचे 'जीवितसर्वस्व' आहे. क्षेमेन्द्राने मात्र 'आर्द्र' शब्दप्रयोगाचा बडिवार माजवून येथे अनौचित्य उद्भासित झाले आहे अशी अग्राह्य टीका केली आहे. आणि आश्चर्याची बाब म्हणजे ती टीकादेखील स्वतःवरच केली आहे. कधीकधी क्षेमेन्द्राच्या ठिकाणची शुष्क शास्त्रज्ञता सहृदय रसिकतेवर कशी मात करते ते ह्यासारख्या उदाहरणांवरून पाहावयास मिळते.

क्षेमेन्द्रकृत स्वभावौचित्यविचार साकल्याने ध्यानात घेता असे जाणवते की, 'स्वभाव' शब्दाचा अतिशय मर्यादित अर्थ क्षेमेन्द्राला अभिप्रेत होता. ह्या संदर्भात, म्हणूनच, तो वाचकांवर उदाहरणपद्यांची वृष्टी करण्यास असमर्थ ठरला आहे.

मर्मस्थान बाविसावे—सारसंग्रह

सारसंग्रहौचित्यं दर्शयितुं आह—

> सारसंग्रहवाक्येन काव्यार्थः फलनिश्चितः ।
> अदीर्घसूत्रव्यापार इव कस्य न सम्मतः ।। ३४ ।।

सारसंग्रहवाक्येन काव्यार्थः सुनिश्चितफलः शीघ्रकारिण इव व्यापारः कस्य नाभिमतः ॥

सरलार्थ—सारसंग्रहाचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

सारसंग्रहपर वाक्यामुळे फलश्रुती निश्चित झालेला काव्यार्थ, दीर्घसूत्री नसलेल्या (पुरुषाच्या) वागण्याप्रमाणे, कोणाला मान्य होत नाही !

सारसंग्रहात्मक वाक्यामुळे काव्यार्थाचे फल चांगल्या प्रकारे निश्चित होते, (अशा काव्यार्थ) शीघ्र कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या व्यापाराप्रमाणे (असून तो) कोणाला रुचत नाही ?

विवरण—संस्कृत भाषेतील काव्यादी साहित्यकृतींच्या अंती समाप्तिपर वाक्ये असतात. त्यांमध्ये काव्याला कारणीभूत झालेल्या विषयाचे सार थोडक्यात सांगितलेले असते. इंग्रजीत ज्याला Summing up म्हणतात तशा प्रकारचे हे सार काव्यार्थाच्या फलश्रुतीची निश्चिती करून कविमनातील संदेश सहृदय रसिकांप्रत नेऊन पोचविते. सर्वच संस्कृत कवींप्रमाणे काव्यशास्त्रज्ञही 'चतुर्वर्ग-फलप्राप्ती' हे काव्याचे प्रयोजन होय असे मानीत असत (उदा० वामन म्हणतो, 'काव्यं सद्दृष्टादृष्टार्थम् । प्रीतिकीर्तिहेतुत्वात् ॥ १.१.५ ह्यावरील स्वरचित वृत्तीत वामनाने पुढील श्लोक दिला आहे—'तस्मात्कीर्तिमुपादातुमकीर्तिं तु निबर्हितुम् । काव्यालंकारशास्त्रार्थः प्रसाद्यः कविपुंगवैः ॥' रुद्रट म्हणतो—'ननु काव्येन क्रियते सरसानामवगमश्चतुर्वर्गे । लघु मृदु च नीरसेभ्यस्ते हि त्रस्यन्ति शास्त्रेभ्यः ॥ काव्यालंकार १२.१. कुन्तकही असेच म्हणतो—'धर्मादिसाधनोपायः सुकुमार-क्रमोदितः । काव्यबन्धोऽभिजातानां हृदयाल्हादकारकः ॥'—वक्रोक्तिजीवित १।३. 'काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये । सद्यःपरनिर्वृतये कान्तासम्मित-तयोपदेशयुजे ॥ काव्यप्रकाश १.२ ही मम्मटोक्ती प्रसिद्धच आहे.) काव्यार्थाच्या फलाची निश्चिती करणारे वाक्य संक्षिप्त असणे, अर्थातच, आवश्यक असते. तसे ते असेल तरच त्याला 'सार' म्हणता येईल. असे सारात्मक वाक्य, पाल्हाळ न लावता सुटसुटीतपणे आपले म्हणणे मांडणाऱ्या व्यक्तीच्या उक्तींसारखे, चित्ता-कर्षक असते. आधुनिक दृष्टिकोणातून काव्यादींचे सार काढणे म्हणजे त्यांचा 'रस' गमावून बसणे ठरेल ! परंतु, प्रस्तुत कारिकेचा विचार क्षेमेन्द्रकालीन काव्य-विषयक कल्पना डोळ्यांसमोर ठेवूनच केला पाहिजे. खुद्द क्षेमेन्द्राने आपल्या काही काव्यांना जोडलेली सारसंग्रहपर वाक्ये येथे उद्धृत करणे उद्बोधक ठरेल—उदा० 'भोगार्हो नवयौवनेऽपि विपिने चीराम्बरो राघवस्तत्राप्यस्य परेण दारहरणं क्लेशस्तदन्वेषणे । संप्राप्तापि जनापवादरजसा त्यक्ता पुनर्जानकी सर्वं दुःखमयं तदस्तु भवतां श्लाघ्यो विवेकोदयः ॥' रामायणमंजरी समाप्ति-श्लोक १; 'इत्यौचित्य-प्रचुररचनाविश्रुतश्रव्यवृत्तव्यक्तिः शक्तिप्रसृतवचसां दर्शिता संग्रहेण ॥ क्षेमेन्द्रेण प्रणयिविपदां हर्तुराश्चर्यकर्तुर्भूभृद्भर्तुर्भुवनजयिनोऽनन्तराजस्य राज्ये ॥' सुवृत्ततिलक ३.४०. 'इत्युक्ता रुचिरोचिता परिचयप्राप्तिर्विभागैर्गिरां दिङ्मात्रेण विचित्रवस्तु-

रचनामैत्रीपवित्रीकृता। यद्यस्त्यत्र नवोपदेशविषये लेशोऽप्युपादेयता तत्सद्भिर्गुणकौतुकादवसरः श्रोतुं समाधीयताम् ॥ कविकंठाभरण ५.२. ज्या काव्यांचे फलनिश्चायक सार सांगता येते अशी काव्ये क्षेमेन्द्राच्या दृष्टीने शास्त्रकाव्ये ठरतील (उदा० शास्त्रकाव्यं चतुर्वर्गप्रायं सर्वोपदेशकृत् ॥–सुवृत्ततिलक ३।४)

यथा मम मुनिमतमीमांसायाम्—

९३. 'विविधगहनगर्भग्रन्थसंभारभारै—
मुनिभिरभिनिविष्टैस्तत्त्वमुक्तं न किंचित्।
कृतरुचिरविचारं सारमेतन्महर्षे-
रहमिति भवभूमिर्नाहमित्येव मोक्षः ॥'

अत्र भगवद्गीतार्थविचारे सारसंग्रहोऽभिहितः—यत्किल मुनिभिरनेकभेदभिन्नशास्त्रजडैरभिनिविष्टमतिभिस्तत्त्वमुपादेयं न किंचित्कथितम्। भगवतो महर्षेर्व्यासस्य सुमतेर्विमलविचारोत्तीर्णं निश्चितमेतदेव, यदहंकारः संसारमूलभूमिः, ममतापरित्याग एव मोक्ष' इति तत्संक्षेपेण भवक्षयोपदेशः प्रकृतार्थस्य परममौचित्यं पुष्णाति ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, माझ्या मुनिमतमीमांसेतील ह्या श्लोकात सारसंग्रहौचित्य आढळेल—

अनेक, गहनतापूर्ण ग्रंथसमूहाच्या भारांच्या द्वारे (म्हणजे अनेक, गूढ ग्रंथ रचून), साभिनिवेश मुनींनी कोणतेच तत्त्व प्रतिपादिले नाही. (परंतु), सुंदर विचार करून महर्षींनी असे (शब्दशः हे) सार काढले की 'अहंकार' ही संसाराची (जन्ममृत्यूच्या अस्खलित चक्राची) मातृभूमी (जन्मदात्री) होय (व) अहंकार-राहित्य हाच मोक्ष होय.

येथे भगवद्गीतेच्या अर्थाच्या विचारप्रसंगी सारसंग्रह सांगण्यात आला आहे. तो असा की, अनेक भेदांच्या योगे भिन्न अशा शास्त्रांनी (अनेक शास्त्रप्रकारांमुळे) गोंधळलेल्या (म्ह० अनिश्चित मतीच्या) व अभिनिवेशी (विशिष्ट मताबद्दल आग्रहबुद्धी बाळगणाऱ्या) मुनींनी कोणतेही ग्राह्य तत्त्व सांगितले (प्रतिपादिले) नाही. (परंतु) पूज्य, शुद्ध, बुद्धीच्या (म्ह० विप्लवरहित बुद्धीच्या) व्यास महर्षींनी निर्मल विचार करून असेच निश्चित केले की, 'अहंकार हेच संसाराचे (जन्ममृत्यूचे फेरे न सरण्याचे) आदिकारण होय (व) ममतेचा संपूर्ण त्याग हाच मोक्ष होय,' असा हा संसारनाशविषयक संक्षिप्त उपदेश प्रस्तुत अर्थाच्या उच्च औचित्याचा परिपोष करतो.

न तु यथा परिव्राजकस्य—

९४. 'तपो न तप्तं वयमेव तप्ता भोगा न भुक्ता वयमेव भुक्ताः ।
जरा न जीर्णा वयमेव जीर्णास्तृष्णा न याता वयमेव याताः ॥'

अत्र वयमेव तप्ता भुक्ता जीर्णा याता इत्युक्ते निःसाराचारुत्वादपर्यवसितो वाक्यार्थः फलशून्यतया सारसंग्रहोचितं न किंचित्प्रतिपादयति ॥ ३४ ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, परिव्राजकाच्या ह्या श्लोकात सारसंग्रहौचित्य आढळत नाही—

आम्ही तप केले नाही (उलट) स्वतःच तप्त झालो; आम्ही भोग भोगले नाहीत (उलट) आम्हीच भोगले गेलो; जरा जीर्ण झाली नाही (उलट) आम्हीच जीर्ण झालो; तृष्णा (अभिलाषा) हरपली (नष्ट झाली) नाही (उलट) आम्हीच गेलो (समाप्त झालो).

येथे, 'आम्हीच तप्त झालो, भोगले गेलो, जीर्ण झालो, समाप्त झालो,' ह्या उक्तीत सारहीनताजनित सौंदर्यशून्यतेमुळे वाक्यार्थ पर्यवसानरहित (झाला असून तो) फलश्रुतीशून्य असल्याने सारसंग्रहास अनुरूप असे काहीच प्रतिपादीत नाही.

टीपः—परिव्राजकाची वरील सूक्ती कोणत्या संदर्भात उच्चारली गेलेली आहे ते क्षेमेन्द्राने सांगितलेले नाही. अर्थात प्रस्तुत उक्ती निःसार आहे ह्यात संदेहच नाही. मात्र 'वयमेव याताः' हे म्हणायला वक्ते शिल्लक कसे राहिले ते बरीक कळत नाही !!

मर्मस्थान तेविसावे—प्रतिभा

प्रतिभौचित्यं दर्शयितुं आह—

प्रतिभाभरणं काव्यं उचितं शोभते कवेः ।
निर्मलं सुगुणस्येव कुलं भूतिविभूषितम् ॥ ३५ ॥

प्रतिभालंकृतं कवेः काव्यमुचितं गुणवतः कुलमिव विमलं लक्ष्म्या प्रकाशितं शोभते ॥

सरलार्थ—प्रतिभेचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे सद्‍गुणी मनुष्याचे निष्कलंक कुळ ऐश्वर्याने विभूषित होते, त्याप्रमाणे कवीचे प्रतिभेने विनटलेले काव्य उचित बनून शोभून दिसते.

प्रतिभेने विभूषित (असे) कवीचे काव्य उचित होऊन शोभते. जसे गुणी पुरुषाचे निर्मल कुल धनसंपदेने प्रकाशित होऊन शोभते.

विवरण—कारिकागत उपमेत ऐश्वर्य व प्रतिभा ह्यांची परस्परतुलना केली आहे. ह्यापूर्वीच्या काही कारिकागत उपमांचा येथे थोडासा विचार करावयास हवा. गुणांच्या प्रभावामुळे भव्य बनणाऱ्या ऐश्वर्याने सज्जन मनुष्य शोभतो (कारिका १३). औदार्यपूर्ण चरितांनी कुळभूषणभूत ऐश्वर्य शोभते (कारिका २०). सन्मार्गाचरणाने ऐश्वर्य वाढते (कारिका २४). ह्या सर्वांचा गोळाबेरीज अर्थ असा होतो की, ऐश्वर्याने कुळही शोभते व सज्जन पुरुषही शोभतो. तसेच ऐश्वर्य हे गुणांमुळे, औदार्यचरिताने तसेच सन्मार्गाने शोभते. एवंच तीच तीच उपमाने पुन्हापुन्हा वापरून क्षेमेन्द्राने जणू स्वतःचे कल्पना-ऐश्वर्य संपुष्टात आल्याचाच नकळत कबुलीजबाब दिला आहे ! भट्ट-तौतांची 'प्रज्ञा नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा मता' ही प्रतिभेची व्याख्या क्षेमेन्द्राला मान्य असल्याचे पुढे आलेच आहे. इतर साहित्यशास्त्रज्ञ प्रतिभेचे लक्षण करतात, काव्यनिर्मितिक्षम शक्तीच्या संदर्भात प्रतिभेच्या सामर्थ्याचे निरूपण करतात, राजशेखरासारखा एखादा शास्त्रज्ञ प्रतिभेचे कारयित्री, भावयित्री इत्यादी भेदही सांगतो (काव्यमीमांसा, अध्याय चवथा). क्षेमेन्द्र मात्र ह्या प्रपंचात पडत नाही !

यथा मम लावण्यवत्याम्—

९५. 'अदय ! दशसि किं त्वं बिम्बबुध्याधरं मे
भव चपल ! निराशः पक्वजम्बूफलानाम् ।
इति दयितमवेत्य द्वारदेशाप्तमन्या
निगदति शुकमुच्चैः कान्तदन्तक्षतौष्ठी ॥'

अत्र कयापि द्वारदेशाप्तं प्रियं ज्ञात्वा अन्यकामुकदशनखण्डितौष्ठया संप्रति कान्तागमनानभिज्ञयेव शुकमुद्दिश्य यदुक्तं—'निर्दय, किं त्वं बिम्बफललोभादधरं मम विदारयसि, पक्वानां जंबूफलानामिदानीं चपल ! निराशो भव, कुपिता तुभ्यं नो दास्यामि, इति तेनोच्चैः प्रत्यायनापन्हवनवोन्मेषप्रज्ञाचातुर्य-चारुवचनमौचित्यचमत्कारं करोति ॥

यदाहु भट्टतौताः काव्यकौतुके—'प्रज्ञा नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा मता' इति ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, माझ्या लावण्यवतीतील ह्या श्लोकात प्रतिभौचित्य आढळेल—

पती दारापाशी आला आहे हे जाणून जिच्या ओठावर प्रियकराने दन्तक्षत केले आहेत अशी अन्या (जातीची नायिका) पोपटाला उद्देशून मोठ्याने म्हणते—'अरे निर्दया ! माझा अधर म्हणजे बिंबफळ असे समजून तू का चावा घेतोस ? (थांब) गुलामा ! (चंचला !) आता पिकलेली जांभळे खायला मूक- (पिकलेल्या जांभळांचे बाबतीत निराश हो).'

येथे पती दरवाजापाशी येऊन पोचला आहे हे जाणून दुसऱ्या कामुकाने (प्रियकराने) जिचे ओठ दंतक्षतांनी अंकित केले होते अशी नायिका प्रियकराचे आगमन जणू आपल्या गावीच नाही असे भासवून आता पोपटाला उद्देशून म्हणते—'निर्दया ! बिंबफळाच्या लोभामुळे माझ्या अधराला का डसतोस ? चंचला ! आता पिकलेल्या जांभळांचे बाबतीत निराश हो. (मी आता तुझ्यावर) रागावले आहे. तुला (पिकलेली जांभळे) देणार नाही,' अशा प्रकारे ती पतीला विश्वास वाटावा म्हणून मोठ्याने बोलली. (आपले पाप) लपविण्यासाठी नवनवोन्मेषयुक्त प्रज्ञेच्या चतुराईमुळे सुंदर (बनलेले तिचे) वचन औचित्याचा चमत्कार (आल्हाद) उत्पन्न करते.

भट्टतौत काव्यकौतुकामध्ये म्हणतात—'नवनवीन उन्मेषांमुळे (कल्पनोद्रेकांमुळे) शोभणाऱ्या प्रज्ञेला प्रतिभा म्हणतात'.

विवरण—प्रस्तुत श्लोकात 'अन्या' हा साहित्यशास्त्रीय पारिभाषिक शब्द आला आहे. संस्कृत साहित्यशास्त्र नायिकांचे स्वकीया, अन्या (परकीया) व साधारणस्त्री असे तीन प्रमुख भेद मानते (पाहा—'स्वान्या साधारणस्त्रीति तद्गुणा नायिका त्रिधा।—दशरूपक २.१५). पुनः, अन्या प्रकारच्या नायिकेचेही पुढीलप्रमाणे दोन उपभेद मानण्यात आले आहेत—'अन्यस्त्री कन्यकोढा च नान्योढा अंगिरसे क्वचित्।' तत्रैव–२-२०. म्हणजे अन्या नायिका विवाहित मुलगी किंवा दुसऱ्या पुरुषाची पत्नी अशी द्विविध असते. प्रस्तुत श्लोकातील अन्या ही विवाहित स्त्री असून परपुरुषासक्त आहे. येथील वर्णन अशा विशिष्ट स्त्रीचेच असल्यामुळे श्लोकगत वाक्यार्थाचा नैतिक दृष्ट्या विचार संभवतच नाही ! बाकी आपले पापकर्म लपविण्यासाठी ह्या 'अन्ये' ने लढविलेली कल्पना व तिच्यात क्षेमेन्द्राला आढळलेला औचित्यचमत्कार या दोहोंचे कौतुक कुठवर करावे !! हे वर्णन एका विवाहितेच्या परपुरुषासक्तीचे आहे. पुढील श्लोकातील वर्णन एका प्रियकराची वंचना करून दुसऱ्या प्रियकराशी रात्र घालविणाऱ्या एका वेश्येचे आहे. आणि ही दोन्ही उदाहरणपद्ये 'प्रतिभेचे' औचित्य दाखविण्यासाठी दिली गेली आहेत ! औचित्यरूपी सुवर्ण

तोलायला बसलेल्या क्षेमेन्द्राचा तोल येथे सुटलेला दिसतो. कवीने असल्या वर्णनांसाठीच 'प्रतिभा' राबवावयाची असेल तर काव्ये नकोत पण असली 'लोकविलक्षण' प्रतिभा आवरा असे म्हणण्याची पाळी दुर्दैवी रसिकांवर आल्यावाचून राहाणार नाही !!

न तु यथा मम तत्रैव—

९६. 'निर्याते दयिते गृहे विशयने निर्माल्यमाले हृते
प्राप्ते प्रातरसह्यरागिणि परे वाराहवारेऽन्नया ।
द्वारालीनविलोचना व्यसनिनी सुप्ताहमेकाकिनी-
त्युक्त्वा नीविविकर्षणैः स चरणाघातैरशोकीकृतः ॥'

अत्र वेश्या व्यालग्नकामुकस्य वारावहारं विधाय, नवकामुकेन सह क्षपायां नीतायां, प्रभाते तस्मिन्निर्याते, शय्याकुसुमादिसंभोगलक्षणे निवारिते, वारवंचनकुपिते गाढानुरागग्रहग्रस्तमतौ पूर्वकामुके प्राप्ते, त्वदालोकनकांक्षिणी व्यसनिनी द्वारन्यस्तनयनाहमेकाकिनी सुप्तेति प्रत्यायनावचनविलीनमन्युः सरभससरसनीविकर्षणोद्यताकृतिः कृतेर्ष्याकोपया चरणनलिनप्रहारैरशोकीकृतः, शंकाशल्योन्मूलनान्निःशोकः संपादितः । संततपुलकांकुरत्वादशोकतरुतुल्यतां नीत इति वा वाक्यार्थः केवलासत्यविप्रलंभप्रागल्भ्यमात्रमेव गणिकाया गाढरागमूलतां च प्रतिपादयति । न तु प्रतिभोद्भूतामौचित्यकणिकां सूचयति ॥ ३५ ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, माझ्या त्याच (म्हणजे लावण्यवती ह्याच) काव्यातील ह्या श्लोकात प्रतिभौचित्य नाही—

प्रियकर निघून गेल्यावर, अंथरूण गुंडाळल्यावर, निर्माल्यवत् झालेले हार (वगैरे) दूर सारल्यावर, ज्याला तिने आदल्या दिवशी परतवून लावले होते असा अत्यासक्त (पूर्व) प्रियकर प्रातःकाळी आला असता (त्या) वेश्येने 'दाराकडे दृष्टी लावून मी एकटीच व्याकुळ होऊन झोपले' असे म्हणून (एकीकडे) निऱ्या सैल करीत (दुसरीकडे) त्याचेवर लत्ताप्रहार करून त्याला अशोकवृक्षाप्रमाणे फुलविले (आनंदित केले).

येथे, (एका) वेश्येने तिजवर अत्यन्त आसक्त झालेल्या कामुकाला (संभोगसुखवंचित करून) त्या दिवशी परतवून लावून नव्या कामुकाबरोबर रात्र घालविली. (त्यानंतर) पहाटे तो (म्हणजे नवा कामुक) निघून गेल्यावर गादीवरील फुले वगैरे संभोगचिन्हे निवारली गेल्यावर (आदल्या)

दिवशी (रात्री) फसवणूक झाल्यामुळे रागावलेला पण मनात गाढ आसक्ती असणारा (पूर्व)कामुक आला असता, 'तुझ्या दर्शनाच्या अभिलाषेने व्याकुळ अशी मी दाराकडे दृष्टी लावून एकटीच झोपले,' अशा प्रकारच्या तिच्या प्रत्ययोत्पादक शब्दांनी त्याचा राग शमला असता, अत्यंत घाईने आपल्या सुंदर निरीस हात घालण्यास (सरसावलेल्या) उद्युक्त झालेल्या वेश्येने ईर्ष्यायुक्त कोपाने चरणप्रहारांच्या द्वारे त्या (कामुका)ला अशोकाप्रमाणे फुलविले म्हणजे शंकारूप शल्याचे उन्मूलन करून (शब्दशः केल्यामुळे) दुःखहीन बनवले. अथवा, सतत रोमांचरूपी अंकुरामुळे अशोकवृक्षासारखा तो कामुक केला गेला, असा वैकल्पिक वाक्यार्थ घेता येईल. हा वाक्यार्थ केवळ खोट्या वियोगाची प्रगल्भतामात्र आणि वेश्येची उत्कट अनुरागमूलकता प्रतिपादित करतो. परंतु हा वाक्यार्थ प्रतिभाजनित लवमात्र औचित्य सूचित करीत नाही.

विवरण—ही दोन्ही उदाहरणपद्ये वाचून येथे क्षेमेन्द्राने स्वतःच 'औचित्य-विवेक' पाळला नाही असे म्हणावेसे वाटू लागते. ज्या कालिदासाची त्याने आपल्या कविकंठाभरणात (द्वितीय संधी, श्लोक १९) प्रशंसा केली आहे त्याचे एकही पद्य त्याला ह्या संदर्भात द्यावेसे वाटू नये हे केवढे आश्चर्य ! तसेच त्याच्या मती भुवनोपजीव्य असणारे पूज्यपाद महर्षी व्यास अथवा वर्णांमधील ॐकाराप्रमाणे कवींमध्ये सर्वप्रथम असलेले सर्वोपजीव्य, चक्रवर्ती वाल्मीकी यांचाही क्षेमेन्द्राला विसर पडलेला पाहून रसिकाला सखेदाश्चर्य वाटते.

मर्मस्थान चोविसावे—अवस्था

अवस्थौचित्यं दर्शयितुं आह—

अवस्थोचितमाधत्ते काव्यं जगति पूज्यताम् ।
विचार्यमाणरुचिरं कर्तव्यमिव धीमताम् ॥ ३६ ॥

अवस्थोचिततया काव्यं जगति श्लाघ्यतामायाति, मतिमतामिव कृत्यं विचारनिर्घर्षरुचिरम् ॥

सरलार्थ—अवस्थेचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे बुद्धिमंतांनी विचारपूर्वक केलेले अतएव सुंदर असलेले कर्तव्य जगात पूज्य (आदरणीय) ठरते, त्याप्रमाणे अवस्थेस अनुरूप काव्य जगात पूज्यतेस पात्र ठरते.

विचारनिकषावर घासल्यामुळे जगात सुंदर झालेल्या बुद्धिमंतांच्या कृत्याप्रमाणे अवस्थेच्या औचित्यामुळे जगात काव्य श्लाघ्य बनते.

यथा मम लावण्यवत्याम्—

९७. 'मुक्तः कन्दुकविभ्रमस्तरलता त्यक्तैव बाल्योचिता
मौग्ध्यं निर्धुतमाश्रिता गजगतिर्भ्रूलास्यमभ्यस्यते ।
यन्नर्मोर्मिषु निर्मितं मृगदृशा वैदग्ध्यदिव्यं वच-
स्तद्विद्मः सुभगाभिमानलटभाभावे निबद्धो भरः ॥'

अत्र यदुक्तं–कन्दुकक्रीडा त्यक्ता, बालचापल्यं परिहृतं, मौग्ध्यं निरस्तं, गजगतिरंगीकृता, भ्रूलतालास्याभ्यासः क्रियते, नर्मोर्मिषु वचनवैचित्र्यमासूत्रितम्, तेन जानीमहे शैशवावस्थां समुत्सृजन्त्या यौवनमाश्रयन्त्या प्रौढतामनारूढयापि नवसंभोगगौरवगर्भेण सुभगाभिमानेन लटभाभावे बालया भरो निबद्धः, इत्यभिहिते स्फुटधिया वयोऽवस्थामध्यसंधिवर्णनायामौचित्यं स्फुरदिवावभासते ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, माझ्या लावण्यवती काव्यातील ह्या श्लोकात अवस्थौचित्य आढळेल—

मृगाक्षीने चेंडूने खेळण्याचे सोडले आहे, बाल्याला उचित अशी चंचलता टाकलीच आहे, तिची मुग्धता धुतली गेली (नष्ट झाली) आहे, तिने गजगतीचा आश्रय केला आहे (ती गजगामिनी झाली आहे), भुवयांच्या लास्यनृत्याचा अभ्यास सुरू केला आहे. तिच्या थट्टामस्करीच्या बोलण्यात कौशल्यपूर्ण, सुन्दर शब्द प्रयोग होऊ लागले आहेत. त्यावरून रूपसंपदेच्या अभिमानामुळे, प्रियकराच्या अभावीही, तिने आपल्या यौवनाचा भार धारण केला आहे, हे आम्ही ओळखतो.

येथे, चेंडूचा खेळ सोडला आहे, बाल्योचित चंचलता गेली आहे, मुग्धपणा नाहीसा झाला आहे, गजगती स्वीकारली गेली आहे, भुवया नाचविण्याचा अभ्यास केला जात आहे, थट्टेच्या बोलण्यात शब्दाचे सौंदर्य गुंफले जात आहे, त्यावरून आम्ही ओळखून चुकलो आहो की, शिशु-अवस्थेचा त्याग करणाऱ्या, तारुण्यात पदार्पण करणाऱ्या, प्रौढता आलेली नसली तरीही नवसंभोगाच्या गौरवाने युक्त अशा सौंदर्यविषयक अभिमानामुळे, पति प्राप्त झालेला नसताही, त्या बालेने तारुण्यभार धारण केला आहे. अशा शब्दातील दोन वयोवस्थांमधील संक्रमणकालाच्या वर्णनात औचित्य जणू लखलखताना स्पष्टपणे प्रतीत होते.

विवरण—तारुण्यात पदार्पण करीत असलेल्या युवतीचे हे वर्णन जितके यथार्थ अतएव रमणीय आहे, तितकेच क्षेमेन्द्राचे ह्या श्लोकावरील रसग्रहणही

रमणीय आहे. काही शब्दांवर क्षेमेन्द्राचे विशेष प्रेम आहे. त्यांचा तो पुनः पुन्हा प्रयोग करतो. उदाहरणार्थ येथील 'लटभ' शब्द त्याने सुवृत्ततिलक २।३ यातही वापरला आहे.

न तु यथा राजशेखरस्य—

९८. 'ज्यायान्धन्वी नवधृतधनुस्ताम्रहस्तोदरेण
क्षत्रक्षोदव्यतिकरपटुस्ताटकाताडनेन ।
कर्णाभ्यर्णस्फुरितपलितः क्षीरकंठेन सार्धं
योद्‌धुं वाञ्छन्न कथममुना लज्जते जामदग्न्यः ।।'

[बालरामायण ४.१]

अत्र भार्गवः स्थविरावस्थास्थितः स्थिरतरपराक्रमकर्कशप्रौढो धनुर्धरः शिशुना रामेण धनुर्ग्रहणारुणितकोमलकरकमलतलेन क्षत्रियक्षयसंरंभप्रगल्भस्ताटकाताडकेन, स्फुरदाकर्णपलितः संभाव्यमानजननीस्तनक्षीरकंठेनामुना युयुत्सुः कथं न लज्जते' इत्युक्ते पेशलतया राघवावस्थायां जामदग्न्यावस्थाविपरीतायां प्रतिपाद्यमानायां ताटकाताडकेनेति विरुद्धाभिवासोऽर्थः किमप्यनौचित्येन चेतसि संकोचमादधाति ॥ ३६ ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, राजशेखराच्या श्लोकात अवस्थौचित्य नाही—

क्षत्रियांचे निर्दालन करण्यात निष्णात आणि ज्याच्या कानांपर्यंत पांढरे केस येऊन पोचले आहेत अशा धनुर्धरश्रेष्ठ परशुरामाला, नुकत्याच धारण केलेल्या धनुष्यामुळे ज्याचा तळहात लाल झाला आहे, ज्याने (फक्त) ताडकेस मारिले आहे व ज्याच्या कंठाला (अद्यापि) दूध लागले आहे अशा याच्याशी (म्ह० रामाशी) युद्ध करण्याची इच्छा बाळगताना लाज कशी वाटत नाही ?

येथे, 'परशुरामाला वृद्धावस्था प्राप्त झाली आहे, त्याच्या स्थिरतर पराक्रमामुळे त्याची कठोरता व प्रौढता स्पष्ट झाली आहे, तो (श्रेष्ठ) धनुर्धर आहे, (उलट) राम (अद्यापी) शिशू असून धनुष्य धारण केल्यामुळे त्याचा सुकोमल तळहात तांबडालाल झाला आहे. परशुरामाने अनेक वेळा क्षत्रियांचा संहार केलेला असल्यामुळे तो प्रगल्भ (अनुभवी) झाला आहे, (उलट रामाने) केवळ ताडका नामक राक्षसीचा वध केला आहे. परशुरामाचे केस पिकले असून ते कानांपर्यंत येऊन पोचले आहेत (उलट रामाच्या)

कंठात मातेच्या स्तनांचे दूध (अद्यापी) संभवते. (अशा परशुरामाला) अशा (रामाशी) युद्ध करण्याची इच्छा बाळगताना लाज कशी वाटत नाही ?' ह्या उक्तीत कोमलत्वामुळे राघवा(रामा)ची अवस्था परशुरामाच्या अवस्थेच्या विरुद्ध असल्याचे प्रतिपादिले आहे. ह्या प्रतिपादनात ताडका (राक्षसीच्या) वधाने हा विरुद्धभावाने युक्त असा अर्थ काहीशा अनौचित्यामुळे अंतःकरणात संकोच निर्माण करतो.

विवरण—क्षेमेन्द्राची राजशेखराच्या श्लोकावरील टीका रास्तच आहे. कारण राम अद्यापी शैशवावस्थेत असून परशुरामाचे केससुद्धा पिकले आहेत असे प्रतिपादावयाचे असताना रामाने ताडकेचा वध केला असल्याचे वर्णिल्याने त्याच्या शैशवावस्थेचा ठसा रसिकांच्या अंतःकरणावर उमटत नाही. त्यामुळेच रसिकाचा विरस होतो, हा क्षेमेन्द्राचा आक्षेप योग्य आहे. काव्यनाटकादीतील पात्रांच्या तोंडची भाषा त्यांच्या वयाला, व्यवसायाला, मनःस्थितीला व स्वभावाला अनुरूप असली पाहिजे हेच क्षेमेन्द्राला कटाक्षाने सुचवावयाचे आहे. अर्थात् आधुनिक दृष्टिकोणानुसार ह्या सर्व अंगांचा समावेश स्वभावदर्शनकलेत होतो.

मर्मस्थान पंचविसावे–विचार

विचारौचित्यं दर्शयितुं आह—

उचितेन विचारेण चारुतां यान्ति सूक्तयः ।
वेद्यतत्त्वावबोधेन विद्या इव मनीषिणाम् ॥ ३७ ॥

विचारौचित्येन सूक्तयश्चारुतां यान्ति, ज्ञेयस्वरूपज्ञानेन विद्या इव विदुषाम् ॥

सरलार्थ—विचाराचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

ज्याप्रमाणे ज्यांच्या बुद्धीवर शास्त्राचे संस्कार झाले आहेत अशांचे ज्ञान जाणण्याजोग्या तत्त्वाच्या ज्ञानाने, सुंदर बनते त्याप्रमाणे उचित विचाराने युक्त, अशी काव्ये सुंदरता प्राप्त करतात.

विचाराच्या औचित्याच्या योगे काव्यांना सुंदरता प्राप्त होते, ज्याप्रमाणे ज्ञेय तत्त्वाचे स्वरूप समजल्याने बुद्धिमंतांच्या ज्ञानाला (सुंदरता प्राप्त होते).

विवरण—मनीषी म्हणजे 'शास्त्रसंस्कृतमनीषावान् ।' मनीषा म्हणजे बुद्धी. बुद्धिमंतांच्या ज्ञानाला तत्त्वाकलनानेच सुंदरता प्राप्त होते, एरव्ही नाही.

काव्यातही विचारांच्या औचित्यामुळे रमणीयता निर्माण होते हा सर्वस्वी ग्राह्य असाच विचार क्षेमेन्द्राने येथे मांडला आहे. काव्यगत विचारसौंदर्याकडेही सूक्ष्म दृष्टीच्या क्षेमेन्द्राचे लक्ष गेलेले आहे, ही विशेष उल्लेखनीय बाब आहे. क्षेमेन्द्राने तिसाव्या कारिकेत उचित तत्त्व सत्याचा निश्चयात्मक प्रत्यय आणून देत असल्यामुळे त्याचे वर्णन काव्याला ग्राह्यता प्राप्त करून देते, असे म्हटले आहे. त्या उचित तत्त्वाच्या सम्यक् आकलनाने विद्वानांच्या विद्येला सुंदरता प्राप्त होते असे येथे प्रतिपादून क्षेमेन्द्राने ह्या दोन कारिकांची जणू गुंफण साधली आहे.

यथा मम मुनिमतमीमांसायाम्—

९९. 'अश्वत्थामवधाभिधानसमये सत्यव्रतोत्साहिना
मिथ्या धर्मसुतेन जिह्मवचसा हस्तीति यद्व्याहृतम् ।
सा सत्यामृतरश्मिवैरमसमं संसूचयन्त्याः सदा
शंके पंकजसंश्रयेण मलिनारंभा विजृंभा श्रियः ॥'

अत्र द्रोणनिधनाख्याने सत्यव्रतोत्साहवता धर्मतनयेनापि मिथ्या लघुवचसा कुञ्जर इति यदुक्तं, सा सततं सत्यचन्द्रद्वेषं सूचयन्त्याः श्रियः शंके पंकजसंश्रयेण मलिनव्यापारा विजृंभा' इत्यभिहिते ससंवादलक्ष्मीस्वभावपरिभावनतया तत्त्वावबोधेन मूलविश्रान्त्या फलपर्यवसायी विचारः सहृदयसंवेद्यमौचित्यं व्यनक्ति ।

सरलार्थ—उदाहरणार्थ, माझ्या मुनिमतमीमांसेतील ह्या श्लोकात विचारौचित्य आढळेल—

सत्यव्रताविषयी उत्साह बाळगणाऱ्या धर्मपुत्राने म्हणजे युधिष्ठिराने 'अश्वत्थामा' नामक हत्तीच्या हत्येचे वर्णन करतेसमयी 'हत्ती (मेला)' असे जे (अगदी) हलक्या आवाजात खोटेपणाने म्हटले तो (उद्गार) म्हणजे सत्यरूपी चंद्राशी असलेले आपले कायमचे विषम वैर सूचित करणाऱ्या लक्ष्मीचा पंकजाशी संपर्क झाल्याने (तिच्या ठायी) उदित झालेल्या मालिन्याचा विकास होय, असे मला वाटते.

येथे 'द्रोणाचार्यांच्या निधनासंबंधी बोलताना सत्य बोलण्याच्या व्रताविषयी उत्साही असणाऱ्या धर्मपुत्र युधिष्ठिरानेदेखील खोटेपणाने हलक्या आवाजात 'हत्ती' असा जो शब्दोच्चार केला तो (शब्दोच्चार) म्हणजे सत्यरूपी चन्द्राशी

असलेले आपले कायमचे हाडवैर सुचविणाऱ्या लक्ष्मीचा, मला वाटते, पंकजाशी संपर्क झाल्याने (तिच्या ठायी उदय पावलेल्या) मालिन्यव्यापाराचा विकास (प्रकटीकरण) होय असे जे म्हटले आहे त्यातील फलामध्ये पर्यवसान पावणारा विचार, लक्ष्मीच्या स्वभावाविषयींच्या (सांकेतिक) कल्पनेस धरून असल्यामुळे (लक्ष्मी मनुष्याला कुटिल व्यवहारास प्रवृत्त करते ही सांकेतिक कल्पना) आणि तत्त्वाच्या सम्यक् ज्ञानाने मुळात विश्रान्त होत असल्यामुळे, सहृदय रसिकांना ग्राह्य असे औचित्य व्यक्त करीत आहे.

विवरण—प्रस्तुत उदाहरणश्लोक व त्यावरील क्षेमेन्द्राची गद्यवृत्ती ही दोन्ही प्रशंसनीय आहेत. पहिल्या दोन पादातील 'सत्य' व 'मिथ्या' हे दोन विरुद्धार्थक शब्द खुबीदारपणे वापरले गेले आहेत. जिह्म म्हणजे अंधुक, अस्पष्ट. धर्मपुत्राने अंधुक शब्दात म्हणजे ऐकू जाईल, न जाईल अशा बेताने 'हत्ती' शब्द उच्चारला हे वर्णन समुचित व सुंदर आहे. लक्ष्मीचे सत्याशी कायमचे वैर असते हे तत्त्वही श्लोकात बहारीने गुंफले गेले आहे. लक्ष्मी कमळात उभी असते, कमळ हे चिखलात उगवते, त्यामुळे लक्ष्मीचा चिखलाशी संपर्क झाल्याने तो मलिन (श्लेषाने मलिन स्वभावाची) झाली ही उत्प्रेक्षा रमणीय आहे. क्षेमेन्द्रकृत स्वकाव्यव्याख्यानही मर्मोद्घाटक आहे. [क्षेमेन्द्राने लक्ष्मीचे सत्याशी वैर असल्याचे म्हटले आहे, उलट सुभाषितकार 'लक्ष्मी सत्यानुसारणी' असते असे म्हणतात].

न तु यथा मम तत्रैव—

१००. 'प्रम्लाने　चिरकालवृत्तदयिताकेशाम्बराकर्षणे
क्रूरं राक्षसवैशसं यदि कृतं भीमेन दुःशासने ।
तत्कालक्षमिणा कुशाश्मपरुषारण्यप्रवासे चिरं
किं पीतं तततापमग्नमहिषस्वेदाम्बुपृक्तं पयः ॥'

अत्र भीमसेनचरिते विचार्यमाणे त्रयोदशवर्षपर्युषिते कृष्णाकेशाकर्षणपराभवे भीमेन भीमं राक्षसकर्म दुःशासने यदि कृतं तत्सद्यःकृतापराधकालक्षमिणा सुचिरं दर्भसूचीविषमाश्मपरुषवनवासे किं ग्रीष्मतापनिमग्नमहिषस्वेदस्रुतिपृक्तं पयः पीतमित्यनुपपन्नकृत्येऽभिहिते कारणविचाराभावान्निर्मूलोपालंभमात्रमनौचित्यमनुबध्नाति ॥ ३७ ॥

सरलार्थ— परंतु, उदाहरणार्थ, माझ्या त्यातल्याच (म्हणजे मुनिमतमीमांसेतल्याच) ह्या श्लोकात विचारौचित्य नाही.

(मध्यंतरी) दीर्घकाळ लोटल्यामुळे प्रियेचे केस खेचण्याची व वस्त्रहरण करण्याची घटना जुनी (अतिशय म्लान) झाली असता जर भीमाने दुःशासनाचे बाबतीत राक्षसास अनुरूप (असे) क्रूर कृत्य केले, (तर) त्या (म्हणजे घटना) समयी क्षमा करणाऱ्या (भीमाने) कुश गवत व दगडधोंडे यांनी कठोर अशा अरण्यात दीर्घकाळ हिंडून, प्रखर तापात निमग्न झालेल्या महर्षींच्या घर्मजलाने संपृक्त (संयुक्त) जलाचे पान का केले ?

येथे, भीमसेनाच्या चरित्राचा विचार केला जात असता, द्रौपदीच्या केशाकर्षणरूप अपमानास तेरा वर्षे लोटली असता भीमाने जर दुःशासनाचे बाबतीत भीम म्हणजे राक्षसी कृत्य केले तर तत्क्षणी केल्या गेलेल्या अपराधाचे बाबतीत(अपराधकाळी) क्षमाबुद्धी धारण करणाऱ्या (भीमाने) दर्भगवताच्या पात्यांनी विषम झालेल्या व दगडाधोंड्यांनी कठोर झालेल्या अरण्यात दीर्घकाळ वास्तव्य करून, ग्रीष्म ऋतूच्या उन्हात न्हाऊन निघालेल्या महर्षींच्या घामाने (घर्मजलाने) युक्त असे जल का प्राशन केले ? अशा प्रकारे ज्याची उपपत्ती (उलगडा) लागत नाही अशा कृत्याच्या वर्णनात कारणाचा विचार (केलेला) नसल्यामुळे निराधार टोमणाच (तेवढा दिला आहे. तो) अनौचित्य प्रकट करतो.

विवरण—प्रस्तुत प्रसंगी भीमसेनाच्या भीमचरित्राचा विचार केला जात आहे. दुःशासनाने द्रौपदीचे भर सभेत केशाकर्षण केले. तेव्हा भीम प्रत्यक्षपणे काहीच करू शकला नाही, परंतु दुःशासनास ठार मारण्याची प्रतिज्ञा त्याने तेथल्या तेथे केली व ती भारतीय युद्धात खरीही करून दाखवली. दुःशासनाच्या वधाचे कृत्य भीमाने केशाकर्षणाच्या घटनेनंतर तेरा वर्षांनी केले. ज्या भीमाने हे घोर कर्म केले त्या भीमाने वनवासाच्या काळात घर्मजलयुक्त जलाचे पान का केले असा प्रश्न येथे केला आहे. जलपानाच्या कृत्याचा उलगडा होत नाही. त्या कृत्याचे कारण सांगितलेले नाही. अशा प्रकारे, कारणाचा विचार येथे केलेला नसल्यामुळे विचाराचे अनौचित्य निर्माण झाले आहे.

मर्मस्थान सव्विसावे—नाम

नामौचित्यं दर्शयितुं आह—

नाम्ना कर्मानुरूपेण ज्ञायते गुणदोषयोः ।
काव्यस्य पुरुषस्येव व्यक्तिः संवादपातिनी ॥३८॥

काव्यस्य कर्म औचित्यं तेन नाम्ना पुरुषस्येव गुणदोषव्यक्तिः संवादिनी ज्ञायते ।

सरलार्थ—नामाचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात.

ज्याप्रमाणे पुरुषाच्या नावाच्या द्वारे त्याच्या (नावाला) साजेशा गुणदोषांची अभिव्यक्ती होते, त्याप्रमाणे काव्याच्या कर्मास अनुरूप (अशा) नावाने काव्याचे गुण व दोष प्रतीत होतात.

काव्याचे कर्म औचित्य. ज्याप्रमाणे नावाच्या द्वारे पुरुषाच्या गुणदोषांची सुसंवादी अभिव्यक्ती प्रतीत होते त्याप्रमाणे त्याने (म्ह० औचित्याच्या द्वारे) काव्याच्या गुणदोषांची सुसंवादी अभिव्यक्ती ज्ञात होते.

विवरण—मनुष्याचे नाव त्याच्या कर्मानुसार असेल तर त्याच्या अंगच्या गुणांचा व दोषांचा बोध होतो. 'धर्म' हे नाव धारण करणारा पुरुष धर्मानुसार आचरण करणारा, पापभीरू असला पाहिजे, अशी कल्पना होते. तसेच 'भीम' नावाचा मनुष्य भीम (म्हणजे राक्षसोचित भयंकर) कर्म करणारा, क्रूरवृत्तीचा असला पाहिजे असे अनुमान निघते. (व्यवहारात नेहमीच असे घडते असे नाही. प्रायः, नाव सोनूबाई नि हाती कथलाचा वाळा! अशीच प्रचीती येत असते, हा भाग अलाहिदा!) काव्यगत पात्रांची नावे त्यांच्या कर्मानुसार असली तर त्या त्या पात्रांचे गुणदोष त्यांच्या नावांवरून प्रतीत होतात, असे क्षेमेन्द्राला म्हणावयाचे आहे. त्याने नामौचित्याच्या विचारप्रसंगी, पुढे, मदनाची पंचबाण व विलासायुध ही दोन नावे कशी उचित आहेत व शंकराचे भव हे नाव (विशिष्ट श्लोकार्थापुरते) कसे अनुचित आहे ते दाखवून दिले आहे. येथपर्यंत वाद नाही. परंतु, वरील कारिकेवरील गद्यवृत्तीत 'काव्यस्य कर्म औचित्यं', असे म्हटले असल्याने गोंधळ निर्माण होतो. त्याचे स्वरूप असे—'काव्यस्य कर्म औचित्यं' या वाक्याचा सरळ अर्थ असा की, औचित्य हे काव्याचे कर्म होय. आता, खुद्द काव्य हे कविकर्म असते. ('काव्यं कवेः कर्म ।' भिक्षुगौरीशंकरसंपादित 'सर्वतंत्रसिद्धान्तपदार्थलक्षणसंग्रहः, संवत् २००६, पृ० ६९). कोणत्याही कर्माचे ठायी कर्म संभवत नाही, असा नियम आहे. (पाहा—कार्यविरोधि कर्म ॥ वैशेषिक सूत्र १.१.१४; गुणवैधर्म्यात् न कर्मणां कर्म ॥ —तत्रैव १.१.२४). साहजिकपणेच काव्यरूपी कर्माचे अन्य कर्म संभवतच नाही. पुनः कोणतेही कर्म जन्यच असते. जे जे जन्य असते ते ते अनित्य असते असे शास्त्रात सांगितले आहे (यद् यद् जन्यं तद् तद् अनित्यम् ।). आता औचित्य हे काव्याचे कर्म मानले तर ते जन्यत्वामुळे अनित्य ठरेल. परंतु, खुद्द क्षेमेन्द्रानेच कारिका पांचवरील वृत्तीमध्ये 'औचित्यं त्वग्रे वक्ष्यमाणलक्षणं स्थिरं

अविनश्वरं जीवितं काव्यस्य—।' असे म्हटले आहे. म्हणजेच, औचित्य अनित्य मानल्यास क्षेमेन्द्राच्या महासिद्धान्तास विरोध होतो. खरे, औचित्य हे काव्याचे जीवित होय हा नवसिद्धान्त प्रतिपादण्यास प्रवृत्त झालेल्या क्षेमेन्द्राचे हातून औचित्यास कर्म मानण्याची ढोबळ चूक होण्याची शक्यता एकंदरीने कमीच. मग अशा स्थितीत येथील विरोधाचा परिहार कसा करावयाचा हा प्रश्न निर्माण होतो. त्याचे उत्तर असे—येथे कर्म शब्दाचा अर्थ धर्म असा घ्यावयाचा. म्हणजे मग 'काव्यस्य कर्म औचित्यम्' ह्या वाक्याचा अर्थ काव्याचा धर्म औचित्य होय, असा होईल. शीतत्व हा ज्याप्रमाणे पाण्याचा धर्म आहे, उष्णत्व हा ज्याप्रमाणे तेजाचा धर्म आहे, निरूपत्व हा ज्याप्रमाणे आकाशाचा धर्म आहे, त्याप्रमाणेच औचित्य हा काव्याचा धर्म होय. शीतत्वादि धर्म हे ज्याप्रमाणे त्या त्या द्रव्यांशी नित्यसंबद्ध असणारे (म्हणजेच समवायसंबंधाने राहणारे) धर्म आहेत, त्याप्रमाणेच औचित्यही काव्यात समवायसंबंधाने राहते. ते काव्याशी पूर्णपणे एकजीव झालेले असते. औचित्यावाचून काव्य असू शकत नाही. अशा औचित्य-धर्मामुळेच काव्याच्या गुणदोषांची अभिव्यक्ती होते व ती ज्ञात होते. असा विरोधपरिहार केला की, कारिकागत दोषाचे उत्पाटन होते.

यथा कालिदासस्य—

१०१. 'इदमसुलभवस्तुप्रार्थनादुर्निवारः
प्रथममपि मनो मे पंचबाणः क्षिणोति ।
किमुत मलयवातान्दोलितापाण्डुपत्रै-
रुपवनसहकारैर्दर्शितेष्वंकुरेषु ॥' [विक्रमोर्वशीय २.६]

अत्र प्रारंभ एव ममेदं मनः पंचबाणः सुदुर्लभवस्तुप्रार्थनादुर्निवारः शकलीकरोति, किमुत लीलोद्यानसहकारैर्मलयानिलान्दोलितबालपल्लवैर-ङ्कुरेषु दर्शितेष्वित्युक्ते मदनस्य पंचबाणाभिधानमुचितमेव ॥

सरलार्थ—उदाहरणार्थ, कालिदासाच्या ह्या श्लोकात नामौचित्य आहे—

दुर्मीळ वस्तूच्या प्रार्थनेपेक्षा(ही) निवारण्यास कठीण (असा हा) पंचबाण म्हणजे मदन माझे हे मन पहिल्यापासूनच छिन्नभिन्न करीत आला आहे. तर मग मलय पर्वतावरून वाहात येणाऱ्या वाऱ्यांनी हालविलेल्या उद्यानगत आम्रवृक्षांच्या पांढुरक्या पानांनी आम्रमंजरी दाखविल्या तर काय होईल (ते सांगणेच नलगे) !

येथे, दुष्प्राप्य वस्तूच्या प्रार्थनेपेक्षाही अनिवार (असा) पंचबाण (म्हणजे मदन) माझे हे मन अगोदरच छिन्नभिन्न करीत आहे, अशा स्थितीत क्रीडोपवनातील आम्रवृक्षांच्या, मलयवायूने हिंदोळणाऱ्या, कोमल पालवीने मंजऱ्या प्रकट केल्या तर काही बघायलाच नको, ह्या वर्णनात मदनाला लावलेले पंचबाण हे नामाभिधान उचितच आहे.

विवरण—अमरकोष मदनाचे वाचक 'मन्मथ, मार, प्रद्युम्न, मीनकेतन, कंदर्प, दर्पक, अनंग, काम, पंचशर, स्मर, शंबरारि, मनसिज, कुसुमेषु, अनन्यज, पुष्पधन्वा, रतिपति, मकरध्वज, आत्मभू (अमरकोष १।४९-५२), एवढे पर्यायशब्द देतो. प्रस्तुत श्लोकातील 'मदन माझ्या मनाची शकले करीत आहे,' ह्या वर्णनात क्षिण् (८ गण उभयपदी) ह्या धातूचा प्रयोग झाला असून इजा करणे, मोडणे हा ह्या धातूचा अर्थ आहे. तो लक्षात घेता पंचबाणाप्रमाणेच पंचशर व मार ह्या दोन पर्यायवाचकांपैकी एखादा पर्यायवाचक येथे शोभून दिसला असता.

यथा वा मम बौद्धावदानकल्पलतायाम्—

१०२. 'तारुण्येन निपीतशैशवतया साऽनङ्गशृंगारिणी
तन्वङ्ग्या सकलांगसंगमसखी भंगिर्नवांगीकृता ।
निःसंरम्भपराक्रमः पृथुतरारंभाभियोगं विना
साम्राज्ये जगतां यया विजयते देवो विलासायुधः ॥'

[बौद्धावदानकल्पलता ६४·११७]

अत्र यौवननिपीतशैशवतया तन्वङ्ग्या अनंगशृंगारवती सर्वांगसंगमसखी सा काप्यभिनवा भंगिरंगीकृता यया निष्प्रयत्नपराक्रमः प्रभूततरारंभसंभारं विहाय, त्रिभुवनसाम्राज्ये जयति देवो विलासायुध इत्युक्ते कामस्य विलासायुध इति नामोपपन्नमेव । तन्वंगी भंग्यैव सिद्धत्रैलोक्याधिपत्यविजिगीषायां कामसायकादीनां नैरर्थक्यात् ॥

सरलार्थ—अथवा, उदाहरणार्थ, माझ्या बौद्धावदानकल्पलतेतील ह्या श्लोकात नामौचित्य आढळेल—

तारुण्याने जिचे शैशव नष्ट (शब्दशः प्राशन) केले होते अशा शेलाट्या सुंदरीने मदनास अलंकृत करणारी व सर्व शरीराच्या संगमाची सखी असलेली (म्ह० सबंध शरीराला व्यापणारी) नवीन विनीतता (अथवा कांती) धारण केली. तिच्या साह्याने, फार मोठ्या तयारीच्या खटाटोपावाचून सहज

(शब्दशः प्रयत्न न करता) पराक्रम गाजविणारा भगवान विलासायुध तिन्ही जगांच्या साम्राज्यात विजयी होतो.

येथे, 'जिचे शैशव तारुण्याने नष्ट केले होते अशा तन्वंगीने कामदेवाच्या शृंगाराने युक्त व समस्त शरीराशी मैत्रिणीप्रमाणे संगम पावणारी अभिनव कांती अंगीकारिली. तिच्या साह्याने, प्रयत्न न करता पराक्रम गाजविणारा भगवान विलासायुध, फार मोठ्या तयारीवाचून त्रिभुवनांच्या साम्राज्यात विजयी होतो,' ह्या उक्तीत कामदेवाला लावलेले विलासायुध हे नाव समर्पकच आहे. कारण सुंदरीच्या कांतीनेच त्रैलोक्यावर आधिपत्य गाजविण्याची इच्छा सिद्ध होत असता (असल्यामुळे) कामदेवाचे बाण वगैरे निरर्थक होत.

विवरण—स्त्रीचे शैशव संपले व तिने तारुण्यात पदार्पण केले की तिची 'नवली' पालटते; तिचे बोलणे, वावरणे, वागणे ह्या सर्वच गोष्टीत एक प्रकारची 'क्रांती' घडून येते. तरुणी मदनाचे जणू प्रसाधन बनते (आणि मदनही तिचे प्रसाधन बनतो !!). असा हा मदन त्रैलोक्याला व्यापून आहे, जणू त्याने त्रैलोक्यावर आपले आधिपत्य स्थापिले आहे. परंतु, ह्या त्रिभुवनसम्राटात व इतर सम्राटात फरक हा आहे की, इतर सम्राटांना विजयप्राप्तीपूर्वी फार मोठ्या सैन्याची जमवाजमव करावी लागते, साहित्यसामग्रीची सिद्धता करावी लागते व विजयार्थ प्रयत्न करावा लागतो. मदनाला मात्र ह्यांपैकी काहीच करावे लागत नाही. त्याचा पराक्रम (म्हणजे प्रभाव) प्रयत्न व तयारी ह्यांवाचून प्रकट होतो. श्लोकार्थ रमणीय आहे ह्यात शंका नाही. परंतु, 'विलासायुध' हा मदनवाचक शब्द अमरकोष देत नाही. तो कवीने बुद्धीने बनविलेला शब्द आहे. अशा शब्दांचा जेव्हा काव्यात प्रयोग होतो तेव्हा त्या काव्यात 'पर्यायोक्त' अलंकार झाला असे सांकेतिक साहित्यशास्त्र म्हणते. (अर्जुनाला अर्जुन न म्हणता 'मध्यमपती' म्हणणे हे पर्यायोक्ताचे उदाहरण.) प्रस्तुत श्लोकातील पहिल्याच पादात 'अनंग' हा कामदेवाचा वाचक शब्द वापरला असून तरुणीच्या नवभंगीला 'अनंगशृंगारिणी' म्हटले आहे. वाक्यार्थाचा कीसच काढावयाचा झाला तर असे विचारावयास हवे की, ज्याला अंगच नाही त्याला शृंगारावयाचे कसे ? परंतु असली समालोचना अरसिकतेचीच द्योतक ठरावयाची !

न तु यथा कालिदासस्य—

१०३. 'क्रोधं प्रभो ! संहर संहरेति
यावद्गिरः खे मरुतां चरन्ति ।

तावत्स वह्निर्भवनेत्रजन्मा
भस्मावशेषं मदनं चकार ॥'

[कुमारसंभव ३.७२]

अत्र पश्यतो भगवतस्त्रिनेत्रस्य स्मरशरनिपातक्षोभे वर्ण्यमाने तत्त्विकार-कोपप्रशमाय संहर संहर प्रभो क्रोधं इति यावद्वचः खे देवानां चरति, तावद्-भवनेत्रोद्भवः वह्निर्मदनं भस्मराशिशेषमकार्षीदित्युक्ते संहारावसरे रुद्रस्य भवाभिधानमनुचितमेव ॥ ३८ ॥

सरलार्थ—परन्तु, उदाहरणार्थ, कालिदासाच्या ह्या श्लोकात नामौचित्य नाही—

'प्रभो ! आपला क्रोध आवरा हे देवांचे शब्द आकाशात उमटतात न उमटतात तोच शंकराच्या नेत्रामधून निघालेल्या अग्नीने मदनास भस्मरूपाने शिल्लक (राहिलासा) केला (मदनास भस्मसात् केले).

येथे, कामदेवाचा बाण लागल्यामुळे खवळून जाऊन पाहाणाऱ्या भगवान शंकराचे वर्णन करावयाचे असता, त्याचा (शंकराचा) अकारण, आत्यंतिक राग शमविण्यासाठी देवांनी उच्चारलेले 'प्रभो ! राग आवरा, राग आवरा' हे शब्द आकाशात उमटताहेत, न उमटताहेत तोच भवाच्या (शंकराच्या) नेत्रामधून निघालेल्या त्या अग्नीने मदनाला भस्मराशीच्या रूपाने अवशिष्ट केला असे वर्णिले आहे. ह्या वर्णनात संहाराच्या वर्णनप्रसंगी रुद्राला लावलेले भव हे नामाभिधान अनुचितच आहे.

विवरण—क्षेमेन्द्राच्या सूक्ष्म दृष्टीचे येथे कौतुक करावेसे वाटते. शंकराने मदनाचे पाहता पाहता भस्म करून टाकले असे येथे कालिदासाला वर्णावयाचे आहे. म्हणजेच विषय शंकरकृत संहारवर्णन हा आहे. साहजिकपणे शंकराच्या अनेक नावांपैकी संहारकृत्याला उचित नावाची निवड व गुंफण प्रस्तुत श्लोकात व्हावयास हवी होती. तशी ती झालेली नाही ह्याबद्दल क्षेमेन्द्राने कालिदासाला दोष दिला आहे व तो योग्यच आहे. ह्या श्लोकाच्या अनुरोधाने डॉ. दे (Sanskrit Poetics as a Study of Aesthetic, 1963, P. 41) म्हणतातः—"And, as an instance of detail, one may cite Kṣemendra's acute criticism of Kālidāsa's use in the same work of the colourless word bhāva as a designation of Rudra, the terrible god of

destruction; for he thinks that it mars the mighty effect of the few swift words describing the tragic annihilation of Madana, the love god." ह्या विधानातील bhāva (भाव) हा उघडच मुद्रणदोष आहे. परंतु, भव हा शब्द swift (शीघ्रगती,चपळ) असल्यामुळे क्षेमेन्द्राला हेय वाटतो असे नाही, तर तो soft (पारुष्यशून्य, मिळमिळीत) असल्यामुळे क्षेमेन्द्राला त्याज्य वाटतो. ह्या ठिकाणी संहारानुकूल harsh (परुष) शब्द योजावयास हवा होता, असा क्षेमेन्द्राच्या म्हणण्याचा आशय आहे. अमरकोषात शिवाचे जे पर्यायवाचक शब्द (प्रथम काण्ड, श्लोक ५९-६८) दिले आहेत त्यांपैकी उग्र, स्मरहरः, त्रिपुरान्तक, क्रतुध्वंसी, रुद्र, ह्यांपैकीही एखादा शब्द येथे शोभून दिसला असता. कवींनी कोषांचा उपयोग कसा मार्मिकपणे करून घ्यावयास हवा तेच जणू क्षेमेन्द्राला येथे सुचवावयाचे आहे. जरी खुद्द त्याने आपल्या कविकंठाभरणाच्या पंचम संधीत भाषाप्रभूने अभ्यासावयाच्या शास्त्रांच्या यादीत कोशाला स्थान दिलेले नसले तरी इतर साहित्यशास्त्रज्ञानी कोशाचा उल्लेख केला आहे. उदा० भामह म्हणतो–"शब्दश्छन्दोभिधानार्था इतिहासाश्रयाः कथाः । लोको युक्तिः कलाश्चेति मन्तव्या काव्यगैर्ह्यमी ॥' काव्यालंकार १-९. तसेच वामनही म्हणतो की, 'शब्दस्मृत्यभिधानकोषश्छन्दोविचितिकलाकामशास्त्रदण्डनीतिपूर्वा विद्याः ॥' काव्यालंकारसूत्र १. ३. ३. मम्मटाने काव्यप्रकाश १।३ ह्या कारिकेवरील वृत्तीत छंदःशास्त्र, व्याकरण, कला, गजशास्त्र इत्यादींबरोबर कोशाचा उल्लेख केला असल्याचे प्रसिद्धच आहे. एवंच, कवीने कोशाध्ययन केले पाहिजे हा विचार परंपरागतच आहे. मदन, शंकर आदी देवतांचे पर्यायशब्द वापरताना कवीने औचित्यविवेक पाळावा हेच क्षेमेन्द्राला येथे सांगावयाचे आहे.

मर्मस्थान सत्ताविसावे—आशीर्वचन

आशीर्वचनौचित्यं दर्शयितुं आह—

पूर्णार्थदातुः काव्यस्य संतोषितमनीषिणः ।
उचिताशीर्नृपस्येव भवत्यभ्युदयावहा ॥ ३९ ॥

संपूर्णार्थसमर्पकस्य संतोषितविदुषः काव्यस्य नृपतेरिवोचितमाशीः पदमभ्युदयावहं भवति ।

सरलार्थ—आशीर्वचनाचे औचित्य दाखविण्यासाठी म्हणतात—

संपूर्ण अर्थाचे दान करणाऱ्या व ज्यांची बुद्धी शास्त्रज्ञानाने सुसंस्कृत झाली आहे अशा बुद्धिमंतांच्या (हृदयांना) संतोष देणाऱ्या काव्याचे औचित्यपूर्ण आशीर्वचन राजाच्या आशीर्वचनाप्रमाणे अभ्युदयास (उन्नतीस, उत्कर्षास) कारणीभूत होते.

परिपूर्ण व समर्पक अर्थाने युक्त आणि विद्वानांना संतोष देणाऱ्या काव्यातील उचित आशीर्वादपर शब्द राजाच्या (उचित) सफल आशीर्वादपर शब्दाप्रमाणे उन्नतिकारक ठरतो.

विवरण—ग्रंथाच्या शेवटी आशीर्वचनपर पद्य लिहिण्याचा संस्कृत ग्रंथकारांचा रिवाज आहे—त्याचाच येथे उल्लेख आहे. क्षेमेन्द्राने आपल्या कविकंठाभरणाच्या शेवटी आशीर्वादपर वचन पुढीलप्रमाणे लिहिले आहे—'कृत्वा निश्चलदैवपौरुषमयोपायं प्रसूत्यै गिरां। क्षेमेन्द्रेण यदर्जितं शुभफलं तेनास्तु काव्यार्थिनाम् ॥ निर्विघ्नप्रतिभाप्रभावसुभगा वाणी प्रमाणीकृता। सद्भिर्वाग्भवमंत्रपूतविततश्रोत्रामृतस्यन्दिनी ॥' कविकंठाभरण ५. ३.

यथाऽस्मदुपाध्यायगंगकस्य—

१०४. 'स कोऽपि प्रेमार्द्रः प्रणयपरिपाकप्रचलितो
विलासोऽक्ष्णां देयात्सुखमनुपमं वो मृगदृशाम्।
यदाकूतं दृष्ट्वा पिदधति मुखं तूणविवरे
निरस्तव्यापारा भुवनजयिनः पंच विशिखाः ॥'

अत्र 'स कोऽप्यसामान्यप्रेमप्रणयविश्रान्तिप्रगल्भकुरंगदृशां निरुपमो नयनविलासः सुखं वो देयात् यदभिप्रायमालोक्य भुवनजयिनः कामस्य पंचसायकाः समाप्तव्यापारास्तूणीरविवरे लज्जयेव मुखं पिदधतीत्युक्ते सुखं वो देयादित्याशीः पदमुचितमेव, प्रियानयनविभ्रमस्य सुखार्पणयोग्यत्वात्।

सरलार्थ—उदाहरणार्थ, माझे गुरुजी गंगक यांच्या पुढील श्लोकात आशीर्वचनौचित्य आढळेल—

मृगनयनांच्या डोळ्यांचा तो प्रेमार्द्र व प्रणयाच्या परिपाकामुळे प्रगल्भ बनलेला विलास तुम्हांला निरुपम सुख देवो. त्याचा (शब्दशः ज्याचा) अभिप्राय पाहून भुवनजेत्या कामदेवाचे पांच बाण आपापली कार्ये टाकतात (आणि) भात्याच्या पोकळीमध्ये आपले तोंड लपवितात.

येथे, 'असामान्य प्रेमप्रणयात पर्यवसान पावल्यामुळे प्रगल्भ बनलेला हरिणाक्षींचा तो निरुपम 'नेत्रविभ्रम तुम्हांला सुख देवो. त्याचा (ज्याचा)

अभिप्राय अवलोकून भुवन जिंकणाऱ्या कामदेवाचे पांच बाण (आपापले) व्यापार थांबवून भात्याच्या पोकळीत जणू लाजेने तोंड लपवितात,' ह्या उक्तीतील 'मुखं वो देयात्' (तो नेत्रविलास तुम्हाला सुख देवो) हे आशीर्वादपर पद उचितच आहे. कारण प्रियेचा नयनविभ्रम सुखप्रदान करण्यास पात्र असतो.

विवरण—क्षेमेन्द्राचे शिक्षण अनेक गुरूंच्या हाताखाली झाले असावे असे अनुमान प्रस्तुत ग्रंथाच्या समाप्तिपर श्लोकांक दोनमधील 'तस्यात्मनः सर्वमनीषिशिष्यः श्रीव्यासदासापरपुण्यनामा ।' ह्या उल्लेखावरून निघते. पैकी गगक नामक उपाध्यायाचा उल्लेख येथे झाला असून अभिनवगुप्त व सोमपाद यांचे उल्लेख भारतमंजरीच्या समाप्तिपर श्लोकांत ८ व ९ मध्ये आले आहेत.

प्रस्तुत श्लोकात प्रयुक्त झालेला 'भुवनजयी' शब्द कामदेवाचा पर्यायशब्द म्हणून प्रसिद्ध नाही. त्यामुळे परंपरागत साहित्यशास्त्राच्या दृष्टीने येथे अप्रयुक्तता हा दोष आहे.

कामदेवाच्या पंचबाणांविषयी अमरकोष म्हणतो—'अरविन्दमशोकं च चूतं च नवमल्लिका । नीलोत्पलं च पंचैते पंचबाणस्य सायकाः ॥ उन्मादनस्तापनश्च शोषणः स्तंभनस्तथा । संमोहनश्च कामस्य पंचबाणाः प्रकीर्तिताः ॥' (प्रथम कांड)

यथा वा मम वात्स्यायनसूत्रसारे—

१८५. 'कामः कामं कमलवदनानेत्रपर्यन्तवासी
दासीभूतत्रिभुवनजनः प्रीतये जायतां वः ।
दग्धस्यापि त्रिपुररिपुणा सर्वलोकस्पृहार्हा
यस्याधिक्यं रुचिरतितरामञ्जनस्येव याता ॥'

अत्र कामः प्रीतये वो जायतां यस्य दग्धस्याप्यञ्जनस्येवाधिक्यं रुचिर्यातेत्युक्ते प्रीतये जायतामित्युचितं, कामस्य प्रीत्यात्मकत्वात् ।

सरलार्थ—अथवा, उदाहरणार्थ, माझ्या वात्स्यायनसूत्रसारातील ह्या श्लोकात आशीर्वचनौचित्य आढळेल—

कमलमुखी (सुंदर) स्त्रियांच्या नेत्रांच्या टोकावर राहणारा आणि (पृथ्वी, स्वर्ग व पाताळ ह्या) तिन्ही लोकातील लोक ज्याचे दासानुदास बनले आहेत असा कामदेव तुमच्या आनंदास कारणीभूत होवो. त्याला (शब्दशः ज्याला) त्रिपुरदैत्याच्या शत्रूने म्हणजे शंकराने जाळले असतामुद्धा सर्व लोकांना स्पृहणीय वाटणारी त्याची गोडी काजळाप्रमाणे अतिशय वृद्धी पावली.

येथे, कामदेव तुमच्या आनंदास कारणीभूत होवो. जरी तो दग्ध झाला असला तरीदेखील त्याची रुची, काजळाप्रमाणे, उत्कर्ष पावली. ह्या उक्तीत 'आनंदास कारणीभूत होवो' हे आशीर्वचन उचित आहे. कारण कामदेव प्रीत्यात्मक (आनंदात्मक) असतो.

विवरण—श्लोकाचे सौंदर्य 'दग्धस्यापि' पदाने खूपच वाढले आहे. शंकराने आपला तृतीय नेत्र उघडून कामदेवाला जाळले हे खरे. तथापि, कामदेव दग्ध झाला तरीही निष्प्रभ झाला नाही. दुसरी कोणतीही वस्तू दग्ध झाल्यानंतर फार तर नामाने शेष राहते. कामदेवाचा प्रभाव मात्र दग्धावस्थे-नंतरही पूर्ववत् कायम राहिला. एवंच, कामदेवाने शंकरावरही मात केली आणि म्हणून असा अलौकिक सामर्थ्यसंपन्न कामदेव तुमच्या आनंदास कारणी-भूत होवो ह्या आशीर्वचनात परम औचित्याचा परिपोष झाला आहे, हे क्षेमे-न्द्राचे म्हणणे योग्यच आहे.

न तु यथाऽमरुकस्य—

१०६. 'आलोलामलकावलीं विलुलितां बिभ्रच्चलत्कुण्डलं
किंचिन्मृष्टविशेषकं तनुतरैः स्वेदाम्भसां सीकरैः ।
तन्वंग्याः सुतरां रतान्तसमये वक्त्रं रतिव्यत्यये
तत्त्वां पातु चिराय किं हरिहरस्कन्दादिभिर्दैवतैः ॥'

अत्र तन्व्याः रतिव्यत्यये लोलालकं चलत्कुण्डलं स्वेदसलिलेन किंचिदु-न्मृष्टतिलकं यन्मुखं तत्त्वां पातु, किं हरिहरस्कन्दादिभिर्दैवतैरित्युक्ते पातु त्वामित्यनुचितम्, आनन्दयतु त्वामित्युचितं स्यात् ।

पाठभेदः—हाच श्लोक अमरुशतकात (क्रमांक ३) पुढीलप्रमाणे आढळतो—

आलोलामलकावलीं सुकुसुमां बिभ्रच्चलत्कुण्डलं
किंचिन्मृष्टविशेषकं तनुतरैः स्वेदांभसः शीकरैः
तन्व्या यत्सुरतान्ततान्तनयनं वक्त्रं रतव्यत्यये
तत्त्वां पातु चिराय किं हरिहरब्रह्मादिभिर्दैवतैः ॥

सरलार्थ—परंतु, उदाहरणार्थ, अमरकाच्या ह्या श्लोकात आशीर्वचनौचित्य नाही—

चंचल व विस्कटलेला केशसंभार धारण करणारे, हलणारे कर्णभूषण (धारण करणारे), लहान लहान घर्मजलबिंदूंनी कपाळावरील तिलक किंचित् पुसले

गेलेले असे विपरीत रतिक्रीडेच्या अन्तसमयीचे सुंदरीचे मुख तुमचे दीर्घकाळ रक्षण करो. विष्णु, शंकर, व कार्तिकेय इत्यादी देवतांचे काय प्रयोजन आहे ?

येथे 'सुंदरीचे रतिक्रीडान्तकालीन विस्कटलेले केस व हलणारे कर्णभूषण धारण करणारे व घर्मबिंदूंनी कपाळावरील तिलक किंचित् पुसटलेले असे मुख तुमचे रक्षण करो. विष्णू, शंकर, कार्तिकेय इत्यादी देवतांचे काय प्रयोजन आहे ?' असे जे वर्णिले आहे त्यातील 'तुमचे रक्षण करो' हे शब्द अनुचित आहेत. 'तुम्हांला आनंद देवो' असे म्हणणे उचित झाले असते.

विवरण—विपरीत रतिक्रीडेची वर्णने करण्याचा विलक्षण सोस संस्कृत कवींना आहे. कारण वरीलसारखे अनेक श्लोक संस्कृतात आढळतात. अर्थात् उपरिवर्णित स्थितीतील सुंदरी रसिकांना आनंद कसा काय देणार ते फक्त संस्कृत कवीच जाणोत !

येथवर क्षेमेन्द्राने काव्यगत जीवितरूप औचित्याच्या एकूण सत्तावीस मर्मस्थानांचा विचार केला. त्यांचे सिंहावलोकन करता असे लक्षात येते की, क्षेमेन्द्राने काव्यगत वाक्याच्या अंशा-अंशांचा, घटकाघटकांचा, अंगोपांगांचा अत्यंत सूक्ष्म बुद्धीने विचार केला आहे. त्याने काव्यगत रस, अर्थ, अलंकार, वाक्य ह्या ठळक अंगांचा तर परामर्श घेतलाच आहे परंतु त्याखेरीज वाक्यातील क्रियापद, सहा कारके, पुंल्लिंगादी तीन लिंगे, तीन वचने, विशेषणे, उपसर्ग, निपात इत्यादींचेही विवेचन केले आहे. त्याखेरीज काव्यार्थगत अभिप्राय, तत्त्व, विचार, सारसंग्रह, पात्रांची अवस्था, नावे, त्यांचे सत्त्व, कुळ, व्रत इत्यादींचा केलेला विचार वेगळाच. एतावता क्षेमेन्द्राची दृष्टी जितकी सूक्ष्म तितकीच व्यापक होती, असे स्पष्टपणे जाणवते. परंतु, इतक्या अंगांचा बारकाईने व साक्षेपाने विचार करूनही क्षेमेन्द्राचे समाधान झाले नाही. किंबहुना इतका सविस्तर विचार करूनही आपल्या विवेचनात कदाचित् उणेपणा राहिला असेल ह्या धास्तीने क्षेमेन्द्र म्हणतो—

अन्येषु काव्यांगेष्वनयैव दिशा स्वयमौचित्यमुत्प्रेक्षणीयम् । तदुदाहरणान्यानन्त्यान्न प्रदर्शितानीत्यलमतिप्रसंगेन ।

सरलार्थ—ह्याच पद्धतीने इतर काव्यांगांतील औचित्याचा स्वतः विचार करावा. त्यांची उदाहरणे/ असंख्य असल्यामुळे (ती) दाखविली (दिली) नाहीत. असो, अधिक विस्तार नको.

विवरण—क्षेमेन्द्राच्या ह्या उक्तींवरून त्याचा दुराग्रहशून्य स्वभावच दिसून येतो. त्याची आपल्या औचित्यसिद्धान्तावर दृढ श्रद्धा आहे यात शंकाच

नाही. तसेच त्याने तो सिद्धान्त ठासून मांडला आहे यातही शंका नाही. परंतु, तरीदेखील क्षेमेन्द्र ह्या सिद्धान्ताचे प्रतिपादन हटवादीपणाने करतो आहे असे मुळीच वाटत नाही. म्हणूनच, "He dogmatically summarises the cases of application as twenty-seven in number" हे डॉ० दे (Sanskrit Poetics as a Study of Aesthetic, 1963, p. 40) यांचे उद्गार क्षेमेन्द्राला अन्यायकारक आहेत असेच म्हणावे लागते. डॉ० दे समजतात त्याप्रमाणे क्षेमेन्द्र dogmatic असता तर त्याने 'अन्येषु काव्यांगेषु ......' इत्यादी शब्दांनी ग्रंथोपसंहार केलाच नसता. येथल्यासारखीच शब्दरचना सुवृत्ततिलकाच्या २।४३ ह्या श्लोकातही आढळते (अनयैव दिशा सर्वं ज्ञेयं तज्ज्ञैर्यथोचितम् ॥)'काव्यांग' शब्दाचा प्रयोग कविकंठाभरण २।३ व सुवृत्तलिक ३।३ येथेही आढळतो.

उपसंहार-श्लोक—

आसीत्प्रकाशेन्द्र इति प्रकाशः काश्मीरदेशे त्रिदशेश्वरश्रीः ।
अभूद्गृहे यस्य पवित्रसत्रमच्छिन्नमग्रासनमग्रजानाम् ॥
यः श्रीस्वयंभूभवने विचित्रे लेख्यप्रतिष्ठापितमातृचक्रः ।
गोभूमिकृष्णाजिनवेश्मदाता तत्रैव काले तनुमुत्ससर्ज ॥१॥

सरलार्थ—त्रिदशांचा ईश्वर म्हणजे देवांचा प्रमुख जो इन्द्र त्याच्यासारखा ऐश्वर्यसंपन्न, प्रकाशस्वरूप (असा) प्रकाशेन्द्र नामक (पुरुष) काश्मीरात होता. त्याच्या (शब्दशः ज्याच्या) घरी. निरंतर यज्ञयाग चालत असे. (त्यात) ब्राह्मणांना अग्रासन मिळत असे. त्याने (शब्दशः ज्याने) विचित्र, ब्रह्मदेवाच्या देवळात भिंतींवर मातृकांची चित्रे प्रतिष्ठापित केली होती. तो गाई, जमीन, हरिणाचे कातडे, घरे यांचे दान करीत असे. त्याने तेथेच (म्ह० त्या मंदिरातच) कालान्तराने शरीरत्याग केला.

तस्यात्मजः सर्वमनीषिशिष्यः श्रीव्यासदासापरपुण्यनामा ।
क्षेमेन्द्र इत्यक्षयकाव्यकीर्तिश्चक्रे नवौचित्यविचारचर्चाम् ॥
श्रीरत्नसिंहे सुहृदि प्रयाते शार्वं पुरं श्रीविजयेशराज्ञि ।
तदात्मजस्योदयसिंहनाम्नः कृते कृतस्तेन गिरां विचारः ॥२॥

सरलार्थ—त्याचा मुलगा, सर्व विद्वानांचा शिष्य, श्रीव्यासदास हे दुसरे पुण्यमय नाव धारण करणारा व काव्ये लिहून अविनाशी कीर्ती मिळविणारा क्षेमेन्द्र 'औचित्यविषयक विचाराची चर्चा' नामक नवीन ग्रंथ रचिता झाला. मित्र

रत्नसिंहाने शिवलोकी प्रयाण केल्यावर त्याचा मुलगा जो उदयसिंह त्याचेसाठी क्षेमेन्द्राने हा वाग्विचार केला.

क्षेमेन्द्रापूर्वी 'औचित्य हे काव्याचे जीवित होय' हा विचार सिद्धान्तरूपाने, सोदाहरण स्वरूपात कोणीच मांडला नव्हता. हा विचार सिद्धांतरूपाने मांडणारा आद्य साहित्यशास्त्रज्ञ क्षेमेन्द्रच म्हणून तो स्वतःच्या ग्रंथाला 'नवौचित्य विचारचर्चा' असे म्हणतो. आपला औचित्यसिद्धान्त हा अभिनव सिद्धान्त आहे अशी त्याची दृढ धारणा आहे. रत्नसिंह राजा क्षेमेन्द्राचा मित्र होता त्याचे निधन झाल्यावर अनंतराज गादीवर आला. त्याच्या कारकीर्दीत उदयसिंह हा लहान होता. त्याच्या अध्ययनार्थ औचित्यविचार चर्चा हा ग्रंथ क्षेमेन्द्राने लिहिला. उदयसिंह हा क्षेमेन्द्राचा शिष्य असून त्याचे दोन श्लोक क्षेमेन्द्राने आपल्या कविकंठाभरणात (पंचम संधी) उद्धृत केले आहेत. उदयसिंहाने ललित व भक्तिभव नामक दोन महाकाव्ये लिहिल्याचा उल्लेखही तेथेच मिळतो. मात्र राजपुत्राच्या शिक्षणासाठी क्षेमेन्द्राने एक अभिनव ग्रंथ लिहिला ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. प्रस्तुत श्लोकातील 'श्रीविजयेशराशि' ह्या शब्दाबद्दल डॉ०सूर्यकान्त म्हणतात—'विजयेशराशि is incorrect according to Pāṇini; it is mahākaviprayoga! The names Vijayeśa and Ratnasimha do not occur in the Rājataraṅgiṇi. The phrase शार्वं पुरं श्रीविजयेशराशि may refer to a place of pilgrimage called Vijayeśvara or Vijayeśa, modern Bijabehārā between Anantanāga and Srināgar, or शार्वं पुरम् may be modern Sopur and Vijayeśa may be a feudatory King'. (Kṣemendra Studies, 1954, p. 172 footnote).

यस्यासिः परिवारकृत् त्रिभुवनप्रख्यातशीलश्रुतेः
सर्वस्यावनतेन येन नितरां प्राप्ता विशेषोन्नतिः ।
आशाः शीतलतां नयत्यविरतं यस्य प्रतापानल-
स्तस्य श्रीमदनन्तराजनृपतेः काले किलायं कृतः ॥ ३ ॥

इति श्रीप्रकाशेन्द्रात्मजव्यासदासापराख्यश्रीक्षेमेन्द्रकृता औचित्यविचार-चर्चा समाप्ता ॥

सरलार्थ—शील व ज्ञान ह्या बाबतीत तिन्ही लोकात प्रसिद्ध असलेल्या ज्याची तरवार परिवार निर्माण करणारी आहे, ज्याने सर्वांपुढे अत्यंत नम्रतेने

वागून विशेष उत्कर्ष प्राप्त करून घेतला, ज्याचा पराक्रमाग्नी दिशांना नेहमी शीतलता प्रदान करतो त्या महाराज अनंतराज राजाच्या काळात हा ग्रंथ लिहिला. अशा प्रकारे प्रकाशेन्द्राचा पुत्र जो व्यासदास-क्षेमेन्द्र त्याने लिहिलेला 'औचित्यविचारचर्चा' नामक ग्रंथ समाप्त झाला.

विवरण—अनंतराज हा पराक्रमी, सच्छील, ज्ञानसंपन्न व विनम्र होता ह्या गोष्टी प्रस्तुत श्लोकावरून कळतात. अनन्तराजाच्या पराक्रमाचा उल्लेख सुवृत्ततिलकाच्या ३।४० ह्या श्लोकातही (क्षेमेन्द्रेण प्रणयिविपदां हर्तुराश्चर्यकर्तुर्भूभृद्भर्तुर्भुवनजयिनोऽनन्तराजस्य राज्ये ॥) आला आहे. तसेच कविकंठाभरणाच्या समाप्तिपर श्लोकातही अनन्तराज हा पराक्रमी, कीर्तीशाली, ऐश्वर्यसंपन्न व कलियुगातील विष्णू असल्याचे वर्णिले आहे. (काश्मीरेषु पृथुप्रतापसवितुः कीर्त्यंशुतारापतेः । प्रौढारातिवनानलस्य धनदस्येन्द्रस्य भूमण्डले । विश्वाकारवतः पुनः कलियुगे विष्णोरिवोत्साहिनो । राज्ये श्रीमदनन्तराजनृपतेः काव्योदयोऽयंकृतः ॥) एवंच क्षेमेन्द्राने औचित्यविचारचर्चा, कविकंठाभरण व सुवृत्ततिलक हे तिन्ही ग्रंथ अनन्तराजाच्या कारकीर्दीत लिहिले हे स्पष्ट होते. अनन्तराजाने इ. स. १०२८ पासून १०६३ पर्यंत राज्य केले. मात्र क्षेमेन्द्राचे ग्रंथरचनाकार्य अनन्तराजाच्या पश्चात् गादीवर आलेल्या कलश राजाच्या कारकीर्दीतही चालूच होते.

परिशिष्ट अ.

ग्रन्थस्थ कारिकांची अकारानुक्रमणिका

कारिकारंभ	कारिकाक्रमांक	पृष्ठांक	कारिकारंभ	कारिकाक्रमांक	पृष्ठांक
अकदर्थनया	३२	१२७	कृतारिवञ्चने	१	१
अर्थौचित्यवता	१५	३१	कृत्वापि	२	२
अलङ्कारास्त्वलङ्काराः	५	६	चमत्कारं	३१	१२३
अवस्थोचित	३६	१४०	तिलकं बिभ्रती	११	१३
उचितं प्राहुः	७	१०	तेषां परस्पराश्लेषात्	१८	६२
उचितस्थानविन्यस्तै	२५	१०४	देशौचित्येन	२७	११३
उचितस्थानविन्यासाद्	६	८	नाम्ना कर्मानुरूपेण	३८	१४६
उचितार्थविशेषेण	१३	२१	पदे वाक्ये	८	१०
उचितेन	३७	१४३	पूर्णार्थदातुः	३९	१५२
उचितेनैव लिंगेन	२१	९०	प्रतिभाभरणं	३५	१३६
उचितैरेव वचनैः	२२	९२	प्रतिभायां	१०	११
उपसर्गे	९	११	प्रस्तुतार्थोचितः	१४	२७
औचित्यरचितं	१२	१७	यथा मधुरतिक्ताद्याः	१७	६२
औचित्यस्य	३	२	योग्योपसर्ग	२४	१००
कालौचित्येन	२६	१०७	विशेषणैः	२३	९५
काव्यं	३०	१२१	सगुणत्वं	१९	७३
काव्यस्यालम्	४	४	सान्वयं	२०	७६
काव्यार्थः	२९	११८	सारसंग्रहवाक्येन	३४	१३३
कुर्वन्सर्वाशये	१६	३७	स्वभावौचित्य	३३	१३०
कुलोपचितम्	२८	११५			